


[illegible] ग्रन्थमाला, [illegible]

भारत-गौरव-ग्रंथमाला-पुष्प २७ वें.

# लाला लजपतराय

यांचें

# आत्मचरित्र व चरित्र



न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥

—भगवान् श्रीकृष्ण

REFBK-0004373

किंमत २-८-० रु.

# —प्रारंभींचे दोन शब्द—

लालाजींच्या आत्मचरित्राच्या वाचनानें अनेक संशयांचें निरसन होईल. आम्हां महाराष्ट्रीयांच्या मनांत, रूढीपासून च्युत झाल्यास अनर्थ कोसळतील, ब्राह्मणांनीं ब्राह्मणेतरांच्या संगतींत राहिल्यास त्यांचें ब्राह्मणत्व तितकें उज्ज्वल राहाणार नाहीं, त्यांत कांहीं तरी कमीपणा येईल, कदाचित् त्यांच्यांत इतर जातींच्या गुणांचेंच प्राबल्य होईल, सहभोजनानें सहविवाहाचा प्रश्न उद्भवेल, प्रचलित जातिभेद मोडून प्राचीन कालाप्रमाणें गुणकर्मावरून वर्ण ठरवूं लागल्यास सबगोलंकार होऊन हिंदुधर्म नष्ट पावेल, अस्पृश्यांना जवळ केल्यास, एक विशिष्ट धंदा परंपरेनें करीत आल्यामुळें—आमच्या समजाप्रमाणें—त्यांच्या रक्तांत त्या विशिष्ट धंद्यामुळें उत्पन्न झालेले कीटाणू आमच्या रक्तांत घुसतील व एकंदर समाज अस्पृश्यांसारखा होईल, वेदाधिकार सर्वांना दिल्यास काय आपत्ति ओढवेल कोण जाणे, इत्यादि इत्यादि प्रश्नांविषयीं सदोदित काहुर माजलेलें असतें व आमच्या या मनःस्थितीचा इतर धर्मीय फायदा घेत असतांहि आम्ही किंकर्तव्यमूढ होऊन स्वस्थ असतों.

असे हे जटिल प्रश्न कमी जास्त प्रमाणांत सोडविणारा समाज ज्या विभूतीनें स्थापिला व त्याचा पंथ अनुसरून ज्यांनीं ते सोडविण्याचा प्रयत्न करून या प्रश्नांचा उलगडा होऊन हिंदुसमाजांतील सर्व जातींस सारखे हक्क दिले गेल्यास सर्व लोक आपुलकीनें विराट् हिंदुजातीकरितां व धर्माकरितां काय करूं शकतात याचें जिवंत चित्र हिंदुलोकांसमोर खडें केलें; सनातन धर्मीयांना ज्या गोष्टी घडल्यास धर्म बुडेल अशी धास्ती वाटत असते, त्याच गोष्टी अमलांत आणून असल्या गोष्टी केल्यानें धर्म बुडत नसून उलटा तेजस्वी व वर्धिष्णु बनतो हें ज्यांनीं स्वतःच्या उदाहरणानें सर्वांच्या नजरेस आणून दिलें, अशा आर्यसमाजांतील कांहीं थोर व्यक्तींचीं चरित्रें व त्यांनीं केलेली उलथापालथ या पुस्तकांत वाचावयास मिळेल आणि रूढींना चिकटून बसलेल्यांची व रूढींना लाथाडून ईश्वरी आज्ञेप्रमाणें वागणारांची तुलना करावयास सांपडेल.

महाराष्ट्रीयांस अशी तुलना करावयास सांपडावी व त्यांची अवास्तव भीति दूर होऊन सत्यमार्गावर त्यांचें पाऊल पडावें आणि ब्राह्मण ब्राह्मणेतर, स्पृश्य अस्पृश्य इत्यादि वाद मिटले जावे या हेतूनें हें पुस्तक मराठींत आणलें आहे. ईश्वर करो आणि तो हेतु सफल होवो.

रामनवमी, शके १८५३. "राम"

१७९५

# —आभार—

ज्यांच्या प्रोत्साहनानें हें पुस्तक लिहावयास घेतलें गेलें व ज्यांच्या उत्तेजनामुळेंच तें पुरें करून या स्वरूपांत प्रकाशांत आणण्याची उमेद आली अशा अनेक सहृदय प्रेरकांचा मी अत्यंत आभारी आहें. तसेंच हें सर्व ज्यांनीं मराठींत भाषांतर करण्यास परवानगी दिल्यामुळें व आत्मचरित्राचें जरूर तें साहित्य पुरविल्यामुळेंच घडून आलें त्या सर्व्हंटस् ऑफ पीपल सोसायटीतर्फे चाललेल्या 'पंजाबकेसरी' साप्ताहिकाच्या चालकांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

"राम"

१२५८

# लालाजींचें वैशिष्ट्य.

आधुनिक युगाचा एक विशेष त्याची विस्मरणशीलता हा आहे. सिनेमांत ज्याप्रमाणें आपल्या डोळ्यांसमोरून चित्रपट झरझर निघून जातात, त्याप्रमाणें आधुनिक माणसांचें स्मरण फक्त वर्तमानपत्रांतील जाड्या टाइपांतील मथळे वाचीपर्यंतच असतें. दृक्पटलाच्या आंत बहुधा कोणतीहि गोष्ट शिरत नसावी. मेंदूपर्यंत एखादी गोष्ट नेणें आधुनिक माणसास पसंत पडत नाहीं. डोक्याला त्रास कोणीं द्यावा बोवा, असें आधुनिक माणूस नेहमीं म्हणत असतो. स्वतःला कोणत्याहि प्रकारचा त्रास होऊं नये, अशी त्याची खटपट असते. ही त्याची प्रवृत्ति संभाळण्यासारखीच या युगाची रचना करण्यांत आली आहे. शाळेंतील मुलाला स्वतः अर्थ समजून घेण्याचे श्रम सोसत नाहींत, त्याला पुस्तकावर टिप्पणी पाहिजेत! आधुनिक माणूस तारतम्य कधींच शिकत नाहीं, याचें कारण दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याची त्याची संवय. तो जें वर्तमानपत्र वाचतो त्याप्रमाणें त्याचें मत; हें असें कां, असा प्रश्न तो कधीं विचारण्याच्या भानगडींत पडावयाचा नाहीं. विचार करून डोक्यास त्रास होईल ना!

लाला लजपतराय जाऊन एक वर्ष लोटलें, पण राष्ट्राला त्यांची फारशी आठवण राहिलेली दिसत नाहीं. एरवीं त्यांचें संस्थास्मारक करण्यासाठीं पांच लाख रुपयांची मागणी करण्यांत आली होती ती पूर्ण झाल्याशिवाय राहिली नसती! सायमन कमिशनच्या आगमन प्रसंगीं मिळालेल्या पोलिसच्या वेत्रिकाप्रसादामुळें लालाजींवर मरण ओढवलें हें देश एवढ्यांतच विसरला! त्यांच्यावरील या आपत्तीचा सूड घेण्याची कोणती तजवीज करण्यांत आली आहे? त्यांनीं मरण ओढवून घेतलें तें व्यर्थच काय?

लाला लजपतरायांसारखा चौरस देशभक्त दुसरा नाहीं. या चौरसपणामुळें त्यांना लोकमान्यांसारखी लोकप्रियता संपादन करणें शक्य झालें नाहीं. लोकमान्यांनीं पुराणमताभिमानी पक्षाचा पाठिराखेपणा वेळोवेळीं केला; त्यामुळें

महाराष्ट्रांतील खेड्यापाड्यांत राहणारा व शिक्षणांत मागसलेला असा वर्ग नेहमीं त्यांच्या बाजूस राहिला. राजकारण हें लोकांच्या रोजच्या व्यवहारांत अडखळविणारें नसल्यानें सामान्य जनांस लोकमान्यांच्या राजकारणाची अडचण वाटत नव्हती; पण जर त्यांनीं समाजसुधारकाचा अवतार घेतला असता, तर त्यांची बहुतेक लोकप्रियता रसातळास गेली असती, हें निश्चित आहे. लालाजींनीं राजकारणांत क्रांतिकारकांच्या सीमेवर उभें राहून, समाजकारणांतहि तसेंच सीमेवर उभें राहण्याचा उपक्रम केला होता. आपल्या जोरकसपणानें पंजाबांतील आर्यसमाजाची चळवळ त्यांनीं ब्राम्हो किंवा प्रार्थनासमाज यांच्या चळवळींपेक्षां शतपटीनें यशस्वी केली. ब्राम्होसमाजाप्रमाणें हिंदी संस्कृतीचा व धर्माचा पाया त्यांनीं सोडला नाहीं; पण त्याबरोबरच आधुनिक काळाला नडणाऱ्या सर्व गोष्टींची धर्मापासून फारकत करण्याची तजवीज त्यांनीं केली. अस्पृश्यता, पतितपरावर्तन, अनाथपालन, स्त्रीशिक्षण वगैरे प्रश्न आर्यसमाजाइतक्या धडाक्यानें कोणींहि हिंदुस्थानांत धसास लाविलेले नाहींत. पंजाबांतील शिक्षणाचा प्रसार बराचसा आर्यसमाजिस्टांनीं केलेला आहे, हें महशूर आहे. आपल्या शिक्षणसंस्थांना अनाथविद्यार्थिगृहांची जोड दिल्यानें आर्यसमाजाला आपल्या कार्याचें जाळें पसरविण्यास मोठी मदत झाली आहे. आर्यसमाजाच्या अनाथालयांतून बाहेर पडलेले बहुतेक सुशिक्षित त्याचे आजन्म प्रचारक बनतात. याचा अर्थ ते समाजांतील सामान्य धंद्यांत किंवा व्यवहारांत पडत नाहींत असा नव्हे, पण आपला निर्वाहाचा धंदा चालवीत असतांनाच ते समाजाचें कोणतें ना कोणतें तरी कार्य करीतच राहतात. महाराष्ट्रांतील फर्ग्युसन कॉलेजसारख्या संस्थांतून बाहेर पडलेले ग्रॅज्युएट असें कोठलेंहि कार्य करण्यास समर्थ झालेले दिसत नाहींत. महाराष्ट्रीय विद्यार्थ्यांइतके राजकारणाच्या गप्पा मारणारे विद्यार्थी दुसरे नसावे; पण प्रत्यक्ष समाजकार्य करण्यास त्यांतील अगदींच थोडे समर्थ असतात किंवा पुढें येतात. फर्ग्युसन कॉलेजला विठ्ठलराव शिंद्यांचें 'अस्पृश्योद्धारा'चें कार्य, कर्व्यांचें स्त्रीशिक्षणाचें व विधवांचा प्रश्न सोडविण्याचें कार्य, गोखल्यांचें देशांतील अनेक सामाजिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याचें कार्य, कै. अण्णा विजापूरकरांचें 'राष्ट्रीय शिक्षण' कार्य, अशा सर्व कार्यांची जोड दिली असतां जें कार्य घडून आलेलें दिसेल, तें सर्व कार्य एका आर्यसमाजाच्या विविध चळवळींनीं व कार्यशाखांनीं पंजाबांत केलें आहे. या सर्व कार्यांत लालाजींचा हात प्रामुख्यानें होता एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या योग्यतेची योग्य कल्पना येईल. राजकारणांत टिळकांप्रमाणें किंबहुना क्वचित् त्यांच्याहि

पुढें उभें राहून, खेरीज शिंदे, कर्वे, गोखले व विजापूरकर या सर्वांची भूमिका त्यांच्यांत अंशतः एकवटलेली होती. म्हणूनच आम्हीं त्यांस चौरस देशभक्त असें म्हटलें आहे.

हिंदुस्थानांत पुढारी आणि देशभक्त हे शब्द पुष्कळदां एक अर्थानेंच योजण्यांत येतात. एका अर्थी पाहूं गेलें, तर असें सिद्ध करतां येईल कीं, या जगांतील प्रत्येक माणूस जन्मतःच देशभक्त असतो. आपला देश स्वतंत्र असूं नये असें मनांत तरी कोणत्या अधमाला वाटत असतें? त्यांपैकीं कित्येकजण भीतीनें, स्वार्थानें, अधिकारलालसेनें किंवा मानाच्या इच्छेनें मनांतील ही इच्छा बाहेर सांगण्यास न धजोत, पण प्रत्येकास तसें वाटणें ही अत्यंत सरळ गोष्ट आहे. पण एवढ्यावरून आपण प्रत्येकास देशभक्त म्हणत नाहीं. देशाचें नुसतें प्रेम एवढीच गोष्ट देशभक्त नामाभिधान मिळण्याला पुरेशी ठरणार नाहीं. एकदां याच मुद्यावर वाद करतांना एक विद्वान आम्हांस म्हणाले कीं, तुमची देशभक्तीची व्याख्याच आमच्यापेक्षां वेगळी आहे. त्यांच्या मतें सर चिमणलाल, जिन्हा यांसारखे लोकहि देशभक्तच आहेत. आम्हीं आरंभीं वर सांगितलेला अर्थच अभिप्रेत असेल, तर इतरांबरोबर तेहि देशभक्तच ठरतील, हें उघड आहे. पण देशाच्या राजकारणांत भाग घेणें एवढीच गोष्ट देशभक्तिनिदर्शक नाहीं, असें मानणारास वरील सद्गृहस्थांस देशभक्त हें नांव देतां येणार नाहीं. एखाद्या माणसाच्या आयुष्यांतील सर्व गोष्टी जेव्हां देशकल्याणाच्या अनुरोधानें चालतांना दिसतील तेव्हांच त्यास देशभक्त हें नांव देणें योग्य ठरेल. अर्थातच असें करतांना परतंत्र राष्ट्रांतील देशभक्तांना कधीं तरी परकी सत्तेचा जाच जाणवल्याशिवाय राहणार नाहीं. याच दृष्टीनें हिंदुस्थानांत राजद्रोहाचे खटले होणारे सर्व गृहस्थ देशभक्त मानले जाण्याचा प्रघात पडला आहे. लालाजींवर हद्दपारी व स्वदेशगमनबंदी हीं दोन्ही भोगण्याची पाळी आलेली होती. अमेरिकेंत महायुद्धाच्या वेळीं रहावें लागलें असतां, त्यांस किती हाल भोगावे लागले हें थोड्यांसच ठाऊक असेल. लोकमान्य विलायतेस गेले तेव्हांच त्यांच्या कानीं वरील गोष्ट आली व त्या प्रसंगीं त्यांनीं आपल्या जवळ असलेले सर्व पैसे लालाजींकडे पाठवून दिले, असें आम्हीं ऐकलें आहे. अत्यंत आपत्तींत असूनसुद्धां आपलें दैन्य बाहेर न दाखविणारा असा पुरुष विरळा !

लालाजींनीं मोठी प्राप्ती असलेली आपली वकिली सोडून, आपलें सर्वस्व देशासाठीं वेंचलें. त्यांचा साधेपणा व उज्वल चारित्र्य हीं लोकविश्रुतच आहेत. या

बाबतींत त्यांची बरोबरी लोकमान्य किंवा महात्माजी अशा माणसांशींच होण्यासारखी आहे. लोकमान्यांपेक्षांहि लालाजींच्या देशभक्तीचा एक असा विशेष होता कीं, लालाजी देशभक्तींत स्वतःचें अस्तित्व विसरून जात असत. देशसेवा करतांना त्यांची व्यवहारदृष्टि कायम राहूं शकत नसे. लोकमान्य किंवा महात्माजी हे देश-भक्त असले तरी त्यांची व्यवहारदृष्टि कधींहि सुटलेली दिसणार नाहीं. देवाशीं एकरूप होऊन आपलें स्वत्व विसरणारा भक्त जसा वरचढ, तसाच या ठिकाणीं लालाजींचा दर्जा वरचा असें म्हणणें भाग आहे.

आधुनिक सुधारक हे बहुधा शुद्ध बुद्धिवादी असतात. उच्च धर्मवासनेचा किंवा पवित्र सदाचरणाचा आदर्श ते क्वचितच असतात. लालाजींत या दोन्ही गोष्टींचा एकसमयावच्छेदेंकरून समावेश झाला होता. त्यांची धर्मवासना एखाद्या मध्य-युगांतील साधूला शोभण्यासारखी होती. इतकी उत्कटता लोकमान्यांच्या धर्मबुद्धींत होती असें वाटत नाहीं. दुसरें, लोकमान्यांच्या धर्मबुद्धीबद्दल साशंक असणारे अनेक लोक सांपडतील. बऱ्याच वेळीं त्यांचें वर्तन शुद्ध धर्मबुद्धीशीं विसंगत भासे. शंकराचार्यांवर ज्याप्रमाणें ते प्रच्छन्न बौद्ध असल्याबद्दल आरोप केला जातो, त्याप्रमाणेंच लोकमान्यांना मिलस्पेन्सरचेच शिष्य मानणारे बरेच लोक महाराष्ट्रांत आहेत. या बाबतींत आरंभीं तरी त्यांचीं व आगरकरांचीं मतें एकरूप होतीं, अशी किंवदंती आहे. लालाजींवर असा आरोप करतां आला नसता. तसेंच लोकमान्य हे जसे अत्यंत लोकप्रिय होते, तसेच कांहीं लोक त्यांचे अत्यंत द्वेष्टे होते—लोकमान्यांबद्दल कडवा द्वेष बाळगणारे जसे लोक आम्हीं पाहिले आहेत तसे द्वेष्टे आम्हांस अन्यत्र कोठेंहि दिसलेले नाहींत—हीहि गोष्ट महाराष्ट्रांत तरी सांगावयास पाहिजे असें नाहीं. या गोष्टीवरून काय अनुमान निघतें, किंवा त्याचा अर्थ काय लावावयाचा हें प्रत्येक माणसाच्या दृष्टीवर अवलंबून राहील. पण इतकें तरी म्हणणें भाग आहे कीं, असे ज्याचे द्वेष्टे नाहींत तो मनुष्य वेगळ्या कोटींतील व वरच्या कोटींतील समजला पाहिजे. लालाजी किंवा महात्माजी यांचा द्वेष करणारे बहुधा कोणी नाहींत. ही एकच गोष्ट त्यांच्या शुद्ध मनाची व सरळ वर्तनाची साक्ष देण्यास पुरेशी आहे.

व्यक्तिविषयक गुणांकडे पाहिलें तरी लालाजींची विद्वत्ता लोकमान्यांपेक्षां वेगळ्या तऱ्हेची असली, तरी कमी दर्जाची होती असें नाहीं. हिंदुस्थानांत संस्कृतज्ञाला व तज्जन्य विद्वत्तेलाच खरी विद्वत्ता समजण्याचा विशेष प्रघात आहे. ज्याप्रमाणें ऑक्सफर्ड येथें लॅटीन व ग्रीक येत असल्याखेरीज कोणी विद्वान् समजला जात

नसे, त्याप्रमाणेंच हा प्रकार आहे. संस्कृत भाषा ही आर्यसंस्कृति, धर्म, तत्त्वज्ञान वगैरे विषयांशीं एकरूप असल्यानें ब्राह्मणी संस्कृतीच्या परंपरेंत वाढलेल्या समाजांत एतद्विषयक ज्ञान विद्वत्तेचें लक्षण समजलें जावें हें साहजिक आहे. पण या विशिष्ट दृष्टीमुळें आधुनिक शास्त्रांतील पारंगत इसमास विद्वान् न मानण्याचा जो प्रकार बराच आढळण्यांत येतो, तो गैर आहे. उदाहरणार्थ, गोखले लोकमान्यांपेक्षां अर्थशास्त्रांत जास्त पारंगत होते, पण त्यांस कोणी विद्वान् असें विशेषण लावतांना महाराष्ट्रांत क्वचितच आढळे. तीच गोष्ट लालाजींच्या बाबतींत म्हणतां येईल. लालाजींची विद्वत्ता लोकमान्यांप्रमाणें संशोधक स्वरूपाची नव्हती. पण त्यांच्या लेखनाकडे पाहतां त्यांची बुद्धि किंवा ज्ञान कमी दर्जाचीं होतीं, असें म्हणवत नाहीं.

लोकमान्य किंवा महात्माजी या दोघांहि जवळ नसणारा वक्तृत्वगुण लालाजींजवळ होता. हिंदुस्थानांतील इंग्रजी वक्त्यांत त्यांचा नंबर बराच वर लागेल. बंगाली वक्ते बहुधा कृत्रिम दिसतात. वक्तृत्वशास्त्राचा त्यांनीं बराच अभ्यास केला असावा, असा भास होतो. लालाजींच्या वक्तृत्वांत अशी कृत्रिमता मुळींच आढळून येत नसे. त्यांच्या मनाचा सरळपणा वक्तृत्वांतहि तसाच दिसे. मैत्रीला व चार चौघांत बसण्याउठण्याला लालाजी लोकमान्य किंवा महात्माजी यांपेक्षां जास्त चांगले ठरण्यासारखे होते.

असा एकंदर विचार करतां लालाजींचें चरित्र हें अनेक दृष्टींनीं सामान्यजनांसहि बोधप्रद व मार्गदर्शक होणारें आहे. आपल्या अंतिम ध्येयप्रवणतेमुळें महात्माजी किंवा एकांतिकतेमुळें लोकमान्य हे सामान्य जनांना पुढें ठेवण्यासारखे गुरु ठरूं शकत नाहींत. तशी स्थिति लजपतरायांची नाहीं. कोणाहि मनुष्यानें यांचें अनुकरण करावें, असें त्यांचें चरित्र आहे.

भारत-गौरव-ग्रंथमालेच्या चालकांनीं सर्वसाधारण जनतेला सहज आचारणीय अशा या चरित्राला आपल्या मालेंत स्थान देऊन तें महाराष्ट्रीय जनतेच्या आटोक्यांत आणलें आहे. तरी आमचे महाराष्ट्रीय लोक याचा उचित लाभ घेतील अशी आशा आहे.

त्र्यंबक शंकर शेजवलकर.



लाला लजपतराय.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6373
"ग्रंथ शाखा" (ठाणे शहर)

# १. प्रास्ताविक.

१९०७ सालीं मंडाले येथें कारावासांत असतांना स्वतःचा जीवनवृत्तांत लिहिण्याचा विचार पहिल्या प्रथम माझ्या मनांत आला; परंतु त्या वेळीं तो विचार मी अमलांत आणूं शकलों नाहीं. याचें कारण त्याचें हस्तलिखित सरकारच्या हातीं जाऊन त्यामुळें माझ्यावर आणखी आपत्ती ओढवण्याचा संभव होता. माझा जीवनवृत्तांत त्या वेळीं न लिहिण्याला दुसरेंहि एक महत्त्वाचें कारण होतें. ज्या लोकांचा माझ्याशीं संबंध आला होता त्यांचें माझें चरित्र लिहिलें गेल्यानें नुकसान होण्याचा संभव होता. वस्तुस्थिति अशी असली, तरी या विचारानें माझ्या मनावर इतका पगडा बसविला कीं, माझ्या आयुष्यांतील सर्व प्रसंग जींत आले आहेत अशी एक कादंबरी लिहिण्यास मीं सुरवात केली; पण ती पुरी होण्या-पूर्वींच माझी कारागृहांतून सुटका झाली व पुढें ती पूर्ण करण्याचा योग केव्हांहि आला नाहीं.

१९१० सालीं भाई परमानंदांच्या खटल्यांत कदाचित् माझ्या घराचीहि झडती घेतली जाईल अशी शंका वाटून, मीं माझे सर्व कागदपत्र माझ्यापासून दूर केले.

अशा प्रकारें माझे कागदपत्र दूर झाल्यावर ते माझ्या इच्छेविरुद्ध चुलत्याच्या व वडिलांच्या संमतीनें जाळले गेले, असें मला सांगण्यांत आलें. आतां ते खरोखर जाळले कीं काय, हें जरी मी खात्रीपूर्वक सांगूं शकत नसलों, तरी त्यांच्या सांगण्यावर अविश्वास ठेवण्याचें मला कांहींच कारण दिसत नाहीं.

१९१० पासून १९१४ पर्यंत आपली आत्मकथा लिहिण्याचा मीं अनेकदां विचार केला, परंतु सरकारच्या हातांत ती पडली जाईल या भीतीनें प्रत्येक वेळीं मला माझा विचार रहित करावा लागला. पुढें इंग्लंडला जाण्याचें मीं निश्चित केलें व मातृभूमीला परत येण्यापूर्वी आपल्या आयुष्याची कहाणी अक्षरबद्ध करून, तिला कुठें तरी सुरक्षित ठिकाणीं ठेवण्याचा मीं पक्का निश्चय केला. त्या निश्चयाच्या पूर्तीसाठींच आज मी या कार्याला सुरवात करीत आहें. परंतु त्यापूर्वी हा एवढा खटाटोप मी कशाकरितां करीत आहें, हें सांगणें अवश्य आहे.

मजविषयीं माझे देशबंधु वाटेल तें समजोत. वाटल्यास ते मला श्रेष्ठ पुरुष समजोत किंवा एक क्षुद्र आत्मश्लाघी समजोत. परंतु एवढें खरें आहे कीं, देशाच्या घडामोडींत माझा बराच काल गेला असल्यामुळें, पुष्कळशा सुशिक्षित देशबांधवांशीं माझा संबंध आलेला आहे. दुसरें, माझ्या निरीक्षणाखालून गेला नाहीं व ज्यांत मीं थोडा फार भाग घेतला नाहीं असा गेल्या ३२ वर्षांतील राष्ट्रीय चळवळीचा एखादाच अंश असूं शकेल. माझ्या हितशत्रूंच्या म्हणण्याप्रमाणें भिन्न भिन्न समाजांचीं, भिन्न भिन्न चळवळींचीं आणि निरनिराळ्या कार्यांचीं सूत्रें माझ्या हातांत असल्यामुळें, आपल्या देशाचा गेल्या ३२ वर्षांचा इतिहास मला प्रत्यक्ष माहीत आहे. हा इतिहास बनविण्यांत मीं स्वतः थोडासा भाग घेतलेला असून, इतरांनाहि बनवितांना पाहिलेलें आहे. राष्ट्रीय आंदोलनाच्या निरनिराळ्या अवस्था कोणत्या कारणानें प्रभावित झाल्या, त्यांना कोणी चालना दिली आणि त्यांत कसकशीं परिवर्तनें होत गेलीं, हें सर्व मला माहित आहे.

आज माझे कागदपत्र, लेख, रोजनिशा, अस्सल पत्रें वगैरे जीं मीं मुद्दाम जपून ठेविलीं होतीं, तीं जर माझ्यापाशीं असतीं तर मी आपली आत्मकहाणी साधार लिहूं शकलों असतों; परंतु आज तीं सर्व जवळ नसल्यामुळें मला माझ्या स्मरणशक्तीवरच भिस्त ठेऊन आपली जीवनकथा लिहिणें भाग आहे आणि त्यामुळें मी पुढें लिहीत असलेल्या हकीकतीच्या खरेपणाविषयीं माझ्या स्मरणशक्तीशिवाय दुसरा पुरावा देणें मला शक्य नाहीं. राष्ट्रीय आंदोलन कोणकोणत्या परिस्थितींतून

गेलें, या चळवळींत पुढाऱ्यांनीं व इतर कार्यकर्त्यांनीं काय काय चुका केल्या, ऐन परीक्षेच्या वेळीं ते कसे हिणकस ठरले, हें सर्व माझ्या प्रियतम देशाच्या भावी पिढीला कळावें आणि तिनें त्यापासून योग्य बोध घ्यावा, हाच ही आत्मकथा लिहिण्यांत माझा एकमेव हेतु आहे.

आमची चालू परिस्थिति आणखी बरेच दिवस अशीच राहील असें मला वाटतें. कित्येकांना आमची चळवळ यशस्वी होऊन आमचा देश लवकरच स्वतंत्र होईल असें वाटत असतें; परंतु हे विचार मला पटत नाहींत असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागत आहे. सध्यांची धकाधकी बरेच दिवस चालेल असें माझें मत आहे. आमचे प्रतिस्पर्धी जबर आहेत आणि आमचे मित्र फार थोडे व दुर्बल आहेत. दुसरें, राष्ट्रीय आंदोलन ज्या मार्गानें सफल होऊं शकतें त्याची आम्हांला अजून ओळखहि झालेली नाहीं. आमचे घरगुती शत्रू इतके आहेत व आमच्यांत इतके भेद आहेत कीं, ते वाटतात तितके लवकर नष्ट होणें शक्य दिसत नाहीं.

गेल्या सात वर्षांत मीं जें अवलोकिलें, ऐकिलें व अनुभविलें आहे, त्यानें मी आशावादी बनत चाललों आहें. गेल्या दहा वर्षांतील राष्ट्रीय जागृतीच्या कांहीं बाबी आशाजनक व उत्साहवर्धक आहेत यांत शंका नाहीं. परंतु त्याचबरोबर कांहीं निराशाजनकही आहेत हें विसरून चालावयाचें नाहीं.

१९०५ सालीं जोसेफ मॅझिनीचें चरित्र लिहितांना आमच्या राष्ट्रांत इतक्या अल्प अवधींत एवढी जागृति उत्पन्न होईल, असें मला स्वप्नांतसुद्धां वाटलें नाहीं. पण १९०७ सालीं ती तशी झाली असल्याचें माझ्या अनुभवास आलें. १९०५ सालीं स्वातंत्र्याची खरी योग्यता समजून तिच्याकरितां देशांतील नवयुवक आत्म-यज्ञ करण्यास तयार होतील व त्यानें देशांत भयंकर खळबळ उडून सर्वत्र अशांतता माजेल, असें मला वाटत नव्हतें. तो काळ अजून फार दूर आहे असाच माझा समज होता.

हें चरित्र लिहितांना दहा वर्षांचे आंत स्वातंत्र्य ही जगांतील उत्तमोत्तम वस्तु आहे व तिच्या प्राप्तीकरितां करावा तितका त्याग थोडा आहे; हें माझें मत आपल्या आचरणानें सिद्ध करून देणाऱ्या संस्था देशांत स्थापल्या जातील, याची मला कल्पनासुद्धां नव्हती. स्वातंत्र्याची तृष्णा लोकांत किती प्रबळ झालेली आहे व तिचीं पाळेंमुळें किती खोल रुजलेलीं आहेत, हें १९०७ सालीं देशांत जीं

जागृतीचीं चिन्हें दिसूं लागलीं व साधारणपणें इतरत्र व विशेषतः बंगालप्रांतांत ज्या घटना घडून आल्या त्यांनीं सर्वांच्या प्रत्ययास आणून दिलें.

राष्ट्रभक्तीनें प्रेरित होऊन ज्यांनीं इंग्रजांवर व हिंदी देशद्रोह्यांवर हल्ले केले, देशांत अराजकीय चळवळीचा प्रचार केला, व निरनिराळ्या ठिकाणीं गुप्तसमित्यांची स्थापना केली, त्यांना स्वतःला 'दूरदर्शी' व 'नीतिमान्' समजणारे कांहीं स्वयंमन्य देशभक्त कुचकामी समजतात व त्यांच्या कार्याला कवडीचीहि किंमत देऊं इच्छित नाहींत. परंतु यांनीं कांहींहि म्हटलें किंवा दर्शविलें तरी ज्या तरुणांनीं वरील कृत्यें केलीं त्यांच्या ठिकाणीं स्वतःच्या प्राणाची पर्वा न बाळगण्याची बहादुरी, अप्रतिम देशभक्ति, चारित्र्याची उच्चता व पावित्र्य इत्यादि सद्गुण होते, याबद्दल तरी कोणाचें दुमत होईल असें मला वाटत नाहीं.

कदाचित् हे आमचे देशभक्त सरकारकडून व पर्यायानें लोकांकडून सतावले जाण्याच्या भीतीनें जरी आपलें खरें मत प्रकट करूं इच्छित नसले, तरी ज्या बंगाली तरुणांनीं गोस्वामीची हत्या करण्याचा बेत करून तो अमलांत आणला, ते तरुण एक प्रकारें अजरामर झाले आहेत यांत शंका नाहीं. आज त्यांची किंमत होत नसली किंवा आतांपर्यंत झाली नसली, तरी असा एक काळ लवकरच येणार आहे कीं, ज्या वेळीं अखिल भारतवर्ष त्यांच्या समाधीवर फुलें उधळील!

त्याचप्रमाणें १९१२ सालीं ज्या इसमानें दिल्ली दरबारच्या ऐनप्रसंगीं लॉर्ड हार्डिंजवर बॉंब फेंकला त्यानेंहि चिरस्मरणीय कार्य केलें यांत शंका नाहीं. पण एक अतिप्रबल व सुसंघटित साम्राज्य, जवळ सर्व प्रकारचें सामर्थ्य व विपुल धन असूनहि आजतागायत या इसमाचा पत्तासुद्धां लावूं शकण्यास समर्थ झालें नाहीं, ही याहीपेक्षां विशेष गोष्ट होय. हिंदुस्थानच्या आधुनिक इतिहासांतील या व अशा प्रकारच्या इतर सर्व गोष्टी भारतीयांचा उत्साह व उमेद वाढविणाऱ्या आहेत यांत संशय नाहीं.

चालू परिस्थितींतील ही उज्वल बाजू दृष्टिआड करून देशाच्या एकंदर परिस्थितीचें चित्र डोळ्यांपुढें उभें केलें म्हणजे त्यांत जे निरनिराळे प्रकार दिसून येतात त्यांवरून देशाच्या सर्वसाधारण स्थितीचा विचार करणें जरूर आहे.

माझ्या मतें देशाची राजकीय परिस्थिति खालीं दिल्याप्रमाणें आहे.—

१. देशभक्तांची एक लहानशी संख्या देशांत गुप्तसमित्यांचें जाळें विणीत आहे व त्यांच्याद्वारें स्वातंत्र्याचा प्रचार करीत आहे. हे लोक धनहीन परंतु अतिउद्योगी असे तरुण आहेत. यांच्यामध्यें कांहीं असे आहेत कीं, त्यांनीं मनांत आणलें असतें तर कांहीं उद्योगधंदा करून किंवा सरकारी नोकरी करून मुबलक पैसा मिळविला असता. दुसरे कांहीं असे आहेत कीं, चालू राजकीय परिस्थितींत व्यावहारिक दृष्ट्या त्यांच्याकडून कांहींहि होणें शक्य नाहीं.

२. देशांतील सर्वसाधारण जनतेला यांच्याबद्दल सहानुभूति वाटते, पण यांचीं कृत्यें मात्र मूर्खपणाचीं वाटतात.

३. सुशिक्षितांत अनेक प्रकार आढळतात. कांहीं क्रांतिकारकांच्या कृत्यांविषयीं खरोखरीचा अनादर वाटणारे आहेत, तर थोडेसे त्यांच्या कार्यांना फाजील व चालू काळाला नुसतें अनावश्यकच नव्हे तर हानिकारक समजणारे आहेत. आतां असें असलें तरी बहुतेक सुशिक्षितांना यांच्याविषयीं एक प्रकारें सहानुभूति ही असतेच. परंतु आपला जीव व पैसा धोक्यांत घालून यांच्यांत मिसळून यांना यांच्या कृत्यांपासून परावृत्त करणारे किंवा प्रत्यक्ष अशी सहानुभूति दाखविणारे असे फार थोडे सुशिक्षित आढळून येतील.

४. देशांतील अर्धशिक्षित जनता व तिचे नेते दोघेहि भित्रे, स्वार्थी व कुत्सित अंतःकरणाचे असलेले दिसून येतात. यांतील पुष्कळांना आपला देश स्वतंत्र व्हावा असें वाटतें, पण त्यासाठीं धनजनाचा त्याग करण्याला मात्र त्यांची तयारी नाहीं.

सध्यांच्या शिक्षणानें व फॅशननें लोकांना ‘ त्याग ’ करण्यास अयोग्य बनविलें आहे. यांपैकीं पाऊण हिस्सा असे आहेत कीं, त्यांना आपला देश कधीं काळीं तरी स्वतंत्र होईल असें वाटतसुद्धां नाहीं. शेंकडा ९० लोक असे आहेत कीं, हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर त्यांना काय करावें लागेल याची कल्पनाहि नाहीं. मला वाटतें “ आपण सात दिवसांनीं हिंदुस्थान सोडून जाणार ” अशा प्रकारचा जाहीरनामा जर इंग्रजांनीं लावला तर शेंकडा नव्वद लोक त्यांनीं तसें न करण्याची कृपा करावी म्हणून अर्जांवर अर्ज धाडूं लागतील.

आजकाल कांहीं लोक आपल्या भाषणांतून राजभक्तीचें जें अवडंबर माजवितांना दिसतात तें निव्वळ ढोंग आहे. माझ्या मतें शिक्षितांत शेंकडा एकहि

राजभक्त म्हणून मिळणार नाहीं; इतकेंच नव्हे तर दहा हजार सुशिक्षितांतसुद्धां एकादा तरी राजभक्त आढळेल कीं नाहीं याची शंकाच आहे.

आतां एवढें खरें कीं, शेंकडा पन्नास सुशिक्षितांना त्यांच्या हयातीपर्यंत इंग्रजांनीं येथें रहावें असें वाटत असतें. कारण इतकेंच कीं, त्यांचा आजपर्यंतचा काल भोगविलासांत गेला असल्यामुळें राज्यक्रांतीच्या वेळीं ज्या हालअपेष्टा सहन कराव्या लागतात त्या सहन करण्याचें त्राण त्यांच्यांत उरलेलें नाहीं. त्यांनीं आपला सारा काल चैनींत घालविला असल्यामुळें, हत्याराला स्पर्शहि केलेला नसल्यामुळें व खेळांत सुद्धां कधीं कोणाशीं सामना दिलेला नसल्यामुळें, कष्ट सहन करणें म्हणजे काय हेंहि त्यांना समजेनासें झालेलें आहे. इंग्रजी शिकून अनायासें यांनीं पैसा कमविला व त्रासाशिवाय आपलें आयुष्य घालविलें. दुसरें राज्यक्रांतीबरोबर एकंदर समाजाची घडी बिघडते, हें यांना माहीत असल्यामुळें बाहेरून जरी यांनीं स्वातंत्र्याचा पुरस्कार केला, तरी भविष्यकालीन अशांततेचें व कष्टांचें चित्र यांच्या मनश्चक्षूंसमोर उभें राहिलें कीं हे गडबडून जातात. यामुळेंच पराधीनतेंत सुद्धां जर सुखानें व शांतीनें जीवन क्रमितां येऊन ऐश्वर्याचा लाभ होतो, तर स्वातंत्र्याकरितां जाणून बुजून सरकारी नोकरीवर पाणी सोडण्यांत व शांततेचा भंग करण्यांत काय अर्थ आहे असें यांना वाटत असतें, नव्हे अशी यांची ठाम समजूत झालेली असते. एवंच नोकरी चाकरी, धन व ऐषआराम यांचे हे लोक पक्के गुलाम आहेत. यांच्या दृष्टीनें सुग्रास भोजनाला, सुसज्जित दिवाणखान्याला किंवा सुबक मोटारीला जी किंमत आहे ती कांहीं स्वातंत्र्याला नाहीं! अशा लोकांकडून त्यागाची अपेक्षा करावयाची असल्यास इतकीच करणें योग्य होईल कीं, सुट्टीच्या दिवसांत एखाद्या ठिकाणीं जाऊन हे एखादें व्याख्यान झोडतील; परंतु तें व्याख्यानहि असलें देतील कीं, ज्यानें यांच्या नोकरीवर गदा येणार नाहीं किंवा यांच्यावर वरिष्ठांची वक्रदृष्टि होणार नाहीं. फार फार झालें तर हे लोक थोडासा पैसा देतील!

तात्पर्य अशा लोकांचें देशप्रेम खालील गोष्टींवर अवलंबून असतें:—

१. त्यामुळें यांच्या प्राप्तींत कमतरता पडतां कामा नये.

२. त्यामुळें इंग्रजांशीं असलेल्या यांच्या स्नेहसंबंधांत बाधा येतां कामा नये किंवा सरकारदरबारीं असलेल्या मानमरातबांत फरक पडतां कामा नये. इतकेंच

काय पण यांच्याविषयीं इंग्रजांच्या मनांत आपल्या देशाला हे त्यांच्यापेक्षां अधिक चाहतात असला किंतुहि उत्पन्न होण्याचा संभव असेल, तर तसल्या फंदांत ते पडण्याची नुसती इच्छाहि करणार नाहींत.

३. त्यामुळें यांच्या ऐषआरामांत बाधा येतां कामा नये. यांच्या दृष्टीनें आराम याचा अर्थ शरीरस्वास्थ्याला आवश्यक वस्तू इतकाच नसून, ज्यांच्या ज्यांच्यामुळें यांना आनंद होतो त्या त्या वस्तु ' आराम ' या सदरांत प्रविष्ट होतात.

४. त्यामुळें यांच्या भविष्यकालीन उन्नतीला, आकांक्षेला किंवा मनोराज्याला कसल्याही प्रकारची आंच लागतां कामा नये.

वरील वर्णनावरून देशाची सद्यःस्थिति खालीं दिल्याप्रमाणें असलेली दिसून येईलः—

१. **आंग्लविद्याविभूषित लोकः**—यांच्यापैकीं शेंकडा ९९ लोक विचारानें जहाल असून क्रांतिकारी पक्षाच्या सिद्धांतांशीं सहानुभूति ठेवणारे, इंग्रजांवर विश्वास नसणारे व इंग्रजी शासनांत दुःख मानणारे असे आहेत. क्रांतिकारी पक्षाच्या लोकांच्या कृत्यांपासून यांना संतोष होतो, पण त्या कृत्यांची मर्यादा यांच्या ऐष-आरामांत बाधा न येण्याइतकी असावी लागते.

यांच्यापैकीं २५ टक्के असे आहेत कीं, त्यांना राष्ट्राच्या राजकीय परि-स्थितीचा विचार करण्यास वेळ नाहीं. २५ टक्के लोकांना वेळ आहे पण असल्या जंजाळांत पडण्याची इच्छा नाहीं. दुसरे २५ टक्के असले आहेत कीं, ज्यांच्या राष्ट्रसेवेचें वर्णन वर आलेंच आहे. बाकी राहिले २५ टक्के, यांपैकीं १० टक्के देशद्रोही आहेत. फक्त पांचच टक्के सुशिक्षित लोक असे आहेत कीं, जे आपल्या विचारांना आचारांत परिणत करण्याकरितां स्वार्थत्याग करूं शकतात. अर्थात् असल्या त्यागाचें स्वरूप व प्रमाण प्रत्येक व्यक्तीच्या परिस्थितीप्रमाणें भिन्न भिन्न असतें.

२. **जुन्या तऱ्हेचे शिक्षित मुल्लामौलवी व पंडितः**—या लोकांपैकीं २५ टक्के देशद्रोही आहेत. ५० टक्के असे आहेत कीं त्यांना कशाचीच पर्वा वाटत नाहीं. बाकी उरलेल्या २५ टक्के लोकांपासून देशभक्तांनीं मनांत आणल्यास त्यांच्या योग्यतेनुरूप राष्ट्रकार्य करून घेतां होईल.

३. **आमचा व्यापारी वर्गः**—हा वर्ग जुन्या तऱ्हेचाच आहे. यांतल्या शेंकडा नव्याण्णवांना कशाचीच दरकार नाहीं. शेंकड्यांत फक्त एखादाच व्यापारी असा मिळूं शकेल कीं ज्यावर नेत्याचें कांहीं वजन पडूं शकेल.

४. **शेतकरीः**—यांची स्थिति वरच्याप्रमाणेंच आहे.

५. **जहागीरदार व वतनदार**—यांपैकीं जे जुन्या चालीचे आहेत त्यांतील शेंकडा ५० देशद्रोही आहेत. २५ टक्के बेफिकीर आहेत आणि फक्त २५ टक्के असे आहेत कीं त्यांना मनापासून इंग्रज नको आहेत.

देशांतील अगदीं थोडे लोक स्वातंत्र्याकरितां तनमनधनाची होळी करण्यास तयार आहेत, हें सर्वसाधारण जनतेस समजावें, हा वर दिलेल्या निरनिराळ्या स्थितींतील लोकांच्या पृथक्करणाचा मुख्य हेतु आहे.

आतांपर्यंत सर्वसाधारण जनतेंत स्वातंत्र्याची आवड उत्पन्न झालेली नाहीं. क्रांतिकारी लोकांनीं आपल्या उतावळेपणानें व वेडेचारांनीं देशाचें नुकसान केलें, शासकांस जागें केलें व त्यांना अत्याचार करण्याला संधी दिली, अशा प्रकारचे आरोप क्रांतिकारी पक्षावर कांहीं लोक करीत असतात. परंतु परकी लोकांच्या अमलाखालीं जर नुसती शांतताच नांदत राहील व अत्याचार किंवा दडपशाही केली जाणार नाहीं तर तो अंमल जित राष्ट्राला हितावह होणार नाहीं, ही अगदीं साधी गोष्ट या लोकांच्या लक्षांत येत नाहीं, असें म्हणणें भाग आहे. माझ्या मतें या क्रांतिकारी लोकांच्या कृत्यांनीं गेल्या दहा वर्षांत लोकांत जी जागृति उत्पन्न झालेली आहे, तसली जागृति मवाळ लोकांच्या हातून पन्नास वर्षांतही झाली नसती.

राष्ट्राचें उत्थान व पतन कशानें होतें हें सांगणें कठीण आहे. परंतु परकी सत्तेखालच्या चैनीच्या व शांततेच्या काळापेक्षां जित राष्ट्राला हानिकारक असें दुसरें कांहींहि नाहीं, ही गोष्ट साधारण मनुष्यालाहि समजण्यासारखी आहे. क्रांतिकारी पक्षाच्या कार्याचा देशावर जो तात्कालिक परिणाम होतो तो हा कीं प्रथमतः चैतन्य उत्पन्न होतें, नंतर पतन झाल्यासारखें वाटतें, पण अखेरीस प्रत्याघात करण्याची शक्ति राष्ट्रांत उत्पन्न होते.

आजकाल हिंदुस्थानांतील प्रत्येक इसम ढोंगी बनलेला आहे. याचें कारण खरें बोलणें हें हानिकारक होऊन बसलेलें आहे. परकी सत्तेंत ज्यानें त्या सत्तेला नुकसान

पोंचणार नाहीं किंवा जें त्या सत्तेच्या विरुद्ध असणार नाहीं तितकेंच सत्य बोलण्याला अगर लिहिण्याला मुभा असते. कोणतेंही परकी सरकार, ज्यानें त्याच्या कारभाराला किंवा हुकमतीला कमीपणा येण्याचा संभव असतो असल्या सत्याचा प्रसार होऊं देणार नाहीं.

परकी राज्य साम व दण्ड या दोन नीतींचा अंमल आपल्या प्रजेवर लागोपाठ करीत असतें. प्रजेंतील बहुसंख्याकांत चालू राज्यप्रणाली उत्कृष्ट व हितावह आहे, तिच्यांत कसलाहि फरक होणें आपल्याला अनिष्ट आहे, अशा प्रकारचे विचार कायम राखण्यांत परकी सरकाराचा एक प्रकारचा स्वार्थ असतो. कैक वेळ चालू सत्तेखालीं राहिल्यानें आपला जास्त उत्कर्ष होण्याचा संभव आहे, अशा प्रकारचें प्रलोभनहि तें दाखवीत असतें. याच्या उलट जर लोक चालू राज्यप्रणालीचें किंवा सरकाराचें परिवर्तन करूं इच्छितील, तर त्यांना कसें तुडविलें जाईल व स्वतःची उन्नति करून घेण्याची संधी पुन्हां त्यांस कशी दिली जाणार नाहीं, याचें भयानक चित्र त्याच्या नजरेसमोर उभें ठेवण्याची दक्षता परकी सरकार नेहमीं वाळगीत असतें.

इंग्रज सरकारहि याच नीतीचें अनुसरण करीत आलें आहे. वरच्या सारखेच विचार जनसमुदायांत किंवा निरनिराळ्या जातींत वेळोवेळीं फैलावण्याचा त्याचा क्रम चालू आहे. हिंदूंना मुसलमानांची भीति दाखविली जाते तर मुसलमानांना हिंदूंची; शेतकऱ्यांना जमीनदारांची तर जमीनदारांना शेतकऱ्यांची. या परिस्थितींत लोकांच्या नजरेस खरी स्थिति आणून त्यांच्यांत जागृति उत्पन्न करणें हेंच प्रत्येक देशभक्ताचें खरें कर्तव्य आहे. या मार्गांत वेळप्रसंगीं हानी होण्याचाहि संभव आहे. पण 'दुःखाशिवाय सुख नाहीं' हा त्रिकालाबाधित सिद्धांत केव्हांहि विसरतां कामा नये. यःकश्चित बाबतींतसुद्धां जर कष्टाखेरीज फलप्राप्ति होत नाहीं तर स्वातंत्र्यासारख्या अमूल्य रत्नाच्या प्राप्तीची गोष्टच कशाला? इतिहासाकडे नजर फेंकल्यासहि हेंच दिसून येईल. स्वातंत्र्याचा मार्ग सुगम व सरळ नसून तो कांट्यांनीं भरलेला आहे. ज्या लोकांनीं सुखदुःखाला न जुमानतां या खडतर मार्गाचें आक्रमण केलें त्यांच्यावरच स्वतंत्रतादेवी प्रसन्न झाली; इतरांच्यावर नाहीं. आजकालचे सुशिक्षित लोक आपत्तींच्या नुसत्या विचारानेंच कापूं लागतांना दिसतात; अशा स्थितींत 'आम्ही लवकरच स्वतंत्र होऊं' असली फुकाची आशा

बाळगणें हें शेख महंमदी मनोराज्याहून अधिक योग्यतेचें आहे असें निदान मला तरी वाटत नाहीं.

स्वातंत्र्यप्राप्तीकरितां चाललेला सध्यांचा लढा असाच पुष्कळ दिवस चालेल व कदाचित् यांत कैक पिढ्याहि निघून जातील. याकरितां आम्हीं आमच्यापुढें आयर्लंडाचें उदाहरण ठेवणें अवश्य आहे. असल्या प्रकारच्या अनेक वर्षें चालणाऱ्या लढ्यांत लाखों लोकांचे बळी दिले जातील, हजारों हद्दपार केले जातील, लाखों स्त्रिया विधवा होतील आणि दुसरें काय काय होईल हें सांगणें कठीण आहे. असला लढा पुष्कळ कालपर्यंत चालणारा व कष्टदायक असतो हें आम्हीं नेहमीं ध्यानांत ठेवलें पाहिजे व यासाठीं तो पुष्कळ कालपर्यंत चालू राहील व त्याच्या मार्गांत नसतीं विघ्नें येणार नाहींत या दिशेनें प्रत्येक देशभक्तानें आपले प्रयत्न चालू ठेवणें इष्ट आहे. तसेंच तो निदान एक पिढीपर्यंत तरी चालेल इतकी तयारी पहिल्यानेंच करण्याची काळजी पुढाऱ्यांनीं घेतली पाहिजे. कामचलाऊ प्रयत्नानें हें काम होणें नाहीं; कारण त्यानें लोकांत अविश्वास उत्पन्न होण्याचा संभव असतो. यासाठींच स्वातंत्र्यप्राप्तीकरितां श्रद्धेइतकीच दूरदर्शित्वाचीहि जरूरी आहे.

राजकीय स्वातंत्र्याचा लढा हा एक बुद्धिबळाचा खेळ आहे. ज्याप्रमाणें बुद्धिबळाच्या डावांत प्रत्येक बाजू दुसरीवर मात करण्याची इच्छा करीत असते, तोच प्रकार या लढ्यांतहि असतो. बुद्धिबळाच्या डावाप्रमाणें या लढ्यांतहि वारंवार निरनिराळ्या प्रकारें आपलीं मोहरीं मागेंपुढें सरकवावीं लागतात व ठरविलेला बेत रहित करून नव्या रीतीनें डाव खेळावा लागतो.

आंतर्राष्ट्रीय व्यवहारांतहि हीच गोष्ट आढळून येते. या बाबतींतहि एकाच मार्गानें जाऊन चालत नाहीं. वेळोवेळीं परिस्थितीप्रमाणें मार्गांतहि बदल करावा लागतो.

थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे अशा लढ्यांत अंतिम फलाकरितां एकामागून एक अशाप्रकारें पिढ्यांमागून पिढ्यांना आपलें जीवन खर्चीं घालावें लागतें. यासाठींच भावी पिढीला आपल्या पूर्वपिढ्यांच्या कार्याची माहिती असणें जरूर आहे व हाच ही आत्मकथा लिहिण्यांत माझा मुख्य हेतू आहे.

---

[library stamp]

## २. कुलवृत्तांत.

माझ्या बाल्यावस्थेंतील हकीकत संक्षेपानें देण्याचा माझा विचार आहे. माझे वडील जातीनें अग्रवाल वैश्य होते. लुधियानाजवळ असलेल्या फिरोजपुरापाशीं जगरांव नांवाच्या खेड्यांत आमच्या बऱ्याच पिढ्या गेल्या होत्या. याहीपूर्वी मालेरकोटला येथें आमच्या कुलाचें वास्तव्य होतें. इ. स. १८४५ सालीं जानेवारी महिन्यांत लाहोर येथें माझ्या वडिलांचा जन्म झाला. त्यांच्या जन्मदिनींच इंग्रजांनीं फिरोजपूर येथील लढाईंत शिखांचा पराभव केला. माझ्या वडिलांच्या बाल्यावस्थेंत माझे आजोबा इंग्रजांतर्फे एका गांवाचे पटवारी ( कुळकर्णी ) होते. साधारण लिहिण्यावाचण्यापलीकडे त्यांचें शिक्षण झालेलें नव्हतें. माझ्या आजोबांना मीं पाहिलेलें आहे. ते मोठे उद्योगी व साहसी होते. त्यांची शरीरयष्टी विशेष उंच नव्हती. ते हुषार असून स्वभावानें मनमिळाऊ होते. त्यांच्या या स्वभावामुळें इतरांशीं त्यांची मैत्री फार लवकर जमत असे. त्यांचा व्यापार असून आपल्या धंद्यांत ते नेहमीं मग्न असत. धर्मानें ते जैन असून आपल्या धर्मपालनांत ते नेहमीं तत्पर असत. जैनांत बरेच पंथ आहेत, पण त्यांपैकीं ज्या पंथाचे

साधू आपल्या तोंडावर कपड्याची पट्टी बांधतात, त्या पंथाचे माझे आजोबा अनुयायी होते. आपल्या पंथाच्या साधूंच्या समागमाविषयीं त्यांच्या ठायीं उत्कट इच्छा वसत होती व ते त्यांचा यथाशक्ति आदरसत्कारहि करीत असत. अखेर-पर्यंत त्यांचा उद्योगधंदा चालू होता. केवळ एक दिवसाच्या दुखण्यानेंच त्यांची इहलोकींची यात्रा संपली.

माझी आजी और होती. तिच्यासारखी प्रामाणिक व साधी स्त्री आजपर्यंत माझ्या अवलोकनांत आलेली नाहीं. तिचें शिक्षण इतकें झालेलें होतें कीं, तिला फक्त विसापर्यंतच मोजतां येत असे. आपल्या साऱ्या आयुष्यांत त्या माउलीनें कोणतीहि वस्तु कडीकुलपांत ठेवली नाहीं. कसल्याहि प्रकारचा संग्रह करण्याची तिला संवयच नव्हती. या तिच्या स्वभावामुळें माझे आजोबा तिच्याजवळ फारसा पैसा अडका कधींच ठेवीत नसत. तिची रहाणी फार साधी होती. दागिन्यांचा किंवा कपड्यालत्त्याचाहि तिला फारसा षोक नव्हता. कोणतीहि वस्तु दुसऱ्यांना देण्यांत तिला फार आनंद वाटत असे. यामुळें माझे आजोबा जी जी वस्तु घरीं आणीत ती ती गरजेपुरती ठेवून बाकीची ती शेजाऱ्यापाजाऱ्यांला देऊन टाकी. दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यांत तिला एक प्रकारचें सुख वाटत असे. यामुळें कोणाचें कसलेंहि काम असलें तरी ती तें मोठ्या आनंदानें करीत असे. तिचा स्वभाव साधा व मनमिळाऊ असल्यामुळें लहान मुलांबरोबरहि ती कवड्यांनीं खेळत असे व अशा प्रकारें खेळण्यांत तिला कांहींच वाटत नसे.

केव्हां केव्हां ती बेशुद्ध होत असे व अशा वेळीं तिच्या अंगांत माझ्या आजो-बांच्या बहिणीचें भूत संचारत असे असा सर्वसाधारण समज होता. अशा उन्मादा-वस्थेंत केव्हां केव्हां ती बोलूं लागे व त्या वेळीं ती जें कांहीं बोले तें ती स्वतः बोलत नसून आजोबांची बहीणच बोलते अशी सर्वांची समजूत होती. अशा प्रसंगीं घरांतील व आसपासची मंडळी तिच्याभोंवतीं जमे व ज्याला जो प्रश्न विचारा-वासा वाटे तो विचारी व माझी आजी त्याचें उत्तर देई. हा सर्व प्रकार मी कैक वेळां पाहिलेला आहे. माझी आजी कोणत्या कारणानें मूर्च्छित होत असे, हें सांगणें माझ्या सामर्थ्याबाहेरचें आहे. तिची शरीरप्रकृति चांगली होती व त्यामुळें ती सहसा आजारी पडत नसे. तिचा आजार म्हणजे वर सांगितला तेवढाच. असें असलें तरी तिची एकंदर वृत्ति पहातां तिच्या हातून कपटाचरण घडणें अशक्य होतें. तिची प्रकृति धडधाकट असल्यामुळें व तिचें चारित्र्य अत्यंत उज्ज्वल

असल्यामुळें तिच्या मूर्च्छित होण्याची कारणमीमांसा लावणें फार कठिण आहे. या मूर्च्छितावस्थेंत माझी आजी पुढें होणाऱ्या गोष्टी सांगे व इतरहि अशा कांहीं गोष्टी सांगे कीं ज्या सर्व साधारण लोकांस नुसत्या तर्कानें सांगतां येणें शक्य नाहीं. मला आलेल्या अनुभवाप्रमाणें तिनें सांगितलेल्या पुष्कळशा गोष्टी खऱ्या झालेल्या आहेत. इतर कांहीं म्हणोत पण निदान आमच्या घरांतील लोकांचा तरी तिच्या सांगण्यावर विश्वास असे.

वर लिहिल्याप्रमाणें माझ्या वडिलांचा जन्म इ. स. १८४५ सालीं जानेवारी महिन्यांत झाला. पुढें १८४९ त इंग्रजांनीं जरी संपूर्ण पंजाब काबीज केला असला, तरी सतलज नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशावर यापूर्वींच त्यांनीं आपली सत्ता प्रस्थापित केली होती. आमचें राहण्याचें ठिकाणहि याच बाजूला होतें. माझ्या वडिलांचें शिक्षण एका सरकारी फार्शी शाळेंत झालेलें होतें. या शाळेचा मुख्याध्यापक एक मौलवी होता. हा मौलवी मुसलमानी धर्माचा कट्टर अनुयायी असून आपल्या धर्माप्रमाणें स्वतःचें आचरण ठेवण्यांत तो नेहमीं दक्ष असे. त्याचें आचरण इतकें कडकडीत होतें कीं, त्यामुळें त्याच्या धर्माचा प्रभाव शाळेंतील सर्व विद्यार्थ्यांवर पडला होता. या विद्यार्थ्यांपैकीं पुढें बरेचसे मुसलमान झाले व ज्यांनीं आपला धर्म सोडला नाहीं, त्यांचा स्वतःच्या धर्मावरील विश्वास नाहींसा होऊन ते धर्मानें नसले तरी मनानें मुसलमान बनले होते.

माझे वडील या दुसऱ्या प्रकारांत मोडत असत. वरील मौलवीसाहेबांच्या हाताखालीं माझ्या वडिलांचें शिक्षण झाल्यावर पुढें ते दिल्लीच्या नॉर्मल स्कूलमध्यें शिकण्यास गेले. माझे वडील वर्गांत नेहमीं पहिले असत व नॉर्मल स्कूलच्या अंतिम परीक्षेंत सर्व पंजाबप्रांतांत ते पहिले आले. या परीक्षेंत गणित व मनोविज्ञान या विषयांत तर त्यांना पूर्ण गुण मिळाले. लहानपणींच त्यांना वाचनाची गोडी लागली व ती अखेरपर्यंत कायम राहिली. आजला त्यांचें वय सत्तर वर्षांचें आहे व येत्या जानेवारींत त्यांना एकात्तरावें लागेल. परंतु या वार्धक्यावस्थेंतहि त्यांचें वाचन चालूच असतें. हिंदी, फार्शी, उर्दू किंवा गुरुमुखी या भाषांतील एखादें पुस्तक किंवा वर्तमानपत्र मिळण्याचा अवकाश कीं तें अथपासून इतीपर्यंत वाचल्याशिवाय ते आजहि सोडीत नाहींत. त्यांना फक्त वाचनाचेंच तेवढें एक व्यसन आहे व त्याखेरीज त्यांचा एकहि क्षण जात नाहीं. वेळेवर नवीन असें कांहीं न आढळल्यास

ते स्वतःजवळील जुनीं पुस्तकेंच पुन्हां वाचूं लागतात. साधारणपणें कोणत्याहि विषयावरचीं पुस्तकें वाचण्यास त्यांना कंटाळा येत नाहीं, पण त्यांतल्या त्यांत धर्म व इतिहास हे दोन विषय त्यांच्या फार आवडीचे आहेत. धर्मासंबंधाचें त्यांचें ज्ञान फार विस्तृत व खोल आहे. इस्लाम, हिंदु, ख्रिस्ती, जैन, बौद्ध इत्यादि धर्मांचा त्यांनीं चांगला अभ्यास केलेला आहे. कुराणाचीं तर त्यांनीं अनेक पारायणें केलीं आहेत. तसेंच उपनिषदांचेंहि त्यांनीं अनेकदां आलोडन केलेलें आहे. याखेरीज बायबल, आणि जैन व बौद्ध या दोन धर्मांचे धर्मग्रंथहि बरेच वेळां त्यांच्या अवलोकनाखालून गेलेले आहेत. निरनिराळ्या धर्मांच्या वर लिहिलेल्या मुख्य ग्रंथांशिवाय त्या त्या धर्मांतील इतर ग्रंथहि त्यांच्या निरीक्षणाखालून गेलेले आहेत.

वयाच्या पन्नासाव्या वर्षापर्यंत इस्लाम धर्मावर त्यांचा पूर्ण विश्वास होता. ते नियमानें रोज नमाज पडत, रोजे पाळीत व नेहमीं मौलवींबरोबर संभाषण करीत बसत. परंतु मध्यंतरीं ज्या वेळीं सर सैयद अहमदखाननें * धार्मिक व

---

* गेल्या शतकांत उत्तर हिंदुस्थानांत जे वजनदार मुसलमान पुढारी होऊन गेले, त्यांत सर सैयद अहमदखान यांचें नांव सर्वश्रेष्ठ आहे. यांचें घराणें दिल्लीस बादशहाच्या दरबारीं घरगुती कामावर होतें. त्यांचे वडील तेथील नामधारी बादशाहाच्या हाताखालींच होते. पण सैयद अहमद मात्र इंग्रजीशाहींत शिरस्तेदार झाले. तरीहि त्यांना नामधारी बादशहानें त्यांची वडिलोपार्जित पदवी ' आरिफ-इ-जंग ' ही दिली होती. ५७ सालच्या बंडांत तात्पुरते ते बादशाही बाजूस होते; परंतु इंग्रजांशीं मिळतें घेण्यांत त्यांनीं सफाई दाखविल्यामुळें ते इंग्रज सरकारच्या राज्यांत माननीय ठरले. हिंदी राष्ट्रीय चळवळीच्या दृष्टीनें पहातां त्यांचें नांव मुसलमानांचा सवतासुभा निर्माण करणाऱ्यांमध्यें आद्य आहे. अलीगडचें विख्यात कॉलेज त्यांनीं स्थापिलें. धर्माच्या पायावर आयुष्याची उभारणी झाली पाहिजे, असें त्यांचें स्पष्ट मत होतें. अर्थातच हिंदी मुसलमान मुसलमानी धर्म विसरत चालले होते त्याचें पुनरुज्जीवन करण्याची व्यवस्था त्यांनीं केली. मात्र आधुनिक कांहीं माथेफिरूंप्रमाणें त्यांच्यांत कडवेपणा नव्हता. त्यांचें कॉलेज न निघतें तर हिंदी मुसलमान आधुनिक हिंदूंप्रमाणें धर्माच्या बाबतींत उदासीन बनून, हिंदु मुसलमानांचा धार्मिक व राजकीय प्रश्न उपस्थितच झाला नसता.

सामाजिक प्रचारास सुरवात केली, तेव्हां त्याचे लेख यांच्या वाचनांत आले व त्या वेळेपासून हे त्याचे अनुयायी बनले. वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत ते सैयद-साहेबांचे अनुयायी राहिले. सैयदसाहेबांचा पंथ प्रकृतिवादी म्हणून समजला जात असे. सैयदसाहेबांचे अनुयायी असतांना माझे वडील हिंदुधर्म व आर्यसमाज या दोहोंचेही कट्टर शत्रु होते व वेळोवेळीं ब्राह्मसमाजाच्या पत्रांतून त्यांचा खरपूस समाचार घेत असत. परंतु पुढें त्यांचे चिरंजीवच (मी) जेव्हां आर्यसमाजी झाले व त्यामुळें हिंदुधर्मावर निरनिराळ्या प्रकारें प्रकाश पाडणारें वाङ्मय जेव्हां त्यांच्या वाचनांत येऊं लागलें, तेव्हां त्यांचे आचारविचार बदलण्यास सुरवात झाली व हळू हळू ते वेदान्ती बनले. आजला ते स्वतःला वेदान्ताचे अनुयायी म्हणवितात. परंतु असें असलें तरी मुसलमानी धर्मग्रंथांविषयीं एके काळीं वाटत असलेली पूज्यबुद्धि त्यांच्या ठायीं आजहि कायम आहे.

## ३. माझी आई.

माझे वडील रोज नियमानें नमाज पढत, रोजे पाळीत, कुराणाचें पारायण करीत इत्यादि त्यांच्याविषयींची हकीकत वाचून कोणालाहि ते मुसलमान कसे झाले नाहींत, याबद्दल एक प्रकारें आश्चर्य वाटल्याखेरीज रहाणार नाहीं. वास्तविक ते केव्हांच मुसलमान झाले असते व मी व आमचा परिवार आजला मुसलमान असता; पण ही सर्व आपत्ति टाळण्याचें सारें श्रेय माझ्या आईला आहे. लग्न झाल्यानंतर थोड्याच दिवसांत माझे वडील मनानें मुसलमान बनले असून, त्यांचें त्या धर्मावर अतिशय प्रेम बसलें असल्याचें तिच्या दृष्टोत्पत्तीस आलें. हें त्यांचें मुसलमानी धर्मावरील प्रेम पाहून, कोणत्याहि कारणानें त्यांना उघडपणें मुसलमान बनण्याची संधी मिळूं नये म्हणून ती फार जपून वागूं लागली. हिंदु राहून व हिंदूचा वेष ठेवून जोंपर्यंत माझे वडील आपल्या आवडत्या धर्माचें पालन करीत होते, तोंपर्यंत ती साध्वी त्यांच्या धर्माचरणाचे आड केव्हांच आली नाहीं. उलट आपला पति आपल्या धर्माविरुद्ध वागत असतांनासुद्धां तिनें त्याची सेवा करावी आणि त्याचे भलतेच आचारविचार निमूटपणें सहन करावे. केव्हां केव्हां

माझ्या वडिलांचे मुसलमान मित्र आमच्या घरीं जेवावयास रहात असत. अशा प्रसंगीं मनांतून वाईट वाटत असलें, तरी आपल्या पतीला तें दिसूं नये म्हणून ती त्यांचीं उष्टीं ताटें स्वतः उचली व स्वतःच घांशीत असे. मात्र ज्या ताटांत मुसलमान जेवीत असत, तीं ताटें अग्नींत घालून ती आपल्या मतानें शुद्ध करून घेई. आम्ही धर्मानें जैन होतों हें वर सांगितलेंच आहे. जैन-धर्माचें अहिंसा हें मुख्य तत्त्व. पण माझे वडील मनानें व आचारानें मुसलमान बनले असल्यामुळें, केव्हां केव्हां आमच्या घरीं मांस शिजविलें जाई व कधीं कधीं मुसलमानांकडून शिजवून आणिलें जाई. स्वतःच्या धर्माविरुद्ध असला भयंकर अनाचार घडत असतांहि माझी आई कांहींच बोलत नसे. उलट ती वडिलांच्या मनाप्रमाणें वागून त्यांना सदोदित खुष ठेवण्याचा प्रयत्न करी. माझ्या आईचा स्वभाव फार तापट होता. तिला आपल्या शब्दाविरुद्ध कोणीं बोललेलें खपत नसे. परंतु स्वतःच्या मुलांवरील व पतीवरील प्रेमामुळेंच ज्या गोष्टींविषयीं तिला अतिशय तिट्कारा होता त्याहि ती निमूटपणें सहन करीत असे. माझ्या आजोळचा धर्म शीख होता. माझे आजोबा, आजी, मामा वगैरे सर्व शीख होते. त्या धर्माच्या रीतीप्रमाणें त्यांच्या डोक्यावर लांब केंस होते. ते रोज नियमानें जपजीचा* पाठ करीत असत. माझें आजीवळ शीख धर्माला मानणारें असलें तरी हिंदु धर्माप्रमाणें सर्व सणवार व रीतिरिवाज तेथें पाळले जात असत. मात्र अशा सणावारांत हिंदु धर्माप्रमाणें एखाद्या प्रतिमेच्या पूजेऐवजीं ग्रंथसाहेबाचीच पूजा केली जात असे. माझ्या आजोबांचा एक भाऊ ग्रंथी* होता. माझी आजी दररोज पहांटेस उठून

---

* शीखांच्या धर्मग्रंथाला आदिग्रंथ किंवा ग्रंथसाहेब असें नांव आहे. हा ग्रंथ म्हणजे एका लेखकाचें लेखन नसून त्यांत अनेक गुरु, भगत व साधू यांच्या वेदान्तपर, ईश्वरभक्तिपर, मानवजीवनरहस्यपर, सदाचार उपदेशपर वगैरे कवितांचा संग्रह केलेला आहे. या आदिग्रंथाचें विवेचन करणाराला **ग्रंथी** किंवा ग्यानी ऊर्फ ज्ञानी असें म्हणतात. आदिग्रंथाचें संकलन मूळ शीखांचा पांचवा गुरु अर्जुन यानें सन १६०० च्या सुमारास केलें असलें तरी त्यांत नंतरच्या गुरूंच्याहि कांहीं काव्याचा अंतर्भाव मागाहून करण्यांत आला. या आदिग्रंथाचा प्रस्तावनारूप भाग धर्मसंस्थापक नानककृत अभंगांसारख्या कवितेचा असून त्यास जप किंवा **जपजी** अशी संज्ञा आहे. हा भाग प्रत्येक शीखास पाठ म्हणतां आलाच पाहिजे.

सूर्योदयापर्यंत जपजीचा पाठ करीत बसत असे. तात्पर्य माझ्या आजोळचे सर्व लोक धर्मानें व कर्मानें कट्टर शीख होते व त्यांना मुसलमान लोकांविषयीं व त्यांच्या धर्माविषयीं अतिशय तिट्कारा होता. पण नवलाची गोष्ट हीं कीं, अशा या कट्टर शीख धर्मी कुटुंबांतील एका मुलीचा संबंध दैवयोगानें अशा इसमाशीं कायमचा जडला गेला कीं, जो मुसलमान धर्म तेवढाच खरा धर्म म्हणून मानणारा, मुसलमानांशींच दोस्ती ठेवणारा आणि घटकोघटकीं त्यांच्या मुलीला मी मुसलमान होतों म्हणून धमकी देणारा असा होता.

मुसलमान लोक आपल्या धर्माविषयीं किती कट्टर असतात, आपल्या धर्माचा फैलाव करणें हें ते आपलें कसें परम पवित्र कर्तव्य समजतात व त्याकरितां किती जिवापाड मेहनत करतात आणि अशी एखादी सुवर्णसंधी प्राप्त होऊन एखादा इसम त्यांच्या तावडींत सांपडतांच तो हातांतून निसटूं नये म्हणून ते डोळ्यांत तेल घालून कसे जपत असतात याचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर उभें राहिलें, म्हणजे माझ्या वडिलांवर त्यांच्या चाळीस वर्षांच्या हयातींत मुसलमान व्हावें म्हणून त्यांनीं किती निकड लावली असेल, किती वजन टाकलें असेल, किती प्रलोभनें दाखविलीं असतील, परोपरीनें किती विनविलें असेल याविषयीं पुसटशी कल्पना मला होऊं शकते व असल्या भयंकर परिस्थितींत ते मुसलमान कसे झाले नाहींत, याबद्दल मलासुद्धां फार आश्चर्य वाटूं लागतें. पण वाचकहो, या सर्व प्रकारच्या जाळ्यांत न सांपडण्याचें खरें श्रेय माझ्या आईलाच आहे. त्या माउलीमुळेंच आजला आम्ही हिंदु म्हणून राहिलों आहों. माझ्या लहानपणीं वडिलांच्या वर लिहिलेल्या अनाचारांमुळें दुःखित होऊन व दुसरा कांहीं उपाय न सुचून ओक्साबोक्सीं रडतांना अनेक वेळां मीं तिला पाहिलेलें आहे. केव्हां केव्हां पतीच्या अनाचारामुळें वैतागून त्या माउलीनें कैक दिवस उपवासहि केले आहेत. एखाद वेळ

---

प्रत्येक शीखानें रोज प्रातःकाळीं त्याचें पारायण करावयाचें असतें. यांत अडतीस अभंग किंवा दोहरे असून शेवटीं अर्जुनकृत एक श्लोक आहे. शीख लोक जपजीला आदिग्रंथाची किल्ली व सार समजतात. आदिग्रंथांत नानकप्रभृति शीख गुरूंच्या कवितांखेरीज महाराष्ट्रीय साधु नामदेव, कबीर, जयदेव, रामानंद, सूरदास, रविदास, पीपा, फरीद प्रभृति अनेक साधुसंतांच्या वचनांचा संग्रह करण्यांत आला आहे. त्यामुळें आदिग्रंथ समजण्यास अनेक भाषांच्या जुन्या रूपांचें ज्ञान अवश्य पाहिजे.

दुःख अनिवार झालें म्हणजे ती साध्वी आम्हांला आपल्या पोटाशीं धरून स्वतःच्या मनाला धीर देई. अशा वेळीं तिच्या नेत्रांतून सारखा अश्रुप्रवाह चालू असे. अशा प्रकारचीं दुःखें सहन करीत असूनहि त्या माउलीच्या मनांत पतीला सोडून जाण्याचा विचार केव्हांहि आला नाहीं; इतकेंच नव्हे तर माझ्या वडिलांपासून दूर अशी ती केव्हांहि फार दिवस राहिली नाहीं.

हिंदु धर्म व रीतिरिवाज इत्यादींची माझे वडील नेहमीं चेष्टा करीत असत. केव्हां केव्हां हिंदु देवदेवतांविषयींहि ते कांहीं तरी भलतेंच बोलत असत. सणावाराच्या दिवशीं होणाऱ्या कसल्याहि प्रकारच्या पूजेअर्चेंत ते कधींहि भाग घेत नसत. उलट असले प्रकार आपल्या घरीं पाळले जाणेंहि त्यांना पसंत नव्हतें. परंतु माझी आई वडिलांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून हिंदु या नात्यानें सर्व प्रकारचे रीतिरिवाज पाळीत असे. ती प्रत्येक सण साजरा करी, पूजाअर्चा करी व श्राद्धहि घालीत असे. पण हे सर्व प्रकार माझ्या वडिलांच्या नकळत तिला करावे लागत. केव्हां केव्हां ती घराचीं दारें लावून घेई व माझे वडील येण्यापूर्वी असले विधी आटोपून घेई. परंतु एकाद वेळीं मध्यंतरींच माझे वडील घरीं येत त्या वेळीं किंवा आमच्यापैकीं कोणी तरी ते आल्यावर कौतुकानें घरांत काय चाललें होतें हें सांगे, तेव्हां त्यांना आपली बायको आपल्या नकळत मूर्तिपूजा करते असें कळे. अशा वेळीं आईवर ते अतिशय संतापत व त्या भरांत तोंडाला येईल तें बोलत. परंतु माझी आई हें सर्व सहन करी व अतिशयच झालें तर रडून रडून आपल्या मनाचें सांत्वन करून घेई.

माझे वडील मुसलमान न होण्याला आणखीहि एक कारण होतें. त्यांना ठाऊक होतें कीं, आपण मुसलमान झाल्यास आपली बायको मुलांना घेऊन आपल्या सासऱ्याकडे किंवा बापाकडे निघून जाईल, पण ती प्राणांतींहि मुसलमान म्हणून होणार नाहीं. आपला पति मनानें व कृतीनें मुसलमानाप्रमाणें वागत असून उघडपणें मुसलमान कां होत नाहीं याचें हें कारण माझ्या आईच्याही लक्षांत येऊन चुकलें होतें व त्यामुळेंच ती माझ्या वडिलांच्या बोलण्याचालण्याकडे दुर्लक्ष करून सर्व कांहीं सहन करीत असे. उलट, वर म्हटल्याप्रमाणें ती त्यांच्या धार्मिक स्वातंत्र्याच्या आड केव्हांहि येत नसे व आपल्या मनाच्या व विश्वासाच्या विरुद्ध त्यांना खुशाल वागूं देत असे. माझ्या आईच्या या प्रकारें वागण्यांतील

शहाणपणाचें व वरील सर्व प्रकार सहन करण्यांतील सहनशीलतेचें यथायोग्य वर्णन करणें माझ्या आटोक्याबाहेरचें आहे.

माझे वडील मानी असल्यामुळें त्यांची नोकरी नेहमीं अनिश्चित असे. दुसरें त्यांचा पगारहि बेताचाच असल्यामुळें आम्हां सर्वांचें तेवढया तुटपुंज्या रकमेंत पालनपोषण करणें फार त्रासाचें होतें. आजला जेव्हां जेव्हां याविषयीं मी विचार करूं लागतों, तेव्हां तेव्हां माझ्या आईच्या थोरवीची योग्य जाणीव होऊन माझें अंतःकरण आदरानें भरून येतें व अशा माउलीची योग्य प्रशंसा करण्यास मी अयोग्य आहें, असें वाटूं लागतें.

ज्या वेळीं माझा जन्म झाला त्या वेळीं माझ्या वडिलांना २५ रु. पगार मिळत होता. ते फार्शी शिकवीत असत. स्वभावानें मानी असल्यामुळें व कोणाची खुशामत करणें त्यांना आवडत नसल्यामुळें सुमारें दहा पंधरा वर्षांत त्यांच्या वेतनांत कवडीचीही वाढ झाली नाहीं. माझी आई या पंचवीस रुपयांतच घरचा सारा कारभार, सणवार, दानधर्म व आपल्या दर्जाप्रमाणें मुलांबाळांना कपडेलत्तें वगैरे करीत असे. माझ्या वडिलांचें वेतन पस्तीस रुपयांपेक्षां केव्हांहि जास्त वाढलें नाहीं. त्यांच्या नोकरीच्या अखेरीच्या सात आठ वर्षांत फक्त दोन वेळां त्यांना पांच पांच रुपयांची वढती मिळाली. या वेळीं मी एकोणीस वर्षांचा झालों होतों व थोडीफार कमाईहि करूं लागलों होतों. मी कमाऊं लागल्यावर आमची सांपत्तिक स्थिति सुधारूं लागली. माझी आई अशिक्षित होती, हें वर सांगितलेंच आहे. माझ्या वडिलांनीं व मीं कैक वेळ तिला शिकविण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा कांहींहि उपयोग झाला नाहीं. कारण एक तर तिला घरच्या कामाकाजापुढें वेळ मिळत नसे, आणि दुसरें ती वारंवार आजारीहि पडत असे. तिला एकंदर दहा मुलें झालीं; पण तिच्या अंतकालीं त्यांतील चार मुलगे व दोन मुली अशीं फक्त सहाच हयात होतीं.

## ४. माझें प्राथमिक शिक्षण.

माझें आरंभींचें शिक्षण थोडें वडिलांपाशीं आणि थोडें शाळेंत व मकतबमध्यें* असें झालें. या शिक्षणाचा सारा काळ कसबा रोपड येथेंच व्यतीत झाला. माझे वडीलहि येथेंच फार्शीचे अध्यापक होते. साधारणपणें वर्गात माझा पहिला नंबर असे व वार्षिक परीक्षेंतहि मला बरींच इनामें मिळत. वर्गात वयानें मी सर्वांपेक्षां लहान असल्यामुळें मास्तरांचें माझ्यावर विशेष प्रेम असे व त्यांना माझ्याविषयीं एक प्रकारें कौतुकहि वाटत असे. तेराव्या वर्षीं मी मिडल स्कूलची परीक्षा पास झालों व उच्च शिक्षणाकरतां लाहोर शहरीं आलों. येथें आल्यावर मला दरमहा ७ रुपयांची शिष्यवृत्ति मिळाली. शिष्यवृत्ति मिळतांच मी दिल्लीला आलों व तेथें शिकण्यास सुरवात केली. सुमारें आठ महिने मी दिल्लींत होतों. परंतु या अल्प अवधींत मी वारंवार आजारी पडलों. माझें बालपण आजारांतच गेलेलें आहे. पहिलीं आठ वर्षें ज्या रोपड गांवीं गेलीं, तें रोपड गांव हिंवतापाचें माहेरघर होतें. वर्षांतून सहा महिने तेथें तापाची सांथ चालू असे.

* मशिदीला जोडून असलेली शाळा.

केव्हां केव्हां आमच्या घरची सर्व मंडळी एकदम तापानें आजारी पडे. अशा रोगट हवेंत राहिल्यामुळें माझी प्लीहा वरीच वाढलेली होती. दिल्लीला येऊनहि आजारीपणांतून माझी सुटका झाली नाहीं. येथें मी छात्रालयांत रहात असें. दिल्लीचें एकंदर हवामान माझ्या प्रकृतीला मुळींच मानवलें नाहीं. वर म्हटल्याप्रमाणें येथें मी फक्त आठच महिने होतों, पण त्यांपैकीं जवळ जवळ चार महिने आजारीपणांत गेले. या ठिकाणचेहि शिक्षक माझ्यावर खुष असत. येथें येऊन सहा महिने होतांच माझ्या वडिलांची सिमल्यास बदली झाली. दिल्ली-पेक्षां तेथील हवा एकंदरींत चांगली, पण रहाणी फार खर्चाची असल्यामुळें आम्हां सर्वांना तेथें रहावयास जाणें शक्य नव्हतें. वडिलांची बदली झाल्यावर माझी आई मुलांबाळांसह जगरांवला गेली व दिल्लीची हवा मानवत नसल्यामुळें मीहि लवकरच दिल्ली सोडून आईजवळ गेलों.

माझा विवाह बाराव्या वर्षी झाला होता. या वेळीं माझें वय १४॥ वर्षांचें होतें. हा वेळपर्यंत मीं आपल्या पत्नीला पाहिलेलें नव्हतें किंवा आमचें बोल-भाषणही झालेलें नव्हतें. जगरांवला आल्यावर माझी पत्नीहि तेथें आली. या वर्षांचे (१८७९) बाकीचे दिवस मी जगरांव येथेंच घालविले. पुढें १८८० च्या सुरवातीला लुधियाना येथील मिशन स्कूलमध्यें मीं आपलें नांव घातलें. माझी तरतरी पाहून तेथील हेडमास्तरांनीं मला शिष्यवृत्ति देण्यास सुरवात केली. या ठिकाणींहि आजारीपणानें माझी पाठ पुरविली व त्यामुळें येथेंहि तीन महिन्यांहून अधिक मी राहूं शकलों नाहीं. सुदैवानें याच वेळीं माझ्या वडिलांची अंबाला शहरीं बदली झाली व आम्ही सर्व त्यांच्याजवळ रहावयास गेलों. अद्यापिहि माझें नष्टचर्य संपलें नव्हतें. येथें येऊन दोन महिने होतात न होतात तोंच मी पुन्हां आजारी पडलों. या खेपेला जवळ जवळ तीन महिने मी बिछान्या-वर पडून होतों. दोन तीन वेळ डॉक्टरनें चीरफाडहि केली, पण त्याचा कांहीं उप-योग झाला नाहीं. तापानें तर माझा पिच्छाच चालविला होता. रात्रंदिवस माझ्या शुश्रूषेंत आई व वडील मग्न असत. या वेळीं त्यांच्या कष्टाला पारावार नव्हती. बिचाऱ्यांना नेहमींचीं कामें संभाळून शिवाय माझी शुश्रूषा करावी लागे. याखेरीज माझें काय होतें म्हणून धास्ती वाटे ती निराळीच. ज्या ज्या वेळीं माझ्याकरितां त्यांना त्या वेळीं सहन कराव्या लागलेल्या कष्टांचें स्मरण होतें त्या त्या वेळीं माझें मलाच फार वाईट वाटतें.

सारा पावसाळा अशा रीतीनें गेला. या वर्षी दोन तीनदां सतत चौदा पंधरा दिवस सारखा मुसळधार पाऊस पडला. ज्या घरांत आम्हीं रहात होतों तें घर बरेंच मोठें असून ओळखीमुळें थोड्याशा सवलतीनें मिळालें होतें. पण तें नवें असल्यामुळें व या वर्षी पाऊसहि फार पडल्यामुळें सारखें गळत होतें. कैक वेळां या ठिकाणाहून त्या ठिकाणीं खाटा उचलून ठेवण्यांतच रात्रीच्या रात्री आईला व बाबांना जागून काढाव्या लागल्या. अशा प्रकारें सर्व घरभर गळत असल्यामुळें बिचाऱ्या आईला ओलीं लांकडें घेऊनच स्वयंपाक करावा लागे. चारी बाजूंनीं अशी कष्टप्रद स्थिति असतांहि त्या माउलीला मदतीला म्हणून नोकरचाकर किंवा दुसरें कोणीहि नव्हतें. आईची ही स्थिति, तर वडिलांना सहा तास शाळेंत शिकवावें लागे आणि घरीं आल्यावर विश्रांतीऐवजीं माझी सेवाशुश्रूषा करावी लागे. माझ्या आईबापांच्या हयातींत माझ्यामुळें त्यांना त्रासच झालेला आहे. माझ्यापासून त्यांना सुख असें फार थोडें लाभलें आहे. पण या वर्षी माझ्यामुळें त्यांना जे कष्ट सहन करावे लागले ते मी आजन्म विसरणार नाहीं.

पावसाळ्याच्या अखेरीस मला बरें वाटूं लागलें व पुढें दोन तीन महिन्यांच्या अवधींत एन्ट्रन्स परीक्षेची मीं तयारी केली. परीक्षेसाठीं मी लाहोरास आलों. लाहोरास ही माझी दुसरी खेप होती. पहिली १८७८ सालीं झाली व ही दुसरी १८८० त झाली. माझें पुढील आयुष्य लाहोरांत जावयाचें असून लाहोराशीं माझा विशेष संबंध जडणार आहे याची या वेळीं मला कल्पनादेखील नव्हती.

त्या वेळचें लाहोर फार निराळें होतें. त्या वेळीं तेथें आजच्या इतक्या शिक्षणसंस्था नव्हत्या कीं इतकी साफसफाईहि नव्हती. ज्या वेळीं मी स्टेशनावर उतरलों आणि एका हेलकऱ्याच्या स्वाधीन आपलें सामानसुमान केलें त्या वेळीं स्टेशनवरील पोलिसानें प्रवाशांना आपल्या सामानावर नजर ठेवण्याबद्दल व हेलकऱ्यांविषयीं सावध रहाण्याबद्दल दिलेला इषारा आजहि मला आठवतो. पोलिसाचे ते शब्द ऐकून मला भीति वाटूं लागली आणि माझा हेलकरी ज्या ज्या वेळीं अरुंद व अंधेऱ्या गल्ल्यांतून जाऊं लागे त्या त्या वेळीं आतां हा आपल्या हातावर तुरी देतो कीं काय अशी शंका वाटून, माझें मन खालीं वर होऊं लागे. परंतु माझी ही सर्व भीति फुकट होती. त्या वेळीं पाश्चात्य सुधारणेला नुसती

सुरवातच झालेली होती; हल्लींप्रमाणें तिचा प्रसार खेड्यापाड्यापर्यंत झालेला नव्हता. सुदैवानें माझा हेलकरी एक पहाडी हिंदु होता व आजच्याप्रमाणें त्या लोकांना त्या वेळीं पाश्चात्य सुधारणेचें वारें लागलेलें नव्हतें.

लाहोर शहरांत माझ्या वडिलांचे दोन स्नेही होते. एक पंडित शिवनारायण व दुसरे लाला भवानीदास. यांपैकीं लाला भवानीदास हे एम.ए.चा अभ्यास करीत होते. ते कॉलेजच्या छात्रालयांतच रहात असत. यांचें प्राथमिक शिक्षण माझ्या वडिलांच्या हाताखालीं झालें होतें व त्यामुळें त्यांच्यावर यांची एक प्रकारें श्रद्धा बसलेली होती. मी त्यांच्या वसतिगृहांत जातांच त्यांनीं माझें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. त्यांच्याजवळ राहिल्यानें मला माझ्या अभ्यासांत त्यांची फार मदत झाली. इलम तबईविषयीं* त्यांनीं मला खास टिप्पणी लिहून दिल्या. हा वेळपर्यंत पदार्थविज्ञान-शास्त्राचें फक्त एक लहानसेंच पुस्तक माझ्या अवलोकनांत आलें होतें. त्या विषयासंबंधाच्या यंत्रांचें मला दर्शनहि झालेलें नव्हतें. पण येथें राहिल्यामुळें भवानीदासांनीं तीं सर्व मला दाखविलीं व इतर रीतीनेंहि त्यांनीं मला फार मदत केली.

त्या वेळीं पंजाब विश्वविद्यालय बाल्यावस्थेंत होतें. हें विश्वविद्यालय नुकतेंच सुरू झालेलें असल्यामुळें त्याला सर्व अधिकार मिळाले नव्हते. या वेळीं डॉक्टर लाइटनर हेच त्याचे कर्तेधर्ते होते. यांची इच्छा याला पौर्वात्य विद्यांचें केंद्र बनविण्याची होती. तात्पर्य, इतर विश्वविद्यालयांपेक्षां हें निराळें बनविण्याकडे त्यांचा कल असून सर्व विषयांचें शिक्षण मातृभाषेंतून देण्याचा त्यांचा विचार होता. पण पास होणाऱ्या विद्यार्थ्यांस मात्र इतर विद्यालयांतील पदव्यांप्रमाणेंच पदव्या मिळाव्या असें त्यांस वाटत होतें.

त्या वेळीं एन्ट्रन्स परीक्षेला आठ विषय घ्यावे लागत; पण परिक्षा मात्र तितकीशी कडक नसे. त्या काळीं सगळ्या उत्तर हिंदुस्थानांत कलकत्ता युनिव्हर्सिटीचा अति बोलबोला होता. परंतु डॉक्टरसाहेब पुष्कळशा शिष्यवृत्त्या देत असल्यामुळें पुष्कळ विद्यार्थी कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला न बसतां पंजाब युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला बसत. मी मात्र दोन्ही परीक्षांना बसलों. कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला इंग्रजी, इतिहास भूगोल, गणित व फार्शी ( संस्कृत किंवा

* प्राकृतिक भूगोल.

अरवी ) असे चारच विषय असत. पंजाब युनिव्हर्सिटीच्या परीक्षेला या चारां-खेरीज पदार्थविज्ञान, उर्दू व अरबी हे विषय मीं घेतले होते.

वडिलांजवळ मी अरबी शिकलों होतों. मुसलमानी धर्मावर त्यांचें प्रेम असल्यामुळें अरबी भाषा त्यांची फार आवडती होती. मला अरबी शिकविण्यासाठीं त्यांनीं फार श्रम घेतले, पण त्यांचें चीज झालें नाहीं. अरबी भाषा शिकण्यांत व तिचे व्याकरणाचे नियम घोकण्यांत माझें अर्धें अधिक बालपण जाऊनहि व्हावा तसा फायदा झाला नाहीं. कारण अरवी भाषा शिकण्याकडे माझें मनच लागत नसे. केवळ नशिबाची परीक्षा पाहण्यासाठींच मीं परीक्षेच्या विषयांत तिचा समावेश केला होता, पण ऐन वेळीं कोरा पेपर देऊन मला दिवाणखान्याबाहेर पडावें लागलें. तोंडी परीक्षेंत मात्र १५ पैकीं १३ मार्क मिळाले. पदार्थविज्ञानाचीहि हीच स्थिति होती. असो. जानेवारींत ( १८८० ) परीक्षेचा निकाल लागला व मी दोन्ही परीक्षांत पास झालों. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या परीक्षेंत मी प्रथम श्रेणींत पास झालों आणि पंजाब युनिव्हर्सिटींतून पास झालेल्या १०० विद्यार्थ्यांत माझा ५३ वा नंबर लागला.

## ५. माझें उच्च शिक्षण.

माझी एन्ट्रन्स परीक्षा पास होतांच मला उच्च शिक्षण कसें मिळेल हा प्रश्न माझ्या वडिलांपुढें उभा राहिला. मला उच्च शिक्षण मिळावें अशी त्यांची फार इच्छा होती, पण स्वतःचें वेतन अति अल्प असल्यामुळें माझ्या शिक्षणाचा खर्च कसा चालवावा या एकाच विचारानें ते ग्रस्त झाले होते. शेवटीं कांहीं झालें तरी मला उच्च शिक्षण देण्याचा त्यांचा ठाम निश्चय झाला व त्याप्रमाणें मी फेब्रुवारी (१८८१) महिन्यांत लाहोरास आलों. मागील खेपेस परीक्षेसाठीं म्हणून लाहोरास आलों असतां ज्या छात्रालयांत मी उतरलों होतों, त्याच छात्रालयांत या खेपेसहि उतरलों. त्या वेळीं लाहोरांत आजच्याप्रमाणें पुष्कळ कॉलेजें नसून फक्त एकच कॉलेज होतें व तेंहि सरकारी होतें. त्या काळीं कॉलेजाची फी दरमहा दोन रुपये होती व वसतिगृहांत रहाण्याबद्दल दरमहा एक रुपया द्यावा लागत असे. आमचें वसतिगृह तीन लहान लहान बंगल्यांचें बनलेलें होतें. त्यांपैकीं दोन बंगले एका ओळींत होते व ते आजहि पहावयास मिळतात. हे दोन बंगले सध्यां दयानंद अँग्लो वेदिक कॉलेजांत सामील झालेले आहेत. यांपैकीं एका बंगल्यांत हल्लीं

लाला हंसराज रहातात व दुसऱ्यांत प्रोफेसर देवीदयाळजी असतात. तिसरा बंगला कॉलेजापाशींच होता, पण आज त्याचा मागमूसहि राहिलेला नाहीं. वसतिगृहाची व्यवस्था फार वाईट होती. जेवणाखाणाची व्यवस्था विद्यार्थ्यांवर सोंपविलेली असून साफसफाई बिलकुल नव्हती. त्यांतल्यात्यांत स्वयंपाकघर व शौचकूप यां-विषयीं तर कांहीं न लिहिणेंच बरें.

मीं आपलें नांव कॉलेजांत घातलें त्या वेळीं माझें वय सोळा वर्षांचें होतें. कॉलेजांतहि वयानें मी सर्वांहून लहान होतों. वर लिहिल्याप्रमाणें आमची स्थिति गरिबीची असल्यामुळें येथें आल्यावर केव्हां केव्हां मला जेवणाचीहि पंचाईत पडूं लागली. या त्रासामुळें माझे डोळे सारखे दुखूं लागले. अशा स्थितींत मी कसेबसे दोन तीन महिने काढले. अखेरीस पुष्कळ खटपट केल्यानंतर मला सात रुपयांची शिष्यवृत्ति मिळाली.

घर सोडतांना माझा विचार एखादी पदवी मिळवावी असा होता; पण येथें आल्यावर बरोबरच्या सोबत्यांच्या आग्रहानें मी आपलें नांव कायद्याच्या (Law) वर्गांत दाखल केलें. मला मिळत असलेल्या शिष्यवृत्तीच्या सात रुपयांपैकीं दोन रुपये कॉलेजची फी व तीन रुपये कायद्याच्या वर्गाची फी म्हणून द्यावे लागत. बाकी राहिलेल्या दोन रुपयांपैकीं एक रुपया वसतिगृहाच्या भाड्यांत जाई व फक्त एक रुपया माझ्याजवळ शिल्लक राही. याशिवाय माझे वडील मोठ्या मुष्कि-लीनें मला दर महिन्याला सात आठ रुपये पाठवीत असत व यांतच कसा तरी मी आपला जेवणाखाणाचा व इतर खर्च भागवीत असें. कायद्याच्या अभ्यासाचीं पुस्तकें घेण्यास पुष्कळ पैशांची जरूर होती; पण फारच जरुरीचीं पुस्तकें मीं कशीं तरी अति अल्प किंमतींत मिळविलीं. हीं सर्व नवीं घेण्याच्या भानगडींत न पडतां जुनींच घेतलीं होतीं व जीं जुनीं मिळण्यासारखीं नव्हतीं व ज्यांच्या किंमती फार होत्या, त्यांच्या बाबतींत आपल्या सोबत्यांवर अवलंबून राहिलों. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे विकत अशीं मीं फारच थोडीं पुस्तकें घेतलीं व याच्या त्याच्यापासून घेऊनच कसा तरी मी आपला अभ्यास चालविला. माझ्या वडिलांना ही सर्व परिस्थिति कळविली असती तर त्यांनीं वाटेल तें करून किंवा प्रसंगीं कर्ज काढूनहि पैसे पाठविले असते; पण घरची एकंदर परिस्थिति मला माहीत असल्या-मुळें मी तसें केलें नाहीं व त्यांच्याचप्रमाणें मीहि कसे तरी दिवस ढकलूं लागलों.

पहिल्या वर्षी कायद्याच्या पहिल्या परीक्षेकरितां (मुख्त्यारी *) मी फार श्रम केले. या परिश्रमानें मला कावीळ (Jaundice) झाली. हें सबंध वर्ष मी फार

---

*आमच्याकडे पूर्वी होत असलेल्या डिस्ट्रिक्ट प्लीडरच्या परीक्षेसारखी परीक्षा.

हालांत काढलें. वर्षभर तापाची सांथ चालू असल्यामुळें परीक्षेची वेळ येतांच आम्हीं सर्वांनीं "तापाच्या सांथीनें आमची परीक्षेची तयारी झालेली नाहीं, तरी परीक्षा पुढें ढकलावी" म्हणून विश्वविद्यालयाला अर्ज केला. आमची विनंति मान्य केली गेली व परीक्षा दोन महिने पुढें लांबली. म्हणजे डिसेंबरांत होणारी परीक्षा फेब्रुवारींत झाली.

सुदैवानें मी परीक्षेंत पास झालों व त्यामुळें मला स्वतःविषयीं एकप्रकारें आत्मविश्वास वाटूं लागला. यापुढें मीं वकिलीच्या अभ्यासास सुरवात केली. परंतु दुर्दैवानें असे कांहीं प्रसंग उपस्थित झाले कीं, त्यामुळें या बाबतींत मी यशस्वी होऊं शकलों नाहीं. १८८२ च्या सुरवातीला हिंदी कीं उर्दू हा प्रश्न उपस्थित झाला व त्यांत माझे जवळ जवळ दोन महिने गेले. याशिवाय सबंध वर्षभर मला बारीकसा ताप येतच होता. दुसरें आमचें राष्ट्र व धर्म यांच्या सद्यःस्थितीच्या विचारानें माझ्या मनांत ठाणें दिल्यामुळें अभ्यासाचीं पुस्तकें वाचावयाचीं सोडून मी भलतींच पुस्तकें वाचूं लागलों. अखेरीस या सर्वांचा परिणाम जो व्हावयाचा तोच झाला. या वेळच्या ( १८८२ नव्हेंबर ) परीक्षेंत मी नापास झालों व त्यामुळें जानेवारी महिन्यांत मुख्त्यारी चालविण्याचा परवाना घेऊन मला जगरांव गांठावें लागलें. या प्रकारें माझ्या नियमित रीतीनें चाललेल्या शिक्षणाची इतिश्री झाली.

साधारणपणें मी दोन वर्षें कॉलेजांत काढलीं. यापैकीं बराचसा काळ कायद्याच्या अभ्यासांत, आजारीपणांत व देशसेवेचे प्राथमिक धडे घेण्यांत गेला. कॉलेजांतील सर्व अध्यापकांचें माझ्यावर प्रेम होतें व त्यांना माझ्याबद्दल कौतुकहि वाटत असे. परंतु त्यांतहि गणिताचे प्रोफेसर बाबू शशिभूषण मुकर्जी व प्रोफेसर अर्जुन यांचें माझ्यावर विशेष प्रेम होतें.

या वेळीं पुढील इसम माझे सहाध्यायी होते—( १ ) पं. गुरुदत्त, एम्. ए., ( २ ) लाला हंसराज, बी. ए., ( ३ ) राय शिवनाथसाहेब इंजीनियर, ( ४ ) दिवाण नरेंद्रनाथ साहेब, एम्. ए. व ( ५ ) प्रो. रुचिराम सहानी, एम्. ए. यांपैकीं पहिल्या तिघांशीं माझी अतिशय सलगी होती व ती आमरण कायम राहिली. पहिल्या दोघांनीं माझ्यांत परिवर्तन घडवून आणलें व मला आजच्या दर्जाला येण्यास फार साहाय्य केलें. ही सर्व माहिती पुढें ओघानें येणार असल्यामुळें वाचकांना ती आपोआपच कळेल.

## ६. आर्यसमाजानें मला काय शिकविलें ?

मागील प्रकरणांत माझी कायद्याची परीक्षा कोणत्या कारणास्तव नापास झाली हें सांगितलें आहे. याच सुमारास ब्राह्मसमाजाच्या तिन्ही शाखांत वादविवाद चालू होता व सहजासहजीं तो मला वाचावयास मिळाला. हा सर्व वादविवाद वाचून ब्राह्मसमाजाविषयीं माझा प्रतिकूल ग्रह झाला.

आदि–ब्राह्मसमाजाच्या वाङ्मयाच्या वाचनानें ख्रिस्तीधर्माचा पोकळपणा मला कळून चुकला. बाबू केशवचंद्र सेन व त्यांचे अनुयायी यांचे लेखांनीं मनुष्याला ईश्वरप्रणीत ज्ञानाची ( इलहाम ) किती जरूर आहे हें समजलें व साधारण–ब्राह्म-समाजाचें वाङ्मय वाचून बाबू केशवचंद्र सेन यांनीं स्वतःस देवदूत म्हणवून घेणें कसें हास्यास्पद आहे हें कळून चुकलें.

या वेळीं मला पुरीं अठरा वर्षेंहि झालीं नव्हतीं व माझें वाचनसुद्धां फारसें झालेलें नव्हतें; तरी पण या वादविवादाच्या वाचनानें माझ्या अंतःकरणांत अतिशय खळवळ उत्पन्न झाली; माझें मन उदास झालें व एकप्रकारें तें ब्राह्मसमाजापासून पराङ्मुख झालें.

कॉलेजांत असल्या वेळेपासून पं. गुरुदत्त व लाला हंसराज यांच्याशीं माझा संबंध आलेला होता व त्यांच्या संगतींत आर्यसमाजाचीं मतें राष्ट्रीय संस्कृतीला

धरून असल्याचें पाहून मी त्यांचा चाहता बनलों होतों. पण माझे वडील आर्य-समाजाचे कट्टे विरोधक असल्यामुळें समाजमंदिरांत पाय ठेवण्याचें धाडस मला झालें नाहीं. त्या दिवसांत मी दररोज घडणाऱ्या विशेष गोष्टी नियमानें आपल्या दैनंदिनींत ( Diary ) लिहून ठेवीत असें. आजला जर ती असती तर त्या वेळची माझी मानसिक स्थिति त्या वेळच्याच शब्दांत देतां आली असती. पण दुर्दैवानें इतर कागदपत्रांबरोबर तीहि भस्मसात् केली गेल्या-मुळें, माझ्या स्मरणशक्तीवरच भिस्त ठेवून मला त्या वेळची माहिती द्यावी लागत आहे.

माझ्या आजपर्यंतच्या एकंदर आयुष्यांतलीं जीं दोन वर्षें लाहोर येथील कॉलेजांत गेलीं, तीं माझा जीवनौघ बदलणारीं झालीं आहेत. आज बत्तीस वर्षांनंतरसुद्धां मी आत्मपरीक्षण करूं लागलों तरी, त्या वेळीं माझ्या आचारांस व विचारांस जें विशिष्ट वळण लागलें होतें तेंच आजहि कायम आहे असें मला दिसून येतें. सर्वांना माहीत असलेलें माझें सार्वजनिक चरित्र व माझ्या भावना त्या दोन वर्षांच्या अवधींतच निश्चित केल्या गेल्या. यावरून गेल्या बत्तीस वर्षांत माझ्या विचारांत कांहीं परिवर्तन झालें नाहीं किंवा मी नवीन असें कांहीं शिकलों नाहीं, असें समजण्याचें कारण नाहीं. भावार्थ इतकाच कीं, त्या दोन वर्षांत माझ्या जीवनाला जें एक विशिष्ट वळण लागलें, तेंच इतक्या कालावधी-नंतरहि कायम राहिलेलें आहे.

याच कालांत हिंदुधर्माशीं माझा कायमचा संबंध जडला गेला. प्राचीन आर्यसंस्कृतीचें वास्तविक महत्त्व याच कालांत मला उमजलें व पुढें हीच संस्कृती माझ्या आयुष्याचें ध्येय बनली. माझ्या जीवनाचें उद्दिष्ट काय असावें हेंहि याच वेळीं मला समजून आलें व तें आचरणांत आणण्यालाहि याच कालांत सुरवात झाली. आजहि या बाबतींत लेशमात्रसुद्धां फरक झालेला नाहीं. त्या दोन वर्षांच्या अल्पा-वधींत हिंदुस्थानचें प्राचीन वैभव, ऐतिहासिक कालांतील अपूर्व घटना व त्याची सध्यांची असहाय स्थिति याविषयींचे विचार मनांत येऊन व त्यांचीं वर्णनें वाचून मी कैक वेळां रडलों असल्याचें मला आजहि चांगलें आठवतें. याच काळांत बऱ्या-चशा मोठ्या लोकांचीं चरित्रें माझ्या अवलोकनाखालून गेलीं; आणि या सर्वांचा परिणाम असा झाला कीं, आपल्या जीवनाचा बराचसा भाग हिंदुधर्माचें वास्तविक

महत्त्व लोकांच्या निदर्शनास आणण्यांत, त्याचा प्रचार करण्यांत व हिंदु लोकांची सेवा करण्यांत घालविण्याचा मी निश्चय केला. यावरून या दोन वर्षांत हिंदुधर्मावर व हिंदुजातीवर प्रेम करण्याचें व तिची सेवा करण्याचें एवढेंच शिकलों, असें कोणी समजूं नये. हिंदुस्थान देशाला त्याच्या सांप्रतच्या गुलामगिरीच्या स्थितींतून मुक्त करून इतर स्वतंत्र देशांच्या दर्जाला आणून ठेवण्याची उत्कट लालसा याच कालांत माझ्या ठिकाणीं उद्भवली व माझ्या पुढील जीवनांत इतरांबरोबर तिचाही विकास झाला.

१८८२ सालीं नवंबर किंवा डिसेंबर महिन्यांत मी पहिल्या प्रथम आर्यसमाजमंदिरांत पाऊल ठेवलें. त्या वेळीं समाजाचा वार्षिकोत्सव चालू असून त्या दिवशीं स्व. लाला मदनसिंह, बी. ए., यांचें व्याख्यान होतें. मदनसिंहांचें माझ्यावर अतिशय प्रेम असल्यामुळें त्यांनीं लिहून आणलेलें आपलें व्याख्यान मला दाखविलें व त्याविषयीं माझा अभिप्राय विचारला. मला तें पसंत पडलें. यानंतर मी खालीं येत असतां लाला सांईदासजींनीं माझा हात धरला व बाजूस नेऊन ते म्हणाले, "तूं आम्हांला येऊन मिळावें अशी आमची फार फार इच्छा आहे." वाचकहो, तो प्रसंग मीं केव्हांही विसरणें शक्य नाहीं. माझ्याशीं बोलत असतांना माझे विचार समजून घेण्यासाठीं त्यांनीं माझ्या चेहऱ्यावर आपली तीक्ष्ण नजर लावली होती व आपला एक हात माझ्या खांद्यावर ठेवला होता. मी म्हटलें, "सांईजी, मी आपल्यांतलाच आहें." माझ्या मुखांतून इतके शब्द बाहेर पडतांच त्यांनीं सभासद बनविण्याचा फार्म मागविला व तो माझ्यासमोर ठेवला. हा सर्व प्रकार पाहून मी थोडासा गोंधळलों. माझी ती अवस्था पाहून ते म्हणाले, "यावर तुझी सही घेतल्याशिवाय मी कांहीं आज तुला सोडणार नाहीं." लगेच मीं त्या फार्मवर सही केली. या वेळीं त्यांच्या चेहऱ्यावर जी आनंदाची आभा पसरलेली दिसत होती तिचें वर्णन करणें कठीण आहे. त्यांचा चेहरा पाहणारास जणूं काय त्यांना हिंदुस्थानाची बादशाहीच प्राप्त झाली आहे असें वाटलें असतें. त्यांनीं गुरुदत्तांना बोलावूं धाडलें व ते आल्यावर मी समाजाचा सभासद झाल्याचें त्यांना सांगून मला त्यांच्या स्वाधीन केलें. माझ्या सभासद होण्यानें गुरुदत्तहि आनंदित झाले. असो. लाला मदनसिंहांचें व्याख्यान संपतांच मला व पं. गुरुदत्तांना व्यासपीठावर उभें केलें गेलें व आम्हांला दोन शब्द बोलण्यास सांगितलें. आमचें भाषण ऐकून

लोक फार खूष झाले व त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट केला. लोकांनीं दिलेल्या टाळ्यांनीं माझ्या मनावर मद्यासारखी धुंदी चढली. आपल्या व्याख्यानाचा लोकांवर झालेला हा परिणाम पाहून मला फार आनंद झाला व त्या आनंदांतच गर्क होऊन मीं आपल्या घरीं गेलों.

याप्रमाणें १८८२ च्या नवंबर किंवा डिसेंबर महिन्यांत आर्यसमाजरूपी नावेंत मीं आपलें पाऊल टाकलें. त्या वेळीं ती फारच लहान होती. आज बत्तीस वर्षांच्या कालावधीनंतर तिचें प्रचंड जहाजांत रूपांतर झालेलें आहे. माझ्या मतें आर्यसमाज ही हिंदूंच्या जातीयत्वाची नाव होय. त्या वेळीं ती एकाकी असून तिचा आकारहि एखाद्या लहानशा होडीएवढा होता; पण आतां हिंदु लोकांत स्वतःविषयीं इतका अभिमान उत्पन्न झाला आहे कीं, जातीयत्वाचें पूर्वींचें होडीचें स्वरूप पार बदलून जाऊन कैक जहाजांनीं युक्त अशा प्रचंड काफिल्याचें स्वरूप त्याला प्राप्त झालें आहे; आणि या काफिल्यांत आर्यसमाजरूपी जहाजाला अग्रस्थान प्राप्त झालेलें आहे.

गेल्या बत्तीस वर्षांत आर्यसमाजांत दाखल झाल्याबद्दल मला केव्हांहि खेद वाटला नाहीं. उलट माझें आर्यसमाजी बनणें ही माझ्या जीवनांतील एक महत्त्वाची व माझा जीवनौघ बदलणारी ( Turning point ) गोष्ट होय असेंच मला वाटत आलें आहे; आणि ज्या ज्या वेळीं या गोष्टीचें मला स्मरण होतें त्या त्या वेळीं मला एक प्रकारचें समाधान व अभिमान वाटत असतो.

१९०९ सालीं हद्दपारीच्या शिक्षेंतून सुटका होऊन परत आपल्या मातृभूमींत पाय ठेवल्यावर लाहोर आर्यसमाजांत जें मीं पहिलें व्याख्यान दिलें त्या वेळीं मीं पुढील आशयाचे उद्गार काढले होतेः—

" माझ्यांत जे दुर्गुण किंवा वाईट भाग आहे तो माझा स्वतःचा किंवा आनुवंशिक किंवा माझ्या पूर्वजन्माच्या कर्मांचें फळ आहे; परंतु याच्या उलट माझ्यांत जो उत्तम किंवा प्रशंसनीय भाग आहे तो सर्व आर्यसमाजाच्या शिकवणीपासून प्राप्त झालेला आहे व त्याला आर्यसमाजच कारणीभूत आहे. आर्यसमाजानें मला वैदिक धर्मावर प्रेम करण्यास शिकविलें, प्राचीन संस्कृतीचें महत्त्व दाखविलें, प्राचीनकाळच्या आर्यांशीं माझा संबंध जोडला, व मला एकप्रकारें त्यांचा भक्त व सेवक बनविलें. आर्यसमाजानेंच मला

स्वतःच्या हिंदु जातीवर प्रेम करण्यास शिकविलें व त्यानेंच तिच्यासाठीं आपलें सर्वस्व अर्पण करण्याचा मार्ग मला दाखविला. आर्यसमाजानेंच माझ्यांत सत्य धर्मा-विषयीं व स्वतंत्रतेविषयीं प्रखर लालसा उत्पन्न केली व त्यानेंच मला संगठित रहाण्याचा धडा शिकविला. समाज, धर्म व देश यांचा आदर व सेवा करणें जरूर आहे व अशा प्रकारें सेवा करीत असतां जो इसम आत्ममाहुति देतो व नानाप्रकारचीं दुःखें सहन करतो तोच स्वर्गाचा अधिकारी बनतो इत्यादि तत्त्वें मी आर्यसमाजापासूनच शिकलों. थोडक्यांत समाजांत प्रविष्ट झाल्यावर समाजीयां-पासूनच लोकसेवेचे सर्व प्रकारचे धडे मला मिळाले. याच ठिकाणीं मला जिवश्च-कंठश्च मित्र लाभले व येथेंच सार्वजनिक आयुष्यांतील पवित्रतम आचरणाचे नमुने माझ्या पाहण्यांत आले. अशा प्रकारें आर्यसमाजाचे माझ्यावर अगणित उपकार झालेले आहेत व माझें सर्वस्व जरी या उपकारांप्रीत्यर्थ खर्चिलें गेलें तरीहि या उप-कारांची भरपाई होणें शक्य नाहीं. दुर्दैवानें आर्यसमाजांत माझा प्रवेश न होता तर आजला माझी स्थिति काय असती तें फक्त ईश्वरच जाणे; परंतु ज्या स्वरूपांत मी आज येथें उपस्थित झालों आहें त्या स्वरूपांत मी दिसलों नसतों एवढें मात्र मी स्वानुभवानें सांगूं शकतों."

आर्यसमाजांत दाखल होऊन पुरा एक आठवडा होण्याच्या पूर्वींच सांईदास-जींनीं माझ्यावर एक कामगिरी सोंपविली. स्वर्गीय स्वामी दयानंदजी त्या वेळीं राजपुतान्यांत प्रचार करीत होते. त्यांची इच्छा आर्यसमाजाचा प्रचार करण्यासाठीं एक प्रचारकनिधी गोळा करावा अशी होती. या त्यांच्या इच्छेनुसार लाहोर आर्यसमा-जानें दोन सभासदांचें एक डेप्युटेशन संयुक्तप्रांतांत पाठविण्याचें ठरविलें व या कामा-वर भाई जवाहरसिंह, मंत्री, लाहोर आर्यसमाज ( यांची उत्तम वक्ते म्हणून ख्याति होती ) व माझी नेमणूक केली गेली. पहिल्यानें आम्हीं सहारणपुराला आलों. मी व्याख्यान देण्यास सुरवात केली, तेव्हां फक्त तीनच इसम जमले होते; पण पुढें हळूहळू पन्नास साठ गोळा झाले. मेरठ येथेंही असेंच झालें. त्यानंतर आम्ही फरुकाबादेस गेलों. येथील आर्यसमाजीयांनीं आमचा फार आदरसत्कार केला. याच ठिकाणीं "नमस्ते" शब्दांत काय जादू भरलेली आहे याचा मला अनुभव आला. या काळीं 'नमस्ते' शब्द जादूचें काम करीत असे. या 'नमस्ते' शब्दानें एक मिनिटांत अपरिचित लोकांशीं जिवलग दोस्ती जमत असे. या दौऱ्यांत व विशेषतः

फरुकाबादेंतील अनुभवावरून आर्यसमाजाच्या श्रेष्ठतेविषयीं मला चांगली कल्पना आली.

या दौऱ्यांतून परत आल्यानंतर पुढें आठ महिने विशेष असें मीं कांहींच केलें नाहीं. पुढें जानेवारी ( १८८३ ) महिन्यांत मी, पं. गुरुदत्त व लाला हंसराज यांनीं मिळून एकमेकांच्या सल्ल्यानें दोन वर्तमानपत्रें चालू करण्याचें ठरविलें. यापैकीं एकाचें नांव 'Regenerator of Aryavarta' व दुसऱ्याचें 'देशोपकारक' असें ठेवण्याचें ठरलें. हीं दोन्ही नांवें मींच सुचविलीं होतीं. इंग्रजी वर्तमानपत्र पं. गुरुदत्त व लाला हंसराज यांनीं चालवावें व मीं उर्दू चालवावें असा आमचा विचार होता. त्याप्रमाणें इंग्रजी वर्तमानपत्र त्या दोघांनीं दोन वर्षेपर्यंत चालविलें, परंतु माझ्याकडून मात्र कांहींच झालें नाहीं. याचें कारण निर्वाहाकरितां मला मुख्त्यारीचे कामामागें लागावें लागलें.

## ७. ब्राह्मसमाजांत !

माझे वडिलांचा मुसलमानी धर्माकडे ओढा असल्याचें मागें आलेंच आहे. लहानपणीं त्यांनीं मला थोडें फार कुराण शिकविलें होतें. त्यांचें पाहून मीहि नमाज पडत असें व केव्हां केव्हां रोजेहि पाळित असें. चौदाव्या वर्षी पहिल्या प्रथम शिक्षणासाठीं लाहोरास आल्यावेळीं पं. शिवनारायण अग्निहोत्री यांची भेट झाली. अग्निहोत्री हे पंजाबांतील ब्राह्मसमाजाचे एक नेते समजले जात व "बिरादरे हिंद" या नांवाचें एक वर्तमानपत्र ते चालवीत असत. माझे वडील या पत्रांत हिंदुधर्म व आर्यसमाज यांच्या विरुद्ध मधून मधून लिहीत असत. यामुळें पंडित-जींशीं त्यांचा परिचय झालेला होता व लाहोरास येतांना त्यांनीं माझ्याशीं त्यांना एक पत्र दिलें होतें. पंडितजी लाहोर डिस्ट्रिक्ट शाळेंत ड्रॉइंग मास्तर होते. मी आपलें नांव त्याच शाळेंत दाखल केल्यामुळें विद्यार्थी या नात्यानेंही त्यांच्याशीं माझा संबंध आला. या वेळीं फक्त दोनच महिने मी लाहोरांत होतों. उन्हाळ्याची सुटी झाली व सुटींत घरीं गेल्यानंतर परत लाहोरास न येतां थेट दिल्लीला गेलों. १८८१ सालीं पुन्हां लाहोरास आल्यावेळीं पंडितजींना भेटण्याचे अनेक योग आले. या वेळीं (१८८१) ब्राम्हसमाजांत दोन पक्ष झाले होते. लाहोरच्या समाजांत बाबू केशवचंद्र सेनांच्या मताचे पुष्कळ सभासद असल्यामुळें पंडितजींनीं

एक निराळाच समाज स्थापन केला व त्याकरितां ब्राम्हसमाजाशेजारींच भाड्यानें एक जागा घेतली. याच जागेंत या नूतन समाजाच्या सभा भरत असत. पंडितजी उत्कृष्ट वक्ते होते व त्यांच्या व्याख्यानाला पुष्कळ गर्दी जमत असे. पंडितजींकडे मी वारंवार जात असें व त्या वेळीं ते मला ब्राह्मधर्मांचीं तत्वें समजाऊन सांगत असत. पुढें त्याच्याच सांगण्यावरून मी त्यांच्या समाजाचा सभासद झालों. या वेळीं पंजाब ब्राह्मसमाजाचे पुढील इसम ट्रस्टी होते. (१) मेडिकल कॉलेजचे हेडक्लार्क लाला गंडामल, (२) जंगलखात्यांतील लाला रलाराम व (३) लाला काशिराम. थोड्या दिवसांनीं समाजाच्या ट्रस्टींच्या वार्षिक निवडणुकीची वेळ आली. या वेळीं आपल्या बाजूस मताधिक्य व्हावें म्हणून पंडितजींनीं बरींच मतें गोळा केलीं व पुष्कळसे नवे सभासदही केले. माझ्या वडिलांकडून त्यांनीं सभासदत्वाचा फार्म भरून आणविला व आपल्या नांवें त्यांचें मतही मागवून ठेवलें. विरुद्ध पक्षांतील लाला गंडामल यांचें मेडिकल कॉलेजांत फार वजन असल्यामुळें त्यांनींही पुष्कळसे विद्यार्थी सभासद बनविले. अखेरीस लालाजींच्याच बाजूला मताधिक्य झालें. याच वेळीं पंडितजींची पत्नी परलोकवासी झाली व त्यांनीं एका बंगाली महिलेशीं दुसरें लग्न केलें. पण यापुढें त्यांना शांति अशी लाभली नाहीं. त्यांची ही नूतन पत्नी लाहोरास येतांच देवीच्या आजारानें आजारी पडली. या वेळीं मी त्यांच्याकडे नेहमींपेक्षां वारंवार जाऊं लागलों. पंडितजींनीं पत्नीच्या सेवाशुश्रूषेंत शिकस्त केली. एक दोन रात्री मीही त्यांच्या घरीं काढल्या व त्यांच्या मुलांना सांभाळलें.

पंडितजींचें प्रथम पत्नीवर फार प्रेम होतें व तिच्या वर्तणुकीचा त्यांच्यावर फार परिणाम झालेला होता. यामुळें पंडितजींना तिची वारंवार आठवण होई व त्यानें ते फार कष्टी होत असत. प्रथम पत्नीच्या मृत्यूनें पंडितजींत फार बदल घडून आला होता.

पंडितजी भाविक होते. साधारणपणें भाविक मनुष्याला कोणाचा ना कोणाचा आधार हवा असतो. पंडितजीहि याला अपवाद नव्हते. कोणीहि इसम थोड्याच अवधींत आपल्या वागणुकीनें व गोड स्वभावानें त्यांच्यावर आपली छाप पाडूं शके. पंडितजींशीं माझी प्रथम भेट झाली त्या वेळीं घराबाहेर बाबू नवीनचंद्र रायांचें म्हणणें त्यांना मान्य असे व घरीं त्यांच्या पत्नीचें त्यांच्यावर वजन असे.

परंतु दुर्दैवानें पुढें या दोन्हीहि व्यक्ती दुरावल्या व त्यांची जागा भरून काढील अशी एकही व्यक्ति पंडितजींना भेटली नाहीं.

पंडितजींचा ईश्वरावर अतिशय विश्वास होता. प्रार्थना करीत असतांना कैक-वेळां त्यांच्या नेत्रांतून अश्रूंचा पूर लोटत असे. त्यांच्या प्रार्थना व व्याख्यानें ऐकूनच आपणही त्यांच्याच सारखा उत्तम वक्ता व्हावें अशी इच्छा माझ्या मनांत उद्भूत झाली. परंतु तिला त्या वेळीं दृश्य फल आलें नाहीं. समाजाचा मेंबर असूनहि मी व्याख्यान देऊं शकलों नाहीं. नाहीं म्हणावयास राममोहनरायांच्या चरित्रावर मात्र एक निबंध वाचला होता.

१८८१ किंवा ८२ सालीं समाजाच्या वार्षिकोत्सवांत पंडितजींनीं मला ब्राह्म-धर्माची दीक्षा दिली. याच वेळीं आर्यसमाजाचे अध्यक्ष लाला सांईदास यांचें मला दर्शन घडलें. या दिवशीं लालाजी आमच्या समाजांत आलेले होते व त्या दिवसाचा कार्यक्रम पुरा होतांच ते बाहेर पुस्तकविक्रीच्या जागीं उभे राहिले. याच ठिकाणीं त्यांचें व माझें पहिलें संभाषण झालें. त्या वेळीं ते काय बोलले हें मला स्मरत नाहीं, पण त्यांच्या चर्येवरून त्यांना माझी दया येत असावीसें भासत होतें. जणूं काय मी नकळत अज्ञानानें या जाळ्यांत सांपडलों असून माझा रस्ता निराळाच आहे असें त्यांना वाटत असावें.

कॉलेजांत असतांना लाला शिवनाथ, छुट्टनलाल व लाला लक्ष्मीनारायण (हे सध्यां दिल्लीस बॅरिस्टरी करीत असतात.) यांच्याशीं माझा पहिल्यानें स्नेह जमला. दिल्लीस असतांनाच यांच्याशीं माझी ओळख झालेली होती. पुढें मी लाहोरास आलों तेव्हां हेही लाहोरास आले व आम्ही सर्व एकाच खोलींत राहूं लागलों. आमच्या कॉलेजांत यांना “ दिल्लीवाले ” म्हणून संबोधिलें जात असे. पंजाबी विद्यार्थ्यांपैकीं ज्यांच्याशीं माझी पहिल्यानें मैत्री जमली ते लाला चतुर्भुज हे होत. लालाजी सध्यां अमृतसर येथें वकिली करीत असून तेथें त्यांचा पहिल्या दर्जाच्या वकिलांत समावेश झालेला आहे. या सर्वांशीं माझा स्नेहसंबंध जडला असला तरी ज्यामुळें माझ्या आयुष्याला निराळें वळण लागलें व मी आजच्या योग्यतेला पोंहोंचलों तो केवळ लाला हंसराज व पंडित गुरुदत्त यांच्या स्नेहाचा परिणाम होय.

पं. गुरुदत्त वर्गांत बरेच वरती असत. ते विश्वविद्यालयाच्या परिक्षेंत पहिले आले नसले तरी त्यांचा नंबर बराच वरतीं होता. आमचे सर्वांचे मित्र प. वा. लाला चेतनानंद ( वकील, मुल्तान ) हे पहिले आले व माझे स्नेही लाला शिवनारायण ( एंजिनियर ) हे तिसरे आले. पंडितजींचा नंबर चौथा किंवा पांचवा असावा. आमच्या वर्गांत त्यांची बरोबरी करण्यास योग्य असे फक्त लाला सूरजनारायण मेहर हेच होते.

सूरजनारायणजी हे तैलबुद्धीचे असून त्यांना फारशी, उर्दू व इंग्रजी इतक्या भाषा चांगल्या अवगत होत्या. दुसरें ते फार मेहनती असून त्यांना वाचनाचाहि भारी नाद होता. पंडित गुरुदत्तांची स्मरणशक्ति दांडगी असून ते तैल बुद्धीचे होते.

पं. गुरुदत्त व चेतनानंद यांचा पहिल्यापासूनच आर्यसमाजाकडे ओढा होता. त्यामुळें लाहोरास येतांच त्यांचा आर्यसमाजाशीं घनिष्ठ संबंध जडला. पंडितजींची कोणतेंही काम करण्याची हातोटी अपूर्व होती. पंडितजी इंग्रजी, फारशी, अरबी, उर्दू व संस्कृत इतक्या भाषा चांगल्याच प्रकारें जाणत असून गणितावर त्यांचें विशेष प्रभुत्व होतें. पदार्थविज्ञान हा त्यांचा फार आवडता विषय असून, शिवाय तत्वज्ञान व इतिहास या विषयांवरचींही बरींच पुस्तकें त्यांनीं वाचलेलीं होतीं. या सर्व दृष्टीनें पहातां त्यांच्यासारखा अष्टपैलू विद्यार्थी दुसरा एकहि नव्हता, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांची रहाणी साधी पण विचित्र होती. त्यांच्या अंगीं वसत असलेल्या या असाधारण गुणसमुच्चयामुळें आमचे वर्ग सुरू झाल्यावर थोड्याच दिवसांत त्यांची सर्व कॉलेजांत तारीफ होऊं लागली. त्यांची वागण्याची रीत व संवयी विलक्षण असल्यामुळें सर्व विद्यार्थ्यांचें त्यांच्याकडे आपोआपच लक्ष वेधलें जाई. असाधारण कामें करण्याकडे त्यांचा नेहमीं कल असे. या त्यांच्या उपजत प्रवृत्तीमुळें केव्हां केव्हां अध्यापकवर्गाला त्यांच्या कार्यावर नजर ठेवावी लागे; पण त्यांची योग्यता त्यांना माहीत असल्यामुळें त्यांच्या कोणत्याही गोष्टींत खोल जाण्याचें ते मुद्दाम टाळीत असत. पंडितजींविषयीं इतकें वर्णन या ठिकाणीं पुरे आहे. पंडितजींमुळेंच लाला हंसराज यांच्याशीं माझा स्नेह जमला.

प. वा. सांईदास हे त्यावेळीं लाहोर आर्यसमाजाचे प्रमुख होते. लालाजी वृद्ध असून मनुष्याची पारख करण्यांत फार कुशल होते. आर्यसमाजांत तरुणांची

भरती व्हावी अशी त्यांची फार इच्छा असल्यामुळें ते नेहमीं आमच्या वसतिगृहांत येत असत. वसतिगृहांत पं. गुरुदत्तांखेरीज दुसरेही कित्येक आर्यसमाजाशीं कमीजास्त संबंध असलेले व सभासद झालेले असे बरेच विद्यार्थी होते. अशांपैकींच लाला चेतनानंद ( एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर ) हे एक होते.

पहिल्या वर्षीं परीक्षेच्या तयारींत मीं गुंतलों असल्यामुळें गुरुदत्तांच्या संगतीचा योग्य लाभ मला घेतां आला नाहीं. परंतु दुसऱ्याच वर्षीं हिंदी कीं उर्दू हा वाद उपस्थित झाला व त्यानें आमचें त्रिकूट जमलें. या वादापासूनच माझ्या सार्वजनिक जीवनाला प्रारंभ झाला. आम्हीं दोघांनीं ( मी व पं. गुरुदत्त ) एक विनंतिपत्र तयार केलें व त्यावर हजारों विद्यार्थ्यांच्या सह्या घेतल्या. अम्बाला येथें जाऊन मी या वादाविषयीं एक व्याख्यानही दिलें. अध्यक्षस्थानीं सुप्रसिद्ध राय हुक्मचंद्र, एम्. ए. हे होते. रायसाहेब हिंदीचे कट्टर विरोधी असून शिवाय एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर होते. त्यांना आमची ही चळवळ पसंत पडली नाहीं व तिला आळा पडावा म्हणून त्यांनीं माझ्याबद्दल आमच्या कॉलेजच्या प्रिन्सिपालसाहेबांना लिहिलें. प्रिन्सिपालसाहेबांनीं माझ्याविषयीं पहिल्यानें चौकशी केली व नंतर मला बोलावून " विद्यार्थ्यांनीं सार्वजनिक कार्यांत भाग घेणें चांगलें नाहीं " असें बजाविलें.

१८८२ सालाच्या सुरवातीपासूनच पं. गुरुदत्तांशीं माझा निकट स्नेह जमूं लागला व त्याचा परिणाम माझ्या विचारांना राष्ट्रीय स्वरूप प्राप्त होण्यांत झाला. वाचकहो, ज्याचें बालपण मुसलमानी वातावरणांत व्यतीत झालें होतें, तारुण्याचे सुरवातीला जो ब्राह्मसमाजांत दाखल झाला होता, तोच पुढें पं. गुरुदत्त व लाला हंसराज यांच्या सहवासामुळें प्राचीन आर्यसंस्कृतीचा व धर्माचा भक्त बनला ! पंडितजींच्या सहवासानेंच ही एवढी प्रचंड क्रांति माझ्या विचारांत घडून आली.

गुरुदत्त जॉन स्टुअर्ट मिल व बेन्थॅम यांचे फार चहाते होते. त्यांच्या संगतींत मीहि यांचे ग्रंथ वाचले व त्यामुळें माझे विचार प्रगल्भ झाले. वर्तमानपत्री वाचनहि चालूच होतें. परंतु या सर्वांपेक्षां हिंदी कीं उर्दू या वादानें माझ्यावर फार परिणाम झाला व माझ्यांत राष्ट्रप्रेम उत्पन्न झालें. बाबू नवीनचंद्र राय राष्ट्रीय विचाराचे असल्यामुळें त्यांचा ब्राह्मसमाजही हिंदीच्याच बाजूचा होता.

बाबूसाहेब हिंदीला राष्ट्रभाषा मानीत असत व हिच्यावरच भावी हिंदी राष्ट्राची उभारणी केली जाईल असें त्यांचें मत होतें. बाबूसाहेबांच्या या विचारांनींहि मी प्रोत्साहित झालों.

ब्राम्हसमाजाच्या साप्ताहिक उपासनांत, व्याख्यानांत किंवा वार्षिकोत्सवांत येशुख्रिस्त व बायबल यांचें फार स्तोम माजविलें जात असे. यामुळें पं. गुरुदत्त व लाला हंसराज ब्राह्मसमाजाची नेहमीं अति टर उडवीत असत.

# ८. आर्यसमाजांतील कामगिरी

स्वामीजींच्या इच्छेप्रमाणें प्रचारकनिधि गोळा करण्यासाठीं काढलेल्या दौऱ्यांतून परत आल्यावर सुमारें आठ महिने मी स्वस्थ होतों. पुढें सप्टेंबर (१८८३) महिन्यांत वकिलीच्या परीक्षेची तयारी करण्यासाठीं लाहोरास आलों व स्व. लाला मदनसिंहांकडे राहूं लागलों. येथें आल्यानंतर स्व. सांईदासजी आपल्याकडे मला वारंवार बोलावून नेत व तेथें आमचें समाजकार्याविषयीं तासान् तास बोलणें चाले. स्वामी दयानंद सरस्वति अतिशय आजारी असल्याची वातमी आक्टोबरांत लाहोरास आली व लाहोरसमाजानें स्व. लाला जीवनदास व पं. गुरुदत्त या दोघांना त्यांच्या शुश्रूषेकरितां अजमिरास पाठविलें. या वर्षी दिवाळीहि आक्टोबरांतच आली होती. साऱ्या शहरांत दिवाळीची धामधूम चालू होती; पण स्वामीजींच्या अत्यवस्थ स्थितीमुळें आमचें मन कशावरच लागत नव्हतें. एक दिवस घरांत करमेनासें होऊन दिवाळीची रोषणाई पाहून तरी मनाला विरंगुळा वाटल्यास पहावें म्हणून मी, लाला सांईदास व मदनसिंह असे तिघे फिरावयास निघालों; पण आमचीं मनेंच ठिकाणावर नसल्यामुळें थोड्याच वेळांत परत आलों. याच सुमारास स्वामींच्या जगण्याची आशा नाहीं अशी

बातमी आलेली समजली. दुसऱ्या दिवशीं अभ्यासाचीं पुस्तकें घेऊन जात असतां वाटेंत एक मुलगा मोठमोठ्या अक्षरांनीं छापलेली व सभोंवार जाड काळ्या रेघा असलेली अशी एक जाहिरात वांटीत असलेला मला दिसला. मी जवळ जातांच त्यानें माझ्या हातांत एक जाहिरात दिली. जाहिरात वाचतांच माझ्या हातांतील पुस्तकें खालीं गळलीं. मी तसाच समाजमंदिराकडे गेलों. तेथें पहातों तों लोकांची तुफान गर्दी गोळा झाली होती. चौकशी अंतीं स्वामीजींच्या मृत्यूनिमित्त दुसऱ्या दिवशीं एक जाहिर सभा भरविण्याचें ठरलें असल्याचें समजलें. त्या सभेंत मुख्य वक्ता म्हणून माझें भाषण करण्याचें ठरविलें असल्याचें लाला सांईदासजींनीं मला सांगितलें. मी घरीं आलों व रात्रभर जागून दुसऱ्या दिवसाच्या भाषणाची तयारी केली. दुसऱ्या दिवशीं सभेच्या वेळीं आर्यसमाजमंदिर लोकसमुदायानें फुलून गेलें होतें. दिवस थंडीचे असतांहि लोकांच्या गर्दीमुळें इतका उकाडा होऊं लागला कीं नुसतें बसून रहाणेंहि अशक्य झालें. समाजाबाहेर व छपरांवरहि लोक उभे राहिले होते. याखेरीज शेकडों लोक जागेच्या अभावीं निराश होऊन परत गेले ते निराळेच. मी सुमारें एक तासभर बोललों. माझ्या भाषणाचा लोकांवर फार परिणाम झाला व आर्यसमाजाच्या पहिल्या दर्जाच्या व्याख्यात्यांत माझी गणना झाली.

स्वामीजींच्या मृत्यूचा माझ्यावर अतिशय परिणाम झाला. माझें मन अस्वस्थ झालें, नानाप्रकारचे विचार येऊं लागले, व त्यामुळें अभ्यासाचीं पुस्तकें वाचणें अशक्य झालें. तरीहि मी परीक्षेला बसलों; पण या खेपेला परीक्षेचे पेपर अति कडक रीतीनें तपासले गेल्यामुळें मी नापास झालों. या वर्षी एकंदर पांसष्ट इसम परीक्षेला बसले होते व त्यांपैकीं फक्त पांचच पास झाले.

यापुढें आर्यसमाजाचें कार्य ही माझ्या आयुष्यांतील एक महत्वाची बाब झाली. १८८४ मध्यें जगरांव सोडून रोहतक येथें गेलों. याच ठिकाणीं माझे वडील होते. या ठिकाणीं मुख्त्यारीचें काम संभाळून मी परीक्षेचीहि तयारी करूं लागलों. या पूर्वीच येथें आर्यसमाज स्थापन झालेला होता पण कार्य मात्र व्हावें तसें होत नव्हतें. मी येतांच समाजाचा मंत्री बनलों व मोठ्या उत्साहानें कार्यास लागलों.

दुसऱ्यांदा मी वकिलीच्या परीक्षेला बसलों व तीन मार्कांनीं नापास झालों. त्या वेळीं परीक्षेंत पास होण्यासाठीं प्रत्येक विषयांत शेंकडा साठ मार्क मिळवावे लागून शिवाय एकंदर विषयांच्या मार्कांच्या बेरजेंत शेंकडा सासष्ट मार्क असावे लागत. या वर्षींहि पांसष्ट इसम परीक्षेला बसले होते व त्यांतले केवळ दहाच पास झाले. मुख्त्यारीच्या कामांत भारी अपमान केला जात असे व तो सहन करणें मला अशक्य झाल्यामुळें परीक्षेंत नापास झाल्याबद्दल मला फार वाईट वाटलें. पण वडिलांनीं मला धीर दिला व त्यांच्या सांगण्यावरून पुन्हां एकदां नशिबाची परीक्षा पाहाण्याचें मी ठरविलें.

परीक्षेंत दोन वेळ नापास झाल्यामुळें मी थोडासा निराश झालों असलों तरी आर्यसमाजाच्या कामांत मात्र चालढकल केली नाहीं. १८८५ सालांत दयानंद कॉलेजासाठीं रोहतक येथें थोडासा फंड गोळा करून मी लाहोरास पाठविला. पुढें डिसेंबरांत परीक्षा आली व मी तिसऱ्यांदा परीक्षेला बसलों. या खेपेलाहि मला अपयशच आलें. परीक्षेच्या निकालानंतर त्या वेळचा रजिस्ट्रार लांच घेत असल्याचें व लांच देणाऱ्या विद्यार्थ्यांनाच पास करीत असल्याचें उघडकीस आलें.

१८८३ सालीं मी लाहोरास असतांनाच दयानंद कॉलेज स्थापन करण्याचें ठरलें होतें. त्या वेळीं मी समाजाच्या सर्व प्रकारच्या सभांस हजर रहात असें. १८८४ व ८५ या दोन वर्षांत कॉलेजासाठीं फंड गोळा करण्याचें काम चालू होतें, परंतु आवश्यक रक्कम एकत्रित होऊं शकली नाहीं. १८८६ सालीं जानेवारी व दिसेंबर या दोन महिन्यांत पं. गुरुदत्त व लाला हंसराज यांच्याशीं माझी वारंवार भेट झाली व त्या वेळीं आमचें समाजाविषयीं व कॉलेजाविषयीं संभाषण चाललें. आमचा विचार समाज हें हिंदूंच्या जातीयत्वाचें व कॉलेज हें राष्ट्रीयत्वाचें केंद्र बनविण्याचा होता. पण वर लिहिल्याप्रमाणें कॉलेज सुरू करण्यासाठीं प्रथमारंभीं आवश्यक असलेली रक्कमच न जमल्यामुळें या भावी कॉलेजाचाच एक विभाग म्हणून पहिल्यानें एक शाळा सुरू करावी असें मी व लाला हंसराज मिळून ठरविलें. या शाळेंत लालाजींनीं हेडमास्तर व मी असिस्टंट मास्तर व्हावें असेंहि ठरलें गेलें.

याप्रमाणें आमचे बेत ठरले पण माझ्यापुढें एक नवीच अडचण उपस्थित झाली. लालाजी बी. ए. असल्यामुळें त्यांनीं केलेला त्याग लोकांना पटला असता;

पण मी एंट्रंसशिवाय युनिव्हर्सिटीची दुसरी कसलीच परीक्षा दिलेली नसल्यामुळें व माझ्या इतकें शिक्षण झालेले ३०–४० रुपयांवर हवे तितके इसम मिळण्यासारखे असल्यामुळें मी करूं इच्छित असलेल्या सेवेला कांहींच किंमत नव्हती. आतां हें खरें कीं या वेळीं मुख्त्यारीवर मला दरमहा दोनशें रुपयांची प्राप्ति होती व ती सोडून शिक्षकाचें काम पत्करण्यांत माझ्या दृष्टीनें मी मोठा स्वार्थत्याग करूं इच्छित होतों; पण शाळेच्या दृष्टीनें त्याला कांहीं महत्व नव्हतें. परंतु समाजाची कांहीं तरी सेवा करावी असें मला उत्कटतेनें वाटत असल्यामुळें व मुख्त्यारीच्या कामांतील अपमानालाहि मी कंटाळलों असल्यामुळें लोकांनीं कांहीं म्हटलें तरी आम्ही स्थापन करूं इच्छित असलेल्या शाळेंत शिक्षक होण्याचा माझा ठाम निश्चय झाला.

पण माझा निश्चय एवढ्यानेंच पार पडूं शकत नव्हता. यापुढें तिसरीच एक अडचण माझ्या मार्गांत उभी राहिली. लालाजींनीं असें कांहीं समाजसेवेचें कार्य पत्करल्यास त्यांना मदत करण्यास त्यांचा भाऊ तयार होता; पण मला मात्र नुसता धीर देण्यासहि कोणी नव्हतें. दुसरें माझ्या वडिलांनीं मोठ्या मुष्किलीनें शिक्षण देऊन मला मिळवता केला होता. माझ्या इतर भावांचें अझून शिक्षण व्हावयाचें असून त्याकरितां मी मदत करावी अशी त्यांची इच्छा असणें अयोग्य नव्हतें. भोंवतालच्या या बिकट परिस्थितीच्या विचारानें मी चिंताक्रांत झालों व पुढें काय करावें हें सुचेनासें झालें. अशा रीतीनें दोहींकडे माझें मन गुंतल्यामुळें मी फार व्याकुल झालों व केव्हां केव्हां ही स्थिति असह्य झाली म्हणजे माझ्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागत. अशाच एका प्रसंगीं अचानकपणें पं. गुरुदत्तांनीं मला पाहिलें व सौम्य शब्दांत माझ्या मनोदौर्बल्याबद्दल तिरस्कार दर्शविला. पुढें त्यांनीं मला धीर दिला व त्यांच्याच सांगण्यावरून मी पुन्हां एकदां प्रयत्न करून पहाण्याचें ठरविलें. या प्रयत्नाकरितां माझे दोनशें रुपये खर्च झाले व मी एकदांचा पास झालों.

परीक्षा पास झाल्यावर आमचे विचार बदलले आणि गुरुदत्त व लाला हंसराज यांच्या सल्ल्यानें माझा शिक्षक होण्याचा बेत रहित झाला व सर्वानुमतें मी स्वतः शिक्षक म्हणून काम करण्याऐवजीं शाळेला आर्थिक साहाय्य करावें असें ठरलें.

१८८६ पासून ९६ पर्यंत हिसार येथें मी वकिली चालविली. हिसारला आल्यावर मी तेथें आर्यसमाजाची स्थापना केली व पांच वर्षांत पं. लखपतराय

( वकील ), लाला चंदूलाल व हरीलाल ( सावकार ) यांच्या साहाय्यानें एक भली मोठी रक्कम कॉलेज फंडासाठीं पाठवून दिली. आमच्या समाजाचें काम फार नियमित रीतीनें चाललें होतें. यामुळें पुढें या बाजूच्या पहिल्या प्रतीच्या समाजांत आमच्या समाजाची गणना होऊं लागली. या पांच वर्षांत हिसारपासून रोहतकपर्यंत व एकंदर दिल्ली प्रांतांत आर्यसमाजाचे सिद्धांत व सेवावृत्ति यांचा प्रसार सर्वसाधारण लोकांत करण्यांत या समाजानें जें कार्य केलें त्याची बरोबरी या जिल्ह्यांतील दुसरा कोणताहि समाज करूं शकला नाहीं. शिक्षित व अशिक्षित जनतेंत एकमेकांच्या सुखदुःखाविषयीं समवेदना उत्पन्न झाल्याशिवाय कोणतेंहि कार्य सफल होणें अशक्य आहे ही भावना शिक्षित लोकांत ज्या समाजांनीं उत्पन्न केली त्यांपैकींच आमचा हिसार आर्यसमाज हा एक होता.

आर्यसमाजाच्या कार्याचा जो एवढा प्रचंड प्रसार झालेला आहे त्याचें मुख्य कारण आपल्या मताप्रमाणें सुधारणेच्या व उन्नतीच्या विचारांचा फैलाव नुसत्या शिक्षितजनतेंत करूनच तो थांबलेला नाहीं; अशिक्षित जनतेंत त्यांचा प्रसार होईपर्यंत त्याचें कार्य चालूच असतें. दुसरें त्याची प्रचार करण्याची शैली अशी आहे कीं तिचा शिक्षित व अशिक्षित लोकांवर सारखाच परिणाम होतो.

हिसार समाजानें या बाबतींत प्रत्यक्ष असें फार मोठें कार्य केलें. ज्या लोकांनीं हें कार्य करण्यांत त्याला मदत केली, त्यांची या ठिकाणीं थोडक्यांत माहिती देणें मी माझें कर्तव्य समजतों.

प्रथमतः लाला चंदूलाल ( अध्यक्ष, आर्यसमाज हिसार ) यांविषयीं लिहितों. लालाजींचा जन्म एका प्रतिष्ठित घराण्यांत झाला होता. जातीनें ते अग्रवाल ( वैश्य ) होते. त्यांचे आजोबा पहिल्या अफगाणिस्थानच्या लढाईंत कमिसरियट खात्यांत खजिनदार ( खजांची ) असून त्यांचे बंधू दलाली करीत असत. लढाईनंतर यांच्या आजोबांची हिसार जिल्हा कचेरींत खजीनदाराच्या जागेवर नेमणूक झाली व तें काम त्यांनीं बरेच दिवस केलें. पुढें एक वेळ हाताखालच्या इसमाच्या हलगर्जीपणामुळें खजिन्यांत थोडी तूट आली व त्यासाठीं यांना फार त्रास झाला. स्वतःची चूक नसतांना सहन कराव्या लागलेल्या या त्रासामुळें त्यांनीं सरकारी नोकरी न करण्याचा निश्चय केला व तो आमरण पाळला.

आजोबांचे विचार फार उच्च होते. चालू पौराणिक हिंदू धर्मावर त्यांचा विश्वास नसल्यामुळें ते मूर्तिपूजा करीत नसत. सामाजिक सुधारणेंतहि ते बरेच पुढारलेले

होते. स्वतःच्या नातलगांच्या किंवा इष्टमित्रांच्या मताची पर्वा न करतां त्यांनीं आपल्या घरांत अनेक प्रकारच्या सुधारणा प्रचलित केल्या. त्यावेळीं तरी त्यांच्या स्थितीच्या इसमास तसल्या सुधारणा घडवून आणणें अशक्य होतें. त्यांचा स्वभाव निडर असल्यामुळें इतरांच्या मताची त्यांनीं केव्हांच पर्वा केली नाहीं. यामुळें कोणतीहि गोष्ट एक वेळ त्यांना पटली म्हणजे लगेच ती ते अमलांत आणीत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आजोबा दृढनिश्चयी, स्वतःसिद्ध, साहसी व उदार होते.

सरकारदरबारांतहि त्यांना फार मान होता; पण ते केव्हांहि कसल्याच समारंभास हजर राहिले नाहींत. एक वेळ सरकारांतून एका समारंभास हजर रहाण्याकरितां धमकीवजा आमंत्रण धाडलें गेलें. सरकारचें हें करणें आजोबांच्या मानी स्वभावास रुचलें नाहीं व त्यांनीं आपल्या मानाचा लगेच राजिनामा धाडून दिला. पुढें त्यांच्या नातवांनीं व भाच्यांनीं त्या मानाच्या जागीं स्वतःची नेमणूक करून देण्याविषयीं त्यांना अनेक प्रकारें गळ घातली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आपल्या मुलांना सरकारी अमलदारांपासून दूर रहाण्याविषयीं ते नेहमीं बजावीत असत. सरकारी अमलदारांची संगति स्वाभिमानाला बाधक असल्यामुळें त्यांना तिचा तिट्कारा होता.

या सुमारास त्यांचा एक खटला सरकारांत चालू होता. या खटल्याकरितां त्यांनीं मला आपला वकील नेमला व हिसारला बोलाविलें. मीहि वकिलीकरितां चांगल्या जागेच्या शोधांत होतों व त्यामुळें त्यांचें आमंत्रण स्वीकारून हिसारला आलों. येथें आल्यावर धंद्याच्या दृष्टीनें हें ठिकाण मला बरें वाटलें व येथेंच पुढें वकिली चालविली.

पुढें आजोबांचा माझ्याशीं स्नेह जमला व ते माझ्याकडे वारंवार येऊं लागले. साधारणपणें शिक्षित लोकांवर त्यांचा विश्वास नसे. शिक्षित लोक ढिले व कमकुवत असतात, असें त्यांचें मत होतें. परंतु माझ्यावर मात्र त्यांचा पूर्ण विश्वास होता.

मी हिसारला येण्यापूर्वींच त्यांच्या घरांत आर्यसमाजाचा प्रवेश झालेला होता. स्वतः आजोबांना आर्यसमाजाचीं सर्वच मतें मान्य नव्हतीं; पण त्यांच्या सुधारकी आचरणामुळें व विचारांमुळें सर्व लोक त्यांना आर्यसमाजी म्हणूनच समजत असत.

# ९. हरियानाचा सरदार गेला !

मी हिसारला आलों तेव्हां तेथें गंगासहाय नांवाचे एक पंडित होते. पंडितजी वेदांतमताचे अनुयायी असून त्यांनीं स्थापिलेल्या एका सभेमार्फत ते त्याचा प्रचार करीत असत. पहिल्यानें कांहीं दिवस पं. लखपतराय व बाबू चूडामणि यांच्या बरोबर मींहि त्यांच्या प्रवचनाला जात असें. पुढें आर्यसमाज स्थापन करण्याचा आमचा बेत झाला व त्याप्रमाणें लवकरच समाजाची स्थापना केली. सुरवातीला मागील प्रकरणांत ज्यांची हकीकत आली आहे, त्या लाला रामजीदासांचे नातू लाला चंदूलाल यांना समाजाचे अध्यक्ष केले व मी मंत्री झालों. लालाजी हिसारांतील एक गण्यमान्य व्यक्ति असून त्यांना सार्वजनिक कामाची अतिशय आवड होती. लालाजी हुषार व श्रीमंत तर होतेच पण शिवाय परोपकारीहि असल्यामुळें त्यांचें नांव लहानथोरांच्या तोंडीं झालेलें होतें. त्यांच्या मृत्यूपर्यंत आमचा स्नेह कायम राहिला. १९०९ सालीं लालाजी परलोकवासी झाले. अखेरपर्यंत ते समाजाचे अध्यक्ष होते. लालाजी खंबीर मनाचे असून त्यांचें आचरणहि आदर्शवत् होतें. आपल्या आजोबांप्रमाणें हेहि उत्साही, साहसी व बोलण्याप्रमाणें वागणारे होते. इतरांच्या

तंटेभांडणांत ते आपण होऊन पडत व योग्यप्रकारें त्यांचें निवारण करीत. कोणीहि मनुष्य कसल्याहि संकटांत सांपडून त्यांच्याकडे गेला व तो थोडीफार मदत न मिळतां परत आला, अशाप्रकारचें एकहि उदाहरण माझ्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आलेलें नाहीं. जिल्ह्यांतील लहानथोरांचे ते एक प्रकारें सल्लागारच होते. फिर्यादी अर्यादींतहि त्यांची सल्ला घेतली जात असे. जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणांहून वेगवेगळ्या पेशाचे व धर्मांचे लोक निरनिराळ्या बावतींत त्यांचें मत समजून घेण्यासाठीं मुद्दाम लालाजींकडे येत असत. सर्वांचा लालाजींवर पूर्ण विश्वास असल्यामुळें कोणी आपल्या मुलावाळांच्या शिक्षणाविषयीं तर कोणी धार्मिक व सामाजिक बाबतींत त्यांचें मत विचारावयास येत असत, आणि यामुळें नेहमीं निरनिराळ्या विषयांची चर्चा त्यांच्या घरीं चाललेली आढळून येई. लालाजींचें शिक्षण बेताचेंच झालेलें होतें. संस्कृत व उर्दू या दोन भाषांत त्यांची गति साधारण असून हिंदी भाषा मात्र त्यांना उत्कृष्टपणें अवगत होती. हिशेबांत तर ते प्रवीण होते. व्यापार उद्योगांत, चलन, हुंडी वगैरे बाबतींत त्यांचा सल्ला प्रमाण धरला जात असे. शेतीची व जमीनदारीची व्यवस्था योग्यप्रकारें ठेवण्यांत ते अतिप्रवीण असल्याबद्दल त्यांची ख्याति होती. त्यांच्या परिवारांत तीन कुटुंबें होतीं व त्या तिन्ही कुटुंबांचे लालाजीच पुढारी होते.

उपजतबुद्धि देण्यांत लालाजींच्या बाबतींत ईश्वरानें मुळींच कसूर केलेली नसल्यामुळें प्रत्येक गोष्टीच्या बुडाशीं इतरांपेक्षां ते फार लवकर पोंचत असत व यामुळें प्रत्येक गोष्टींत त्यांची प्रखर बुद्धिमत्ता लोकांच्या चटकन् नजरेस येई. त्यांच्याशीं एकाद्याची एकदां मैत्री जमली कीं तींत कधीं वितुष्ट म्हणून येत नसे. लालाजींची रहाणी त्यांच्या श्रीमंतीला साजेशी असली तरी त्यांचें वर्तन चोख होतें. माझ्याशीं त्यांचा संबंध येण्यापूर्वीं त्यांनीं ऐयाषी भोगलेली होती, पण आमचा स्नेह जमल्यावर अखेरपर्यंत त्यांचें वर्तन निष्कलंक राहिलें.

लालाजी गर्भश्रीमंत असले तरी गोरगरीबांच्या उपयोगी पडण्यांत व त्यांच्या सुखदुःखांत समभागी होण्यांत त्यांचें वैभव केव्हांहि आड आलें नाहीं. जणूं काय लोकांच्या उपयोगीं पडणें हा एक त्यांचा जन्मस्वभावच होता. गरीब लोकांना ते स्वतःच्या खर्चानें बहुमूल्य औषधें देत. त्यांच्या परोपकारी स्वभावाच्या ख्यातीमुळें कोणीहि इसम प्रसंगीं मध्य रात्रीसही त्यांच्या घरीं येऊन ते झोंपले

असतांहि उठवी व लालाजी लगेच त्याच्या बरोबर जाऊन आजारी माणसास पाहून त्याच्या औषधोपचाराची तजवीज करीत. परोपकारासाठीं लालाजी अष्टौप्रहर सज्ज असत व यामुळें वाटेल त्या वेळीं कोणत्याहि इसमाला त्यांची भेट घेतां येत असे. थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास ईश्वरानें अपूर्व गुणांनीं युक्त असें हें नररत्न निर्माण केलें होतें. त्यांना उच्च शिक्षणाचा लाभ झाला असता तर आजला पंजाबांतील प्रमुख नेत्यांत त्यांची गणना झालेली दिसती; परंतु दुर्दैवानें तसें झालें नसलें तरीहि आपल्या जिल्ह्यांत लालाजी अतिशय लोकप्रिय होते. एकदां एका मुसलमान डेप्युटी कमिशनराशीं तक्रार होऊन कमिशनर स्वतः चौकशी करण्याकरितां हिसारला आले. या वेळीं कमिशनरांनीं लालाजींना जो टोमणा मारला तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. कमिशनर म्हणाले, "लालाजी, या जिल्ह्याचे आपण राजेच आहां !" कमिशनरांनीं हे शब्द जरी उपहासानें उच्चारले असले तरी त्यांची लोकप्रियता सरकारी अंमलदारहि कसे जाणून होते हें यावरून स्पष्ट दिसून येतें. आर्यसमाजाचे अध्यक्ष असतांना त्यांनीं समाजाच्या कार्जीं आपलें तनमनधन अर्पण केलें. अशा प्रकारच्या त्यांच्या सेवेमुळेंच हिसार आर्यसमाज आपल्या कार्यांत वर लिहिल्याप्रमाणें यशस्वी होऊं शकला.

लाला चंदुलाल राजकीय बाबींत लक्ष घालीत नसले तरी ते त्यांतल्या खुब्या जाणत असत. जिल्ह्यांतील अधिकारीवर्गाशीं पहिल्यानें त्यांचें बरें होतें, पण पुढें आर्यसमाजाशीं त्यांचा संबंध आल्यापासून अधिकाऱ्यांचें मन त्यांच्याविषयीं कलुषित झालें. १९०७ सालीं सरकारानें मला हद्दपार केलें, त्या वेळीं लाला चंदुलाल पूर्णपणें कसास उतरले. जिल्हाधिकाऱ्याला आमचा स्नेहसंबंध असल्याचें माहीत असल्यामुळें एखादा इसम या प्रसंगीं भेदरून गेला असता; पण यांनीं केव्हांहि कोणाजवळ सुद्धां आमचा संबंध नाकबूल केला नाहीं. इतकेंच काय पण माझ्या हद्दपारीच्या मुदतींत माझे सर्व कागदपत्र त्यांच्याजवळच होते. एखाद्या छोट्याबड्या अंमलदारानें याबद्दल विचारपूस करण्याची खोटी कीं लालाजी कांहींहि लपवून ठेवीत नसत; उलट 'मी पूर्ण निर्दोषी आहें' अशी आपल्यातर्फे ग्वाही देत. या वेळीं ज्यांना मी आपले दोस्त समजत असें अशा असंख्य लोकांनीं माझा संबंध नाकारला होता, फक्त लालाजीच तेवढे अखेरपर्यंत टिकून राहिले.

हद्दपारींतून सुटका होऊन परत आल्यानंतर कैक वेळां मी त्यांच्या घरीं राहिलों, ठिकठिकाणीं दोघे बरोबर हिंडलों व देहराडून येथें तर तीन आठवडेपर्यंत आम्ही एकत्र होतों. मंडाले येथें असतांनाहि लालाजींचा माझ्याशीं पत्रव्यवहार चालू होता. या वेळीं माझे जिवलग मित्रसुद्धां माझ्या सांवलीला उभें राहूं इच्छित नव्हते, मग अमीर उमराव किंवा सरकारी अंमलदार यांची गोष्टच कशाला ? या बिकट प्रसंगींहि लालाजीच तेवढे उघड रीतीनें माझा स्नेहसंबंध कबूल करीत असत.

हिसार आर्यसमाजानें थोड्याशा अवधींत जें प्रचंड कार्य केलें, त्याला लालाजींची बुद्धिमत्ता, आचरण व उदारता इत्यादि बहुमोल गुणच बव्हंशानें कारणीभूत झाले होते. पुढें मागें एकोणिसाव्या व विसाव्या शतकांत ज्या नर-रत्नांनीं आपल्या त्यागाच्या व श्रद्धेच्या बलानें हिंदुधर्माची प्रतिष्ठा वाढवून त्याचें रक्षण व प्रसार केला, हिंदुस्थानाचा सद्यःस्थितींतून उद्धार करण्याचा ज्यांना निदि-ध्यास लागला होता व त्याकरितां ज्यांनीं अश्रांत परिश्रम केले अशा महापुरुषांचें योग्य स्मारक करण्यासाठीं एखादें मंदिर उभारण्याचा भावी पिढीनें विचार केल्यास अशा मंदिरांत लाला चंदूलाल यांना तिला अवश्य स्थान द्यावें लागेल.

लालाजी जन्मानें वैश्य असले तरी त्यांच्यांत थोडेसे ब्राह्मणाचे व उत्साह, साहस, निर्भयता इत्यादि क्षत्रियांचे गुण एकवटलेले होते. तात्पर्य लालाजींत हिंदूंच्या तिन्ही उच्च वर्णांच्या उत्तमोत्तम गुणांचा मिलाप झालेला होता. त्यांच्या निधनाची बातमी ऐकून मला जितकें दुःख झालें तितकें फारच थोड्यांबद्दल झालेलें आहे.

लालाजींचे धाकटे बंधु देवतास्वरूप स्व. बालमुकुंद यांनीं आपल्या खर्चानें राहून दयानंद कॉलेजाची आमरण सेवा केली. त्यांचे दुसरे बंधु लाला हरिलाल सध्यां हिसार आर्य समाजाचे अध्यक्ष असून तेहि आपल्या बंधूंच्या कीर्तीला साजेसें कार्य करीत असतात.

लाला चंदूलालजींच्या निधनानंतर जिल्ह्यांतील निरनिराळ्या ठिकाणांहून हजारों हिंदुमुसलमान त्यांच्या घरीं आपली समवेदना प्रकट करण्यासाठीं येऊन गेले. यांपैकीं पुष्कळांच्या तोंडून "हरियानाचा* सरदार गेला!" असे उद्गार बाहेर पडलेले मीं ऐकले आहेत.

---

* हिसार, हांसी व भिवानी या तीन तालुक्यांना हरियाना म्हणून संबोधिलें जातें. इतिहासांतहि हे तिन्ही तालुके याच नांवानें प्रसिद्ध आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४३७३


# १०. हिसार आर्यसमाजाचे कांहीं सेवक !

हिसार आर्यसमाजाच्या सुदैवानें लाला चंदूलालजींसारखाच दुसरा एक नेता त्याला लाभला. कांहीं बाबतींत अखिल पंजाबांत याला जोड नव्हती. लोकांच्या संकटाच्या व दुःखाच्या वेळीं त्यांच्यांत मिसळून त्यांच्या सुखदुःखांचा वांटेकरी होण्याचा लाला चंदूलालजींचा जो विशेष होता त्यांत पंडित लखपतराय त्यांच्याहून कांकणभर सरस आहेत, पण रतिभरही कमी नाहींत. पंजाबांतील आर्यसमाजी नेत्यांत पंडितजी हे अद्वितीय आहेत. या व्यक्तीची चिकाटी, तिचा प्रेमळ व मनमिळाऊ स्वभाव इत्यादि सद्गुणांनीं तिला दुर्लभ अशा देवकोटींत बसविण्यास योग्य केलें आहे. माझ्या हयातींतील माझ्या परिचितांची गणना करूं लागलों तर कैक हजार भरेल, ज्यांच्याशीं माझा स्नेह जमला असे लोक शेंकड्यांनीं मोजतां येतील, पण निस्पृहता, निस्वार्थ प्रेम, आत्मसंयम व स्वार्थत्याग या बाबतींत पंडितजींशीं तुलना करण्यास योग्य असा एकहि इसम मला आढळला नाहीं. माझ्या आयुष्यांत ज्या ज्या वेळीं माझ्यापुढें निराशेचा काळाकुट्ट अंधकार पसरला गेला व संकटांच्या आक्रमणामुळें मला काय करावें हें सुचेनासें होऊन माझी

तारांवळ उडाली, त्या त्या वेळीं पंडितजींच्या प्रेमानेंच मला उत्साहित करून संकटांचें भय नाहींसें केलें.

आमच्या प्रेमांत अंतर म्हणून पडलें नाहीं. ज्याच्यावद्दल पंडितजींइतका आदर व प्रेम मला वाटतें असा दुसरा एकहि इसम उभ्या दुनियेंत तूर्त तरी मला दिसत नाहीं. राजकीय बाबतींत आमचे विचार जमत नाहींत. याचें कारण पंडितजी थोडेसे भीरु आहेत; पण असें असलें तरी मला त्यांना भित्रे म्हणवत नाहीं; कारण या एका गोष्टीखेरीज त्यांना भीति म्हणून काय चीज आहे हें ठाऊकहि नाहीं. राजकीय बावतींत भिण्याला एक कारण आहे. ज्या कार्यासाठीं त्यांनीं आपल्या आयुष्याचा उत्तमोत्तम भाग खर्चीं घातला, त्या चळवळीवर कांहीं संकट ओढवूं नये हेंच राजकीय बाबींतील त्यांच्या भीरुतेचें एकमेव कारण होय. त्यांचें जीवन सेवाभावानें परिपूर्ण भरलेलें आहे. जवळच्या व दूरच्या नातलगांना त्यांच्यापासून सहाय्य झालेलेंच आहे, पण परक्यांनींहि त्याच्या या वृत्तीचा फायदा घेतलेला आहे.

आर्यसमाजाच्या इतिहासांत पंडितजींचें नांव चिरकाल चमकत राहील. त्यांनीं आपलें काम इतक्या उच्च हेतूंनीं प्रेरित होऊन केलें आहे व इतक्या उत्कृष्ट प्रकारें पार पाडिलें आहे कीं प्रत्येक आर्यसमाजी तरुणानें त्यांचा फोटो आपल्या गळ्यांत लटकावणें योग्य आहे. यानें प्रत्येक अडचणीच्या प्रसंगीं तें चित्र त्याला मार्गदर्शक होईल व जातिद्रोह, स्वार्थपरता व मिथ्याभिमान यांपासून तो बचावला जाईल.

मी स्वतः मूर्तिपूजा करीत नाहीं व मूर्तिपूजेवर माझा विश्वासहि नाहीं. परंतु आर्यसमाजाच्या क्षेत्रांत आपल्या अंगच्या गुणांनीं व सेवेनें ज्या व्यक्तींनीं स्वतःची पूजा करवून घेण्याइतका मान मिळविला आहे अशा व्यक्तींत पंडितजी अग्रभागीं बसण्यास योग्य आहेत. आर्यसमाजाच्या उत्तमोत्तम व सुप्रसिद्ध अशा सेवकांतील पंडितजी हे एक आहेत. त्यांची रहाणी अत्यंत साधी असून त्यांचें आचरण फार उच्च दर्जाचें आहे. आर्यसमाजाच्या नेत्यांपैकीं ज्यानें स्वतःच्या नांवलौकिकाची पर्वा न करतां स्वतःच्या कार्याचें श्रेय इतरांना खुशाल घेऊं दिलें असे एकटे पंडितजीच होत. पंडितजींची योग्य शब्दांत प्रशंसा करणें माझ्या आवाक्याबाहेरचें आहे. तरी पण येथपर्यंतच्या वर्णनावरून वाचकांना या नररत्नाविषयीं साधारण कल्पना होईल.

हिसार आर्यसमाजाच्या कार्यांत पं. लखपतराय यांचे धाकटे बंधु डॉ. धनी-राम यांनींहि योग्य भाग घेतलेला आहे. डॉक्टरसाहेबांची बुद्धिमत्ता, विद्वत्ता व संस्कृतभाषाभिज्ञता यांची समाजकार्याला मोठीच मदत झालेली आहे.

हिसार, रोहतक व दिल्ली प्रांत या बाजूला आर्यसमाजाचे सिद्धांत व कार्य यांना लोकप्रिय बनविण्याचें कार्य ज्या व्यक्तीनें केले, ते डॉक्टर रामजी-लालसाहेब होत. १८८४ सालीं रोहतक डिस्ट्रिक्ट स्कूलमध्यें शिकत असतांना आमची मैत्री जमली. डॉक्टरसाहेब जाट आहेत. परमेश्वरकृपेनें त्यांना जो स्वभाव प्राप्त झाला आहे त्याच्या योगानें ते जेथें जातात तेथें लोकप्रिय होतात. आपल्या अडाणी जातभाईंत मिळूनमिसळून वागणारा डॉक्टरसाहेबांसारखा उच्च-विद्यालंकृत इसम आजपर्यंत माझ्या अवलोकनांत आलेला नाहीं. शिक्षित इसमाला आपल्याच जातीच्या अशिक्षित व घाणेरड्या शेतकऱ्यांशीं संबंध ठेवणें कसेंसेंच वाटतें. खालच्या जातींत गुडगुडीला किती महत्व दिलें जातें हें सर्वांना ठाऊकच आहे. त्यांच्या प्रत्येक सामाजिक गोष्टींत गुडगुडीला फार महत्व असतें. मुसलमान लोकांना साधारणपणें एकमेकांचा हुक्का चालतो; पण हिंदुलोक या बाबतींत इतके संकुचित वृत्तीचे असतात कीं आपल्या कुटुंबाच्या बाहेर त्यांची मजल जाऊं शकत नाहीं. अर्धवट शिकलेल्या लोकांना आपल्याच जातीच्या अशिक्षित दुकानदार किंवा जमीनदार बंधूंचा हुक्का पिणें कसेंसेंच वाटतें. या गोष्टीला डॉक्टरसाहेब तेवढेच अपवाद असे मला आढळले. जाटलोकांबरोबर घाणीनें वरवटलेला हुक्का ओढतांना मी स्वतः डॉक्टरसाहेबांना कैक वेळ पाहिलें आहे. अशा प्रकारच्या वागणुकीमुळें डॉक्टरसाहेबांचें घर या बाजूच्या जाटलोकांचें केंद्र झालें होतें. लांबलांबचे लोक डोळ्यांच्या किंवा इतर उपचाराकरितां यांच्याकडे येत व यांपैकीं पुष्कळांचें खाणेंपिणें डॉक्टरसाहेबांकडेच होत असे. आपल्या आचरणानें, चिकित्सेनें व मन-मिळाऊ स्वभावानें हजारों जाटांत त्यांनीं आर्यसमाजाचा प्रचार केला व त्यांच्यांत देशभक्तीची व जातिहिताची ज्योत प्रज्वलित करून जातीच्या व देशाच्या सद्यः-स्थितीबद्दल तळमळ उत्पन्न केली.

हिसार आर्यसमाजाच्या प्रसाराला ज्यांचे श्रम कामीं आले व ज्यांची हकीकत संक्षेपानें आतांपर्यंत दिली आहे त्या सर्वांत पंडित अमीचंद्र ( उपदेशक ) यांचें कार्य फार मोठें आहे. हिसार जिल्ह्यांतील जाट लोकांत आर्यसमाजाचा प्रसार

करण्यांत पंडितजींचा ईश्वरी देणगीसारखा उपयोग झालेला आहे. पंडितजी एक खरेखुरे ब्राह्मण आहेत. हिसार व रोहतक या दोन जिल्ह्यांत आर्यसमाजाचे सिद्धांत लोकप्रिय करण्यांत पंडितजींनीं इतकें उत्कृष्ट काम केलें आहे कीं त्याचें यथायोग्य वर्णन करण्यास माझ्या जवळचा शब्दसंग्रह अपुरा आहे.

बाबू चूडामणि यांनीं अनाथ मुलांचें रक्षण करण्यांत अथाक परिश्रम घेतले असल्यामुळें तेहि प्रशंसा योग्य आहेत.

हिसार येथें आर्यसमाजाची स्थापना करण्यांत व पहिलीं पांच वर्षें त्याची जोपासना करण्यांत मी जो भाग घेतला, त्याबद्दल मला फार अभिमान वाटतो. त्या वेळीं समाजाला चारी बाजूनें विरोध होत असल्यामुळें आमच्या धैर्याच्या कसोटीची ती वेळ होती. बरेच दिवस माझ्या घरांतच समाजाच्या साप्ताहिक सभा भरत असत. कैक वेळ अशा सभांना मी व माझा कारकून या दोहोंव्यतिरिक्त तिसरा कोणी नसे. परंतु अशा परीक्षेच्या वेळींहि उपासना चालविण्यांत मी चालढकल केली नाहीं. कैक आठवडे मी स्वतःच उपासना चालविली आहे व स्वतःच व्याख्यानहि दिलेलें आहे. समाजाचा मंत्री म्हणून मी फक्त एक वर्षपर्यंतच होतों; परंतु हिसारला असेपर्यंत समाजकार्याचा पुष्कळसा बोजा माझ्यावरच होता.

हिसार समाजाचे वकील मेंबर आपल्या प्राप्तीचा एकशतांश समाजाला देत. अशा रीतीनें कांहीं दिवस कार्य चालल्यावर पांचव्या वर्षाच्या अखेरीस लाला चंदूलाल यांचे बंधू भाई हरिलाल यांना प्रेरणा होऊन त्यांनीं आपल्या बंधूस समाजमंदिराकरितां एक घर दान देण्यासाठीं आग्रह केला. मंदिराकरितां मीहि माझी एक महिन्याची प्राप्ति म्हणजे सुमारें १५०० रुपये देण्याचें ठरविलें व इतरांनींहि आपली एकेक महिन्याची प्राप्ति देण्याचें कबूल केलें. या वेळीं समाजाचे सभासद फार थोडे होते. हिसार आर्यसमाजाचें मंदिर हें लाला चंदूलाल व त्यांचे बंधू यांच्या उदारतेचें व परिश्रमाचें फल आहे. कैक महिने ते स्वतः मंदिराच्या बांधकामावर देखरेख ठेवीत होते व प्रसंगीं पदरचे पैसेहि लावीत होते. या मंदिरामुळें त्यांचा समाजाशीं जिव्हाळ्याचा संबंध जडला गेला व तो अखेरपर्यंत कायम राहिला.

## ११. हिसार येथील माझें वास्तव्य.

हिसार येथें मी सहा वर्षें होतों. या सहा वर्षांत माझ्या शिक्षणांतील अपूर्णता पुरी करण्याचा मी यत्न केला; तसेंच सामाजिक, धार्मिक व राजनैतिक विषयांवरचीं बरींच पुस्तकें वाचलीं आणि संस्कृत शिकण्याचाहि बराच यत्न केला. संस्कृत शिकण्यांत मात्र मला यश आलें नाहीं. कारण माझ्या धंद्यांतील परिश्रमांनीं मी इतका थकून जात असें कीं संध्याकाळीं संस्कृत भाषा शिकण्याला आवश्यक असलेले श्रम करणें अशक्य होई. माझ्या धंद्यांत योग्यता व प्राप्ति या दोन्ही दृष्टीनें मी पहिल्या दर्जांत गणला जाई. या वेळीं माझी प्राप्ती वर्षाला १७-१८ हजारांपर्यंत होती; आणि माझ्या आठवणीप्रमाणें दहा हजारांखालीं ती केव्हांच गेली नाहीं. या सहा वर्षांत कमींत कमी ७०-८० हजार रुपये मी मिळविले. येथें येऊन धंद्याचा जम बसतांच पहिल्यानें वडिलांची नोकरींतून मुक्तता केली. माझ्या वकिलीच्या पहिल्याच वर्षीं त्यांनीं पेन्शन घेतलें व जिच्या व्याजांतून त्यांचें पुढील आयुष्य सुखानें जाईल एवढी रक्कम मी त्यांना दिली. एक प्रकारें ही रक्कम ठेवच होती. रोजच्या खर्चालासुद्धां या रकमेच्या व्याजाची गरज

पडली नाहीं. कारण साऱ्या कुटुंबाचा नेहमींचा खर्च, विवाह वगैरे नैमित्तिक खर्च आणि माझ्या भावांच्या शिक्षणाचा खर्च मीच करीत असें. याशिवाय आपल्या प्राप्तीचा दशमांश हिंदु जातीच्या हिताकरितां मी नियमपूर्वक देत असें. या वेळीं आर्यसमाजाकरितां मी लांबलांबच्या ठिकाणीं जाऊन व्याख्यानें देत असें, फंड गोळा करीत असें आणि शिवाय समाजाचे पुढारी जी जी कामगिरी माझ्यावर सोंपवीत ती ती करीत असें. खेरीज मधून मधून वर्तमानपत्रांतून लेख लिहीत असें आणि राजकीय चळवळींतही भाग घेत असें. महंमद हसन नांवाच्या एका सुशिक्षित मुसलमानाबरोबर माझें निरनिराळ्या विषयांवरच्या पुस्तकांचें वाचन चालू होतें. आमचा दोघांचा अतिस्नेह होता. आजहि त्या स्नेहाचें मला विस्मरण पडलेलें नाहीं. आम्हां दोघांत कसल्याच प्रकारचा भेदभाव म्हणून नव्हता. महंमदसाहेब नेहमीं माझ्याकडे जेवीत व मींहि मधून मधून त्यांच्या घरीं जेवीत असें.

शेवटच्या तीन वर्षांत मी म्युनिसिपल कमिटीचा सभासद निवडला गेलों. ज्या विभागातर्फे माझी निवडणूक झाली होती, त्यांत हिंदूंपेक्षां मुसलमानांचीच जास्त वस्ती होती. ज्या वेळीं त्या विभागांतील मुसलमान लोक माझ्या नांवाचा प्रस्ताव घेऊन डेप्युटी कमिशनरच्या कचेरींत गेले, तेव्हां डेप्युटी कमिशनरसाहेबांनीं त्यांना त्यांच्या निश्चयापासून परावृत्त करण्याची शिकस्त केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. दुसरा कोणी उमेदवार उभा केला गेला नसल्यामुळें मी सर्वानुमतें निवडला गेलों व एकदांचा म्युनिसिपल कमिटीचा सभासद बनलों.

कमिटीचा अध्यक्ष कमिसरियट खात्यांतील एक युरोपियन अधिकारी होता. सदर साहेब अत्याचारी व कुटीलनीतिपरायण होता. शहरांतील लोक त्याला फार कंटाळलेले होते. अशा स्थितींत लोकांची बाजू घेणारा कोणी नव्हता. मी त्यांची बाजू घेत असल्यामुळें व त्यांचे हक्क राखण्यांत पुढाकार घेत असल्यामुळें डेप्युटी कमिशनरची माझ्या हालचालींवर नजर असे. या कमिटीवर बारा हिंदी व तीन युरोपियन असे पंधरा सभासद होते. कैक वेळ हिंदी सभासद एका बाजूला व युरोपियन सभासद विरुद्ध बाजूला असें होत असे.

माझ्या तीन वर्षांच्या अमदानींत हिसार कसब्यांत शिक्षण व स्वास्थ्य यांची उन्नति करण्याची मी बरीच खटपट केली व त्यांत थोडें फार यशहि आलें.

मध्यंतरीं अध्यक्षसाहेबांच्या चिथावणीनें एका हेडमास्तरानें माझ्याशीं नसता तंटा उपस्थित केला, पण शेवटीं त्याचीच फजिती झाली. शिक्षणखात्याला माझ्या व्यवस्थेंत कांहीं दोष आढळला नाहीं व यामुळें हेडमास्तराला ठपका मिळाला.

याचप्रमाणें लेफ्टनंट गव्हर्नराच्या एका आगमनप्रसंगीं द्यावयाच्या मानपत्राच्या मसुद्याबद्दल अध्यक्ष आणि डेप्युटी कमिशनर यांच्याशीं माझी खडाजंगी झाली. त्यांची इच्छा मानपत्रांत विवादास्पद असे सार्वजनिक हिताचे प्रश्न येऊं नयेत अशी होती. उलट तसले प्रश्न अवश्य असावेत असें माझें म्हणणें होतें. शेवटीं कमिटींत याविषयीं भारी वादविवाद होऊन प्रश्न मतावर पडला व मतें घेतलीं जातां झाडून सर्व हिंदी सभासदांचीं मतें माझ्या बाजूला पडून अध्यक्ष व डेप्युटी कमिशनर यांना नमतें घ्यावें लागलें. स्वागतपत्र उर्दूंत तयार केलें गेलें व तें वाचण्याचें काम कमिटीनें माझ्याकडेच सोंपविलें.

कांहीं दिवसांनीं अध्यक्षसाहेब थोड्या दिवसांसाठीं रजेवर गेले व दरम्यान आम्ही एका हिंदी अधिकाऱ्याची अध्यक्षाच्या जागीं निवड केली. या काळीं एखाद्या बिनसरकारी इसमाची अध्यक्षाच्या जागीं निवड करण्याचें धाडस हिंदी सभासदांत नव्हतें. कारण सभासदांनीं केलेली निवडणूक मान्य किंवा अमान्य करण्याचें कमिशनरसाहेबांच्या हातांत होतें, आणि कमिशनर किंवा डेप्युटी कमिशनर दोघांनाहि बिनसरकारी इसम या जागीं येणें पसंत नव्हतें. असो.

हिसार येथें असेंपर्यंत म्युनिसिपालिटीच्या कामाविषयीं व इतर सार्वजनिक गोष्टींविषयीं लोकांत रुची उत्पन्न झाली. लोकांच्या मनोवृत्तींत असा फरक पडल्यामुळें राष्ट्रीयसभेच्या सहाय्याकरितां व तिच्या कार्याच्या प्रसाराकरितां हिसार येथें कैक सभा भरल्या, त्यांत बाहेरच्या व्याख्यात्यांचीं व्याख्यानें झालीं आणि अशा व्याख्यानांना लोकांची गर्दीहि जमूं लागली. हिसार हा एक लहानसा कसबा आहे. याची लोकसंख्या सुमारें पंधरा हजार आहे. तरीहि येथून १८८८ मध्यें अलाहाबाद येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेला पांचसहा प्रतिनिधी गेले होते. यांपैकीं तीन चार तर जमीनदारच होते. याच प्रमाणें १८८९ सालीं मुंबई येथें भरलेल्या अधिवेशनांतहि हिसार येथील प्रतिनिधी हजर होते.

मी चालविलेली ही चळवळ डेप्युटी कमिशनरांस पसंत पडली नाहीं; परंतु ती कायद्याच्या मर्यादेंत असल्यामुळें त्यांना कांहींएक करतां येईना. या प्रकारें

त्यांना माझें कार्य पसंत नसलें किंवा त्यानें ते वैतागून गेले असले तरी माझ्याशीं वागतांना ते फार सभ्यतेनें वागत असत. माझ्या सामाजिक सुधारणेच्या कार्यानें तर ते फार खुष असत. तसेंच मी सभासद झाल्यावर म्युनिसिपालिटीच्या कामांत व्यवस्थितपणा व सचोटी आली असल्यामुळें त्यांना माझ्याविषयीं एक प्रकारें आदरहि वाटत असे.

याच सुमारास एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनरच्या जागीं माझी नेमणूक करण्याविषयींची गोष्ट डेप्युटी कमिशनरांनीं माझ्याजवळ काढली. माझ्या वडिलांच्या मनांतून मी ती जागा स्वीकारावी असें होतें. मी मात्र आपलें स्वातंत्र्य गमविण्यास तयार नव्हतों. शेवटीं डेप्युटी कमिशनरांचा प्रस्ताव मी साभार अमान्य केला. माझ्या पुढील आयुष्यांतील घटनांची आठवण झाली म्हणजे या प्रलोभनांतून बचल्याबद्दल मला फार समाधान वाटतें.

सर्व बाजूंनीं विचार केल्यास हिसार येथील माझा काल फार सुखाचा व यशस्वी असा गेला. माझी प्राप्ती माझ्या कल्पनेबाहेर होती, लोकांत मानमरातब होता, सार्वजनिक कार्य करण्याला मुबलक वाव होता, जिल्हाधिकारी माझ्यावर खुष होते आणि माझ्या मनांत असतें तर त्यांना खुष करून स्वतःचा शक्य तितका जास्त फायदा करून घेतला असता. पुष्कळशा शिक्षित लोकांनीं अशा क्षणिक मानमरातबासाठीं आपला धर्मसुद्धां सोडला होता. मला मात्र या सर्व गोष्टी सहजप्राप्त होत्या व इतरांप्रमाणें धर्म सोडण्याचीहि गरज नव्हती. परंतु माझा जीवनोद्देश निराळा होता. हिसार येथें सर्व प्रकारच्या सुखसोयी, मानमरातब वगैरे असूनहि माझ्या चित्ताला स्वास्थ्य नव्हतें. आंतून सारखी टोंचणी चालू होती व मी माझ्या जीवनोद्देशापासून फार दूर जात असून त्याला गांठण्याच्या बाबतींत मी दुर्लक्ष करीत आहें व अशा प्रकारें आपलें आयुष्य फुकट घालवीत आहें अशी सारखी प्रेरणा होत होती. माझी भावना विशाल बनूं पहात होती. तिला हिसारसारख्या छोटयाशा क्षेत्रांत गुरफटून रहाणें पसंत नव्हतें. आपल्या भावनांच्या विकासास योग्य अशा कर्तव्यक्षेत्राच्या शोधांत माझें अंतःकरण गुंतलें होतें. इतरांच्या दृष्टीनें सर्व प्रकारची सांसारिक सफलता प्राप्त झाली असूनहि माझ्या अंतःकरणांत उठतां बसतां, जाग्रदावस्थेंत व सुप्तावस्थेंत एकच ध्वनी चालू होता—मी माझ्या ध्येयापासून च्युत होत असून दिवसें

दिवस अधिकाधिक वहावत चाललों आहें. मनांत विचार येत कीं पैसा कमावणें व भोग भोगणें एवढाच माझा जीवनोद्देश नाहीं. सरकार दरबारांत मानसन्मान मिळाल्यानेंहि माझ्या चित्ताला स्वस्थता मिळणें शक्य नव्हतें. माझ्या आत्म्याची धुन कांहीं औरच होती. त्याची इच्छा आपल्या धर्माकरितां व राष्ट्राकरितां पतंगा-प्रमाणें जळून जाण्याची होती. परंतु याकरितां हिसार योग्य नव्हतें. सर्व दृष्टीनें पहातां हिसार येथील माझें वास्तव्य एखाद्या प्रवाशासारखें होतें. माझ्यापुढें थोड्याशा पैशानें मला मोठा जमीनजुमला मिळण्याचे अनेक योग आले, परंतु त्यांकडे मी लक्ष दिलें नाहीं. याचें कारण तसें केल्यानें मी येथेंच कायमचा जखडला जाण्याचें भय होतें. इतर रीतीनें हिसार येथें मी थोडासा पैसा गुंतविला हें खरें, परंतु वडि-लांच्या व मित्रांच्या इच्छेप्रमाणें जमीनजुमल्यांत मात्र गुंतविला नाहीं. त्यावेळीं जर मी जमीनजुमल्यांत पैसा गुंतविला असता तर आजला त्याची किंमत दुप्पट होती व आज सर्वप्रकारें सुखी असा एक मी लाखोपति बनलों असतों. ज्या लोकांनीं त्या वेळीं जमीनजुमला खरेदी केला, त्यांना आज कशाचीच ददात उर-लेली नाहीं. असो.

चीफ कोर्टांत वकिली चालविण्यास योग्य होण्याकरितां खालील कोर्टांत पांच वर्षें वकिली करणें जरूर असे. यासाठीं पांच वर्षें पूर्ण होतांच मी हिसार सोड-ण्याच्या तयारीला लागलों. डिविजनल जज्ज, जिल्हा जज्ज, व जिल्हा मॅजिस्ट्रेट यांनीं मला चांगलीं शिफारसपत्रें दिलीं आणि त्यांमुळें चीफ कोर्टांत वकिली सुरू करण्यास मला परवानगी मिळाली. परवानगी मिळाल्यानंतर चार महिन्यांनीं मी हिसार सोडलें.

हिसार येथें माझ्या आयुष्याचीं जीं सहा वर्षें गेलीं, तीं एकप्रकारें माझ्या भावी आयुष्याच्या पूर्वतयारीचीं होतीं. या ठिकाणीं मी चांगले पैसे कमाविले, शिक्षणांतील उणीवांची पूर्तता केली, सार्वजनिक आयुष्यांतील सुरवातीच्या संकटांतून पार पडलों व सार्वजनिक कार्याला लागणाऱ्या चिकाटीचें शिक्षण मिळविलें. या ठिकाणीं मला असे कांहीं मित्र लाभले कीं ज्यांच्या प्रेमानें साऱ्या आयुष्यभर शांति व सामर्थ्य यांचा मला तुटवडा भासला नाहीं. या ठिकाणीं माझें शरीरस्वास्थ्यहि सुधरलें. येथें मला दोन मुलें झालीं. एक मुलगी व एक मुलगा. याच मुलाबद्दल माझ्या इतर मुलांपेक्षां मला जास्त प्रेम वाटतें.

# १२. आर्यसमाजांतील दुही.

सन १८९२ सालीं एप्रिल महिन्यांत मी लाहोर शहरीं आलों. या वेळीं येथील आर्यसमाजांत दोन पक्ष निर्माण झाले होते. परंतु दोघांनीं निरनिराळे समाज स्थापन केले नव्हते. आर्यसमाज व त्याचे नेते यांच्या आयुष्यांतील ही एक महत्वाची घटना असल्यामुळें या मतभेदाचा इतिहास थोड्या विस्तारानें देण्याचा माझा विचार आहे. तसेंच ज्या व्यक्तींनीं या बाबतींत भाग घेतला व ज्यांच्या व्यक्तित्वाचा या घटनेवर प्रभाव पडला त्या व्यक्तींविषयींहि येथें थोडी फार माहिती देणें मला योग्य वाटतें.

आर्यसमाजांत दोन पक्ष उत्पन्न होण्याची जबाबदारी पुढें महात्मापार्टी म्हणून जो एक पक्ष प्रसिद्धीस आला, त्यांतील पुढाऱ्यांवर आहे. या पक्षाचे पुढारी स्वर्गीय पं. गुरुदत्त, लाला मुंशीराम (स्वामी श्रद्धानंद), मास्टर दुर्गाप्रसाद, लाला रलाराम, लाला देवराज, राय प्याडाराम, राय ठाकुरदत्त हे होते. दुसऱ्या पक्षाचे पुढारी लाला सांईदास, लाला मूलराज, लाला हंसराज व लाला लालचंद हे होते. मी स्वतः या वादांत केव्हां व कसा गुरफटला गेलों हें पुढें सांगेन.

पं. गुरुदत्त व लाला हंसराज यांच्याशीं विद्यार्थिदशेंत असतांना माझा अत्यंत स्नेह होता, हें मागें सांगितलेंच आहे. दयानंद शाळा चालू होईपर्यंत आमचा स्नेह कायम होता व त्यांत कसल्याच प्रकारचें अंतर पडलें नाहीं. १८८६ सालीं दयानंद शाळेची स्थापना झाली. त्या वेळीं समाजांत पूर्ण एकी होती व कोणत्याही प्रकारचा मतभेद उत्पन्न झालेला नव्हता. सर्वसम्मतीनें लाला हंसराज व मास्टर दुर्गाप्रसाद हे या शाळेचे अनुक्रमें हेडमास्तर व असिस्टंट मास्तर निवडले गेले. लाला लालचंद कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष होते व पं. गुरुदत्त कांहीं कालपर्यंत चिटणीस होते. या वेळीं लाला सांईदास लाहोर आर्यसमाजाचे अध्यक्ष होते. लालाजींविषयीं सर्व समाजसभासदांत फार आदर होता, त्यांच्या बुद्धिमत्तेवर लोकांची अतिश्रद्धा होती व त्यांचें चारित्र्य फार श्रेष्ठ दर्जाचें व आदर्शवत् असें समजलें जाई. हिंदु जातीविषयीं व राष्ट्राविषयीं त्यांना वाटत असलेली तळमळ अवर्णनीय होती. या बहुमोल गुणांमुळेंच अखिल पंजाबांतील आर्यसमाजांचे ते एक प्रकारें स्वयंभू पुढारी बनले होते. मनुष्याची पारख करण्याचा लालाजींत असलेला गुण दुसऱ्या कोणत्याही पुढाऱ्यांत त्यांच्या इतका तीव्रतेनें वसत असलेला मला आजपर्यंत दिसून आलेला नाहीं. या त्यांच्या गुणामुळेंच लाला हंसराज व पं. गुरुदत्त यांसारखीं नररत्नें आर्यसमाजाला लाभलीं. तरुण लोकांत लालाजी मिळून मिसळून वागत व आपल्या गोड वाणीनें त्यांच्यावर आपली छाप बसवीत. कोणत्याहि चळवळीची सफलता त्यांत किती तरूण सामील होतात यावर अवलंबून असते असें त्यांचें मत होतें. एखाद्या चळवळींत ज्या मानानें उत्साही व साहसी तरूण सामील होतील, त्या मानानें ती चळवळ यशस्वी होईल, असें त्यांना वाटत असे.

आर्यसमाजाची त्या वेळीं नुकतीच स्थापना झालेली होती व त्याचें कार्य हळूहळू विस्तार पावत होतें. समाजाचे आरंभींचे सर्व सभासद इंग्रजी जाणणारे होते व इंग्रजी साहित्याच्या वाचनानें त्यांच्या मनावर नवीन विचारांचा परिणाम झालेला असल्यामुळें त्यांच्यांत देशभक्तीची ज्योत प्रज्वलित झालेली होती. इंग्रजी साहित्याच्या परिशीलनानें नवीन विचारांनीं व नवीन भावनांनीं भारलेले लोकच स्वामी दयानंदांनीं उभारलेल्या झेंड्याखालीं एकत्रित झाले होते. यांपैकीं फारच थोड्यांना संस्कृत भाषा अवगत होती. जुन्या तऱ्हेनें संस्कृताचा अभ्यास केलेले असे फारसे इसम दयानंदांच्या झेंड्याखालीं आले

नाहींत व जे थोडे आले ते वैयक्तिक लाभासाठीं आलेले होते. पहिल्या सभासदांतील कांहीं सभासद अखिल पंजाबांतील पहिल्या दर्जाचे पदवीधर होते. नार्मल स्कूलचे त्या कालीं मुख्याध्यापक असलेले मास्टर श्रीराम, एम. ए. हे कांहीं कालपर्यंत आर्यसमाजाचे मंत्री होते. अखिल पंजाबांत प्रेमचंद रायचंद परीक्षेंत एकटेच उत्तीर्ण होणारे असे लाला मूलराज, एम. ए. हे समाजाचे पहिले अध्यक्ष होते. लाला ईश्वरदास, एम. ए. व त्यांचे बंधू लाला नारायणदास, एम. ए., लाला अछरूराम, बी. ए., लाला मदनसिंह, बी. ए., लाला द्वारकादास, एस. ए., लाला केदारनाथ, एम. ए., लाला भवानीदास, एम. ए. इत्यादि इत्यादि विश्वविद्यालयाच्या उच्च पदव्यांनीं अलंकृत झालेले लोक आर्यसमाजाच्या आरंभींच्या सभासदांत गणले जातात. याचप्रमाणें पंजाबांतील ज्या तरुणांनीं कलकत्ता विश्वविद्यालयाच्या पदव्या मिळविल्या होत्या, त्यांपैकीं पहिल्या दर्जाचे पदवीधर समाजाचे सभासद झालेले होते. तसेंच पंजाबांत ज्यांनीं असिस्टंट सर्जनची किंवा वकिलीची परीक्षा देऊन त्या त्या धंद्याच्या सनदा मिळविल्या होत्या असे झाडून सारे लोक समाजांत सामील झाले होते. यांपैकीं कांहीं जणांचीं नांवें पं. लेखराम यांनीं लिहिलेल्या स्वामीजींच्या चरित्रांत दिलेलीं असून कांहींचीं मी लिहिलेल्या स्वामीजींच्या चरित्रांत दिलेलीं आहेत. परंतु यांपैकीं संस्कृतज्ञ किती होते म्हणून कोणी पाहूं गेल्यास फारच थोडे आढळले असते. उच्च दर्जाचें शिक्षण मिळविलेल्या तरुणांशिवाय मध्यम प्रतीचें शिक्षण संपादन करून ज्यांनीं सरकारी नोकऱ्या मिळविल्या होत्या अशा तरुणांचीहि फार मोठी संख्या समाजांत सामील झालेली होती.

लाला सांईदास हे अशाच पैकीं होते. त्यांचें इंग्रजी शिक्षण बेताचेंच झालेलें होतें. फारशी भाषेंत त्यांची गति उत्तम प्रकारें चालत असून संस्कृत साधारणपणें जाणत असत. ते भाषांतर करण्याच्या कामावर होते व इंग्रजीचें उर्दूंत भाषांतर करण्याचें काम त्यांच्याकडे होतें. १८८३ सालीं ज्या वेळीं पहिल्यानें त्यांच्याबरोबर माझा परिचय झाला, त्या वेळीं त्यांचें वेतन दरमहा १३० रुपये होतें. ज्या इतरांचा वर उल्लेख केलेला आहे, त्यांची स्थिति या दृष्टीनें पहातां लाला सांईदासजींहून फार चांगली होती. त्यांच्यापैकीं कांहीं एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनराच्या हुद्यावर होते तर कांहीं थोड्याच दिवसांनीं त्या हुद्यावर नेमले गेले. पण असें असलें

तरी समाजांत साईंदासजींना जी मानाची जागा प्राप्त झाली ती केवळ त्यांच्या उच्च चारित्र्यामुळेंच होय. विद्वत्ता किंवा संपत्ति त्यांच्यापाशीं नव्हती, विश्वविद्यालयाची एखादी पदवीहि त्यांना मिळालेली नव्हती, पण त्यांना वाटत असलेली राष्ट्राविषयींची व हिंदु जातीविषयींची तळमळ फारच थोड्यांत दिसून येत होती. पुढारी होण्याचा मान त्यांना मिळण्याचें हेंच एक कारण होय.

सांईदासजी जन्मानें खत्री होते आणि त्यांचा स्वभाव व आचरण हीं दोन्ही खऱ्या क्षत्रियाला शोभण्यासारखींच होतीं. ते अटल निश्चयी, अदम्य उत्साही व दृढ साहसी असून बोलण्याप्रमाणें कृति करणारे होते. या वेळीं शिक्षित लोक एकत्र जमण्याचें व सार्वजनिक प्रश्नांचा विचारविनिमय करण्याचें सबंध लाहोरांत ब्राह्मसमाज हेंच एक स्थळ असल्यामुळें लाहोराला आल्यानंतर कांहीं कालपर्यंत ते ब्राह्मसमाजाचे सभासद होते. पुढें कांहीं दिवसांनीं स्वर्गीय लाला बिहारीलाल व यांनीं मिळून सत्सभा नांवाची एक सभा स्थापन केली. ही नवी सभा स्थापन करण्याचें कारण लाहोरांतील ब्राह्मसमाजाचें कार्य बंगालच्या धाटणीवर व बंगाली लोकांच्या भावनांनुसार चाललें होतें व त्यांत पंजाबी मनोवृत्तीला वाव नव्हता. सांईदासजींची इच्छा पंजाबी भावनेला प्राधान्य मिळावें अशी होती. असो. स्वामी दयानंदांच्या आगमनानंतर लवकरच लाहोरांत आर्यसमाजाची स्थापना झाली व सांईदासजींना आपल्या मनाप्रमाणें कार्य करण्याची संधी मिळाली.

लाला सांईदास आस्तिक असले तरी त्यांना एकांतिक भक्त म्हणतां आलें नसतें. आतां ते ईश्वरभक्त नसले तरी देशभक्त व हिंदुजातिभक्त होते यांत मात्र शंका नाहीं. हिंदु जातीविषयीं त्यांना फार कळकळ वाटत असे. हिंदूंची अवनतावस्था पाहून त्यांचे अंतःकरणावर इतका परिणाम झालेला होता कीं त्यामुळें ते रात्रंदिवस बेचैन असत. त्यांच्या यःकश्चित् संभाषणांतसुद्धां या गोष्टीचा प्रत्यय येत असे व ऐकणारास त्यांचा आत्मा कसल्या तरी चिंतेनें व्याकुळ झालेला आहे असें वाटल्याखेरीज रहात नसे. हिंदूंच्या प्राचीन व अर्वाचीन स्थितीची ते तुलना करूं लागले, कीं गहिंवरून जात व कैक वेळां पुढें बोलणेंही त्यांना अशक्य होई. हिंदु जातीविषयीं वाटत असलेली इतकी तळमळ, इतकें अलोट प्रेम व इतकी तन्मयता माझ्या साऱ्या आयुष्यांत फारच थोड्या हिंदूंत मला दिसून आली. या बाबतींत यांच्याहून वरचढ असा इसम मात्र माझ्या अवलोकनांत

आला नाहीं. या खेरीज लालाजींचा विशेष हा होता कीं जो कोणी त्यांच्या समागमांत येई त्याच्यावर त्यांच्या या तळमळीची छाप पडे व तोही त्यांच्या तळमळीचा थोडाफार वांटेकरी बने. ज्याच्यावर असा परिणाम झाला नाहीं असा इसम शोधूं गेल्यास एखाददुसराच मिळूं शकेल.

या दृष्टीनें पहातां त्यांच्या हिंदु जातीवरील प्रेमाची तुलना करणें झाल्यास एखाद्या सांथीच्या रोगाशींच करणें योग्य होईल. सांथींत ज्याप्रमाणें एकाच्या संसर्गानें दुसरा व दुसऱ्याच्या संसर्गानें तिसरा आजारी पडतो, त्याप्रमाणें सांईदासजींच्या संसर्गांत कर्मधर्मसंयोगानें जो जो येई तो तो त्यांच्या या रोगानें पछाडला जाई. लाला हंसराजांचे बंधु लाला मुल्कराज भल्ला ब्राम्ह समाजाचे अनुयायी होते. ते आर्यसमाजाचे सभासद केव्हांच झाले नाहींत; पण तेसुद्धां या सांथीपासून स्वतःला बचावूं शकले नाहींत. लाला सांईदासजींना हिंदु जातीविषयीं वाटत असलेल्या तळमळीमुळें मुल्कराजजींची त्यांच्यावर भक्ति जडली व या भक्तीमुळेंच लाला हंसराजांचा सांईदासजींशीं आत्यंतिक संबंध जडला.

लाला सांईदासजींनीं अनेक तरुणांवर स्वतःची छाप पाडून त्यांना आपलेसे केले होते; पण पं. गुरुदत्त व लाला हंसराज या दोघांवर त्यांच्या समागमाचा व विचारांचा जितका परिणाम झाला तितका आर्यसमाजाच्या इतिहासांत दुसऱ्या कोणाचाहि झालेला नाहीं. दोघेहि सांईदासजींना पूज्य मानीत असत व दोघांचाहि सांईदासजींच्या बुद्धिमत्तेवर विश्वास होता. उलट सांईदासजींनाहि दोघांविषयीं आपलेपणा वाटत असून त्यांच्यावर त्यांची सारी भिस्त होती. सांईदासजींपासूनच हंसराजांनीं आर्यसमाजाच्या सिद्धांतांची माहिती करून घेतली होती. पं. गुरुदत्त हे एण्ट्रन्स परीक्षा पास होऊन पुढील शिक्षणासाठीं लाहोरास आले तेव्हां पुरे नास्तिक नसले तरी त्या बाजूला बरेच झुकलेले होते. सांईदासजींच्या प्ररणेनें त्यांनीं संस्कृत भाषेंतील धार्मिक ग्रंथांचें अवलोकन केलें; परंतु त्यानेंही त्यांच्या मतांत परिवर्तन होऊं शकलें नाहीं. पुढें दयानंद सरस्वतींच्या शेवटच्या आजारांत ते अजमिरास गेले असतां स्वामींच्या अंतकालाच्या दृष्यानें त्यांचीं नास्तिकतेचीं पटलें दूर झालीं व ते पूर्ण आस्तिक बनले. गुरुदत्त असामान्य बुद्धीचे होते. विद्वत्ता व स्वाभाविक योग्यता या दोन्ही दृष्टीनें ते आपल्या सहाध्यायांच्या फार पुढें होते. त्यांच्यांत थोडीशी आत्मश्लाघाहि वसत होती. त्यांच्या सभोंवतीं

सदोदित विद्यार्थ्यांचा तांडा जमलेला असे व त्यांतून एखाद्यानें त्यांची स्तुती केली कीं त्यांना आनंद होत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येई. ( पण आत्मस्तुति कोणाला प्रिय नाहीं ? ) आम्ही सर्व त्यांना 'गुरुजी' म्हणून संबोधित असूं व तेही या गुरुजीच्या उपाधीनें खुष असत. त्यांच्या सहाध्यायांकडून त्यांचा अशा रीतीनें गौरव होत असला तरी लाला सांईदास व हंसराज यांच्याशीं ते फार लीनतेनें वागत असत. या दोघांच्या बुद्धिमत्तेविषयीं त्यांना आदर वाटत असे व प्रत्येक गोष्टींत यांच्याच सल्ल्यानें ते वागत असत. १८८६–८७ सालापर्यंत या तिघांत कसलाहि भेदभाव उत्पन्न झाला नाहीं. पं. गुरुदत्त दयानंद शाळेचीं सर्व प्रकारचीं कामें फार आवडीनें करीत असत. गव्हर्मेंट कॉलेजांत विज्ञानाचे प्रोफेसर असूनहि ते मधून मधून दयानंद शाळेंत शिकवीत असत. वसतिगृहांतील विद्यार्थ्यांविषयींहि त्यांना अति आपलेपणा वाटत असे.

याच सुमारास बरेचसे आर्यसमाजी त्यांच्या भोंवतीं गोळा होऊं लागले व त्यांपैकीं कांहीं संस्कृतहि शिकूं लागले. गुरुदत्तांच्या स्वभावांत मूळचाच एककलीपणा होता व दिवसें दिवस तो वाढूं लागला. शेवटीं त्याचा परिणाम असा झाला कीं संस्कृत भाषेवर त्यांची आत्यंतिक भक्ति जडली व पाश्चात्य तेवढें त्यांस टाकाऊ वाटूं लागलें. पुढें पुढें तर इंग्रजी शिकणें निरर्थक आहे व पाश्चात्य विज्ञानांत कांहींच अर्थ नाहीं असें ते उघड उघड बोलूं लागले. "मी जर पाश्चात्य ज्ञान विसरून जाईन तर फार उत्तम होईल" अशा अर्थाचे उद्गारहि त्यांच्या तोंडून एकदां निघाल्याची अफवा आहे.


लाला सांईदास व हंसराज यांचें या बाबतींत त्यांच्याशीं पटत नसे. याच सुमारास मास्तर दुर्गाप्रसादांचें पं. गुरुदत्तांशीं दळणवळण वाढलें व उभयतांची मैत्री जमली. दुर्गाप्रसाद मांशासनाविरुद्ध होते. लाला मुन्शीरामांचाहि ( स्वा. श्रद्धानंद ) याच वेळीं पंडितजींशीं परिचय झाला. हेही निरामिषाचे पुरस्कर्ते होते. लाला सांईदास व हंसराज मांसाशनी होते. पहिल्या पहिल्यानें गुरुदत्तांनीं इकडे लक्ष दिलें नाहीं; परंतु मास्तर दुर्गाप्रसाद व लाला मुन्शीराम यांच्या सहवासानें त्यांनीं या गोष्टीकडे लक्ष देण्यास सुरवात केली व त्यामुळें त्यांना नकळत लाला सांईदास व हंसराज या दोघांविषयीं तिटकारा वाटूं लागला. दुर्दैवानें याच वेळीं दयानंद

कॉलेजाचा मुख्याध्यापक कोणास नेमावें हा प्रश्न उपस्थित झाला. सांईदासजींचा कल हंसराजांकडे होता व पंडितजींचे चहाते पंडितजींना मुख्याध्यापक करण्याच्या मताचे होते. वस्तुतः लाला हंसराजविषयीं पंडितजींच्या मनांत कसल्याच प्रकारची ईर्षा नव्हती. परंतु सांईदास व हंसराज यांच्या कसल्या तरी संभाषणामुळें व एखाद्या बाबतींत त्यांनीं प्रदर्शित केलेल्या मतामुळें पंडितजींना फार वाईट वाटलें होतें.

या कालांत सांईदास किंवा हंसराज या दोघांचाही धर्माला फाजील महत्व देण्याकडे कल नव्हता. हिंदु जातीच्या कल्याणाचेंच त्यांना महत्व वाटत असे. यामुळें इंग्रजी शिक्षणाला व पाश्चात्य साहित्याला बाजूला ठेवून नुसत्या संस्कृताच्या मागें लागण्यांत हिंदूंचें कल्याण होणें नाहीं असें त्यांचें मत बनलेलें होतें. उलट धर्म व संस्कृत भाषा यांपुढें जातीला किंवा जातीकल्याणाला कसलीच किंमत न देण्याइतकी गुरुदत्तांच्या भावुकतेची मजल गेलेली होती. त्यांच्या अंतःकरणावर भारतीय आदर्शानें आपलें अधिराज्य स्थापन केलें होतें व याच विचारांत त्यांचें मन सदोदित गुंग झालेलें होतें.

अशा प्रकारें समाजांत दोन प्रकारचा विचारौघ चालू झाला व प्रत्येक पक्ष दुसऱ्या पक्षाकडे टीकात्मक दृष्टीनें पाहूं लागला. थोड्याच काळांत समाजांत एक निरामिष भोजी पक्ष निर्माण झाला व सांईदासजींवर कोणत्या ना कोणत्या प्रसंगानें टीका करण्याची संधी साधून त्यांना अध्यक्षपदावरून खालीं ओढण्याच्या कार्यास लागला.

या वेळीं मी हिसार शहरीं होतों व दोन्ही पक्षांशीं माझा सारखाच संबंध होता. पण या कारणामुळें लाहोर शहरीं कांहीं कामानिमित्त माझें येणें झालें असतां दोन्ही बाजूचे लोक मोकळेपणानें माझ्याशीं बोलेनासे झाले. लाला सांईदासजींतहि थोडासा अहंभाव होता व त्यामुळें कोणतीहि गोष्ट आपल्याच मनाप्रमाणें व्हावी असें त्यांना वाटत असे. दुसरें गुरुदत्तजींची संकुचित दृष्टि त्यांना पसंत नव्हती. याखेरीज लंबी चौडी प्रार्थना करणारांना व सदोदित ' धर्म धर्म ' म्हणून ओरडत सुटणारांना पुढारी होण्यास ते नालायक समजत. ईश्वरावर त्यांचा विश्वास होता व त्याची भक्ति करणें मनुष्याचें कर्तव्य आहे असेंहि ते मानीत असत; परंतु उठल्या सुटल्या धर्माला महत्व देण्यास ते तयार नव्हते. हिंदु जातींत समानता



दयानंद अँग्लो-वैदिक कॉलेज, लाहोर.

प्रस्थापित होणें जरूर आहे असें त्यांना वाटे; परंतु यासाठीं धर्माला कायमची रजा देण्याला त्यांची तयारी नव्हती. मात्र बारीक सारीक गोष्टींत धर्मानें लुडबुड करूं नये इतकेंच त्यांचें म्हणणें होतें. गुरुदत्तांवर त्यांचें अतिशय प्रेम असून त्यांचे ते स्वतःच्या मुलाप्रमाणें लाड करीत असत. आतां गुरुदत्तांवर त्यांचें प्रेम असलें तरी त्यापेक्षांही स्वतःच्या ध्येयावर त्यांचें अति प्रेम होतें. समाजाच्या वेदीवरून मांसाशनाविरुद्ध प्रचार करण्यास त्यांनीं मना केलें नाहीं, परंतु त्याच वेळीं मांसभक्षणांत मोठें पाप सांठलेलें आहे असेंहि त्यांना वाटत नसे. दुसरें ते थोडेसे हठवादीहि होते. या वेळीं ते थोड्या सहनशीलतेनें व समजुतीनें वागते तर पं. गुरुदत्तजी त्यांच्या विरुद्धपक्षाला मिळाले नसते असें मला वाटतें. हंसराजांनींहि हीच चूक केली; त्यामुळेंच गुरुदत्त त्यांचे विरोधी बनले. अशा प्रकारें दोन्ही पक्षांत विरोधाला सुरवात होतांच दोन्ही बाजूच्या लोकांच्या मनांत परस्परांविषयीं वैषम्य व तिट्कारा उत्पन्न झाला व प्रत्येक आपापल्या धोरणानें वागूं लागला. याप्रमाणें दोघांचे मार्ग निरनिराळे होतांच दोघेही एकमेकांपासून दिवसेंदिवस अधिकाधिक अलग होऊं लागले व शेवटीं हें प्रमाण इतकें वाढलें कीं दोन्ही पक्षांची एकी होणें अशक्य झालें.

१८८८ कीं १८८९ सालीं दयानंद कॉलेज सुरू झालें हें मला आतां बरोबर आठवत नाहीं. परंतु कॉलेज सुरू होण्यापूर्वीं लाहोर आर्यसमाजाचा जो वार्षिकोत्सव झाला त्या वेळीं पं. गुरुदत्त हे बरेच आजारी असल्याची मात्र मला पक्की आठवण आहे. त्यांना क्षयरोग झालेला होता व नुसते अस्थिपंजर राहिलेले होते. अशा स्थितींतही कॉलेजाविषयीं विचार करण्याकरितां कमिटीची जी सभा भरली तिला ते हजर राहिले. मीहि त्या सभेंत होतों. पं. गुरुदत्त, लाला सांईदास, लाला हंसराज व मी कॉलेज सुरू करावें या मताचे होतों व स्वर्गीय लाला लालचंद, लाला द्वारकादास, राय गंगाराम व स्वर्गीय लाला मदनगोपाळ कॉलेज सुरू करण्याच्या विरुद्ध होते. शाळेच्या कार्याला स्थिरता आलेली नसल्यामुळें तत्पूर्वीं कालेज सुरू करूं नये असें विरुद्धपक्षाचें म्हणणें होतें. वादविवादांत लाला मदनगोपाळ सभा सोडून गेले व त्यामुळें आमच्या बाजूला एक मत अधिक पडून लाला सांईदासजींचा ठराव पास झाला. हा वेळपावेतों पं. गुरुदत्तांच्या मनांत लाला हंसराजांविषयीं म्हणण्यासारखें वैषम्य होतें असें वाटत नाहीं. माझ्या

माहितीप्रमाणें स्वःत पंडितजींनीं लाला सांईदास किंवा हंसराज यांच्याविरुद्ध कधींहि कसल्याच प्रकारची चळवळ केलेली नाहीं. परंतु त्यांच्या नांवाचा व आर्य-समाजांतील त्यांच्या प्रभावाचा फायदा घेऊन त्यांच्या पक्षांतील लोकांनीं वेळीं अवेळीं लाला सांईदास व हंसराज यांच्यावर टीका करून आपला पक्ष मजबूत करण्यास कमी केलें नाहीं. याप्रकारें बेकी वाढत असतांच पंडितजींचा रोगही वाढत चालला होता. थोड्याच दिवसांत त्यानें भयानक स्वरूप धारण केलें व लोकांना घाबरवून सोडलें. अशा आपत्तीच्या वेळीं कोणत्याहि प्रकारचा दुजा भाव मनांत न धरतां दोन्ही पक्षाच्या लोकांनीं पंडितजींची अंतःकरणपूर्वक शुश्रूषा केली व उपाय करण्यांत कसलीच बाकी ठेवली नाहीं. लाला सांईदास व हंसराज या दोघांनीं तर या बाबतींत पुढाकारच घेतला होता. पण इतके सर्व प्रयत्न होऊनहि व सर्वांचे डोळे पंडितजींकडे लागले असूनहि कोणाच्याहि प्रयत्नांस किंवा भावनांस यश आलें नाहीं व पंडितजी सर्वांस कायमचे सोडून गेले! त्यांच्या मृत्यूनंतर चारच महिन्यांनीं लाला सांईदास गेले. अवघ्या सहा महिन्याच्या अल्पावधींत याप्रमाणें दोन महान् नेत्यांना आर्यसमाज कायमचा मुकला! या ठिकाणीं मोठ्या दुःखानें सांगणें भाग आहे कीं पंडितजींसारखा विद्वान व सांई-दासजींसारखा व्यवहारज्ञ इसम आर्यसमाज आजतागायत पैदा करूं शकला नाहीं.

सांईदासजींच्या मृत्यूनंतर लाला हंसराज लाहोर आर्यसमाजाचे अध्यक्ष नेमले गेले. मास्टर दुर्गाप्रसाद व लाला जीवनदास यांसारखे वयोवृद्ध लोक हयात असतांना लाला हंसराजांना अध्यक्ष केलें गेलें याचें दुसऱ्या पक्षाला वैषम्य वाटलें व यामुळेंविरुद्ध पक्षाचे लोक जास्तच चिडले गेले, अशी माझी समजूत आहे. या नूतन घटनेमुळें पं. गुरुदत्त व सांईदास यांच्या निधनामुळें शांत होऊं पहाणारी मतभेदाची ज्वाला उलट वाढीला लागली व शेवटीं समाजांत कायमचे दोन पक्ष निर्माण करण्यांत तिचें पर्यवसान झालें. समाजाप्रमाणें कॉलेजमंडळांतही दोन पक्ष झाले व प्रत्येक पक्ष स्वतःच्या बाजूला मताधिक्य व्हावें म्हणून आजूबाजूच्या समाजांतून नवे नवे अनुयायी धुंडूं लागला. लाला हंसराजांचें बाहेरच्या समाजांतून जाणें येणें होत असलें तरी शाळेच्या व कॉलेजाच्या कामापुढें त्यांना म्हणण्यासारखा वेळ मिळत नसे व त्यामुळें सर्वसाधारण सभासदांत मिसळणेंहि होत नसे. दुर्गाप्रसादांची गोष्ट याच्या उलट होती. त्यांचें घर हें सर्वसाधारण लोकांचें

एके ठिकाणीं जमण्याचें केंद्र होतें. याशिवाय प्रचाराकरितां म्हणून आजूबाजूच्या समाजांतून त्यांचें जाणें येणें होत असल्यामुळें उपदेशकवर्ग एकप्रकारें त्यांच्याच बाजूचा होता.

( १ ) लाला हंसराज मितभाषी व एकांतप्रिय असल्यामुळें सर्वसाधारण लोक त्यांना गर्विष्ठ समजत असत. खुद्द उपदेशकवर्गाचाही असाच गैरसमज झालेला होता. ( २ ) त्यांची सांपत्तिक स्थिति चांगलीशी नसल्यामुळें बाहेरून आलेल्या उपदेशकांची व इतरांची बडदास्त ठेवणें त्यांना शक्य नव्हतें. दुर्गाप्रसादांजवळ पूर्वीचा थोडासा पैसा होताच, शिवाय पं. गुरुदत्तही त्यांना मदत करीत असत. याखेरीज ते शिडे असल्यामुळें बाहेरून आलेल्या पाहुण्यांची किंवा उपदेशकांची आपोआपच योग्य व्यवस्था होत असे. ( ३ ) हंसराज शिस्तीचे भोक्ते असल्यामुळें विद्यार्थिवर्गांतहि ते प्रिय नव्हते. त्यांच्या शिस्तीमुळें विद्यार्थी त्यांना वचकून वागत हें खरें, पण त्यांच्याविषयीं त्यांना प्रेमहि वाटत नसे. ( ४ ) लाला मुंशीराम ( स्वामी श्रद्धानंद ) हे प्रारंभापासूनच धडाडीचे कार्यकर्ते आहेत. त्यांचा ओढा दुर्गाप्रसादांकडे होता. मुंशीरामजी सुरवातीपासूनच अग्रभागीं रहाण्यास योग्य असें कार्य करीत आलेले आहेत. त्यांच्या अंगीं लोकांना आकर्षण करण्यास योग्य असे कांहीं गुणही आहेत. ते स्पष्टवादी आहेत. आदर-सत्कार करण्याची त्यांना आवड आहे. स्वतः स्पष्टवादी व सत्यप्रिय असल्यामुळें दुसरा कोणी कांहींतरी सांगत असेल अशी त्यांना शंकाहि येत नाहीं व त्यामुळें त्यांचा कोणावरही सहजासहजीं विश्वास बसतो. ते दृढ विचाराचे असून कोणतेंहि कार्य चिकाटीनें तडीस नेणारे आहेत. प्रारंभापासूनच समाजांतील त्यांचें कार्य एखाद्या नेत्याला शोभण्यासारखें आहे. प्रस्तुतच्या वादविवादांतहि ते अग्रस्थानीं होते. पं. गुरुदत्त व मास्तर दुर्गाप्रसाद यांच्याशीं त्यांचा अतिशय स्नेह होता. ते समाजांत नियमानें येत असत व मधून मधून व्याख्यानेंहि देत असत. त्यांनीं काढलेलें वर्तमानपत्र सुरवातीपासूनच आर्यसमाजक्षेत्रांत चांगलें कार्य करूं लागलें व त्यामुळें अल्पावधींतच तें लोकप्रिय झालें. या वादविवादांत मुंशीरामजींच्या पक्षाचें वाहेरच्या समाजांतहि चांगलें वजन होतें. या पक्षांत मुंशीरामजींसारखे उपदेशक व व्याख्याते होते आणि शिवाय एक चांगलें वर्तमानपत्रहि त्याच्या मदतीला होतें. या बाजूला इतकी अनुकूलता होती तर हंसराजांच्या

हातांत फक्त आर्यपत्रिका ( इंग्रजी ) तेवढीच होती. यांतच आणखी त्यांचा बिन-चळवळ्या स्वभाव व शांतवृत्ति याची भर पडली. अशा परिस्थितींत त्या पक्षाचा प्रचार कसा व्हावा ? समाजांतील पदवीधर सभासद मात्र त्यांच्या बाजूला होते. मांसाहाराच्या प्रश्नाबरोबर एक प्रकारें विचारस्वातंत्र्याचा प्रश्नहि येत असल्यामुळें स्वभावतः जे मांसाहारी नव्हते किंवा मांसाहारावर ज्यांचा विश्वास नव्हता असले पदवीधर सभासदसुद्धां हंसराजांच्या पक्षाला मिळाले.

आर्यसमाजाच्या या घरगुती भांडणाच्या मुळाशीं खालीं दिलेलीं कारणें व सिद्धांत होते.

( १ ) लाला हंसराजांची व्यक्तिगत अप्रियता, लोकांचें त्यांना गर्विष्ठ, आत्मश्लाघी व मानाला हपापलेले समजणें, त्यांचें मितभाषण, लोकांत मिळून मिसळून वागण्याची नावड व शिस्तीकरितां निष्ठुरतेनें वागणें. (२) स्वामी दयानंद सरस्वतींनीं मांसाहाराचा निषेध केला असल्यामुळें साहाजिकच या वादांत स्वामींच्या मतप्रामाण्याचाहि प्रश्न गोंवला गेला. पं. गुरुदत्त शेवटीं शेवटीं स्वामींचे निस्सीम भक्त बनले होते. स्वामीजींच्या मताविरुद्ध कोणी ब्र काढलेलाहि त्यांना खपत नसे व त्यामुळें ते लगेच चिडून जात. अशा वेळीं आवेशाच्या भरांत स्वामीजींचे सर्व सिद्धांत निर्भ्रांत असल्याचें व सत्यार्थप्रकाशांतील अक्षरान् अक्षर वेदतुल्य असल्याचें ते बोलून जात. त्यांचे अनुयायीहि याच मताचे होते. ज्या वेळीं गुरुदत्तांच्या पक्षानें मांसाहाराचा प्रश्न उपस्थित केला, त्या वेळीं दुसऱ्या बाजूनें स्वसंरक्षणार्थ स्वामीजींचे सर्वच सिद्धांत समाजाला बंधनकारक होऊं शकत नाहींत व त्या सिद्धांतांत चूक असणें अशक्यही नाहीं असा नवाच वाद उपस्थित केला गेला. मुंशीरामजींच्या पक्षांतील लाला आत्माराम अमृतसरी व दुसरे कांहीं तरुण लोक स्वामीजींना चूक करण्यापलीकडचे मानीत असत. शिवाय या पक्षाचें दुसरें असें म्हणणें होतें कीं जोंपर्यंत स्वामीजींपेक्षां वरचढ असा दुसरा वेदज्ञ झाला नाहीं तोंपर्यंत स्वामीजींचे सिद्धांत व शिकवण हीं आर्यसमाजाला बंधनकारक असणें योग्य आहे व तसें मानणें हें आमचें कर्तव्य आहे. कॉलेजपक्षांतील विचारस्वातंत्र्याचे भोक्ते स्वामीजींना अचूक धर्मनिर्णायकाचें स्थान देण्याविरुद्ध होते. या पक्षाचे पुढारी लाला मूलराज हे मांसाहार करणें नुसतें योग्यच समजत होते असें नव्हे तर त्याचा प्रचारही करीत असत. मुंशीरामजींच्या पक्षाचें दुसरें असें म्हणणें होतें कीं लाला हंसराजांच्या कार्या-

मुळेंच मुल्कराजांबद्दल आर्यसमाजीयांत आदर आहे; याकरितां मुल्कराज मांसाहाराच्या बाजूनें आर्यसमाजांत जो कांहीं प्रचार करीत आहेत त्याचें उत्तरदायित्व हंसराजजींवरच टाकणें योग्य आहे.

या ठिकाणीं लाला मुल्कराजजींविषयीं थोडेंसें लिहिणें योग्य आहे. ज्या वेळीं लाला हंसराज कॉलेजांत शिकत होते त्या वेळीं ते ब्राह्मसमाजाचे सभासद होते. परंतु लाला सांईदासजींशीं त्यांचा संबंध येतांच ब्राम्हसमाजावरील त्यांची निष्ठा कायम राहूं शकली नाहीं. आरंभापासूनच त्यांचें हिंदुजातीवर फार प्रेम होतें व हिंदूंच्या प्राचीन काळच्या गौरवासंबंधानें त्यांनीं कांहीं कविताहि केलेल्या होत्या. त्यांच्या लेखांविषयीं पुढें सांगेन. तूर्त इतकेंच सांगतों कीं आर्यसमाजांत व आर्यसमाजाबाहेर लाला मुल्कराजजींना फार मान होता. त्यांच्या उदारतेमुळेंच लाला हंसराजांसारखा निस्सीम अवैतनिक सेवक आर्यसमाजाला लाभला. घटकाभर उपरिनिर्दिष्ट कारणें जमेस धरलीं नाहींत तरी लोकांना त्यांच्याबद्दल प्रेम व आदर वाटण्यास दुसरींहि अनेक कारणें होतीं. समाजांतील त्यांच्या प्रभावाला नुसतें लाला हंसराजांचेंच तेवढें कार्य कारण नव्हतें. त्यांची देशभक्ति, त्यांचें चारित्र्य वगैरे अनेक गुण त्याच्या मुळाशीं होते. नोकरीमुळें जेथें जेथें त्यांचें जाणें झालें त्या त्या ठिकाणच्या लोकांना ते जणूं देशभक्तीचा व परोपकाराचा मूर्तिमंत पुतळाच भासले. लोकांच्या उपयोगी पडण्याची व त्यांच्या दुःखांत समभागी होण्याची त्यांना आवड होती. पाहुण्यांचा आदरसत्कार करण्यांत त्यांनीं कधीं उणें पडूं दिलें नाहीं. त्यांच्या अंगच्या अशा अनेक अमोलिक गुणांमुळेंच प्रत्येक ठिकाणीं त्यांची छाप बसत असे. नोकरीमुळें त्यांना नेहमीं फिरतीवर जावें लागे व त्यामुळें सहजासहजीं पंजाबांतील बहुतेक शहरांतून त्यांचें जाणें झालेलें होतें. त्यांचे स्नेहीहि बरेच होते. निदान त्या वेळीं तरी साऱ्या पंजाबांत त्यांच्याइतकी दुसरी प्रतिभावान् व्यक्ति नव्हती असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. खुद्द आर्यसमाजांतहि लाला हंसराजांपेक्षां त्यांचें वजन जास्त होतें.

लाला मुल्कराज मांसाहाराचे पक्षपाती होते आणि बौद्ध व जैन धर्मांच्या प्रादुर्भावामुळेंच हिंदुस्थानाचा राजकीय बाबतींत असा भयंकर अधःपात झाला असें त्यांचें मत होतें. अहिंसेच्या लोकप्रिय परंतु अहितकारी तत्वानें हिंदुस्थानांतील लोकांना दुबळे व दैववादी बनविलें आहे असें ते म्हणत. मुकल्राज अशा मताचे

असल्यामुळें अहिंसेला फाजिल महत्व दिलें जाऊं नये म्हणून ते नेहमीं जपत असत. दुसरें क्षत्रियोचित गुणांचे ते पुरस्कर्ते असल्यामुळें आर्यसमाजांत मांसाहाराचा प्रश्न उपस्थित होतांच निरामिष भोजनाविरुद्ध प्रचंड चळवळ करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. या विषयावर त्यांनीं कांहीं पुस्तकेंही लिहिलीं.

वर लिहिल्याप्रमाणें मांसाहाराच्या प्रचाराकरितां लाला मुल्कराजजींचे प्रयत्न चाललेले पाहून लाला मुंशीराम व त्यांच्या पक्षाचे लोक संतापले होते. हंसराजांकरितांच लाला मुल्कराज हें सर्व करीत आहेत, असा त्यांचा समज झालेला होता. तसेंच आर्यसमाजांत असलेलें हंसराजांचें वजन कायम रहावें म्हणून स्वतः आर्यसमाजी नसतांनाहि आर्यसमाजांतून ते मांसाहाराचा प्रचार करीत आहेत असा त्या पक्षाचा गैरसमज झालेला होता. परंतु वास्तविक स्थिति काय होती हें वर आलेंच अहे. लाला हंसराज मांसाहारी असले व त्यांचीं मतें मुल्कराजजींच्या मतांशीं जुळतीं असलीं तरी त्यांना मांसाहारासारख्या गोष्टीचा प्रचार करणें पसंत नव्हतें. असो. हळूहळू या वादाला नवीं नवीं पाळेंमुळें फुटूं लागलीं. लाला हंसराज व मुल्कराज हे राजकारणी असून धार्मिकतेचा आव आणून आर्यसमाजांत शिरून आपल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ समाजाचा उपयोग करूं पहात आहेत असा एक नवाच प्रश्न मूळच्या वादांत घुसडला गेला.

लाला मुंशीराम व मास्टर दुर्गाप्रसाद स्वतःला धर्माचे पुरस्कर्ते समजत व नुसत्या धर्मप्रचाराचे पक्षपाती म्हणवीत असत. दयानंद हायस्कूल स्थापन झालें त्या वेळीं तें लोकप्रिय वनविण्याकडे सर्वांचें लक्ष होतें. या शाळेंत सुरवातीला बरींचशीं मुलें दुसऱ्या शाळांतून आलेलीं होतीं. या मुलांचें विनाकारण नुकसान होऊं नये म्हणून इतर शाळांतून जें शिक्षण दिलें जाई तेंच शिक्षण आपणहि द्यावें, पण त्याबरोबरच हिंदी व संस्कृत या भाषा शिकविण्याचा प्रयत्न करावा असें ठरलें. आतां ज्या मुलांना प्रारंभापासूनच शिक्षण द्यावयाचें होतें त्यांच्यासाठीं मात्र संस्कृत भाषा आवश्यक म्हणून ठेवण्याचें ठरलें.

पहिल्याच वर्षी संस्कृत भाषेचें शिक्षण कसें दिलें जावें याविषयीं वाद सुरू झाला. पं. गुरुदत्तांची इच्छा दयानंद सरस्वतींनीं मान्य केलेल्या योजनेनुरूप दिलें जावें अशी होती. लाला लालचंद व हंसराज या दोघांना हें मान्य नव्हतें. पं. गुरुदत्त आपल्या आयुष्यभर अष्टाध्यायी शिकविण्यावर जोर देत होते. सुरवातीला

'त्वयार्धं मयार्धं' या नीतीचा अवलंब केला गेला. पंडितजींच्या कांहीं सूचना पास झाल्या तर कांहीं नापास झाल्या. गुरुदत्तांच्या निधनानंतर लाला रलाराम (गूजरखानी) यांच्याकडे महात्मापक्षानें या गोष्टीचें नेतृत्व सोंपविलें. लाला रलाराम व मुंशीराम शाळेंत व कॉलेजांत संस्कृत भाषेला प्राधान्य दिलें जावें व स्वामीजींच्या योजनेप्रमाणेंच शिक्षण दिलें जावें यावर भर देऊं लागले. इंग्रजी भाषेला गौणत्व दिलें जाणें आणि शाळेचा व कॉलेजाचा विश्वविद्यालयाशीं असलेला संबंध तुटला जाणें या दोन्ही गोष्टी लाला हंसराज व लालचंद यांना पसंत नव्हत्या. हळू हळू याविषयींचा मतभेद वाढत गेला व मूळच्या वादांत याचीहि भर पडली गेली. दोन्ही पक्षांची एकमेकांपासून कायमची फारकत होण्यास हा नूतन वादहि थोडा फार कारणीभूत झालेला आहे.

मांसाहारानें सुरू झालेला कलह येथपर्यंत येऊन ठेपल्यावर व दोन्ही पक्षांची एकी होणें अशक्य झाल्यावर प्रत्येक पक्ष आपापली बाजू बळकट करण्याच्या उद्योगास लागला. समाज व कॉलेजची व्यवस्था लाला हंसराजांच्या पक्षाच्या हातांत होती. लालाजी दयानंद कॉलेजाचे मुख्याध्यापक, समाजाचे अध्यक्ष व पंजाबप्रांतीय आर्यप्रतिनिधी सभेचे अध्यक्ष होते. यामुळें मुंशीरामजींचा पक्ष हंसराजांच्या पक्षाच्या हातांतून समाजाची व्यवस्था काढून घेण्याच्या प्रयत्नास लागला. हा अंतर्गत लढा येथपर्यंत आल्यावेळींच (१८९२) माझें लाहोर शहरीं आगमन झालें. यापूर्वींच कॉलेजच्या व्यवस्थापक समितीच्या पत्रव्यवहाराचें काम माझ्याकडे सोंपविलेलें होतें व त्यामुळें निरनिराळ्या व्यक्तींशीं व समाजांशीं मला पत्रव्यवहार करावा लागत असे.

१८९२ सालीं कॉलेजच्या व्यवस्थापक मंडळाची पुन्हां निवडणूक झाली व मी मंत्री बनलों. या वेळीं पं. गुरुदत्त परलोकवासी झालेले होते. विद्यार्थिदशेपासूनच माझा हंसराजांशीं स्नेह जडलेला होता व आतां कॉलेजच्या व्यवस्थापकमंडळाचा चिटणीस बनल्यामुळें त्यांच्याशीं व लाला लालचंद आणि ईश्वरदास यांच्याशीं मला वारंवार काम पडूं लागलें. विरुद्ध पक्षापैकीं मास्टर दुर्गाप्रसादांशीं माझा स्नेह होता व गुरुदत्तांच्या खासगी मित्रांशीं—यांत रैमलदासहि येतात—माझा परिचय होता. कांहीं काळपर्यंत मी या घरगुती भांडणांत लक्ष घातलें नाहीं. हंसराज-पक्षाकडे माझा ओढा होता व महात्मापक्षाच्या मताप्रमाणें कॉलेजाच्या किंवा शाळेच्या शिक्षणक्रमांत उलथापालथ करणें मला पसंत नव्हतें. मांसाहाराच्या

बाबतींतहि माझीं मतें हंसराजांप्रमाणेंच होतीं. याबाबतींत शास्त्राचें मत काय आहे हें समजून घेण्याची मी केव्हांच पर्वा केली नाहीं. दुसरें असल्या क्षुल्लक गोष्टीला एवढें महत्त्व देणें योग्य नाहीं असेंच माझें स्वतःचें मत होतें.

१८९१ चें सबंध वर्ष या नसत्या वादविवादाच्या प्रचंड खळबळींत गेलें. माझ्या स्मरणाप्रमाणें या वर्षाच्या अखेरीला लाला हंसराजांनीं आपण होऊन समाजाचें अध्यक्षस्थान सोडलें व मास्टर दुर्गाप्रसाद त्यांच्या जागीं स्थानापन्न झाले. यामुळेंही दोन्ही पक्षांना चिरस्थायी स्वरूप प्राप्त होण्यांत मोठें साहाय्य झालें. मास्टरसाहेबांत कामाचा उठाव करण्याची योग्यता नव्हती व पुढारी होण्याला लागत असलेले गुणहि नव्हते. मास्टरसाहेबांच्या कारकीर्दींत समाजांतील उपासनांचा व व्याख्यानांचा प्रतिपक्षाचें खंडन करण्याच्या व स्वपक्षाचें मंडन करण्याच्या कामीं उघड उघड उपयोग करण्यांत आला. हळूहळू या गोष्टीची मजल येथपर्यंत आली कीं एक वेळ मास्टरसाहेबांनीं स्वतः व्यासपीठाजवळ उभें राहून व छाती पुढें करून प्रतिपक्षाला आपल्यावर हल्ला करण्याकरितां आव्हान दिलें.

यांच्या कारकीर्दींत अंतरंग सभेच्या सभांनाहि रणक्षेत्राचें स्वरूप प्राप्त होत असे. वर्षभर दोन्ही पक्ष आपापली बाजू मजबूत करण्यांत गुंग झालेले होते. या वेळीं पुष्कळ नवीन सभासदांची भरती केली गेली व जुन्या सभासदांपैकीं ज्यांची वर्गणी आलेली नव्हती त्यांच्याकडून ती वसूल करून घेऊन त्यांना मतें देण्यास लायक बनविलें गेलें. या वादांत कांहीं सभासदांनीं आपलीं मतें अनेकदां बदललीं. व्याख्यानांतून, उपासनांतून व वर्तमानपत्रांतून व्यक्तिगत टीकांचा भडिमार चालू होता. या बाबतींत पिछाडीला कोणता पक्ष होता हें मी सांगूं इच्छित नाहीं. एवढें खरें कीं हंसराजांचा पक्ष जें कांहीं करी त्यांत सभ्यतेचें आक्रमण होत नसे. मास्टरसाहेबांच्या पक्षाच्या प्रत्येक कार्यांत आढ्यता व विरुद्ध पक्षाला संताप आणण्यासारखी टीका यांचा भरपूर सांठा असे. मला पक्की आठवण आहे, कीं या वर्षांत भरलेल्या अंतरंगसभेच्या सभा भल्या लांबलचक होत असत. एकादी सभा संध्याकाळीं सुरू होऊन रात्रौ बारा वाजेपर्यंत चाले तर केव्हां केव्हां याहूनहि उशीर होत असे. मास्टर आत्माराम, लाला तुलाराम, लाला केदारनाथ, लाला सीताराम आर्य, स्वर्गीय लाला जयचंद व लाला जीवनदास हे मास्टरसाहेबांच्या पक्षाचे पुढाऱ्यांपैकीं होते. परंतु त्या पक्षाच्या कार्यकर्त्यांत जबरदस्त असे राय

पैडाराम हे होते. पैडारामसाहेबांच्या योग्यतेविषयीं व बुद्धिमत्तेविषयीं दुमत नव्हतें. ते मोठे धर्मात्मा व देशभक्त होते. त्यांचें खासगी वर्तनहि फार उच्च दर्जाचें होतें. त्या वेळीं ते लँड रेकॉर्ड डायरेक्टरांचे मुख्य सहायक होते. ते शांत व गंभीर असल्यामुळें त्यांच्या हालचालींवरून त्यांच्या अंतस्थ विचारांचा पत्ता कोणालाहि लागणें शक्य नव्हतें. राय मूलराजही अशीच व्यक्ति आहे. असो. राय पैडाराम हे हंसराजांच्या विरुद्धपक्षाचे मोठे आधारस्तंभ होते.

महात्मापक्षाच्या* आतांपर्यंत आलेल्या नेत्यांशिवाय या पक्षाबद्दल सहानुभूति असणारे व या पक्षाच्या पुढाऱ्यांत गणले जाणारे असे आणखी एक सद्गृहस्थ होते. यांचें नांव राय लेधाराम साहनी हें होय. रायसाहेब कट्टर आर्यसमाजी असून उदार अंतःकरणाचे, आदरसत्कारप्रिय, प्रेमळ व साधे असे होते. ते उत्साही होते, पण बुद्धिमत्ता व कार्यकुशलता हे दोन गुण त्यांना फारसे लाभलेले नव्हते. याखेरीज त्यांच्या ठायीं दूरदर्शित्वहि नव्हतें. बुद्धिमत्तेच्या दृष्टीनें महात्मापक्षाचें धुरीणत्व राय पैडाराम यांच्याकडे होतें. परंतु मास्तर दुर्गाप्रसाद पैडारामसाहेबांच्या सल्ल्याप्रमाणें फारसे वागत नसत. उलट ज्यांची फारशी प्रसिद्धि नव्हती, आर्यसमाजांत फूट न पडती तर ज्यांना कोणी विचारलें नसतें व फूट पडण्यांतच ज्यांचा वैयक्तिक फायदा होता, अशा लोकांचीच दुर्गाप्रसादांवर एक प्रकारें छाप बसलेली होती. आर्यसमाजांतून सुशिक्षित लोक फुटून न जातां त्यांच्या नावालौकिकाचा व संपत्तीचा समाजाला लाभ मिळावा, पण समाजाचें धुरीणत्व मात्र महात्मापक्षाकडे असावें अशी राय पैडारामसाहेबांची इच्छा होती. यामुळें पुढें अंतरंग सभेंत जेव्हां राय मूलराज यांना समाजांतून काढून टाकण्याचा ठराव मांडला गेला तेव्हां पैडाराम यांनीं कसून विरोध केला व आपलें मत हंसराजपक्षाच्या बाजूला दिलें. शेवटीं हा ठराव नापास झाला.

---

* लाला मुंशीराम व मास्तर दुर्गाप्रसाद यांच्या पक्षाला हंसराजांचा पक्ष व्यंगोक्तीनें ' महात्मापक्ष ' म्हणत असे. याचें कारण असें कीं हा पक्ष प्रत्येक गोष्टींत धर्माला प्राधान्य देई. उलट महात्मापक्षाचे लोक हंसराजपक्षाला 'कल्चर्ड' ( शिक्षित ) पक्ष म्हणत असे. या पक्षांतील लोकांना आपल्या शिक्षणाचा व चालीरीतीचा फार अभिमान असे व त्यामुळें हें नांव त्याला पडलें होतें.

महात्मापक्षाचे लोक राय मूलराज यांना व हंसराजपक्षाचे लोक राय पैडाराम यांना सरकारचे हस्तक म्हणून समजत असत. लोकांना वाटे कीं हे दोघे सरकारच्या आज्ञेनुसार समाजांत फूट पाडण्याचें कार्य करीत आहेत व अप्रत्यक्ष रीत्या समाजाची कर्तृत्वशक्ति नष्ट करीत आहेत. या दोघांपैकीं राय मूलराजांविषयीं माझें मत काय होतें तें पुढें सांगेन; परंतु पैडारामांसंबंधानें लोकांचें मत कितपत खरें होतें हें सांगणें शक्य नाहीं. यांचें शिक्षण फारसें झालेलें नसलें तरी ते बुद्धिमान् होते. त्यांच्याबरोबर माझें कैक वेळां संभाषण झालेलें आहे. दुसऱ्याचीं मनें आपल्याकडे ओढून घेण्याचा गुण त्यांच्यांत बराच होता. त्यांच्याशीं माझा परिचय झाल्याकाळीं नित्यनैमित्तिक कार्यें करण्यांत ते अति तत्पर असत. ते मांसाहारी नव्हते व मद्यपानहि करीत नसत. परंतु १८९२ सालीं व तदनंतर त्यांच्या अंतकाळापर्यंत समाजांत जें कांहीं त्यांनीं कार्य केलें, त्यावरून राजकीय बाबतींत जेसुईट लोकांप्रमाणें ते वागतात असें माझें मत झालें होतें.

लाहोर शहराबाहेर महात्मापक्षाचे पुढारी लाला मुंशीराम हे इतरांपेक्षां अधिक कार्य करीत असत. मुंशीराम स्वतःचा जीवनवृत्तांत लिहीत असल्यामुळें त्यांच्याविषयीं या ठिकाणीं विशेष लिहिण्याची गरज नाहीं. परंतु १८९२–९३ व पुढें बरींच वर्षेंपर्यंत मुंशीरामजी ही तंटेभांडणें लावणारीच नव्हे तर कीर्तीची व नेता बनण्याची हांव धरणारी व्यक्ती आहे, असा माझा ग्रह झालेला होता. सध्यां मात्र माझें हें मत बदललें आहे व पक्षाभिमानानें किंवा स्वपक्षाच्या हिताकरितां त्यांनीं जें काय केलें त्यावरून त्यांची योग्यता ठरविणें हा अन्याय होय असें मला वाटूं लागलें आहे. इतर मोठ्या लोकांप्रमाणें मुंशीरामजींतहि दोष आहेत व खुशामत करणारे लोक नेमका या दोषांचाच तेवढा फायदा घेत असतात. आणि त्यामुळें त्यांच्या कार्यांवर व मतांवर अशा लोकांची छाप पडलेली दिसून येते. याखेरीज ते स्वभावानें थोडेसे मृदु असल्यामुळें त्यांच्या मतांत धरसोड झालेली दिसते. आतां कीर्तीची व प्रभावाची त्यांच्या ठायीं बिलकुलच अभिलाषा नाहीं असें मात्र मला खात्रीपूर्वक सांगतां येत नाहीं. या दृष्टीनें पहातां आर्यसमाजाच्या सर्व नेत्यांत पंडित लखपतराय व लाला द्वारकादास या दोहोंशिवाय लौकिकाची, कीर्तीची किंवा प्रभावाची बिलकुल इच्छा नसलेला असा दुसरा नेता माझ्या पहाण्यांत आलेला नाहीं.

लाला मुंशीराम जन्मतःच अन्वेशकवृत्तीचे आहेत. इतरांच्या दोषांना टीकेचा विषय बनविण्याचा त्यांचा जन्मस्वभाव आहे. परंतु असें असलें तरी ते तंटेभांडणें लावणारे, भांडखोर किंवा अभिमानी आहेत असें म्हणण्यास मात्र मी तयार नाहीं. पक्षाभिनिवेशाच्या कालांत त्यांच्याविषयीं माझा जो ग्रह झाला होता त्यांत आतां बदल झालेला आहे व त्या कालीं झालेल्या ग्रहाबद्दल माझें मलाच आतां वाईट वाटूं लागलें आहे. मुंशीरामजी भावुक असून क्षुद्रभावापेक्षां त्यांच्यांत उच्च भावनाच अधिक आहेत. ते उदार वृत्तीचे असून आदरातिथ्य करणारे आहेत. त्यांची सेवावृत्ति फार उच्च दर्जाची आहे. तसेंच सिद्धांताकरितां प्रसंगीं हानी किंवा कष्ट सहन करण्यास ते मागेंपुढें पहाणारे नाहींत. त्यांच्या ठायीं आत्मसंयमाचा भरपूर सांठा आहे. मैत्री करण्यास ते योग्य असून मित्राची सदैव साथ देणारे आहेत. तसेंच ते स्पष्टवादी असून खुल्या दिलाचे आहेत.

लाला मुंशीराम त्या काळीं सद्धर्मप्रचारकाचे संपादक होते. त्यांच्या लिखाणांत एक प्रकारचें तेज असे. सद्धर्मप्रचारकाच्या जोडीला हंसराजपक्षानें 'भारतसुधार' नांवाचें एक पत्र चालविलें होतें. खरें पहातां सालिगराम अरोडवंश यांनीं हें पत्र चालविलें होतें; पण त्यांतील लेखांमुळें तें हंसराजपक्षाचें मुखपत्र बनलें होतें. लाला मुंशीरामजींचा पक्ष विद्यार्थ्यांत व तरुणांत—त्यांतल्या त्यांत कॉलेजांतील तरुणांत—फार प्रिय होता. या पक्षांतील तरुण हंसराज व त्यांचा पक्ष यांचा निरादर करीत तर हंसराजपक्षांतील लोक महात्मापक्षाचा करीत. स्वतः हंसराज मात्र असल्या भानगडींत न पडतां शांत असत.

लाहोरांत आल्यावर दोन्ही पक्षांपासून स्वतः अलग राहून दोहोंत एकी घडवून आणण्यास आपण कारणीभूत व्हावें अशी कांहीं दिवस माझी इच्छा होती. पण थोड्याच अवधींत हंसराजांचा मी अनुयायी असल्याबद्दल महात्मापक्षाच्या मनांत किंतु आला. आतां हें खरें कीं सुरवातीपासूनच हंसराजांकडे माझा ओढा होता. त्यांचा त्याग, त्यांची देशभक्ति व त्यांची साधी रहाणी यांचा माझ्या मनावर फार परिणाम झालेला होता. त्यांना मी आर्यसमाजाचा नेता समजत असें व या स्थितींत ते फार गांजले गेले आहेत अशी माझी समजूत झालेली होती. राजकीय बाबतींत आम्हा दोघांचें एकमत होतें; पण असें असलें तरी दयानंद कॉलेजामुळेंच मी कॉलेजपक्षाला मिळालों. कॉलेजाविषयींची महात्मापक्षाची योजना मला बिलकुल

पसंत नव्हती व महात्मापक्षाच्या मताप्रमाणें कॉलेज चालविल्यास एकहि विद्यार्थी कॉलेजांत न येतां व कवडीचीसुद्धां मदत न मिळतां तें बंद करावें लागेल अशी मला भीति वाटत होती. आर्यसमाजाच्या कार्यांत कॉलेजला अति महत्व आहे व महात्मापक्ष हा एकप्रकारें त्याचा शत्रु आहे असें या कालीं माझें ठाम मत झालेलें होतें.

१८९२ चें सारें वर्ष आपापसांतील तंटेभांडणांत गेलें. या वादांत दोन्ही पक्षांनीं पक्षाभिमानांत वाहून जाऊन जें कांहीं केलें त्याचें स्मरणें झालें कीं मला फार वाईट वाटतें. एकमेकांना शिव्या देणें, एकमेकांवर भलतेच आक्षेप लादणें व एकमेकांविषयीं बरें वाईट बोलणें हें तर नेहमींचेंच होतें. पण ही मजल येथेंच थांबलेली नव्हती. समाजांतील मतदार लोकांना भिन्न भिन्न प्रकारांनीं चिथविलें गेलें, कांहींची वर्गणी समाजाच्या कोशांतून भरली गेली, कांहींना दुसरींच प्रलोभनें दाखवून आपल्या बाजूला वळविलें गेलें आणि खासगी पत्रव्यवहारसुद्धां वर्तमानपत्रद्वारा चवाठ्यावर मांडला गेला.

आर्यसमाजाच्या इतिहासांतील या कालाचा जेव्हां मी एकांतांत बसून विचार करूं लागतों तेव्हां माझी मलाच अति लाज वाटते. त्या वेळींसुद्धां हा प्रकार मला आवडत नव्हता. सर्व लोक आमचा तिरस्कार करीत आणि देशाचा, धर्माचा व जातीचा उद्धार करावयास निघालेल्या सुशिक्षितांची असली अवस्था असतांना त्यांनीं इतरांना दोष देण्यास तयार व्हावें हें आश्चर्य आहे असें उघड उघड बोलत.

माझ्या समजुतीप्रमाणें समाजांतील या गोंधळाला लाला मुंशीरामजींइतकेच हंसराजही जबाबदार होते. परंतु आतां पाश्चिमात्य देशांतील सार्वजनिक निवडणुकीची पुरी माहिती झाली असल्यामुळें आज वीस वर्षांनंतर त्या कालींच्या घटनांवर दृष्टी फेंकली कीं असें वाटूं लागतें कीं ज्या तत्त्वांवर समाजाची स्थापना केली गेली होती त्या तत्त्वांनुसार झालेल्या गोष्टी अवश्यंभावी होत्या व तसल्या प्रकारापासून समाजाचा बचाव होणें शक्य नव्हतें.

१८९२ च्या नव्हेंबरांत समाजाचा वार्षिकोत्सव जवळ आल्यामुळें या भांडणांना अगदीं ऊत आला. केवळ समाजच नव्हे तर कॉलेजसुद्धां आपल्या हाताखालीं घालण्याचा महात्मापक्षाचा ठाम निश्चय झालेला आहे असें कॉलेजपक्षाला वाटूं लागलें. प्रत्येक वर्षी नव्हेंबर महिन्यांत लाहोर समाजाची अंतरंगसभा सभा-

सदांचें नवें रजिस्टर बनवीत असते. ज्या लोकांना मत देण्याचा अधिकार असतो अशांनाच सभासद म्हटलें जातें. या वर्षी अंतरंगसभा नवें रजिस्टर बनविण्याच्या हेतूनें जेव्हां जुन्या रजिस्टरांतील सभासदांची चांचणी करूं लागली, तेव्हां प्रत्येक पक्ष आपल्या बाजूचे सभासद वाढविण्याचा व विरुद्ध बाजूचे होतील तितके कमी करण्याचा प्रयत्न करूं लागला. प्रत्येक दिवशीं रात्रीचा बराचसा वेळ याविषयींच्या वादविवादांत जात असे. दिवसा कचेरींतून काम करावें व नवे सभासद मिळविण्याचा यत्न करावा आणि रात्रौ भांडत बसावें. अखेरीस महात्मापक्षानें न्यायनीति गुंडाळून ठेविली असल्यामुळें त्या पक्षाकडून उचित व्यवहाराची अपेक्षा करणें फुकट आहे, असें कॉलेजपक्षाला वाटलें व त्या पक्षानें आपल्या लोकांची एक स्वतंत्र सभा भरविण्याचें ठरविलें. ही सभा मुद्देलियां नांवाच्या मोहोल्यांत लाला लालचंदांच्या घरीं भरली. सभेला कॉलेजपक्षाचे लहान थोर सर्व सभासद हजर होते. ही सभा शनिवारीं रात्रौ भरली होती. कारण सभेला वेळ लागला तरी दुसऱ्या दिवशीं रविवारची सुटी होती. सर्वांपुढें यापुढें काय करावें हा एकच प्रश्न होता. सभेंत चार मताचे लोक असल्याचें आढळून आलें. एका पक्षाचे मतें पोलिसांचे मदतीनें समाजमंदिराचा ताबा घ्यावा, दुसऱ्याचे मतें एका वेळीं एका पक्षाची व दुसऱ्या वेळीं दुसऱ्या पक्षाची सभा भरविली जावी असा कोर्टामार्फत कायमचा निर्णय करून घ्यावा तर तिसऱ्याचे मतें लाठीच्या सहाय्यानें रात्रौ मंदिराचा ताबा घेण्याचा यत्न करावा व कोणी आड आल्यास त्याला चोपून काढावें. तिसऱ्या पक्षाचे अध्वर्यु लाला अमरनाथ हे होते. माझ्या स्मरणाप्रमाणें ते त्या वेळीं लाहोर कमिशनरींत सुपरिंटेंडेंट किंवा कारकून होते व पुढें जिल्हा कचेरींत सुपरिंटेंडेंट किंवा सरकारकून झाले. शेवटीं पेन्शन घेतल्यावर ते सबरजिस्ट्रार झाले व ही जीवनकथा लिहीत असल्यावेळीं ते सरकारचे एक विश्वासु सल्लागार बनले असून जातिभक्तांचे कट्टर विरोधी बनले आहेत.

आतांपर्यंत सांगितलेल्या तीन पक्षांशिवाय जो चौथा पक्ष होता, त्याच्या मतें महात्मापक्षाशीं मिळून काम करणें अशक्य झालें असल्यामुळें आपण एक स्वतंत्र जागा भाड्यानें घ्यावी व तेथें आपल्या पक्षाचीं साप्ताहिक अधिवेशनें भरविण्यास सुरुवात करावी व अशा प्रकारें थोडे दिवस ढकलून पुढें काय करावयाचें तें नंतर नक्की ठरवावें.

या सभेंत मी खालीं दिल्याप्रमाणें बोललों असल्याची मला पक्की आठवण आहे. "नुसत्या दगड आणि विटा यांनीं कांहीं समाजमंदिर बनत नाहीं. ज्या सिद्धांतां-मुळें समाजमंदिर उभें केलें जातें ते सिद्धांतच खरें पहातां मंदिर होत. एखाद्या इमारतीवर ताबा मिळविण्याकरितां किंवा एखाद्या इमारतीकरितां तंटाबखेडा करण्याकरितां आपण समाजांत आलेलों नाहीं; वैयक्तिक सुधारणेसाठीं आणि देशाची व जातीची सेवा करण्याकरितां समाजाचे सभासद झालों आहों. आतां इतकें खरें कीं आपण मोठ्या स्वार्थत्यागानें, अति परिश्रमानें व फार मोठ्या खर्चानें हें मंदिर बांधलें आहे. पण मी आपणांस इतकेंच सांगतों कीं आपल्यांत धर्मभाव जागृत असेल तर याहूनहि भव्य मंदिर आपण बांधूं शकाल. थोडक्यांत सांगाव-याचें म्हणजे सध्याच्या मंदिराचा ताबा घेण्याच्या, त्याकरितां तंटेभांडणें करण्याच्या, कोर्टांत जाण्याच्या किंवा पोलिसांची मदत घेण्याच्या मी अगदीं विरुद्ध आहें."

लाला हंसराजांना समाजमंदीर सोडण्यांत जरी वाईट वाटत होतें तरी लाला लालचंदांचें मत माझ्याप्रमाणेंच असल्याचें पाहिल्यावर ते आमच्या मताला मिळाले व शेवटीं सर्वसम्मतीनें स्वतंत्र रीतीनें कार्य करण्याचें ठरलें.

याप्रमाणें स्वतंत्र रीतीनें कार्य करण्याचें ठरल्यावर दुसऱ्याच दिवशीं अनार-कलीच्या तोंडावर डाव्या बाजूला रहात असलेल्या भगत ईश्वरदास यांच्या येथें आमच्या पक्षाची सभा भरली. सुरवातीला आदल्या दिवशींचा स्वतंत्र रीत्या काम करण्याचा ठराव पास करून घेऊन नवीन कार्यकारी मंडळाची निवडणूक केली गेली. या नव्या निवडणुकींत मी अध्यक्ष व त्या कालीं जंगलखात्यांत सरकारकुनाच्या जागेवर असलेले बुड्ढामल मंत्री निवडले गेलों.

ज्या ठिकाणीं ही सभा भरली होती तें ठिकाण सध्यांचें अनारकली समाजमंदीर जेथें आहे, त्या आवारांत होतें. सध्याच्या मंदिराच्या कोपऱ्यांत त्या वेळीं एक ओटा व एक खोली असून पुढें पांढरी स्वच्छ जागा होती. ज्या बाजूला सध्या पुस्तकालय आहे तेथें एक खोली असून पुढचा भाग दुमजली होता. या दुमजली घराच्या तळमजल्यावर अरोडवंश छापखाना होता व येथेंच आमच्या पक्षाचें 'भारतसुधार' नांवाचें वर्तमानपत्र छापत असे. समाजाच्या साप्ताहिक उपासनां-करितां आंतलें घर व आंगण भाड्यानें घेतलें गेलें व तेथें साप्ताहिक अधिवेशनें होऊं लागलीं.

समाजाच्या वार्षिकोत्सवाला फक्त दोन तीन आठवड्यांचाच अवकाश होता. अवकाश थोडा असल्यामुळें वार्षिकोत्सव साजरा करावा कीं करूं नये हा प्रश्न उपस्थित झाला. उत्सव न करावा तर आमची दुर्बलता व्यक्त होऊन जुना वच्छोवाली समाज हाच मुख्य समाज म्हणून गणला जाण्याचा संभव होता. तसें होऊन आपलें हंसें होऊं नये असें आमच्यांतील बऱ्याच लोकांना वाटत होतें. पण त्याबरोबरच खर्चाचा व कामाचा प्रश्न होता. शेवटीं उत्सव करण्याचें नक्की ठरलें व उत्सवाच्या तयारीला सुरवात झाली. लाहोर समाजाचा उत्सव त्या काळींसुद्धां मोठ्या समारंभानें साजरा केला जात असे. उत्सवाला आमची नवी जागा अपुरी पडण्याचा संभव असल्यामुळें दयानंद हायस्कुलाच्या आवारांत तो साजरा करण्याचें ठरलें. हायस्कूल आमच्या ताब्यांत असल्यामुळें ही जागा मिळण्यास अडचण नव्हती. शेवटीं उत्सव होणार असल्याचें जाहीर केलें गेलें व त्याच्या तयारीला सुरवात झाली. मला चांगली आठवण आहे कीं उत्सवाच्या तयारीकरितां मला कैक रात्री जाग्रण करावें लागलेलें आहे. या वेळीं दिवसभर कचेरींत काम करावें लागे, कॉलेजच्या चिटणिशीचें काम सांभाळावें लागे आणि खेरीज समाजाचा अध्यक्ष या नात्यानें पडणारें कामहि करावें लागे. याखेरीज नेहमींच्या कामाशिवाय आमच्या पक्षाविरुद्ध जे कांहीं आक्षेप घेतले जात त्यांना व्याख्यानद्वारा किंवा लेखनद्वारा उत्तरें द्यावीं लागत. माझ्या एकट्यावर कामाचा एवढा बोजा पडण्याचें कारण त्या वेळीं आमच्या पक्षांत सफाईदार उर्दू लिहूं शकतील असे इसम फार थोडे होते.

ज्या घटनांचा मी आतांपर्यंत उल्लेख करीत आलों आहें, त्यांच्या निश्चित कालाचें मला चांगलेंसें स्मरण नाहीं, हें मी यापूर्वींच सांगितलें आहे. माझ्या अनुमानाप्रमाणें या गोष्टी १८९२ सालांत घडल्या असाव्या. या वर्षाच्या उत्सवांत बरींच विघ्नं उत्पन्न झालीं. धर्माविषयींच्या वादविवादांत मांसाहाराचा प्रश्न उपस्थित केला गेला. लाला मूलराज यांनीं मांसाहाराला अनुकूल असें स्वतःचें मत प्रकट करतांच महात्मापक्षाच्या मुलांनीं व तरुणांनीं त्याविरुद्ध एकच गिल्ला केला. या वेळीं अध्यक्षस्थानीं लाला हंसराज हे असल्यामुळें त्यांनाहि लोकांचीं बरीं वाईट बोलणीं सहन करावीं लागलीं.

हे सर्व प्रकार पाहून माझें मन फार अस्वस्थ झालें व त्यामुळें उत्सवांतील सर्व रात्री जाग्रणांत गेल्या. या वेळीं माझ्या मनांत वारंवार विचार येत कीं,

ईश्वराजवळ तरी आमच्या या आपसांतील दुहीवर इलाज असेल काय ? पूर्वापार चालत आलेल्या या दुहीचा कायमचा नायनाट व्हावा म्हणून पूर्वीच्या अनेक देव-देवतांना सोडून सर्वाधार, सर्वचालक अशा एकाच ईश्वराला आम्हीं भजूं लागलों व त्याचीच पूजा करूं लागलों; परंतु आमचीं कुकर्में, आमचे दुराचार व आमचीं कलुषित अंतःकरणें यांनीं आमची पाठ सोडली नाहीं आणि त्यामुळें आमच्यांत ऐक्य उत्पन्न होण्याऐवजीं बेकीचें बीज कायम राहिलें व आम्ही आपसांतच भांडूं लागलों. ही भांडण्याची रीत तरी योग्य होती काय ? नाहीं. या बाबतींत आम्ही अगदीं ताळतंत्र सोडला होता असें म्हणणें गैर होणार नाहीं.

या वर्षाच्या वार्षिकोत्सवानंतर मी हिसार येथें गेलों परंतु या ठिकाणींहि समाजांतील दुहीमुळें मनाला स्वस्थता नव्हती. माझ्या मनांतील या अस्वस्थतेमुळें व लाहोर समाजाची दुर्दशा माझ्या दृष्टिसमोर वारंवार उभी राहत असल्यामुळें हिसारला माझ्यानें रहावलें नाहीं व मी परत लाहोरास आलों.

१८९२ चें साल कशा प्रकारच्या गोंधळांत गेलें तें वर आलेंच आहे. आतांपयतच्या हकीकतींत महात्मापक्षाच्या उत्साही सभासदांचीं नांवें आलीं आहेत. आतां आमच्या पक्षांतील उत्साही सभासदांचीं देतों. स्वर्गीय लाला लालचंद व भगत ईश्वरदास हे आमच्या पक्षाच्या नेत्यांपैकीं होते आणि लाला शौकतराय, बाबा छज्जूसिंह, मेहता राधाकृष्ण, बाबा तेजासिंह, लाला अमीरचंद, लाला सुखदयाळ, लाला हरनामदास व लाला रामसहाय हे दुय्यम प्रतीच्या नेत्यांत गणले जात असत.

लाहोर शहराबाहेर दोन्ही पक्षांचे नेते खालीं दिल्याप्रमाणें होते--

| ठिकाण | महात्मापक्ष | कॉलेजपक्ष, हंसराज किंवा शिक्षित पक्ष |
|---|---|---|
| पेशावर | स्वर्गीय डॉ. सीताराम, लाला सुजनलाल व लाला मूलचन्द तांबा. | स्वर्गीय बख्शी गोकुलचंद, बा. रलाराम व लाला गज्जूमल, |
| रावळपिंडी | लाला गंगाराम वैद्य, सीताराम व लाला कृपाराम साहनी. | स्वर्गीय लाला हंसराज साहनी, स्वर्गीय लाला हरिराम सेठी व स्वर्गीय लाला मयादास साहनी. |

| ठिकाण | महात्मापक्ष | कॉलेजपक्ष, हंसराज किंवा शिक्षित पक्ष |
|---|---|---|
| ऐबटाबाद | ... | सेठ चूहडलाल. |
| गूजरखां | लाला रलाराम. | ... |
| मियानी | लाला ज्वालासहाय. | ... |
| झेलम | ... | ला. हरभगवानदास व मास्टर बोधराज |
| गुजराणवाला | लाला केवलकृष्ण व लाला नारायण कृष्ण. | ... |
| अमृतसर | स्वर्गीय पं० धर्मचंद कौल. | लाला गोपाळदास भंडारी व पंडित शिवदत्त. |
| जालन्धर | लाला मुन्शीराम, लाला देवराज, लाला रामकृष्ण व रायजादा भक्तराम. | ... |
| होशियारपूर | ... | मास्टर मुरलीधर, स्वर्गीय महाशय रामचंद्र, लाला ठाकुरदास ( हे आतां सनातनी बनले आहेत. ) |
| फिरोजपूर | ... | चौधरी बिशन सहाय, स्वर्गीय पं० मूलराज व ला० दीनदयाल. |
| हिसार | .... | पंडित् लखपतराय. |
| लुधियाना | लाला उमरावसिंह. | ... |
| अम्बाला शहर | ... | लाला द्वारकादास. |
| अम्बाला छावणी | लाला गुरांदत्ता मल. | ... |
| मुलतान | स्वर्गीय लाला काशीराम. | लाला चेतनानन्द. |

वर दिलेली यादी अपूर्ण आहे. परंतु नाइलाजास्तव जेवढीं नांवें मला आठवलीं तेवढींच दिलीं आहेत. हीं नांवें देण्याचें कारण इतकेंच कीं त्यांवरून पुढील

पिढीला आर्यसमाजांतील या कृष्णकालाचें अनुमान करण्यास सोपें जावें. लाला मुंशीराम यांच्यापाशीं याविषयीं जास्त विश्वसनीय माहिती असण्याचा संभव आहे व ती ते आपल्या आत्मकथेंत देतील अशी आशा आहे. असो.

वर लिहिल्याप्रमाणें उभयपक्षांनीं या वर्षीच्या वार्षिकोत्सवाची निरनिराळी तयारी केली व दोघांचे निरनिराळे उत्सव झाले. या वेळीं दोन्ही पक्षांत ईर्षा, द्वेष व वैर यांचा नुसता हैदोस चालू होता.

आमच्या उत्सवाला दोन्ही पक्षाच्या समान मालकीच्या जागेचा उपयोग केला जाणार असल्यामुळें महात्मापक्ष रुष्ट झाला होता. महात्मापक्षाच्या दृष्टीनें आमचा उत्सव व आमचा समाज हीं दोन्हीहि वाह्यात होतीं. उत्सवाच्या दिवसांत दोन्ही पक्ष एकमेकांच्या भीतीनें आपापल्या मंडपांवर रात्रौ पहारा ठेवीत असत; आणि माझ्या स्मरणाप्रमाणें दिवसासुद्धां कांहीं गडबड होऊं नये म्हणून पोलिस सदोदित सज्ज असत.

शुक्रवारीं रात्रौ दोन वाजेपर्यंत मंडपाची सजावट चालू होती. पण ती पुरी न झाल्यामुळें सकाळीं सहा वाजतां पुन्हां सुरवात झाली. शनिवारीं सारा दिवस उत्सवाचा कार्यक्रम चालून संध्याकाळीं सहा वाजण्याच्या सुमारास आर्यप्रतिनिधि सभेच्या वार्षिक अधिवेशनास सुरवात झाली. हें अधिवेशन पहांटे पांचसहा वाजेपर्यंत चाललें होतें. दरम्यान एकमेकांची क्षति दाखविण्यांत दोन्ही पक्षांनीं बिलकुल कसूर केली नाहीं. अधिवेशनांत महात्मापक्षाच्या लोकांचा भरणा अधिक असल्यामुळें कॉलेजपक्षाला अडथळा करण्याशिवाय दुसरें कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. शेवटीं कसल्याच बाबतींत निर्णय न होतां अधिवेशन समाप्त झालें.

रविवारीं कॉलेज फंडाकरितां मी मागणी केली. या उत्सवांत शनिवारीं किंवा रविवारीं राय मूलराज यांचें "आर्यसमाजा"वर व्याख्यान झालें. व्याख्यानाला लोकांची तुफान गर्दी जमली होती; परंतु सुदैवानें कसलेंहि विघ्न न येतां व्याख्यान पुरें झालें. या वर्षाचा उत्सवही निर्विघ्नपणें पार पडला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

या वर्षाच्या शेवटीं दोन्ही पक्षांची स्थिति खालीं दिल्याप्रमाणें होती. लाहोर समाजांत दोन पक्ष स्थापन होऊन दोहोंचे निरनिराळे समाज बनले होते. जुन्या

समाजाचें मंदिर, रजिस्टर व पुस्तकालय हीं महात्मापक्षाच्या ताब्यांत होतीं, तर कॉलेजपक्षानें एका भाड्याच्या घरांत आपला समाज थाटला होता.

आर्यप्रतिनिधि सभेचे सर्व पदाधिकारी व कागदपत्र महात्मापक्षाच्या अखत्यारांत होते, तर कॉलेजपक्षाची कॉलेजावर एकमेव सत्ता होती.

नव्या वर्षाच्या सुरवातीला दोन्ही पक्षांत नव्या दमानें युद्धाला सुरवात झाली. वर्तमानपत्रें, उपासना व व्याख्यानें हीं या युद्धाचीं रणक्षेत्रें होतीं. कॉलेजावर येणाऱ्या आक्षेपांपासून कॉलेजाचा बचाव करण्याकरितां "दयानंद अँग्लो वैदिक कॉलेज समाचार" नांवाचें एक मासिक पत्र मी सुरू केलें. प. वा. लाला लालचंद हे या मासिकांत लिहीत असले तरी मुख्य मदार माझ्यावरच होती. कॉलेजांत संस्कृत भाषेला फारसें महत्व दिलें जात नाहीं, या सबबीवर महात्मापक्ष कॉलेजच्या व्यवस्थेला नेहमीं दोष देत असे. या दोषांतून मुक्त होण्यासाठीं मी एक दोनशें पानांचें पुस्तक लिहिलें. या पुस्तकांत कॉलेज सुरू झाल्यापासून पुस्तक लिहिण्याच्या वेळेपर्यंत संस्कृत व हिंदी या दोन भाषांच्या प्रसाराकरितां कॉलेजनें केलेल्या कार्याची माहिती दिलेली होती. पुस्तकाचा विषय एकदम ध्यानांत यावा म्हणून पुस्तकाचें नांव "दयानंद कॉलेजांतील संस्कृत शिक्षणाचें कालमानाच्या दृष्टीनें समालोचन" (दयानंद कॉलेजमें संस्कृतकी तालीमपर तवारिखी नजर) असें ठेविलें होतें. इतर कामाबरोबर आणि या पुस्तकलेखनाबरोबर 'भारतसुधार' पत्रांतहि माझें लिहिणें चालू होतें. ह्याशिवाय विरुद्ध पक्षाच्या आर्यपत्रिका पत्राच्या तोडीला आमच्या पक्षानें चालविलेल्या 'आर्य मेसेंजर' नांवाच्या इंग्रजी पत्रांतही मी लिहीत होतों. परंतु माझ्या फुरसुतीचा बराचसा वेळ व कोर्टाच्या सुटीचे बहुतेक दिवस कॉलेजकरितां फंड गोळा करण्यांत व एतद्विषयक दौरा काढण्यांत जात असत. एकदां मला सिमल्याहून थेट पेशावरला तांतडीनें यावें लागलें. इतक्या गडबडीनें येण्याचें कारण असें होतें कीं माझ्या येण्यांत जर थोड्याशा तासांचा विलंब होता तर कॉलेजला कवडीचीसुद्धां मदत मिळाली नसती. पेशावरांत दोन दिवसांत मला तीन हजार रुपये मिळाले; पण तिसऱ्या दिवशीं महात्मापक्षाच्या मंडळीचें आगमन झाल्याबरोबर कॉलेजला मदत मिळण्याचें बंद झालें.

१८९३ सालीं खालीं दिलेलीं कामें माझ्यावर सोंपविलेलीं होतीं:—

१. कॉलेज कमिटीच्या मुख्य मंत्र्याचें.

२. आमच्या पक्षाच्या समाजाच्या अध्यक्षाचें.

३. दयानंद अँग्लोवैदिक समाचारपत्राच्या संपादकाचें.

४. भारतसुधार व आर्यमेसेंजर या दोन पत्रांत लिहिण्याचें.

या दोन पत्रांपैकीं भारतसुधारपत्र कैक वेळां मी अथपासून इतीपर्यंत लिहिलेलें आहे.

५. कॉलेज फंडाकरितां दौरा काढण्याचें.

वर दिलेल्या समाजाच्या कामांखेरीज स्वतःच्या चरितार्थाकरितां वकिलीचें काम करावें लागे तें निराळेंच. या वर्षी याखेरीज आणखी एक नवेंच काम माझ्या माथीं पडलें होतें. तें म्हणजे प्रथम पंजाब काँग्रेसच्या स्वागतसमितीचें. या समितीच्या सभांना मला हजर रहावें लागे. इतकीं कामें संभाळून जो कांहीं वेळ उरे तो दोन्ही पक्षांत एकी घडवून आणण्याच्या हेतूनें ज्या बैठकी बसत त्यांना हजर रहाण्यांत जाई. या बैठकी भिन्न भिन्न स्थळीं व भिन्न भिन्न वेळीं भरविल्या जात असत. पण अखेरीला या बैठकींतून कोऱ्या वादविवादाव्यतिरिक्त दुसरें कांहीं निष्पन्न झालें नाहीं.

१८९३ ते मार्च १८९७ पर्यंत उभय पक्षांत अति चढाओढ चाललेली होती. लाहोराबाहेर कैक ठिकाणीं दोन पक्ष होऊन एका समाजाचे दोन समाज झाले होते. शिक्षित (कॉलेज) पक्षानें आपली स्वतंत्र प्रतिनिधि सभा बनविली होती. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रत्येक पक्षाला स्थिरस्थावरता प्राप्त होऊन तो स्वतःसिद्ध बनला होता. कॉलेजपक्षानें आपल्या हातून कॉलेज जाऊं नये म्हणून स्वतःच्या बहुमतानें प्रथमतः एक ठराव पास करून घेतला. या ठरावानें जे समाज कॉलेजकरितां फंड जमा करतील अशांचेच प्रतिनिधि कॉलेजच्या व्यवस्थापक समितींत घेतले जावे असें ठरलें गेलें. ज्या समाजांचे दोन विभाग झाले होते अशांसाठींच मुख्यतः हा ठराव होता.

या वेळीं एक तर कॉलेज महात्मापक्षाच्या स्वाधीन करावें किंवा तें आहे तसेंच पुढें चालवावें असा प्रश्न कॉलेजपक्षापुढें होता. महात्मापक्षाची पाठ्यप्रणाली कॉलेजपक्षाला पसंत नसल्यामुळें तिचा अवलंब करण्यास तो तयार नव्हता. कॉलेजपक्षाच्या मतें पंजाबप्रांताच्या शैक्षणिक गरजा पुऱ्या करण्यासाठीं कॉलेजाचा विश्वविद्यालयाशीं संबंध असणें व कॉलेजांतून विश्वविद्यालयाच्या परीक्षांसाठीं विद्यार्थी पाठविले जाणें अवश्य होतें. असें झाल्यानेंच देशभक्ति व जातिभक्ति या दोहोंची पूर्णता होईल असें कॉलेजपक्षाला वाटत असे.

कायद्याच्या दृष्टीनें विचार करून कॉलेजपक्षानें असा ठराव केला कीं ज्या ठिकाणीं एकाचे दोन समाज झाले असतील, त्या ठिकाणीं जो समाज आपल्या कार्यक्रमांत कॉलेजसंस्थेला महत्त्व देईल, कॉलेजाकरितां जो फंड जमा करण्याचा प्रयत्न करील, अशा समाजालाच कॉलेज कमिटींत प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार असावा. या ठरावानें महात्मापक्षांत उद्वेग उत्पन्न झाला.

मे महिन्यांत कॉलेजच्या वार्षिक अधिवेशनाच्या वेळीं महात्मापक्षानें लाठीच्या जोरावर कॉलेज आपल्या ताब्यांत घेण्याचा यत्न केला. महात्मापक्षाची एक टोळी "**धर्मीकरितां प्राण जाइ तरि पर्वा नसे तयाची**" (धर्मके लिए जान जाती है तो जाने दो) हें गाणें गात हायस्कुलाच्या बाजूला आली. हायस्कुलाचे बाहेरचे दरवाजे पूर्वींच बंद केलेले होते. ज्यांच्यापाशीं समितीच्या कायद्याप्रमाणें सभासदत्वाचा व मताधिकार असल्याचा मंत्रीच्या सहीचा पास असेल अशांनाच अधिवेशनांत येऊं द्यावें, असें कॉलेजपक्षानें ठरविलें होतें. महात्मापक्षाची टोळी जबरदस्तीनें आंत घिरण्याच्या हेतूनें आली, पण दरवाजे बंद पाहून व दुसरा कांहीं इलाज नाहीं असें पाहून ती दरवाजे फोडण्याचा प्रयत्न करूं लागली. लगेच दोन्ही पक्षांत मारामारीला सुरवात झाली. प. वा. लाला सुंदरदासजींचें डोकें फुटलें. सुंदरदासजींचे बंधु लाला गोपाळदास जखमी झाले व दुसऱ्या दोघांतिघांना जखमा झाल्या. या गडबडीमुळें अधिवेशन बंद पडलें व उभय पक्षांनीं आपापल्या कैफियती पोलिसांत दाखल केल्या. दुसऱ्या दिवशीं एक प्रचंड सभा भरली. सभेंत वादविवादाला ऊत आला होता. शेवटीं बहुमतानें महात्मापक्षाविरुद्ध निकाल दिला गेला व तो निकाल ऐकतांच महात्मापक्षाची मंडळी सभेंतून उठून गेली. नंतर ही मंडळी आपल्या समाजांत गेली व तेथें तिनें यापुढें कॉलेजचा नाद सोडून देऊन वेदप्रचार कोष स्थापन करण्याचें ठरविलें.

अशा प्रकारें उभयपक्षाचें शिक्षणविषयक कार्य निरनिराळें झालें; पण एवढयानें आपसांतील लाथाळी मात्र थांबली नाहीं. दोन्ही पक्षांचीं कामें निरनिराळीं झालीं, पण त्यांच्या कार्यांना मदत करणारी जनता मात्र एकच होती. यामुळें दोन्ही पक्षांना आपापल्या मतांचा प्रचार करणें भाग होतें. या घरगुती लढयांत ज्याप्रमाणें उभयतांनीं घृणित व अनुच्चारणीय अशीं कृत्यें केलीं, एकमेकांवर आक्षेप लादले, एकमेकांचीं उणीं काढलीं, एकमेकांवर शिव्याशापांचा वर्षाव केला व

लेखणीचा दुरुपयोग केला, त्याप्रमाणेंच हिमतीनें, उत्साहानें व साहसानें समाजाची सेवा करण्यांत त्यांनीं केलेला त्याग इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं अंकित करण्यायोग्य व संस्मरणीय असा आहे. वृद्ध, तरुण, श्रीमंत, गरीब सर्वांनीं आपापल्या सामर्थ्याबाहेर कार्य केलेलें आहे. कॉलेजच्या मदतीकरितां पूर्वीच प्रत्येकानें स्वतःची एक महिन्याची प्राप्ति दिलेली होती. शिवाय पुष्कळ इसम नियमितपणें प्रत्येक महिन्याला वर्गणीच्या रूपानें मदत करीत असत. पण आतां नवीन प्रकार योजून कॉलेजचा फंड गोळा होऊं लागला व सर्वांनीं तो मोठ्या आनंदानें दिला. वेदप्रचार कोष, कन्या महाविद्यालय व स्थानिक शाळांकरितां महात्मापक्षानें नव्या दमानें पैसा जमविण्यास सुरवात केली व लोकांनीं त्यांनासुद्धां भरपूर मदत दिली. उभयपक्षाच्या या करण्यानें लोकांना वाटूं लागलें कीं आपापले फंड वाढविण्याकरितांच दोन्ही पक्ष आपापसांत भांडत असावे.

आमच्या पक्षाच्या कार्यांत कॉलेजांतील एका उत्साही तरुणानें—स्व. लाला सुंदरदासजीनें (स्व. लाला सांईदासजींचे ज्येष्ठ पुत्र)—आपले प्राण अर्पण केले. त्याच प्रमाणें महात्मापक्षांतील एका उत्साही युवकानें—लाला लम्भूराम यानें—आपल्या पक्षाच्या सेवेंत स्वतःची आहुति दिली. याच सुमारास मी भारी आजारी पडलों. या आजारांतून मी बरा होईन कीं नाहीं याचीहि शंका होती. दोन महिनेपर्यंत मी सन्निपातानें (न्युमोनिया) बिछान्यावर पडून होतों. माझीं दोन्ही फुफ्फुसें साफ सडून गेलीं होतीं. या वेळीं डॉ. बेलीराम यांनीं माझ्याकरितां जे श्रम घेतले व माझी काळजी घेतली त्यामुळें मी त्यांचा कायमचा ऋणी झालों आहें. या वेळीं लाला हंसराज व लाला मुंशीराम यांनीं अति उत्साहानें व सहनशीलतेनें आपापलें कर्तव्य बजावलें व आपापल्या पक्षाच्या कार्यास स्वतःला वाहून घेतलें. प. वा. लाला लालचंद यांची कॉलेजाचे व लाला पैडाराम यांची महात्मापक्षाचे कार्यांत पुष्कळ मदत झाली.



पं. लेखराम.

## १३. पंडित लेखराम शहीद् झाले.

मार्च सन १८९७ त पं. लेखराम यांचा खून झाला. आर्यसमाजाच्या इतिहासांत ही घटना चिरस्मरणीय होईल अशी आहे. आपल्या धार्मिक विश्वासामुळें पंडितजी एका मुसलमानाच्या हातून मारले गेले. धार्मिक विश्वासास्तव मारले गेल्यामुळेंच पंडितजींना 'शहीद' ही बहुमानाची पदवी प्राप्त झाली. पंडितजी आर्यसमाजांतील पहिले शहीद होत व आजपर्यंत ही बहुमानाची पदवी पटकाविणारा दुसरा कोणी झालेला नाहीं.* माझ्या मतें पंडितजी अति उत्साही आर्यसमाजी होते व समाजाच्या तत्वांवर त्यांचा नितांत विश्वास होता. फार्शी व अरबी या दोन भाषा त्यांना उत्तम प्रकारें अवगत असून उर्दूवरहि त्यांनीं प्रभुत्व संपादिलेलें होतें. त्यांचें वैयक्तिक चारित्र्य फार उच्च दर्जाचें होतें. सुरवातीला ते पोलिसखात्यांत होते व पुढें ही नोकरी सोडून ते समाजाचे प्रचारक बनले. निर्वाहासाठीं प्रतिनिधि सभा यांना कांहीं वेतन देत असे. पोलिसखात्यांत काम केल्यामुळें यांच्या अंगीं एककल्लीपणा आलेला होता व पुढें धार्मिक बाबतींतसुद्धां तो कायम राहिला. त्या काळीं इस्लाम व ख्रिश्चन या दोन धर्मांचें खंडन

* पं. रामचंद्र, स्वामी श्रद्धानंद इत्यादिकांनीं वैदिक धर्माच्या प्रसाराकरितां केलेलें स्वात्मार्पण ही आत्मकथा लिहिली गेल्यानंतरच्या कालांतील आहे.

करून त्यांनीं हिंदूंची फार मोठी सेवा बजाविलेली आहे. ज्याप्रमाणें मौलवी व पाद्री हिंदु धर्मांतील विविक्षित गोष्टींवर टीका करून हिंदु धर्म टाकाऊ आहे असें प्रतिपादितात व आपल्या प्रतिपादनाच्या पुष्टीकरितां हिंदुधर्मावरील टीकाकारांनीं लिहून ठेवलेल्या गोष्टी पुढें मांडीत असतात, त्याचप्रमाणें पंडितजीसुद्धां या दोन्ही धर्मातील विविक्षित अंगांवर टीका करून व स्वमतप्रतिपादनाकरितां दोन्ही धर्मांच्या विरोधकांचीं प्रमाणें देऊन या दोन्ही धर्मांची रेवडी उडवून देत असत. पंडितजींनीं लिहिलेलीं पुस्तकें अशाच स्वरूपाचीं आहेत. साऱ्या आर्यसमाजांत अशाप्रकारें टीका करून विरुद्ध पक्षाचा धुव्वा उडविण्यांत त्यांचा हात धरूं शकेल असा दुसरा कोणीहि इसम झालेला नाहीं. हिंदु धर्माच्या बचावाकरितां इतर धर्मां-विषयीं अशा प्रकारची समालोचना करणें सुरवातीला जरी लाभदायक झालें असलें तरी अंतीं या प्रकारानें स्वतंत्र व न्याययुक्त धर्मसंशोधन करण्याची प्रवृत्ति आर्यसमाजापुरती तरी खुंटली गेली, असें मला वाटतें.†

पंडितजी सरहद्दीवरील प्रांतांतील राहाणारे असल्यामुळें त्यांच्या वाणींत सभ्यलोकांत आढळून येणारी मार्दवता नव्हती. साऱ्या पंजाबांत त्यांच्यासारखा दुसरा ताठ इसम नव्हता. त्यांना जें वाटे तें ते कोणाचीहि भीडमर्यादा न ठेवतां बोलून दाखवीत. आतां असें असलें तरी त्यांच्या अंतःकरणाच्या सत्यनिष्ठेविषयीं कोणाला कधींहि शंका नव्हती. स्वामी दयानंद सरस्वतींवर पंडितजींचा पूर्ण विश्वास असला तरी स्वामीजींना चूक होण्यापलीकडचे असे ते मानीत नसत. एकदां अजमीर येथें राय मूलराज यांच्या तोंडून "स्वामीजींवर प्रचलित जैनधर्माचें दडपण पडलें गेल्यामुळें मांसाहाराविषयीं त्यांनीं प्रतिकूल मत दिलें" असे शब्द बाहेर पडले. हे शब्द ऐकतांच पंडितजींच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले व एखाद्या

† आपल्या अनुयायांतून इतर धर्मांचें न्याय्य परीक्षण करण्याची प्रवृत्ति नष्ट न व्हावी या गोष्टीची बौद्ध, ख्रिस्ती किंवा इस्लामधर्मप्रवर्तकांनीं जर काळजी घेतली असती तर या धर्मांची स्थापनाच झाली नसती, त्यांच्यांत पंथभेद माजले नसते व या सर्व गोंधळामुळें झालेले व होत असलेले अनर्थ टळले असते. पण असें होतें तर या धर्मांचा आज दिसत असलेला जगड्व्याळ पसारा न दिसतां त्यांची स्थिती हिंदुधर्मासारखीच राहती.

लहान मुलाप्रमाणें ते रडूं लागले. स्वामी दयानंदांवर त्यांची इतकी निस्सीम भक्ति होती कीं स्वामीजींवर टीका झालेली ऐकली कीं त्यांचें देहभान रहात नसे.

मुसलमानांपासून हिंदूंचें रक्षण करण्यांत व नवमुस्लिमांना पुन्हां हिंदू बनवून घेण्यांत त्यांनीं हिंदु जातीची जी सेवा बजाविलेली आहे, ती सुवर्णाक्षरांनीं अंकित केली जाण्यायोग्य व अद्वितीय अशी आहे. आणि अशी सेवा निर्भयतेनें बजावीत असतांनाच पंडितजींनीं स्वतःचा बलि दिला या गोष्टीचें स्मरण झालें, कीं पंडित लेखराम हे आर्यसमाजाचे खरेखुरे शहीद आहेत असें म्हणण्यास बिलकुल संकोच वाटत नाहीं. मुसलमानांनीं त्यांना कैक वेळ धमक्या दिलेल्या होत्या; तसेंच कट्टर मौलवी आपल्या रक्ताला भुकेलेले आहेत हेंहि त्यांना ठाऊक होतें; परंतु अशा स्थितींतसुद्धां आपलें कार्य चालू ठेवण्यास ते डगमगले नाहींत. असो. ज्या रीतीनें त्यांचा खून केला गेला ती रीत इतकी घृणित होती कीं त्या कृत्यानें इस्लामधर्माला कायमचा बट्टा लागला गेला. त्यांचा खून करणारा इसम शुद्ध होण्यासाठीं म्हणून त्यांच्याकडे आला. पंडितजींनीं त्याला आपल्या घरीं आश्रय दिला व एखाद्या पाहुण्याप्रमाणें त्याची बडदास्त ठेवली. याप्रकारें आश्रय मिळाल्यावर त्या इसमानें पंडितजींच्या घरचा कांहीं दिवस पाहुणचार भोगला व एक दिवस संधी साधून पंडितजींच्या पोटांत सुरी भोसकून पसार झाला. पंडितजींच्या खुनानें साधारणपणें सर्व उत्तर हिंदुस्थानांत फार खळबळ उडाली व आपसांतील मतभेद विसरून जाऊन थोडा वेळ सनातनी हिंदू आर्यसमाजाचे साथीदार झाले. पंडितजींच्या शवाबरोबर लोकांचा एवढा मोठा समूह लोटला होता कीं तेवढा मोठा जनसंमर्द यापूर्वी दुसऱ्या कोणाच्याहि शवाबरोबर जमलेला नव्हता. शवाबरोबर २० ते ५० हजारपर्यंत लोक असावेत असें अनुमान आहे.

सुरीं भोंसकल्याबरोबर पंडितजींना हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें, व तेथूनच त्यांच्या प्रेतयात्रेला सुरवात झाली. हिंदु लोकांनीं पंडितजींच्या शवाचा अपूर्व सत्कार केला. हजारों स्त्रियांनीं पंडितजींच्या शवावर पुष्पांचा व बताशांचा वर्षाव केला. पंडितजींच्या शवावरील फुलें पवित्र समजलीं गेलीं व लोकांनीं तीं आपापल्या घरीं नेलीं. पंडितजींच्या बलिदानाचा पहिला परिणाम असा झाला कीं स्मशानांत शव ठेवलें गेल्यावर त्या शवासमोर समाजांतील उभयपक्षांनीं मतभेद विसरून जाऊन एकी करण्याचा निश्चय केला. या वेळीं लाला मुंशीराम यांनीं जें भाषण केलें तें त्यांच्या योग्यतेला व कीर्तीला साजेसें व अद्वितीय असें होतें.

पंडितजींच्या प्रयाणानंतर जो रविवार आला, त्या दिवशीं वच्छोवाली ( जुना समाज ) समाजांत लाला हंसराजांच्या अध्यक्षतेखालीं उभयपक्षांची एकत्रित अशी उपासना झाली. या ऐक्यासंबंधाची सुरवातीची तडजोड माझ्याच घरीं झाली. या बैठकींत मांसाहाराचा प्रश्न बाजूला ठेवण्याचें व एकत्रित समाजाचे अध्यक्ष पूर्वीप्रमाणें लाला हंसराजांनाच नेमण्याचें महात्मापक्षानें कबूल केलें. याच वेळीं पंडितजींचा खून करणाऱ्या इसमाचा पत्ता लावण्याकरितां एक कमिटी नेमली गेली व तिचें कामकाज माझ्याकडे सोंपविलें गेलें. या कामानिमित्त मी बरेच वेळां पोलीस सुपरिंटेंडेंटला भेटलों. पोलिसांनीं व आर्यसमाजानें खुनी इसमाचा शोध लावण्याची बरीच खटपट केली, पण मुसलमानांनीं त्यांच्या खटपटीला यश लाभूं दिलें नाहीं. निरनिराळ्या वेळीं दोनतीन इसमांना पकडण्यांत आलें, व ओळख न पटल्यामुळें सोडून देण्यांत आलें. या वेळीं लोकांचा असा समज झाला होता—व तसा समज होण्यास भक्कम कारणेंहि होतीं—कीं खुनी इसमाविषयीं मुसलमानांत फार सहानुभूति आहे व हा खून करण्याकरितां एक षड्यंत्र रचलें गेलें असून त्यांत लाहोरांतील कांहीं मौलवी व मुसलमान जमीनदार यांचें अंग आहे व याच लोकांनीं खुनी इसमाला आश्रय देऊन त्याला पळून जाण्यास मदत केलेली आहे. कांहींहि असो; पंडितजींचा खून करणाराचा पत्ता न लागणें हें मुसलमानांतील प्रेमाचें व ऐक्याचें द्योतक आहे व त्याबद्दल त्यांनीं अभिमान धरणें योग्य आहे असें मला वाटतें.

पंडितजींच्या आत्माहुतीनें दोन्ही पक्षांत एकी झालीसें दिसलें, पण ती फार दिवस टिकली नाहीं. याचें कारण ही एकी तात्कालिक होती व तिची उत्पत्ती पंडितजींच्या शोकामुळें झालेली होती. वास्तविक पहातां उभयपक्षांच्या विचारांत एकतानता उत्पन्न झालेली नव्हती व उभयतांचे विचार निरनिराळ्या दिशेनेंच चाललेले होते. या एकीच्या कालांतसुद्धां प्रतिनिधि सभा महात्मापक्षाच्या हातांत होती व कॉलेज शिक्षितपक्षाच्या ताब्यांत होतें. तात्पर्य उभयतांचा एकमेकांवर विश्वास असा मुळींच नव्हता. उलट प्रत्येक पक्ष दुसरा पक्ष आपलें वजन व शक्ति हीं आपल्याला नामोहरम करण्याकडे खर्चीत आहे असें समजत होता. याखेरीज हा मेळमिलाप कांहीं वर्षें असाच राहिला तर लाहोर शहरापुरतें तरी आपलें महत्व नामशेष होईल अशी महात्मापक्षाला अंतस्थ भीति

वाटत होती. राय पैडाराम यांनीं एका सभेंत अशाच अर्थाचे उद्गार काढल्याचें मला कांहीं लोकांनीं सांगितलें होतें. सारांश हा कीं या नूतन अविश्वासानें लाहोर शहरांत पुन्हां दोन समाज झाले व आमचा (शिक्षित) पक्ष पुन्हां अनारकली समाजांत आपल्या सभा भरवूं लागला. ज्या वेळीं ही दुसऱ्यांदां फाटाफूट झाली त्या वेळीं मी आजारी होतों व लाहोरांत नव्हतों. ज्या वेळीं बरा होऊन पुन्हां लाहोरांत आलों, त्या वेळीं दोन्ही पक्षांचे समाज निरनिराळे झालेले होते व त्यांच्या सभासुद्धां निरनिराळ्या होऊं लागल्या होत्या.

## १४. राजकारणाकडे झुकाव.

१८९७ सालच्या सुरवातीला मध्यप्रांतांत भयंकर दुष्काळ पडला व तेथील लोक अन्नान्नदशेनें मरूं लागले. लोकांच्या या दैन्यावस्थेचा फायदा घेण्याकरितां ख्रिस्तीलोकांनीं अनाथालयें उघडलीं असून त्यांत अन्नास मोताद झालेल्या लोकांची भरती करण्यास सुरवात केली आहे, तसेंच दुष्काळांत विशेषतः मुलेंच फार मरत असून ख्रिस्ती लोक मुलांनाच आपल्या अनाथालयांत घेत आहेत, अशा आशयाची बातमी लाहोरांत आली. लोकांच्या दैन्यावस्थेची ही करुण कहाणी ऐकून माझें अंतःकरण कळवळलें व दुष्काळपीडित लोकांसाठीं कांहीं करतां येतें तर पहावें म्हणून चळवळ करण्यास आरंभ केला. अनारकली समाजातर्फें पहिल्यानें या चळवळीला प्रारंभ झाला व थोड्याच अवधींत सर्व हिंदु लोक तींत सामील झाले. लवकरच लाहोर शहरांत अनाथ हिंदु मुलांच्या संरक्षणासाठीं एका सभेची स्थापना झाली व तींत सनातनी आणि ब्रह्मसमाजीसुद्धां सामील झाले. पुढें जबलपूर, बिलासपूर इत्यादि ठिकाणांहून अनाथ मुलें आणविलीं गेलीं आणि लाहोरांत व इतरत्र त्यांची सोय करण्यासाठीं अनाथाश्रम उघ-

डले गेले. माझ्या स्मरणाप्रमाणें ज्या दिवशीं अशा अनाथ मुलांची पहिली टोळी लाहोरांत आली, त्या वेळीं त्यांना पहाण्याकरितां स्टेशनावर पुष्कळ लोक जमले होते. या वेळीं शहरांतील लोकांत अशा मुलांविषयीं सहानुभूतीचें वातावरण निर्माण झालेलें होतें. आगस्टपर्यंत मी हें काम करीत होतों. पुढें आगस्टमध्यें विश्रांतीसाठीं म्हणून थोडे दिवस मी ऐबटाबाद येथें गेलों. तेथें असतांना एक दिवस पावसांत भिजल्यामुळें मला ताप आला. हळू हळू तापाबरोबर प्लीहा वाढली व या दोहोंमुळें पुढील सालच्या मे महिन्यापर्यंत मी आजारी राहिलों.

लहानपणापासून मला धार्मिक शिक्षण मिळालें असलें, धार्मिक विषयांवरील वादविवाद मी ऐकत आलों असलों व धार्मिक विषयांना वाहिलेलीं वर्तमानपत्रें वाचीत आलों असलों तरीहि माझ्यांत धर्माविषयीं प्रेम उत्पन्न झालें नाहीं. लहानपणीं ज्या पुस्तकांनीं माझ्यावर परिणाम केला व जीं मी पुनःपुन्हां वाचीत असें, तीं ‘कसस हिंद’ व फर्दूसीचा ‘शाहनामा’ हीं होत. गुलिस्तांपैकीं जी कविता माझ्या हृत्पटलावर कायमची कोरली गेली ती ही आहे—

**आं न मन् बाशम् कि रोजे जंग बीनी पुश्तमन्**
**ईमनम् कां दरमियाने खाके खूं बीनी सरे**

(अर्थ—शत्रूला पाठ दाखविणारांपैकीं मी नाहीं. शत्रूशीं दोन हात करतांना ज्याचा देह रक्तानें माखला जातो व ज्याचें प्रेत मातींत लडबडून जातें अशांपैकीं मी आहें.)

माझ्या वडिलांनीं लहानपणीं खासगी रीतीनें मला फार्शी भाषा शिकविली होती. त्यांच्या बरोबर फार्शी वाङ्मयाचें माझें जेवढें वाचन झालें त्यांत ‘सिकंदरनामा’ व ‘शाहनामा’ या दोन काव्यग्रंथांचा माझ्यावर अति परिणाम झाला. उर्दू साहित्यापैकीं ज्यांनीं माझ्यावर परिणाम केला तीं ‘रसूमे हिंद’ व ‘कसस हिंद’ हीं दोन पुस्तकें होत. मौलवी मुहम्मद हुसेन आजादलिखित ‘कसस हिंद’ पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत रजपुतांच्या शौर्याचें वर्णन आलेलें आहे. हा भाग मी अनेक वेळां वाचला. चितोडवरील अल्लाउद्दीनाची स्वारी, हुमायूनची दुःस्थिति व अकबराच्या विजयांचें वर्णन या कथाभागानें माझ्या अंतःकरणांत कायमचें स्थान पटकाविलें. या पुस्तकानें हिंदूंच्या शौर्याविषयीं माझ्या ठायीं

आदर उत्पन्न केला व हिंदूंबद्दल मला अभिमान वाटूं लागला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हें पुस्तक माझें आवडतें बनलें व यानें माझ्या आयुष्यांत बरेंच परीवर्तन घडवून आणलें.

ज्या दिवशीं हें पुस्तक माझ्या हातांत पडलें, त्या दिवसापासून रजपुतांचा इतिहास जाणण्याची लालसा माझ्यांत जागृत झाली व आजतागायत तींत तिळमात्रहि फरक पडलेला नाहीं. मुख्त्यारीची परीक्षा उत्तीर्ण होऊन मी कमावूं लागल्यावर पहिल्यानें जें पुस्तक मी खरेदी केलें तें टॉडकृत राजस्थान हें होय. त्या वेळीं सरकारी शाळांतून 'वाकयाते हिंद' या उर्दू पुस्तकद्वारा हिंदुस्थानचा इतिहास शिकविला जात असे. या पुस्तकाच्या अध्ययनानें मुसलमान लोकांनीं हिंदूंवर अति अत्याचार केले असल्याचें आढळून आल्यामुळें इस्लामधर्माविषयीं मला वाटत असलेला आदर लुप्त झाला व मी इस्लामधर्माचा तिरस्कार करूं लागलों. पुढें लाहोरांत ज्यांची संगत मला लाभली त्यांच्या सहवासानें इस्लामधर्मापासून मी जास्त जास्त दुरावत गेलों व हिंदुधर्म व हिंदुलोक यांच्याबद्दल मला आपलेपणा वाटूं लागला. या आपलेपणांत राजकारणाचीहि झांक होती. हा आपलेपणा उत्पन्न करण्यांत लाला मुल्कराज भल्ला यांनीं लिहिलेल्या 'शहीदगंज'* व 'वीरगंज'* या दोन पुस्तकांचें सहाय्य झालेलें आहे.

लहानपणीं हिंदुधर्माविषयीं मला कांहींच वाटत नव्हतें. मी शीख कुटुंबांत वाढलों असलों, आपल्या आजीला जपजीचा पाठ करतांना मी पाहिलेलें असलें तरीहि त्यानंतर मिळालेल्या मुसलमानी धर्मशिक्षणानें हिंदु किंवा शीख धर्माविषयीं मला आपलेपणा म्हणून कांहींच वाटेनासा झाला होता. उलट हे दोन्ही धर्म अंधविश्वासानें व मूर्खपणाच्या गप्पाष्टकांनीं ओतप्रोत भरलेले आहेत असें माझें मत झालें होतें. माझ्या या विचारांत पुढें जें परिवर्तन घडून आलें, त्याचें कारण राष्ट्रीय विचारांची वाढ हें होय. मी जें धार्मिक वाङ्मय वाचलें होतें तें मुसलमानी धर्माला अनुकूल असल्यामुळें इस्लामधर्माविषयीं मला आदर वाटूं लागला होता. परंतु ज्या वेळीं 'वाकयाते हिंद' व 'कसस हिंद' हीं दोन पुस्तकें माझ्या वाचनांत आलीं, त्या वेळीं माझ्या अंतःकरणांत एका नव्या भावनेचा



* धर्माकरितां बलिदान देणारांच्या व शूरांच्या गोष्टी.

प्रादुर्भाव झाला व ही भावना इस्लामधर्मापासून मला दूर दूर नेऊं लागली. हिंदुधर्माचें अध्ययन करण्यास किंवा त्याचीं उत्तमोत्तम तत्त्वें समजून घेण्यास मला फारसा अवकाश नव्हता. दुसरें धार्मिक प्रश्न योग्य प्रकारें जाण्याइतकी माझ्यांत योग्यताहि नव्हती. याखेरीज वेळ असता तरी संस्कृत भाषेच्या ज्ञानाभावीं मीं काय वाचूं शकलों असतों ? संस्कृत भाषा तर राहोच, नुसतीं हिंदीचीं मुळाक्षरें-सुद्धां त्या वेळीं मला वाचतां येत नव्हतीं. गुरुमुखी तर आजहि येत नाहीं. माझें सारें बालपण उर्दू, फार्शी व अरबी शिकण्यांत गेलें होतें. उर्दू भाषेंत हिंदुधर्मांचीं तत्त्वें विशद केलेलीं अशीं फारशीं पुस्तकें नव्हतीं व जीं होतीं तीं मला समजण्यासारखींहि नव्हतीं. परंतु सुदैवानें मिडिल परीक्षा उत्तीर्ण होण्यापूर्वींच 'वाकयाते हिंद' व 'कसस हिंद' हीं दोन पुस्तकें माझ्या अवलोकनांत आलीं व माझें अंतःकरण हिंदुधर्म व हिंदुइतिहास यांकडे झुकूं लागलें. 'कसस हिंद' वाचून मी कैक वेळ रडलेला आहें. मला असें वाटूं लागलें कीं माझ्या अंतःकरणांत व कर्णरंध्रांत रजपुतांच्या बहादुरीचीं गीतें गाइलीं जात आहेत व तीं मला आपल्याकडे ओढीत आहेत. माझी ही स्थिति दिवसें दिवस वाढूं लागली व शेवटीं ही भावना इतकी प्रबल झाली कीं एक दिवस आपलें मन आवरावें म्हटलें तरी तें आंवरणें अशक्य झालें.

## १५. मुसलमानाचा हिंदु बनलों.

सोळाव्या वर्षीं एंट्रंसची परीक्षा पास होऊन पुढील अभ्यासाकरितां मी लाहोर शहरीं आलों. येथें आल्यावर मीं ब्राह्मसमाजांत जाऊं लागलों व त्यामुळें माझे विचार हळूहळू हिंदुधर्माकडे झुकूं लागले आणि हिंदुलोकांची प्रशंसा ऐकण्याची इच्छा होऊं लागली. ब्राह्मसमाजाच्या साहित्यांत हिंदुधर्माच्या गौरवपर असें विशेषसें नसलें तरी तेथें हिंदुवातावरण पसरलेलें होतें. ब्राह्मसमाजीयांत इंग्रज लोकांविषयीं व आंग्लसभ्यतेविषयीं जरी विशेष आदर होता तरी एकंदरींत मुसलमानांपेक्षां हिंदुधर्माबद्दल त्यांना जास्त प्रेम वाटत असे. दुसरें आमचा ब्राह्मसमाज संस्कृत व हिंदी भाषेचा पाठिराखा होता व हिंदी–उर्दूच्या लढयांत आमच्या समाजानें हिंदीला पाठिंबा दिलेला होता. या हिंदी–उर्दूच्या लढयानेंच हिंदुजातीयत्वाचा पहिला पाठ मला शिकविला व त्या पाठानें माझ्यांत जें स्थित्यंतर घडून आलें, त्यांत आजतागायत बिलकुल फरक झालेला नाहीं. वास्तविक पहातां लहानपणांतील संस्कारांनीं व वडिलांच्या शिकवणुकीनें मी उर्दूपक्षांत असावयाचा; दुसरें स्वतःच्या हिताच्या दृष्टीनेंसुद्धां मी उर्दूचीच तळी उचलावयास हवी होती; कारण हिंदी भाषेचीं नुसतीं मुळाक्षरेंसुद्धां मला येत नव्हतीं.

याखेरीज फार्शी शिकण्यांत माझीं कैक वर्षें गेलेलीं होतीं व उर्दूसाहित्याशीं माझा चांगलाच परिचय झालेला होता. या दृष्टीनें पहातां हिंदी पक्षाचा जय होण्यांत माझें स्वतःचें अति नुकसान होतें. परंतु राष्ट्राच्या एकीकरणाकरितां सर्व राष्ट्रांत नागरी लिपीचा व हिंदी भाषेचा प्रचार होणें अवश्य आहे असें जेव्हां मला समजून आलें, तेव्हां स्वतःच्या हानिलाभाचे विचार गुंडाळून ठेवून मी हिंदीचा पक्षपाती बनलों व तिच्या प्रचाराला सुरवात केली. या लढयाच्या दरम्यान ज्या वेळीं मी अंबाला शहरीं जाऊन तेथें हिंदीला पोषक व उर्दू विरुद्ध असें व्याख्यान दिलें त्यावेळीं हिंदी मुळाक्षरांची नुसती ओळखहि झालेली नव्हती. माझ्या या व्याख्यानाला प. वा. राय हुक्मचंद हजर होते. रायसाहेब दिल्लीचे रहिवासी होते. इंग्रजी भाषा त्यांना चांगल्या प्रकारें अवगत असून उर्दूचे ते प्रेमी होते. उर्दू भाषा त्यांच्या घरीं दासीप्रमाणें रावत असे. माझ्या या व्याख्यानाची रायसाहेबांनीं एका वर्तमानपत्रांत स्तुति केली, पण माझ्या हिंदीच्या अज्ञानाबद्दल मात्र कींव व्यक्त केली. असो. पुढें दिल्लीहून परत आल्यानंतर मीं हिंदीचीं मुळाक्षरें शिकण्यास प्रारंभ केला व हिंदीवरच स्वतांचें लक्ष पूर्णपणें लागावें म्हणून फार्शी-अरबीचें वाचन अजिबात बंद केलें.

कॉलेजांत सुद्धां माझें फार्शी व अरबी या दोन भाषांचेंच शिक्षण चालू होतें. मौलवी मुहंमद हुसेन आजाद हे आमचे प्रोफेसर होते. एक दिवस त्यांनीं हिंदी पक्षाची रेवडी उडवून दिली व बंगाली लोकांची थट्टा करण्यास सुरवात केली. थट्टा करण्याच्या भरांत "बंगाली लोकांचा देश निराळा असल्यामुळें पंजाब-प्रांताच्या प्रांतीय प्रश्नांत ढवळाढवळ करण्याचा त्यांना अधिकार नाहीं व पंजाब-प्रांताशीं त्यांचा कांहीं संबंध नाहीं" इ. इ. मुक्ताफळें त्यांच्या तोंडून बाहेर पडलीं. मौलवीसाहेब शिया पंथी होते व ते सदोदित इराणाची प्रशंसा करीत असत. "इराण माझी मातृभूमि आहे, इराणांत जाऊन रहावें अशी आपली अति मनीषा आहे" वगैरे वगैरे ते नेहमीं बोलून दाखवीत असत. अशा विचारांच्या या मौलवीसाहेबांना बंगाली लोकांवर गुस्सा करतांना पाहून माझ्या तोंडून चटकन् "मौलवीसाहेब, बंगाली लोक पंजाबप्रांताचे रहिवासी नसले तरी हिंदी तरी आहेत. परंतु आपण तर मुसलमान असून शिवाय स्वतःला इराणी म्हणवतां. तेव्हां पंजाबचे रहिवासी नसल्यामुळें बंगाली लोकांना जर पंजाबी प्रश्नांत हात

घालण्याचा अधिकार नाहीं तर आपणाला तरी तो कसा मिळूं शकतो?" माझ्या या प्रश्नानें मौलवीसाहेब गरम झाले, पण दिल्लीवासियांखेरीज वर्गातील सर्व विद्यार्थी माझ्या बाजूचे असलेले पाहून विशेष कांहीं न बोलतां त्यांना आपला गुस्सा थंडा करावा लागला. मी वारंवार आजारी पडत असल्यामुळें व कायद्याचा अभ्यास करण्याचा माझा बेत असल्यामुळें मौलवीसाहेबांची व त्यांच्या तासाची मी फारशी पर्वा बाळगीत नसें व त्यांच्या सर्व तासांना हजरहि रहात नसें. असें असलें तरी मौलवीसाहेबांची माझ्यावर इतराजी झाली व त्यांनीं माझ्याविरुद्ध गिल्ला करण्यास सुरवात केली. अंबाला शहरीं व्याख्यान देऊन परत आल्यावर मौलवी-साहेबांच्या सांगण्यावरून प्रिंसिपॉलसाहेबांनीं मला भेटीस बोलाविलें व खूब तंबी दिली. परंतु मौलवीसाहेबांच्या या सर्व कारवाईचा परिणाम त्यांच्या अपेक्षे-विरुद्ध झाला. म्हणजे अरबी व फार्शी या दोन भाषांना मी कायमचाच छाट दिला.

याप्रमाणें अरबी व फार्शी भाषांच्या शिक्षणाची इतिश्री झाल्यावर पंडित गुरुदत्त मला संस्कृत प्रोफेसरांपाशीं ( पं. भगवानदास ) घेऊन गेले व त्यांना म्हणाले, " पंडितजी ! आपल्याकरितां आज एक नवा शिष्य आणला आहे." त्या वेळीं संस्कृत शिकणारे विशेष नसत. परंतु या वर्षी मात्र नेहमींपेक्षां संस्कृत शिकणारांची संख्या वाढलेली होती. असो. पंडितजींनीं माझ्या संस्कृत-ज्ञानाची चांचपणी करण्यास सुरवात केली, पण माझ्याकडून कसल्याच प्रश्नाचें उत्तर येत नाहींसें पाहून ते थोडेसे गोंधळांत पडले. पंडितजींना गोंधळांत पडलेले पाहून गुरुदत्त हंसत हंसत म्हणाले, " पंडितजी ! आपला हा नवा शिष्य बिलकुल कोरा आहे. थोड्या क्षणापूर्वींपर्यंत हा मुसलमान होता व या क्षणापासून हिंदु बनूं पहात आहे." गुरुदत्तजींचे ते शब्द ऐकून पंडितजी हंसूं लागले.

लाला हंसराजांनींसुद्धां कॉलेजांत आल्यानंतरच संस्कृताध्ययनास प्रारंभ केला होता. पं. गुरुदत्तजींनीं "एका वर्षांत एफ. ए. पास होण्याइतकी माझी संस्कृतची तयारी होऊं शकेल" असा मला धीर दिला होता. अस्तु. माझ्याकडून संस्कृत भाषा शिकणें कांहीं झालें नाहीं, पण माझ्या आयुष्यांतील या भाषेच्या अध्यय-नाच्या या पहिल्या पाठानें मला पक्का हिंदु बनविलें व अशा प्रकारें हिंदु बनल्या-बद्दल आजतागायत खेद करण्याची पाळी आलेली नाहीं.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. 8363

## १६. राजकीय क्षेत्रांतील प्रवेश.

याच सुमारास बाबू सुरेंद्रनाथ बानर्जींच्या व्याख्यानांचें पुस्तक माझ्या हातीं आलें. यांपैकीं एक जोसेफ मॅझिनीवर होतें. जोसेफ मॅझिनीवरील व्याख्यान वाचीत असतां कैक वेळ माझे डोळे अश्रूंनीं भरून आले. मॅझिनीवरील व्याख्यानानें मी मुग्ध झालों व मॅझिनीप्रमाणें आपणहि राष्ट्रसेवेस वाहून घ्यावें असें मला वाटूं लागलें. मॅझिनीला मी आपला गुरु केला व आजतागायत राजकीय बाबतींत तोच माझा मार्गदर्शक आहे. ही गोष्ट १८८१ किंवा ८२ सालांतील आहे. हा वेळपर्यंत मी आर्यसमाजी झालों नव्हतों व आर्यसमाजाविषयीं मला फारसें प्रेमहि वाटत नव्हतें. माझ्या आठवणीप्रमाणें यानंतर अभ्यासाकडे माझें मन लागेनासें झालें, वाचन अप्रिय झालें व कांहीं और बनावें असें वाटूं लागलें. परंतु घरची गरिबी, आईबापांची खर्चाच्या बाबतींतील ओढाताण व सवलतींचा अभाव या सर्व अडचणी उभ्या राहिल्या कीं मी निराश होई. कैक वेळ असें झालेलें आहे कीं वाचण्यासाठीं म्हणून Indian Criminal Procedure Code (भारतीय दंडविधान) घेऊन बसावें व तें वाचण्याऐवजीं ऐतिहासिक विभूतींना उद्दे-

शून कांहींतरी पुटपुटूं लागावें. यावेळीं मी दररोजची हकीकत आपल्या दैनंदिनींत टिपून ठेवीन असें. तसेंच या हकीकतींत स्वतःचे विचारहि नमूद करून ठेवीत असें. पण दुर्दैवानें त्या सर्व दैनंदिनी आजला नष्ट झाल्या आहेत. असो. याप्रमाणें माझ्या विचारांत भारी परिवर्तन होऊं पहात होतें. आर्यसमाजांत मी प्रवेश केला त्या वेळीं माझे विचार बरेच प्रगल्भ झालेले होते. मी आर्यसमाजाचा सभासद झाल्याचें अग्निहोत्री यांना कळलें तेव्हां ते आश्चर्यचकित झाले. माझ्या परिवर्तनाविषयीं एका व्याख्यानांत बोलतांना त्यांनीं मला 'विशेष विचार न करतां एका फुलावरून दुसऱ्या फुलावर उड्या मारीत रहाणाऱ्या फुलपांखराची' उपमा दिली. ही सर्व हकीकत १८८२ सालांतील आहे.

१८८३ सालीं जगरांव येथें मुखत्यारीचें काम पहात असतांना माझ्या राजकीय विचारांत भर पडण्यासारखी संधी आली नाहीं; तरीहि या दिवसांत मौलवी मुहर्रम अली चिश्ती यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होणाऱ्या 'रफाके हिंद' या पत्रांत मधून मधून लिहीत असें. मौलवीसाहेब माझ्या वयाचे होते व माझ्या लेखांना आपल्या पत्रांत मोठ्या आनंदानें जागा देत असत. लाहोरांत शिकत असतां एका इंग्रजावरील खटला ऐकण्यास मी गेलों होतों. सदरहु साहेबानें एका हिंदी इसमाला ठार मारलें होतें. परंतु ज्यूरीनें त्याला निर्दोष ठरविलें. या निकालानें हिंदी लोकांत बराच असंतोष फैलावला व त्यांनीं चळवळ करण्यास सुरवात केली. मीसुद्धां या चळवळींत सामील झालों होतों. एकंदर परिस्थिति अशी असली तरी या वेळचे माझे राजकीय विचार फारसे उच्च नव्हते. आर्यसमाजांतील माझ्या व्याख्यानांत मी सरकारची स्तुति करीत असें. मुसलमानांच्या अत्याचारांपासून इंग्रजांनींच आमची सुटका केली असें मला वाटत असे. सर्वसाधारण जनतेचें मतहि अशाच प्रकारचें होतें. १८८३ ते १८८५ या दरम्यान माझ्या राजकीय विचारांत म्हणण्यासारखा कांहीं फरक झाला नाहीं, व फरक होण्यासारखी संधीहि आली नाहीं. इतर चारचौघांप्रमाणें मीहि इंग्रजी उर्दु वर्तमानपत्रें वाचीत असें, केव्हां केव्हां इंग्रजी पत्रांत लेखहि लिहीत असें व राजकीय बाबतींत वादविवादहि करीत असें; परंतु राजकारणाचें अध्ययन असें केलें नाहीं किंवा चळवळींतहि भाग घेतला नाहीं. या वेळीं माझें सारें लक्ष वकिलीच्या अभ्यासाकडे लागलेलें होतें. याचें कारण वडिलांच्या तुटपुंज्या वेत-

नामुळें त्यांना सहन कराव्या लागणाऱ्या कष्टांचें मूर्तिमंत चित्र माझ्यासमोर उभें होतें. आतां असें असलें तरी राष्ट्राविषयींचे विचार चालूच होते.

शेवटीं १८८५ सालीं मी वकिलीची परीक्षा पास झालों व पुढल्याच वर्षी वकिली करूं लागलों. वकिली सुरू होऊन हातांत पैसा खेळूं लागतांच मी स्वतःचें वाचनालय बनविण्यास आरंभ केला. सहजासहजीं एकदां डेप्युटी कमिशनरांची स्वारी माझ्या घरीं आली. घरांत प्रवेश करतांच त्यांची नजर माझ्या पुस्तकालया-कडे गेली. माझा तो भला मोठा पुस्तकांचा संग्रह पाहून स्वारी चकित झाली व बरोबर असलेल्या हाताखालच्या अधिकाऱ्यास म्हणाली, "या इसमाचें पुस्त-कालय आमच्यापेक्षांहि मोठें आहे."

हिसार येथें असतांना बहुतेक प्रकारचें वाङ्मय माझ्या नजरेखालून गेलें. एकदां सहजासहजीं एका रायसाहेबांच्या घरीं मला चारदोन दिवसांसाठीं जावें लागलें. रायसाहेब पंजाबप्रांतांतील निवडक व्यक्तींपैकीं होते. विद्यार्थि-दशेपासूनच त्यांची ख्याति झालेली होती. हिंदी राष्ट्राविषयीं वाटत असलेल्या कळकळीबद्दल त्यांची प्रसिद्धी होती, परंतु सरकारी नोकरीमुळें त्यांच्या हातून कांहीं होऊं शकलें नाहीं. त्यांचें नाव राय मूळराज हें होय. रायसाहेबांपाशीं युरो-पांतील गुप्त समित्यांचा इतिहास होता. हें पुस्तक त्यांनीं कोणत्या तरी वाचना-लयांतून आणलेलें होतें. एक दिवस या पुस्तकांतील कांहीं मजकूर त्यांनीं मला वाचून दाखविला. तो ऐकून तें पुस्तक वाचण्याची मला अति इच्छा झाली व त्याच घडीला मी त्या पुस्तकाचीं कांहीं पानें वाचून टाकलीं. माझ्या मनांत तें पुस्तक घरीं नेऊन स्वस्थपणें वाचावयाचें होतें, पण रायसाहेबांनीं तें देण्याचें नाकारलें.

घरीं आल्यावर आजूबाजूच्या अनेक पुस्तकविक्रेत्यांकडे या पुस्तकाबद्दल व मॅझिनीच्या चरित्राबद्दल मी चौकशी केली, परंतु कोणाकडेहि तीं मिळूं शकलीं नाहींत. सुदैवानें याच वेळीं एक पंजाबी तरुण विलायतेंत होता, त्याला मी हीं दोन्ही पुस्तकें पाठवून देण्यास लिहिलें व त्यानें तीं लंडनहून पाठवून दिलीं. ज्या दिवशीं हीं पुस्तकें माझ्या हातांत आलीं, त्या दिवशीं मला हायसें वाटलें. पहिल्यानें मी मॅझिनीचें चरित्र आद्योपांत वाचलें. बाबू सुरेंद्रनाथांचें मॅझिनीवरील व्याख्यान वाचून माझ्या मनावर जो परिणाम झाला होता, त्याहून किती तरी अधिक या पुस्तकाच्या वाचनानें झाला. मॅझिनीची निस्सीम देशभक्ति, देशाकरितां त्याची

चाललेली धडपड, त्याची नैतिक उच्चता व मनुष्यमात्राकरितां त्याला वाटत असलेली कळकळ हीं वाचून त्यानें मला वेड लावलें. पुढें मॅझिनीच्या Duties of Man या पुस्तकाचा मी उर्दूभाषेंत अनुवाद करण्यास सुरवात केली. अनुवाद पुरा होतांच माझे मित्र लाला नत्थूराम आनंद–हे लाहोर शहरांत रहात असत व वर्तमानपत्रांतून लिहीत असत–यांच्याकडे तो पाठवून दिला. त्यांनीं त्यांत थोडेफार फेरफार करून तो प्रसिद्ध केला.

हिसार येथें असतांनाच पहिल्या प्रथम अशी कॉंग्रेसविषयींची हकीकत माझ्या वाचनांत आली. पुढें बद्रुद्दीन तैयबजींच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या मद्रास येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनाची हकीकत वाचून माझ्या मनावर बराच परिणाम झाला व कॉंग्रेसविषयींचें साहित्य मागवून मी तें वाचलें. याच सुमारास मि. ह्यूम यांनीं लिहिलेलीं 'Star in the East' व 'An Old Man's Hope' हीं दोन पुस्तकें प्रसिद्ध झालीं. आजतागायत या दोन पुस्तकांच्या जोडीला बसूं शकेल असें कॉंग्रेसविषयीं लिहिलें गेलेलें असें एकहि पुस्तक माझ्या वाचनांत आलेलें नाहीं. दोन्ही पुस्तकांत स्वातंत्र्याभिलाषा ओतप्रोत भरलेली होती. या पुस्तकांनींसुद्धां माझ्यावर बराच परिणाम झाला. फलस्वरूप १८८८ सालीं अलीमहमद भीमजी पंजाबच्या दौऱ्यावर आले असतांना मी त्यांना हिसार शहरीं बोलाविलें व त्यांचीं वरींच व्याख्यानें केलीं.

हिसार येथें येऊन अजून पुरीं तीन वर्षेंहि झालीं नव्हतीं. माझी वकिलीसुद्धां बेताबातानेंच चाललेली होती. मी हांजीपणा करीत नसल्यामुळें व कोर्टांतसुद्धां Your Honour सारखे शब्दप्रयोग योजीत नसल्यामुळें आणि बारीकसारीक अनुचित बाबींकरितां वरिष्ठांबरोबर झगडत असल्यामुळें सुरवातीपासूनच इंग्रज अधिकारी माझ्यावर नाराज झालेले होते. माझ्या या स्वभावामुळें बऱ्याचशा तरुण इंग्रज न्यायाधीशांशीं माझे खटके उडालेले होते. परंतु आतां तर राजकारणांत उघडपणें अधिकाधिक भाग घ्यावयास लागल्यामुळें माझ्यावरील त्यांच्या अप्रसन्नतेची मात्रा दिवसेंदिवस वाढूं लागली.

त्यांच्या या अप्रसन्नतेकडे दुर्लक्ष करून सर सैय्यद अहमद खॉंना मी 'खुलीं पत्रें' (Open letters) लिहिण्यास आरंभ केला. सैय्यदसाहेबांचें सर्व लिखाण उर्दू भाषेंत होतें. सैय्यदसाहेब या दिवसांत कॉंग्रेसविरुद्ध चळवळ करण्यांत गढून

गेले होते व आपल्या हेतूच्या सिद्धीकरितां लखनऊ, मेरठ वगैरे शहरीं त्यांनीं व्याख्यानें देण्यास सुरवात केलेली होती. त्यांना उद्देशून लिहिलेल्या खुल्या पत्रांत यापूर्वी त्यांनीं लिहिलेल्या पुस्तकांतील उतारे देऊन पूर्वीच्या सैय्यदसाहेबांत व सध्याच्या सैय्यदसाहेबांत किती फरक पडला आहे हें स्पष्टपणें दाखविलें होतें. या पत्रांखालीं माझें नांव नव्हतें; परंतु पत्रांवर 'हिसार' हीं अक्षरें छापलीं गेलीं असल्यामुळें व हिसारांत माझ्याशिवाय दुसरा कोणी अशीं पत्रें लिहूं शकेल असें लोकांना वाटत नसल्यामुळें हीं पत्रें लिहिणारा माझ्याखेरीज दुसरा कोणी नाहीं असेंच लोक समजून चुकले. वास्तविक पत्रांखालीं नांव घालण्यास हरकत नव्हती; परंतु माझ्यासारख्या यःकश्चित् इसमानें सैय्यदसाहेबांसारख्या बड्या व्यक्तीला उद्देशून अशा प्रकारें खुलीं पत्रें लिहिणें हें माझें मलाच कसेंसेंच वाटूं लागलें. हीं खुलीं पत्रें त्या वर्षाच्या कॉंग्रेसच्या अधिवेशनापूर्वी प्रसिद्ध झालीं असल्यामुळें साऱ्या हिंदुस्थानांत त्यांच्याविषयीं चर्चा झाली. असो. हीं पत्रें हेंच राजकीय विषयावरील माझें पहिलें लिखाण होय. यापूर्वी मी वर्तमानपत्रांतून लिहिलें असलें तरी त्यांत स्थानीय किंवा प्रांतीय बाबींपलीकडे माझी मजल गेलेली नव्हती. दुसरें पूर्वीच्या लेखांमुळें या पत्रांप्रमाणें माझी प्रसिद्धीहि झाली नाहीं. या वेळीं माझ्या वयाला पुरीं पंचवीस वर्षेंहि झालेलीं नव्हतीं.

पुढें डिसेंबरांत अलाहाबाद येथें भरणाऱ्या कॉंग्रेसच्या अधिवेशनाला हजर राहण्याकरितां म्हणून मी माझ्या मित्रमंडळीबरोबर अलाहाबादेस गेलों. स्टेशनावर मि. ह्यूम, पं. अयोध्यानाथ व पं. मदनमोहन मालवीय वगैरे कार्यकारिणी समितीचे बहुतेक सर्व सभासद हजर होते. या वेळीं पं. मालवीयजी तरुण असले तरी लोकांत त्यांना मान होता. हे लोक माझें स्वागत करण्याकरितां आलेले नव्हते; परंतु गाडींतून मी खालीं उतरतांच यांनीं व स्वयंसेवकांनीं माझ्या नांवाचा जयघोष केला. कॉंग्रेसच्या अधिवेशनांतसुद्धां मला सन्मानानें वागविलें गेलें व दोनदां मी कांहीं बोलावें म्हणून सभामंचकावर उभें केलें गेलें. पंजाबप्रांतांतून गेलेल्या प्रतिनिधींनीं—यांत सुप्रसिद्ध वकील राय मुरलीधर व हंसराज साहनी हेहि होते—पुढील सालाकरितां पंजाबप्रांतातर्फे कॉंग्रेसला निमंत्रण देण्याचें ठरविलें व हें काम माझ्यावर सोंपविलें. ठरल्याप्रमाणें मी आमंत्रण दिलें, पण तें अस्वीकृत होऊन पुढील सालचें अधिवेशन मुंबईत भरविलें जाण्याचें ठरलें.

अलाहाबादच्या कॉंग्रेसला हजर रहाणें हेंच राजकीय क्षेत्रांतील माझें पहिलें पदार्पण होय. या अधिवेशनानंतर मि. ह्यूम यांनीं माझ्याशीं बराच पत्रव्यवहार केला व माझ्या सम्मतीनें माझ्या खुल्या पत्रांची इंग्रजी भाषा सुधारून स्वखर्चानें द्वितीयावृत्ति प्रसिद्ध केली. कांहीं दिवस या छोट्याशा पुस्तकाला बरीच मागणी होती. असो. डिसेंबर ( १८८९ ) पर्यंत कॉंग्रेसविषयीं माझ्या मनांत बराच उत्साह होता; पण पुढें तो हळू हळू नाहींसा होऊं लागला. १८८९ सालच्या मुंबई येथील अधिवेशनाचे मि. ब्रॅडलॉ हे अध्यक्ष होते. या वेळीं ब्रॅडलॉसाहेबांना भेटण्याची मला संधी मिळाली. सर वुइलियम वेडरबर्न यांचें दर्शनहि याच वेळीं झालें. परंतु या खेपेस माझ्या मनावर निराळाच परिणाम झाला. मला वाटूं लागलें कीं कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांना राष्ट्रकल्याणापेक्षां स्वतःच्या मोठेपणाचीच विशेष चाड आहे. परंतु माझी ही केवळ शंका असल्यामुळें मी ती उघडपणें व्यक्त करूं शकलों नाहीं. १८९३ सालापर्यंत कॉंग्रेसच्या अधिवेशनांस मी हजर राहिलों नाहीं.

कॉंग्रेसवरून माझें मन उडून जाण्याला वर दिलेल्या कारणाखेरीज आणखीहि एक कारण होतें. हें कारण म्हणजे माझ्या आर्यसमाजी मित्रांचीं मतें होत. १८८९ सालानंतर माझ्या एका सुप्रसिद्ध मित्राचा सहवास मला घडला. हा मित्र कॉंग्रेस-विरोधी होता. हा कॉंग्रेसविरोधी असण्याचीं कारणें याप्रमाणें होतीं.

कांहीं इंग्रजांनीं आपण होऊन कॉंग्रेसची स्थापना केली असल्यामुळें व इंग्रज लोक स्वराष्ट्रहिततपर असल्यामुळें त्यांनीं स्थापिलेल्या कॉंग्रेसमार्फत राजकीय स्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं असें या माझ्या मित्राचें म्हणणें होतें. दुसरें हिंदु-स्थानच्या राज्यकारभारापासून इंग्रजांचे व त्यांच्या देशाचे अनेक प्रकारें फायदे होत असल्यामुळें आपण होऊन या देशाला ते स्वातंत्र्य प्रदान करतील हें असं-भवनीय आहे. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें या देशांतील शिक्षित लोकांनीं त्यांच्याविरुद्ध भलतीच चळवळ करण्याच्या भानगडींत पडूं नये यासाठीं मूठभर इंग्रजांनीं कॉंग्रेसची स्थापना करून वर्षांतून एक वेळ तिचें अधिवेशन भरविलें जावें व त्या वेळीं शिक्षित हिंदी लोकांचीं व्याख्यानें व्हावीं, पुढें वर्तमान-पत्रांत त्यांचीं तीं भाषणें प्रसिद्ध व्हावीं व वर्तमानपत्रांनीं त्यांची स्तुति करावी आणि ही स्तुति वाचून या शिक्षित लोकांनीं स्वतःस कृतकृत्य मानून त्यांतच गुंग व्हावें याकरितां या मूठभर साहेबबहादुरांची ही सारी क्लृप्ति आहे. माझे हे मित्र त्या

दिवसांत प्रत्येक इंग्रजाला हिंदुस्थानाचा शत्रु लेखीत असत. आणि यामुळें कॉंग्रेस हें मूठभर इंग्रजांनीं हिंदी लोकांच्या भुलावणीसाठीं दिलेलें एक खेळणें आहे असें त्यांचें ठाम मत झालेलें होतें. हे महाशय कॉंग्रेसला नुसती टाकाऊच नव्हे तर हिंदी हितविरोधी समजत असत. त्यांच्या मतें शिक्षणप्रसारानें, स्वदेशी प्रचारानें व गुप्त रीत्या हत्यारें वापरण्याच्या शिक्षणानें हिंदी लोकांनीं शक्तिशाली बनावें व इंग्रजांना घालवून देण्यास पुरेसें सामर्थ्य व लोक मिळेपर्यंत वाट पहावी. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माझे हे मित्र कॉंग्रेसच्या ऐवजीं गुप्त समित्यांचे पुरस्कर्ते होते.

या महाशयांचा हिंदु-मुस्लिम ऐक्यावर विश्वास नव्हता. यांच्या दृष्टीनें हिंदु-मुस्लिम ऐक्याकरितां केली जाणारी खटपट हिंदूनाच बाधक होणारी आहे. कारण हिंदु लोकांत आपापसांत एकी नाहीं, धर्माविषयीं आस्था नाहीं व प्रेमहि नाहीं. उलट मुसलमानांत या सर्व गोष्टी विद्यमान आहेत. यामुळें हिंदु-मुस्लिम ऐक्यांत मुसलमानच गाजी होतील. दुसरें तुर्कस्थान व अफगाणिस्थान हे दोन मुसलमान देश स्वतंत्र असल्यामुळें हिंदु लोकांची स्थिति आहे अशीच राहिल्यास या दोन देशांच्या जोरावर हिंदी मुसलमान येथील राजकारणांत शेर होऊन राहतील. असें होऊं नये म्हणून हिंदूंना सामर्थ्यवान् बनवावें, त्यांच्यांत हिंदुत्वाचा अभिमान जागृत करावा व त्यांच्यांत एकी कशी घडवून आणतां येईल इकडे हिंदूंनीं पहिल्यानें लक्ष पुरवावें असें त्यांचें म्हणणें होतें. त्यांच्या दृष्टीनें कॉंग्रेसच्या चळवळीमुळें हिंदु लोक स्वतःच्या सुधारणेपासून दुरावले जात असून भलत्याच कामांत ढकलले जात आहेत व यामुळें हिंदूंची कधींहि भरून न येण्यासारखी हानि होणार आहे. दुसरें कॉंग्रेसनें चालू केलेल्या राजकीय चळवळींतील हिंदूंच्या सहकार्यामुळें त्यांच्यावर इंग्रजांची वक्रदृष्टि होईल व त्यामुळें ते हिंदूंच्या मार्गांत नसतीं विघ्नें उत्पन्न करतील व इतर अनेक प्रकारांनींहि त्यांना खाड्यांत लोटतील.

साधारणपणें लाहोर येथील बहुतेक आर्यसमाजी पुढाऱ्यांचीं अशींच मतें होतीं. यांपैकीं कांहींचें म्हणणें आर्यसमाजीयांनीं आपला सर्व वेळ समाजाला द्यावा व समाजाव्यतिरिक्त दुसऱ्या कसल्याहि सार्वजनिक कार्यांत पडूं नये असें होतें. दुसऱ्या कांहींच्या दृष्टीनें आर्यसमाजी राजकारणांत भाग घेऊं लागल्यास समाजावर सरकारची वक्रदृष्टि होईल व तें समाजाच्या कार्यांत नसतीं विघ्नें उत्पन्न करूं लागेल.

स्वर्गीय लाला सांईदास व लालचंद हे दोघेहि याच मताचे होते. साईंदास, मूलराज व लालचंद या तिघांनाहि हिंदूंनीं पहिल्यानें स्वतःच्या पायांवर उभें रहाण्यास शिकणें हें त्यांचें आद्य कर्तव्य होय असें वाटत असे. त्यांच्या मतें हिंदु लोकांचें सदोदित दुसऱ्याच्या तोंडाकडे पहात राहाणें सुटणें अवश्य होतें.

स्वर्गीय लाला सांईदास १८८१ सालांतहि स्वदेशी कपडा वापरीत असत व स्वदेशीचा प्रचारहि करीत असत. लाला मूलराजसुद्धां स्वदेशीचे पुरस्कर्ते असून साधारणतः देशी कपडा वापरणारे होते.

आर्यसमाजाच्या प्राथमिक कालांत आर्यसमाजाविषयीं सरकारचें मत चांगलें नव्हतें. सर लेपेल ग्रिफिन, सर रॉबर्ट इगर्टन वगैरे आर्यसमाजाला चांगल्या दृष्टीनें पहात नसत. आर्यसमाजाची चळवळ ही हिंसाप्रधान असून सरकारला धोका देणारी आहे असें त्यांचें मत असल्यामुळें आर्यसमाजाच्या उन्नतीकडे ते भीतियुक्त नजरेनें पहात असत. यापुढें एक वेळ असा आला कीं आर्यसमाजानें गोरक्षणाच्या चळवळीस सुरवात केली व हिंदु लोकांस गोरक्षणाचें महत्व समजावून देण्यास आरंभ केला. या वेळीं अधिकारी लोकांनीं लाहोर आर्यसमाजाच्या पुढाऱ्यांस फंदांत पाडण्याचा प्रयत्न केला. लाला मूलराज व सांईदास यांना कैक वेळ भेटीस बोलाविलें गेलें व एक वेळ त्यांच्याकडून जामीन घेण्याचाहि यत्न केला गेला.

परकी सत्तेला दृढ करण्यांत हिंदी लोकच आपली शक्ति खर्च करीत असलेले पाहून लाला सांईदास व मूलराज त्यांना फार वाईट वाटे व यामुळें पहिल्या दर्जाच्या विद्यार्थ्यांना सरकारी नोकरींत पडण्यापासून परावृत्त करण्याचा ते नेहमीं प्रयत्न करीत. या बाबतींत लाला लालचंद यांचे विचार निराळे होते. काशीच्या पंडितांनीं लॉर्ड रिपनची गाडी ओढलेली ऐकून लाला सांईदासजींना फार दुःख झालें. पंडितांच्या या कृत्यानें हिंदुधर्मावर काळिमा लागला गेला असें त्यांना वाटलें. त्यांच्या मतें हिंदूंनीं आपल्या धर्मांत, सामाजिक चालीरीतींत किंवा शैक्षणिक कार्यांत इंग्रजांशीं किंवा सरकारशीं कसलाच संबंध ठेवूं नये, त्यांच्यापासून आर्थिक मदत घेऊं नये, त्यांचें मत पुसूं नये किंवा कसली अन्य मदत घेण्याची इच्छाहि करूं नये. तात्पर्य जें काय करावयाचें तें स्वतः करावें व आपल्या धर्मबांधवांत स्वतःवर अवलंबून रहाण्याची वृत्ति उत्पन्न करावी. सांईदासजींचे हे विचार योग्य नाहींत असें कोण म्हणणार नाहीं ?

पंजाबांतील राजकीय चळवळीच्या सुरवातीस लाला सांईदास परलोकवासी झाले व लाला मूलराज व लाला लालचंद यांच्या विचारांत पुढें फरक झाला. यासंबंधानें पुढें योग्य स्थळीं येईलच.

सन १८९३ सालीं ज्या वेळीं बक्षी जयसीराम यांच्या ठरावानें पंजाबप्रांतानें कॉंग्रेसला पंजाबांत अधिवेशन भरविण्याविषयीं आमंत्रण दिलें, त्या वेळीं आर्य-समाजीयांत बराच मतभेद झाला व जयसीरामखेरीज दुसऱ्या कोणत्याहि आर्य-समाजी पुढाऱ्यानें कॉंग्रेसच्या तयारींत भाग घेतला नाहीं. याचें असेंहि एक कारण होतें कीं, आर्यसमाजी आपापसांतील भांडणांत गुंतलेले होते. महात्मापक्षाच्या कांहीं आततायी व्यक्तींनीं कॉलेजपक्षाचे लोक मनापासून सरकारच्या विरुद्ध आहेत व आर्यसमाजाला राजकारणांत ढकलूं इच्छित आहेत अशा अर्थाचीं पत्रेंसुद्धां सरकारकडे रवाना केलीं. कॉंग्रेसच्या स्वागतकारिणी समितीचा मी सभासद झालों, पण लोकांच्या अपेक्षेइतका त्यांत मी भाग घेतला नाहीं. या खेपेचें कॉंग्रेसचें अधि-वेशन यशस्वी होण्यांत बक्षी जयसीराम व जोगेंद्रचंद्र बोस यांचे श्रम कारणीभूत झाले. लाला हरकिसनलाल हेहि या वेळच्या कॉंग्रेससाठीं खटपट करणारांपैकीं होते. परंतु बक्षी महाशयांशीं लालाजींचें पटत नसल्यामुळें स्वागतकारिणी समितीच्या बैठकींत कैक वेळ लालाजींवर संतापण्याची पाळी आलेली होती. सरदार दयाळसिंहजींवर हरकिसनलालांचें वजन होतें. असो. या गोष्टी अप्रस्तुत आहेत.

या वर्षीच्या कॉंग्रेस अधिवेशनांत मी दोन तीन व्याख्यानें दिलीं. कॉंग्रे-सच्या कार्यांत राय मूलराज यांनींहि बरीच खटपट केली हेंहि येथें लक्षांत ठेवणें जरूर आहे. सरकारी नोकर असल्यामुळें ते सभासद झाले नसले तरी विषय-नियामक कमिटीच्या बैठकींस ते हजर रहात असत व लोकांना कॉंग्रेसचे स्थायी नियम बनविण्याविषयीं आग्रह करीत असत.

यापुढें पुन्हां एकदां १९०० सालापर्यंत कॉंग्रेसच्या अधिवेशनांत मी भाग घेतला नसला तरी माझी राजकारणाची रुची मात्र नाहींशी झाली नाहीं. १९०० सालांत पुन्हां एकदां कॉंग्रेसचें अधिवेशन पंजाबांत भरलें व या खेपेस आर्यसमाजी लोकांनीं तिच्या कार्यांत पहिल्याहून अधिक भाग घेतला. याचें कारण मध्यंतरींच्या कालांत स्वर्गीय जयसीरामजींच्या मताचा आर्यसमाजीयांवर बराच परिणाम

झालेला होता व बरेचसे आर्यसमाजी पुढारी त्यांचे मित्र बनले होते. या वेळीं स्वागतकारिणी समितींत बऱ्याच आर्यसमाजीयांचा प्रवेश झाल्यामुळें त्यांनीं असें ठरविलें कीं कामचलाऊ सभामंडप उभारण्यांत पैसा घालविण्याऐवजीं एक स्थायी सभामंडप ( Hall ) उभारावा व त्यांतच कॉंग्रेसचें अधिवेशन भरवावें. असें केल्यानें सार्वजनिक सभा भरविण्याकरितां या मंडपानें एक कायमचें स्थान तयार होईल. या मंडपाकरितां वर्गणी गोळा करण्यासाठीं स्व. लाला लालचंद व त्यांच्या मित्रांनीं बरीच मेहनत घेतली. या मंडपाला ब्रॅडलॉ हॉल असें नांव दिलें गेलें. आर्यसमाजी लोक मंडपाला हें नांव देण्याच्या विरुद्ध होते, परंतु बहुमत या नांवाच्या बाजूला पडल्यामुळें शेवटीं हेंच नांव कायम झालें.

कॉंग्रेस अधिवेशनापूर्वी थोडे दिवस आधीं बक्षी जयसीराम परलोकवासी झाले. बक्षी महाशयांच्या निधनानें आर्यसमाजी लोकांचें कॉंग्रेसवरील लक्ष पुन्हा एकदां कमी झालें. अधिवेशनानंतर बरींच वर्षे आर्यसमाजी पुढारी व लाला हरकिसनलाल यांच्यांत सभामंडप व कॉंग्रेस यांबाबत झालेल्या खर्चाविषयीं कुरबुर चालली होती व अखेरपर्यंत तिचा निकाल म्हणून कांहीं लागला नाहीं. स्वर्गीय बाबू कालीप्रसन्न राय हे पंजाब कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष होते. बाबू महाशय आर्यसमाजी लोकांच्या संकुचित वृत्तीमुळें व कट्टरतेमुळें त्यांच्यावर नाराज असले तरी या हिशेबाच्या बाबतींत आर्यसमाजीयांच्याच बाजूला होते. हिशेबाचा निर्णय लागण्यापूर्वीच बाबू महाशय कलकत्त्याला निघून गेले व ते गेल्यानंतर आर्यसमाजी लोकांनीं कॉंग्रेसच्या कार्यांत भाग घेण्याचें सोडून दिलें.

## १७. १८९८ ते १९०४.

१८९७ व ९८ तीं दोन वर्षे मला अति तापदायक गेलीं. आगष्ट १८९७ पासून मार्च १८९८ पर्यंत मी इतका आजारी होतों कीं माझ्या मित्रांनीं माझी आशाच सोडली. सतत आठ महिने मला ताप येत होता व माझें फुफ्फुस ( जिगर ) सडून गेलें होतें. ही सर्व हकीकत पूर्वी एकदां आलेली आहे. तापांतून मीं बरा होत आहें त्यापूर्वीच माझा धाकटा भाऊ दलपतराय, एम. ए. यास क्षयरोगानें पछाडलें होतें. ज्या वेळीं माझा ताप पूर्णपणें नाहींसा झाला, त्यावेळीं याच्या क्षयरोगाचें प्रमाण बरेंच पुढारलेलें होतें. शेवटीं जून महिन्याच्या अखेरीस तो आम्हाला सोडून गेला. त्याच्या मागें त्याची पत्नी व दोन मुलें होतीं. या बंधूच्या मृत्यूमुळें मला अति दुःख झालें. कारण ह्याच्यावर माझें फार प्रेम होतें व याच्यावर माझी बरीच भिस्त होती. माझा हा बंधु पक्का आर्यसमाजी असून संस्कृत भाषेचा भोक्ता होता. मला मोठी आशा होती कीं सार्वजनिक कामांत हा माझ्यापेक्षां वरचढ निघेल. परंतु दुर्दैवानें क्षयरोगानें माझ्या साऱ्या आशा धुळीस मिळविल्या. बंधूच्या निधनानंतर मी स्वामी दयानंद सरस्वतींचें चरित्र

लिहिण्यास सुरवात केली. यांत माझे दोन महिने गेले. हें चरित्र पुरें होतांच पुन्हां दुष्काळपीडित लोकांच्या कार्यास लागलों.

सन १८९९ व १९०० सालांतील दुष्काळ १८९७–९८ सालांतील दुष्काळापेक्षां फारच तीव्र होता. या वेळीं संयुक्तप्रांत व पंजाब या दोन्हीही प्रांतांत दुष्काळानें आपलें ठाणें दिलें होतें. दुष्काळाचें स्वरूप पूर्वीपेक्षां तीव्र असल्यामुळें अनाथरक्षणाचें कार्यहि विस्तृत प्रमाणावर करणें भाग होतें. या दुष्काळांत जवळ जवळ दोन हजार लोकांचें रक्षण आमच्या हातून झालें.

या वेळीं मी वकिली करीत असलों तरी तींत माझें मन लागत नव्हतें. कारण सार्वजनिक कामाला लागावें तर वकिली आड येई व वकिलीच्या कामांत सार्वजनिक कामें आडवीं येत. याकरितां कोणत्या तरी एका कार्याला वाहून घ्यावें असें मला वाटूं लागलें. वकिलीकडे माझा विशेष ओढा नव्हता. वकिली सोडून सार्वजनिक सेवेंत आपली सर्व शक्ति लावावी अशी माझी मनीषा होती. परंतु माझा हा विचार वडिलांना पसंत नव्हता. त्यांची इच्छा मी वकिली करून चांगले पैसे मिळवावे व आपल्या बंधूंकरितां व मुलांकरितां चांगली सोय करून ठेवावी अशी होती. त्यांनीं आपली ही इच्छा व्यक्त करितांच मी म्हटलें, "भावांच्या शिक्षणांतून मी मोकळा झालों असून ते कमावण्यास योग्य झाले आहेत. राहतां राहिलीं माझीं मुलें; त्यांनीं माझ्याजवळ जो पैसा आहे त्यांतच आपली सोय करून घ्यावी."

माझी आई माझ्या विचारा आड येऊं इच्छित नव्हती. उलट माझ्या आकांक्षांविषयीं तिची सहानुभूतीच होती. असो. शेवटीं सन १८९८ च्या वार्षिकोत्सवांत "यापुढें वकिलीचें काम कमी करण्याचें ठरविलें असून त्यामुळें वांचणारा वेळ आर्यसमाज, कॉलेज व देश यांच्या सेवेंत घालविण्याचा मी निश्चय केला आहे" असें जाहीर केलें. या माझ्या संकल्पानुसार शाळेच्या आवारांत प्रबंधक समितीच्या कार्यालयाजवळची एक खोली स्वतःकरितां म्हणून घेतली व तींत बसून कॉलेजाचें व समाजाचें काम करण्यास सुरवात केली. जवळ जवळ दोन महिनेपर्यंत कॉलेजांत मीं हिंदुस्थानच्या इतिहासावर व्याख्यानें दिलीं. या वेळीं शाळेकरितां क्रमिक पुस्तकें लिहिलीं, बाहेरील समाजांच्या उत्सवांत गेलों व दुष्काळपीडित लोकांकरितां फंड गोळा करण्याकरितां राजपुताना व संयुक्तप्रांत

यांमध्यें दौरा काढला. या दौऱ्यावर असतांना निरनिराळ्या ठिकाणच्या ख्रिस्ती अनाथालयांचें निरीक्षण केलें, फंड गोळा केला व दुष्काळी कमिशनपुढें साक्ष दिली.

१८९५ ते १९०० च्या दरम्यान मी मॅझिनी, गॅरिबाल्डी, शिवाजी, स्वामी दयानंद सरस्वती व भगवान् श्रीकृष्ण यांचीं चरित्रें लिहिलीं व लहान मुलांकरितां प्राचीन आर्यसभ्यतेची माहिती देणारें एक छोटेंसें पुस्तक लिहिलें. याखेरीज आर्यसमाज व इतर विषयांवरहि लहान लहान पुस्तकें लिहिलीं. या लहान मोठ्या पुस्तकांशिवाय मधून मधून इंग्रजी मासिकांतून लेख लिहिले व जवळ जवळ दोन वर्षें आर्य गॅझेट पत्राचा हंसराजांबरोबर सहसंपादक होतों. आर्य गॅझेट पत्राचा मी सहसंपादक असलों तरी लेखनाचा बराचसा भार माझ्यावरच पडे. या कालावधींतच भगवद्गीता, मनुस्मृति आणि उपनिषदें हीं वाचलीं आणि स्वतःला आर्यसमाजी जीवनाला योग्य बनविलें.

विसाव्या शतकाच्या आरंभाला वकिली सोडण्याच्या मार्गांत माझें आणखी एक पाऊल पुढें पडलें. या वेळीं मी निश्चय केला कीं वकिलींत जें काय मिळेल तें सर्व हिंदुजातीच्या सेवेला अर्पावयाचें. याविषयीं लाला हंसराजांना लिहिलेल्या पत्रांत आर्यसमाज किंवा कॉलेज यांचा उल्लेख न करितां वकिलींत होणारी मिळकत सर्वसाधारण कार्याला देणार असल्याचें लिहिलें होतें. पत्रांत कोणत्याहि संस्थेचा उल्लेख केलेला नसला तरीहि या उत्पन्नाचा बराचसा हिस्सा आर्यसमाज व कॉलेज यांनाच मिळेल, असा लोकांचा अंदाज होता व माझीहि तीच इच्छा होती. वकिलींत मिळणाऱ्या पैशाचा लोभ सुटावा म्हणून हा सर्व खटाटोप होता. वकिलींत मिळणाऱ्या पैशानें वैयक्तिक फायदा होण्याचें बंद झालें कीं आपोआपच वकिलीकडे दुर्लक्ष होऊं लागेल असा माझा कयास होता. सन १९०४ पयत वकिलींत जी कांहीं प्राप्ती होई ती सर्व मी समाज व कॉलेज यांच्याकरितां खर्च करीं व या उप्पर जें कांहीं उरे तें वार्षिकोत्सवांत देऊन टाकीं.

या पांच वर्षांच्या अवधींतच मी लिहिलेल्या मॅझिनीच्या चरित्राविषयीं सरकारांत चर्चा चाललेली असून तें पुस्तक लिहिल्याबद्दल माझ्यावर खटला करावा कीं काय याविषयीं विचार चालू असल्याचें कैक वेळ माझ्या कानांवर आलें. ही

सर्व अंतस्थ हालचाल होती. याखेरीज उघडपणेंसुद्धां सरकारचीं सूत्रें चाललींच होतीं. दयानंद कॉलेजच्या प्रिन्सिपॉलकडे माझीं पुस्तकें कॉलेज किंवा शाळा यांत शिकविलीं जातात कीं काय याविषयीं अनेकदां सरकारनें चौकशी केल्याचें मला ठाऊक आहे. लाहोरांतील या दोन आर्यसमाजी शिक्षणसंस्थांशिवाय पंजाबांतील इतर सर्व शाळांच्या हेडमास्तरांना अनुलक्षून अशाच अर्थाचें एक सर्क्युलर पाठविलें गेलें. याच सुमारास पंजाबांतील एका बड्या शहरांतील छात्रालयांत रहाणाऱ्या एका विद्यार्थ्याच्या पुस्तकांची झडती घेतली गेली. या झडतींत मी लिहिलेलें मॅझिनीचें चरित्र मिळतांच तो विद्यार्थी ज्या शाळेंत शिकत होता, त्या शाळेच्या हेडमास्तराजवळ याबाबतींत बरीच चौकशी झाली. सरकारच्या या दुसऱ्या प्रकारच्या कारवाईशिवाय अन्य प्रकारेंहि खटपट चाललीच होती. मी लिहिलेल्या मॅझिनीच्या चरित्राचा दोन तीनदां इंग्रजी अनुवाद केला गेला व तो सरकारी वकिलांकडे धाडला जाऊन त्यांचा सल्ला घेतला गेला. पण सरकारी वकिलांचें माझ्यावर खटला भरण्याविषयीं मतैक्य न झाल्यामुळें सरकारला आपला बेत रहित करावा लागला अशी लोकवार्ता आहे.

या किटाळांतून माझी सुटका होते न होते तोंच लाहोर शहरांतून पंजाबी पत्र प्रसिद्ध होऊं लागलें. हें पत्र सुरू होण्यास कारण झालेल्या हकीकतीचा माझ्या जीवनकथेशीं महत्वाचा संबंध असल्यामुळें तिचा स्वतंत्र प्रकरणांत उल्लेख करण्याचा माझा विचार आहे.

## १८. पंजाबीपत्राचा जन्म.

१९०० सालच्या काँग्रेसच्या अधिवेशनानंतर पंजाबांत राजकारणाचा म्हणून कांहींच मागमूस उरला नाहीं हें यापूर्वींच आलें आहे. या अधिवेशनापूर्वींहि राजकारणाची जवळ जवळ हीच स्थिति होती. याचें कारण पंजाबांतील बरेचसे शिक्षित लोक आर्यसमाजी बनले होते व आर्यसमाजी लोकांचे राजकारणासंबंधाचे विचार काय होते हें यापूर्वींच आलेलें आहे. वस्तुस्थिति अशी असली तरी बाबू जोगेंद्रचंद्र लाहोरांत असेपर्यंत व पुढें जयसीराम हयात असेपर्यंत इंडियन असोसिएशन व पंजाब काँग्रेस समिति या दोन संस्था थोडीफार हालचाल करीत असत. या संस्थांमार्फत होणारी चळवळ विशेष महत्वाची नसली तरी इतर प्रांतांत कोणतीहि चळवळ होऊं लागली कीं तिचा पडसाद पंजाबांत या संस्थांमार्फत उठविला जात असे. प्रत्येक नवागत लेफ्टनंट गव्हर्नराला मानपत्र देण्याचें काम इंडियन असोसिएशन करीत असे. परंतु पुढें जयसीरामजींच्या परलोकवासानंतर या दोन्हीहि संस्था थंडावल्या. आर्यसमाजी लोकांपैकीं कांहीं मतभेदामुळें तर कांहीं हरकिसनलालांशीं पटत नसल्यामुळें राजकारणापासून

अलग राहिले. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं हरकिसनलालांचे कॉंग्रेस-विषयक विचार बव्हंशीं आर्यसमाजीयांसारखे असतांहि बाहेरून ते कॉंग्रेसला बिलगून राहिले होते. या ठिकाणीं लाला हरकिसनलालांविषयीं थोडी माहिती देणें अप्रस्तुत होणार नाहीं.

१८९२ सालीं मी लाहोरांत आलों तेव्हां हरकिसनलाल विलायतेची सफर करून आले होते. या वेळीं त्यांच्याशीं माझा विशेष संबंध जडला. पुष्कळ दिवसांपासून राय मूलराज यांच्या मनांतून एक हिंदी बँक काढावी असें होतें. इंग्रज लोक हिंदी लोकांच्या पैशानें बँका स्थापून व कंपन्या काढून अचाट नफा मिळवितात व त्यांतील थोडासा अंश आमच्या लोकांच्या तोंडावर टाकून बाकीचा सारा स्वतः लाटीत असल्याचें पाहून राय मूलराज यांना वाईट वाटे. मी लिहिलेल्या मॅझिनीच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत राजकीय स्वातंत्र्यापूर्वी धार्मिक, शैक्षणिक व औद्योगिक स्वातंत्र्याची स्थापना होणें जरूर आहे, अशा अर्थाचे विचार प्रकट केले होते. सुदैवानें धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याला आर्यसमाजानें हात घातला होता. धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्याच्या कार्याप्रमाणेंच औद्योगिक स्वातंत्र्याच्या कार्याचा सुद्धां आर्यसमाजामार्फतच प्रारंभ केला जावा अशी राय मूलराज व त्यांच्या विचाराच्या इतर लोकांची इच्छा होती. या सर्व लोकांचा माझ्या कार्यशक्तीवर भरंवसा असल्यामुळें मी हें काम हातीं घेतल्यास तें यशस्वी होईल असें त्यांनीं मला कैक वेळ बोलून दाखविलें होतें. शेवटीं या लोकांच्या प्रेरणेनें देशी बँक स्थापली जावी कीं नाहीं, याविषयीं मत अजमावण्याच्या हेतूनें मीं एक पत्र तयार केलें व तें माझ्या निवडक मित्रांकडे रवाना केलें. माझ्या मित्रांनीं मला प्रोत्साहन दिलें, पण आधींच माझ्यावर कामाचा भलामोठा बोजा लादलेला असल्यामुळें समाजाचें व कॉलेजाचें काम सोडून बँकेकडे लक्ष द्यावेंसें मला वाटेना. बँकेच्या बाबतींत माझ्याकडून याहून जास्त कांहीं होऊं शकलें नाहीं. दरम्यान हरकिसनलालांच्या मानसिक स्फूर्तीची प्रसिद्धी होऊं लागली. हरकिसनलाल आर्यसमाजाच्या धार्मिक व सामाजिक सिद्धांतांची टर उडवीत असत व पुष्कळशा आर्यसमाजी लोकांना ढोंगी ( Humbug ) म्हणत असत. आर्यसमाजी लोकांविषयीं त्यांचीं मतें अशीं असलीं तरी आर्यसमाजी लोकांच्या मदतीशिवाय पंजाबांत कसलीहि चळवळ यशस्वी होणें नाहीं हें ते पूर्णपणें जाणून होते.

विलायतेंत असतांना औद्योगिक व राजकीय बाबतींत त्यांनीं स्वतःचीं अशीं कांहीं मतें बनविलीं होतीं व तीं कृतींत आणण्याची त्यांना अति इच्छा होती. ही इच्छा पूर्ण व्हावी या हेतूनें त्यांनीं आपले विचार लोकांपुढें मांडण्यास सुरवात केली व एका बाजूनें ट्रिब्यूनचे संपादक श्री. गुप्त यांच्याशीं व सरदार दयाळसिंह यांच्याशीं तर दुसऱ्या बाजूनें आर्यसमाजी लोकांशीं संधान जमविण्याचा प्रयत्न चालविला. या वेळीं हरकिसनलालांशीं माझी बरीच जानपछान झालेली होती व उभयतांच्या वारंवार भेटीहि होत असत. अशा भेटींत बँका व कंपन्या काढून लाखोपती बनलेल्यांच्या गोष्टी हरकिसनलाल नेहमीं मला सांगत असत. शेवटीं दयाळसिंह व हरकिसनलाल यांच्या खटपटीनें पंजाब नॅशनल बँकेची स्थापना झाली व माझा भाऊ लखपतराय तिचा मॅनेजर झाला. बँकेच्या पहिल्या डायरेक्टरांत सरदार दयाळसिंह, बाबू कालीप्रसन्न राय, लाला लालचंद, लाला हरकिसनलाल इत्यादि होते. सरदारसाहेब घराबाहेर फिरकणारे नव्हते. शिवाय आर्यसमाजी लोकांवर त्यांचा विश्वासहि नव्हता. सरदारसाहेब एवंगुणविशिष्ट असल्यामुळें हरकिसनलाल वारंवार त्यांच्या बंगल्यावर जाऊं लागले. उलट सरदारसाहेबांचाहि हरकिसनलालांवर पूर्ण विश्वास होता. कांहीं दिवस बाकीचे डायरेक्टरसुद्धां सरदारसाहेबांच्या बंगल्यावर जात व तेथेंच डायरेक्टरांच्या सभा भरत. परंतु कायद्याप्रमाणें डायरेक्टरांची सभा बँकेंत भरणें अवश्य असल्यामुळें सरदारसाहेबांच्या घरीं डायरेक्टरांच्या सभा भरणें बंद झालें व त्यामुळें इतर डायरेक्टरांचेंहि जाणें बंद पडलें. दरम्यान हरकिसनलाल व त्यांचे जोडीदार डायरेक्टर यांविषयीं इतर डायरेक्टरांत कुजबुज सुरू झाली व तीमुळें डायरेक्टरांतच दुफळी माजण्याचा संभव दिसूं लागला. माझ्या बंधूनेंसुद्धां बँकेशीं असलेला संबंध सोडला. शेवटीं हरकिसनलालांनीं एका नव्या बँकेची स्थापना केली व पंजाब नॅशनल बँकेच्या डायरेक्टरांनीं त्यांना बँकेच्या कारभारांतून काढून टाकण्याचा विचार चालविला. या वेळीं सरदार दयाळसिंह परलोकवासी झाले होते, बाबू कालीप्रसन्न लाहोर सोडून कलकत्याला निघून गेले होते आणि या उभयतांच्या जागीं भक्त ईश्वरदास व लाला जयसीराम डायरेक्टर बनले होते. पुढें जेव्हां हरकिसनलालांची डायरेक्टराच्या जागीं फेरनिवडणूक होण्याची वेळ आली, तेव्हां आर्यसमाजी लोकांनीं त्यांच्या विरुद्ध मला उभें केलें. अनेक अडचणी, तंटेभांडणें आणि वादविवाद होऊन हरकिसनलालांच्या जागीं मी स्थानापन्न झालों.

या निवडणुकीनें हरकिसनलाल व मी या उभयतांमधील मनोमालिन्याचा पाया घातला गेला व पुढें बक्षी जयसीराम यांच्या निधनानंतर काँग्रेसच्या हिशेबाविषयीं झालेल्या वादविवादानें या मनोमालिन्याचा पारा पुष्कळच चढला. यावेळीं पुष्कळांचा असा समज झाला होता कीं व्यक्तिद्वेषानें आर्यसमाजी लोक हरकिसनलालांना त्रास देत आहेत. हा समज बळावण्यास याच सुमारास आणखीहि एक कारण झालें. याच वेळीं भारत इन्शुरंस कंपनीच्या कामकाजांत राय मूलराज व हरकिसनलाल यांच्यांत मतभेद उत्पन्न झाला. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे १९०० सालच्या काँग्रेसपूर्वीच पंजाबांत हरकिसनलालांचा व आर्यसमाजीयांचा असे दोन पक्ष निर्माण झाले होते. हरकिसनलालांनीं आपल्या सभोवतीं अशा लोकांचा घोळका जमविला होता कीं जे हरएक बाबतींत त्यांना आपले पुढारी समजत असत. यांपैकीं कांहीं हरकिसनलालांचे आश्रित होते व कांहीं आर्यसमाजीयांना संकुचित वृत्तीचे व प्रत्येक सार्वजनिक कार्य आपल्या तंत्रानें चालावें अशी इच्छा असणारे असे समजणारे होते. १९०० सालच्या काँग्रेसच्या हिशेबाच्या वादाचा अखेरपर्यंत निकाल म्हणून कांहींच लागला नाहीं. पंजाब काँग्रेस समितीच्या प्रत्येक वार्षिक सभेंत हा प्रश्न पुढें मांडला जाई व त्यावर खूब वादविवाद होई, पण निकाल मात्र लागत नसे. या प्रकाराला कंटाळून हरकिसनलालांनीं प्रांतिक काँग्रेस समितीच्या वार्षिक सभा भरविणेंच बंद केलें. या हिशेबाच्या भानगडीशिवाय काँग्रेसच्या पुढाऱ्यांशींसुद्धां हरकिसनलालांचीं भांडणें झालीं व कोठेंच कांहीं जमत नाहींसें पाहून शेवटीं त्यांनीं काँग्रेसचें नावच सोडून दिलें. असो. राजकारणांत भाग घेणाऱ्या पंजाबांतील दोन संस्थांपैकीं इंडियन असोसिएशननें यापूर्वीच झोंपा काढण्यास सुरवात केली होती व आपसांतील यादवीमुळें प्रांतिक काँग्रेस समितीचें कामहि मंदावलें होतें. तात्पर्य या सर्वांचा परिणाम पंजाबांतील राजकारणाची इतिश्री होण्यांत झाला.

लॉर्ड कर्झन यांच्या कारकीर्दींत सर्व हिंदुस्थानभर जी राजकारणाची लाट उसळली, तींत इतर प्रांतांच्या मानानें पंजाबनें म्हणण्यासारखा कांहींच भाग घेतला नाहीं. याचें मुख्य कारण असें होतें कीं, पंजाब प्रांताच्या शिक्षणखात्यांत व इतरत्र जे अन्याय घडत होते ते जनतेपुढें ठेवणारें एकहि वर्तमानपत्र या वेळीं सबंध पंजाबांत नव्हतें.

या वेळीं साऱ्या पंजाबांत ' ट्रिब्यून ' हेंच काय तें एक इंग्रजी वर्तमानपत्र होतें. सरदार दयाळसिंहजींच्या अंतिम कालांत जरी या पत्राच्या धोरणांत फरक पडला होता तरी त्यांच्या हयातीपर्यंत हें पत्र ठीक चाललें होतें. पुढें सरदारसाहेबांच्या निधनानंतर हें पत्र जवळ जवळ कुचकामाचें बनलें. सरदारसाहेबांनीं आपल्या मृत्युपत्रांत हरकिसनलालांकडे या पत्राची सर्व मदार सोंपविली होती. १९०० सालच्या कॉंग्रेसचे अधिवेशनाचे वेळीं हें पत्र हरकिसनलालांच्या ताब्यांत होतें. सरदारसाहेबांच्या हयातींत या पत्राविषयीं आर्यसमाजीयांची कसलीच तक्रार नव्हती; कारण त्या वेळीं हें पत्र पंजाबी बाबतींत स्वतंत्र धोरणानें लिहीत असे. सरदारसाहेबांच्या कारकीर्दींत या पत्राचें धोरण असें होतें कीं सरकारदरबारीं याची गणना आर्यसमाजीपत्र म्हणून झालेली होती. या वेळीं अखिल पंजाबांत आर्यसमाज हीच काय ती एक जीवंत संस्था होती; कारण पंजाबांतील साधारणपणें बहुतेक मोठमोठे वकील आर्यसमाजांत सामील झालेले होते. वस्तुस्थिति अशी असल्यामुळें ट्रिब्यूनपत्रांत सरकारी धोरणावर होणारी टीका किंवा समालोचना हा सर्व आर्यसमाजीयांचाच उद्योग आहे असा सरकारचा समज झालेला होता. पुढें हरकिसनलाल या पत्राचे कर्तेधर्ते होतांच पत्राचें धोरण बदललें व त्यामुळें आर्यसमाजी लोकांची त्याच्यावर इतराजी झाली. १९०० सालापूर्वींच या अप्रसन्नतेची मात्रा वाढली होती व बक्षी जयसीराम यांच्या हयातींतच कैक वेळ दुसरें पत्र काढण्याचा खल चालू झालेला होता. शेवटीं १९०० सालच्या कॉंग्रेसनंतर हें प्रकरण विकोपास गेलें व पुढें १९०३-४ सालांत पत्र काढण्याचा विचार करण्याकरितां आर्यसमाजीयांच्या अनेक बैठकी झाल्या. सुदैवानें पंजाबांतील राजकारण अजिबात नाहींसें झाल्याचें पंजाबी लोकांच्या नजरेस या वेळीं स्पष्टपणें आलें व त्याचा परिणाम प्रजेला हानिकारक झालेला असून अधिकारी लोकांवर लोकमताचा कांहींच दाब राहिलेला नाहीं हेंहि ते समजून चुकले. परिस्थिति या थरेला आल्यावर पंजाबांतील राजकारणाला चालना देण्याचा निश्चय झाला. परंतु या बाबतींत सुरवात कशी करावी हा प्रश्न सर्वांपुढें पडला; कारण पंजाब कॉंग्रेस समिती हरकिसनलालांच्या ताब्यांत होती, इंडियन असोसिएशन निर्माल्यवत् बनली होती आणि ट्रिब्यून पत्राची स्थिति तर एकदमच खालावलेली होती. शेवटीं एक निराळेंच इंग्रजी पत्र सुरू करण्याचें ठरलें.

या उद्दिष्ट हेतूच्या सिद्ध्यर्थ आर्यसमाजी पुढाऱ्यांनीं एका तरुणाला कॉलेजांतील अध्यापनाचें काम सोडून वर्तमानपत्राच्या मार्गे लागण्याकरितां तयार केलें. याच सुमारास सरकारी कॉलेजांत स्वदेशीच्या बाबतींत विद्यार्थी व प्रिंसिपॉल यांच्यांत खटका उडाला. या प्रकरणांत पुढें असें उघडकीस आलें कीं ज्या विद्यार्थ्यांनीं याविषयीं ट्रिब्यून पत्राशीं पत्रव्यवहार केला होता, त्यांचीं अस्सल पत्रें कॉलेजांतील एका अध्यापकाच्या स्वाधीन केलीं गेलीं व या अध्यापकमहाशयांनीं त्यांचें लोण प्रिंसिपॉलसाहेबांपर्यंत पोंचविलें. एकंदर परिस्थिति अशी उत्पन्न होतांच आर्यसमाजाच्या दहा पुढाऱ्यांनीं प्रत्येकीं एक हजाराच्या नुकसानीची हमी घेतली व लाला जसवंतरायांना वर्तमानपत्र काढण्यास प्रोत्साहित केलें.

अक्टोबर ( १९०४ ) च्या पहिल्या आठवड्यांत पंजाबी पत्राचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. या पहिल्या अंकानेंच पंजाबीची सर्वत्र प्रसिद्धि झाली. या अंकांत बऱ्याचशा अधिकाऱ्यांच्या वर्तनावर कडक टीका केली गेली होती. या अधिकाऱ्यांत एक हिंदु डेप्युटी कलेक्टरहि होते. पत्राच्या टीकेंतून हिंदूहि न सुटला गेल्यामुळें हें पत्र कोणाचीहि भीडमुर्वत ठेवणार नाहीं अशी जनतेची खात्री झाली. या अंकांतील बरींचशीं स्फुटें व एक दोन लेखहि मी लिहिले होते. संपादकाची निवड मीच केली होती व तिला माझे मित्र बाळ गंगाधर टिळक यांनीं दुजोरा दिला होता. पत्राच्या व्यवस्थेचें काम लाला जसवंतराय यांच्यावर सोंपविलेलें होतें. लवकरच पत्राशीं माझा संबंध असल्याचें व माझ्याच देखरेखीखालीं तें चालविलें जात असल्याचें सर्व लोकांना कळून चुकलें. हरकिसनलालांच्या पक्षानें आमच्या पत्राला हाणून पाडण्याची शिकस्त केली, पण आपल्या लेखांनीं व धोरणानें आमच्या पत्रानें सर्व साधारण जनतेवर लवकरच आपली छाप बसवून टाकली.

पत्राच्या नुकसानीकरितां ज्या लोकांनीं एकेक हजाराची हमी घेतली होती, त्यांपैकीं कांहीं निवडक लोकांचीं नांवें येथें देतों.

रायबहादुर लाला लालचंद, एम. ए., लाला ईश्वरदास, एम. ए., स्वर्गीय लाला हंसराज साहनी, वकील, रावळपिंडी, स्व. लाला गुरुदासराम साहनी, बॅरिस्टर, रावळपिंडी, सेठ चूहडलालसाहेब, एबटाबाद, लाला काशीराम, वकील, फिरोजपूर, बक्षी टेकचंद, एम. ए. व लाजपतराय.

यांपैकीं लाला गुरुदासराम व सेठ चूहडलाल यांच्याकडूनच रुपये घेतले गेले. गुरुदासरामांनीं एक हजार व शेठजींनीं पांचशें रुपये दिले. हे सर्व रुपये एक वर्षाच्या आंतच परत केले गेले व यानंतर पुढें केव्हांहि कोणापासून पैसे घेण्याची पाळी आली नाहीं.

पत्र चालू होण्याच्या वेळींच १९०४ सालीं मुंबई येथें भरणाऱ्या कॉंग्रेसला प्रतिनिधि पाठविण्याचें व कॉंग्रेसशीं पुन्हा संबंध जोडण्याचें निश्चित झालें.

ठरल्याप्रमाणें १९०४ सालच्या कॉंग्रेसला मी हजर राहिलों. यावेळीं सर हेनरी कॉटन हे अध्यक्ष होते. सर विलियम वेडरबर्नहि आलेले होते. विषय-नियामक कमिटींत पंजाबप्रांताच्या तक्रारींविषयीं बराच वादविवाद झाला. सर विलियम वेडरबर्न यांच्याशीं माझी मुलाखत झाली व कॉंग्रेसशीं जडलेला संबंध कायम राखण्याचा आमचा पक्का निश्चय झाला. या वेळच्या कॉंग्रेसनें १९०५ सालीं विलायतेला एक डेप्युटेशन पाठविण्याचें ठरविलें. कॉंग्रेस अधिवेशनानंतर पुढें कलकत्ता शहरीं माननीय गोखले यांच्याशीं माझी भेट झाली व त्यांच्या संमतीनें विलायतेस जाणाऱ्या डेप्युटेशनबरोबर जाण्याचें मी ठरविलें. अस्तु. याप्रमाणें १९०५ सालीं गोखल्यांशीं माझी पहिली मुलाखत झाली.

## सिंहलद्वीपाची सफर.

मुंबईच्या कॉंग्रेसची कार्यवाही संपतांच जानेवारी महिन्यांत मी आगबोटीनें सिंहलद्वीपास गेलों. माझ्याबरोबर संयुक्त प्रांतांतील प्रसिद्ध आर्यसमाजी डेप्युटी कलेक्टर लाला गंगाप्रसाद, एम. ए. हे होते. दोघांनींहि किनाऱ्या किनाऱ्यानें जाणाऱ्या ब्रिटिश इंडिया कंपनीच्या बोटीनें प्रवास करण्याचें ठरविलें. ज्या बोटीनें आमचा प्रवास चालू होता ती जुनी पुराणी होती व आमच्या वांट्याला जी खोली आली होती ती तर फारच घाणेरडी होती. उष्मा फारच होत होता. दुसऱ्या वर्गाला खोलीबाहेर मोकळी अशी फारशी जागा नव्हती व जी होती तेथें बसून वारा घ्यावा म्हटलें तर बसावयास खुर्ची किंवा बांकहि नव्हतें. भोजनाची व्यवस्था जहाजाप्रमाणेंच होती. या बोटींत प्रवासी असे आम्ही दोघेच होतों. जणूं काय असल्या बोटीनें कोणी प्रवासच करीत नसावें. माझे सोबती कट्टर अहिंसावादी असल्यामुळें मांस, अंडीं किंवा मांसळी खाण्याची त्यांना सोय नव्हती. शेवटीं माझ्या अत्याग्रहास्तव अंडीं खाण्यापर्यंत

त्यांनीं मजल मारली. बोटीवरील खानसामा बंगाली मुसलमान होता व कप्तान एक इंग्रज होता. हे इंग्रजबहाद्दर आमच्याबरोबर तिरस्कारानें वागत व पहिल्या वर्गाच्या छतावर आम्हाला पायसुद्धां ठेवूं देत नसत. या प्रवासांत मंगलोर, कालिकत, कन्नानोर व मही इत्यादि ठिकाणीं उतरून आम्हीं तीं तीं ठिकाणें पाहिलीं. महीला आम्ही एका चर्चमध्यें आपलें ठाणें दिलें व संध्याकाळीं तेथील देशी पाद्र्याकडे भोजन केलें. मलबारचा किनारा फार सुंदर आहे. तेथील हिंदु वर्णानें काळे असले तरी त्यांची राहाणी स्वच्छ व टापटिपीची आहे. या प्रांतांत अर्धवट क्रिश्चन बरेच आहेत. हे लोक रोमन क्याथोलिक पंथाचे अनुयायी आहेत. यांच्या डोक्यावर शेंडी असून ते जातिभेद मानतात. हे लोक विवाहप्रसंगींच नव्हे तर खानपानाच्या बाबतींतसुद्धां आपल्या जातीबाहेर जात नाहींत.

जवळ जवळ एक सप्ताहानंतर आम्हीं सिलोन शहरीं पोंचलों. बोटीवरून उतरतांच एका अधिकाऱ्यानें आम्हाला क्वारंटाईनचा रस्ता दाखविला व शहरांत जाण्यास मनाई केली. शेवटीं नाइलाजास्तव डेप्युटी कलेक्टरांना त्या ठिकाणीं ठेवून मी एका पारशी व्यापाऱ्याच्या तलासास लागलों. या व्यापाऱ्याला मि. मलबारींनीं एक चिठ्ठी दिली होती. चिठ्ठी हातीं पडतांच त्या व्यापाऱ्यानें माझ्याबरोबर एक इसम दिला. दरम्यान् कलेक्टरसाहेबांचीहि सुटका झाली होती. त्या लोकांचा आमच्याकडून पैसे उकळण्याचा विचार होता, पण आमच्या कडून कांहींसुद्धां लभ्यांश होण्याचें लक्षण न दिसतांच त्यांनीं आमचा पिच्छा सोडून दिला. पारशी व्यापाऱ्यानें दिलेल्या इसमानें आमची एका हॉटेलांत रवानगी केली. हॉटेलांत उतरण्याचा व युरोपियन पद्धतीनें जेवण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होता. हळू हळू डेप्युटी कलेक्टरांनीं सूप व मासळीवर हात मारण्यास सुरवात केली व मधून मधून कबाबाचीहि लज्जत चाखूं लागले. परंतु पुढ्यांतून कच्चें मांस जाऊं लागलें कीं मग मात्र त्यांना कसेंसेंच होई.

कोलंबो शहरांत एक आठवडा राहून नंतर आम्ही कँडीला गेलों. येथून पुढें सिंहलद्वीपांतील सुप्रसिद्ध नेवारा एलिया पर्वत पहाण्यास गेलों. या पर्वतापासून थोड्याच अंतरावर सीताबंदिवासाचें स्थान म्हणून एक जागा दाखविण्यांत येते. या स्थानाजवळून एक सुंदर व स्वच्छ नदी वहाते. या स्थानाजवळच सिंहल-

द्वीपांतील सर्वांत मोठा बगिचा आहे. येथून पुढें अनुराधापुराला गेलों. हें शहर मध्यंतरीं जमिनीच्या पोटांत गडप झालेलें होतें, पण इंग्रजी सत्ता चालू झाल्यावर प्रकाशांत आणलें गेलें. याच्या प्रकाशांत येण्यानें बौद्ध कालांतील अनेक शोभिवंत भवनें उघडकीस आलीं. सम्राट् अशोकांच्या पुत्रानें हिंदुस्थानांतून आणून लावलेला वृक्षहि याच ठिकाणीं आहे. सध्या बौद्ध लोक याची मोठ्या भक्तिभावानें पूजा अर्चा करीत असतात. हें नगर पहाण्यांत मी कैक तास घालविले व या ठिकाणीं दृष्टिगोचर होणारें भारतवर्षाचें प्राचीन वैभव व कलाकौशल्य पाहून मी दिङ्मूढ झालों. प्रवासांतून परत येतांना रामेश्वराची यात्रा केली व मदुरा येथील भव्य मंदिर पाहून पुन्हां मद्रास शहरीं आलों. मद्रास येथें आम्ही श्री. जी. सुब्रमण्यम् यांच्या येथें उतरलों व त्यांच्या घरीं मद्रासी जेवणाची चव अनुभविली. मद्रास शहरीं तीन दिवस राहून रेल्वेनें कलकत्ता शहरीं गेलों. कलकत्त्याला पोंचतांच आम्ही निरनिराळ्या ठिकाणीं उतरण्यास गेलों. राय रलाराम यांच्या येथें मी आपली सोय केली व डेप्युटी कलेक्टर आपल्या मित्राकडे गेले. कलकत्त्यांत दोन दिवस काढून कलेक्टरसाहेब आपल्या गांवाला रवाना झाले.

एक दिवस माननीय गोखले वरिष्ठ कौंसिलचें ( Supreme Council ) कामकाज अवलोकन करण्यास मला घेऊन गेले. त्या दिवशीं विश्वविद्यालयाच्या बेकायदेशीर कार्यवाहीला कायद्याच्या चौकटींत आणण्याविषयींचा वादविवाद होणार होता. या दिवशीं बहुतेक सभासद हजर होते. या वेळीं झालेल्या सर्व हिंदी वक्त्यांच्या भाषणांत एकच भाषण उत्कृष्ट असें झालें व तें गोखल्यांचें होय. इंग्रज वक्त्यांत इबसन यांची जोरदार वक्त्यांत गणना होत असे. पुष्कळ वादविवादानंतर सरकारला पाहिजे होता तसा कायदा पास झाला. कौंसिलांतील हा सर्व तमाशा पाहून माझ्या मनावर कौंसिलाविषयीं प्रतिकूल परिणाम झाला. एक दिवस माननीय गोखले मला भगिनी निवेदिताबाईंकडे घेऊन गेले. निवेदिताबाईंच्या भेटीनें मला फार आनंद वाटला. स्टेट्समन पत्राचे संपादक मि. रॅटक्लीफ यांच्याकडे त्या मला घेऊन गेल्या. रस्त्यांत माझ्याशीं त्या जें कांहीं बोलल्या तें मी आजन्म विसरणें शक्य नाहीं. हिंदी लोकांवर त्यांचें अति प्रेम होतें व इंग्रजी शासनाविषयीं त्यांना फार तिटकारा वाटे. राजकीय बाबतींत त्यांचे विचार थेट मॅझिनीप्रमाणें होते. त्यांच्या भेटीनें माझ्या राजकीय विचारांस दृढता प्राप्त झाली व त्यामुळें मला एक प्रकारें समाधान वाटलें. याप्रमाणें कलकत्त्यांत कांहीं दिवस घालवून मी सीधा लाहोरास गेलों.

## १९. विलायतेची सफर.

लाहोरला येऊन थोडे दिवस होतात न होतात तोंच इंडियन असोसिएशननें विलायतला पाठविण्याकरितां आपला प्रतिनिधि म्हणून माझी निवड केली. माझ्या विलायतच्या प्रवासाकरितां फंडहि गोळा होऊं लागला. अंदाजीं तीन साडेतीन हजार ( कदाचित् दीड हजारहि असावे ) रुपये जमा झाले व मीं जाण्याचा निश्चय केला. या फंडाला पैसे देणारांत स्व. लाला लालचंद तर होतेच पण भक्त ईश्वरदासहि असावे. मला निरोप देण्याकरितां लाहोरांत एक समारंभ झाला व पुढें स्टेशनावर पोंचविण्यासाठींहि बरेच लोक आले. या वेळींहि लाला हंसराज व स्व. लालचंद हे हजर होते. ज्या दिवशीं मी निघण्याचें ठरविलें होतें त्याच दिवशीं माननीय गोखल्यांकडून माझ्या नांवें एक तार आली. या तारेंत सर विलियम वेडरबर्न यांच्या सांगण्यावरून थोड्या दिवसांकरितां त्यांनीं आपला विलायतेला जाण्याचा बेत तहकूब केला असल्याचें होतें. गोखल्यांनीं आपला बेत बदलला तरी मला आपला बेत बदलावासा वाटेना. कारण युरोपचा प्रवास करण्याची माझी फार इच्छा असल्यामुळें ही आयती चालून आलेली संधी

गमविली गेल्यास पुन्हां कदाचित् माझें जाणें होणार नाहीं अशी मला भीति वाटूं लागली. याखेरीज जुलई महिन्यांत प्रवास करावयाला मी कचरत होतों. शेवटीं एकदांचें लाहोर शहर तर सोडलेंच. माझ्याबरोबर लाहोरचे लाला दीवाण-चंद कपूर हे होते. कपूरमहाशय आपल्या कामाकरितां विलायतेस जात होते.

मुंबईला पोंचल्यावर एक दिवसासाठीं पुण्याला गेलों व तेथें गोखल्यांकडे उतरलों. गोखल्यांनीं व त्यांच्या भगिनीनें माझें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. या वेळीं एक वेळ टिळकांकडे जेवलों, त्यांच्या पत्नीचें दर्शन घेतलें व त्यांच्याशीं बराच वेळ बोलत बसलों. स्वतः गोखल्यांनीं मला टिळकांकडे पोंचविलें, पण आपण मात्र तेथें बसले नाहींत. त्या दिवसांतसुद्धां उभयतांचें पटत नसे; परंतु उभयतांना एकमेकांविषयीं अति आदर वाटे. वस्तुस्थिति कांहींहि असो, पण माझा तरी असा समज झाला.

मुंबईंत बोटींत पाय ठेवल्यापासून पोर्ट सैयद बंदर आल्या वेळीं आमचे पाय किनाऱ्याला लागले. या बंदरांतील हिंदी लोकांचीं दुकानें पाहून मनाला फार संतोष झाला व त्यांना कडकडून भेटण्याची अनिवार इच्छा झाली. आमच्या बोटीवरहि तिसऱ्या वर्गांत कांहीं हिंदी उतारू होते. हे सिंधी असून माल्टा, स्पेन, क्यूबा वगैरे ठिकाणीं व्यापारानिमित्त जात होते. बोटीवर हे स्वतःच आपलें जेवण तयार करीत असत. पोर्ट सैयदहून मी मसीनाला गेलों व मसीनाहून नेपल्सला गेलों. तेथून पुढें रोम शहरीं व रोमहून मिलान येथें गेलों. नंतर मिलानहून निघून १० जून रोजीं लंडन शहरीं पोंचलों.

उपरिनिर्दिष्ट शहरांत जें कांहीं माझ्या अवलोकनांत आलें तें सर्व पंजाबी-पत्रांत येऊन गेलें असल्यामुळें त्याची येथें पुनरावृत्ति करण्याची आवश्यकता नाहीं. याचप्रमाणें माझ्या विलायतच्या प्रवासाची हकीकतसुद्धां पंजाबीपत्रांत येऊन गेलेली आहे. असो. श्यामजी कृष्ण वर्मा यांना मी विलायतेंत आलों असल्याची बातमी लागतांच ते मला हॉटेलांत भेटण्यास आले व आपल्या भारतीय गृहांत (India House) रहावयास घेऊन गेले. या गृहाचा उद्घाटनसमारंभ याच वेळीं झाला. येथें असतांना श्यामजी कृष्ण वर्माशीं भेटण्याचे अनेक प्रसंग आले. राजकीय विचारांत आमचें दोघांचें थोडें फार ऐकमत्य होतें, पण कॉंग्रेस व तिचे पुढारी यांविषयीं ते जी अनुदारता प्रकट करीत असत ती मात्र मला पसंत

नव्हती. गोखल्यांविषयीं तर ते फारच तुच्छतेनें बोलत. ही गोष्टहि मला पसंत नव्हती. असो. यांच्या मार्फत मजूरपक्षाचे पुढारी हाइंडमन व एकदोन आयरीश पुढाऱ्यांशीं माझा परिचय झाला. याच सुमारास हॉबर्न हॉलमध्यें मजूर-पक्षाची एक काग्रेस झाली. या संस्थेचे दादाभाई नौरोजी हे उपाध्यक्ष होते. त्यांच्या सांगण्यावरून मी या कॉंग्रेसला हजर राहिलों व एक भाषणहि केलें. वर्मांचेंहि भाषण झालें. यापूर्वींच वर्मासाहेबांनीं एक मासिकपत्र चालू केलेलें होतें. त्याचें नांव Indian Socialogist असें होतें. या मासिकांत कॉंग्रेस व तिचे पुढारी यांविषयीं ते वाटेल तें खरडीत असत. वर्मासाहेबांच्या अशा प्रकारच्या कारवाईमुळें मी व त्यांनीं एकाच सभामंचकावरून स्वराज्याच्या ( Home Rule ) समर्थनपर व्याख्यानें दिल्याचें कळतांच सर हेन्री कॉटन फार नाराज झाले व ब्रिटिश कॉंग्रेस समितीच्या सभेंत कॉंग्रेसचा प्रतिनिधी या नात्यानें माझें हें कृत्य अनुचित असल्याचा ठराव त्यांनीं मांडला. सर विलियम वेडरबर्न व इतर सभासद यांनीं माझी बाजू घेतली. या वेळीं स्वतःच्या समर्थनार्थ मीं पुढें दिल्याप्रमाणें बोललों. "कॉंग्रेसच्या प्रतिनिधित्वाकरितां मी कांहीं आपलें व्यक्तिस्वातंत्र्य विकलेलें नाहीं. दुसरें ज्यानें कोणाहि कॉंग्रेसवाल्यावर गदा येईल अशा प्रकारचें व्याख्यान मी दिलेलें नाहीं. इतउत्तर कॉंग्रेसच्या प्रतिनिधित्वामुळें मला जर या देशांत आपले विचार स्पष्टपणें लोकांसमोर मांडतां येणार नसतील तर त्याकरितां मी कॉंग्रेसच्या प्रतिनिधित्वाला रजा देण्यास तयार आहें. पण कोणत्याहि कारणास्तव माझ्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा येऊं देण्यास मी तयार नाहीं" शेवटीं आपल्याला मिळालेला व्याख्यानाचा रिपोर्ट बरोबर नसल्याचें सर हेन्री कॉटन यांनीं सांगितलें व हें वादळ येथेंच शांत झालें. वयोवृद्ध दादाभाई नौरोजीसुद्धां वरील कॉंग्रेसमध्यें हजर होते. या वेळीं टेम्स नदीच्या पलीकडे केन्सिंग्टनच्या बाजूला ते रहात असत व त्यांचा बराचसा वेळ मतें मिळविण्यांत जात असे. जुलई महिन्यांत मँचेस्टर, लीड्स , एडिन्बर्ग, ग्लास्गो इत्यादि शहरें पाहिलीं, कांहीं ठिकाणीं व्याख्यानें दिलीं व हिंदी विद्यार्थ्यांनीं दिलेला पाहुणचार घेतला. पुढें आगस्ट महिन्यांत लंडन शहरीं आलों व भारतीय गृहांत राहूं लागलों.

भारतीय गृहाची व्यवस्था फार वाईट होती. कारण या गृहाची सजावट करण्यासाठीं व योग्य व्यवस्था ठेवण्यासाठीं वर्मामहाशय कांहींहि खर्च करूं इच्छित

नव्हते. घर विकत घेण्यांत त्यांनीं आपले पैसे लावले होते व कांहीं आवश्यक सामानहि घेतलें होतें; परंतु यापुढें मात्र अधिक खर्च करण्याची त्यांची तयारी नव्हती. बाकीचा खर्च भाड्यांतून केला जावा असें त्यांचें म्हणणें होतें. त्यांचें म्हणणें कांहींहि असलें तरी सुरवातीला असें होणें शक्य नव्हतें. असो. कांहीं कालपर्यंत या गृहांत मी व अहमदाबादचे बॅरिस्टर देसाई या दोहोंव्यतिरिक्त तिसरा कोणीच रहात नव्हता. गृहव्यवस्थेसंबंधानें श्यामजींशीं माझी बरेंच बोलणें झालें. या गृहांत एक मुसलमान तरूण रहात असे. श्यामजींनीं याला शिकण्याकरितां शिष्यवृत्ति देण्याचें कबूल केलेलें होतें. परंतु त्याच्यावर वर्मामहाशय इतकीं कामें सोंपवीत असत कीं बिचाऱ्याला वाचण्याला वेळच मिळत नसे. या तरुणाला अमेरिकेस जाण्याकरितां मदत देण्याचें मीं कबूल केलें. वर्मामहाशयांना ही गोष्ट कळतांच ते माझ्यावर नाराज झाले व आपल्या व्यवस्थेंत हात घालून मी त्यांचें कार्य बिघडून टाकीत आहें असें म्हणाले. शेवटीं हें प्रकरण विशेष वाढीला न लागतां येथेंच मिटलें व त्यामुळें आमच्या स्नेहांतहि कांहीं फरक पडला नाहीं. परंतु झालेल्या प्रकारानें वर्मामहाशयांशीं सहकार्य करणें कठीण आहे हें मी समजून चुकलों. जवळच्या कोणाहि व्यक्तीला ते आपल्याविरुद्ध बोलूं देत नाहींत. त्यांचीं स्वतःचीं अशीं ठरींव मतें आहेत व त्यांवर त्यांचा पूर्ण विश्वास आहे. दुसऱ्याच्या मतांचा विचार करण्यास ते बिलकुल तयार नाहींत, व दुसऱ्याचे विचार समजून घेण्याइतकी त्यांच्यापाशीं उदारताहि नाहीं. स्वतःच्या बुद्धिमत्तेवर त्यांचा इतका विश्वास आहे कीं भिन्न मताच्या इसमाला ते वाटेल तें बोलूं लागतात. तात्पर्य ते पक्के हेकेखोर आहेत. याखेरीज ते अति कंजूसहि आहेत. ज्याला ते मदत देतात त्यानें जन्मभर आपला गुलाम रहावें किंवा मरेमरे तों काम करावें अशी त्यांची इच्छा असते. ही त्यांची वृत्ति जन्मजात आहे.

१९०५ सालानंतर ज्या कांहीं गोष्टी घडल्या त्यांवरून उपरिनिर्दिष्ट माझें मत बरोबर असल्याचें सिद्ध झालें आहे. वर्मामहाशय एवंगुणविशिष्ट असले तरी त्यांच्या देशभक्तीविषयीं दुमत होणें नाहीं. त्यांचे राजकीय विचार थोडे फार योग्य आहेत व अंतःकरणापासून देशाच्या कल्याणाची ते इच्छा करणारे आहेत. परंतु पैशाचा लोभ, अहंकार व आत्मश्लाघा यांच्या अतिरेकामुळें कोणाशीं मिळून मिसळून काम करणें त्यांच्या बाबतींत अशक्य झालें आहे. जितक्या लोकांचा

यांच्याशीं संबंध आला तितक्या लोकांचें थोड्या फार दिवसांनीं यांच्याशीं पटेनासें झालें व यामुळें यांची कोणतीहि योजना यशस्वितेचा पल्ला गांठूं शकली नाहीं. परंतु यांच्या प्रचाराचा व खटपटीचा राष्ट्रीयपक्षाची स्थापना होण्यांत व त्याला दृढता प्राप्त होण्यांत बराच उपयोग झाला, हें विसरून चालणार नाहीं. हरदयाळ व सावरकर यांच्यावर वर्मामहाशयांच्या विचाराचा थोडा फार परिणाम झाला असला तरी या दोघांना त्यांचे शिष्य समजणें हें या दोन महापुरुषांचा अनादर करण्यासारखें आहे.

विलायतेंत असतांना बडोदा नरेशाशीं माझा परिचय झाला. महाराजासाहेब सेसिल हॉटेलांत उतरले होते. त्यांनीं एक मेजवानी देण्याचें ठरवून तन्निमित्त मला व वर्मांना आमंत्रण दिलें. या मेजवानीला आमच्याखेरीज फक्त एकच हिंदी होता. राजेसाहेबांनीं महाराणीसाहेबांशीं माझा परिचय करून दिला व आम्हाला हलकेच इतर पाहुणे गेल्यावर आपण बोलत बसूं म्हणून सांगितलें. इतर पाहुणेमंडळी (युरोपियन) गेल्यावर राजेसाहेब बराच वेळ खुल्या दिलानें बोलत बसले.

सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीला दिवाण अमरनाथ यांचे पुत्र दिवाण बदरीनाथ यांच्यासह अमेरिकेला गेलों. बदरीनाथ जहाल विचारांचे असून केंब्रिजमध्यें अध्ययन करीत होते. बरेच दिवसांपासून त्यांच्या मनांतून अमेरिकेचा प्रवास करावयाचा असल्यामुळें मी जात असलेला पाहून माझ्याबरोबर तेहि निघाले. यांच्यामुळें मला बराच त्रास सोसावा लागला. खेरीज माझें बँकबुक हरवल्यामुळें मी आर्थिक अडचणींतहि सांपडलों. अमेरिकेच्या प्रवासाचें वर्णन यापूर्वी छापलें गेलें असल्यामुळें त्याचीहि येथें पुनरावृत्ति करीत नाहीं.

आक्टोबरच्या आरंभाला मी लंडनशहरीं परतलों. या वेळीं माननीय गोखले येऊन पोंचले होते व सर विलियम वेडरबर्ननीं आमच्या कार्यक्रमाचा आराखडा तयार केला होता. या आराखड्यानुसार ३ नव्हेंबरपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं मीं व्याख्यानें देत फिरलों. कक ठिकाणीं मी व गोखले एकाच सभामंचकावरून बोललों तर कैक ठिकाणीं स्वतंत्रपणें बोललों. या वर्षीचीं माननीय गोखल्यांचीं भाषणें फार कडक होतीं. स्वतः गोखलेसुद्धां बरेच गरम झालेले दिसत होते. शेवटीं ३ नवंबरला इंग्लंडचा किनारा सोडून हिंदुस्थानांत येण्याकरितां बोटींत पाय ठेवला. बोटीवर हिंदुस्थानचे भावी व्हाइसरॉय लॉर्ड मिंटो हेहि होते. पुढें

लाहोर शहरीं पोंचल्यावर लोकांनीं मोठ्या उत्साहानें माझें अभूतपूर्व स्वागत केलें. स्टेशनच्या आवारांत लोकांची इतकी दाटी झालेली होती कीं चिरडून जाण्याची धास्ती वाटत होती. स्टेशनाबाहेर सर्व ठिकाणीं ‘ ॐ ’ हा एकच शब्द दृष्टिगोचर होत होता. गाडींत पाय ठेवतांच तरुणांनीं गाडीचे घोडे सोडले व माझ्या घरापर्यंत त्यांनीं स्वतः गाडी ओढीत नेली. यापुढें कैक दिवस माझ्या सन्मानार्थ शहरांत सारख्या सभा भरत होत्या. इंडियन असोसिएशननें व निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं मला मानपत्रें दिलीं. सरकारी कॉलेजामार्फत एक स्वतंत्र मानपत्र दिलें गेलें.

आर्यसमाजाच्या या वर्षाच्या वार्षिकोत्सवांतील माझ्या व्याख्यानाला लोकांची इतकी भयंकर गर्दी लोटली कीं व्याख्यान तहकूब ठेवणें भाग झालें. संध्याकाळीं दयानंद शाळेच्या आवारांत माझं व्याख्यान झालें. व्याख्यानाला कमींत कमी दहा हजार लोक आले होते. लोकांनीं मोठ्या प्रेमानें माझें स्वागत केलें. सुमारें दोन तासपर्यंत मी बोललों. पुढें १९०७ सालीं माझ्यावर झालेल्या खटल्यांत याच व्याख्यानाचा उपयोग केला गेला. या व्याख्यानांतील अंतिम शब्द पुढें दिल्या-प्रमाणें होते. “देशाच्या क्षितिजावर रक्ताचा वर्षाव होण्याचीं चिन्हें दृग्गोचर होत आहेत. आपणांस जरी या वेळीं तें स्वच्छ दिसत असलें तरी बारकाईनें निरीक्षण केल्यास मधून मधून छोटे छोटे रक्ताचे पाट वहात असलेले दिसून येतील.” लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं १९०५ सालीं कोणासहि पुढें झालेल्या प्रचंड आंदोलनाची यत्किंचित्‌सुद्धां कल्पना नव्हती. अशा प्रकारचें दूरदर्शित्व फक्त इतिहासवेत्त्यांसच असतें.

थोड्या दिवसांनंतर बारिसाल येथून उत्तेजक वातम्या येऊं लागल्या. बंगाल सरकारनें बारिसाल कॉन्फरन्समध्यें नसतीं विघ्नं आणून कॉन्फरन्सचें काम मध्येंच बंद पाडलें व कैक देशभक्तांना गिरफ्तार केलें. सरकारच्या या अरेरावीच्या कृत्याचा निषेध करण्याकरितां पहिली सभा लाहोर शहरीं झाली. या सभेंत बोल-तांना “ आमची राजभक्ति कायद्याच्या पाशांनीं विवक्षित मर्यादेपर्यंत जखडून टाकलेली आहे व या विवक्षित मर्यादेबाहेर ती जाऊं शकत नाहीं. यामुळें सद्यः-स्थितींत आमच्याकडून याहून अधिक राजभक्तीची अपेक्षा करणें फुकट आहे. अशा परिस्थितींत सरकारच्या या कारवाईमुळें जर कांहीं वाईट परिणाम घडून आले तर त्यांचें उत्तरदायित्व सरकारावरच राहील.”

पुढें काशी क्षेत्रीं ( १९०५ ) जी कॉंग्रेस भरली, तिला मी हजर राहिलों. काशीच्या लोकांनीं माननीय गोखल्यांचें अश्रुतपूर्व स्वागत केलें. मी गोखल्यांच्या जवळ बसलों होतों. लोकांचा उत्साह अवर्णनीय होता. वंदे मातरम्‌चा ध्वनी चारी दिशा निनादवून सोडीत होता. आमच्या गाडीच्या मागें स्वयंसेवक सुंदर-लाल उभा होता व जयध्वनीच्या आरोळ्यांनीं तो आमचे कान बधिर करून सोडीत होता. सकाळीं अध्यक्षांचें ( मा. गोखले ) भाषण झालें व संध्याकाळीं विषयनियामक कमिटीची सभा भरली. पहिल्याच ठरावावर मोठी खडाजंगी उडाली.

हा ठराव युवराजांच्या ( पंचम जॉर्ज ) स्वागताचा होता. या ठरावाचा मी विरोध केला व टिळकांनीं मला पाठिंबा दिला. बराच वादविवाद झाला. बहुतेक वृद्ध पुढारी आमच्या विरुद्ध होते. थोडे बंगाली व कांहीं महाराष्ट्रीय एवढेच कायते आमच्या बाजूला होते. शेवटीं ठराव मतास पडतां तो बहुमतानें पास झाला. ठराव पास झाला असला तरीहि खुल्या अधिवेशनांत आम्ही त्याचा विरोध करूं अशी सूचना तेथल्या तेथेंच देऊन टाकली. आमच्या या सूचनेमुळें कॉंग्रेसचे जुनेपुराणे पुढारी संतापले तर संयुक्त प्रांतीय पुढारी गर्भगळित झाले.

रात्रींच्या रात्रीं पोलिस कमिशनरला याविषयीं खबर दिली गेली व उजाडतांच डेप्युटी कमिशनरासह मुंशी माधवलाल मंडपांत दाखल झाले. दंगा होण्याच्या भीतीनें मुंशीसाहेब गडबडून गेले होते व यदाकदात् दंगा झाल्यास त्यांची जबाबदारी आपल्यावर येऊं नये म्हणून ही सारी त्यांची धडपड होती. मुंशी-साहेब उघडपणें आम्हाला राजद्रोही व बदमाष म्हणूं लागले. रात्रभर व सकाळीं-सुद्धां साऱ्या शहरांत याविषयींचीच चर्चा चालू होती. कांहीं लोक "संयुक्त प्रांतांत असें झाल्यास आमच्या प्रांताचें नांव बद्दु होईल" असें बोलूं लागले तर दुसरे कांहीं "असें झाल्यास कॉंग्रेस उधळली जाईल" असें बडबडूं लागले. आम्ही कोणाच्याहि बडबडण्याकडे लक्ष दिलें नाहीं. शेवटीं अकरा वाजतां अधिवेशन चालू होण्याची वेळ जवळ येऊन ठेपली तरीहि गोखले कोठें दिसेनात. चौकशी करतां विरोधी लोकांची समजूत घालण्याच्या प्रयत्नांत असल्याचें कळलें. थोड्याच वेळांत गोखले आले, परंतु मंडपांत जाण्याऐवजीं माझी समजूत घालूं लागले. मी म्हटलें, "आमचा विरोध सैद्धांतिक

आहे. " पण एवढ्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. अखेरीस कोणत्याहि प्रकारें मी ऐकत नाहींसें पाहून ते म्हणाले, " मेहेरबानी करून माझ्याकरितां तरी विरोध करूं नका. " यापुढें मात्र त्यांच्याशीं वादविवाद करणें अशक्य झालें व मी त्यांचें म्हणणें "ठराव पुढें आल्यावेळीं आम्ही मंडपाबाहेर जाऊं व दरम्यान् आपण ठराव पास करून घ्यावा; मात्र सर्व संमतीनें तो पास झाला असें नमूद केलें जाऊं नये, " या अटीवर कबूल केलें. जेमतेम टिळकांची मी समजूत घातली; पण बंगाली तरुण जे. एन. एम. व आर. राय यांची समजूत पटेना. शेवटीं मी त्यांना जबर-दस्तीनें धरून ठेविलें व उपरिनिर्दिष्ट ठराव पास होऊं दिला.

कॉंग्रेसच्या शेवटच्या दिवशीं माझें व्याख्यान झालें. व्याख्यानाला फक्त दहा मिनिटें दिलेलीं होतीं; परंतु जवळ जवळ वीस मिनिटें माझें भाषण झालें. कॉंग्रेसच्या मंचकावरून अशा प्रकारचें हें पहिलेंच व्याख्यान होतें. लोक सारखे करतलध्वनीनें आपली पसंती व्यक्त करीत होते व 'पुढें बोला, पुढें बोला' म्हणून मला प्रोत्साहन देत होते. अध्यक्षांच्या दोन्ही बाजूस बसलेल्या जुन्या-पुराण्या पुढाऱ्यांचे—विशेषतः मुंबापुरस्थ—चेहरे काळवंडून गेले व भीतीनें ते कापूं लागले. माझें व्याख्यान बंद करून मला खालीं बसविण्यासाठीं ते गोखल्यांना आग्रह करूं लागले, पण गोखल्यांनीं सांगितलें कीं आपण असें करूं शकत नाहीं. शेवटीं अध्यक्षांच्या सवलतीचा अनुचित फायदा घेऊं इच्छित नाहीं असें सांगून मी आपलें व्याख्यान समाप्त केलें. त्याच दिवशीं सायंकाळीं रोमेशचंद्र दत्तांनीं श्री. पलित यांच्या मार्फत "माझें व्याख्यान या अधिवेशनांतील सर्व व्याख्या-नांत उत्कृष्ट झालें असल्याचें व आपणांस तें फार आवडल्याचा " निरोप पाठविला. लोकांत अफवा पसरली कीं या भाषणामुळें सरकार माझ्यावर खटला चालविणार असून काशींतच मी पकडला जाण्याचा संभव आहे. या अफवेमुळें काशीहून मी देहराडून येथें आपल्या मुलीला भेटण्यास गेलों असतां तेथें माझी खुशाली समजण्याकरितां लाहोरहून धाडली गेलेली तार मला मिळाली. पुढें मी लाहोरला जाऊन पोंचेपर्यंत लोकांची माझ्याविषयींची धास्ती कमी झालेली नव्हती.

---

## २०. मवाळ-जहालांची पहिली सलामी.

१९०६ त साऱ्या हिंदुस्थानांत स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य या त्रयीची चळवळ वर्षभर जोरांत चाललेली होती. मीसुद्धां या त्रयीवर मधूनमधून व्याख्यानें दिलीं व लेख लिहिले. श्री. आठवले हे पंजाबीपत्राचे संपादक असले तरी त्याची बरीचशी जबाबदारी माझ्यावर असल्यामुळें एक प्रकारें तें माझ्याच अखत्यारांत होतें. बहुतेक दररोज सकाळीं शेवटचें प्रूफ तपासण्यासाठीं मी छापखान्यांत जात असें. ज्या लेखामुळें पंजाबीवर खटला भरला गेला, त्या लेखाचीं प्रुफें माझ्या अवलोकनाखालून गेलेलीं नव्हतीं. तीं प्रुफें मला दाखविलीं गेलीं असतीं तर तशा प्रकारचा लेख मी छापूं दिला नसता. पंजाबीपत्र सरकारच्या डोळ्यांत सलत असल्यामुळें पत्रावर लवकरच खटला भरला जाणार आहे अशा अर्थाच्या अफवा लोकांत नेहमीं चालू असत. शेवटीं १९०६ च्या उन्हाळ्यांत लोकांच्या गप्पांना मूर्तस्वरूप प्राप्त झालें व पंजाबीपत्रावर खटला भरला जाऊन लाला जसवंतराय व श्री. आठवले यांच्यावर वारंटें निघालीं. पुढें दोघांचीहि जामिनावर सुटका झाली.

या सालांतील विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे या सालची कॉंग्रेस होय. या वर्षी तिचें अधिवेशन कलकत्ता शहरीं भरलें होतें. बंगालमध्यें दोन पक्ष होते. जहालपक्ष टिळकांना अध्यक्ष करूं इच्छित होता तर मवाळपक्ष

मुंबापुरस्थांच्या अधीन होता. गोखल्यांनासुद्धां या पक्षाची ही कारवाई पसंत नव्हती. जहालपक्षाशिवाय बंगाली आम जनता टिळकांना अध्यक्ष करावें अशा मताची होती. शेवटीं मवाळांनीं मुंबापुरस्थांच्या मसलतीनें दादाभाई नौरोजींना अध्यक्ष करण्याचें ठरवून त्यांना तार केली व उलट तारेनें त्यांची संमति प्राप्त होतांच स्वागतसमितींत पास करून घेण्यापूर्वींच ती त्यांनीं प्रसिद्ध करून टाकली. दादाभाईविषयीं लोकांत अति आदर असल्यामुळें त्यांना अध्यक्षस्थान देण्याचें ठरविल्यास त्याविरुद्ध कोणीं जाणार नाहीं व आपोआप टिळकांची ब्याद टळेल असा त्यांचा अंतस्थ हेतु होता. सुदैवानें दादाभाईची कबुली मिळतांच त्यांना फारच अवसान चढलें. दादाभाईची कबुली मिळविण्याकरितां कदाचित् ' कॉंग्रेस संकटांत सांपडूं पहात आहे तरी आपण अध्यक्षस्थान स्वीकारून तिचा बचाव करावा ' असेंहि लिहून धाडलें गेलें असण्याचा संभव आहे. मवाळांच्या या कारवाईचा जहालांना चेव आला. या दिवसांत अरविंद घोष राष्ट्रीय कॉलेजाचे मुख्याध्यापक असून आपल्या मतांचा प्रचार करीत असत. शेवटीं जहालपक्षानें दादाभाईंच्या अध्यक्षत्वास आपली संमति दिली.

या अधिवेशनास पंजाबांतून बरेचसे प्रतिनिधी आलेले होते. यांत सुप्रसिद्ध लाला शादीलाल बॅरिस्टरहि होते. पंजाबी प्रतिनिधींची संख्या अंदाजीं ६०–७० (कदाचित् ८० सुद्धां असेल) असावी असें मला वाटतें. शादीलाल व मी एकाच ठिकाणीं उतरलों होतों. याच सुमारास एका व्याख्यानांत लॉर्ड मिंटो यांनीं सात्विक स्वदेशीचें समर्थन करून बहिष्काराचें मात्र खंडन केलें. कदाचित् कॉंग्रेसच्या वेळीं भरलेलें प्रदर्शन उघडतांना त्यांनीं जें भाषण केलें तेंहि हें असूं शकेल. कॉंग्रेसचे वेळीं भरलेलें हें प्रदर्शन लॉर्ड मिंटोच्या हस्तें उघडलें गेल्यामुळें बंगाली तरुण रागावले होते. मी कलकत्त्यास पोंचलों त्याच दिवशीं संध्याकाळीं बेडन चौकांत मिंटोसाहेबांच्या या व्याख्यानाचा परामर्ष घेण्याकरितां एक सभा भरणार असल्याचें कळलें. प्रत्यक्ष सभेची जाहिरात पहातां या सभेचा मला अध्यक्ष केलें असल्याचें कळलें. मला न विचारतां माझें नांव अध्यक्षस्थानीं घालून तशा जाहिरातीहि वांटल्या गेलेल्या पाहून मला एक प्रकारें राग आला व हा रोष प्रकट करण्याकरितां मी सी. आर. दास यांच्या घरीं पाल व टिळक होते तेथें गेलों. त्या ठिकाणीं पोंचतांच ही सर्व पालबाबूंची कारवाई असल्याचें आढळून आलें. शेवटीं बऱ्याच आग्रहानंतर ऐनवेळीं सभेचा बोजवारा उडविणें बरें नाहीं

असें वाटून मी अध्यक्ष होण्याचें कबूल केलें. संध्याकाळीं सभेला हजारों लोक आले होते व कैक तासपर्यंत ती चालली होती. एकंदरींत ही सभा कल्पनातीत यशस्वितेनें पार पडली. जहालपक्षानें आपला स्वतंत्र तंबू ठोकून तेथें टिळक, खापर्डे, बिपिनचंद्र पाल, अरविंद घोष इत्यादींच्या व्याख्यानांचा कार्यक्रम चालू ठेविला. या सभांना मीसुद्धां एकदोनदां गेलों, पण भाषण मात्र केलें नाहीं.

जहालपक्षानें माझ्या सन्मानार्थ एक दोन मेजवान्या दिल्या. या वेळीं मी त्यांना सांगितलें कीं "सगळा उत्साह बाह्यावडंबरांत घालविणें चांगलें नाहीं. आमचे शत्रू बलवान आहेत. याकरितां आमची चळवळ अयशस्वी होऊन त्यांना आमची गळचेपी करण्याची संधी मिळणार नाहीं अशा प्रकारें चौफेर नजर ठेवून आम्हांला सावधानतेनें आपलें पाऊल पुढें टाकलें पाहिजे." माझ्या समजुती-प्रमाणें माझा हा सावधानतेचा उपदेश बंगाली जहालांना पसंत नव्हता व त्यामुळें त्यांनीं अशा प्रकारच्या हळुवार पद्धतीचा अवलंब करण्याविषयीं उपदेश करणाऱ्या इतरांच्या व्याख्यानांकडेहि फारसें लक्ष दिलें नाहीं. खुद्द कॉंग्रेसमध्यें-सुद्धां बरीच गडबड माजून राहिलेली होती. भर अधिवेशनांत फिरोजशहा मेहतांवर खुल्लम खुल्ला टीकेचा भडिमार केला गेला. गोखलेसुद्धां या भडिमारांतून बचले गेले नाहींत. स्वदेशीच्या ठरावावर तर फारच रण माजलें. दोन्ही बाजूनें जोरदार भाषणें झालीं. जहाल पक्षानें पंडित मदनमोहन मालवियांचीहि तमा ठेविली नाहीं. शाब्दिक मतभेदामुळें चाललेली आपसांतील ही लाथाळी माझ्यानें स्वस्थ-पणें पहावेना. मूळ ठरावांत मी थोडासा फरक सुचविला. एवढ्यानेंहि जहाल पक्षाचें समाधान झालें नाहीं. पण बदलेला ठराव मतास पडतां तो बहुमतानें पास झाला. ठराव पास होतांच बिपिनचंद्र पाल व त्यांच्या पक्षाची मंडळी मंडपां-तून उठून गेली. मवाळपक्षाचे लोक माझ्या फरकानें खुष झाले व ऐन वेळीं बाजू राखली असें त्यांनीं बोलून दाखविलें. या अधिवेशनांत मुंबापुरस्थ नेत्यांशीं माझा पुन्हां एकदां खटका उडाला, पण फारशी गडबड झाली नाहीं. या वेळीं दुर्दैवानें दादाभाई नौरोजी ऐवजीं दुसरा एखादा अध्यक्ष असता व उपरिनिर्दिष्ट फरक मी त्या ठरावांत केला नसता तर १९०७ सालीं सुरतेंत घडलेला प्रकार याच ठिकाणीं याच वेळीं घडला असता.

## २१. गोखल्यांचें लाहोरांतील अपूर्व स्वागत.

१९०६ च्या शेवटीं पंजाबप्रांतांत बरीच खळबळ उडालेली होती. यावेळीं प्रांतिक कौंसिलांत कायद्याचें स्वरूप देण्याकरितां दोन ठराव मांडले गेले होते. यापैकीं एक लायलपूर येथील नव्या वसाहतीसंबंधीं होता व दुसरा जमिनीच्या मालकी हक्कांतील फरकासंबंधाचा होता. पहिल्या ठरावाविरुद्ध हिंदु, मुसलमान, शिख इत्यादि सर्व जनता होती. दुसऱ्या ठरावाला मात्र फक्त हिंदूंचाच तेवढा विरोध होता. या दोन्ही ठरावांविरुद्ध मी पंजाबीपत्रांत लेख लिहिले. पंजाबीपत्रावर खटला केला गेला असतांहि त्याच्या लेखांत पूर्वींचाच जोरदारपणा राहिलेला आहे हें पाहून एकंदर जनता पंजाबीवर खुष होती. सरकारी गुप्तचरांनीं व इतर देशद्रोह्यांनीं रा. आठवल्यांना खटल्यांतील लेखाची जबाबदारी जसवंतरायां-वर टाकण्यास परोपरीनें सांगितलें, परंतु आठवल्यांनीं तसें करण्याचें साफ नाकारलें. कलकत्त्याच्या कॉंग्रेसहून परत आल्यावेळीं खटल्याचें काम संपत आलें होतें. लाला जसवंतरायांनीं आपल्या लेखी जबानींत लेखाची जिम्मे-वारी आपल्यावर असून आपल्याच संमतीनें तो प्रसिद्ध केला गेला असें

नमूद केलें होतें. यावेळीं अखिल पंजाबी लोकांचें लक्ष या खटल्याकडे लागून राहिलें होतें. ज्या लेखामुळें हा खटला भरला गेला तो लेख एका मुसलमान शिपायाच्या असाधारण मृत्यूमुळें लिहिला गेला असल्यानें व पंजाबीच्या धोरणांत हिंदुमुसलमान असा भेदभाव नसल्यामुळें मुसलमान लोकांतहि पंजाबीसंबंधानें आपलेपणा उत्पन्न झालेला होता. खटल्यांतील लेखाच्या विधानांच्या सत्यतेविषयीं पंजाबी लोकांना तरी कसल्याच प्रकारची शंका नव्हती. या एकंदर परिस्थितीमुळें १९०७ सालच्या पहिल्या दोन महिन्यांत पंजाबांत राजकीय चळवळीला बराच जोर आलेला होता व ठिकठिकाणीं सभा भरवून लोक सरकारी घोरणाविषयीं निषेधप्रदर्शक ठराव पास करीत होते. मीसुद्धां या वेळीं कैक ठिकाणीं फिरलों व स्वदेशी, बहिष्कार व स्वराज्य या त्रयीवर व्याख्यानें दिलीं.

याच सुमारास गोखले उत्तर हिंदुस्थानच्या दौऱ्यावर होते व निरनिराळ्या ठिकाणीं त्यांचें मोठ्या समारंभानें स्वागत केलें जात होतें. या वेळीं साऱ्या देशांत एकप्रकारचें नवीन वातावरण निर्माण झालेलें दिसत होतें. माझ्या सांगण्यावरून इंडियन असोसिएशननें गोखल्यांना पंजाबांत येण्याकरितां आमंत्रण दिलें. या वेळीं इंडियन असोसिएशनचा मी अध्यक्ष होतों. योग असा आला कीं ज्या दिवशीं जिल्हा मॅजिस्ट्रेटनें पंजाबीवरील खटल्याचा निकाल सांगितला, त्याच दिवशीं गोखल्यांचें लाहोर शहरीं आगमन झालें. या निकालानें जसवंतरायांना दोन वर्षें सक्तमजुरीची व आठवल्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. हा निकाल दहा वाजण्याच्या सुमारास दिला गेला. खटल्याचा निकाल ऐकण्याकरितां कोर्टाच्या आवारांत हजारों लोक जमले होते. निकाल होतांच पोलिसांनीं दोघांना गाडींत घातलें व गाडी चालू झाली. गाडी चालली असतांना कांहीं लोक गाडीमागें धांवत जाऊं लागले तर कांहीं लोक टाळ्या वाजवून त्यांचें अभिनंदन करूं लागले. ज्या रस्त्यानें ही गाडी गेली त्या रस्त्यावरील घरांतून यांच्यावर फुलांचा वर्षाव केला गेला. निकाल लागतांच मी अपील दाखल करून सेशन कोर्टांत जामिनावर सुटका होण्याचा अर्ज गुदरला. माझा अर्ज मंजूर होऊन त्यांच्या सुटकेचें फर्मान माझ्या स्वाधीन केलें गेलें व तें घेऊन मी सीधा जेलकडे रवाना झालों. दरम्यान् लोकांनीं जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या बंगल्याची थोडीशी नासधूस केली व त्यामुळें सिव्हिल स्टेशनावर गडबड उडाली. कांहीं तरुणांनीं पायीं जाणाऱ्या कित्येक इंग्रजांना चोपून काढलें तर गाडींतून

जाणारांवर कांहीं लोकांनीं चिखल फेंकला. दुसऱ्या कांहींना नुसता शिव्याशापांचा प्रसाद मिळून ते सुटले गेले. तात्पर्य त्या दिवसाचें लोकांचें वर्तन इंग्रजांच्या दृष्टीनें छोट्याशा बंडासारखें होतें. फर्मानाबरहुकूम जसवंतराय व आठवले यांची सुटका झाली. जेलबाहेर लोकांची तुफान गर्दी जमलेली होती. या गर्दींत वयोवृद्ध लाला ईश्वरदास हेहि होते. परत येतांना लोकांचा हा समूह जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या बंगल्यासमोर येतांच त्यानें भीषण स्वरूप धारण केलें. लोकांना मी जेमतेम शांत केलें. पुढें ही गर्दी लॉरेन्स बागेजवळ येतांच एक युरोपियन फिटन गाडींतून जात होता. हा गृहस्थ सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेटचा बातमीदार होता. या पत्रावर लोकांचा पूर्वीपासूनच राग असल्यामुळें लोकांच्या दृष्टीस त्या पत्राचा हा बातमीदार पडतांच लोक त्याच्यावर तुटून पडले. याच संधीस माझी त्या बाजूला नजर गेली व मी ओरडून म्हणालों, “ एका इसमावर इतक्या लोकांनीं हल्ला करावा ही मोठ्या शरमेची गोष्ट आहे ” माझे शब्द तरुणांना रुचले नाहींत; पण त्या बातमीदाराची मात्र सुटका झाली. बातमीदार जातांच हे लोक माझ्याकडे वळून मला वेंचकुल्या दाखवूं लागले.

चाराच्या सुमारास गोखल्यांची स्वारी स्टेशनावर उतरली. स्टेशनाबाहेर चारी बाजूस लोकांची तुफान गर्दी जमलेली होती. लोकांत पंजाबीच्या खटल्याविषयीं चर्चा चाललेली होती. गोखले गाडींत बसतांच लोकांच्या उत्साहाला जणूं भरती आली व चारी दिशा निरनिराळ्या प्रकारच्या जयध्वनींनीं दुमदुमून गेल्या.

गाडी चालू होतांच लोकांनीं गाडीचे घोडे सोडले व स्वतःच ती ओढूं लागले. गाडीचे घोडे सोडले जातांच मी खालीं उतरलों व पायींच गाडीबरोबर चालूं लागलों. अशा प्रकारें मिरवणूक थोडीशी गेल्यावर गाडींत बसण्याचा गोखल्यांनीं मला आग्रह केला व नाइलास्तव मी पुन्हां गाडींत बसलों. याप्रमाणें शहरभर मिरवणूक मिरविली जाऊन ती अनारकली भागांत आली. या ठिकाणीं मिरवणुकीबरोबर एकंदर लोक किती होते हें सांगणें अशक्य आहे. याच ठिकाणीं जसवंतराय व आठवले होते आणि त्यांच्या सभोंवतीं बराच घोळका जमलेला होता. आमची गाडी येथें येतांच लोकांनीं जबरदस्तीनें त्या दोघांना उचलून आमच्या गाडींत बसविलें. लोकांचें हें करणें गोखल्यांना आवडलें नाहीं; पण लोकाग्रहापुढें करणार काय ? लाहोरशहरीं गोखले तीन दिवस राहिले. तिन्ही

दिवस सारें शहर उत्साहानें भरून गेलें होतें. या वेळच्या एका सभेंत ते म्हणाले, "I place no limitation on ambition of my people. We want to be in our own country what others are in theirs." (माझ्या देशबांधवांच्या आकांक्षांना कसल्याच प्रकारची मर्यादा घालण्याची माझी इच्छा नाहीं. इतर लोक ज्याप्रमाणें आपल्या देशांत नांदत आहेत त्याचप्रमाणें आम्हांसही या देशांत नांदतां यावें एवढीच आमची मनीषा आहे.) या वेळीं झालेल्या सभांपैकीं एकीचा मी अध्यक्ष होतों व त्या वेळीं आपल्या भाषणांत महाराज रणजितसिंहांच्या कालाचा उल्लेख केला. सभास्थानीं महाराजांच्या दोन नाती राजकुमारी सोफिया व राजकुमारी बैबा दिलीपसिंह या उपस्थित होत्या. वृद्ध पुढाऱ्यांना यांची उपस्थिति पसंत नव्हती, परंतु तरुण मात्र खुष होते. गोखल्यांच्या आगमनानें पंजाबी लोकांच्या उत्साहांत पुष्कळ भर पडली व अखिल पंजाब खडबडून जागा झाला.

२२. ## सरदार अजीतसिंह

या ठिकाणीं सरदार अजीतसिंहांविषयीं थोडेंसें लिहिणें योग्य आहे. सरदारसाहेब १८९७-९८ सालापूर्वी जालंधर येथील अँग्लो-संस्कृत शाळेंत शिकत होते. यांचे बंधु किसनसिंहहि यांच्याच बरोबर शिकत होते. सरदारसाहेब स्वर्गीय लाला सुंदरदासजींच्या प्रिय शिष्यांपैकीं होते व सुंदरदासजींनींच यांच्यांत पहिल्या प्रथम स्वदेशभक्तीचें बीजारोपण केलें. किसनसिंहांनीं पुढें लौकरच शाळेला रामराम ठोकला, पण सरदारसाहेब मात्र एंट्रंस पास झाले. १८९७ सालच्या दुष्काळांत किसनसिंहांशीं माझी पहिली मुलाखत झाली. दुष्काळपीडित लोकांना मदत देण्याकरितां व मिळतील ते अनाथ लोक घेऊन येण्याकरितां यांना नागपूर जबलपूर शहरांकडे पाठविलें गेलें व त्या ठिकाणीं यांनीं चांगलें काम बजाविलें. लाहोरास येतांना हे बरेच लोक बरोबर घेऊन आले. लाहोरास आल्यानंतर यांना एका नव्या अनाथालयाचे अध्यक्ष केलें गेलें. या वेळीं अजीतसिंह दयानंद कॉलेजांत शिकत होते. अजीतसिंहांचा स्वभाव फार खर्चीक होता. पुढें थोड्याच दिवसांत त्यांनीं शिक्षण सोडलें व वारंवार आपल्या भावाकडे येऊं लागले. या वेळीं मधून मधून अजीतसिंहांना मी पाहिलेलें आहे, पण प्रत्यक्ष असा संबंध मात्र केव्हांच

आला नाहीं. किसनसिंहांशीं मात्र चांगली जानपछान होती. दोघां बंधूंत किसन-सिंहच मला आवडत असत. अजीतसिंह सार्वजनिक वादविवादांत भाग घेत व वर्तमानपत्रांतून लेख लिहीत आणि इंग्रज लोकांना फार्शी, उर्दू व हिंदी शिकवून ते आपला खर्च भागवीत असत. अजमासें १९०० च्या सुरवातीला अनाथालयाशीं असलेला माझा संबंध मी सोडला व रायबहादुर बक्षी त्याचे मंत्री झाले.

१९०६ सालच्या कॉंग्रेसमध्यें अजीतसिंहांना मी जहाल पक्षाच्या सभांत पाहिलें. पुढें १९०७ सालीं त्यांनीं सूफी अम्बाप्रसाद यांच्या सल्ल्यानें एक संस्था स्थापिली व तिला 'भारतमाता' असें नांव दिलें. या संस्थेमार्फत भरणाऱ्या सभांतून अजीतसिंह व इतर नवयुवक इंग्रजी शासनावर उघडपणें कडक टीका करून जहाल पक्षाच्या तत्वांचें प्रतिपादन करीत असत. या दिवसांत कांहीं वेळां अजीतसिंह माझ्याकडे आले व आर्थिक साहाय्य मागूं लागले. पण आर्थिक साहाय्य देण्याकरितां मी कांहीं अटी घातल्या व त्या त्यांच्याकडून पुऱ्या होऊं शकल्या नाहींत. गोखल्यांच्या आगमनानें यांच्या कार्याला जोर आला. नवीन वसाहतीच्या कायद्यामुळें व कालव्याच्या करवाढीमुळें—जो याच सुमारास वाढविला गेला होता—यांना जमीनदार लोकांत मिसळण्याची संधी मिळाली व त्यामुळें यांचें प्रस्थ वाढलें.

करवाढीनें व यांच्या प्रचारानें जमीनदारांत असंतोष उत्पन्न झाला व पुढें काय करावें याविषयीं सल्ला घेण्याकरितां ते माझ्याकडे येऊं लागले. रायबहादुर रामशरणदास व मुहम्मद शफी यांचा सल्ला घेण्यास मी त्यांना सुचविलें. एक वेळ व्हाइसरॉयांना पाठविण्याच्या तारेचा मसुदाहि करून दिला. परंतु वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याच्या किंवा इतर प्रकारें लेखनसाहाय्य करण्यापलीकडे नवीन वसाहतीच्या कायद्याच्या बाबतींत माझ्याकडून विशेष कांहीं होऊं शकलें नाहीं. याप्रमाणें या कायद्याविरुद्ध माझ्या हातून म्हणण्यासारखी चळवळ झाली नसली तरी स्वदेशी व बहिष्कार यांच्या प्रचारार्थ अंबाला, अमृतसर व फिरोजपूर इत्यादि ठिकाणीं व्याख्यानें दिलीं व त्यामुळें फिरोजपूर व अंबाला येथील वकिलांनीं बिगारी-संबंधीं हस्तपत्रिका काढून त्या सर्वसाधारण जनतेंत वांटल्या.

ठिकठिकाणाहून व्याख्यानें देण्याकरितां मला सारखीं आमंत्रणें येऊं लागलीं; पण मी तीं कांहीं ना कांहीं सबब सांगून टाळूं लागलों. दरम्यान अजीतसिंहांनीं दौरा

काढला व त्यांचीं ठिकठिकाणीं भाषणें होऊं लागून हजारों लोक तीं ऐकण्यास जमूं लागले. अजीतसिंहाच्या या दौऱ्यानें लोकांचा उत्साह द्विगुणित झाला. अजीतसिंहांव्यतिरिक्त जमीनदारपत्राचे संपादक व चौधरी शहाबुद्दीन वकील हे दोघे मोठ्या उत्साहानें नवीन वसाहतीचा कायदा रद्द व्हावा म्हणून खटपट करीत होते. यांच्याहि व्याख्यानाला बराच मोठा समुदाय जमत असे. चौधरी-साहेबांनीं पंजाबी भाषेंत एक कविता तयार केली होती व ती ते प्रत्येक सभेंतून स्वतः म्हणून दाखवीत असत. लोकांना ती प्रिय झाली होती व तिचा त्यांच्यावर परिणामहि झाला होता. असो. शेवटीं मार्च महिन्याच्या अखेरीस किंवा एप्रिल महिन्याच्या सुरवातीस लायलपुराहून मला बोलाविलें गेलें. मीसुद्धां एकदोन वकिलांना लिहिलें कीं लोकांची सहानुभूति व विश्वास संपादण्याची हीच संधी आहे. हें आमंत्रण जमीनदार असोसिएशनमार्फत आलेलें होतें. तरीसुद्धां मी एकदोन आठवडे चालढकल केली; परंतु शहाबुद्दीन वकील माझ्याकडे आले व येण्याकरितां आग्रह करूं लागले. याच संधीस तेथें गाय बैल इत्यादि पशूंचें प्रदर्शन भरावयाचें असल्यामुळें निरनिराळ्या ठिकाणचे लोक अनायासें लायलपूर येथें जमण्याचा संभव होता. अशा या सहजासहजीं लाभलेल्या अमूल्य संधीचा फायदा घेण्यासाठीं शहाबुद्दीनसाहेब तेथें वसाहतीविषयीं होऊं घातलेल्या कायद्याच्या निषेधार्थ एक प्रचंड सभा भरवूं इच्छित होते व त्याकरितां मला बोलाविण्यासाठीं मुद्दाम लाहोरास आले होते. शेवटीं त्यांना नाखुष करणें बरें न वाटून मी तेथें जाण्याचा निश्चय केला.

ता. २४ एप्रिल रोजीं रायबहादूर सुखदयाळ, बक्षी टेकचंद, पं. रामभजदत्त चौधरी व पंजाबीपत्राचे मालक लाला जसवंतराय यांच्यासह लायलपूर येथें जाण्यासाठीं रात्रौ गाडींत बसलों. सकाळींच लायलपूर स्टेशनावर आमची गाडी दाखल झाली. स्टेशनाबाहेर लोकांची बरीच गर्दी जमलेली होती. स्टेशनाबाहेर येतांच मला व लाला जसवंतराय यांना लोकांनीं एका गाडींत बसविलें व घोडे सोडून टाकून स्वतः ती ओढून नेऊं लागले. गाडी चालू होतांच वंदे मातरम्च्या घोषानें सारें दिग्मंडल निनादित झालें. आमची गाडी थोड्या अंतरावर जातांच मी गाडींतून उडी टाकली, परंतु जसवंतरायांना लोक खालीं उतरूं देतना. पुढें मी व माझे सोबती रामचंद्र मनचंदा वकील यांच्या घरीं उतरलों व

तेथेंच आमचें जेवणखाण झालें. कांहीं वेळानें चौधरी शहाबुद्दीन वकील व जमीनदार पत्राचे संपादक सिराजुद्दीन व एक सरकारपक्षीय जिल्हाधिकारी आम्हाला भेटण्याकरितां आले. थोडा वेळ गप्पा गोष्टी होऊन आम्हीं सर्व सभास्थानीं गेलों. आमच्या जाण्यापूर्वींच तेथें सरदार अजीतसिंहांचें भाषण चालू झालेलें होतें. आम्ही जातांच त्यांना आपलें भाषण संपविण्यास सांगून सभेच्या कामाला सुरवात केली. एक पेन्शनर लष्करी अधिकारी सभेच्या अध्यक्षस्थानीं नियुक्त केला गेला. अध्यक्षांचें भाषण चांगलें झालें. माझी पाळी येतांच मी म्हणालों " हिंदुस्थान ही आमच्या बापजाद्यांपासून चालत आलेली अशी आमची मालकीची भूमी आहे व आमच्यापासून ती हिसकावून घेण्याची कोणाचीहि प्राज्ञा नाहीं." बांके दयाळांनीं आपली सुप्रसिद्ध "पगडी संभाळ ओ जट्टा" नांवाची कविता सभेंत म्हणून दाखविली. या कवितेनें लोकांत आवेश चढला. सियालकोट येथील एका मौलवींनीं एक पंजाबी कवित्त गाइलें. शहाबुद्दीन व रामभजदत्तांचींसुद्धां भाषणें झालीं. शेवटीं लाहोराहून छापून आणलेल्या अर्जाचा मसुदा वाचून दाखविला जाऊन पास करून घेतला गेला. होऊं घातलेल्या कायद्याविरुद्ध लोकांच्या ज्या तक्रारी होत्या त्यांना उत्तर म्हणून सरकारमार्फत छापली गेलेली एक हस्तपत्रिका याच वेळीं सभास्थानीं वांटली गेली व तिलाहि कांहीं वक्त्यांनीं उत्तर देऊन सरकारचा हा कायदा लोकांना कसा भोंवणार आहे हें दाखवून दिलें. रायबहादुर हरीचंद आपल्या मुलांभाच्यांसह सभेंत हजर होते व सभेचें कामकाज अवलोकन करीत होते. आमच्या मतें अधिकाऱ्यांनींच सभेंत काय काय चालतें तें पहाण्याकरितां मुद्दाम त्यांना पाठविलें असावें. रायबहादुरांखेरीज स्वतः डेप्युटी कमिशनर व पोलिस कप्तान बाहेर उभे राहून सभेची कार्यवाही अवलोकन करीत होते. पण लोकांचें कोणाकडेच लक्ष नव्हतें. या अधिकाऱ्यांनींहि नुसतें पहाण्यापलीकडे विशेष कांहीं केलें नाहीं. शीख व मुसलमान जमीनदार या कायद्यानें क्षुब्ध झाले होते व या वेळीं पोलीस जर गडबड करते तर भलतीच परिस्थिति उत्पन्न होण्याचा संभव होता.

याप्रमाणें सभेचें काम पुरें होत आल्याचें पाहून अजीतसिंह बोलण्यासाठीं उभे राहिले. सभामंचकावर बसलेल्यांपैकीं बहुतेक लोकांची इच्छा त्यांना बोलूं देऊं नये अशी होती. परंतु रामभजदत्तांनीं त्यांना बोलूं द्यावें असा आग्रह

धरिला. शेवटीं अजीतसिंहांचे भाषणास सुरवात झाली. त्यांचें भाषण अति जहाल होतें. अध्यक्षांनीं कैकदां त्यांचें भाषण बंद पाडण्याचा विचार केला, पण रामभजदत्त प्रत्येक वेळीं आडवे आले. शेवटीं कोणालाहि न पुसतां सभेचें काम समाप्त झाल्याचें अध्यक्षांनीं जाहीर केलें. या वेळीं श्रोतृसमुदाय अध्यक्षांच्या आंवाक्याबाहेर गेलेला होता. लोक हालत नाहींसे पाहून व अजीतसिंहांचें भाषण संपत नाहींसें पाहून अध्यक्ष व आम्ही सभा सोडून निघालों. तरीहि लोकांच्या हालण्याचें चिन्ह दिसेना. इकडे अजीतसिंहांचें भाषण चालूच होतें. असो. त्याच रात्रीं आम्ही लाहोरास येण्यासाठीं गाडींत बसलों. सभेंत जो अर्ज वाचून दाखविला जाऊन पास करून घेतला गेला होता, त्याचा मसुदा शहाबुद्दीन वकिलांनीं तयार केला होता. मूळचा मसुदा भारी कडक असल्यामुळें मियां मुहम्मद शफींनीं त्यांत फेरफार करून माझ्याकडे दिला. हा परिवर्तित मसुदासुद्धां आवश्यकतेपेक्षां कडक आहे असें मला वाटलें व त्यांत मी बरेच फेरफार केले.

लायलपूरच्या सभेपूर्वीं थोडे दिवस आधीं अजीतसिंह रावळपिंडीला गेले होते व तेथें त्यांचीं व्याख्यानेंही झालीं होतीं. रावळपिंडी येथें भरलेल्या या सभांपैकीं एका सभेचे लाला गुरुदासराम साहनी हे अध्यक्ष होते. या सभेच्या सूचनार्थ जी हस्तपत्रिका वांटली गेली तीवर ज्यांचीं नांवें होतीं त्यांत लाला अमोलकराम वकील यांचेंहि नांव होतें. भाषण करणारांत लाला हंसराज वकील, पं. जानकीनाथ कौल बॅरिस्टर व खजानसिंह बॅरिस्टर हे होते. सभा झाल्यानंतर डेप्युटी कमिशनरांनीं या पांची गृहस्थांवर " या सभेंत भाग घेण्याच्या अपराधास्तव तुमची वकिलीची किंवा बॅरिस्टरीची सनद रद्द कां करूं नये?" अशा अर्थाची नोटीस बजाविली. लाला हंसराज व लाला अमोलकराम हे पंजाबांतील लोकप्रिय व सुप्रसिद्ध पुढाऱ्यांपैकीं असल्यामुळें या नोटिशीनें अखिल पंजाबांत खळबळ उडाली. नोटिशीचें उत्तर देण्याकरितां जो दिवस नियत केला गेला होता, त्याच्या आदल्या दिवशीं मी रावळपिंडीला गेलों. ज्या वेळीं मी रावळपिंडीच्या स्टेशनावर उतरलों, त्या वेळीं तेथें लाला गुरुदासराम साहनी—ज्यांच्यावर माझें फार प्रेम होतें—हजर होते. त्यांच्या गाडींत बसून आम्ही उभयतां दुसऱ्या एका बॅरिस्टरांच्या घरीं गेलों. या ठिकाणीं जणूं एक छोटीशी सभाच भरलेली होती. या ठिकाणीं रायबहादुर मैयादास साहनी, लाला हंसराज साहनी व त्यांचे पुत्र

बोधराज बॅरिस्टर, पंडित जानकीनाथ इत्यादि इत्यादि बसलेले होते व उद्यां काय करावें याविषयीं विचार करीत होते. थोड्याच अवधींत मला समजलें कीं उद्यां या विचित्र खटल्यानिमित्त साऱ्या शहरांत हडताळ पाळला जाणार असून रेल्वे, गुदाम व बाजार या ठिकाणचेंहि काम बंद रहाणार आहे. ही वार्ता ऐकून मला फार संतोष वाटला; परंतु मीं इतकेंच म्हणालों कीं, "हडताळ पाडावयाचा असल्यास तो अर्धवट पडणार नाहीं याविषयीं काळजी घ्या." नोटिशीच्या उत्तराच्या बाबतींत बराच खल होऊन उत्तराचा खर्डा तयार केला गेला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं दहा वाजतां आम्ही कोर्टांत गेलों. कोर्टाचें आवार लोकांनीं खच्चून भरून गेलें होतें. गर्दी इतकी झालेली होती कीं आजूबाजूस फिरकणेंसुद्धां शक्य नव्हतें. डेप्युटी कमिशनर वेळेवर न आल्यामुळें जसजसा उशीर होऊं लागला तसतशी लोकांची गर्दी वाढूं लागली. अंदाजीं वीस हजार किंवा याहूनहि जास्त लोक त्या दिवशीं कोर्टाजवळ जमले असावे. शेवटीं बारा वाजण्याच्या सुमारास डेप्युटी कमिशनर आले व येतांच त्यांनीं मि. अजीज अहमद बॅरिस्टरांना व पांची अभियुक्तांना बोलावून पंजाब सरकारच्या आज्ञेवरून नोटीशीचें काम तहकूब केल्याचें सांगितलें. खटला रहित झाल्याची बातमी साऱ्या लोकसमुदायांत बिजली-प्रमाणें पसरली व लोक हर्षानें टाळया वाजवूं लागले.

कांहीं लोक वकिलांच्या खोलींत येऊन मी कांहीं बोलावें म्हणून आग्रह करूं लागले; परंतु मी तसें करण्याचें नाकारिलें. पुढें मिरवणुकींत मी भाग घ्यावा म्हणून त्यांनीं इच्छा प्रकट केली, पण त्यांचें हेंहि म्हणणें मी नाकबूल केलें. थोड्याच अवधींत बातमी आली कीं डेप्युटी कमिशनर व जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या बंगल्याच्या आवारांत लोक घुसून नासधूस करीत आहेत. लगेच लोकांना शांत करण्यासाठीं कांहीं इसम मी रवाना केले. जास्त चौकशी अंतीं पोलीसच लोकांना गडबड करण्याकरितां उत्तेजित करीत आहेत असें कळलें. रस्त्यानें जाणाऱ्या साहेबांना कांहीं लोकांनीं थोडा फार चोप दिला. थोड्याच अवधींत या एकंदर प्रकाराला भलतेंच स्वरूप प्राप्त झालें. पुढें कांहीं वेळानें बूटासिंहाच्या कारखान्यांत लोक घुसले असल्याचें कळलें. बूटासिंहाला लोक देशद्रोही व या साऱ्या उपद्रवाचा कर्ताधर्ता समजत होते.

लोकांच्या आग्रहावरून संध्याकाळीं बाजाराच्या आवारांत मी व्याख्यान देण्याचें कबूल केलें होतें, परंतु आतांपर्यंत झालेल्या धामधुमीनें सायंकालचें

व्याख्यान रहित करण्याचें ठरविलें. आम्ही अजूनपर्यंत कोर्टांतच होतों. इतक्यांत आणखी बातमी आली कीं लोकांची धांदल मोडण्याकरितां व उपद्यापी लोकांना पकडण्याकरितां फौज येत आहे. याच सोबत हुकूम मिळाला असतांहि एका पठाणी पलटणीनें तयारी करण्यास फाजील वेळ लावला असेंहि कळलें. इतक्यांत एक पठाण माझ्याजवळ आला व म्हणाला, "फलाणी पलटण आपल्या हुकुमाची अपेक्षा करीत आहे." यावर कांहीं न बोलतां मी फक्त हंसलों. माझा समज हा पठाण सरकारी गुप्तहेर असावा, व कोणत्या तरी मिषानें मला फंदांत पाडण्याचा त्याचा बेत असावा. पलटण येतांच लोकांची पांगापांग झाली व सारा कोलाहल शांत झाला. या दरम्यान बरेच लोक पकडले गेले व पोलीसकोठडींत बंद केले गेले. या बंदिवान् लोकांत शहरांतील कांहीं बडे व कांहीं सुशिक्षित तरुणही होते. क्षणोक्षणीं काय काय घडत आहे याची बित्तंबातमी आम्हाला मिळत होती; पण कळून सवरूनसुद्धां आमच्या हातून काय होणार होतें? लाला हंसराज साहनीची प्रकति ठीक नसल्यामुळें ते घरीं गेले व स्वस्थ पडून राहिले. असो. संध्याकाळीं सभेची वेळ जवळ येतांच आम्ही लाला हंसराज साहनींकडे जमलों. साहनींची इच्छा सभेला येण्याची नव्हती; परंतु अशा वेळीं सभेला न जाणें म्हणजे नसता घाबरटपणा पदरीं घेणें आहे असें मी त्यांना सांगितलें. दुसरें झालेल्या प्रकाराविषयीं खेद प्रदर्शित करण्याला व लोकांनाहि शांत करण्याला ही एक उत्तम संधी आहे असेंहि बोललों. इतक्यांत असें कळलें कीं सभेचा मार्ग डेप्युटी कमिशनर (Agnew) व पोलीस कप्तान यांनीं इतर पोलिसांच्या मदतीनें अडवून धरला आहे. परंतु या बातमीनें न घाबरतां आम्ही सर्व मिळून सभास्थानाकडे निघालों. रस्त्यांत एक पोलिस हेर भेटला. या हेरानें डेप्युटी कमिशनर आम्हाला बोलावीत असल्याचें सांगितलें. निरोपानुसार आम्ही डेप्युटी कमिशनरांजवळ गेलों. कमिशनरसाहेब एका खुर्चीवर बसले होते व समोर पोलिस कप्तान उभा असून त्यांच्या आजूबाजूला इकडे तिकडे हिंदी पोलिस ऑफिसरांची गर्दी जमलेली होती. डेप्युटी कमिशनर म्हणाले, "आजची सभा भरली जाऊं नये व व्याख्यानहि दिलें जाऊं नये असा माझा हुकूम आहे. याउप्पर माझा हुकूम मोडून सभा भरविली गेली तर तिची जबाबदारी आपणांवर राहील." यावर लाला हंसराज म्हणाले, "आपला हुकूम मोडण्याचा आमचा उद्देश नाहीं. झालेल्या प्रकाराबद्दल आम्हांला भारी खेद वाटतो." यानंतर

पोलिस कप्तान माझ्याकडे वळून व माझ्याकडे निर्देश करून म्हणाला, "जर सभा झाली तर आपण एकटेच जबाबदार धरले जाल." मी म्हणालों, "आपल्या उपदेशाची मला जरुरी नाहीं. देवाच्या दयेनें मी थोडा फार कायदा जाणतों व मला आपल्या जबाबदारीची जाणीव आहे." हे शब्द ऐकतांच डेप्युटी कमिशनर संतापानें लाल झाले व म्हणाले, "चालते व्हा, असल्या प्रकारचीं उत्तरें ऐकण्याची आमची इच्छा नाहीं."

अखेरीस आम्ही परत फिरलों व जमलेल्या लोकांना अधिकाऱ्यांनीं सभेला बंदी केली असल्याचें कळवून घरोघर जाण्यास सांगितलें. या दिवशीं दुसरें विशेष कांहीं घडलें नाहीं. दुसऱ्या दिवशीं जेवून आम्ही कोर्टांत गेलों. लाला हंसराज व लाला अमोलकराय आले नव्हते. कोर्टांत थोडा वेळ राहून मी लाला गुरुदासराम यांच्या घरीं गेलों व स्वस्थ झोंपीं गेलों. सुमारें तीन वाजण्याच्या सुमारास लाला गुरुदासराम यांना पोलिसांनीं गिरफ्तार केल्याचें कळलें. कपडे करून मी कोर्टांत गेलों, तों लाला हंसराज साहनी व लाला अमोलकराम हेहि पकडले गेले असून पंडित जानकीनाथांचा तपास चालू असल्याचें समजलें. पुढें पकडलेल्या लोकांना कोर्टांत आणलें गेलें. कोर्टांत येतांच त्यांनीं जामिनावर सुटण्याचा अर्ज केला, पण तो मंजूर झाला नाहीं. हें पाहून मी लगेच स्टेशनचा रस्ता धरला व त्याच वेळीं लाहोरला जाणाऱ्या गाडींत बसलों. असें करण्यांत माझा उद्देश चीफ कोर्टांत जामिनावर सुटण्याकरितां अर्ज गुदरण्याचा होता. गाडींत असतांनाच ही गिरफ्तारीची बातमी सर्वत्र पसरली असल्याचें मला कळून आलें.

लाहोरास येतांच जामिनावर सुटका होण्याकरितां अर्ज दाखल केला. नेहमीं असले अर्ज तावडतोब निकालांत काढले जात असत; पण प्रस्तुत अर्ज गुदरला जातांच त्याला विरोध करण्याकरितां सरकारी वकील उभा राहिला. शेवटीं अर्जाचा निकाल न लागतां तो बेंचपुढें मांडला जावा असा जज्जानें हुकूम सोडला. या अर्जाची अशी वासलात लावण्यांत सरकारी वकिलास रावळपिंडीच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटकडून जामिनावर सुटका होऊं नये अशा अर्थाची चिठ्ठी आणण्यास सवड मिळावी असा हेतु होता. पुढें हा अर्ज बेंचसमोर विचारार्थ येण्यापूर्वींच चीफ कोर्टाच्या जज्जाच्या नांवें तेथील लष्करी अधिकाऱ्याची एक चिठ्ठी घेऊन रावळपिंडीचे मॅजिस्ट्रेट स्वतःच आले. चिठ्ठींत बहुशः "या लोकांना जामि-

नावर सोडल्यास देशी फौजेंत बंड होण्याचा संभव आहे" असें कांहीं तरी लिहिलेलें असण्याचा संभव आहे. या चिठ्ठीची एक नक्कल आपणांस मिळावी. निदान ती पहाण्यास तरी मिळावी अशा प्रकारची विनंति केली गेली असतांहि ती आरोपींच्या वकिलांना दाखविली गेली नाहीं. मग नकलेची गोष्ट दूरच राहिली. पुढें मामुली वहिवाटीप्रमाणें उभयपक्षाच्या वकिलांचे उलट सुलट प्रश्नोपप्रश्न झाल्यावर आरोपींना जामिनावर सोडतां येत नाहीं असा निकाल दिला गेला.

याच सुमारास बऱ्याच लोकांकडून सरकार व पोलिस येन केन प्रकारेण मला पकडण्याच्या विचारांत असल्याचें कळलें. चीफ कोर्टाचे रजिस्ट्रार एकदां बॅरिस्टर बोधराज यांना म्हणाले, "जी व्यक्ति या सर्व कारस्थानाच्या मुळाशीं आहे ती तर अद्यापि सुटीच आहे. तिला कसें पकडतां येईल या काळजींत आम्ही सर्व आहों. परंतु लवकरच या काळजीचेंहि निरसन होऊन ती व्यक्ति आमच्या तडाख्यांत सांपडेल अशी उमेद आहे."

रावळपिंडी येथील दंगा व लायलपूरची सभा या दरम्यान लाला जसवंतरायांवरील पंजाबी पत्रासंबंधाचा खटला चीफ कोर्टांत सुनावणीस निघून त्याचा फैसलाहि होऊन गेला होता. सेशन जज्जानें लाला जसवंतरायांची शिक्षा दोन वर्षांवरून सहा महिन्यांवर आणून ठेवली. ज्या दिवशीं हा निकाल लागला त्याच दिवशीं चीफ कोर्टांत पुढील अपिलाकरितां जसवंतरायांची जामिनावर सुटका व्हावी म्हणून अर्ज गुदरला गेला व त्यांची जामिनावर सुटकाहि झाली. सेशन जज्जाच्या कोर्टांत लाला जसवंतरायांच्या वकिलानें जें भाषण केलें होतें त्यावर मखलाशी करून ट्रिब्यून पत्रानें असें दर्शविलें कीं खटल्यांतील लेखाची सर्व जबाबदारी जसवंतराय संपादकावर ढकलूं पहात आहेत. या वेळीं लाला हरकिसनलालांनीं एका देशी ख्रिस्ती गृहस्थाकडे ( बॅ. आल्फ्रेड नंदी ) 'ट्रिब्यून' पत्र सोंपविलें होतें. ट्रिब्यूनच्या या नसत्या उठाठेवीमुळें चीफ कोर्टांत खटल्याच्या सुरवातीला जसवंतरायांच्या वकिलाच्या भाषणाचा विपर्यास केला जाऊं नये म्हणून आक्षेपित लेखाची जबाबदारी जसवंतराय कोणावरहि लोटूं इच्छित नाहींत असें कोर्टाच्या नजरेस आणलें गेलें. ज्या दिवशीं या खटल्याचा निकाल दिला गेला त्या दिवशीं चीफ कोर्टाच्या न्यायाधिशांचे चेहरे भीतीनें काळवंडून गेले होते. रीडसाहेबांनीं आपल्या हुजऱ्याला दोन वेळ बंगल्यावर धाडलें व

मेमसाहेबांची खुशाली आणविली. कोर्टाच्या आवारांत पुष्कळसे शिपाई आणून ठेवलेले होते व कोर्टापासून तुरुंगापर्यंतच्या रस्त्यावर दुतर्फा पोलिसांची रांग उभी केलेली होती. ज्या वेळीं सर न्यायाधिशांनीं निकाल सांगितला व पोलिसांनीं जसवंतराय व आठवले यांना घेरलें तेव्हां मी पुढें होऊन दोघांशींहि हस्तांदोलन केलें.

गाडींत घालून दोघांना तुरुंगाकडे नेण्यांत येत असतां रस्त्यांत पोलिसां-बरोबर लोकांच्या बऱ्याच झटापटी झाल्या. लोकांनीं पोलिसांवर चिखलाचा इतका मारा केला कीं चिखलापासून स्वतःचा बचाव करण्याकरितां इंग्रज अधिकाऱ्यांना आपल्या गाडींतून उतरून कैद्याच्या गाडींत जसवंतरायांशेजारीं बसावें लागलें. पोलिसांनींहि लोकांना यथेच्छ झोडपलें. या दंगलींत डी. ए. व्ही. शाळेचा एक विद्यार्थी किशनसिंह व एके काळीं आर्यसमाजाचे उपदेशक असलेले घसीटाराम असे दोघे पकडले गेले. यांना पकडल्याची बातमी कळतांच मी पोलिसठाण्यावर गेलों व दोघांनाहि धीर दिला. पुढें किशनसिंहाला पोलिसांनीं सोडून दिलें. असो.

वर लिहिल्याप्रमाणें रावळपिंडी येथील वकील पकडले गेल्यानंतर एक दिवस लाला धनपतराय माझ्याकडे आले व "या वेळीं मतभेद विसरून जाऊन सर्वांनीं मिळून पकडलेल्या वकिलांच्या सुटकेचा प्रयत्न करणें इष्ट आहे" असें म्हणाले. पुढें एकी करण्याच्या उद्देशानें ते मला लाला हरकिसनलालांकडे घेऊन गेले. तदनंतर या बाबतींत काय करतां येईल याची चर्चा करण्याकरितां दोन तीन वेळां माझें हरकिसनलालांकडे जाणें झालें. पंजाबीपत्र चालू झाल्यापासून जणूं काय मी त्यांच्या वाईटावर टपलेला आहें असा हरकिसनलालांचा समज झालेला होता व या गैरसमजामुळेंच त्यांच्या संकेतानुसार ट्रिब्यूनपत्र आर्यसमाजावर व आमच्या पक्षावर मधून मधून टीका टिप्पणी करीत असे.

या वेळीं लाहोर शहरीं प्लेग जोरांत असल्यामुळें माझी पत्नी व मुलें बाहेर-गांवीं रहावयास गेलीं होतीं व मी एकटाच लाहोरांत रहात होतों.

असो. ता. ९ मे रोजीं मी पकडला जाऊन हद्दपार केला गेलों. ही सर्व हकी-कत यापूर्वींच पुस्तकरूपें प्रसिद्ध झालेली आहे.

## २३. हद्दपारीपूर्वी व नंतर.

[ आतांपर्यंत आलेली हकीकत लालाजींनीं उर्दूंत लिहिलेल्या आत्मकथेवरून घेतली होती; यापुढील हद्दपारीसंबंधाची हकीकत हिंदी पुस्तकावरून उद्धृत केली आहे. ]

या सुमारास माझ्या एका स्नेह्याला एका उच्च युरोपियन अधिकाऱ्याला भेटण्याची संधि प्राप्त झाली. या स्नेह्यानें सांगितलें कीं "आतांपर्यंत ठिकठिकाणीं झालेल्या चळवळीचा व दंग्याधोप्यांचा मूळप्रवर्तक मी आहें असा अधिकाऱ्यांचा समज झालेला असल्यामुळें युरोपियन अधिकारी माझ्यावर संतापानें नुसते जळफळून गेले आहेत, व कोणत्यातरी मिषानें मला कडक शासन करणें जरूर आहे असा त्यांचा ग्रह होऊन बसला आहे." माझ्या या स्नेह्यानें यापुढें मी त्यांच्या पाशांत सांपडूं शकेन अशी संधि त्यांना मिळूं देण्याविषयीं खबरदारी बाळगावी म्हणून खास सूचनाहि दिली. दुसऱ्या एका मार्गानें कळलें कीं लायलपूरच्या सभेंतील माझ्या भाषणाची फार बारकाईनें छाननी चालली असून त्याच्यांतून राजद्रोह शाबित करण्याची खटपट चालू झालेली आहे. याशिवाय आणखी

एका मित्रानें अधिकाऱ्यांच्या गोटांतील इसमाच्या सांगण्यावरून कळविलें कीं कूकांचे पुढारी रामसिंह* यांची जी गति झाली तीच माझीहि होण्याचा बराच संभव आहे. अशा प्रकारें प्रसृत होणाऱ्या नित्य नव्या अफवांमुळें थोड्या दिवसांकरितां लाहोर सोडून जाऊन या वादळांतून पार पडावें असा माझ्या कांहीं मित्रांनीं मला सल्ला दिला. परंतु सरकारी कायद्याखालीं येण्यासारखें माझ्या हातून कांहीं घडलें आहे असें माझें मलाच वाटत नसल्यामुळें 'मला स्वतःला कसलीच भीति वाटत नाहीं' असें सांगून माझ्या या मित्रांचें मी समाधान केलें. माझे स्नेही व इतर चहाते माझ्या फिकिरींत होते तर माझें मन रावळपिंडीच्या माझ्या वकील मित्रांची सहाय्यता कशी करतां येईल, या विचारांत गुंग झालें होतें. माझ्या चित्तांत विचार येत कीं मी माझ्या स्वतःच्या घरांत आरामानें रहात आहें पण माझे दोस्त मात्र तुरुंगांत नाना प्रकारच्या हालअपेष्टा भोगीत आहेत. असे विचार मनांत उद्भवूं लागले कीं माझें मन उद्विग्न होऊन कांहीं सुचेनासें होई. निदान माझ्या या मित्रांशेजारीं तरी जाऊन रहावें अशी माझी फार इच्छा होती; परंतु त्यांच्या स्नेहीसंबंधींना मी जवळ येण्यापेक्षां दूर रहाणें चांगलें असें वाटत असल्यामुळें रावळपिंडीला जाण्याचा विचार मला तहकूब करणें भाग पडलें. माझ्या मित्रांच्या आप्तसंबंधींचा असा समज झालेला होता कीं मी रावळपिंडीला राहूं लागल्यास त्यांना सरकारकडून त्रास पोंचण्याचा संभव आहे. या त्यांच्या समजामुळें माझ्याशीं कोणत्याहि प्रकारें स्वतःचा संबंध येऊं नये म्हणून ते जपून वागूं इच्छित होते. अशा स्थितींत माझ्या तुरुंगस्थ मित्रांना नुसता सहानुभूतीचा संदेश पाठविण्यांत व स्वतः लागेल तें सहाय्य करण्यास तयार आहें असें कळविण्यांत मी स्वतःच्या मनाचें समाधान मानून घेतलें व इतर प्रकारें कांहीं करतां येणें शक्य आहे कीं काय याविषयीं विचार करूं लागलों. एक विचार असा आला कीं झालेल्या पकडापकडीविषयीं असंतोष प्रकट करण्याकरितां लाहोरांत व इतरत्र

---

* भाई रामसिंह हे शिखांच्या एका धार्मिक संप्रदायाचे मुख्य होते. यांच्या हातून घडणारें प्रत्येक कार्य राजकीय हेतूनें प्रेरित होऊन केलें जात आहे असा सरकारचा समज झालेला असल्यामुळें यांच्या प्रत्येक गोष्टीकडे सरकार राजकीय दृष्टीनें पहात असे. पुढें सन १८७२ त यांना १८१८ च्या रेग्युलेशन कायद्यान्वयें हद्दपारीची शिक्षा मिळून ब्रह्मदेशांत यांची रवानगी केली गेली.

सभा भरवून तन्निदर्शक ठराव पास करून घ्यावे; पण एक ना एक कारणामुळें हाहि विचार सोडून द्यावा लागला. माझ्या या मित्रांच्या विवंचनेमुळें स्वतःच्या गिरफ्तारीविषयीं पसरत असलेल्या नित्य नव्या अफवांविषयीं नुसता विचार करण्यासहि फुरसूद नव्हती; मग सुरक्षित स्थान शोधून काढण्याची गोष्ट दूरच राहिली. हळू हळू मी पकडला जाणार याविषयीं लोकांत दाट वदंता पसरूं लागली व तिचें प्रमाण सारखें वाढूं लागल्यामुळें खरोखरच पकडला गेल्यास मागाहून एखाद्या जरुरीच्या पत्राचा जबाब देणें राहून गेल्याबद्दल मनाला चुटपूट वाटूं नये म्हणून आवश्यक अशा एकंदर कागदपत्रांची वासलात लावून ठेवणें चांगलें असें मला वाटूं लागलें.

या खेरीज माझ्यावर येऊं पहाणारें संकट खरोखरीच आल्यास त्या वेळीं माझ्या वडिलांनीं भांबावून जाऊं नये म्हणून त्यांना येऊं पहाणाऱ्या संकटाला तोंड देण्यासाठीं तयार करणें अवश्य होतें. माझी पत्नी व मुलगी—जी दोनच महिन्यांपूर्वी विधवा झालेली होती—आणि सर्वांत धाकटा मुलगा हीं सर्व लुधियाना येथें माझ्या मेहुण्याकडे होतीं. माझा मोठा मुलगाच तेवढा माझ्याजवळ होता. या भावी आपत्तीच्या वेळीं पत्नी व मुलें जवळ नसलेलीं पाहून मला एक प्रकारें समाधान वाटलें. कारण घराची झडती घेतली जाऊन मी पकडला गेल्यास तें पाहून घरच्या मंडळींना वाटणारें दुःख मी माझ्या डोळ्यांनीं अवलोकन करूं इच्छित नव्हतों. आतां कुटुंबांतील मंडळीपैकीं ज्यांची मूर्ति माझ्या मनःचक्षूंसमोर वारंवार उभी राहून माझें चित्त कावरेंबावरें करून सोडीत होती ती माझ्या वडिलांची होय.

वडिलांची आज्ञा पालन करावी कीं मातृभूमीसंबंधाचें स्वतःचें कर्तव्य पार पाडावें या एकाच समस्येनें माझें सारें आयुष्य व्यापून टाकलेलें आहे. माझ्या वडिलांना मान्य नसलेल्या किंवा नुसती सहानुभूतीहि वाटत नसलेल्या अशा अनेक गोष्टी करून मी त्यांना कैक वेळ नाराज केलेलें आहे. परंतु यामुळें आमचा संबंध तोडून टाकण्याइतकी पाळी मात्र केव्हांच आली नाहीं. माझ्या कार्यामुळें आम्हां उभयतांमध्यें क्षणिक मतभेद उत्पन्न झाला असतां किंवा माझीं कार्यें त्यांना बिलकुल पसंत नसतांनासुद्धां अशा प्रत्येक कार्यांत जरूर पडल्यास माझे वडील माझें संरक्षण करण्यास तयार आहेत असा मला धीर होता.

माझ्या प्रकृतीविषयीं काळजी करण्यांत तर त्यांचे काळ्याचे पांढरे झाले होते. वृद्धावस्थेंतसुद्धां इतरांनीं माझी आशा सोडल्यावेळीं सतत कैक महिने रात्रंदिवस त्यांनीं माझी सेवाशुश्रूषा केलेली आहे. कैक वेळ तर अहोरात्र माझ्या बिछान्याजवळून क्षणमात्रहि ते हाललेले नाहींत. अशा प्रकारचा प्रेमळ स्वभाव हेंच माझ्या वडिलांचें विशिष्टत्व होतें. या विशिष्टत्वामुळेंच घरादाराचें बंधन तोडून टाकून पूर्ण त्यागमय जीवन व्यतीत करण्याऐवजीं मध्यम मार्गाला अनुसरणें मला भाग पडलें. त्यांच्या अत्युच्च आचरणानें व नैतिक बलामुळेंच माझ्या ठायीं आध्यात्मिक भावनेचें बीजारोपण केलें गेलें. वयांत आल्यावरसुद्धां वडिलांना नाखुष करणें कसें चुकवितां येईल, या एकाच विचारानें मी वारंवार गुंग होऊन जात असें. सार्वजनिक गोष्टी वगळल्यास त्यांची इच्छा मला शिरोधार्य होती.

एकंदर परिस्थिति अशी असल्यामुळें या भावी आपत्तीच्या वेळीं माझ्या चित्तांत माझ्या वडिलांविषयींची चिंता ठाणें देऊन बसणें स्वाभाविक होतें. याकरितां पहिल्यानें असा विचार केला कीं येऊं पहाणारें संकट खरोखरीच आल्यास त्या वेळीं वडिलांनीं माझ्याविषयीं काळजी करूं नये म्हणून त्यांना विनंति करावी. या विचारानुसार पकडला जाण्यापूर्वी दोन दिवस आधीं खालीं दिलेलें पत्र मी माझ्या वडिलांना लिहिलें. हें पत्र घाईंत लिहिलें असल्यामुळें त्यावर तारीख किंवा तिथि दिलेली नाहीं.

" पूजनीय पिताजी !

" रजपतरायांच्या पत्त्यावर आपण पाठविलेली तार पोंचली. सध्यां येथें मी पकडला जाणार अशी अफवा पसरलेली आहे. या अफवेंत कितपत तथ्य आहे हें सांगणें कठीण आहे; कसेंहि असलें तरी मला आपल्याला एक सादर नम्र विनंति करावीशी वाटते. ती इतकीच कीं माझ्यावर कसलीहि आपत्ती कोसळली तरी आपण घाबरून जाऊं नये. विस्तवाशीं खेळूं लागणारा इसम एक ना एक वेळ विस्तवाच्या ज्वालांत गुरफटला जाण्याचा संभव असतो. त्यानेंहि या गोष्टीला तयार असणें जरूर आहे. राज्यकर्त्यांच्या कारभारावर टीका करणें हें आगीशीं खेळण्यासारखेंच आहे. मला जर कोणत्याहि गोष्टीविषयीं वाईट वाटत असेल तर मी पकडला गेल्यास आपल्याला होणाऱ्या दुःखाविषयींच होय. माझी एवढीच अंतःकरणपूर्वक इच्छा आहे कीं माझ्यावर आलेल्या संकटानें आपण दुःखी

होणार नाहीं असें मला एकवार सांगावें. लाला हंसराज, गुरुदासराम व अमोलकराम यांच्यासारखे तुरुंगांत खिचपत पडलेले असतांना माझी काय कथा? कोणत्याहि कारणास्तव भीरुता प्रदर्शित करण्याची ही वेळ नाहीं. उलट या वेळीं आलेल्या कसल्याहि प्रकारच्या संकटाला धीरानें तोंड देणेंच योग्य आहे.

" या ठिकाणीं अजून प्लेग जोरांत आहे. १३ मेला कॉलेज सुरू होईल. परंतु प्रिय मोहनला ( लालाजींचा द्वितीय पुत्र; हा प्लेगामुळें लालाजींच्या वडिलांजवळ होता. ) १३ तारखेपूर्वी लाहोरास पाठवूं नये. मला कसल्याहि प्रकारची काळजी वाटत नाहीं किंवा मी कोणत्या कारणास्तव कष्टीहि नाहीं. आपण मात्र कोणत्याहि गोष्टीची पर्वा करूं नये.

आपला आज्ञाधारी सेवक
**लाजपतराय.**"

याच पत्रांत जगरांव येथील माझी मिळकत माझ्या मुलांच्या नावानें करण्याविषयीं लिहिलें होतें व सरकारी कागदपत्रांत त्याप्रमाणें फेरबदल करण्याविषयीं वडिलांना विनंति केली होती. मला असें कळलें होतें कीं भाई रामसिंहांप्रमाणें मलासुद्धां १८१८ च्या रेग्युलेशन कायद्यान्वयें हद्दपार करण्यांत येणार आहे. या अफवेमुळें मी रेग्युलेशन कायद्याचें परिशीलन करूं लागलों. रेग्युलेशनचा कायदा वाचल्यावर याच्या कलमाखालीं येण्यासारखें माझ्या हातून कोणतेंच कार्य घडलेलें नाहीं अशी माझी खात्री झाली. एका बुद्धिमान गव्हर्नराच्या अमलाखालीं असलेलें पंजाब प्रांतीय सरकार माझ्यासारख्या साधारण व्यक्तीला हद्दपार करून सर्व जगापुढें आपल्या निर्बलतेचें व घाबरटपणाचें प्रदर्शन करील अशी माझें मन मला ग्वाही देण्यास बिलकुल तयार होईना. परंतु माझी खात्री होत नसली तरी मी येईल त्या आपत्तीला तोंड देण्याची, स्वतःची तयारी केली. या परिस्थितींत सुद्धां स्वतःच्या बचावाकरितां कांहीं खटपट करावी असा विचार क्षणमात्रसुद्धां माझ्या चित्तास शिवला नाहीं व पूर्वीप्रमाणेंच रावळपिंडीच्या माझ्या मित्रांकरितां होईल ती खटपट चालविली. तसेंच इतर प्रांतांतील पुढाऱ्यांना पंजाबांतील परिस्थितीची जाणीव व्हावी म्हणून मी पत्रें लिहिलीं. चिनाब कालव्यावरील नवीन वसाहतीसंबंधी होऊं घातलेल्या कायद्याविरुद्ध खटपट करण्याकरितां कांहीं कागदपत्र गोळा केले

व एका पत्राबरोबर इंडियन नॅशनल काँग्रेसच्या ब्रिटिश समितीचे अध्यक्ष सर विलियम वेडरबर्न यांजकडे त्यांची रवानगी केली.

विलायतची डाक जाण्यापूर्वी दोन दिवस आधीं इंग्लंडमधील माझ्या एका मित्राला मी एक पत्र लिहिलें. या पत्रांत पत्र लवकर लिहिण्याचें कारण डाक जाण्याच्या दिवशीं मी मोकळा असेन कीं नाहीं याचा नेम नाहीं असें दिलें होतें. याखेरीज या पत्रांत पंजाबाची एकंदर परिस्थिति व स्वतःच्या पकडल्या जाण्याच्या अफवांची सविस्तर हकीकत दिली होती. माझें अनुमान खरें ठरलें नाहीं. विलायतची डाक जाण्याच्या दिवशीं सकाळपर्यंत मी पकडला गेलों नाहीं.

पंजाबच्या राजकीय परिस्थितीविषयीं वर्तमानपत्रांत प्रकाशित करण्याकरितां मी एक लेख लिहित असतां माझे कांहीं दोस्त—यांत डी. ए. व्ही. कॉलेजचे प्रिंसिपाल लाला हंसराजही होते—सकाळीं दहाच्या सुमारास माझ्या घरीं आले व मला फिरावयास चलण्यास सांगूं लागले. मी त्यांना म्हटलें, या वेळीं मला अवकाश नाहीं व माझें मन फिरावयाला जाण्याला उत्सुकहि नाहीं. आलेल्या मंडळीनें आपल्याबरोबर येण्याकरितां फार आग्रह चालविला व मी भलत्याच काळजींत गुंग होऊन बसलों आहें अशी माझी समजूत घालण्याचा यत्न केला. परंतु मी आपला हेका सोडला नाहीं व आपल्या कामापासून विचलित होणें शक्य नाहीं, असें स्पष्ट सांगितलें. या वेळीं मित्रांना नाराज केल्यावद्दल नुसती औपचारिक दिलगिरी प्रदर्शित करण्याचीसुद्धां मला गरज वाटली नाहीं. माझे स्नेही जातांच मी आपल्या कामाला लागलों व तें जेवणापूर्वी पुरें केलें.

पुढें एक दोन पत्रें लिहून चीफ कोर्टांत जाण्याची तयारी केली. आज कोर्टांत माझें कांहीं विशेष असें काम नव्हतें. परंतु दोन दिवसांपूर्वी एक पक्षकार त्याच्या खटल्याचे कागदपत्र तपासून एकाद्या मुख्य वकिलाची नेमणूक करण्याकरितां ३५० रुपये देऊन गेला होता. त्यानें दिलेले रुपये मी घेतले असल्यामुळेंच कोर्टांत जाण्यास निघालों. वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करावयाचें पत्र व इतर पत्रें ज्यांवर तिकिटें लावावयाचीं होतीं तीं माझ्या हातांत होतीं. इतक्यांत माझ्या कारकुनानें मला भेटण्याकरितां दोन इसम आले असल्याची वर्दी दिली. कोण आले आहेत हें पहाण्यासाठीं मी बाहेर आलों तों समोर लाला गंगाराम, इन्स्पेक्टर, अनारकली



महात्मा लाला हंसराज,

प्रिंसिपॉल, डी. ए. व्ही. कॉलेज.

पोलिस व मुंशी रहमतउल्ला, इन्स्पेक्टर, सिटीपोलीस उभे असलेले दिसले. मी येतांच मुंशी रहमतउल्लानें डेप्युटी कमिशनर भेटीला बोलावीत असल्याचें सांगितलें. परंतु कोणत्या कारणाकरितां बोलाविलें आहे तें मात्र सांगितलें नाहीं. या दिवसांत कमिशनर निरनिराळ्या लोकांना भेटीस बोलावून शहरांतील अशांतता दूर करण्याच्या प्रयत्नांत होते. यामुळें माझा समज झाला कीं, मलासुद्धां त्यासाठींच बोलाविलें असावें. माझ्या अंदाजाप्रमाणें मी मुंशी रहमतउल्लाला म्हणालों, "कोर्टांत थोडेंसें काम आहे तेवढें आटोपून कमिशनरच्या भेटीस येतों." इन्स्पेक्टर म्हणाले, "कमिशनरसाहेब जिल्हा पोलिसठाण्यांत बसून आहेत व थोड्याशा मिनिटांकरितांच आपली भेट घेऊं इच्छित आहेत. तरी पहिल्यानें भेटा व मग कोर्टांत जा."

इन्स्पेक्टराच्या या उत्तरानें मला शंका आली. परंतु ती व्यक्त न करितां मी थोड्याशा बेपर्वाईनें म्हणालों, "कांहीं हरकत नाहीं. चला, माझी गाडी तयार आहे. आपण सर्वच तींत बसून जाऊं." गाडींत बसतांच हातांतील कागद कारकुनाच्या स्वाधीन केले व त्याला कोर्टांत जाण्यास सांगितलें.

माझी गाडी फाटकांतून बाहेर पडते न पडते तोंच माझ्या घराकडे जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंट मि. रॅण्डल येत असलेले दिसले. बरोबर आणखी एक युरोपियन अधिकारीहि होता. दोघेहि उडी मारून माझ्या गाडींत चढले. रॅण्डल माझ्या ओळखीचे असल्यामुळें मी त्यांना बसण्यास सांगितलें. माझ्या घरापासून दोन मिनिटांच्या अंतरावर जिल्हा पोलिसठाणें आहे. ठाण्यांत पोंचतांच कमिशनर यंगहज्बंड म्हणाले, "हिंदुस्थान सरकारच्या वारंटानुसार मी आपणास गिरफ्दार करीत आहें. हिंदुस्थान सरकारनें आपल्याला हद्दपारीची शिक्षा देण्याचें ठरविलें आहे. तुम्हाला चांगल्या प्रकारें वागविलें जाईल." यावर फक्त "इच्छा असेल तसें करा." एवढेंच मी बोललों.

या वेळीं पोलिसठाण्यांत डेप्युटी कमिशनर मि. मन्न, मि. रँडल व दुसरा एक युरोपियन अधिकारी होता. कमिशनरांनीं विचारलें, "हद्दपार होण्यापूर्वी कोणाला भेटण्याची इच्छा आहे काय?" मी लगेच "नाहीं" म्हणून जबाब दिला. यानंतर कमिशनरनें पत्रें लिहिण्याचें सामान व कपडेलत्ते आणण्यासाठीं पत्र लिहिण्याची मुभा दिली. लाला द्वारकादास यांना मी एक पत्र लिहिलें. पत्रासोबत ३५० रु. च्या नोटा घालून त्या ज्या पक्षकारानें मला दिल्या होत्या त्याला परत कर-

ण्यास किंवा त्या पक्षकाराचें काम करून देण्यास लिहिलें. त्याच प्रमाणें माझ्याकडे असलेल्या इतर खटल्यांचीहि वासलात लावण्यास सांगितलें. याशिवाय पत्रांत माझ्या गिरफ्दारीची बातमी लिहिली व माझी रवानगी कोठें होणार आहे हें कमिशनरनें कळविलें नसल्याचेंहि लिहिलें. तसेंच सध्या मी ईश्वराधीन असल्यामुळें व परमेश्वर जें कांहीं करतो तें बऱ्यासाठींच करीत असल्यामुळें माझ्याविषयीं कोणत्याहि प्रकारें काळजी करूं नये असें लाला द्वारकादासजींना लिहिलें. पत्र लिहून झाल्यावर स्वतःजवळ पैसे ठेवण्यास कांहीं हरकत आहे कीं काय असें कमिशनराला विचारलें व त्याच्याकडून हरकत नसल्याचें समजतांच पाकिटांत ठेवलेल्या नोटा काढून घेतल्या व पत्राला तशी पुस्ती जोडली.

दुसरें पत्र माझा मुलगा प्यारेलाल याला लिहिलें व त्यांत स्वतःच्या गिरफ्दारीची बातमी देऊन वडिलांना धीर देण्यास व त्यांना कष्ट न होतील असें वागण्यास लिहिलें. याच पत्रांत सोबतच्या पोलिसाबरोबर कपडेलत्ते पाठविण्यासहि लिहिलें. यापुढें माझ्यापाशीं कांहीं शस्त्रास्त्रें असतील या शंकेनें माझ्या घराची झडती घेतली गेली; पण पोलिसांचे श्रम फुकट गेले. तदनंतर डेप्युटी कमिशनर मला मोटारींत घालून ठाण्यांतून बाहेर पडले.

सिव्हिल आणि मिलिटरी गॅझेटच्या शब्दांत सांगावयाचें झाल्यास या वेळीं स्वतः डेप्युटी कमिशनर मोटरड्रायव्हर बनले होते. त्यांच्याच शेजारीं जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंट रिव्हॉल्व्हर रोखून धरून बसले होते व मागच्या बाजूला मी व पोलिस सबइन्स्पेक्टर असे होतों. मोटरींत बसतांना तेथें दुसरा कोणी हिंदी इसम नसल्यामुळें मी मुंशी रहमतुल्लाला नमस्कार केला. हळूहळू गोल बागेजवळून अपर मॉलच्या बाजूला आमची मोटर वळली. इतक्यांत घोड्याच्या गाडींतून चाललेल्या दोघां युरोपियनांनीं आमची मोटर उभी करविली. मोटर थांबतांच पोलिस सुपरिंटेंडेंट तींतून खालीं उतरले व गाडींत बसलेल्या दोघां युरोपियनांशीं थोडा वेळ बोलत उभे राहिले. यानंतर मियां मीरच्या दिशेनें आमची मोटर चालू झाली. मध्यंतरींच्या कालव्यावरील पूल ओलांडला जातांच थोड्याशा तोफखान्यानिशीं हिंदी व युरोपियन घोडेस्वार समोरून दौडत येत असलेले दिसले. हा देखावा पाहून मला हंसूं येऊं लागलें, पण मी तें लगेच दाबलें. थोड्याच वेळांत आमची मोटर युरोपियन गार्डासमोर उभी राहिली व मला खालीं उतरण्यास सांगण्यांत आलें. खालीं उतरतांच डेप्युटी कमिशनर व दुसरा एक युरोपियन

अधिकारी पुढें झाले व त्यांच्या मागें दोन पोलिस अधिकाऱ्यांच्या पहाऱ्यांत आमची स्वारी चालूं लागली. अशा प्रकारें तुरुंगाच्या आवारांत आमची स्वारी दाखल होतांच एका कोठडींत माझी रवानगी केली गेली. कोठडींत शिरतांच बाहेरून टाळें ठोकलें गेलें व एका गोऱ्या इसमाची पहाऱ्यावर नेमणूक केली गेली. थोड्या वेळानें डेप्युटी कमिशनरानें माझ्या जेवणाची वगैरे चौकशी केली व मला कशाचीच गरज नसल्याचें समजतांच डेप्युटी कमिशनर व जिल्हा पोलिस सुपरिंटेंडेंट असे दोघेहि तेथून निघून गेले. हे गेल्यावर भिंतीवर टांगलेले तुरुंगाचे नियम मी वाचले. या ठिकाणीं उष्मा फार होत असल्यामुळें अंगांतील कोट काढून खुंटीस अडकविला व तेथें असलेली लांकडाची फळी साफसूफ करून तीवर पोट दुखत असल्यामुळें उपडा पडून राहिलों.

नेहमीं मे महिन्यांत लाहोर शहरांत बराच उष्मा होत असतो. परंतु या वर्षी (१९०७) पाऊस बराच पडला असल्यामुळें व माझी पोटदुखी चाळवली असल्यामुळें मी गरम कपडेच वापरीत असें. बाहेर असेपर्यंत हें सर्व ठीक होतें; परंतु तुरुंगाच्या कोठडींत पाऊल टाकतांच तेथें इतकें उकडूं लागलें कीं नुसत्या कोटालाच नव्हे तर सदऱ्यालाहि रजा देणें भाग झालें. असो. फळीवर पडल्या-पडल्या मी स्वतःच्या भूत व भविष्य कालाच्या निरीक्षणांत मग्न झालों.

पहिल्यानें माझ्या गिरफ्दारीच्या वेळीं माझे वडील, पत्नी व मुलें नसल्यानें मी पकडला गेल्यावेळीं त्यांना होणारें दुःख स्वतःच्या नेत्रांनीं अवलोकन करण्याचा प्रसंग माझ्यावर न आल्याबद्दल परमेश्वराचे आभार मानले. तसेंच स्वतःच्या मुलाला गिरफ्दार केलेला पहाण्याचा प्रसंग माझ्या आईवर येऊं न दिल्याबद्दलहि त्या सर्वसमर्थाचे उपकार मानले. माझी आई यापूर्वीच आम्हांला सोडून गेली होती. मी पकडला जाण्यापूर्वी माझ्या वडिलांविषयीं मला अति चिंता वाटत होती, परंतु एकदां पकडला जातांच त्यांच्या धीरोदात्त वृत्तीची आठवण होऊन माझी काळजी आस्ते आस्ते कमी होऊं लागली.

राहतां राहिलीं पत्नी व मुलें. परंतु तीं वडिलांजवळ असल्यामुळें त्यांच्याविषयीं विशेषशी फिकीर बाळगण्याची मला जरूर वाटली नाहीं. असो. याप्रकारें कौटुंबिक चिंतेतून मुक्त होतांच, मी स्वतःच्या मानसिक शक्तीच्या विश्लेषणास सुरवात केली. सुदैवानें लहानपणापासून परमेश्वरी एकमेव सत्तेवर माझा विश्वास

जडलेला होता. या विश्वासामुळेंच आतांपर्यंत आलेल्या किंवा येऊं पहाणाऱ्या संकटांच्या वेळीं माझें मन डगमगलें नाहीं व तूर्तच्या आपत्तीच्या वेळींसुद्धां तें डगमगेलसें वाटलें नाहीं. याप्रमाणें आत्मनिरीक्षण केल्यानंतर ज्याप्रमाणें आतां-पर्यंत आलेल्या आपत्तींचा सामना करण्यास त्या सर्वसमर्थानें मला बल दिलें, त्याचप्रमाणें प्रस्तुतच्या व भावी संकटांतहि त्यानें मला बल द्यावें व माझ्या हातून देशाचें किंवा समाजाचें नांव बद्दु होईल असें कृत्य घडून येण्यापासून माझें रक्षण करावें, म्हणून त्या परम थोर परमात्म्याची सद्गदित अंतःकरणानें मी पुन्हां एकदां प्रार्थना केली. यानंतर सरकारच्या या कारवाईचा उपहास करण्याकडे माझी वृत्ति वळली. माझ्या देशबांधवांच्या मनःस्थितीची मला पुरी जाणीव असल्यामुळें सर-कारच्या विश्वासु सल्लागारांकडूनच सरकारला भलताच सल्ला देण्यांत त्याचा विश्वास-घात केला जात असलेला अवलोकून मला हंसूं येऊं लागलें. कदाचित् या सर्व प्रकारामागें अदृश्य अशा ईशशक्तीचीच प्रेरणा असावी असें मला वाटूं लागलें. याप्रकारें विचारांत गढून गेलों असतां या आपत्तिरूपी ढगांमागें लोपून राहिलेली एक छोटीशी तेजस्वी कोर दृष्टिगोचर होऊं लागली. या कोरेकडे माझें चित्त वेधलें असतां हळू हळू तिला झांकून ठेवणारे ढग कमी कमी होत असलेले दिसूं लागले व ती छोटीशी कोर प्रचंड ज्योतिस्वरूपांत आपल्या संपूर्ण तेजानें तळपत असलेली दिसूं लागली. मनांत विचार आला कीं भारताला दास्यांत डांबून ठेव-णारीं बंधनेंसुद्धां याचप्रमाणें एक ना एक दिवशीं नष्टप्राय होऊन भारत आपल्या संपूर्ण तेजानें तळपूं लागेल.

सुमारें एक तासानंतर मी आंतून दरवाजा उघडला व रेज्यांतून बाहेरील दृश्य अवलोकन करूं लागलों. कोठडीसमोर एक शिपाई सरकारच्या साम-र्थ्याचें प्रदर्शन करीत उभा असलेला दिसून आला. बागनेट टेकून तो ऐटीनें उभा होता. थोड्या वेळानें पहाऱ्यांत बदली झाली. आलेला नवा पहारे-करी अवेळीं कामावर हजर राहावें लागल्यामुळें त्रासून गेलेला दिसत होता. जमल्यास या नव्या पहारेकऱ्याशीं बोलून मनाचा विरंगुळा घालवावा, या उद्देशानें 'किती वाजले' म्हणून मी त्याला प्रश्न केला. हळू हळू आमच्या भाषणास सुरवात झाली. परंतु त्याचें बोलणें स्पष्टपणें ऐकूं येत नसल्यामुळें थोड्याच वेळांत मला गप्प बसणें भाग पडलें. संध्याकाळीं चाराच्या सुमारास

त्याच्या जागीं दुसऱ्या शिपायाची नेमणूक झाली. येतांच त्यानें माझी विचारपूस केली व मला कशाचीहि गरज नसल्याचें सांगतांच त्यानें एका हिंदु कहाराकडून लोटाभर पाणी आणविलें. यापैकीं थोडेंसें मी प्यालों व उरलेल्या पाण्यानें तोंड धुतलें. यानंतर मी पुन्हां दरवाजा बंद केला. सहाच्या सुमारास कोठडीला लावलेल्या टाळ्यांत चावी फिरत असल्याचा भास झाला. लगेच माझ्या नांवाचा पुकाराहि केला गेला. पुकारा ऐकतांच मी दरवाजा उघडला, तों समोरच मि. रँडल, एक युरोपियन अधिकारी व एक मुसलमान इन्स्पेक्टर उभे असलेले दिसले. पुढें त्यांच्या सांगण्याप्रमाणें मी कोठडींतून बाहेर आलों व त्यांच्या बरोबर चालूं लागलों. रस्त्यावर येतांच तेथें असलेल्या लांडो कारमध्यें आम्ही सर्व बसलों व मियां मीर रेल्वे स्टेशनाजवळ असलेल्या लष्करी भागाजवळ रुळावर असलेल्या आगगाडीच्या डब्यांत मी दाखल झालों. डब्यांत बसतांच मि. रँडलनें मी लिहिलेलीं पत्रें ज्याचीं त्यांना दिलीं गेलीं असल्याचें सांगितलें व माझें अभीष्ट चिंतून माझी रजा घेतली. यावर मी योग्य असा जबाब दिला व आपल्या जागीं जाऊन बसलों. थोड्याच क्षणांत गाडीची शिटी झाली व हळू हळू लाहोर शहर दृष्टिआड होत गेलें.

आज बऱ्याच वर्षांनंतरहि मी त्या वेळच्या माझ्या मनःस्थितीचें निरीक्षण करूं लागलों तरी लाहोर सोडतांना तें कायमचें सुटलें जात आहे असें मला वाटत होतें असें वाटत नाहीं. त्या वेळींसुद्धां कांहीं अनिश्चित कालाच्या प्रवासाला मी निघालेला आहें अशीच माझें मन मला ग्वाही देत होतें.

गाडी चालू होतांच एक पोलिस अधिकारी माझ्या डब्यांत शिरला व तो येतांच एका युरोपियन पोलिस इन्स्पेक्टरानें पुन्हां एकदां माझी झडती घेतली. या वेळीं माझ्याजवळ असलेले रुपये त्यानें काढून घेतले व प्रवास आटोपतांच ते मला दिले जातील म्हणून सांगितलें. या झडतींत माझ्या घड्याळाला असलेली सोन्याची सांखळी त्यानें राहूं दिली होती, परंतु पुढें त्याला काय वाटलें कोणास ठाऊक कांहीं वेळानंतर तीहि त्यानें माझ्याजवळून घेतली व इन्स्पेक्टराच्या स्वाधीन केली. झडतीचें काम संपतांच तो म्हणाला, " नाइलाजास्तव सरकारला स्वरक्षणासाठीं आपल्याशीं अशा प्रकारें वागावें लागत आहे. " यावर मी म्हणालों, "माझ्याशीं असा व्यवहार केला जाण्याजोगें माझ्या हातून कांहीं घडलें आहे असें मला तरी

वाटत नाहीं. हें सर्व अननुभवी उतावळया मूर्ख तरुण इंग्रजांचें कृत्य असावें असें माझें मत आहे." यावर तो अधिकारी म्हणाला, "आपलें म्हणणें कांहीं इंग्रजांना लागू पडेल यांत शंका नाहीं; परंतु सर्वांच्याच बाबतींत तसें म्हणणें योग्य होऊं शकणार नाहीं. कारण बऱ्याच तरुण इंग्रजांना जरबेंत ठेवण्यांत येत असतें." असो, याप्रमाणें कांहीं वेळ आमचें बोलणें चाललें होतें. शेवटीं या अधिकाऱ्यानें सरकारचा इरादा मला चांगल्या प्रकारें वागविण्याचा असल्याबद्दल पुन्हां एकदां सांगितलें व माझी खात्री पटावी म्हणून प्रमाणादाखल आतांपयत मला कसें उत्तमप्रकारें वागविलें गेलें आहे तें दाखवून दिलें. सरकारच्या या सदिच्छेबद्दल मी आभार मानले व पुढें "माझ्या स्वतःविषयीं मला कांहीं वाटत नाहीं, परंतु स्वरक्षणाकरितां सरकारला लाहोर शहरांतून मला हद्दपार करणें इष्ट वाटत असेल तर त्याची मर्जी" एवढेंच बोललों. यावर त्या अधिकाऱ्यानें जें उत्तर दिलें त्यावरून माझी हद्दपारी थोड्याच दिवसांसाठीं आहे असा माझा समज झाला. शेवटीं त्या अधिकाऱ्यानें गाडींत असलेल्या दोन हिंदु पोलीसांकडून जेवणाची वगैरे व्यवस्था करून घेण्यास सांगितलें. तसेंच दुसऱ्या इन्स्पेक्टरांनासुद्धां माझ्या गरजांकडे लक्ष देण्याची ताकीद दिलेली आहे असें तो म्हणाला. एवढें सांगून होतांच लगेच त्यानें एका इन्स्पेक्टराला माझ्याकरितां उशी, चादर व कांबळें आणून देण्यास सांगितलें व त्यानें तीं आणून दिलीं. याच कपड्यांमुळें अँग्लोइंडियन पत्रांनीं मी स्वदेशीचा नुसता नामधारी प्रचारक असल्याबद्दल टीका करून माझी बदनामी करण्याचा यत्न केला. असो. वर लिहिल्याप्रमाणें या वेळीं माझी पोटदुखी चाळवली असल्यामुळें एक फलानेलची पट्टी आणून देण्यास त्या इन्स्पेक्टराला मी सांगितलें; परंतु या गाडींतून मी प्रवास करीत असल्याची बातमी बाहेर फुटूं न देण्याची त्याला खबरदारी घेणें अवश्य असल्यामुळें त्याच्याकडून ती मिळूं शकली नाहीं. स्टेशनावरील कारकुनांना वगैरे ही रेल्वे बोर्डाची स्पेशल ट्रेन असल्याचें सांगण्यांत आलें होतें.

माझ्यावर देखरेख ठेवण्यासाठीं जी पोलिसांची तुकडी ठेवण्यांत आली होती, तींत एक मुसलमान सबइन्स्पेक्टर असून त्याच्या हाताखालीं पांच मुसलमान व दोन हिंदु असे सात शिपाई होते. एखाद्या ठिकाणीं गाडी उभी राहिली कीं या तुकडीवरहि खास नजर ठेवण्यांत येई.

जंडियाला स्टेशन येतांच पोलिस अधिकारी माझ्या डब्यांतून निघून गेले व मीहि झोंपण्याच्या तयारीस लागलों. गेल्या कैक वर्षांपासून निद्रादेवी माझ्यावर फारशी प्रसन्न नव्हती; परंतु आज मात्र ती पूर्णपणें प्रसन्न झालेली दिसली. या रात्रीं मला इतकी सुस्त झोंप लागली कीं फिल्लोर स्टेशन येतांच दूध पिण्यांकरितां मला जागें करावें लागलें. या एकाच गोष्टीवरून माझ्यावर ओढवलेल्या या आपत्तीचा माझ्या मनावर काय परिणाम झाला होता हें कळून येईल.

दुसऱ्या दिवशीं पंजाबप्रांत सुटून औंध रोहिलखंड रेल्वे लाइनवरून आमची गाडी चालू झाली होती. पंजाब प्रांताच्या हद्दींत रेल्वेच्या खिडक्या बंद करून ठेवण्यांत आल्या होत्या. परंतु औंध रोहिलखंड प्रांताची हद्द सुरू होतांच स्टेशनांदरम्यान खिडक्या खुल्या ठेवण्यांत येऊं लागल्या. स्टेशन येतांच खिडक्या बंद केल्या जात असल्यामुळें आमची स्वारी कोठें चालली आहे हें समजावें म्हणून मी फटींतून स्टेशनाचें नांव वाचण्याचा यत्न करीत असें. एकदां सूर्यास्तापूर्वी लखनौ शहराजवळील मोहनलाल गंज स्टेशनावर आमची गाडी उभी राहिली. या वेळीं उष्मा फार होत होता. परंतु माझ्या डब्यांत पंख्याची सोय केलेली होती व तो ओढण्यास मजूरसुद्धां ठेवलेला होता. या ठिकाणीं आमची गाडी बरेच तास उभी राहिली. मला वाटतें पोलिस अधिकारी वरिष्ठांच्या हुकुमाची वाट पहात असावा किंवा पुढील स्टेशनावर माझ्या उतरण्याच्या वगैरे व्यवस्थे-संबंधी सूचना देत असावा. पुढें बारा वाजतां पुढील प्रवासास सुरवात झाली. यानंतर सकाळीं मोगल सराय स्टेशनवर गाडी उभी राहिली व तेथें उतरून मी स्नान वगैरे करून कपडे बदलले. या वेळीं सबइन्स्पेक्टरानें माझ्याकरितां बाजारांतून खमीस व पायजामा विकत आणला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आमची गाडी ईस्ट बंगाल रेल्वेच्या डायमंड हार्बर स्टेशनवर येऊन थडकली. पहांटेसच इन्स्पेक्टरानें हाताखालील शिपायांना नियोजित ठिकाणीं जाण्यास जरूर असलेल्या सामानसुमानाची बांधाबांध करण्यास सांगितलें. इतक्यांत एक पोलिस अधिकारी माझ्याजवळ आला व मी कोठें आलों व कोठें जाणार हें ठाऊक आहे काय म्हणून विचारूं लागला.

यावर "या प्रांतांत यापूर्वी मी आलेला असल्यामुळें हें स्टेशन माझ्या परिचयाचें आहे व माझी रवानगी बहुतकरून रंगूनला किंवा मंडालेला होणार असें

मला वाटतें" असा जबाब दिला. माझें हें उत्तर ऐकून तो अधिकारी आश्चर्यचकित झाला. कारण आतांपर्यंत माझी रवानगी कोठें होणार आहे हें मला कळविण्यांत आलेलें नव्हतें.

चौकशी अंतीं मुख्य अधिकाऱ्यानें याविषयीं मला खबर लागूं न देण्याविषयीं सक्त ताकीद दिली असल्याचें कळलें. छोटे छोटे अधिकारी आपल्याला याविषयीं कांहींहि माहिती नसल्याचें शपथेवर सांगत असत. माझ्या अंदाजाप्रमाणें इन्स्पेक्टराला याविषयीं थोडीफार माहिती असावी.

रेल्वेच्या प्रवासांत माझ्या जेवणाची व्यवस्था अति वाईट होती. कदाचित् ही व्यवस्था इन्स्पेक्टरकडे सोंपविलेली असल्यामुळें त्याचा नोकर त्याच्याकरितां जें जेवण तयार करीत असे त्याहून चांगल्या जेवणाची माझ्याकरितां आवश्यकता नाहीं असें तो समजत असावा. सकाळीं ८–९ च्या सुमारास गाडींतून उतरून नदीच्या कांठापर्यंत चालत गेलों व तेथें असलेल्या स्टीम लॉंचवर चढून गाईड नांवाच्या सरकारी बोटींत जाऊन बसलों. गाडी सोडते वेळीं माझ्या वारंटावर माझ्या आंगठ्याचा ठसा उमटवून घेतला गेला.

या ठिकाणाहून वडिलांना तार करण्याची परवानगी मागितली पण ती मिळाली नाहीं. परंतु डेप्युटी पोलिस इन्स्पेक्टर जनरलनें घरीं पत्रें लिहिण्याची मुभा दिली. तदनुसार मी दोन पत्रें वडिलांच्या व मुलाच्या नावें लिहिलीं. वडिलांना लिहिलेलें पत्र हरवलें गेल्यामुळें तें येथें देतां येत नाहीं. मुलाला लिहिलेलें पत्र पुढें दिल्याप्रमाणें होतें.

"प्रिय पुत्र,

प्राप्त स्थितींत शक्य तों आनंदांत रहाण्याचा मी प्रयत्न करीत आहें. एका गोष्टीबद्दल मला पूर्ण विश्वास आहे. ती ही कीं माझ्या उद्दिष्टापासून मी ढळणें शक्य नाहीं व माझ्या अंतःकरणांत कोणत्याहि प्रकारें निराशा किंवा दीनता यांचा शिरकाव होणें नाहीं. कोणत्याहि अवस्थेंत माझी रहाण्याची तयारी आहे. आपल्या आजोबांची व आईची सेवा कर, आपल्या प्रकृतीची काळजी घेत जा, आपल्या चुलत्याशीं प्रेमानें वाग आणि आपत्तींना धैर्यानें तोंड दे. प्रिय कृष्णालाहि माझा हाच निरोप सांग. तसेंच अमृत व प्रिय

कृष्ण हे आपल्या शिक्षणांत टंगळमंगळ करणार नाहींत, याविषयींहि काळजी घे. माझ्या मित्रांना माझे नमस्कार सांगून मीं आनंदांत असल्याचें त्यांना कळव. माझ्या अंतःकरणांत निराशा किंवा निरुत्साह यांचा बिलकुल शिरकाव झालेला नाहीं.

आपला मंगलाभिलाषी,

**लाजपतराय.**

नदीकिनाऱ्यावर पंजाबच्या पोलिस इन्स्पेक्टर जनरलनीं माझी रजा घेतांना पुढील उद्गार काढले—

You are leaving India. Let us see when you return."

[ आपण हिंदुस्थान सोडून चालला आहां. परत केव्हां येतां तें पहावें. ]

स्टीम लॉंचवर चढतांच पंजाब पोलिस इन्स्पेक्टर जनरलनें माझा फोटो काढून घेतला व बंगाल पोलिसखात्यांतील वरिष्ठ अधिकाऱ्याला सलाम करून रेल्वे स्टेशनाकडे रवाना झाला. बंगाली पोलिस अधिकारी मगरूर असून अति रुक्ष होता. इतरांशीं तो अति उद्दामपणें वागत असला तरी युरोपियन इन्स्पेक्टर व सबइन्स्पेक्टर यांच्याशीं मात्र फार गरिबीनें वागत असे. त्यांच्या बसण्या उठण्याची व सिगारेटची सुद्धां त्यानें तजवीज केली; परंतु खुर्च्या असूनसुद्धां मला मात्र एक खुर्ची द्यावी असें त्याला वाटलें नाहीं.

असो. थोड्याच वेळांत आमची लॉंच मोठ्या बोटीला लागली व लॉंचवरील सारें सामानसुमान बोटीवर चढविण्यांत आलें. सर्वांच्या शेवटीं नियोजित स्थानाकडे रवाना होण्याकरितां आमची स्वारीहि बोटीवर दाखल झाली.

बोटीवर हिंदु लोकांकरितां एक पाण्याचें मडकें भरून ठेवलेलें होतें. तसेंच मजुरांकरितां एका टोपलींत चणे वगैरे भरून ठेवलेले होते. या टोपली शेजारींच दुसऱ्या एका टोपलींत पीठ, डाळ वगैरे सामान भरून ठेवलेलें दिसलें. याशिवाय जवळच एका डब्यांत थोडेंसें तूप होतें. चौकशी अंतीं हें सर्व सामान माझ्याकरितां आहे असें कळलें.

थोड्याच अवधींत पाण्याचें मडकें बाजूला करून ठेवणें जरूर आहे असें आढळून आलें व तें बाजूला सारून ठेवण्यास मी जवळपासच्या उतारूंस सांगितलें.

मी स्वतःच तें बाजूला केलें असतें, परंतु तसें केल्यास मग इतरांना तें चालेल कीं नाहीं अशी शंका वाटल्यावरून मला हा एवढा द्राविडी प्राणायाम करावा लागला.

यानंतर माझ्या जागेसंबंधीं बोटीवरील कप्तानाचें व युरोपियन अधिकाऱ्याचें खलबत चाललें. युरोपियन अधिकाऱ्यानें स्वतःकरितां व हाताखालच्या युरोपियन सबइन्स्पेक्टराकरितां दोन स्वतंत्र केबिन मागून घेतले, आणि माझ्याकरितां व मुसलमान सबइन्स्पेक्टर व कॉन्स्टेबलांकरितां बिनहवेची व घाणेरडी अशी जागा दाखवून दिली. या जागेबद्दल मी तक्रार केली व कायद्यान्वयें माझ्या योग्यतेनुसार जागा देण्याला सरकार बांधलें गेलें आहे असें त्याला बजावलें. इतकें केल्यावर तो शुद्धीवर आला व "थोडा वेळ येथें काढा; तोंपर्यंत दुसऱ्या जागेची तजवीज करतों" असें सांगून तेथून निघून गेला. सुमारें एक तासानंतर तो पुन्हां आला व युरोपियन सबइन्स्पेक्टराची खोली माझ्याकरितां खालीं करण्यांत आली असल्याचें सांगून गेला. विचारपूस करतां या खोलीखेरीज दुसरी खोली मिळणें शक्य नसल्याचें समजलें. ही खोलीहि चांगली नसल्यामुळें बोटीवर असेपर्यंत मी डेकवरच झोंपत असें.

पहिल्या रात्रीं अपर डेकवर निजलों आणि दुसऱ्या व तिसऱ्या रात्रीं मुसलमान सबइन्स्पेक्टर व मी असे दोघेजण कंपॅनियन डेकवरील चौरस तक्त्यावर बिछाना टाकून पडून राहिलों. मुसलमान सबइन्स्पेक्टर व कॉन्स्टेबल दोघेहि वादळ असल्यामुळें आजारी पडले. मलासुद्धां दर्यावरील आजारानें पछाडलें व त्यामुळें बोटीवर असेपर्यंत मी फक्त नावालाच जेवल्यासारखें करीत होतों. कॉन्स्टेबल व सार्जंट हे दोघे मात्र मजेंत असून समुद्राच्या सफरीचा यथेच्छ उपभोग घेत होते. मुसलमान कॉन्स्टेबल व सबइन्स्पेक्टर या दोहोंपैकीं कोणालाहि स्वयंपाक करतां येत नसल्यामुळें व बोटीवरील खलाशांचें जेवण दोघांनाहि पसंत पडत नसल्यामुळें आणि हिंदु पोलिस शिपाई त्यांच्याकरितां जेवण करण्यास राजी नसल्यामुळें बिचारे दोघेहि हवालदिल होऊन गेले होते.

युरोपियन सबइन्स्पेक्टर व मी आमच्यांतलें थोडथोडें अन्न त्यांना देत असूं, परंतु तेवढ्यानें त्यांची भूक शमणें शक्य नव्हतें. त्यांचे हाल पाहून मला फार वाईट वाटलें. भारतीय सरकार आपल्या युरोपियन व हिंदी नोकरांची एकाद्या खास कामावर नेमणूक करीत असतें व अशा वेळीं युरोपियन नोकराची तेवढी

योग्य बडदास्त राखली जाण्याची तें काळजी घेतें; पण हिंदी नोकरांविषयीं कांहीं करण्याची जरूर आहे असें त्याच्या स्वप्नींहि येत नाहीं. सरकारच्या या मामुली वहिवाटीप्रमाणें माझ्याबरोबर असलेल्या या मुसलमान कामदारांची खास कामावर नेमणूक करण्यांत आली होती, पणं त्यांच्या जेवणाखाणाची मात्र अल्पस्वल्पहि व्यवस्था करण्यांत आलेली नव्हती. मग खास कामावर असल्यामुळें खास व्यवस्थेची गोष्ट कशाला ? अस्तु. एकाच सरकारच्या नोकरींत असलेल्या युरोपियन व हिंदी नोकरांच्या वागवणुकींतील हा अपमानकारक फरक पाहून मला अति वाईट वाटलें.

या हिंदी पोलिस शिपायांचा पगार फक्त ७–८ रुपये होता. या बाबतींत फक्त एकच शिपायी अपवाद होता. प्रस्तुतच्या प्रवासांत हे शिपायी स्वतःचा खर्च स्वतःच करीत होते. उलट युरोपियनांचा पगार भलाभक्कम असूनहि त्यांचा प्रवासखर्च मात्र सरकार स्वतःच्या तिजोरींतून चालवीत होतें. रंगूनला पोंचेपर्यंत समुद्रांतील वादळ शांत झालें नाहीं. बोटीवरील युरोपियन अधिकारी आमच्याविषयीं उदासीन होते. एकदोनदां बोटीवरील कप्तानानें चालू राजकारणाविषयीं माझ्याशीं चर्चा करण्याचा आव आणला, पण वंदेमातरम्, हिंदी लोक व बाबू सुरेंद्रनाथ बानर्जी यांविषयींचीं त्याचीं मुक्ताफळें ऐकतांच असल्या गोष्टी ऐकण्यास मी तयार नसल्याचें सांगून त्याच्याबरोबर भाषण करणें सोडून दिलें. कप्तानसाहेब अति तोंडाळ होते. नोकरांचाकरांशीं व खलाशांशीं बोलतांनाहि सहजासहजीं शिव्या हांसडण्यांत त्याला कांहींच दिक्कत वाटत नसे. एकदोन वेळ स्वयंपाक्याला मारतांनाहि मी पाहिलें. सर्व बोटीवर फक्त एकच इसम अधिकारी असूनहि आनंदी वृत्तीचा असलेला आढळला. हा इसम वयानें तरुण असून छोट्याशा हुद्द्यावर होता. ज्या ज्या वेळीं हा माझ्याजवळून जाई त्या त्या वेळीं माझ्याकडे पाहून तो लाजल्यासारखें दाखवी.

१२ मे रोजीं दुपार होण्यापूर्वी आमची बोट डायमंड बंदरांतून सुटली व १५ मे रोजीं दुपार होऊन गेल्यानंतर रंगून बंदरांत दाखल झाली. बोटीवरसुद्धां मी समुद्रांत उडी टाकून आत्महत्त्या करूं नये म्हणून युरोपियन पोलिस इन्स्पेक्टरानें माझ्यावर नजर ठेवण्याकरितां एका पोलिसाची नेमणूक करून ठेवली होती. इन्स्पेक्टराच्या या कृतीचें मला हंसूं येऊं लागलें. मी हंसत असलेला पाहून त्यानें हंसण्याचें कारण विचारलें. यावर " समुद्रांत उडी टाकून आत्महत्या करण्याची

माझी इच्छा नाहीं, दुसरें सरकार किंवा त्याचे हस्तक यांच्यापेक्षां माझ्या देश-बांधवांच्या दृष्टीनें माझ्या जिवाची किंमत अधिक आहे, तेव्हां कोणत्याहि कारणास्तव आपल्या पहाऱ्याची गरज आहे असें मला वाटत नाहीं " म्हणून सांगितलें. हा अधिकारी सज्जन होता व त्यानें माझ्या सुखसोयींविषयीं बरीच काळजी घेतली. असो. रंगून बंदर येतांच धक्क्यावरील लोकांच्या दृष्टीस मी पडूं नये म्हणून मला केबिनमध्यें जाण्यास सांगितलें गेलें. बराच वेळ केबिनमध्यें काढल्यावर धक्क्यावर नेण्याकरितां पोलिस कमिशनरासह लॉंच आली असल्याचें मला समजलें. थोड्याच वेळांत मला लॉंचमध्यें बसविण्यांत आलें. हा पोलिस कमिशनर वृद्ध असून अभिमानी होता. कैद्यांच्या सुखसोयींपेक्षां स्वतःच्या अधिकाराचें व बडेजावाचें स्तोम माजविण्यांत याला पुरुषार्थ वाटे. या महाशयांनीं मला डेकवर बसूं न देतां एका सलूनमध्यें पाठवून दिलें व लगेच देखरेखीसाठीं एका ब्रह्मी पोलिसाची नेमणूक करून दिली. पाऊस पडत असतांनाच आम्ही बंदरांत उतरलों. धक्क्यावर लोकांची फारशी गर्दी नव्हती. पोलिसाच्या पोषाखांत असलेले थोडेसे पंजाबी लोक इकडे तिकडे फिरत होते. माझ्यासाठीं एक गाडी आणली गेली व तींत मी बसतांच लाहोरपासून बरोबर आलेला युरोपियन पोलिस अधिकारी माझ्या शेजारीं बसला व समोर स्थानिक पोलिस कमिशनर विराजमान झाला.

या प्रकारें पोलिसांच्या हातांतून निसटतां येऊं नये अशा बंदोबस्तानें मला पांडुजुइंग स्टेशनावर आणण्यांत आलें. हें एक आडगांवांतील लहानसें स्टेशन असून रंगून स्टेशनापासून थोड्याशा अंतरावर आहे. कांहीं वेळपर्यंत आम्हीं गाडींतच बसून राहिलों व मेलगाडी येतांच शिपायांच्या पाहाऱ्यांतून रेल्वे पूल ओलांडून प्लॅटफॉर्मवर दाखल झालों. बोटीवर असल्या वेळेपासूनच नदी किनाऱ्यावरील घरें, देवळें व भवनें यांनीं माझें लक्ष वेधलें. हळूहळू ब्रह्मी स्त्रीपुरुष, बालक बालिकांचे चेहेरे दिसूं लागले. या ब्रह्मीसमुदायांत बरेचसे परदेशस्थ लोकहि होते. परकी लोकांत चिनी व हिंदी लोकांचें प्रमाण अधिक होतें. इरावती नदीच्या मुखांत आगबोट शिरतांच पहिल्या प्रथम ब्रम्हीलोक व ब्रह्मदेशस्थ इतर लोक यांच्या विचारांनीं माझ्या चित्तांत ठाणें दिलें. असें होण्याचें कारण काय असावें हें सांगणें कठीण आहे. बहुशः स्वदेशांतून हद्दपार होऊन त्यांच्या देशांत जात असल्यामुळें ब्रम्हदेशनिवासियांच्या सहानुभूतीची व साहाय्याची माझ्या

या स्थितींत मला आशा लागली असावी. ब्रम्हदेशासारख्या पौर्वात्य राष्ट्राला पहिल्यानेंच पाहतांच आशिया खंडाच्या राजकीय अधःपतनाचें चित्र समोर उभें राहून पौर्वात्य राष्ट्रांविषयीं माझ्या मनांत सहानुभूतीची भावना उत्पन्न झाली. ब्रम्ही लोकांना पाहून माझ्या मनांत अशा प्रकारचे विचार उत्पन्न होण्याचें कारण भारतवर्षापासून त्यांनीं बौद्ध धर्माचें ग्रहण केलें होतें हेंहि असूं शकेल. या धार्मिक संबंधानेंच माझ्या मनांत त्यांच्याविषयीं आपलेपणा उत्पन्न झाला असावा. कोणतेंहि कारण असो, ब्रह्मदेशांत आल्यानें मी एखाद्या परक्या ठिकाणीं आलों आहें असें कांहीं मला वाटलें नाहीं.

हिंदी लोकांना ( हिंदु, मुसलमान, पंजाबी, बंगाली, मद्रासी ) पाहून मला प्रेमाचें भरतें आलें. माझ्या दृष्टीनें हे सर्व मला आपल्या बंधूंप्रमाणें होते. हे सर्व एका विशेष सूत्रानें बांधले गेले असल्याचें मी अनुभवीत होतों व हें सूत्रच इतर अवांतर गोष्टींपेक्षां अधिक दृढ व योग्य आहे असें मला वाटत होतें.

मागें पुढें पहारा असलेल्या स्थितींत रेल्वेचा पूल ओलांडून जात असतां जवळून एक पंजाबी गेला. हा इसम माझ्या ओळखीचा नसला तरी त्यानें मात्र मला ओळखलें. मला या स्थितींत पहातांच त्याचा चेहेरा उतरून गेला व त्यावर दुःखाची छटा उमटल्याचें दिसूं लागलें. त्यानें केलेल्या सलामाला मी फक्त नेत्रसंकेतानेंच प्रतिसलाम केला. पूल उतरल्यानंतर थोड्या वेळानें पहिल्या वर्गाच्या खास डब्यांत पहारेकऱ्यांसह मला बसविण्यांत आलें. डब्यांत बसल्यावर मी सहजासहजीं खिडकींतून बाहेर पाहूं लागलों तों शेवटच्या डब्यांत पोलिसच्या पोषाखांत असलेले पंजाबी शीख माझ्याकडे टक लावून पहात असलेले व आपापसांत जोराजोरानें आवेशांत बोलत असलेले माझ्या दृष्टीस पडले. पोलिस कमिशनराची त्यांच्याकडे नजर वळतांच त्यानें त्यांना आपल्या जागीं जाऊन बसण्यास सांगितलें व मी बसलेल्या डब्याच्या खिडक्या बंद करून टाकण्याचा हुकूम सोडला. यापुढें मंडालेला गाडी पोंचेपर्यंत प्रत्येक स्टेशनावर माझ्या डब्याच्या खिडक्या बंद करण्यांत येऊं लागल्या. मंडालेला पोंचेपर्यंत दरम्यान विशेष असें कांहीं घडलें नाहीं; परंतु शेजारीं पहाऱ्यावर असलेले मुसलमान शिपाई स्वतःला माझ्याकरितां कांहीं करतां येत नसल्याबद्दल क्षणोक्षणीं व्यक्त करीत असलेली लाचारी व माझ्याविषयीं व्यक्त करीत असलेलें प्रेम व आदर हीं उल्लेखनीय नाहींत असें कोण म्हणेल ?

या ठिकाणीं माझ्यावर पहारा करण्याकरितां नेमण्यांत आलेल्या शिपायांविषयीं दोन शब्द लिहिणें अयोग्य होणें नाहीं. लाहोरापासून मंडालेपर्यंत माझ्यावर नजर ठेवण्यासाठीं म्हणून ज्या हिंदु व मुसलमान शिपायांची नेमणूक करण्यांत आली होती, त्यांच्या सहानुभूतीच्या व आपुलकीच्या वागणुकीचें मला केव्हांहि विस्मरण होणें शक्य नाहीं. हे लोक माझ्याशीं खुल्या दिलानें बोलत असत. विशेषतः एका तरुण मुसलमानाच्या अंतःकरणाची जी तळमळ चालू होती ती तर मी आजन्म विसरणें शक्य नाहीं. माझ्यावर कोसळलेल्या आपत्तीमुळें त्याला होत असलेलें दुःख व देशाची असहाय स्थिति या दोहोंचें चित्र रेखाटतांना त्यानें जे उद्गार काढले, त्यांनीं माझ्या हृत्पटलावर कायमचा ठसा उमटविला. इतरांनीं असले उद्गार काढले नसले तरी त्यांच्या चित्तवृत्तीहि अशाच प्रकारच्या वेदनांनीं बावरून गेल्या असल्याचें स्पष्टपणें निदर्शनास येत होतें. या सर्वांनीं प्रवासांत माझ्या सुखसोयींत अणुरेणूइतकेंहि उणें पडूं नये म्हणून अति मेहनत घेतली. या शिपायांपैकीं एकानें ब्रह्मदेशांतील प्रवासांत स्वतःच्या पैशानें केळीं विकत घेतलीं व मी तीं घ्यावीं म्हणून माझ्या पुढयांत ठेवलीं. त्याला वाईट वाटूं नये म्हणून मीं त्यांतील एक केळें उचललें, पण तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. बाकीचीं सगळीं नाहीं तर निदान थोडीं तरी घ्यावीं म्हणून तो आग्रह करूं लागला. परंतु नुसत्या आग्रहानें मी वळत नाहींसें पाहून तो म्हणाला, "आपली व माझी पुन्हां गांठ पडेलच असा मला भरंवसा वाटत नसल्यामुळें कृपा करून या वेळीं तरी माझा हिरमोड करूं नका." हे शब्द उच्चारीत असतां त्याचें अंतःकरण गहिंवरून आलें. त्याची ती भक्ति पाहून माझ्याच्यानें त्याच्या विनंतीचा अव्हेर करणें अशक्य झालें व मी आणखी केळीं घेतलीं. त्याला धीर देण्याच्या उद्देशानें मी म्हणालों, "थोड्याच अवधीनंतर मी पुन्हां स्वदेशीं परतेन अशी माझा अंतरात्मा मला ग्वाही देत आहे. याकरितां तूं परमेश्वरावर विश्वास ठेव व माझ्या परत येण्याविषयीं बेफिकीर रहा." माझे हे शब्द ऐकतांच बिचाऱ्याचें समाधान झालें.

पाश्चात्य दिखाऊ सभ्यतेची आंच न लागलेल्या भारतीय अंतःकरणाच्या पवित्रतेचा अनुभव घेण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग होता. ज्या व्यक्तीनें भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा प्रत्यय माझ्या अनुभवास आणून दिला होता ती

व्यक्ति गरीब शेतकरी वर्गापैकीं असून पोटाची खळगी भरण्याकरितां ७-८ रुपये पगारावर नोकरीस राहिलेली होती. ही व्यक्ति धर्मानेंहि भिन्न होती. परंतु भिन्न-धर्मी असतां व स्वतःची स्थिति अत्यंत असहाय असतांहि माझ्यावर आलेल्या आपत्तीविषयीं समवेदना प्रकट करण्याकरितां स्वतःचा एकमेव आधार जी नोकरी तीवरसुद्धां पाणी सोडण्यास ती तयार झाली होती. माझ्यावर नजर ठेवण्या-करितां मुसलमान शिपायांची नेमणूक करण्यांत धर्मभिन्नतेमुळें मुसलमान शिपायाला माझ्याविषयीं सहानुभूती वाटणार नाहीं व तो माझ्याशीं तिऱ्हाइताप्रमाणें वागेल असा अधिकाऱ्यांचा कयास असल्यास तो साफ चुकला असें म्हटल्या-खेरीज राहवत नाहीं. माझ्याबरोबरचे शिपायी मुसलमान असले तरी माझ्या-विषयीं त्यांना वाटत असलेली सहानुभूति त्यांनीं छपवून ठेवली नाहीं व माझ्या तैनातींत कोणत्याहि प्रकारें कमतरता पडूं दिली नाहीं. मंडालेला पोंचल्यावर या लोकांना सोडून जातांना मला फार वाईट वाटलें. गाडींतून उतरण्याच्या वेळीं स्टेशनावरून एकंदर लोकांची हकालपट्टी करण्यांत आलेली होती. परंतु इतकें सर्व केलें असतांहि स्टेशनासमोर उभ्या असलेल्या गाडींत बसण्यास जात असतां कांहीं पंजाबी लोक स्टेशनावरील कचेरीच्या खिडकींतून पहात असलेले आढळून आले. स्टेशनांतून बाहेर पडतों न पडतों तोंच सर्व्हंटस् ऑफ इंडिआ सोसायटीचे सभासद श्री. देवधर हे अचानक पुढें आले व त्यांनीं माझ्या चरणांना स्पर्श केला. अशा अपरिचित देशांत माझ्या या मित्राचा हस्तस्पर्श होतांच माझी अशी चमत्कारिक अवस्था होऊन गेली कीं क्षणैक माझें देहभान हरपलें.

कांहीं क्षणांपर्यंत मी याच स्थितींत होतों. गिरफ्दारीनें किंवा हद्दपारीनें माझ्या-वर कांहीं परिणाम केला नाहीं; परंतु आकस्मिक रीत्या घडून आलेल्या मित्राच्या या भेटीनें व त्यानें प्रकट केलेल्या आदरानें व आपुलकीनें मात्र माझी स्थिति चमत्कारिक करून सोडली. अस्तु. देवधरांना खालीं वांकलेले पहातांच पोलिसांना वाटलें कीं माझी सुटका करण्याचा ते प्रयत्न करीत असावेत. यामुळें इन्स्पेक्टरानें एकदम माझा दंड धरला व एका युरोपियन सार्जंटानें देवधरांना बाजूला सारलें. माझ्या मित्राच्या या आपुलकीच्या वर्तनाची नुसत्या संकेतानेंच मी संभावना केली. यानंतर दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं गाडींतून जात असतांना देवधरांना माझ्याकडे

पाहून नमस्कार करतांना पाहिलें. माझे हात खुले असल्यामुळें मीहि उलट त्यांना नमस्कार केला. झालेल्या प्रकारामुळें मला देवधरांविषयीं चिंता वाटूं लागली. कारण या एकंदर घटनेमुळें देवधरांवर पोलिसांची नजर रहाण्याचा व त्यांच्या कार्यांकडे बारकाईनें लक्ष पुरविलें जाण्याचा संभव होता. माझें हें अनुमान केवळ अनुमानच नव्हतें.

ता. १६ मे १९०७ रोजीं मी मंडाला स्टेशनावर दाखल झालों व तेथून गाडींतून रंगून येथील असिस्टंट पोलिस कमिशनराबरोबर किल्ल्यांत रवाना झालों. भरवस्ती टाळण्याकरतां एका लांबलचक रस्त्यानें मला नेण्यांत आलें. हा किल्ला इंग्रजी कादंबरींत आलेल्या किल्ल्यांच्या वर्णनाप्रमाणें एखाद्या उंच टेकडीवर असावा व त्याचा कोट भला उंच असावा असें मला वाटत होतें. परंतु प्रत्यक्ष पहातां माझा अंदाज साफ चुकला असल्याचें आढळून आलें. शहरांतील सर्व साधारण घरांप्रमाणेंच हा किल्ला होता, पण याच्या सभोवतीं खंदक होता एवढेंच. किल्ल्याच्या दक्षिण दरवाजानें आमची गाडी आंत शिरली व राजमहाल व राज-स्मशान यांच्या बाजूनें जाऊन एका युरोपीय पद्धतीच्या सुंदर कौलारू बंगल्याच्या आवारांत जाऊन उभी राहिली. या ठिकाणीं तुरुंगाचा सुपरिंटेंडंट आमची मार्ग-प्रतीक्षा करीत उभा होता. या वेळीं आकाश ढगांनीं भरून गेलेलें होतें व रात्रौ थोडासा पाऊसहि पडलेला होता. लाहोर पोलिस इन्स्पेक्टरानें मंडाला येथील तुरुंगाच्या सुपरिंटेंडंटच्या नावचें मला ताब्यांत घेण्याविषयींचें समन्स, माझ्या ३५० रुपयांच्या नोटा व माझा सोन्याचा छडा हीं माझ्या स्वाधीन करून त्याची पावती घेतली. समन्साच्या मागें माझी सही घेण्यांत आली. पुढें इन्स्पेक्टरानें प्रवासांत माझ्याकरितां घेतलेलें सामान (धोतर, पायजामे, वनियान वगैरे) माझ्या स्वाधीन करून त्याचीहि पावती घेण्यांत आली. हे सर्व विधि सुपरिंटेंडंटच्या कचेरींत झाले. सुपरिंटेंडंटानें या आपल्या अधिकारी पाहुण्यांचें योग्य आदरातिथ्य केलें व मला रहाण्याकरितां वरच्या मजल्यावरील तात्पुरत्या दोन खोल्या दिल्या. या दोन्ही खोल्या स्वच्छ व हवेशीर होत्या. खोलींत खुर्ची, टेबल, वेताची खाट, बिछाना वगैरे सामान ठेवलेलें होतें. याशिवाय वर उल्लेखिलेलें प्रवासांत घेतलेलें सामान होतेंच. सुपरिंटेंडंट इंग्रज असला तरी मनमिळाऊ व उदार होता. मी येतांच त्यानें माझ्या जेवणाखाणाची विचारपूस केली. यावर “ मला भारतीय

पद्धतीचें पंजाबी हिंदूनें तयार केलेलें जेवण हवें; पण सध्यां तशी सोय नसल्यास ती होईपर्यंत इंग्रजी पद्धतीचें चालेल " म्हणून त्यास सांगितलें. त्यानें एका मद्रासी छोकऱ्याला माझें जेवण तयार करावयास सांगितलें. सुपरिंटेंडंट फार चांगला इसम होता. त्यानें माझी योग्य व्यवस्था ठेविली जाईल असें मला सांगितलें. उन्हाळा असल्यामुळें मीं त्याला साधीं खमिसें देण्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं माझी पोटदुखी चाळवल्याचें कळवितांच त्यानें स्वतः येऊन माझी जीभ वगैरे पाहून औषधांची यादी तयार केली व औषध पाठवून देतों म्हणून सांगून निघून गेला. तो गेल्यावर मी पडून राहिलों.

माझ्यावर नजर ठेवण्यासाठीं आठ ब्रम्ही कॉंस्टेबल, एक युरोपियन सार्जंट व एक इंग्रजी जाणणारा ब्रम्ही सबइन्स्पेक्टर इतक्यांची योजना करण्यांत आली व रात्रींच्या वेळीं जिन्याच्या प्रत्येक वळणावर एकेक शिपाई ठेवण्यांत आला. खेरीज रात्रींतून कैकवेळ सबइन्स्पेक्टर व सार्जंट मी जागेवर आहें कीं नाहीं हें पहाण्यास माझ्या खोलींत येत ते निराळेच. याच दिवशीं संध्याकाळीं सुपरिंटेंडंटानें मी पळून जाणार नाहीं म्हणून माझ्याकडून अभिवचन घेतलें. पुढें असें झालें कीं झोंपण्याच्या वेळीं मी जुलाबाची गोळी घेतली असल्यामुळें पहांटेस मला झाड्याला जावें लागलें. मी झाड्याला गेलों असतां दरम्यान सार्जंटाची स्वारी मला पहाण्याकरितां माझ्या खोलींत आली व बिछान्यावर नसलेला पाहून गडबडून जाऊन माझ्या तलासास लागली. त्याची ती धांदल ऐकून संडासांतूनच मी त्या ठिकाणीं असल्याबद्दल त्याला इशारा दिला व त्याच्या काळजीचें निवारण केलें.

सकाळीं मला बरें वाटत नसल्यामुळें बराच वेळपर्यंत मी बिछान्यावरच पडून होतों. इतक्यांत सुपरिंटेंडंटानें कमिशनर व डेप्युटी कमिशनर मला पाहाण्याकरितां येत असल्याची वर्दी दिली. यावर त्यांना भेटण्यायोग्य माझा पोषाख नसल्याबद्दल मी त्याला कळविलें. परंतु पोषाखाविषयीं काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं म्हणून त्यानें उलट कळविलें. थोड्या वेळानें कमिशनर व डेप्युटी कमिशनर उभयतां माझ्या खोलींत आले व पांचसहा मिनिटें बसून माझ्या प्रकृतीविषयीं व गरजांविषयीं चौकशी करून निघून गेले. ते गेल्यावर सुपरिंटेंडंटानें येऊन माझ्या संमतीनें २ सफेद ड्रीलचीं खमिसें, २ टॉवेल, २ पांढरीं खमिसें, ६ उशांचे अभ्रे,

६ रुमाल, २ पायमोज्यांचे जोड, १ फणी, १ ब्रश, कागद, टांक, शाई, टिपकागद, २ बन्यानें व ६ हातरुमाल इत्यादि जिनसा मला आणून दिल्या.

वाचण्याकरितां मॅकार्थीच्या आठवणीचें पुस्तक दिलें गेलें. ब्रह्मी भाषा शिकण्याविषयीं सुपरिंटेंडंटनें मला सूचना दिली व अँग्लो–ब्रह्मी हँडबुक माझ्या स्वाधीन केलें. याखेरीज त्यानें एक मद्रासी छोकरा माझ्या तैनातीस ठेवून दिला व कॉन्स्टेबलच्या निगराणींत आवारांत हिंडण्याफिरण्याची मुभा दिली.

सुपरिंटेंडंटनें दिलेल्या या सवलतीचा मी फारच थोडा फायदा घेऊं शकलों. कारण माझ्याजवळ फक्त एक गरम कोटच असल्यामुळें तो घालून उन्हांत हिंडणें शक्य नव्हतें. पुढें माझ्याकरितां निराळ्या जागेची तजवीज करण्यांत आली. ही जागा सुपरिंटेंडंटच्या बंगल्याशेजारीं राजमहालाच्या बागेच्या उत्तर दिशेला होती. सुपरिंटेंडंटच्या बंगल्यावरील खोलींत मी दोनच दिवस होतों. या दरम्यान् बऱ्याच पंजाबी लोकांना माझ्याकडे पहात असतांना मी अवलोकिलें. यांपैकीं कांहींनीं मला नमस्कार केला. त्यांच्या या नमस्काराचा स्वीकार करून त्यांना पुढें चालूं लागण्यास मी इशारा केला.

गिरफ्दार झाल्याघटकेपासून व पुढें मंडाल्यांत असतांना आणि मियां मीर वेस्ट लाहोर छावणींतून हद्दपारींतून सुटका होईपर्यंत माझ्यावर कडक नजर ठेवण्यांत आलेली होती. माझ्या तैनातीकरितां ठेवलेल्या नोकरांखेरीज दुसऱ्या कोणालाहि माझ्याजवळ फिरकण्याची, भेटण्याची किंवा बोलण्याची मुभा नव्हती. या कालावधींत माझ्या मित्रांना किंवा नातेवाइकांनाहि मला भेटूं दिलें गेलें नाहीं. आगस्ट महिन्याच्या सुरवातीला पंजाब सरकारची परवानगी मिळाल्यास माझ्या नातेवाइकांस मला भेटूं देण्यास हिंदी सरकारची कांहीं आडकाठी नाहीं असें सांगण्यांत आलें. पण या सूचनेनुसार याच महिन्याच्या अखेरीस किंवा सप्टेंबर महिन्याच्या सुरवातीला माझ्या धाकट्या बंधूनें (लाला लजपतराय, बी. ए., एलएल. बी., वकील, फिरोजपूर) भेटण्याची परवानगी मिळावी म्हणून अर्ज केला असतां पंजाब सरकारनें तो नामंजूर केला. यावेळीं सर डॅनिअल इबर्टसन पंजाबचा गव्हर्नर होता. प्रत्यक्ष भावाच्या अर्जाची अशी वासलात लागल्यावर दुसरा कोणीहि परवानगी मागण्याच्या भानगडींत पडला नाहीं. असो.

माझ्यावर सख्त पाहारा ठेवण्यांत येत असे. रस्त्यापलीकडील मैदानांत दिवसा एक संत्री खड्या पहाऱ्यावर असे व बंगल्याच्या मागच्या बाजूस जाण्याच्या चक्री जिन्याच्या दरवाजाला बाहेरून कुलूप लावण्यांत आलें होतें. रात्रौ दोन्ही बाजूंस एकेक शिपाई ठेवलेला असे. याखेरीज युरोपियन सार्जंट व ब्रम्ही सबइन्स्पेक्टर हे दोघे दिवसा व रात्रौ कैकदां मी आहें कीं नाहीं हें पहाण्यास येत असत ते निराळेच. या नियमित पहारेकऱ्यांशिवाय किंवा नोकरांशिवाय दुसऱ्या कोणालाही बंगल्याच्या आवारांत पाऊल टाकण्याची परवानगी नव्हती. बंगल्यांतून बाहेर जातांना व आंत येतांना प्रत्येक वेळीं नोकरांची झडती घेण्यांत येत असे.

माझ्या पत्रांवर सक्त नजर ठेवण्यांत येई. माझ्या नावानें आलेल्या पत्रांपैकीं बरींचशीं गडप करण्यांत येत. गिरफ्दारी, हद्दपारी वगैरे शब्द ज्या पत्रांत लिहिलेले आढळून येत, त्या पत्रांचें तर मला दर्शनहि होत नसे. शिवाय ज्या पत्रांत लाहोरशहरांतील किंवा एकंदर देशांतील राजकीय चळवळीची हकीकत दिलेली असे अशीं पत्रें मला दाखविलींहि जात नसत. मी पाठवीत असलेल्या पत्रांपैकीं ज्यांत सुपरिंटेंडंट किंवा तुरुंगाच्या व्यवस्थेसंबंधी टीका केलेली असे अशीं पत्रें काट मारून पाठविण्यांत येत किंवा अजिबात गडप करण्यांत येत. परंतु ज्यांत सुपरिंटेंडंटची स्तुति केलेली असे तीं मात्र लगेच रवाना होत.

वर्तमानपत्रांनाहि बंदी होती. पहाऱ्यावर असलेल्या युरोपियन सार्जंटांनाहि पहाऱ्यावर असल्या वेळीं बरोबर वर्तमानपत्र न आणण्याबद्दल सक्त ताकीद होती. वाचण्याकरितां मी जीं पुस्तकें आणवीत असें तीं देतांना व नेतांना दोन्ही वेळ उलट्न सुलट्न तपासून पहाण्यांत येत असत.

प्रारंभीं फिरावयास जातांना युरोपियन सार्जंट बरोबर असे. परंतु कांहीं दिवसांनंतर दोन पोलिस शिपायांना बरोबर देण्यांत येऊं लागलें. फिरावयास गेल्या वेळीं कोणाला माझ्याशीं बोलण्यास किंवा जवळ येण्यास परवानगी नव्हती व कोणी तसा प्रयत्नहि केला नाहीं.

कांहीं सफेत पोषाखवाले गुप्त हेर मी रहात असलेल्या बंगल्याभोंवतीं गुपचुप रीतीनें फिरत असत व कोणी माझ्याशीं गुप्तपणें पत्रद्वारा किंवा इतर प्रकारें संबंध ठेवीत आहे कीं काय याविषयीं निरीक्षण करण्यांत गुंग असत. कांहीं दिवस

माझ्या रहात्या घरासमोरील रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या हिंदी लोकांना अनेक प्रकारच्या निर्बंधांनीं त्रास दिला गेला. हा प्रकार कांहीं पोलिस अधिकाऱ्यांनीं इतक्या विकोपास नेला कीं तो रस्ताच कांहीं कालपर्यंत हिंदी लोकांना बंद करून टाकण्यांत आला. या निर्बंधाचा अमल चालू असतां गाडींतून जाणाऱ्या श्रीमंत लोकांनासुद्धां त्या रस्त्यानें जात असतां मागें परतविण्यांत येई व अन्य मार्गानें जाण्यास भाग पाडलें जाई. ब्रह्मदेशच्या पोलिसखात्यांत शिपायांच्या व अधिकाऱ्यांच्या जागांवर पंजाबी लोकांचा बराच भरणा होता. परंतु हिंदी राजकीय कैद्यांवर नजर ठेवण्याकरितां मात्र यांची जाणून बुजून नेमणूक करण्यांत येत नसे. मी मंडाल्याला गेल्या वेळीं माझ्यावर नजर ठेवण्याकरितां नेमलेल्या युरोपियन सार्जंटांपाशीं खासगी कामाकरितां एकेक पंजाबी मुसलमान होता. परंतु माझें आगमन होतांच त्यांच्या जागीं ब्रह्मी इसमांची योजना करण्यांत आली. ज्या रस्त्यावर फिरण्याची मला परवानगी देण्यांत आली होती त्या रस्त्यावर जाण्याकरितां एका मोठ्या दरवाजांतून जावें लागत असे. या दरवाजावर संध्याकाळीं ६ पासून सकाळीं ६ पर्यंत पंजाबी शिपायांचा पहारा असे. परंतु मी आल्यावर लगेच त्यांच्या जागीं ब्रह्मी शिपाई दिसूं लागले.

कांहीं काळपर्यंत मला सलाम किंवा नमस्कार करणाऱ्या हिंदी लोकांना दम देण्यांत येत असे व त्यांच्यावर गुप्तपणें नजर ठेवण्यांत येऊन गुप्त हेरांमार्फत त्यांचा पिच्छा पुरविला जात असे. एके दिवशीं संध्याकाळीं दोघां भारतीयांना या रस्त्याच्या आजूबाजूला फिरकल्याच्या आरोपावरून पकडण्यांत आलें. यांपैकीं एकाला ताकीद देऊन सोडण्यांत आलें. दुसरा इसम शीख होता. डिस्ट्रिक्ट पोलीस सुपरिंटेंडंटला बोलावण्यांत येऊन त्याची जबानी घेण्यांत आली. त्याच्या बापाचें नांव व रहाण्याचा पत्ता याची पूसतपास झाल्यावर याचीहि सुटका झाली. हा इसम रिटायर्ड ओव्हरसियर होता व त्या वेळीं ब्रह्मदेशांतील पब्लिक वर्क्स खात्यांत कंत्राटानें काम करीत होता. माझी ओळख आहे कीं काय व मला नमस्कार कां केला म्हणून त्याला विचारण्यांत आलें. यावर त्यानें "मी यांची कीर्ति ऐकलेली आहे. हे एक मोठे महात्मा असल्यामुळें यांना पहातांच नमस्कार करणें हें मी आपलें कर्तव्य समजतों" म्हणून जबाब दिला. यावर यापुढें असें करणार नाहीं म्हणून कबुली देण्यास तयार आहां काय म्हणून विचारण्यांत आलें.

पण त्यानें साफ नाहीं म्हणून सांगितलें. या इसमानें आपण या देशांत व्यापारानिमित्त आल्याचें व येथील पंजाबी धर्मशाळेंत रहात असल्याचें सांगितलें. शेवटीं या रस्त्यावर परत न फिरकण्याविषयीं ताकीद देण्यांत येऊन त्याला सोडण्यांत आलें.

स्वतःच्या देशबांधवांचा अपमान करण्यांत येत असलेला पाहून मला फार वाईट वाटे. पण करणार काय ? लाहोर येथील एका मित्राला पत्र लिहून त्यांत वरील घटनेचा उल्लेख केला व त्याला या ठिकाणच्या भारतीयांना मला नमस्कार करून अपमानित न होण्याबद्दल विनंति करावी म्हणून लिहिलें व असले प्रत्यहीं घडणारे अपमान पाहाण्याऐवजीं फिरावयास न जाण्याचें ठरविलें. माझें हें पत्र पाठविलें गेलें नाहीं व मीहि फिरावयास जाण्याचें सोडलें. पुढें फिरावयास न जाण्याचें कारण विचारण्यांत आलें असतां मला जें वाटत होतें तें मी स्पष्टपणें सांगून टाकलें. यावर सुपरिंटेंडेंटनें यापुढें असले प्रकार घडणार नाहींत म्हणून आश्वासन दिलें. परंतु या आश्वासनानंतरहि पुढें बरेच दिवस हे प्रकार चालू असल्याचें मला माहित आहे. हिंदुस्थानी शिपायांना मला नमस्कार न करण्याविषयीं खास ताकीद देण्यांत आली असल्याचें युरोपियन सार्जंटांमार्फत कळलें. परंतु वरिष्ठांच्या या हुकुमाची पर्वा न करतां कांहीं शिपायी मला नमस्कार करीतच असत. टोळी टोळीनें कामावर जात असतां कैक वेळ सहजासहजीं यांची माझी भेट होई व अशा प्रत्येक वेळीं मला लष्करी थाटाची सलामी देण्यास ते मागें पुढें पहात नसत.

साधारणपणें असले प्रकार टाळण्याचा मी शक्य तों प्रयत्न करीं. समोरून हिंदी इसम येत असलेला दिसला कीं मी तो रस्ता सोडून दुसऱ्याच बाजूला वळें. आवारांत व्यायाम करीत असतां आसपास हिंदी लोक उभे असलेले दिसले कीं मी व्यायाम बंद करून आंत चालता होई. परंतु मी इतकी काळजी घेत असतांहि चुकून माकून मिळालेल्या संधीचा फायदा घेण्यास हिंदी लोक चुकत नसत.

एक दिवस दुसऱ्या एका प्रतिष्ठित शिखाला अटक करण्यांत आली. याचा अपराध इतकाच होता कीं माझें दर्शन व्हावें म्हणून तो रस्त्यावर उभा होता व मी दृष्टीस पडतांच त्यानें मला नमस्कार केलेला होता. नमस्कार करीत असतांनाच त्याला पकडून जिल्हा पोलिस सुपरिंटेंडंटच्या कचेरींत पाठविण्यांत आलें. ब्रम्ही सब-इन्स्पेक्टरानें त्याला शिव्या देऊं लागतांच दोघांत तक्रार झाली. दोघांच्या

या खडाजंगींत इन्स्पेक्टराला " यांना नमस्कार केलेलें सरकारला चालत नसतां तुम्ही नमस्कार कां करितां " म्हणून प्रश्न करतांना मी ऐकलें. यावर त्या शिखानें " या बाबतींत कोणत्याहि प्रकारें सरकार आम्हांला बंधन घालूं शकणार नाहीं " असें रोखठोक उत्तर दिलें.

एकदां सरकारी कारखान्यांतील एका चपराशाला नमस्कार करण्याच्या गुन्ह्याबद्दल पकडण्यांत आलें व थोड्या वेळानें सोडण्यांत आलें. ही गोष्ट कोठेंहि नमूद करण्यांत आलेली नाहीं किंवा हिची वाच्यताहि करण्यांत आलेली नाहीं हें मला पक्कें माहित आहे. ज्या दिवशीं हा प्रकार घडून आला, त्या दिवशीं मी फिरल्यासारखें करून परतलों व पुढें कोणत्याहि युरोपियन सार्जंटाबरोबर फिरावयास जाणें बंद केलें. एके वेळीं एका दहा वर्षांच्या मुसलमान मुलानें, तो पकडला जाईल या भीतीमुळें बाप मना करीत असतांहि, मला सलाम केला. या प्रकारें नाना प्रकारच्या अडचणी उपस्थित करण्यांत येत असतांहि किल्ल्यांत काम करण्यासाठीं येणारे व त्या रस्त्यानें कामावर जाणारे असे बरेचसे पंजाबी नमस्कार करण्यास चुकत नसत.

यांपैकीं कांहीं जणांना पाहारेकऱ्यांचा डोळा चुकवून सलाम करतांना किंवा अन्य प्रकारें माझ्याविषयींचें प्रेम व्यक्त करतांना अवलोकन करतांच मला कसेंसेंच वाटे. ज्या रस्त्यावर मी फिरावयास जात असें, त्याच्या एका कडेनें युरोपियनांचे बंगले होते. या युरोपियनांकडे मद्रासी नोकर होते. या मद्राशांचीं तीन पासून अकरा वर्षांचीं मुलें मला फिरतांना पहात असत. पुढें हळू हळू हीं मुलें माझी येण्याची वाट पाहूं लागलीं व मी दृष्टीस पडतांच इतरांचें पाहून नमस्कारहि करूं लागलीं. मुलांचें हें अकृत्रिम प्रेम पाहून मी त्यांना जवळ घेऊन त्यांच्या पाठीवरून हात फिरवीं व केव्हां केव्हां पैसेहि देईं. बरोबर असणाऱ्या पाहारेकऱ्यांपैकीं जे समंजस होते त्यांनीं इकडे लक्ष दिलें नाहीं, परंतु एकानें विचारलें कीं, " तुमची व या मुलांची ओळख कशी व कोठली ?"

यावर तिरस्कारानें "फिरावयाला येऊं लागण्यापूर्वी यांचें दर्शनहि झालेलें नव्हतें, मग ओळख कसली ?" इतकेंच उत्तर दिलें. हें उत्तर ऐकून बिचाऱ्याला नवल वाटलें.

एकदां पहांटे चार वाजतां मी प्रार्थना करावयास बसलों असतां कर्मधर्मसंयोगानें त्याच वेळीं एक शीख जपजीचा पाठ करीत होता. पाहाऱ्यावर असलेल्या युरोपियन सार्जंटाला वाटलें कीं जपजीच्या पाठाच्या मिषानें हा माझ्याशीं आपल्या भाषेंत बोलत असावा. संशय येतांच मी जागा आहें कीं काय हें पहाण्यास तो माझ्या खोलींत आला. मी बसलेला पाहून त्याचा संशय दुणावला असावा असा माझा अंदाज आहे. मला ज्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलें होतें त्याच्या दोहों बाजूंस हिरव्या चार गवताचीं कुरणें होतीं. पलटणींतील गवळी व मेंढपाळ मेंढरें व गुरें चरविण्याकडे यांचा उपयोग करीत असत. हे गवळी व मेंढपाळ पंजाबी होते व यांना पंजाबीव्यतिरिक्त दुसरी कोणतीहि भाषा अवगत नव्हती. मूळचें घरदार सोडून समुद्रपार इतक्या दूरच्या देशांत आलेल्या या लोकांना आपलीं मूळचीं खेडवळ गाणीं गाण्यांत जो आनंद वाटे, त्यांची सर दुसऱ्या कशालाहि येण्यासारखी नव्हती. परंतु या एकमेव आनंदाचा उपभोग घेण्याचा त्यांनीं या ठिकाणीं चुकून प्रयत्न करण्याचा अवकाश कीं पाहारेकऱ्यांच्या मनांत भलताच संशय येई व ते आपल्या कर्कश आवाजानें त्यांना गप राहाण्यास हुकूम सोडीत आणि असा हुकूम सुटतांच या बिचाऱ्यांना आपल्या जनावरांसह पुढचा रस्ता धरणें भाग पडे.

मंडाले येथें असतांना मी एक वेळ चष्मा बदलण्याकरितां जनरल हॉस्पिटलांत गेलों होतों. याखेरीज किल्ल्यांतून बाहेर पडण्याची दुसरी अशी संधी मिळाली नाहीं. एक दोन वेळ फिरावयाला जाण्याला सुद्धां बंदी करण्यांत आली होती. याचें कारण कांहीं पंजाबी मुद्दाम मला भेटण्याकरितां व माझ्याशीं खलबत करण्याकरितां ब्रह्मदेशांत आले असल्याची सरकारला कुणकुण लागली होती हें होय.

पार्लमेंटाच्या रिपोर्टांत दिलेलीं १९०७ सालीं ९ जुलई रोजीं झालेलीं प्रश्नोत्तरें वाचल्यास हिंदी व ब्रम्ही राजकीय कैद्यांविषयीं लोकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्यासाठीं वाटेल तें सांगून खरी हकीकत कशी दडपून ठेवण्यांत येत असे तें कळून येईल.

मि. विलियम रेडमंड—चौकशीविना हद्दपारीची शिक्षा झालेल्या राजकीय कैद्यांस त्यांच्या आप्तेष्टांस भेटण्याची परवानगी दिलेली आहे काय ?

मोर्ले—लाला लजपतराय व अजीतसिंह या दोघांनाहि आपापल्या इष्टमित्रांस भेटण्याची सवलत दिलेली आहे. त्यांचा पत्रव्यवहार मात्र योग्य प्रकारें तपासून

नंतर रवाना करण्यांत येतो. याचें कारण असें कीं त्यांत लिहिल्या गेलेल्या एखाद्या भलत्याच मजकुरानें देशांत अशांति उत्पन्न होऊं नये. माझ्या माहितीप्रमाणें आतांपर्यंत या उभयतांना भेटण्याची इच्छा कोणीहि प्रकट केलेली नाहीं. यापुढें कोणाला भेटण्याची इच्छा झाल्यास त्याला भलतीच बातमी पसरली जाऊं नये म्हणून योग्य निरीक्षणांत भेटूं दिलें जाईल.

मि. रेडमंड—या कैद्यांना त्यांच्या इष्टमित्रांना भेटण्यास सुगम पडेल अशा एखाद्या जवळपासच्या ठिकाणीं ठेवणें शक्य आहे काय? सध्याची त्यांची जागा इतकी दूरची आहे कीं मनांत असलें तरी इतक्या लांब भेटण्यासाठीं म्हणून जाणें कोणालाहि शक्य नाहीं.

मोर्ले—आपल्या म्हणण्याप्रमाणें स्थानपरिवर्तन केल्यास मग ती हद्दपारी होणार नाहीं इतकेंच.

रेडमंड—किलमेनहम येथील आयरीश राजकैद्यांना ज्या सवलती देण्यांत आल्या होत्या त्याच सवलती हिंदी राजकीय कैद्यांनाहि देण्यांत येतील असें भारत-मंत्री वचन देऊं शकतील काय?

मोर्ले—ज्या वेळीं मीं आयर्लंडचा गव्हर्नर होतों, तेव्हां तेथें राजकीय कैदी म्हणून कोणीच नव्हता. दुसरें त्या वेळीं राजकीय कैद्यांना काय काय सवलती देण्यांत आल्या होत्या तेंहि मला आठवत नाहीं.

रेडमंड—भारतमंत्र्यांना आठवत नसल्यास मी सांगतों.

मेकनस—राजकीय कैद्यांना कायदेपंडितांशीं पत्रव्यवहार करण्याची मुभा दिलेली आहे काय?

मोर्ले—माझ्या माहितीप्रमाणें असावीसें वाटतें.

यापूर्वी आलेल्या हकीकतीवरून मोर्ले यांनीं दिलेल्या उत्तरांत कितपत तथ्यांश होता हें वाचकांना समजून येईल. हद्दपारीच्या वेळचीं पत्रें मला मागाहून देण्यांत आलीं, यावरूनहि कॉमन्स सभेंत पत्रव्यवहारासंबंधीं मोर्ले यांनीं जें स्पष्टीकरण केलें होतें तें कसें चुकीचें होतें हें दिसून येतें. ज्या पत्रांत लेखकांच्या घरची व त्यांच्या मित्रांची नुसती खुशाली होती अशीं पत्रेंहि विनाकारण अटकवून ठेवण्यांत आलीं होतीं. याचप्रमाणें नुसती सहानुभूति दाखविणाऱ्या पत्रांचीहि वासलात

लावण्यांत आलेली होती. दुसरीं कांहीं पत्रें तर मला केव्हांच देण्यांत आलीं नाहींत. माननीय गोखल्यांनीं मंडालेच्या पत्त्यावर आपण एकदोन पत्रें पाठविल्याचें पुढें एकदां सांगितलें होतें. आश्चर्याची गोष्ट ही कीं या दोहोंपैकीं अखेरपर्यंत मला एकाचेंहि दर्शन घडलें नाहीं. याशिवाय श्रीमती क्लेयर ( श्री. डब्ल्यू. सी. बॅनर्जी यांची इंग्रज बॅरिस्टराबरोबर विवाह झालेली कन्या ) यांचें पत्रहि माझ्याकडे पाठविलें असल्याचें गोखल्यांनीं सांगितलें. हें पत्रहि मला मिळालेलें नाहीं. अशीं हीं सर्वसाधारण पत्रेंसुद्धां कां दिलीं गेलीं नाहींत हें कळणें कठीण आहे. असो.

हद्दपारीनंतर झालेल्या या शिक्षेविरुद्ध मी एक दोन अर्ज केले. पहिला अर्ज २६ जून रोजीं लिहून तो सुपरिंटेंडंटच्या स्वाधीन केला. या अर्जापूर्वीं कांहीं दिवस मी आपल्या शिक्षेविरुद्ध तक्रार केली असल्यास तिचें स्वरूप काय आहे अशाविषयीं पार्लमेंटांत प्रश्न केला गेल्याचें कळलें होतें. या बातमीनें पार्लमेंटांतील माझे मित्र मला दिलेल्या शिक्षेविषयीं माझें स्वतःचें म्हणणें काय आहे हें जाणून घेण्यास उत्सुक असावे असें मी अनुमान केलें.

उपरोक्त बातमी समजण्यापूर्वी अर्ज करण्याची माझी बिलकुल इच्छा नव्हती. परंतु तत्पूर्वी हिंदुस्थान सरकारच्या ज्या हुकुमान्वयें शिक्षा ठोठावण्यांत आली होती त्या हुकुमाची नक्कल मिळून त्यांत कोणतीं कारणें नमूद केलेलीं आहेत हें कळावें म्हणून त्या हुकुमाची नक्कल मिळण्याकरितां मी एक अर्ज केला होता. या अर्जाला खालीं दिलेलें उत्तर मिळालें.

गव्हर्मेंट ऑफ इंडिया,<br>
होम डिपार्टमेंट,<br>
ता. ७ मे १९०७.

जेल सुपरिंटेंडंट,<br>
मंडाले जेल.

ज्या अर्थी योग्य पुराव्याच्या आधारावर राधाकृष्णाचे पुत्र लाला लजपतराय यांना मंडाले येथें तुमच्या खास देखरेखीखालीं ठेवणें जरूर आहे असें गव्हर्नरजनरलानें ठरविलें आहे, त्या अर्थी उपरिनिर्दिष्ट व्यक्तीला आपल्या खास देखरेखीखालीं ठेवून

तिच्याशीं गव्हर्नर जनरलाच्या हुकुमाप्रमाणें व १८१८ च्या रेग्युलेशन कायद्याच्या तिसऱ्या कलमान्वयें आपण व्यवहार ठेवावा असा हुकूम सोडण्यांत येत आहे. ''

गव्हर्नर जनरलच्या हुकुमावरून
**एच. एच. रिस्ले,**
चिटणीस, होम डिपार्टमेंट.

या अर्जाशिवाय वर्तमानपत्रें वाचण्यास मिळावीं म्हणून मी अधिकाऱ्यांची परवानगी मागितली होती; परंतु तीहि दिली गेली नाहीं. ही परवानगी कां देण्यांत आली नाहीं तें मला समजत नाहीं. कदाचित् स्थानिक अधिकाऱ्यांच्या खुनशी-पणाचा हा परिणाम असावा. शेवटीं हिंदुस्थान सरकारचें या बाबतींत काय मत आहे हें समजून घेण्यासाठीं जेल सुपरिंटेंडंटमार्फत मी एक अर्ज केला. सुपरिंटेंडंटनें हा अर्ज वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रवाना केला, पण उत्तर आलें कीं वर्तमानपत्रें न देण्याचा अधिकाऱ्यांनीं जाणूनबुजूनच हुकूम दिलेला आहे. हिंदुस्थानांतील परिस्थिति काय आहे हें कळण्याकरितांच हा सारा खटाटोप होता, पण त्याचा कांहींच उपयोग न झाल्यानें माझा मात्र एकप्रकारें हिरमोड झाला.

यापूर्वी कांहीं दिवस आधीं घरीं पत्र पाठवून १८१८ च्या रेग्युलेशनची प्रत मागविली होती; पण ब्रह्मी सरकारची परवानगी मिळेपर्यंत ती माझ्या स्वाधीन करण्यांत आली नाहीं. पुढें ही प्रत हातांत पडतांच मी त्या कलमाचें बारकाईनें निरीक्षण केलें; परंतु त्यांत वर्तमानपत्रें न देण्यासारखें एकही विधान माझ्या अवलोकनांत आलें नाहीं. वर्तमानपत्राच्या बाबतींत झालेल्या या अन्यायाचें परिमाजन करण्यासाठीं व हद्दपारीविषयीं प्रतिवाद करण्याकरितां हिंदुस्थान सरकारकडे एक अर्ज करण्याचा मी निश्चय केला व लगेच एक कच्चा खर्डा तयार केला. हा कच्चा खर्डा पक्का करण्यापूर्वी जेल सुपरिंटेंडंटला दाखवून त्याचें मत विचारिलें. त्यानें तो वाचून पाहून त्यांत असलेला माझ्या स्वास्थ्या-संबंधाचा व शेवटीं केलेल्या विनंतीचा मजकूर गाळून टाकण्यास सांगितलें. त्याचें हें म्हणणें मला पटलें नाहीं.

या अर्जाची अस्सल नक्कल आज माझ्याजवळ नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. २६ जुलई रोजीं ब्रह्मी सरकारच्या मागण्यावरून मी नुसत्या आठवणीनेंच

त्याची एक नक्कल तयार केली व जेल सुपरिंटेंडंटच्या स्वाधीन केली. आजही पुन्हां नुसत्या आठवणीवरूनच याखालीं देत आहें.

नेकनामदार

**हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल**

यांच्या हुजुरास—

नम्रतापूर्वक अर्ज करण्यांत येतो कीं—

नेकनामदारांचा अर्जदार हा राजकीय कैदी असून मंडाले येथील डफरीन किल्ल्यांत अटकेंत आहे. अर्जदारास लाहोर येथें १८१८ च्या रेग्युलेशन कायद्याच्या तिसऱ्या कलमानुसार ता. ९ मे १९०७ रोजीं आपल्या वारंटानुसार पकडण्यांत येऊन हद्दपार करण्यांत आलेलें आहे.

आपल्या या अर्जदाराला अटकेच्या वेळीं किंवा त्यानंतरहि कोणत्या अपराधास्तव शिक्षा देण्यांत येत आहे किंवा आलेली आहे हें सांगण्यांत आलेलें नाहीं.

आपल्या अर्जदाराला रेग्युलेशन कायद्यान्वयें शिक्षा देण्यासारखें त्याच्या हातून कोणतें कृत्य घडलें आहे तें माहीत नाहीं.

अटकेच्या वेळीं किंवा नंतर हिंदी सरकारच्या अमलाखालीं असलेल्या हिंदी मुलखांत किंवा वसाहतींत शांतताभंग होण्याचा संभव होता या आरोपाचा आपला अर्जदार नम्रतेनें पण जोरदार शब्दांत इन्कार करतो.

आपला अर्जदार सन्मानपूर्वक पण जोरदार शब्दांत आपल्यापुढें मांडूं इच्छितो कीं बादशहाच्या हिंदी मुलखांत अशांतता उत्पन्न होण्यासारखें किंवा १८१८ च्या रेग्युलेशन कायद्याच्या तिसऱ्या कलमाखालीं खटला भरण्यासारखें कार्य त्यानें केलेलें नाहीं किंवा करण्याचा प्रयत्नहि केलेला नाहीं.

आपल्या अर्जदाराचा समज आहे कीं त्याच्या हितशत्रूंनीं केलेल्या रिपोर्टांमुळें व खरी हकीकत ठाऊक नसलेल्या अधिकाऱ्यांकडे त्यांनीं केलेल्या चुगल्यांमुळें उत्पन्न झालेल्या गैरसमजांना तो बळी पडलेला आहे.

आपला अर्जदार नम्रतापूर्वक विनंति करतो कीं कोणत्या कारणांकरितां व कोणत्या आधारांवर १८१८ च्या रेग्युलेशन कायद्याच्या तिसऱ्या कलमानुसार शिक्षा देण्यांत आली आहे हें त्याला कळविण्यांत यावें. म्हणजे त्याच्यावर ठेव-

लेल्या आक्षेपांना त्याला उत्तर देतां येऊन त्याला आपलें म्हणणें पुढें मांडतां येईल. असें झाल्यानें या बाबतींत सरकारास योग्य फेरविचार करण्यास सवड मिळेल.

आपला अर्जदार सुरवातीपासून शांतपणें समाजसेवेचें कार्य करीत आलेला आहे. आपल्या देशबांधवांना शिक्षित करणें, अनाथांना, विधवांना व दुष्काळ-पीडितांना मदत करण्यांत आणि कांगडीमध्यें भूकंपानें संकटांत सांपडलेल्यांचें संरक्षण करण्यांत त्यानें आपला वेळ घालविलेला आहे. याखेरीज तीन वर्षें त्यानें म्युनिसिपल कमिशनर या नात्यानें सेवा बजावलेली असून गेलीं पंचवीस वर्षें तो वकिलीचें काम करीत आहे.

गेल्या २५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनांत अशांति फैलाविल्याबद्दल आपल्या अर्जदाराविषयीं कोणालाहि कधींसुद्धां शंका आलेली नाहीं व उपरिनिर्दिष्ट कलमाखालीं येण्यासारखें कृत्यहि त्याच्या हातून घडलेलें नाहीं.

आपला अर्जदार यकृताच्या विकारानें व पोटदुखीनें नेहमीं आजारी असतो. याखेरीज झोंप न लागण्याची व्यथा त्याला जडलेली आहे. या सर्व विकारांविषयीं लाहोरांतील त्याच्या चिकित्सा करणाऱ्या डॉक्टरांजवळ चौकशी केल्यास आपली खात्री होईल. सध्याच्या नवख्या मुलखांत व हवेंत शारीरिक व्यायाम घेण्याला सक्त निर्बंधांमुळें योग्य सवलती नसल्यामुळें त्याची प्रकृति बिघडण्याचा फार संभव आहे.

अर्जदाराची विनंति आहे कीं त्याची सुटका लवकर होण्यासारखी नसल्यास कोणत्या कारणास्तव त्याला ही शिक्षा देण्यांत आलेली आहे हें त्याला कळविण्यांत यावें व या अर्जाची सोबतची नक्कल बादशहाकडे रवाना करण्यांत यावी. तसेंच या अर्जाचा विचार होईपर्यंत खालील सवलती त्याला देण्यांत याव्या.

(१) हिंदी व विलायती वर्तमानपत्रें वाचण्यास देण्यांत यावीं. वर्तमानपत्रांभावीं त्याचें येथलें जीवन कंटाळवाणें व अत्यंत एकलकोंडें झालेलें आहे.

(२) घराहून आपला नोकर आणण्यास त्याला परवानगी मिळावी.

किती मुदतीपर्यंत व कोणत्या कारणास्तव ही हद्दपारीची व नजरकैदेची शिक्षा देण्यांत आली आहे हें आपल्या अर्जदाराला कळविण्यांत आल्यास तो आपली

मोठी मेहेरबानी मानीन व या आमल्या मेहेरबानीकरितां तो आपला सदैव कृतज्ञ राहील.

किल्ले डफरीन, मंडाले, ता. २९-६-१९०७ } नेकनामदारांचा नम्र अर्जदार, लजपतराय, लाहोर.

जेल सुपरिंटेंडटनें हा अर्ज सरळ व्हाइसरॉयांकडे रवाना केला. पुढें ६ आगष्ट रोजीं या अर्जाला हिंदी सरकाराकडून आलेलें उत्तर मला वाचून दाखविण्यांत आलें. या उत्तराची मी नक्कल मागितल्यावरून खालीं लिहिलेला मजकूर ज्या चिटोऱ्यावर होता तें चिटोरें मला देण्यांत आलें.

( १ ) डफरीन किल्ल्याबाहेर आपण फिरावयास जाऊं शकत नाहीं.

( २ ) पोलिसांचा पाहारा व बंदोबस्त ढिला करतां येत नाहीं.

( ३ ) शिक्षा होण्यास झालेलीं कारणें व कृत्यें यापूर्वी दिग्दर्शित करण्यांत आलेलीं आहेत; त्याहून जास्त हिंदी सरकार सांगूं इच्छित नाहीं. प्रांतीय सरकारामार्फत बादशहाकडे अर्ज पाठविला जाणें जरूर आहे.

( ४ ) स्वतःचा नोकर व वर्तमानपत्रें देतां येत नाहींत.

( ५ ) शिक्षेची अवधि किती आहे हें सांगतां येत नाहीं.

( ६ ) आप्तेष्टांनीं भेटण्यास हरकत नाहीं. परंतु भेटण्यापूर्वी त्यांनीं पंजाब सरकारची परवानगी मिळविणें जरूर आहे.

हिंदी सरकाराकडून अशाच प्रकारचें एखादें उत्तर येईल अशी माझी अटकळ होती. घोडागाडींतून किंवा मोटारींतून फिरावयास जाण्याची मला फिकीरच नव्हती, परंतु वर्तमानपत्रें वाचावयास दिलीं जाण्यास नाकारलें जाईल असें मात्र मला वाटलें नव्हतें. बादशाहाकडे रवाना करण्यास पाठविलेली अर्जाची प्रत पाठविली न जातां प्रांतिक सरकारामार्फत धाडण्यास लिहिल्याचें वाचून मला हंसूं येऊं लागलें. माझ्या मताप्रमाणें ज्याला कायद्याची किंवा दुसरी कसली सल्ला मिळणें शक्य नव्हतें व जो जेल सुपरिंटेंडटशिवाय अन्य रीत्या आपला अर्ज पाठवूं शकत नव्हता, अशा कैद्याला त्यानें योग्य मार्गानें आपला अर्ज पाठविला नाहीं म्हणून सांगणें म्हणजे थट्टा करणेंच होय. कदाचित् हिंदी सरकार हद्दपारीच्या या एकंदर प्रकाराला

इतका टाकाऊ समजत असावें कीं त्याविषयीं बादशहाला केलेला अर्ज पुढें रवाना करण्यास त्याची त्यालाच लाज वाटली असावी व यामुळें योग्य मार्गाचा बहाणा करणें त्याला भाग पडलें असावें. वास्तविक पहातां बादशहाकडे जावयाचा अर्ज कोणत्या मार्गानें पाठवावयाचा हें पहाणें जेल सुपरिंटेंडंटचें काम होतें; परंतु त्याच्या अज्ञानामुळें ही चुकी झाली. अशा या त्याच्या नेणतेपणीं घडलेल्या चुकीबद्दल मजसारख्या असहाय कैद्याला जबाबदार धरणें अन्याय्य होतें. असो. उपरनिर्दिष्ट उत्तरानें मी उदास झालों व आतांपर्यंतच्या अर्जांचा कांहींच उपयोग झालेला नसल्यामुळें यापुढें अर्ज करण्याच्या भानगडींत न पडण्याचा निश्चय केला.

हिंदुस्थानचा कारभार मोर्लेसारख्या राजनीतिज्ञाच्या शिक्कामोर्तबानें चालेला असून बादशहा हे कायद्यानें बनविलेले राजे आहेत व हिंदुस्थानच्या कारभारांत ते हात घालूं शकत नाहींत हें मला ठाऊक होतें. तरीहि बादशहांना अर्ज करण्यांत राजकीय कैद्यांना हिंदुस्थानांत कसें निष्ठुरतेनें वागविण्यांत येतें आणि माझ्या सारख्या सुशिक्षित व उच्च दर्जाच्या इसमाला वर्तमानपत्रेंसुद्धां वाचण्यास दिलीं जात नाहींत हें त्यांच्या नजरेस आणावें इतकाच माझा हेतू होता.

हिंदुस्थान सरकारकडून आलेल्या या टोलवाटोलवीच्या उत्तरानें माझा खटला इतक्या लवकर बादशहांसमोर जाऊं देण्याची हिंदी सरकारची इच्छा नाहीं अशी माझी खात्री झाली.

दरम्यान् लाहोर व रावळपिंडी येथील दंग्यांत पकडलेल्या आरोपींवर अत्याचार करून किंवा सक्ती करून काढतां आल्यास एखाद्या जबानीच्या रूपानें त्या दंग्यांशीं माझा संबंध जुळवितां येतो कीं काय हें पहाण्याचें कार्य चालू होतें. पंजाबांतील ही परिस्थिति मला कळली असतांहि व जेल सुपरिंटेंडंटचा अर्ज करण्याविषयीं सारखा तगादा चालू असतांहि अर्ज करावासें मला वाटेना.

स्वेच्छाचाऱ्यांकडून योग्य रीतीचा व्यवहार केला जाण्याची आशा जें काय थोडें बहुत माझें इतिसाहाध्ययन झालें होतें त्यानें नष्ट झालेली होती. परंतु स्वतःवर लादल्या गेलेल्या भलत्याच आरोपांचा इन्कार करणें योग्य आहे असें माझें मत होतें.

सप्टेंबर महिन्यांत खुद्द सुपरिंटेंडंटनें मुद्दाम मला एक इंग्रजी मासिक वाचावयास दिलें. या मासिकांत बादशहाविरुद्ध बंड पुकारण्यास हिंदी फौजेला मी

चिथविलें असा आरोप माझ्यावर लादण्यांत आलेला होता. हा लेख वाचल्यावर या आरोपाविरुद्ध लिहिणें मला माझें कर्तव्य वाटलें. तदनुसार भारतमंत्र्यांकडे पाठविण्याकरितां मी एक अर्ज तयार केला.

हिंदी सरकाराकडे पाठविलेल्या अर्जापेक्षां भारतमंत्र्याकडे पाठविलेल्या अर्जांत खालील गोष्टी जास्त होत्या—

( १ ) हिंदी फौजेला बंडाला प्रवृत्त करण्याचा आरोप अँग्लो-इंडियन वर्तमान-पत्रांत माझ्यावर लादण्यांत आलेला होता त्याचा इन्कार करून निषेध प्रकट केला होता.

( २ ) रेग्युलेशन कायदा ईस्ट इंडिया कंपनीनें चालू केलेला असल्यामुळें व पार्लमेंटनें त्याला कधींहि मंजुरी दिलेली नसल्यामुळें या कायद्यानुसार शिक्षा करणें योग्य नाहीं, असें लिहिलें होतें.

( ३ ) वर्तमानपत्रें वाचण्यास देण्याला व स्वतःचा नोकर आणवण्यास हिंदी सरकारनें अनुमति दिलेली नव्हती, ती मिळावी.

( ४ ) कोणत्याहि कारणास्तव स्वदेशीं जाण्याला परवानगी मिळावयाची नसल्यास निदान अमेरिकेंत किंवा युरोपांत तरी जाण्याची परवानगी मिळावी.

( ५ ) माझ्या या अर्जाचा योग्य विचार करून मला आपल्या देशीं जाण्यास व आपल्या कुटुंबांत रहाण्यास परवानगी मिळाली तर कुटुंबपोषणाची व मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यास बरें पडेल अशी आशा या अर्जांत प्रकट केली होती.

या अर्जाला कांहींच उत्तर आलें नाहीं; परंतु ११ नवंबर रोजीं मंडाले येथील कमिशनरानें मी लाहोरला नेला जाणार असून तेथें माझी सुटका करण्यांत येणार असल्याची खबर दिली. कदाचित् ही बातमी हेंच माझ्या अर्जाचें उत्तर होऊं शकेल. या दिवसांत मी लेजर अँड स्वोर्ड नांवाचें पुस्तक वाचीत होतों. या पुस्तकांत ईस्ट इंडिया कंपनीचा इतिहास दिलेला आहे. याच्या वाचनानें रेग्युले-शन कायदा राज्यव्यवस्थेच्या विपरीत व पार्लमेंटच्या शिस्तीविरुद्ध असल्याचें मला आढळून आलें.

सुटकेच्या वेळीं माझ्या चालचलणुकीविषयीं कोणत्याही प्रकारची जामिनगिरी घेतली गेली नाहीं किंवा कसल्या अटीहि घालण्यांत आल्या नाहींत. तात्पर्य माझी

बिनशर्त सुटका झाली. उपरिनिर्दिष्ट अर्जांव्यतिरिक्त हिंदी सरकारशीं माझा कसलाच पत्रव्यवहार झालेला नाहीं. फक्त ११ नव्हेंबरला लाहोर मुक्कामीं होणार असलेल्या सुटकेची एक सूचना हिंदी सरकारकडून आली होती तेवढीच.

मंडाले शहरांत राहाणारे माझे देशबांधव निरनिराळ्या प्रकारचीं बंधनें घातलीं गेलीं असतांहि संधी सांपडतांच माझ्याविषयीं आपलें प्रेम व्यक्त करण्यास मागें पुढें पहात नसत हें यापूर्वीं येऊन गेलेलेंच आहे. यासाठीं कैक वेळ अधिकाऱ्यां-कडून त्यांना अपमानहि सोसावा लागला. पण सरकारी अधिकारी व त्यांचे कायदे या बाबतींत निष्फल ठरले आणि माझ्या मित्रांनीं व माझ्यावर प्रेम करणारांनीं आपलें प्रेम व आदर व्यक्त करण्याचा नित्य नवा मार्ग शोधून काढणें चालू ठेविलें.

याविषयींच्या कांहीं गोष्टी येथें नमूद करतों.

( १ ) एक दिवस फिरावयास गेलों असतां बारीक बारीक पाऊस पडूं लागला. माझ्याजवळ छत्री वगैरे कांहींही नव्हतें. याच वेळीं एक वृद्ध शीख जो कोणत्या तरी कचेरींत चपराशी किंवा कोठेंतरी घरकामाला होता त्या बाजूनें जात होता. मला भिजतांना पहातांच तो मंदगतीनें चालूं लागला व मी जवळ पोंचतांच त्यानें मला आपली छत्री देऊं केली. त्याच्या या सौजन्याबद्दल मी त्याचे फक्त आभार मानले.

( २ ) एक दिवस सकाळीं सुमारें दहा वाजण्याच्या वेळीं मी दुसऱ्या मज-ल्याच्या गॅलरींत वाचीत बसलों होतों. सहजासहजीं उभा रहातांच पूर्वदिशेच्या दरवाजासमोरील आंगणांत एक हिंदी इसम डोक्यावर लांकडाची मोळी घेऊन उभा असलेला दिसला. मला पहातांच त्यानें मोळी खालीं टाकली व डोक्याला गुंडाळलेला रुमाल सोडून त्यांत बांधलेलीं कमळाचीं फुलें बाहेर काढलीं. हीं फुलें त्यानें मला देण्याकरितां आणलेलीं होतीं व मला द्यावयाच्या संधीची वाट पहात उभा होता. दरवाजाजवळ कोणी नसलेलें पाहून त्यानें पुन्हां रुमाल बांधला, डोक्यावर मोळी चढविली आणि हातांत फुलें घेऊन तो पश्चिम दरवाजाकडे वळला. या ठिकाणीं पाहारेकरी होता. पाहारेकऱ्याजवळ येऊन त्याला त्यानें तीं फुलें मला देण्यास सांगितलें. पहारेकऱ्यानें फुलें पोंचविण्याचें नाकबूल करून त्याला तेथून हांकवून लावलें. नाइलाज होऊन बिचारा थोड्या अंतरावर अस-लेल्या एका झाडाखालीं जाऊन उभा राहिला व माझ्याकडे पाहात राहिला.

या वेळीं त्याच्या दृष्टींत आदर व प्रेम यांचें मिश्रण भरलें असलेलें स्पष्टपणें प्रतीत होत होतें. शेवटीं कांहीं उपाय न सुचून भक्तिभावानें मला अर्पण करण्याकरितां आणलेलीं फुलें त्यानें त्या झाडाच्या बुंध्यावर ठेवलीं व मला नमस्कार करून निघून गेला. तो गेल्यानंतर थोड्या वेळानें माझ्या मद्रासी स्वयंपाक्याला पाठवून मी तीं फुलें आणविलीं व मोठ्या प्रेमानें ठेवून घेतलीं.

( ३ ) एक दिवस बराच जोराचा पाऊस पडत होता. सहजासहजीं बाहेर पहातां मी रहात असलेल्या ठिकाणाच्या बाजूकडे पहात असलेले दोन बोहरी दिसले. दोघेहि मुंबईकडचे श्रीमंत व्यापारी होते. मी दृष्टीस पडतांच त्यांनीं सलाम केला व आल्या वाटेनें निघून गेले.

( ४ ) मी रहात असलेल्या बाजूनें नेहमीं लोक गाडींतून फिरावयास जात असत. माझ्या ठिकाणाजवळून जात असतां ते गाडीची गति मंद करीत व माझ्या ठिकाणाकडे पहात जात. माझें ठिकाण दृष्टिआड होईपर्यंत त्यांची गाडी हळू हळू जात असे व त्यांची नजर माझ्या ठिकाणाकडे लागलेली असे.

( ५ ) पंजाबी स्त्रियासुद्धां वेळ मिळतांच मला पहाण्यास येत असत.

( ६ ) खेडवळ लोकांनाहि माझ्या हद्दपारीसंबंधाचीं गाणीं गात असतांना मीं ऐकलेलें आहे.

सिव्हिल सर्जननें माझे डोळे तपासले व आपल्या हाताखालील बंगाली इसमाशीं माझा परिचय करून दिला. ओळख करून दिल्यावर सर्जननें त्या इसमाला माझे राजकीय विचार पसंत आहेत कीं काय म्हणून विचारिलें. माझी थट्टा करण्याच्या हेतूनें त्यानें त्याला विचारिलें कीं 'लजपतराय मत देण्याचा अधिकार प्राप्त करून घेऊं इच्छित आहेत व लोकप्रतिनिधींच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालावा असें त्यांचें मत आहे. तरी या बाबतींत तुमचें मत काय आहे ?' यावर 'राजकीय विषयाचा आपण अभ्यास केलेला नाहीं' असें त्यानें उत्तर दिलें. पुढें मी त्याला प्रश्न केला कीं, 'लोकांकडून वसूल केल्या जाणाऱ्या करांचें प्रमाण काय असावें हें ठरविण्याविषयीं व कराचे रूपानें आलेल्या पैशाचा विनियोग करण्याविषयीं जनतेला आपलें मत देण्याचा अधिकार असावा असें तुम्हाला वाटत नाहीं काय ?' यावर त्यानें 'असावा' असें उत्तर दिलें.

त्याचें हें उत्तर ऐकून सर्जनसाहेब गार झाले; पण आपली बाजू सांवरण्याच्या उद्देशानें ते म्हणाले, 'हिंदुस्थानासारख्या निरनिराळ्या जाति, पंथ व

भाषा अस्तित्वांत असलेल्या देशांत लोकशासनप्रणाली चालणें शक्य नाहीं.' आपल्या या म्हणण्याला प्रत्यक्ष प्रमाण दाखविण्याच्या हेतूनें बंगाली इसमाला उद्देशून तो पुढें म्हणाला, 'माझ्यांत व त्याच्यांत विशेष असें कांहीं साम्य दिसून येत नाहीं.' त्याचीं हीं मुक्ताफळें ऐकतांच मी म्हणालों, 'आम्हां दोघांचा देश एक आहे, आमचा धर्म एक आहे व आम्हां उभयतांच्या भाषांची उत्पत्तीहि एकाच भाषेपासून झालेली आहे. इतक्या गोष्टींत आम्हां दोघांत साम्य दिसून येत असतां आणखी दुसरें कोणतें साम्य आपल्याला पाहिजे?' या मुद्द्यावर थोडा वेळ त्यानें माझ्याशीं चर्पटपंजरी चालविली, पण शेवटीं त्या बंगाली गृहस्थानें माझ्या मतालाच दुजोरा दिलेला पाहून तो थंड पडला. बंगाली गृहस्थ त्याच्या हाताखालील नोकर असल्यामुळें आपली बाजू घेईल अशी त्याला आशा वाटत होती, पण अनुभवांतीं ती निष्फल झाली.

सरदार अजीतसिंह मंडाले येथें असल्याची वार्ता मला कळली नसावी असा सर्वसाधारण समज होता. परंतु ज्या दिवशीं त्यांना मंडाल्यास आणण्यांत आलें, त्याच दिवशीं ती बातमी मला कळली. मंडाले येथें असतांनाच सरकार त्यांच्या शोधांत असल्याचें मला समजलें होतें व त्यांच्या आगमनाच्या एकदोन दिवसांपूर्वीपासूनच किल्ल्याच्या पूर्वदरवाजाकडे फिरावयास जाण्याची मला बंदी करण्यांत आली होती.

ही नवी बंदी कां करण्यांत आली हें तेव्हांच माझ्या लक्षांत आलें. पुढें माझे मित्र मदनजित यांनीं रंगूनहून माझ्याकरितां पाठविलेल्या पुस्तकांपैकीं कांहीं पुस्तकें आपल्या मित्राला वाचावयास पाहिजे आहेत म्हणून सुपरिंटेंडंटनें माझ्यापासून मागून घेतलीं व वाचून होतांच परत केलीं जातील म्हणून सांगितलें. परत करतांना दोन पुस्तकें कमी देण्यांत आलीं व त्यांविषयीं विचारतां नेतांना तितकींच नेलीं असल्याचें त्यानें सांगितलें. हीं दोन्ही पुस्तकें आजतागायत मला मिळालेलीं नाहींत. या एकाच गोष्टीवरून सुपरिंटेंडंटच्या स्मरणशक्तीविषयीं कल्पना होण्यासारखी आहे.

दुसऱ्या दिवशीं तुरुंगाचें निरीक्षण केल्यानंतर माझ्या ठिकाणाजवळून जात असतां सुपरिंटेंडंटनें माझ्या नांवाऐवजीं 'अजीतसिंहां'च्या नांवाचा पुकारा केला. लगेच त्याला त्याची चुकी कळून आली व त्यानें मला हांक मारून खालीं येण्यास सांगितलें. खालीं उतरतांच तो म्हणाला, "हिंदुस्थान सरकारनें तुम्हास आपल्या

वकिलाची सल्ला घेण्यास परवानगी दिलेली नाहीं. तसेंच वकिलाला देण्याकरितां आपण जें पत्र दिलें होतें तें हरवलें आहे." यावर मी म्हणालों, "हिंदुस्थान सरकारचें उत्तर आपण यापूर्वीच कळविलेलें आहे व वकिलाला देण्याकरितां दिलेलें पत्रहि परत केलेलें आहे." पण एवढयानें त्याचें समाधान न होतां आपल्या हातून वकिलाला देण्याचें पत्र हरवलें गेलें असल्याचें तो पुनःपुन्हां समर्थन करूं लागला. असो. १९०७ सालीं डिसेंबर महिन्यांत सुरत कॉंग्रेसला गेल्या वेळीं हें पत्र माझ्या खिशांत होतें.

सुपरिंटेंडंटची स्वारी गेल्यानंतर थोड्या वेळानें एक सार्जंट आला व अजीतसिंह कोठें आहेत हें माहीत आहे काय म्हणून विचारूं लागला. यावर 'आपल्या दृष्टीनें असल्या गोष्टी मला कळूं नयेत हें योग्य होय. दुसरें याविषयीं माझ्यापेक्षां आपणांसच अधिक विश्वसनीय माहिती असणें शक्य आहे.' असें मी उत्तर दिलें. या उत्तरानें तो थोडासा लाजला व 'पूर्वदरवाजाजवळील कोठींत ते नजरबंद आहेत' असें म्हणाला. पुढें कांहीं दिवसांनंतर युरोपियन सार्जंटाबरोबर फिरत असतांना अजीतसिंह माझ्या दृष्टीस पडले.

यानंतर आपापसांत अजीतसिंहांविषयीं पोलिसांना उघडपणें चर्चा करतांना मी ऐकलें आहे. याप्रकारें बाहेरून अजीतसिंहांची हकीकत मला कळत असली तरी वरिष्ठ अधिकारी मात्र याविषयीं मला माहिती नाहीं असें समजूनच वागत असत.

11 नवंबर १९०७ रोजीं १०। वाजतां मंडाले विभागाचे कमिशनर पोलीस सुपरिंटेंडंट व डेप्युटी पोलीस सुपरिंटेंडंट यांसह माझ्या बंगलीवर आले व मला एके बाजूस नेऊन हद्दपारींतून माझी सुटका झाल्याचें कळविलें. तदनंतर हद्दपारींतून सुटका झाली असली तरी लाहोरपर्यंत मला पाहाऱ्यांतून नेलें जाईल व लाहोर येथेंच माझी सुटका होईल, असें सांगून दरम्यान याविषयीं माझ्या मित्रांना किंवा आप्तेष्टांना कांहीं कळविण्याच्या भानगडींत मी पडूं नये असेंहि त्यांनीं बजाविलें. तसेंच माझ्याकरितां आगगाडी तयार असून ती १०॥ वाजतां सुटणार आहे असें सांगितलें व यापुढें मी पुन्हां राजद्रोहाच्या भानगडींत पडलों तर तावडतोब पकडून हद्दपार केलें जाईल अशी व्हाइसरॉयांतर्फे सूचना देऊन ते निघून गेले. पोलिसांच्या मदतीनें मी आपल्या सामानाची बांधाबांध केली. पोलीस सुपरिंटेंडंट माझ्याबरोबर स्टेशनापर्यंत आले. स्टेशनांत एका बाजूला स्पेशल गाडी उभी होती व शेजारीं कांहीं युरोपियन अधिकारी उभे होते. या अधिकाऱ्यांपैकीं फक्त

जेल सुपरिंटेंडंट तेवढा माझ्या ओळखीचा होता. जवळ जातांच जेलसुपरिंटेंडंटानें माझ्याशीं हस्तांदोलन केलें. या वेळीं आमच्यांत पुढील संवाद झाला असल्याचें मला आठवतें.

सुप.—इतक्या लवकर सुटका झाल्यामुळें आपणांस आनंद होत असेल.

मी—होय.

सुप.—यापुढें असल्या फंदांत पडून मिळालेल्या धड्यानें शहाणपण न शिकल्याचा प्रत्यय देणार नाहीं अशी मी आशा करतों.

मी—शिक्षेला पात्र होण्यासारखें मी केव्हांच कसलेंहि कृत्य केलेलें नाहीं.

सुप.—ठीक आहे. यापुढें असल्या भानगडींत पडूं नका म्हणजे झालें.

मी—आपल्या या सदिच्छेबद्दल मी आपला आभारी आहें.

सुप.—एका ब्यादींतून मुक्त झाल्यामुळें मलाहि बरें वाटत आहे. आपला भावी काळ सुखाचा जावो असें मी इच्छितों.

मी—आपल्या या शुभेच्छेबद्दल मी आपला आभारी आहें.

यानंतर सुपरिंटेंडंटनें माझ्याशीं हस्तांदोलन केलें व मी डब्यांत जाऊन बसलों. थोड्याच वेळांत गाडीची शिटी झाली व मी मंडाल्याचा निरोप घेतला.

माझ्याबरोबर डेप्युटी पोलिस सुपरिंटेंडंट होते व आम्हां उभयतांकरितां पहिल्या वर्गाचा एक डबा राखून ठेवण्यांत आला होता. अजीतसिंहाबरोबर पाहिलेला युरोपियन सार्जंट स्टेशनच्या आवारांत दिसल्यामुळें अजीतसिंहहि याच गाडींत असावे असें मला वाटलें. माझें अनुमान कितपत खरें आहे हें जाणण्याच्या उद्देशानें डेप्युटी सुपरिंटेंडंटजवळ त्याविषयीं चौकशी केली, पण त्यानें स्पष्ट असें कांहींच न सांगतां मागून येणाऱ्या एखाद्या गाडीनें ते निघतील असा गुळमुळित जबाब दिला. पुढें सायंकाळापूर्वीच अजीतसिंहहि याच गाडींत असल्याचें मला समजलें. अजीतसिंहांबरोबर युरोपियन पोलिस इन्स्पेक्टर व एक युरोपियन सार्जंट असे दोघे अधिकारी होते. याशिवाय बारा हिंदी शिपायी आमच्यावर नजर ठेवण्याकरितां होतेच. डेप्युटी सुपरिंटेंडंट सुस्वभावी असून त्यानें माझी योग्य व्यवस्था ठेविली.

मध्यंतरीं गाडी बऱ्याच मोठमोठ्या स्टेशनांवर पाणी घेण्याकरितां, पुढील रस्ता मोकळा होण्याकरितां व प्रवाशांच्या जेवणाखाणाकरितां उभी राहिली. कित्येक

स्टेशनांबाहेर लोकांची गर्दी जमलेली व जयजयकार करित असलेली दिसली. अधिकाऱ्यांनीं आपल्या मतें जरी आम्ही कोणत्या गाडीनें जाणार आहों याविषयींची बातमी गुप्त ठेविली होती तरी येन केन प्रकारेण या गाडींतूनच मी व अजीतसिंह जात असल्याचें लोकांना कळलें होतेंसें दिसलें.

१२ नवंबर रोजीं सकाळीं ५। वाजण्याच्या सुमारास पांट्टुजुइंग स्टेशनावर आमची गाडी दाखल झाली. या ठिकाणीं मला उतरण्यांत येऊन घोड्याच्या गाडींत बसविलें गेलें. गाडीच्या खिडक्या बंद करण्यांत आल्या होत्या. फक्त एकच खुली होती. थोड्या वेळानें ही खिडकीहि बंद केली गेली. गाडींत एक युरोपियन सार्जंट बसविण्यांत आला होता. थोड्याच अवकाशांत ज्या ठिकाणीं मंडाल्याला रवाना होण्याकरितां मी सहा महिन्यांपूर्वी बोटींतून उतरलों होतों त्या ठिकाणीं पोंचलों. माझें सर्व सामान स्टीमलॉंचवर पाठविण्यांत आलें. पुढें पोलिस कमिशनरानें सोयी गैरसोयीची पर्वा न करतां स्टीमलॉंचवरील सामान ठेवण्याच्या जागीं आम्हांला बसण्यास सांगितलें. या ठिकाणीं श्वासोच्छ्वास करणेंहि जड जात होतें. जागा इतकी छोटी होती कीं दोन्ही सार्जंट व मी मोठ्या मुष्किलीनें जेमतेम उभे राहूं शकलों. सरदार अजीतसिंहांना डेकवर बसविण्यांत आलें. पंधरा मिनिटांत गाईड बोटीवर सामानसुमान चढविण्यांत आलें.

सरदार अजीतसिंह आणि इतर सामानसुमान बोटीवर गेल्यानंतर मला स्टीमलॉंचवरून उतरण्यास सांगण्यांत आलें. सरदारसाहेबांकरितां व माझ्याकरितां निरनिराळ्या केबिनांची व्यवस्था होईपर्यंत आम्हा दोघांना एकमेकांपासून बऱ्याच अंतरावर बसविण्यांत आलें. कांहीं वेळानें एक केबिन माझ्या स्वाधीन करण्यांत येऊन युरोपियन सार्जंट व युरोपियन इन्स्पेक्टर या दोघांना दुसरे दोन देण्यांत आले आणि सरदारसाहेबांना डेकवर जागा करून देण्यांत आली. १२ नवंबर रोजीं सकाळीं सात वाजून बारा मिनिटांनीं गाईड बोटीनें रंगूनचा किनारा सोडला. दोन दिवस समुद्र खवळलेला होता, परंतु तिसऱ्या दिवशीं तो शांत झाला. बोटीवरील अधिकारी साधारणपणें सज्जन होते. त्यांतल्या त्यांत अॅडिशनल चीफ मि. कूपर फारच सज्जन होते. १५ नवंबर रोजीं दुपारीं ३ वाजतां आमची बोट फ्रेअर नामक बोटीजवळ नेण्यांत आली. बोटीवरील कप्तानानें मला आपल्या केबिनमध्यें जाऊन बसण्यास व सरदारसाहेबांना तळघरांत जाण्यास सांगितलें.

अर्धा तासपर्यंत उभय कक्षानांत संभाषण चाललें. त्यानंतर नांगर उठविण्यांत आला. सकाळीं सात वाजतां आमची बोट हुगळीच्या मुखांत शिरली व संध्याकाळीं ५॥ वाजतां डायमंड बंदरांत दाखल झाली. पुढें १० वाजतां कलकत्त्यापासून तीस मैलांवर रायपूर येथें आमची बोट नेण्यांत आली व संध्याकाळीं ४॥ पर्यंत तेथेंच राहिली. नंतर कलकत्त्याच्या दिशेनें ती मार्गक्रमण करूं लागली. सूर्यास्ताच्या सुमारास बजबजजवळ आम्ही मातृभूमीवर पदार्पण केलें. नागपूर रेल्वे लाईनच्या बाजूला आमच्याकरितां एक खास गाडी तयार ठेवण्यांत आली होती. बोटींतून उतरतांच बंगाल पोलिस इन्स्पेक्टर मॅथ्यूस आमच्याबरोबर राहूं लागले. मला व माझ्या पाहारेकऱ्यांना पहिल्या वर्गाच्या डब्यांत आणि सरदार अजीतसिंहांना दुसऱ्या वर्गाच्या डब्यांत बसविण्यांत आलें. याच गाडींत बंगाल-नागपूर रेल्वेचे ट्रॅफिक मॅनेजर मि. क्लार्क व असिस्टंट ट्रॅफिक मॅनेजर होते. क्लार्क महाशय माझ्याशीं चांगल्या प्रकारें वागले. त्यांनीं आपल्या सलूनमध्यें मला खानाहि दिला.

१६ नवंबर रोजीं दोनप्रहरीं बिलासपूर ( सी. पी. ) स्टेशनांत आमची गाडी दाखल झाली व येथून कटनीच्या दिशेनें छोट्या लाईनवर गेली. तेथें सारा दिवस टिनच्या भांड्यांत तयार केलेल्या जेवणावर आम्हांला निर्वाह करावा लागला. क्लार्क महाशयांनीं आमची बडदास्त ठेवण्यांत बिलकूल कसर केली नाहीं. दुसऱ्या दिवशीं आम्ही बियाना स्टेशनांत पोंचलों व येथून झांशीवरून दिल्लीला गेलों. पुढें दिल्लीहून भटिंडाला गेलों व तेथून लाहोरला पोंचलों.

या सात दिवसांच्या प्रवासांत सरदार अजीतसिंहांना व मला पृथक् पृथक् ठेवण्यांत आलें होतें. प्रवासांत आम्ही बसलेल्या डब्याच्या खिडक्या बंद करून करून ठेवण्यांत आल्या होत्या. कैक वेळ माझ्यापासून लपविण्यांत येणाऱ्या गोष्टी पाहून मला हंसूं येई.

१८ नवंबर रोजीं सकाळीं ९॥ वाजतां आमची गाडी मियां मीर वेस्ट ( लाहोर कँटोनमेंट ) स्टेशनांत दाखल झाली. या ठिकाणीं आम्हां उभयतांना एका सलूनांत पाठविण्यांत आलें. या ठिकाणीं लाहोर सेंट्रल जेलच्या सुपरिंटें-डंटानें मंडाल्याहून लाहोर सेंट्रल जेलमध्यें आमची बदली झाल्याची आम्हांस सूचना दिली व नंतर सुटका झाल्याचें कळविलें.

यानंतर आमच्याकरितां एक लँडो कार व सामानाकरितां टमटम मागविली गेली आणि आमचें सामान नियत स्थलीं पोंचविण्याची व्यवस्था केली गेली. पोलिस सुपरिंटेंडंट मि. रँडल आमच्या पुढें गाडींतून जात होते. मी आपल्या घराजवळ पोंचतांच ते पुढें रवाना झाले.

याप्रमाणें सहा महिने नऊ दिवसांनंतर मी पुन्हां आपल्या घरीं आलों.

# लाला लजपतराय.

( उत्तरार्ध )

[ १९०७–१९२८ ]

—लेखक—

गंगाधर देवराव खानोलकर.

## १. वादळी वर्ष.

राष्ट्रीय सभेच्या इतिहासांतील महत्त्वाचें असें तें वर्ष होतें. राष्ट्रीय सभेची नौका कोणत्या दिशेनें आणि कोणी हांकावयाची याबद्दल जंगी रण माजलें होतें. लोकक्षोभाचा प्रचंड मारुत सुटला होता. अशांततेचा वणवा जेथें तेथें पेटलेला दिसत होता. क्रांतीचे वादळी वारे जोरानें वाहूं लागले होते. तरुण म्हणूं लागले कीं, जलदीनें प्रवास करण्याची हीच वेळ आहे. या वाऱ्यांचा फायदा घेऊन शीड सोडूं या. आतांपर्यंतची मंद गति पुरे झाली. कांठाकांठानें डुबकत डुबकत जाण्यांत किती काल घालवायचा ! आज बावीस वर्षें सावधपणा बाळगून चाललों तेवढें खूब झालें. आतां भर समुद्रांत नौका लोटून सुटलेल्या वाऱ्याचा फायदा घेऊं. 'साहसे श्रीः प्रतिवसति.' वृद्धजन कबूल नसतील, तर त्यांना मागें लोटून आपण पुढें होऊं; नौकेचें सुकाणूं आपल्या हातांत घेऊन आणि ज्या दिशेनें ती हांकली असतां आपलें भवितव्य उज्वल होऊं शकेल असें वाटत आहे, त्या दिशेला शीड सोडून झपाझप मार्ग आक्रमूं लागूं. १९०७ च्या सुरतच्या राष्ट्रीय सभेला गेलेला तरुण पक्ष याच विचाराचा होता. या पक्षाचें नेतृत्व टिळकांसारख्या पोलादी निश्चयाच्या पुरुषाकडे होतें. त्यामुळें हा पक्ष मनांत आणलेलें केल्याशिवाय राहणार नाहीं, याची खात्री वृद्धांच्या पक्षाला वाटत होती. १९०६ च्या कलकत्त्याच्या राष्ट्रीयसभेंतच याची थोडीबहुत जाणीव त्यास झाली होती. 'स्वराज्या'चें ध्येय त्यांस मानवणारें

नव्हतें. आणि तें गांठण्यासाठीं योजावयाचे स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे उपाय तर त्यांच्या नरम प्रकृतीस विकृति आणणारे होते. आपल्या पूर्वपरंपरेस धक्का लागूं न देतां यथापूर्व काम चालावें म्हणून दादाभाई नौराजीसारख्या थंड डोक्याच्या वृद्धाला त्यांनीं अध्यक्षपदीं योजिलें, पण तोच तरुणांच्याहि पुढें एक उडी अधिक मारणारा निघाला. या प्रकारामुळें वृद्धांचा हा जुना पक्ष बराच गडबडला, आणि त्यानें असा प्रकार पुढील राष्ट्रीय सभेंत तरी होऊं नये यासाठीं चळवळ सुरू केली, कारस्थानांना प्रारंभ केला. नागपुरास पुढील राष्ट्रीयसभा भरविण्याचें ठरलें होतें, पण नागपूर पडलें तरुणांचें केंद्रस्थान. टिळकांचें वजनहि तेथें अधिक. तेव्हां तेथून आपल्याला सोइस्कर अशा स्थळीं राष्ट्रीयसभा नेण्याचा त्यांनीं चंग बांधला व तो सिद्धीसहि नेला. जुन्या नरम पक्षाचा बालेकिल्ला जें सुरत शहर त्या ठिकाणीं राष्ट्रीय सभा भरविण्याचें ठरलें. राशबिहारी घोष यांसारख्या खात्रीच्या नरम गृहस्थाची अध्यक्षपदीं योजना करण्याचेंहि जवळ जवळ निश्चित केलें गेलें. तरुण पक्षहि कांहीं स्वस्थ बसला नव्हता. कलकत्त्याला जुन्या पक्षावर जी आपण कुरघोडी केली ती फिरविण्याचा, नव्हे आपल्याला कायमचें दाबून टाकण्याचा, हा प्रयत्न आहे हें त्यानें ओळखलें. आपला पक्ष बलवान करण्याचा त्यानें प्रयत्न सुरू केला. याच वेळेस लालाजींची अचानकपणें हद्दपारींतून सुटका होऊन ते स्वदेशीं परत आले होते. १९०५–६ च्या राष्ट्रीयसभेंतील लालाजींच्या वक्तृत्वाचा दणका तरुणांच्या कानांत अजूनहि घुमत होता. १९०४ सालीं मुंबईस भरलेल्या राष्ट्रीयसभेच्या विषयनियामक कमिटींत 'मी नेईन तिकडे राष्ट्रीयसभेनें गेलें पाहिजे' असें म्हणणाऱ्या व सर्वांवर शह बसवूं इच्छिणाऱ्या फिरोजशहांची राष्ट्रीयसभेच्या घटनेच्या प्रश्नाचे बाबतींत, तरुण लालाजींनीं कशी दाणादाण करून टाकली; 'मला विरोध करणारे लजपतराय कुठें आहेत ते' म्हणून गुरगुरून विचारतांच, 'हा मी येथें उभा आहें' असें ताडकन् उठून सांगून, पंधरा मिनिटें-पर्यंत वक्तृत्वाचा पाऊस पाडून फिरोजशहांस गप्प कसें बसविलें, याचें चित्र त्यांच्या डोळ्यांपुढें अजूनहि होतें.

लालाजींच्या सुटकेची वार्ता ऐकून तरुण पक्षाला आनंद झाला. त्याच्यांत दुप्पट उत्साह संचरला. सरकारच्या दडपशाहीला योग्य उत्तर देण्याची हीच वेळ आहे असें त्यास वाटलें. सुरतेच्या राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान लालाजींस

द्यावें अशी त्यानें सूचना केली. गोखले–फिरोजशहाच्या पक्षास अर्थातच ही सूचना मान्य होणें शक्य नव्हतें. भयंकर क्रांतिकारक समजून सरकारनें ज्या गृहस्थास चौकशी न करतां हद्दपार केलें, त्या गृहस्थास राष्ट्रीयसभेचा अध्यक्ष नेमावयाचें म्हणजे, ज्या सरकारची मर्जी संभाळून आपण राष्ट्रीय सभा चालविली त्या सरकारचा कोप जाणून बुजून आपणावर ओढून घेतल्यासारखें होईल; तसा कोप ओढून घेणें म्हणजे आपल्या सर्व आकांक्षांना आपल्या हातानें मूठमाती देणें होय, हें न कळण्याइतका हा पक्ष अधूर्त नव्हता. राष्ट्रीयसभेचा देशोद्धारापेक्षां स्वोद्धाराकडेच उपयोग या लोकांकडून केला जात असे. राष्ट्रीयसभेचीं सूत्रें आपल्या हातांत ठेवून राजकारणी बनावयाचें. राजकारणी बनलें म्हणजे कायदे-काउन्सिलांत व तेथून सरकारच्या कार्यकारी मंडळांत प्रवेश होण्यास विशेष वेळ लागावयाचा नाहीं, हें याच्या मागचें धोरण होतें. आणि या धोरणानुसारच यांच्या सर्व चळवळी चालत. सर फिरोजशहा मेथा हे या लोकांचे प्रमुख. त्यांच्या हातांत राष्ट्रीयसभेचीं सर्व सूत्रें असत. १९०४ पर्यंत ‘ कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् ’ अशी त्यांची स्थिति होती. अध्यक्षाची निवड त्यांच्याच सल्ल्यानें होई. त्यामुळें, ते बोलवितील तसें बोलावयाचें व नाचवितील तसें नाचावयाचें असा प्रकार होता. पण १९०५ सालापासून परिस्थिति बदलूं लागली. राष्ट्रीय सभेंत विरोध करणारा वर्ग निर्माण होऊं लागला. १९०५ च्या काशी येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष नामदार गोपाळराव गोखले होते. ते फिरोजशहांच्या पक्षांतले असले तरी फिरोजशहांचा आग्रह भलत्याच ठिकाणीं चालूं देणारे नव्हते. त्यामुळें मेथाजींस त्यांची एक मोठी धोंडच होऊन बसली होती. १९०६ सालीं दादाभाई नौराजी या अनुभविक राजनीतिकोविदाच्या अध्यक्षतेखालीं राष्ट्रीय सभा भरली. दादाभाईंच्या पुढें मेथाजींचें तेज पडणें शक्य नव्हतें. स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार हे ठराव चर्चेकरितां पुढें आले, तेव्हां ते फेटाळून लावण्याचा किंवा त्यांत फेरफार करण्याचा जोराचा हेका चालवूनहि आपलें कांहीं चालूं शकलें नाहीं, उलट निमूटपणें त्या ठरावांच्या गोळ्या गटागट गिळाव्या लागल्या याबद्दल मेथाजींस संताप आला होता. त्यांच्या पोटांत दुखूं लागलें होतें. त्या दुखण्यानें सबंध वर्षभर त्यांस चैन पडलें नाहीं. अनिच्छापूर्वक गिळाव्या लागलेल्या या गोळ्यांवर पुढील सालीं उतारा घेण्याचा त्यांनीं निश्चय केला होता. या निश्चयाच्या पूर्तीसाठींच सुरतेस सभा भरवून त्यासाठीं आपल्या

सांगणींतला अध्यक्ष नेमण्याची त्यांची धडपड होती. राष्ट्रीय सभेची दोन वर्षांत निराळ्या स्वतंत्र मार्गानें जाणारी गाडी मागें खेंचून आणून आपल्या पूर्वींच्या मार्गावर त्यांस ती आणून सोडावयाची होती. तरुणपक्षानें दोन वर्षांत जे प्रयत्न केले त्यावर निखारा ठेवून ते जाळून खाक करण्याचा त्यांचा विचार होता. अशी सर्व परिस्थिति असल्यामुळें, तरुणपक्षाला मेथाजींचे हे प्रयत्न हाणून पाडण्यासाठीं चंग बांधणेंच भाग होतें. आपलें पक्षबळ कमी आहे हें त्यांस ठाऊक होतें. पण तसें तें असलें तरी विरोध करून, ठराव एकमतानें पास होऊं शकले नाहींत, एवढें जरी झालें तरी त्यांस पुष्कळ होतें. असें व्हावयास निःपक्षपाती अध्यक्षाची निवडणुक होणें जरूरीचें होतें. फिरोजशहांच्या पुठ्यांतला माणूस निवडला गेल्यास आपली मुस्कटदाबी होईल व आपणास राष्ट्रीयसभेंतून हांकून लावण्याचा फिरोजशहांचा प्रयत्न सफल होईल असें त्यांस वाटत होतें. आणि म्हणूनच लालाजींचें नांव तरुण पक्षानें सुचविलें होतें. हें नांव सुचविण्यांत त्याचा आणखीहि एक हेतु होता. लालाजींस अध्यक्ष नेमण्याची सूचना फेंटाळून लावली गेल्यास, सुरतेस सभा भरविणाऱ्यांचें खरें अंतरंगहि लोकांसमोर उघड होईल. पण या वेळेस जुन्या पक्षाचें दैव सबळ होतें. खुद्द लालाजींनींच आपण अध्यक्ष होऊं इच्छित नाहीं असें जाहीर केलें. लालाजींस, राष्ट्रीयसभेंत बरेंच वर्चस्व असलेल्या मुंबईकर मवाळांनीं मधल्या काळांत जीं कारस्थानें केलीं तीं नीट माहीत नव्हतीं. हद्दपारींत बरेच दिवस गेल्यामुळें कलकत्त्याच्या अधिवेशनानंतर काय बनाव घडत होता याची पुरती माहिती त्यांस नव्हती. त्यांनीं आपल्या सरळ स्वभावानुसार मोठ्या शालीनतेनें अध्यक्षपद नाकारलें. याचा फायदा मवाळपक्षानें चांगलाच घेतला. ‘ लालाजी अध्यक्षपद स्वीकारित नसतील तर सुरेंद्रनाथास अध्यक्ष करा ’, या तरुण पक्षाच्या मागणीची पर्वा न करितां डॉ. राशबिहारी घोष यांचीच त्यानें निवड केली. तरुणांना आतां उघड उघड विरोध केल्याविना गत्यंतरच राहिलें नाहीं.

टिळकांच्या नेतृत्वाखालीं झालेल्या तरुणांच्या तीव्र विरोधामुळें व मवाळांच्या तडजोड न करण्याच्या आग्रही वृत्तीमुळें सुरतेचें राष्ट्रीयसभेचें अधिवेशन उधळलें गेलें. हिंदी राजकारणांत जहाल व मवाळ हे दोन पक्ष कायमचे निर्माण झाले.

लालाजी या सुरतेच्या सभेला हजर होते. टिळकांनीं त्यांच्या मध्यस्तीनें तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न केला. गोखले लालाजींस आपले जिव्हाळ्याचे

स्नेही समजत. त्यांच्या सांगण्यानें तरी कांहीं समाधानकारक तडजोड झाली तर पहावी म्हणून, 'तुमच्या पक्षांतील पांच मंडळी व आमच्या पक्षांतील पांच मंडळी एकत्र बसून खल करूं व बहुमतानें काय ठरेल त्याप्रमाणें वागूं,' असें गोखल्यांकडे बोलणें लाविलें. पण त्याचा उपयोग झाला नाहीं. लालाजींनींहि एकंदर रागरंग पाहून मौनव्रत स्वीकारिलें. राष्ट्रीयसभेंतील दुफळी त्यांना पहावत नव्हती. दुफळीमुळें राष्ट्रीयसभेचें सामर्थ्य कमी होत आहे हें पाहून त्यांस अनिवार दुःख झालें. तें वर्षच मुळीं वादळी होतें. दोघांपैकीं कोणताही पक्ष त्या वेळीं समेटाची भाषा ऐकून घेण्याच्या मनस्थितींत नव्हता.

## २. दुसऱ्या हद्दपारीचे आधीं.

वादळानंतर जी भयाण शांतता नांदत असते, तीच सर्व देशभर पसरली होती. राष्ट्रीय सभेंतील दुफळीमुळें राष्ट्रांत उत्साहापेक्षां औदासीन्यच अधिक दिसून येऊं लागलें, आणि जहाल राष्ट्रीय पक्षाचे नेते लोकमान्य टिळक यांस सहा वर्षांची शिक्षा ( १९०८ ) झाल्यामुळें या औदासिन्यांत अधिकच भर पडली. टिळकांचे मागाहून प्रांतांप्रांतांतील छोटे मोठे पुढारी भराभर पकडले गेले. सरकारनें जहालां-विरुद्ध स्वीकारलेल्या या धोरणामुळें राष्ट्रीय सभेचीं तीव्र मतभेदामुळें झालेलीं दोन शकलें पुन्हां सांधतां येणें अशक्यप्राय होऊन बसलें. धोरण राखून आपण हीं दोन शकलें सांधूं, अशी लालाजींस फार आशा वाटत होती. त्यांनीं मवाळांच्या कन्व्हेन्शननें तयार केलेल्या ध्येयपत्रिकेवर याच हेतूनें सहीहि केली होती. त्यांच्या पक्षानें राष्ट्रीयसभा सोडली पण त्यांनीं सोडली नाहीं, याबद्दल त्यांचे-विरुद्ध बरीच टीकाहि झाली. कांहीं उतावळ्या जहाल तरुणांनीं लालाजी सरकारला भ्याले, हद्दपारीच्या शिक्षेमुळें नरमले, मवाळांच्या गोटांत सुरक्षिततेकरितां शिरले अशाप्रकारें खूप कोलाहल माजविलें; पण लालाजी त्यामुळें मुळींच डग-मगले नाहींत. त्यांनीं दोन्ही पक्षांत समेट घडवून आणण्यासाठीं बराच प्रयत्न केला. पण परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळें त्यांना कांहीं काळ स्वस्थ राहणें इष्ट वाटलें.

हद्दपारीच्या शिक्षेमुळें लालाजींची प्रकृती बरीच नादुरुस्त झाली होती. देशांतील एकंदर परिस्थितीलाहि ते कंटाळले होते. इंग्लंडांत कांहीं महिने विश्रांती घेण्यांत घालवावे असें त्यांस वाटूं लागलें व त्याप्रमाणें त्यांनीं १९०८ सालीं इंग्लंडास प्रयाण केलें. इंग्लंडांत ते जवळ जवळ दीड वर्ष होते.

इंग्लंडांत ते विश्रांतीकरितां आले खरे, पण त्यांचा चळवळ्या स्वभाव त्यांस तेथें स्वस्थ बसूं देईना. इंग्लंडांत असलेल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या भेटी घे, त्यांच्याशीं विचारविनिमय कर, त्यांचे संघ बनव, त्यांच्या गैरसोईसंबंधींचीं गाऱ्हाणीं इंडियाहाउसपर्यंत नेऊन पोंचीव, वृत्तपत्रांत हिंदुस्थानाविषयक लेख लिही; मजुर पुढाऱ्यांशीं ओळखी करून घे, हिंदुस्थानासंबंधीं सहानुभूति इंग्लंडांत किंवा युरोपांत उत्पन्न करण्याचे बाबतींत त्यांच्याकडून कांहीं करवितां आलें तर करीव अशा एक ना दोन अनेक खटपटी, चळवळी ते करीत होते. विलायतेंतील हिंदहितविरोधकांस अर्थातच लालाजींच्या या चळवळी आवडत नव्हत्या. यांपैकीं कांहीं जणांनीं कट करून त्यांची पद्धतशीर बदनामी करण्याचा उद्योग आरंभिला. या नीच उद्योगांपैकीं लंडन येथील 'डेली एक्स्प्रेस' या पत्रानें केलेली कुचाळकी विशेष तीव्र स्वरूपाची होती.

लालाजी इंग्लंडांत असतां बिपिनचंद्र पालहि इंग्लंडांत येऊन राहिले होते. पालबाबू त्या वेळीं ज्वलज्जहालांत मोडत असत. यांचीं त्या वेळचीं व्याख्यानें म्हणजे सरकारवर सोडलेले आगीचे लोळच वाटत. क्रांतिकारक तरुणांच्या गळ्यांतील हे ताईत बनले होते. पालबाबूंचे अध्यक्षतेखालीं, या वर्षी लंडन येथें कॅक्स्टन हॉलमध्यें गुरुगोविंदसिंग यांचा जन्मोत्सव मोठ्या थाटानें करण्यांत आला. या समारंभास लालाजी हजर होते. त्यांचें या सभेंत छोटेंसें भाषणहि झालें. या प्रसंगाचा 'डेली मिरर' या पत्रांत एक फोटो प्रसिद्ध करण्यांत आला होता. या फोटोंत लालाजी पालबाबूंच्या शेजारीं बसलेले दिसत होते. लालाजींविरुद्ध काहूर उठविण्याचा ज्या हिंदद्वेष्ट्या लोकांनीं उद्योग आरंभिला होता, त्यांनीं या फोटोचा आपल्या कामीं चांगलाच उपयोग करून घेतला. आपली बदनामी केल्याबद्दल लालाजींनीं 'डेली एक्सप्रेस' या पत्राविरुद्ध अब्रुनुकसानीचा दावा या सुमारास गुदरला होता. या दाव्यांत 'डेली एक्सप्रेसनें' लालाजींविरुद्ध घेतलेले आक्षेप सत्य होते हें सिद्ध करण्यासाठीं, या पत्राच्या बाजूनें काम चालविणाऱ्या वकिलानें या

फोटोचा आधार घेऊन, 'बिपिनचंद्र पालसारख्या आक्षेपार्ह वर्तनाच्या दुष्ट क्रांतिकारकाच्या शेजारीं जो गृहस्थ बसतो व व्याख्यान देतो त्याचें वर्तन राजकीय दृष्टया आक्षेपार्ह कां वाटूं नये.' असा मुद्दा पुढें केला होता. या वकिलानें दुसराहि एक मजेदार मुद्दा पुढें मांडला होता. हा मुद्दा असा, 'मोर्लेसारख्या उदारमतवादी, तत्त्वज्ञानी व सरळ स्वभावाच्या माणसानें ज्या गृहस्थाला अनिष्ट व्यक्ति समजून हद्दपार केलें, त्या गृहस्थाच्या वर्तनांत तसेंच कांहीं तरी आक्षेपार्ह असलें पाहिजे, हें उघड होतें.' न्यायाधिशानेंहि ज्यूरीस हा खटला समजावून देतांना ह्याच मुद्यावर जोर दिला. कोर्टांत हा खटला सुरू असतां हवापालटीकरितां म्हणून त्यावेळीं इंग्लंडांत आलेले पंडित मोतिलाल नेहरू हे हजर होते. खटला ऐकून, लालाजींस येथें न्याय मिळणें अशक्य आहे, त्यांस अब्रुनुकसानीची भरपाई म्हणून एक छदामहि मिळणार नाहीं असे त्यांनीं उद्गार काढले; आणि खटल्यांतील रागरंग पाहतां ते कांहींसे सत्यहि होते. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, न्यायाधिशानें 'डेली एक्सप्रेस'ला दोषी ठरवून, लालाजींचा कोर्टाचा खर्च व अब्रुनुकसानीचे भरपाईबाबत ५० पौंड दिले जावेत असा निकाल दिला. या निकालामुळें लालाजींच्या निंदकांस चांगलीच चपराक बसली. त्यांच्या वाटेस यानंतर फारसें कोणी गेलें नाहीं.

१९०९ चे द्वितीयार्धांत लालाजी स्वदेशीं परत आले. देशांतील परिस्थिति बदललेली नव्हती. मोर्ले-मिंटो सुधारणा अंमलांत येत होत्या. मवाळ पक्ष या सुधारणांचा फायदा करून घेण्यांत गुंतला होता. राष्ट्रीय पक्ष नेत्याच्या अभावीं हातपाय आंखडून घोरत पडला होता. मधून मधून क्रांतिकारकांच्या बॉंबगोळ्यांच्या स्फोटाच्या किंवा पिस्तुलाचा बार उडविल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत, त्या वाचून क्षणमात्र जी कांहीं चुळबुळ होई तेवढीच काय ती ! एरव्हीं सर्व थंडच ! देशावर जवळ जवळ मृत्युकळाच आली होती असें म्हटलें तरी चालेल.

लालाजी स्वदेशीं परत आल्यावर, मोर्ले-मिंटो सुधारणांमुळें घडून आलेल्या अनेक अनिष्ट परिणामांपैकीं जो एक परिणाम विशेषत्वानें त्यांस दिसून आला तो म्हणजे मुसलमानांच्या बाबतींतील होय. मुसलमान या सुधारणांतील कांहीं सवलतींमुळें फार शेफारून जाऊन वरचढ बनले होते. हा वरचढपणा वेळींच दबला गेला नाहीं तर हिंदूंच्या मानगुटीवर हे लोक बसल्याशिवाय राहाणार नाहींत, असें लालाजींस वाटूं लागलें. त्यांनीं लगेच पंजाबांतील हिंदुसमाजांत

एतद्विषयक जागृति करण्याची चळवळ सुरू केली. दोन-तीन वर्षें अहर्निश ते ही चळवळ करीत होते. त्याचा थोडासा परिणामहि दिसत होता. पण या चळवळीचीं पाळेंमुळें त्या वेळीं जितकीं खोल जावीं तेवढीं जाऊं शकलीं नाहींत.

१९१३ सालीं राष्ट्रीय सभेचें अधिवेशन कराची येथें झालें. या अधिवेशनास लालाजी हजर होते. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी लोकांचा प्रश्न त्यावेळीं ताजा व फार महत्वाचा होता. महात्मा गांधी यांनीं अत्यंत निकरानें चालविलेल्या या लढ्यास राष्ट्रीय सभेनें साहाय्य करावें या हेतूनें त्यांनीं या अधिवेशनांत यासंबंधींचा एक ठराव पुढें आणविला. याच सुमाराला त्या वेळचे भारतमंत्री लॉर्ड क्रू यांनीं 'इंडिया हाउस'संबंधीं कांहीं नव्या सुधारणा घडवून आणण्याबाबतचें एक बिल तयार केलें होतें. हें बिल १९१४ च्या हिंवाळ्यांत पार्लमेंटपुढें चर्चेसाठीं यावयाचें होतें. या बिलासंबंधीं हिंदुस्थानातर्फे सूचना करण्यासाठीं म्हणून राष्ट्रीय-सभेनें भूपेंद्रनाथ बसु, जिना, समर्थ, लॉर्ड सिंह, मझरूल हक व लालाजी यांचें एक शिष्टमंडळ बनविलें. या शिष्टमंडळानें विलायतेस जाऊन, तेथील मुत्सद्यांशीं वाटाघाट करून इंडिया हाऊसच्या घटनेंत कांहीं उदार फेरफार घडवून आणण्याची खटपट करावी असें ठरलें व त्याप्रमाणें तें रवाना झालें. लालाजी मात्र लगेच या शिष्टमंडळाबरोबर जाऊं शकले नाहींत. या वर्षी पंजाबांत अनपेक्षित असें एक प्रकरण उपस्थित झालें. लाहोर येथील लॉरेन्स गार्डनच्या वाटेवर १७ मे १९१३ रोजीं कांहीं युरोपियनांना ठार करण्याच्या हेतूनें कांहीं क्रांतिकारकांनीं बॉंब ठेवला. कर्मधर्मसंयोगानें ज्या युरोपियनांना मारण्याकरितां हा बॉंब रस्त्यावर ठेविला होता ते त्या दिवशीं या वाटेनें आले नाहींत. मात्र गरीब बिचारा एक इंडियन आर्डरली संध्याकाळच्या वेळीं या बाजूनें येत असतां, अंधारांत न दिसल्यामुळें बॉंबवर पाय पडून ठार झाला. हा प्रकार घडण्यापूर्वी पांच महिने दिल्लींत व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांजवर बॉंब फेंकण्यांत आला होता. अनेक प्रकारें शोध करूनहि हा बॉंब फेंकणारा माणुस सांपडला नाहीं. लाहोरांतल्या या बॉंबच्या स्फोटामुळें पोलिसांत नवा उत्साह संचारला. व्हाइसरॉयांवर बॉंब फेंकणारा व लॉरेन्स गार्डनच्या वाटेवर बॉंब ठेवणारा माणुस एकच असला पाहिजे, असा पोलिसांनीं तर्क बांधला व त्यांनीं लाहोरांत धरपकडीला सुरुवात केली व संशयावरून चौघां तरुणांस पकडून दिल्ली येथें त्यांजवर खटला सुरू केला.

दिल्लीच्या या खटल्यांत, पोलीस आपणास ‘येनकेन प्रकारेण’ ओढण्याचा प्रयत्न करतील असें लालाजींस पहिल्यानें फार वाटत होतें. असें त्यांस वाटण्याला सबळ कारणेंहि होतीं. या खटल्यांतील आरोपींपैकीं बलराज व बालमुकुंद या दोन आरोपींचा त्यांच्याशीं पुष्कळ वर्षांचा गाढ संबंध होता. बलराज हा त्यांचे स्नेही लाला हंसराज यांचा मुलगा असल्यामुळें व त्याहूनहि त्यांचा मुलगा प्यारेकृष्ण याचा तो जिवश्चकंठश्च सुहृद् असल्यामुळें घरांतल्यापैकींच एक समजला जाई. दुसरा आरोपी बालमुकुंद हा लालाजींचे दुसरे एक स्नेही भाई परमानंद यांचा नातलग असून, त्यांनीं १९११-१२-१३ सालीं सुरू केलेल्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळींतील प्रमुख सहकारी होता. त्याच्या सहकारितेनें त्यांनीं जालंदर परगण्यांत अस्पृश्य मुलांकरितां अनेक शाळा सुरू केल्या होत्या व त्यानें या चळवळीस आजीव वाहून घेण्याचें वचन दिलें असल्यामुळें, अस्पृश्यांची एक आदर्श वसाहत तयार करण्याच्या हेतूनें लालाजींनीं रावी नदीच्या पलीकडे २५००० रुपये खर्च करून जमीन खरेदी केली होती. बालमुकुंद लालाजींस येऊन मिळाला त्या वेळीं त्याचें वय अवघें वीस वर्षांचें होतें. वयाच्या मानानें त्याच्यांतील काम करण्याची तडफ विलक्षण होती. त्याच्या इतकें शुद्ध शील, त्याच्याइतकी त्यागवृत्ति हीं त्या वेळच्या फार थोड्या पंजाबी तरुणांत आढळलीं असतीं. त्यानें आपलें जीवितसर्वस्व लालाजींचे पायीं वाहिलें होतें. लालाजीहि त्याला आपल्या प्राणापलीकडे जपत. अकालीं अविचारीपणें राजकारणाच्या आगींत उडी न घेतां कांहीं तर विधायक कार्य आंगावर घेऊन, तें पार पाडण्याचा निश्चय करावा असा ते त्याला वारंवार उपदेश करीत. या उपदेशाप्रमाणें त्यानें अस्पृश्योद्धाराचें काम घेतलें होतें. हें विधायक कार्य सोडून, आपल्याला थांग न लागूं देतां, बालमुकुंद अत्याचारी क्रांतिकारकांस जाऊन मिळेल असें त्यांस स्वप्नांतहि कधीं खरें वाटलें नसतें. पण खटल्याच्या चौकशीच्या वेळीं जी हकीकत बाहेर आली ती ऐकून ते थक्कच झाले. या खटल्यांत बालमुकुंदावर लॉरेन्स गार्डनमध्यें खुद्द बॉंब ठेवल्याचा आरोप कांहीं सिद्ध होऊं शकला नाहीं, पण या बॉंब ठेवण्याच्या योजनेच्या मागें ज्या व्यक्ती होत्या त्यांपैकीं तो एक होता, असें सिद्ध करण्यांत आलें. इतकेंच नव्हे तर दिल्ली दरबारच्या वेळीं व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यांजवर बॉंब फेंकणाऱ्यांपैकीं हा एक होता असाहि संशय घेण्यांत आला. या खटल्यांत बालमुकुंदला फांशीची शिक्षा सुनावण्यांत आली. विषादाची

गोष्ट ही कीं, बालमुकुंदनें एका सुंदर मुलीशीं लालाजींना चोरून १९११ सालीं प्रेमविवाह केला होता. ज्या दिवशीं बालमुकुंद फांशी गेला त्याच दिवशीं या तरुण मुलीनें प्राणत्याग केला. या एकंदर प्रकारामुळें लालाजींच्या मनावर फार परिणाम झाला. दुःखांत समाधानाची गोष्ट एवढीच कीं, लालाजींच्या नेहमींच वाइटावर असलेल्या पोलिसखात्यानें त्यांस या खटल्यांत ओढण्याचा शिकस्तीचा प्रयत्न केला असतांहि, त्यांच्याविरुद्ध कांहींहि पुरावा पुढें आणतां न आल्यामुळें, तो फुकट गेला. खटला आटोपतांच लालाजी १९१४ च्या एप्रिलांत विलायतेस निघून गेले. विलायतेस पोंचल्यावर राष्ट्रीय सभेनें करावयास धाडलेल्या शिष्टाईचे बाबतींत—त्यांस फारशी आशा वाटत नसतांहि—जेवढें कांहीं त्यांस करतां येणें शक्य होतें तेवढें त्यांनीं केलें. पण लवकरच महायुद्ध सुरू झाल्यामुळें व खुद्द लॉर्ड क्रू यांस, इतर पक्षांकडून तर नाहींच, पण स्वपक्षियांकडूनहि विशेष पाठिंबा नसल्यामुळें, त्यांचा सुधारणांचा खर्डा त्यांच्याच खिशांत कायमचा पडून राहिला. पार्लमेंटांत त्यांच्या बिलास फारच जोराचा विरोध होऊन प्रथमदर्शनींच तें फेंटाळून लावण्यांत आलें. ब्रिटिश प्रधानमंडळाला घरच्या विवंचनेनें ग्रासलेलें असतां, हिंदुस्थानासारख्या परतंत्र राष्ट्राच्या सोईगैरसोईची चर्चा करण्यास थोडीच सवड मिळणार! बिचारें शिष्टमंडळ गेलें तसें हात हालवीत परत आलें. लालाजी मात्र परत आले नाहींत; आणि येण्यासारखी परिस्थितिहि नव्हती.

१९१३–१४ च्या सुमाराला अमेरिकेंतील गदर चळवळीचे प्रतिध्वनी पंजाबांत उमटूं लागले होते. ही 'गदर' चळवळ हरदयाळ नांवाच्या पंजाबी तरुणानें अमेरिकेंत सुरू केली होती. हरदयाळ हा पंजाब विश्वविद्यालयाचा एम. ए. होता. इंग्रजी भाषा हा विषय घेऊन हा पहिल्या वर्गांत पहिला आल्यामुळें यास विलायतेंत जाऊन अभ्यास करण्याकरितां हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ति मिळाली होती. १९०५ सालीं हा विलायतेस गेला. पण पुढें देशांतील एकंदर राजकीय दुःस्थितीकडे यांचें लक्ष गेल्यामुळें, पुस्तकांत डोकें खुपसून राहण्याऐवजीं, देशाला जेणेंकरून बरे दिवस येतील असें कांहींतरी कार्य हातीं घ्यावें असें त्यास वाटूं लागलें. त्यानें आपली शिष्यवृत्ति बंद करण्याबद्दल सरकारास कळविलें व तो १९०८ सालीं हिंदुस्थानास परत आला. हिंदुस्थानांत परत आल्यावर त्यानें लाहोर येथें एक राजकीय शिक्षणाचा वर्ग काढला.

या वर्गांचा हेतू ब्रिटिश साम्राज्य नष्ट करूं शकणारी नवी पिढी तयार करावयाची हा होता. लाहोरास असतां हरदयाळ लालाजींच्या घरीं राहत असे. हरदयाळ हा उघड उघड क्रांतिकारक होता. सशस्त्र बंडावर त्याचा विश्वास होता. लालाजींस त्याचे विचार कितपत पटत होते हें समजण्यास मार्ग नाहीं. हरदयाळाच्या साहचर्यामुळें सरकारच्या संशयीवृत्तीला मात्र ते बळी पडले. हरदयाळासारख्या भयंकर क्रांतिकारकाशीं राजरोस संबंध ठेवणारा गृहस्थ अत्याचारी असला पाहिजे, ही सरकारची समजूत कायम झाली. याचा परिणाम, त्यांचा अत्याचारावर विश्वास नसतांहि, त्यांस पुढें कित्येक वर्षें अकारण भोगावा लागला.

हरदयाळ दोन-अडीच वर्षें हिंदुस्थानांत राहिल्यावर, अमेरिकेस निघून गेला. जातांना त्यानें आपले कांहीं शिष्य तयार करून मागें ठेविले. या शिष्यांपैकीं दोघेजण दिल्लीस भरलेल्या लाहोर कटाच्या खटल्यांत सांपडले व फांशी दिले गेले. हरदयाळ ब्रिटिशांचा तीव्र द्वेष्टा बनला होता. अमेरिकेंतील निरनिराळया भागांत हिंडून त्यानें व्याख्यानें दिलीं. श्रोत्यांच्या काळजाला हात कसा घालावा याची कला त्याला चांगली साधली होती.त्याचीं व्याख्यानें द्वेषपूर्ण होत.श्रोत्यांच्या वृत्ति प्रक्षुब्ध होण्यास त्यामुळें फारसा अवकाश लागत नसे. हरदयाळानें ज्या ज्या भागांत व्याख्यानें दिलीं त्या त्या भागांत क्रांतिकारकांचे संघ त्यानें निर्माण केले व या सर्व संघांना एका सूत्रानें बांधून त्यांस 'गदर' पक्षाखालीं आणलें. 'गदर' याचा अर्थ बंड. सशस्त्र बंडावर ज्याचा विश्वास आहे असा मनुष्यच याचा सभासद होऊं शके. खून, रक्तपात, सामुदायिक सशस्त्र हल्ले यांचे द्वारा सरकारास 'त्राहि भगवान्' असें म्हणावयास लावून, हिंदुस्थानांत राज्यकारभार करणें अशक्य होईल अशी परिस्थिति निर्माण करावयाची, असें या पक्षाचें ध्येय होतें. आपल्या ध्येयप्रसारार्थ या पक्षानें 'गदर' नांवाचें वर्तमानपत्र सुरू केलें होतें. या वर्तमानपत्राचा प्रसार अमेरिकेंतील सर्व हिंदी लोकांत तर झाला होताच, पण हिंदुस्थानांतहि त्याचें देशी भाषांत भाषांतर करून त्याचा जोरानें प्रसार करण्यांत येत होता.

महायुद्ध सुरू होण्यापूर्वी हरदयाळनें एक दिवस एका जाहीर सभेंत, 'लवकरच इंग्लंड व जर्मनी यांचेमध्यें युद्ध सुरू होणार, आपण या युद्धाचा फायदा घेऊन जर्मन लोकांच्या सहकारितेनें हिंदुस्थानांत क्रांति घडवून आणली पाहिजे,' असें जाहीर केलें. हरदयाळ व जर्मन मुत्सद्दी यांचा पत्रव्यवहार या वेळीं सारखा सुरू

होता. पुढें १९१४ सालीं महायुद्धास सुरुवात होतांच, ब्रिटिश सत्तेविरुद्ध उठावणी करण्यासाठीं त्यानें जोरांत चळवळ सुरू केली. ती इतकी कीं, 'संयुक्त संस्थान'च्या सरकारला त्याला आळा घालण्यासाठीं हरदयाळला हद्दपार करण्याचे हेतूनें कैद करणें भाग पडलें. पण कोणी तरी जामीन म्हणून पुढें आल्यामुळें त्याची सुटका झाली. या सुटकेचा फायदा घेऊन, हरदयाळ स्वित्झर्लंडला पळून गेला, व तेथून ऐन लढाईचे दिवसांत त्यानें जर्मनींत प्रयाण केलें. जर्मनींत असतांना त्यानें अनेक कारस्थानें केलीं. त्याचा इतिहास अत्यंत मनोरम आहे. ज्यांस तो वाचणें असेल त्यांनीं तो 'फॉर्टी-फोर मन्थस् इन् जर्मनी अॅण्ड टर्की' या त्याच्या पुस्तकांतून वाचावा.

हरदयाळ जरी अमेरिकेंतून निघून गेला, तरी 'गदर' चळवळ मुळींच थंडावली नाहीं. हरदयाळनें तयार केलेल्या माणसांनीं ती धडकून पुढें चालविली. या चळवळीचा जोर कानडामध्यें विशेष होता. कानडांत या सुमारास जवळ जवळ ४००० हिंदी लोक राहत असत. यांत पंजाब्यांचें प्रमाण सर्वांहून जास्त होतें. या लोकांवर हरदयाळनें आपली विलक्षण छाप बसविली होती.

कानडांत जे 'गदर' पक्षीय होते त्यांचें सर्व लक्ष हिंदुस्थानांत बंड कसें उभारतां येईल याकडे लागलेलें होतें. कानडांत नेहमीं नवीं नवीं माणसें आणावयाचीं व त्यांस शिक्षण देऊन हिंदुस्थानांत पाठवावयाचें असें त्यांचें धोरण होतें. याच धोरणानुसार बाबा गुरुदत्तसिंग या शिख गृहस्थानें 'कोमागाटामारू' ही जपानी कंपनीची आगबोट भाड्यानें घेऊन पंजाबी लोकांस कानडांत नेण्याचा प्रयत्न केला, असें 'सिडिशन कमिटीचें' म्हणणें आहे. या आगबोटींत ३५१ शिख व २१ पंजाबी मुसलमान होते. ही बोट व्हॅन्कुव्हर येथें पहिल्यानें लागली. परंतु कानडा सरकारनें, त्यानें नुक्ताच पास केलेल्या एमिग्रेशन लॉखालीं बोटीवरील लोकांस किनाऱ्यावर उतरण्याची मनाई केली. या मनाईमुळें बोटीवरील लोक व पोलीस यांचे दरम्यान बरीच दंगल उडाली. शेवटीं 'कोमागाटामारू'तील लोकांस हिंदुस्थानास परत फिरणें भाग पडलें. हा प्रकार घडला त्या वेळीं लालाजी इंग्लंडांत होते. त्यांनीं या अन्यायाविरुद्ध 'लिबरल' पक्षाच्या वर्तमानपत्रांत पत्रें लिहिलीं, दुय्यम-भारतमंत्र्याशींहि पत्रव्यवहार केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ही बोट किनाऱ्याजवळ

असतां 'गदर' पक्षाच्या लोकांनीं बोटीवरील लोकांत जोरानें मतप्रसार केला. किनाऱ्यावर उतरावयास न मिळाल्यामुळें लोक आधींच क्षुब्ध झाले होते आणि त्यांत ही भर पडतांच भयंकर वणवा पेटला. 'गदर' पक्षाचीं कांहीं माणसेंहि या लोकांबरोबर हिंदुस्थानांत जावयास निघालीं. अशा माणसांपैकीं विष्णु गणेश पिंगळे हा महाराष्ट्रीय तरुण होता. पिंगळे हा लहानपणींच अमेरिकेस जाऊन राहिला होता. 'गदर' पक्षाच्या तत्त्वांची दीक्षा त्याला चांगलीच मिळाली होती. बरेच दिवस अमेरिकेंत गदर पक्षातर्फे प्रत्यक्ष काम केल्यामुळें कारस्थानें करण्यांत तो तरबेज झाला होता. त्यानें पंजाबांत पाऊल टाकतांच 'कोमागाटामारू' बोटींतून जे लोक परत आले होते त्यांस व 'गदर' पक्षाबद्दल सहानुभूति असलेल्या लोकांस एकत्र आणून क्रांति कुशलतेनें कशी घडवून आणतां येईल यांबद्दल खलबतें सुरू केलीं. पिंगळे यास राशबिहारी बसु या नांवाचा बुद्धिमान् क्रांतिकारक येऊन मिळाला. राशबिहारी हा बॉंब तयार करण्यांत मोठा निष्णात होता. त्याच्या सहकारितेनें पिंगळे यानें क्रांतीची सर्व पूर्वघटना तयार केली. लाहोर शहर क्रांतिकारकांचें केंद्र बनविण्यांत आलें. येथून पुढील सर्व सूत्रें हालविलीं जावयाचीं होतीं. बंडाची तारीख ठरून कोणी कोणी कोठें कोठें उठाव करावयाचा याचे निश्चित बेतहि ठरले. पण एके दिवशीं लाहोरांतील ज्या घरांत क्रांतिकारकांचीं खलबतें चालत, त्यावर पोलिसांनीं एकाएकीं छापा घातला. या छाप्यांत कांहीं क्रांतिकारक सांपडले. पिंगळे व राशबिहारी निसटून गेले. कांहीं दिवसांनीं पिंगळे मिरत येथें घोडेस्वारांच्या बराकींत सांपडला. त्याला कैद केलें त्या वेळीं त्याचेजवळ बॉंबगोळे होते. पिंगळे व लाहोरास पकडलेले इतर क्रांतिकारक यांजवर खटला उभारण्यांत आला. या खटल्यांत पिंगळे यास फांशीची शिक्षा देण्यांत आली. पिंगळ्याच्या फांशीनंतर पंजाबांतील क्रांतिकारकांची चळवळ जवळ जवळ नामशेष झाली असें म्हटलें तरी चालेल.

वरील दोन्ही खटल्यांशीं, किंवा गदर चळवळीशीं तसें पाहूं गेलें तर लालाजींचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष कांहीं संबंध नव्हता. या खटल्यांतील व्यक्तींशीं व्यक्ती या दृष्टीनेंच त्यांचे जवळचे किंवा दूरचे संबंध होते. पण सरकारच्या संशयग्रस्त मनाला तें पटणें शक्य नव्हतें. सरकारला त्यांजवर उघडपणें जरी आरोप करतां आले नाहींत, तरी मनांतून संशय दूर झाला नाहीं. एखाद्या खुनी, दरोडेखोर माणसावर जशी पाळत ठेवावी, तशी त्यांजवर ठेवण्यांत येऊं लागली. त्यांस यामुळें हिंदुस्थानांत येणें धोक्याचें वाटूं लागलें.

## ३. राष्ट्रसभापति होण्याचा पुनः एकदां योग.

लालाजी विलायतेस आल्यावर एक मजेदार घटना घडली. राष्ट्रीय पक्ष व मवाळ यांच्या दरम्यान समेट घडवून आणण्याचा प्रश्न मिसेस ॲनि बिझांट यांनीं ( १९१४ ) हातीं घेतला. राष्ट्रीय सभेचें या वर्षींचें अधिवेशन मद्रास येथें व्हावयाचें असल्यामुळें, पुष्कळ दिवस भिजत पडलेला हा प्रश्न बिझांटबाई एकदांचा धसास लावतील, असें पुष्कळांस वाटत होतें. अर्थात् ज्या सभेपुढें हा प्रश्न यावयाचा आहे त्या सभेचा अध्यक्षहि समेट घडवून आणण्याचे कामीं कळकळीनें मदत करणारा असला पाहिजे, असें बऱ्याच जणांस वाटूं लागलें. त्या दृष्टीनें विचार करतां लालाजी हेच या वर्षीच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होण्यास योग्य आहेत, असें मत प्रदर्शित केलें जाऊं लागलें. त्याप्रमाणें ९ कॉंग्रेस कमिटयांपैकीं ५ कमिटयांनीं लालाजींचें नांव अध्यक्षपदासाठीं सुचविलेंहि. लालाजींच्या एका स्नेह्यानें त्यांस ही हकिगत लिहून कळविली व 'अध्यक्षपद स्वीकाराल किंवा नाहीं,' अशी पृच्छाहि केली. स्नेह्याच्या या पत्रास लालाजींनीं लगेच नकारात्मक उत्तर धाडलें. लालाजींनीं धाडलेलें हें पत्र महत्त्वाचें आहे. आपण अध्यक्षपद कां स्वीकारूं इच्छित नाहीं याचें विस्तृत स्पष्टीकरण त्यांनीं यांत केलें आहे. ते म्हणतातः—

" राष्ट्रीय सभेच्या सध्यांच्या पुढाऱ्यांशीं, ज्या पद्धतीवर व तत्त्वांवर राष्ट्रीयसभा चालविली जात आहे त्याबद्दल मूलतःच माझा विरोध आहे. राष्ट्रीय सभा चालविण्याची पद्धति मला मान्य झाली आहे, असें मद्रासच्या पुढाऱ्यांचें मत

झालेलें दिसतें, पण तें सत्य नाहीं. राष्ट्रीय सभा ही लोकांसाठीं राजकीय सवलती मिळविण्याच्या हेतूनें चालवितां नये. तडजोडीच्या संवयी, कायदेकाउन्सिलांत वापरावयाची मोजक्या व तोललेल्या शब्दांची भाषा हीं ज्या क्षणीं राष्ट्रीय सभेसारख्या लोकसभेंत सुरू केलीं जातात, त्या क्षणीं तिचें राजकीय चळवळीचें क्षेत्र या दृष्टीनें आलेलें महत्त्व कमी होतें, आणि आज तें तसें झालेंहि आहे. एक काळ असा होता कीं, राष्ट्रीय सभेचे पुढारी धीटपणें उपदेश करीत, जनतेपुढें उच्च राजकीय ध्येयें ठेवून, त्यांसाठीं कराव्या लागणाऱ्या त्यागास तिला प्रवृत्त करीत. हत्यारांचा कायदा रद्द झाला पाहिजे व प्रत्येक हिंदी माणसास सैनिक बनण्याचा हक्क असला पाहिजे असें राष्ट्रीय सभा उघड उघड सांगत असे, असा तो काळ होता. तो काळ असा होता कीं, ज्या काळीं पुढाऱ्यांचीं भाषणें म्हणजे राष्ट्रीय सभेचें अमोलिक वाङ्मय असें गणलें जाई. त्या काळांत राष्ट्रीय सभेचा मतप्रचार जनतेंत श्रेष्ठ दर्जाचा उत्साह उत्पन्न करी, कारण तिच्या व्यासपीठावरून स्पष्टोक्तीनें, सडेतोड युक्तिवादानें भरलेले असे जे निर्भयपणें विचार जाहीर केले जात, ते कोणत्याहि देशांतील स्वातंत्र्यवीरास भूषणभूत वाटतील असेच असत. तरुणांच्या अंतःकरणांत या विचारांचें आंदोलन लगेच सुरू झालेलें दिसे व देशांत राजकीय चळवळीबद्दलच्या उत्साहास भरती येई. अलीकडील राष्ट्रीय सभेच्या मतप्रचारावर दोन गोष्टींचा परिणाम झालेला दिसून येतो. एक सरकारची भीति व दुसरी अल्पसंख्याक वर्गाची भीति. ही भीति इतक्या अतिरेकाला गेलेली आहे कीं, राष्ट्रीय सभेला राजकारणाच्या शिक्षणाची शाळा म्हणून आलेलें महत्त्व पार नष्ट होऊन गेलें आहे. राष्ट्रीय सभेच्या आजच्या पुढाऱ्यांपुढें एकच ध्येय आहे आणि तें म्हणजे सरकाराकडून सवलती मिळवा-वयाच्या, कायदेकाउन्सिलांत जावयाचें, सरकारी कार्यकारी मंडळांत जागा पटका-वावयाच्या. अशा लोकांच्या विचारांत व आचारांत फरक पडावा यांत नवल तें काय ? ज्या गृहस्थानें काउन्सिल चेंबरमध्यें प्रेस ॲक्टाच्या बाजूनें मत दिलें, तो गृहस्थ राष्ट्रीय सभेंत तो रद्द व्हावा म्हणून चळवळ व खळबळ उडवून देऊं शकेल काय ? हीच स्थिति इतर बाबतींतहि. अशा स्थितींत मला अध्यक्ष होणें कसें आवडेल ? ”

यानंतर लालाजी इंग्लंडांतील तरुणतरुणी आपले सर्व व्यवसाय एका बाजूस ठेवून खांद्यावर रायफल टाकून युद्धक्षेत्रावर कसे बेधडक जात आहेत, त्यांना

पूर्वी लष्करी शिक्षण मिळालें असल्यामुळें व शस्त्रास्त्रें वापरण्याची संवय असल्यामुळें युद्धाचे बाबतींत सरकारास त्यांचा कसा उपयोग होत आहे याचें वर्णन करून, अंतःकरण पिळवटून म्हणतात, "इंग्रज तरुणांना खांद्यावर रायफल टाकून छाती पुढें काढून जातांना जेव्हां मी पाहातों, त्या वेळीं हिंदुस्थानच्या निःशस्त्रीकरणाचें उदासवाणें चित्र माझ्या डोळ्यांपुढून सरकूं लागतें. शस्त्रशिक्षणाच्या ज्या सवलती इंग्रज तरुणास मिळूं शकतात, त्या हिंदी तरुणास कां मिळूं नयेत? मी जर अध्यक्ष झालों तर माझ्या अंतःकरणांत याविषयीं जें कोलाहल सुरू आहे, तें व्यक्त केल्यावांचून माझ्यानें राहवणार नाहीं; पण मी माझें या बाबतींत अंतःकरण खुलें केल्यास राष्ट्रीय सभेच्या सध्यांच्या पुढाऱ्यांस तें खास आवडणार नाहीं. हद्दपारीपूर्वी माझीं जीं राजकीय मतें होतीं, त्यांत आज यत्किंचितहि फरक पडलेला नाहीं. अशा स्थितींत मी अध्यक्ष न होणेंच मला योग्य वाटतें. शेवटीं, बढाई म्हणून नव्हे तर खरोखरच म्हणून सांगतों कीं, सन्मान आणि अधिकार यांची भुरळ मला कधींहि पडलेली नाहीं. सन्मान आणि अधिकार प्राप्त करून घेण्याचे योग एक सोडून नव्हे, अनेकदां माझ्या आयुष्यांत आले, पण त्यांबद्दल यत्किंचितहि खेद वाटूं न देतां मीं ते फुकट जाऊं दिले. अधिकार व सन्मान यांपासून अलिप्त राहून सामान्य शिपाई म्हणून, स्वतांत जेवढी ताकद असेल तेवढी सर्व खर्चून, देशाची सेवा करीत असतां मरण्यांतच मला अभिमान वाटेल."

लालाजींचें हें पत्र म्हणजे त्यांच्या देशोद्धारार्थ अहोरात्र तळमळणाऱ्या निःस्वार्थी अंतःकरणाचें चित्रच आहे.

लालाजींस अध्यक्ष नेमण्याबद्दल नऊ कॉंग्रेस कमिट्यांपैकीं पांच कमिट्यांनीं जरी मत दिलें होतें, तरी ज्या मुंबईकर मवाळांच्या हातांत राष्ट्रीय सभेचीं सूत्रें होतीं त्यांनीं अनेक खटपटी व लटपटी करून त्यांस हें अध्यक्षपद मिळूं दिलें नाहीं. 'लालाजी मुसलमानांस नकोत; त्यांच्यावर हद्दपारीचा दोष आहे; ते आमच्या पुष्कळ पुढें जाणारे आहेत; आम्ही मवाळ तर ते जहाल,' इत्यादि सबबी पुढें करून, नेहमींच्याप्रमाणें आपणास हवा तसा अध्यक्ष या मवाळांनीं निवडून आणला. हे अध्यक्ष भूपेंद्रनाथ बसू हे होत. सरकारच्या नाकांतील बाल असलेल्या या गृहस्थापासून भीति बाळगण्याचें कांहींच कारण नव्हतें!

लालाजींना अध्यक्षपद देण्याची सूचना फेंटाळली गेल्याचा एक स्पष्ट परिणाम झाला. या वर्षी पंजाबमधून एकहि प्रतिनिधी राष्ट्रीय सभेस हजर राहिला नाहीं. अधिवेशनास अवघे सव्वासहाशें प्रतिनिधी हजर होते. पैकीं पांचशें मद्रासचेच होते. मवाळांच्या अदूरदर्शी व स्वार्थी वृत्तीमुळें राष्ट्रीय सभा कशी रोडावत चालली होती हें यावरून दिसून येईल.

इंग्लंडांत असतांना लालाजींनीं ' आर्यसमाजाचा इतिहास ' लिहिण्याचें काम हातीं घेतलें होतें. तें पूर्ण होतांच ते कानडास जाण्याचा विचार करूं लागले. मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, कानडांत असलेल्या हिंदी लोकांत पंजाब्यांचाच भरणा जास्त होता. लालाजींनीं कानडांत येऊन राहावें अशी या लोकांची फार इच्छा होती व त्याप्रमाणें त्यांनीं त्यांस आमंत्रणहि दिलें होतें. पण ' कोमागाटामारु ' प्रकरण उद्भवल्यामुळें, सरकार त्यांस कानडास जाऊं देण्यास तयार होईना. लढाईचे दिवस असल्यामुळें लालाजींस हिंदुस्थानास जाऊं देणेंहि सरकारास धोक्याचें वाटूं लागलें व त्याप्रमाणें त्यांस बंदीहि झाली. अर्थात् अमेरिकेस निघून जाण्याखेरीज अन्य मार्ग राहिला नाहीं.

## ४. अमेरिकेंतील पांच वर्षें.

१९१४ च्या नोव्हेंबरांत लालाजींनीं अमेरिकेस जाण्याकरितां विलायत सोडली. इंग्लंडास येण्याकरितां जेव्हां त्यांनीं आपलें घर सोडलें, तेव्हां सहा महिन्यांपेक्षां अधिक महिने तिकडे राहावयाचें नाहीं असा त्यांनीं विचार केला होता. लाहोरास त्यांची वकिली उत्तम प्रकारें चालत असे. पहिल्या दर्जाच्या प्रमुख वकिलांत त्यांची गणना केली जाई. पण दैव असें विचित्र कीं, जें घर सहा महिन्यांकरितां म्हणून त्यांनीं सोडलें तें जवळ जवळ सहा वर्षें सोडण्याचा त्यांजवर प्रसंग आला. आर्थिक दृष्ट्या ही फार मोठी आपत्ति होती. पण त्यांची मूळचीच वृत्ति धीरगंभीर असल्यामुळें आलेल्या प्रसंगास धैर्यानें तोंड देण्याचें त्यांनीं ठरविलें. न्यूयॉर्क येथें कांहीं काळ घालवून, मग संयुक्तसंस्थान पूर्णपणें पाहण्यासाठीं सावकाश सावकाश हिंडावयाचें असा त्यांनीं बेत केला. न्यूयॉर्क येथें त्यांच्या परिचयाचें असें कोणी नव्हतें. त्याकरितां त्यांनीं सिडने वेब या इंग्लंडांतील वयोवृद्ध समाजसत्तावाद्याकडून कांहीं परिचयपत्रें घेतलीं. या पत्रांचा लालाजींस फार चांगला उपयोग झाला. कोलंबिया विश्वविद्यालयांतील प्रो. सेलिग्मनसारख्याशीं स्नेह जमून न्यूयॉर्कमधील बऱ्याच प्रतिष्ठित स्त्रीपुरुषांच्या ओळखी झाल्या. या ओळखींच्या जोरावर त्यांस अमेरिकेच्या निरनिराळ्या चळवळींचा सूक्ष्म अभ्यास करणें सुकर झालें. 'युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका' (१९१६) व 'धि प्रॉब्लेम ऑफ नॅशनल एज्युकेशन इन इंडिया' (१९२०) हे त्यांचे उत्कृष्ट म्हणून समजले जाणारे ग्रंथ या अभ्यासाचींच फळें होत.

लालाजींचीं पहिलीं दीड-दोन वर्षें संयुक्त संस्थानांतील निरनिराळ्या संस्थांचा अभ्यास करण्यांत, व वेगवेगळ्या भागांत हिंडून अमेरिकन समाजाचें निरीक्षण करण्यांत गेलीं. दरम्यान ते जपानांतहि थोडे दिवस राहून आले.

महायुद्धाचा तो महत्त्वाचा काल होता. ब्रिटिश लोक आपणास मदत मिळावी म्हणून अमेरिकेंत खटपट करीत होते व त्यांस ती तशी मिळतहि होती. अमेरिकेंतील हिंदी लोक मात्र या बाबतींत उदासीन होते. आणि ज्यांच्यावर 'गदर' पक्षाचें वजन होतें, ते तर मदत स्पष्टपणें नाकारीत होते. कांहींनीं स्पष्टपणेंच सांगावयास सुरुवात केली होती कीं, 'ब्रिटिशांवर संकट येणें हेंच हिंदुस्थानच्या हिताचें आहे.' यामुळें अमेरिकेंतील हिंदद्वेष्टया ब्रिटिश भुतांच्या हातांत कोलीत दिल्यासारखें झालें. याचा फायदा, अमेरिकेचें हिंदुस्थानाबद्दलचें मत कलुषित करण्याचे बाबतींत ब्रिटिशांनीं चांगलाच करून घेतला. हिंदी लोकांना अमेरिकेंत स्वाभिमान सांभाळून राहणें जवळजवळ अशक्य होऊन बसलें. ही परिस्थिति ध्यानांत घेऊन लालाजींनीं तिला आळा घालण्यासाठीं व हिंदुस्थानासंबंधींच्या खऱ्या माहितीचा प्रसार करण्यासाठीं कांहींतरी सांघिक प्रयत्न करण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें १९१६ च्या सप्टेंबरांत त्यांनीं शिकागो येथें अमेरिकेंतील सर्व हिंदी तरुणांची एक सभा बोलाविली व अमेरिकेंतील परिस्थितीसंबंधींचे प्रत्येकाचे विचार नीट समजून घेतले. चिटणिशीचें काम कायमचें सांभाळणारा कोणी तरुण पुढें आल्यास आपण ताबडतोब कामास लागतों, असें त्यांनीं सभेंत जाहीर केलें. तेथें जमलेल्या तरुणांत त्यांना डॉ. हर्डीकर अधिक पसंत पडले व त्यांनीं त्यांस 'तुम्ही माझ्याशीं कायमचें सहकार्य करूं शकाल काय ?' असें विचारिलें. डॉ. हर्डीकर हे त्या वेळीं मिचिगन विश्वविद्यालयांत वैद्यकीचा अभ्यास करीत असून, संयुक्त संस्थानांतील 'हिंदुस्थान असोसिएशन ऑफ अमेरिका' या संस्थेचे अध्यक्ष होते. त्यांचा येथील अभ्यास स्वकष्टावर चालला होता. लालाजींपूर्वी आठ वर्षें ते अमेरिकेंत आले होते. लालाजींनीं 'तुम्हीं सहकार्य करण्यास तयार आहांत का ?' असा प्रश्न टाकतांच ते बुचकळ्यांत पडले. आयुष्यांत जो व्यवसाय करावयाचा म्हणून आपण निश्चित केलें, तो टाकून अगदींच भिन्न व्यवसायांत पडणें कितपत योग्य होईल याचा त्यांना विचार पडला. पण अखेर पुष्कळ चर्चेनंतर त्यांनीं लालाजींबरोबर काम करण्याचें ठरविलें. त्यांनीं आपल्या विश्वविद्यालयाचा अखेरचा निरोप घेतला व ते न्यूयॉर्क येथें १९१६ च्या नोव्हेंबरांत लालाजींकडे राहावयास आले.

डॉ. हर्डीकर येऊन मिळतांच लालाजींनीं लगेच 'इंडिअन होमरूल लीग ऑफ अमेरिका' ही संस्था स्थापन केली. ते स्वतः संस्थेचे अध्यक्ष बनले व डॉ. हर्डीकरांस चिटणीस बनविलें व कार्यास सुरुवात केली. संस्थेच्या कार्यप्रसाराकरितां 'यंग इंडिया' नांवाचें मासिक सुरू केलें. या प्रारंभींच्या दिवसांसंबंधीं आपल्या आठवणींत डॉ. हर्डीकर यांनीं खालीलप्रमाणें हकिगत दिली आहे.

" यंग इंडियाचा पहिला अंक १९१७ च्या जानेवारी महिन्यांत बाहेर पडला. हिंदुस्थानची माहिती मिळविण्याकरितां लोकांच्या झुंडीच्या झुंडी 'यंग इंडिया' ऑफिसकडे येऊं लागल्यामुळें खास त्याच कामाकरितां म्हणून, 'हिंदुस्थानवार्ता प्रसारक संघ' नांवाची एक संस्था लालाजींनीं उघडली, व खास त्याच कामाकरितां म्हणून स्वतंत्र चिटणीस नेमला. हिंदुस्थानची माहिती मिळविण्यास अमेरिकेंतील हिंदी प्रवासी, हिंदी विद्यार्थी व हिंदी कामकरीवर्ग, अशा सर्व प्रकारचे लोक येत असल्यामुळें, माहिती पुरविण्याचें काम बरेंच अवघड झालेलें होतें. स्वतः लालाजीहि, अशा प्रकारच्या हिंदुस्थानविषयक माहितीचे जिज्ञासु लोकांचे प्रश्न ऐकण्यांत व उत्तरें देऊन माहिती पुरविण्यांत आपला पुष्कळ वेळ देत असत. अगदीं अशिक्षित पण हुशार अशा अनेक हिंदी मजुरांनींहि संयुक्त संस्थानांत हिंदुस्थानविषयक ज्ञानाचा प्रसार करण्यास आम्हांला बरीच मदत केली. याहूनहि मोठ्या प्रमाणावर आम्हांला याच दिशेनें मदत करण्याच्या हेतूनें, त्या लोकांस स्वतःची एक वेगळीच संस्था असावी असें वाटल्यावरून लालाजींनीं त्या सर्वांना एकत्रित करून 'हिंदी मजूर संघ' या नांवाची एक संस्था स्थापन केली. त्यांना शिक्षण देण्याकरितां आम्हीं सायंकाळचे वर्ग सुरू केले. हे वर्ग चालविण्यांत लालाजीहि आम्हांस पुष्कळ मदत करीत, आणि कैक वेळां स्वतः त्या मजुरांस लिहावाचावयास शिकवीत. या अशिक्षित मजुरांनीं आमच्याशीं पूर्ण सहकार्य करून आपलीं स्वतःचीं कामें संभाळूनहि आम्हांला आमच्या कार्यांत कल्पनेबाहेर मदत केली. निढळाच्या घामानें मोठ्या कष्टानें मिळविलेल्या आपल्या अगदीं थोड्याशा रोजमजुरींतूनहि त्यांनीं आम्हांला यथाशक्ति आर्थिक साह्य केलें आणि हिंदुस्थानविषयक माहितीचें प्रचारकार्य ते रहात त्या त्या ठिकाणच्या कोनाकोपऱ्यांतूनहि केलें. याप्रमाणें लालाजींनीं येथील हिंदी लोकांस संघटित करण्याला आणि हिंदुस्थानापासून हजारों मैलांवर दूर असलेल्या अशा त्या देशांत हिंदी राष्ट्राचा लढा लढविण्याला मिळालेली एकहि संधि वायां जाऊं दिली नाहीं."

होमरूल लीग स्थापन केल्यावर लालाजींना पहिले पहिले दिवस फारच कष्टाचे गेले. हिंदद्वेष्ट्या लोकांनीं चालविलेल्या विरोधी चळवळीला दडपून टाकण्यास तशीच जोराची चळवळ करणें भाग होतें. पण द्रव्याखेरीज ही चळवळ चालणार कशी? अमेरिकेंतील हिंदी लोकांनीं कितीहि मदत केली तरी ती पुरी पडणारी नव्हती. या लोकांत धनिक सांपडणें विरळा, हातावर पोट असलेलेच फार. अशा स्थितींत लालाजींना फारच हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. या वेळीं त्यांची लेखणी त्यांच्या उपयोगीं पडली. लीगचें काम संभाळून त्यांना जेवढा वेळ मिळे तेवढा ते निरनिराळ्या वर्तमानपत्रांत लेख लिहिण्याकरितां खर्च करीत. या लेखांबद्दल जो मोबदला मिळे त्यांत कसाबसा खर्च चालविण्यांत येई.

लालाजींचें वाचन जबर असे. एक क्षणहि ते व्यर्थ दवडीत नसत. हिंदुस्थानांतून येणारीं, व अमेरिकेंत प्रसिद्ध होणारीं महत्त्वाचीं सर्व नियतकालिकें ते वाचीत. न्यूयॉर्क पब्लिक लायब्ररी व कोलंबिया युनिव्हार्सिटीची लायब्ररी या ठिकाणीं, वेळ सांपडतांच, ते नियमानें जाऊन बसत. या दोन्ही ग्रंथसंग्रहालयांतील हिंदुस्थानविषयक बहुतेक सर्व ग्रंथ त्यांनीं वाचून काढले होते. त्यांना कोठेंहि पहा, त्यांच्या बरोबर पुस्तक व पेन्सिल हीं असावयाचींच. वेळ सांपडला म्हणजे चकाट्या पिटीत न राहतां वाचीत राहावयाचें असा त्यांचा नियम असे. त्यांना निद्रानाशाची व्यथा जडलेली असल्यामुळें मध्यरात्रीपर्यंत ते वाचीत किंवा लिहीत बसलेले आढळावयाचे. कित्येकदां यामुळें त्यांचें शरीर फार ठणकूं लागे, असहनीय होण्याइतकें तें ठणके. मग ते शेजारीं काम करीत बसलेल्या हर्डीकरांना म्हणावयाचे, "हर्डीकर, माझें शरीर कसें ठणकतें आहे! झोंप घेईन म्हटल्यावर झोंप येत नाहीं. अशा वेळीं घरीं असतों तर किती बरें झालें असतें!" हर्डीकर हें ऐकून त्यांचें अंग रगडीत, मालिश करीत. मग म्हणत 'बाळ तूं झोपीं जा. तुला उद्यां सकाळीं बरींच कामें उरकावयाचीं आहेत. वाचतां वाचतांच मी झोपीं जाण्याचा प्रयत्न करीन.' असें म्हणून दिवा मालवून ते स्वस्थ पडत व पुनः एक दोन तासांनीं उठून वाचूं लागत. आंतून व बाहेरून अशा तऱ्हेच्या वेदना होत असतांहि त्यांनीं हिंदुस्थानविषयक चळवळ अविश्रांत चालविली; त्यांत एक दिवसहि खंड पडूं दिला नाहीं.

आर्थिक परिस्थिति वर लिहिल्याप्रमाणें अतिशय बिकट असल्यामुळें, वकीलीच्या धंद्यांत हजारों रुपये मिळवून हजारों रुपयांचा दानधर्म करणाऱ्या या

पुरुषास स्वतःच्या रोट्या बनविण्यापासून तों भांडीं घांसण्यापर्यंत सर्व कामें स्वतःच करावीं लागत. पण त्याबद्दल त्यांना कधींहि विषाद वाटला नाहीं. डॉ. हर्डीकरांस हें पाहवत नसे. त्यांनीं हिंदुस्थानांत असलेल्या आपल्या बंधूंना याविषयींची साग्र हकीगत एकदां लिहिली. हर्डीकरांच्या बंधूंनीं ती हकीगत लो. टिळकांच्या कानांवर घातली. लोकमान्यांना ती हकीगत ऐकून फार वाईट वाटलें व लगेच त्यांनीं होमरूल लीगच्या गंगाजळींतून १५००० रुपये लालाजींकडे रवाना करण्याची व्यवस्था केली. लोकमान्यांकडून मदत येईल अशी लालाजींची अपेक्षा नव्हती. ती आलेली पाहतांच त्यांचा कंठ भरून आला आणि ते हर्डीकरांकडे उद्गारले, "हिंदुस्थानांत परराष्ट्रीय चळवळीचें महत्त्व समजणारा एकच पुरुष आहे, आणि तो लोकमान्य टिळक होय. तो महापुरुष आहे, खरा पुढारी आहे." या मदतीमुळें लीगचें मतप्रसाराचें कार्य लालाजींना धडकावून करतां आलें. या पैशांतून त्यांनीं आपल्या खाजगीकडे एक पैहि घेतली नाहीं. सर्व रकम बँकेंत टाकून त्याच्या व्याजांतून कार्य चालावें अशी त्यांनीं व्यवस्था केली.

लालाजी आपला सर्व खर्च त्यांस वर्तमानपत्रांकडून मिळणाऱ्या रकमेंतून करीत हें मागें सांगितलेंच आहे. लेखनापासून होणारी कमाई पहिल्यानें बेताचीच होती. पण 'यंग इंडिया' या पुस्तकाच्या प्रकाशनापासून अमेरिकेंत त्यांचा लौकिक वाढत गेला. त्यांच्या लेखांस वाढत्या प्रमाणांत मागण्या येऊं लागल्या व त्याप्रमाणें समाधानकारक मोबदलाहि मिळूं लागला. समाजसत्तावादी, आयरिश, मजूरपक्ष वगैरे संस्थांकडून त्यांस व्याख्यानें देण्यास आमंत्रणें येऊं लागलीं. 'यंग इंडिया' पुस्तक १९१६ च्या आगष्टांत प्रसिद्ध झालें. हें पुस्तक इतकें लोकप्रिय झालें कीं त्याची प्रथमावृत्ति अवघ्या आठ महिन्यांत खपून गेली व १९१७ चे एप्रिलांत त्याची दुसरी आवृत्ति काढणें भाग पडलें. ही लोकप्रियता पाहून ब्रिटिश सरकारनें या पुस्तकास आपल्या हद्दींत प्रतिबंध केला. पण तें कोणत्या ना कोणत्या तरी मार्गानें इंग्लंडास गेलें व तेथील 'इंडियन होमरुल लीग'च्या शाखेनें तें कर्नल वेजवुड यांच्या प्रस्तावनेसह पुनर्मुद्रित केलें. कर्नल वेजवुड यांस हें पुस्तक अतिशय आवडलें, तें इतकें कीं, त्यांनीं याच्या प्रति स्वखर्चानें पार्लमेंटच्या सर्व सभासदांस वांटल्या.

'यंग इंडिया' या पुस्तकाखेरीज लालाजींनीं 'इंग्लंड्स् डेट् टु इंडिया,' 'धि पोलिटिकल फ्यूचर ऑफ इंडिया' हीं पुस्तकें अमेरिकेंत असतां लिहिलीं.

त्यांनीं मतप्रसारार्थ लिहिलेल्या छोट्या पुस्तकांत, 'धि फाइट फॉर् क्रेस,' 'ए कॉल टु यंग इंडिया,' 'सेल्फ–डिटरमिनेशन फॉर इंडिया' हीं पुस्तकें विशेष प्रसिद्ध आहेत. याशिवाय 'इंडिया ए ग्रेव्हयार्ड' या नांवाचा एक त्यांनीं निबंध लिहिला होता. याच्या एक लाख इंग्रजी प्रति त्यांनीं संयुक्त संस्थानांत वांटल्या. या निबंधाचें इटालियन, स्पॅनिश, जर्मन, रशियन, फ्रेंच, पर्शियन या भाषांत व सर्व हिंदी भाषांत भाषांतर करून तें वांटण्यांत आलें. या निबंधाप्रमाणेंच लॉइड जॉर्ज व मॉंटेग यांस लिहिलेलीं अनावृतपत्रेंहि महत्त्वाचीं आहेत.

लालाजी अमेरिकेंत असतां रौलेट ॲक्ट पास झाला व मनुष्यत्वाला काळीमा लावणारे अनन्वित अत्याचार इंग्रज सत्ताधाऱ्यांकडून पंजाबांत झाले. या अत्याचारांच्या हकिकती जेव्हां लालाजींच्या कानांवर गेल्या तेव्हां त्यांचें रक्त उसळलें, मन क्षुब्ध झालें. या प्रसंगीं तरुण पंजाब्यांस उद्देशून त्यांनीं एक धीराचा संदेश धाडला. या संदेशांत ते लिहितात, "My heart is bitter, my soul is sore, I am filled with anger at the doings of the bureaucracy but even more so at the conduct and behaviour of my own countrymen. It is the latter whom I hold responsible for all the suffering and the shame that you have been afflicted with." आपल्या देशबांधवांच्या संकटकाळीं आपण प्रत्यक्ष उपयोगीं पडूं शकत नाहीं याबद्दल त्यांना खंती वाटत होती. विशेषतः पुढारी म्हणवणारे लोक पडद्याआड लपत आहेत, सरकारी सोटयाच्या भीतीमुळें सर्व सार्वजनिक चळवळी थंडावल्या आहेत, वर्तमानपत्रें बंद झालीं आहेत, राजकीय आरोपींचीं वकीलपत्रें घेण्याचें वकील नाकारीत आहेत, प्रत्येकजण आपापल्यापुरतें पाहण्यांत गर्क झाला आहे वगैरे हकिगती जेव्हां त्यांनीं ऐकल्या, तेव्हां पंजाबच्या या नैतिक अधःपाताची त्यांस चीड आली. तरुण पंजाब्यांना उद्देशून ते आपल्या संदेशांत म्हणतात, "तरुण पंजाब्यांनों, माझी तुम्हांला कळकळीची विनंति आहे कीं तुम्हीं तरी हा अधःपात थांबवा. ही आत्मपूजेची, दुसऱ्यांवर दोष लादण्याची प्रवृत्ती नाहींशी करा. जे हद्दपार झाले, जे गिरफ्तार झाले, जे मृत्यु पावले, त्या पुढाऱ्यांची स्मृति तुमच्या अंतःकरणांत कोरली जाऊं द्या, त्यांना तुमचेकडून साहाय्य होऊं द्या, सहानुभूति दाखविली जाऊं द्या, त्यांचा आदर तुमचेकडून होऊं द्या. तुमचें सार्वजनिक आयुष्य

पुन: सुरू करा, बंद झालेलीं वृत्तपत्रें चालवूं लागा, तुमच्या राजकीय संस्थांचा पुनरुद्धार करा, लोकांना शिक्षण देऊन संघटित करा. सूडाच्या किंवा द्वेषाच्या भावनेनें मात्र हें करूं नका. तुमची कार्यपद्धति द्वेषाच्या विषानें भरली जाऊं देऊं नका. कृतीनें, वाचेनें किंवा मनानेंहि अत्याचार करूं नका. सशस्त्र क्रांतीची धडपड करण्याइतकी आजची आमची स्थिति नाहीं. क्रांति व्हावयाला पाहिजे, पण ती अत्याचारांच्या किंवा शक्तीच्या द्वारा नव्हे. अंत:करण व मन यांत ती व्हावयाला पाहिजे. दृढता, निश्चयीपणा, चिकाटी व तत्त्वनिष्ठा यांची आज आम्हांला जरूरी आहे. धनिकांकडे दुर्लक्ष करा, त्यांना वाटेल तसें वागूं द्या. मध्यमवर्ग, शेतकरी व कामकरी यांना संघटित करा, त्यांचीं कर्तव्यें त्यांना पटवा, त्यांचे हक्क त्यांना समजावून द्या, शिक्षणाचें, सहकारितेचें व संघटनेचें महत्त्व त्यांचे मनावर बिंबवा, प्रत्येक गोष्टीकडे व्यापक दृष्टीनें पाहावयाला त्यांना शिकवा, व्यक्तीनें समाजाकरितां व समाजानें राष्ट्राकरितां स्वार्थत्याग करणें किती जरूर असतें हें त्यांस समजावून द्या. माझ्या मतानें तरी गांधी हेच तुमचे अत्युत्तम पुढारी आहेत.* त्यांचे गुण

* लालाजींस महात्मा गांधींबद्दल आदर व त्यांनीं रौलेट ॲक्टाविरुद्ध चालविलेल्या सत्याग्रहाच्या चळवळीबद्दल सहानुभूति हीं किती वाटत होतीं, याची कल्पना त्यांनीं त्यांस अमेरिकेहून धाडलेल्या खालील पत्रावरून येईल:—

Dear Mahatmaji,

Circumstances beyond my control have prevented my taking part in the great movement that you are leading for the uplift of our common Motherland. I am, however, desirous of conveying to you my hearty admiration for your noble stand, and myun qualified appreciation of your high-souled patriotism.

During my absence from India, I have learnt and unlearnt a great deal. This is no place to make a full confession of faith. But I want to say, that although I do not fully agree with your line of thought, I am in substantial agreement with your conclusions as to what we shonld do. Never before have I been more convinced of the futility of attempts to bring about a forcible revolution in India. Terrorism, too, in my judgment, is not only futile but sinful. Secret propaganda and secret societies may have some justification in the Government's desire to prohibit and penalize all kinds of open work, but in the long run this ends in the demoralization of

आत्मसात् करून त्यांच्यामागून चालूं लागा. तुमच्यावर दुःखें कोसळतील तेव्हां तीं मर्दाप्रमाणें शांतपणें व धैर्यानें सोसा. ' अमक्यानें तें केलें, अमक्यानें

those who take part in them. I believe that no nation deserves or will win freedom which is not prepared to suffer for it. When I say that, I mean the suffering in pursuit of freedom, and not for lack of it. In India we have plenty of the latter and not sufficient of the former. We have so far done precious little to deserve freedom and we have done still less to educate our people as to what constitutes real freedom. The sacrifices and sufferings we have so far undergone in our fight for freedom are too trivial to be crowded with success.

I am therefore in full sympathy with the general spirit of your propaganda. I may be unable to sign the full pledge of a satyagrahi, but if and when I return to India I shall sign the ' pure Swadeshi Vow'.

You will be pleased to learn that most of the young Indians in this country have a deep sentiment of reverence for you. One of them, at one time a faithful follower of Hardayal, writes:—

" What we need now are the leaders of the type of Mahatma Gandhi. We do not want armed resistance. We do not want passive resistance. What we want is something super, and that is what Mahatma is advocating. I have concluded that the methods which Hardayal advocated are not wise and sane for any part of the world. We want to get a way from murder, assassination, conflagration and terrorism. The foundation in the past was laid upon bloodshed and we have had enough of it; but now the foundation must be laid on justice and freedom to individuals, so that the same be palpable in the future. Hardayal has, by giving these ideas degraded himself, and I am afraid it may affect some of the young men who always followed him blindly. It is our misfortune that our leaders instead of going up, are going down. The crying need of India is leaders of the type of Gandhi, staunch in their principles, which can be applied to almost every part of the world. "

How I wish I had been in India to share in full the misfortunes of my countrymen. My heart bleeds for them, but more for myself in having been deprived of the opportunity to serve and suffer.

तसें सांगितलें म्हणून मीं केलें, त्यानें माझी दिशाभूल केली, सारा दोष त्याचा, माझा त्यांत दोष नाहीं,' असें पोरांसारखें रें रें करीत राहूं नका. मर्दासारखे वागा. तत्त्वाकरितां ज्यांनीं हालअपेष्टा सोसल्या त्या शीख गुरूंचें स्मरण ठेवा. तुम्हांला प्रत्यक्ष मदत करतां येत नाहीं याबद्दल मला वाईट वाटतें. पण जिव्हेनें, लेखणीनें व द्रव्यानें मला जितकें म्हणून करतां येणें शक्य आहे तितकें मी करीन. मी तुमच्याकरितां भिक्षा मागेन, कर्ज काढीन किंवा चोरीहि करीन. मी तुमच्यासाठीं काम करीन व जें कांहीं मिळवीन तें तुम्हांला पाठवून देईन. विसाव्या शतकांतील पंजाबी इतके क्षुद्र व नादान बनले होते कीं, एका धक्क्यासरशीं ते चिरडून गेले, व अधःपाताच्या मार्गाला लागले असें इतरांना म्हणण्यास संधी देऊं नका."

पंजाबांतील एकंदर शोचनीय स्थितीमुळें लालाजींचा जीव सारखा तळमळत होता. त्यांचें सारें चित्त तिकडे लागलें होतें. ते शरीरानें अमेरिकेंत होते पण त्यांचें मन पंजाबाभोंवतीं सारख्या घिरट्या घालीत होतें. यावेळीं अनपेक्षित अशी एक गोष्ट घडली. बादशाही फर्मान अकस्मात् निघून लालाजींवरील बंदी दूर केल्याचें जाहीर करण्यांत आलें. लालाजींना अमेरिकेंत आतां एक क्षणहि राहवणें शक्य नव्हतें. त्यांनीं आपल्या सर्व कामांची निरवानिरव केली, होम रूल लीगच्या कार्याचा भार डॉ. हर्डीकरांवर टाकला व अमेरिकेचा शेवटचा निरोप घेऊन ते मातृभूमीस येण्यास निघाले. त्यांच्या प्रयाणप्रसंगीं अमेरिकेंतील बऱ्याच वृत्तपत्रांनीं स्तुतिपर लेख लिहिले, सिव्हिक क्लबासारख्या क्लबांनीं त्यांना मेजवान्या दिल्या.

अर्धतपानंतर अनेक दिव्यांतून पार पडून लालाजींना त्यांच्या प्रिय मातृभूमीचें दर्शन आतां घडणार होतें.

इतर राष्ट्रांच्या बरोबरीचें स्थान मिळवितां आलेंच पाहिजे. इतर राष्ट्रांत हे सद्गुण फार कमी प्रमाणानें दृष्टीस पडतात. इतर राष्ट्रांचे दुर्गुण हिंदुस्थानानें जर स्वतःस लावून घेतले नाहींत तर हिंदुस्थान स्वतःच्या पायावर अल्पकाळांत उभा राहील; इतकेंच नव्हे तर इतरांनाहि आपला कित्ता गिरवावयास लावील. स्वतःच्या पायावर उभे रहा, इतरांच्या तोंडाकडे पाहूं नका, आपला उद्धार करण्याची शक्ति आपल्या आंगींच आहे," अशा प्रकारचा आत्मविश्वासाचा उपदेश त्यांनीं केला. दुसऱ्या दिवशीं लो. टिळक यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईतील विद्यार्थ्यांनीं त्यांस मानपत्र अर्पण केलें, चायना बागेंत बिझांटबाईंनीं मेजवानी दिली, सर्वंटस् ऑफ इंडिआ सोसायटींत सन्मान झाला. या सर्व ठिकाणीं, 'हिंदु-मुसलमानांची एकी, स्वतःच्या सद्गुणांवर विश्वास टाकून शरीरकष्ट करण्याची हौस आणि खालच्यापासून वरच्यापर्यंत सर्वांवर प्रेम करणारा देशाभिमान, एवढीं तत्त्वें जर आपण संभाळलीं तर आपला देश ऊर्जितावस्थेस आल्यावांचून राहाणार नाहीं,' असें लालाजींनीं वारंवार बजाविलें.

## ६. राष्ट्रीयसभेच्या कलकत्ता येथील जादा अधिवेशनाचे अध्यक्ष.

असमाधानकारक राजकीय सुधारणांमुळें उत्पन्न झालेल्या नैराश्यांत खिलाफत व पंजाव प्रकरण या बाबतींत झालेले अन्याय पाहून, हिंदी लोकांची चित्तवृत्ति उद्विग्न बनली होती. देश पूर्णपणें स्वतंत्र झाल्याशिवाय कोणत्याही प्रश्नाचा निकाल समाधानकारक लागणार नाहीं, अशी बहुसंख्याकांची नम्र समजूत झाली होती. राष्ट्रीयसभेनें या बाबतींत पुरेपुर चर्चा करून यापुढील ध्येय व मार्ग निश्चित ठरविले पाहिजेत अशी सर्वत्र चर्चा सुरू झाली. महात्मा गांधी यांनीं या बाबतींत 'असहकारिता' हाच एकमेव उपाय आहे असें जाहीर केलें व तो उपाय मान्य करून घेण्यासाठीं इतर राजकीय पुढाऱ्यांच्या संमतीनें कलकत्त्यास राष्ट्रीयसभेचें जादा अधिवेशन भरवून निश्चित करून घेण्याचें ठरविलें. त्याप्रमाणें सप्टेंबर १९२० मध्यें सदर अधिवेशन भरविण्याचें मुक्रर करून, त्यासाठीं कलकत्ता शहराची निवड करण्यांत आली. या अधिवेशनाचें अध्यक्षपद लालाजींस देण्यांत आलें. लालाजींची दीर्घकालची राष्ट्रसेवा, त्यांचा व्यापक अनुभव, त्यांची कार्यकुशलता हीं लक्षांत घेतां, त्यांना हा मान या पूर्वींच मिळणें योग्य होतें. पण तो ज्या कारणामुळें मिळूं शकला नाहीं त्यांचें विवेचन यापूर्वींच येऊन गेलें असल्यामुळें त्यासंबंधीं येथें आम्हीं पुन्हां लिहूं इच्छित नाहीं.

कलकत्त्यांत लालाजींचा अपूर्व सन्मान झाला. त्यांची स्टेशनपासून राहण्याच्या जागेपर्यंत जंगी मिरवणूक काढण्यांत आली. ता. २ रोजीं

अधिवेशनाचें अध्यक्षस्थान त्यांनीं मंडित केलें. आपल्याला अध्यक्षपदाचा बहुमान दिल्याबद्दल त्यांनीं प्रथमतः आभार प्रदर्शित केले आणि बंगाल-प्रांत व विशेषतः कलकत्ता शहर हें राष्ट्रीय विचाराचें उगमस्थान व आगर आहे, येथल्याच वक्त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत हिंडून आपल्या परिणामकारक भाषणांनीं देशांत राष्ट्रीय विचारांची जागृति केली, याच शहरचे रहिवासी अरविंद घोष यांच्यासारख्या निर्मल अंतःकरणाच्या व अत्यंत उज्वल प्रतिभेच्या देशभक्तानें राष्ट्रीयत्वाच्या नवीन ध्येयाचें बीजारोपण केलें, आणि याच शहरांत भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावरून महर्षि दादाभाई यांनीं आपलें स्वराज्याचें ध्येय स्पष्ट व असंदिग्ध शब्दांत जाहीर केलें असें म्हणून बंगाली लोकांचा गौरव केला. नंतर ते म्हणाले, "कै. लोकमान्य टिळक यांच्या मृत्यूनें झालेली हानि किती भयंकर आहे याची पुरती कल्पनाहि करवत नाहीं. या प्रसंगीं त्यांच्या शांत, विवेकपूर्ण व पोक्त सल्ल्याचा अतिशय उपयोग झाला असता. त्यांच्या मृत्यूनें सर्व जातींच्या व दर्जाच्या आबालवृद्धांत अत्यंत दुःख झाल्याचा जो देखावा दिसून आला, त्यावरून सरकारी अधिकाऱ्यांनीं कितीहि डोळे वटारले तरी आपल्या पुढाऱ्यांची खरी योग्यता जाणण्याची पात्रता जनतेच्या अंगीं आहे हें सिद्ध होतें. त्यांच्या निधनानें हिंदुस्थान देशाची भयंकर हानी झाली आहे हें तर खरेंच, पण त्यांतल्या त्यांत राष्ट्रीय सभेची झालेली हानि अपरिमितच आहे. लो. टिळकांनीं अतिशय हालअपेष्टा सोसून आपल्या अढळ निश्चयानें, अखंड देशसेवेनें व अपूर्व स्वार्थत्यागानें या देशांत राष्ट्रीय चैतन्याचा संचार करण्याच्या कामास मोठी मदत केली होती. असो. या राष्ट्रीय सभेच्या बैठकींत मुख्यतः तीन महत्वाचे प्रश्न आपल्यापुढें येणार आहेत. पंजावप्रकरण, खिलाफत प्रश्न आणि रिफॉर्म अॅक्टाचे कायदेकानू व पोटनियम हे ते तीन प्रश्न होत. यांतल्या पंजाबप्रकरणाचा विचार प्रथम करूं. अमृतसरची कॉंग्रेसची बैठक झाल्यानंतर कॉंग्रेसकमिटीचा रिपोर्ट, हंटरकमिटीचा रिपोर्ट आणि त्यावरील सरकारी अधिकाऱ्यांची मखलाशी प्रसिद्ध झाली आहे. या सर्वांत हिंदी लोकांच्या व अधिकाऱ्यांच्या मनांत आमूलाग्र मतभेद आहे. वरिष्ठ कार्यकारी कौन्सिलांत त्या वेळीं एकच हिंदी सभासद होता, पण त्यानेंहि आपलें मत वेगळेंच नमूद केलें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. पंजाबांतील अत्याचारांचें मूळ सर मायकेल ओडवायर यांच्या मेंदूंत आहे. पंजावप्रांत सरहद्दीनजीक असल्यानें येथें नेहमींच

लष्करीखात्याचें वर्चस्व दिसत असून या प्रांतावर इतर प्रांतांपेक्षां अधिक करडा अम्मल गाजविण्यांत येत असे व त्यामुळें पंजाबी लोक अगदीं गोगलगाय बनले होते. त्यांतून १९१३ सालीं जेव्हां सर मायकेल यांची या प्रांतावर नेमणूक झाली, तेव्हां ते त्या प्रांतांत नुकत्याच दिसूं लागलेल्या राजकीय चळवळीचा बींमोड करण्याचा चंग बांधूनच पुढें आले. पूर्वीच्या अधिकाऱ्यांच्या सौम्यपणा-मुळें १९०७ व १९१० सालीं जे दंगेधोपे घडले, तसले प्रकार अतःपर न घडावे म्हणून पंजाबच्या लोकांना आपण सदोदित धारेवर धरलें पाहिजे ही त्यांची समजूत त्यांच्या भाषणांत पदोपदीं व्यक्त होऊं लागली आणि वर्तमानपत्रांच्या दडपशाहींत तिचें स्वरूप प्रगट झालें. आरोपीच्या पूर्व चौकशीला कांट देणें, अपीलाची सवड न देणें, झटपट चौकशीनें जामीन घेणें आणि राजकीय गुन्हे-गारीशीं संबंध ठेवणाराला ताबडतोब शिक्षा लावणें हीं जीं चार जुलमी तत्त्वें रौलेट ॲक्टांत समाविष्ट झालीं, तीं याच राजेश्रीच्या शिफारशीवरून होत. १९१४ सालीं महायुद्धास सुरुवात झाल्यावर यांच्या मनाप्रमाणें व सूचनांस अनुसरून 'डिफेन्स ॲक्ट' पास झाल्यानें यांना आपला कार्यभाग सिद्धीस नेण्यास ही चांगलीच संधि मिळाली असें वाटलें व त्यांनीं त्याचा अखेरपर्यंत मनसोक्त उपयोग करून घेतला. सर मायकेल ओडवायर यांच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत त्यांनीं जीं अक्षम्य कामें केलीं त्यांची यादी केल्यास माझ्या मतें ती पुढीलप्रमाणें होईल.

पंजाबवर अम्मल गाजवितांना सर मायकेल यांनीं जें प्रशियनशाही वर्तन केलें त्याचा मासला म्हणून मी पुढील कांहीं बाबी नमूद करीत आहें—

(१) फोडा व झोडा, या तत्वावर त्यांनीं हिंदु व मुसलमान आणि शीख यांच्यांत विरोध उत्पन्न करून फूट पाडण्याच्या धोरणाचा अतिरेक केला.

(२) वरील तत्वास अनुसरून त्यांनीं लष्करीवर्ग, सुशिक्षितवर्ग, खेडवळ लोक व नगरवासी लोक असे आणखी नवेच भेद उत्पन्न केले.

(३) रिक्रुट जमविण्याकरितां आणि वॉरलोन व इतर फंड गोळा करण्या-करितां त्यांनीं कायद्याचा व अधिकाराचा दुरुपयोग केला.

(४) रिक्रुट मिळविणें आणि वॉरलोन उभारणें या कामांत त्यांनीं आपल्या हस्तकांच्या दुष्कृत्यांकडे जाणुनबुजून दुर्लक्ष केलें आणि पोलीस व मॅजिस्ट्रेट यांच्या लांचलुचपतीस आळा घातला नाहीं.

(५) ज्यांनीं ज्यांनीं आपल्या स्वतंत्र बाण्याची आणि राजकीय महत्वाकांक्षेची यत्किंचितहि चुणूक दाखविली, त्यांना नाक घासावयास लावण्याकडे त्या कायद्याचा दुरुपयोग केला.

(६) लष्करी कायदा पुकारण्याची आवश्यकता नसतां त्यानें जाणून बुजून हिंदुस्थान सरकारची समजूत करून दिली आणि साध्या राजद्रोहाच्या खटल्यांचीहि चौकशी लष्करी कोर्टापुढें व्हावी असा आग्रह धरिला. या संबंधांत प्रांतिक जनरल ऑफिसरचें मत आपल्या मतासारखेंच आहे असें भासविण्यांत ओडवायरनें निवळ लबाडी केली.

(७) प्रांतांत बंडाळी नसतांना आणि पुनः दंगाधोपा उद्भवण्याचाहि संभव नसतांना केवळ आपल्या खुनशीपणानें व जनतेची खोड मोडण्याच्या इच्छेनें त्यानें लष्करी कायदा चालू रहावा अशाविषयीं लटपटी केल्या.

(८) पंजाबी लोकांचा अमानुष छळ करणारे व त्यांचा उपमर्द करणारे रानटी हुकूम सोडण्याला त्यानें प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें अथवा कृतीनें उत्तेजन दिलें.

(९) जालियनवाला बागेंतील कत्तल होण्यापूर्वीं नसलें तरी कत्तल झाल्यावर तिला संमति दर्शविण्यानें त्यानें त्या अत्याचाराला सहाय्य केल्याचें पाप केलें आणि या संमतीमुळेंच पुढील सर्व क्रूर सोटेशाही जुलुमाची जबाबदारी त्याच्याच माथ्यावर येऊन पडते.

(१०) जनतेकडून दंडादाखल ज्या रकमा निवळ बेकायदेशीरपणें उकळण्यांत आल्या त्याकडे त्यानें कानाडोळा केला.

(११) ता. १० च्या शोचनीय प्रकारानंतर आणि पुनः जालियनवाला बागेंतील कत्तलीनंतर अमृतसरला जाणें आवश्यक असतां तेथें जाण्याचें टाकून आपल्या कामांत आंगचोरपणा केला.

(१२) सरतेशेवटीं पंजाबांतून निघून जातांना त्यानें बेकायदेशीर व हलकट धमक्या देऊन मानपत्रें उकळलीं आणि त्यांतलें एक मानपत्र तर त्याच्या हस्तकाच्या हातांत असतां त्यांत महत्वाचा फेरबदल करण्यांत आला. असल्या मानपत्रांचा त्यानें विलायतेंत स्वतःच्या बचावाकरितां उपयोग केला.

आपण मला जो अधिकार दिला आहे त्या उच्च अधिकारस्थानावरून मी य आरोपांचा पुकारा करितों व त्या संबंधांत चौकशी करण्याविषयीं आव्हान करितों.

आणि ईश्वरसाक्ष मी असें जाहीर करितों कीं, या आरोपांची चौकशी झाल्या-खेरीज पंजाब प्रांत व पंजाबी लोक यांच्या मनाचें कधींहि समाधान व्हावयाचें नाहीं."

यानंतर लालाजींनीं आपल्या भाषणांत सर मायकेल यांच्यावरील उपरिनिर्दिष्ट आरोप सिद्ध करण्याकरितां त्यांच्याच भाषणांतून आणि सरकारी कमिशनच्या वगैरे रिपोर्टांतून पुरावे दिले आहेत. त्यांत सर मायकेल यानें रयतेकडून नजराणा घेण्याची नवीन वहिवाट कशी पाडली, वर्तमानपत्रांची गळचेपी कशी केली, पंजाबांतील हिंदी व्यापारी व विशेषतः लाला हरकिसनलाल यांची नांगी मोड-ण्याकरितां सरकारी अधिकारी व हरकिसनलाल यांचे शत्रु यांनीं कट कसा केला, पंजाबाला कार्यकारी कौन्सिल असावें या सूचनेची त्यानें कशी थट्टा केली, दिल्लीच्या कटाच्या आरोपींतर्फे काम चालविल्याबद्दल लाला काशीराम या वकीलास कशी तंबी दिली व वकीलांनीं कटवाल्यांचें वकीलपत्र घेतल्यास त्यांजवर सरकारची इतराजी होईल अशी धमकी देऊन वकिलांना कसें कर्तव्य-भ्रष्ट केलें, रौलेट ॲक्टासारख्या जुलमी कायद्याची प्रेरणा कशी केली, हिंदुस्थानां-तील होमरूल चळवळ व गदर पक्षाची क्रांतिकारक चळवळ या दोहोंचें मनः-कल्पित ऐक्य दर्शवून बिपिनचंद्र पाल व लोकमान्य टिळक यांना पंजाबांत येण्याची मनाई कशी करण्यांत आली, परप्रांतांतल्या वर्तमानपत्रांना पंजाबांत मज्जाव कसा केला, पंजाबच्या नैर्ऋत्य भागांत १९१५ सालीं जें बंड उद्भवलें होतें त्यांतील पुढारी 'स्वराज्य' हेंच आपलें ध्येय आहे असें म्हणत अशी खोटीच थापेबाजी कशी केली, वरिष्ठ कौन्सिलांत सुशिक्षित वर्गावर घाणेरडे आरोप केल्याबद्दल माफी मागावी लागली असतां मुद्दाम त्याच आरोपांचा पंजाब कौन्सिलांत कसा पुनरुच्चार करण्यांत आला, शेतकऱ्यांविषयीं वरपांगी कळकळ दाखवीत असतां लष्करांतल्या आपल्या हस्तकांना जहागिरी देण्याकरितां रयतेच्या जमिनी कशा ओढून घेतल्या, रिफॉर्म ॲक्टावरील आपल्या रिपोर्टांत बेझंटबाई, लो. टिळक, पंडित मदनमोहन मालवीय, महमुदा-बादचे राजेसाहेब यांच्यावर कसें गरळ ओकण्यांत आलें, टिळक व पाल यांना पंजाब प्रांतांत येण्याची बंदी करण्यांत आली ही गोष्ट बहुजनसमाजास पसंत पडली असें खोटेंच विधान कसें करण्यांत आलें, हिंदी दिवाणांत लावालावी करतां यावी म्हणून एकाहून अधिक दिवाण नेमावे अशी शिफारस कशी करण्यांत

आली, पंजाबांत प्रांतिक परिषद व कॉंग्रेस भरूं नये म्हणून लाला हरकिसनलाल, डॉ. किचलू, डॉ. सत्यपाल आणि पंडित कोटूमल यांची उचलबांगडी कशी करण्यांत आली, चीफ जस्टिस व कमांडिंग ऑफिसर यांची लष्करी कायद्याला संमति आहे असें खोटेंच भासवून लष्करी कायद्याचा पुकारा कसा करविण्यांत आला, पुढें लष्करी कायदा रद्द करण्याविषयीं हिंदुस्थानसरकारकडून वरचेवर निक्षून निरोप येत असतां कोठें झटपट चौकशीचीं कोर्टें चालू रहावीं म्हणून, तर कोठें भूर्दंड वसूल करतां यावा म्हणून, कोठें शेतसारा सुलभतेनें जमा करतां यावा म्हणून, तर कोठें परप्रांतांतल्या इसमास पंजाबांत ठेवतां येऊं नये म्हणून लष्करी कायदा रद्द करण्याची संमति देण्याला टाळाटाळी कशी करण्यांत आली आणि लष्करी कायदा चालू ठेवण्याला सबबच पाहिजे असेल तर अफगाणिस्थानच्या युद्धाची सबब सांगा असें कसें निर्लज्जपणानें सुचविण्यांत आलें, या सर्वांचें साधार विवेचन करून लालाजींनीं सर मायकेल याच्या पदरांत त्याजविरुद्ध वर नमूद केलेल्या सर्व आरोपांचें भरपूर माप टाकलें. नंतर सर मायकेल यांचे हस्तक कर्नल जॉनसन, ओब्रायन, श्री. रामसुद यांच्या जुलमी कृत्यांचा व विमानांतून बॉंब फेंकणें वगैरे अत्याचारांचा समाचार घेऊन लालाजी आपल्या भाषणांत जालियनवाला बागेंतील कत्तलीकडे वळले आणि त्यांनीं विलायतेस गेल्यापासून आपल्या बचावाकरितां जनरल डायरनें केलेलीं खोटीं विधानें उघडकीस आणलीं. ते म्हणाले, "आर्मी कौन्सिलकडे डायरनें आपली जी दुसरी कैफीयत पाठविली तिच्यांत त्यानें असें नमूद केलें आहे कीं, (१) सिव्हिल लाइनीची लूट करण्याकरितां खेड्यापाड्यांतून ३० हजार गुंड जमविण्यांत आले होते व जालियनवाला बागेंतील सभेंत १५ ते ३० हजार समाज जमला असून तेथें चिथावणीचीं भाषणें चालू होतीं, (२) सभेंत बायका व मुलें मुलींच नव्हतीं, (३) जर मी बंडखोरांची पुरती खोड मोडली नसती तर त्यांनीं माझ्या पिछाडीवर हल्ला केला असता व मला माझें सैन्य शहराबाहेर काढून नेणें कठिण गेलें असतें, (४) थोडा वेळ गोळीबार झाल्यानंतर मजवर हल्ला करण्याकरितां दोन टोळ्या तयार होऊं लागल्या; माझ्या एका ऑफिसरानें मला तो बेत चाललेला दाखविला तेव्हां मी त्या बाजूवर गोळीबार सुरू केला. त्यांतील सर्व विधानें हंटर-कमिटीपुढील डायरच्या स्वतःच्याच साक्षीविरुद्ध असून हीं विधानें सर्वस्वी खोटीं आहेत. खेड्यापाड्यांतून गुंड गोळा केलेले नव्हते, सभेंत भाषणें काय

चाललीं होतीं हें डायरला ऐकूं आलें नव्हतें व ऐकण्यासाठीं तो थांबलाहि नाहीं, सभेंत बायकामुलें होतीं व त्यांतलीं कित्येक मरण पावल्याचें सरकारी रिपोर्टांतच नमूद आहे, डायरवर हल्ला करण्याची कोणाची शक्ति किंवा इच्छा नव्हती किंवा तशी कोणाची मनस्थितीही नव्हती हें आपल्याच जबानींत त्यानें स्वमुखानें कबूल केलें आहे. असें असून आतां विलायतेंत डायरनें हीं खोटीं नाटीं विधानें पसरविण्याचा सपाटा सुरू केला आहे. ओडवायरनेंही लंडन टाइम्समध्यें पत्रें लिहून अशींच खोटीं विधानें केलीं आहेत. त्यांतल्या त्यांत त्यानें ना. शफी यांजवरुद्ध जें विधान केलें आहे तें तर अत्यंत दुष्ट व खोडसाळपणाचें आहे. सर मायकेल व त्याचे हस्तक हे मात्र पंजाबांत खऱ्या हकीकती छपविण्याची व खोटया कंड्या पिकविण्याची शिकस्त करीत असा मि. अँड्र्यूज यांचा त्यांजवर उघड आरोप आहे......रौलेट अॅक्टाविरुद्ध चाललेल्या चळवळीला जर कट किंवा बंड म्हटलें तर प्रजेला सनदशीर चळवळीचा हक्क राहिला तरी कोठें? टिळक, गोखले, गांधी, मालवीय व अरविंद घोष यांच्यासारख्या अत्यंत बुद्धिमान पुढाऱ्यांसहि जर चळवळ्या बनणेंच बरें वाटतें तर ही गोष्ट ते केवळ स्वकर्तव्य म्हणून निरुपायास्तव पत्करीत असावे असाच त्याचा अर्थ होत नाहीं काय? सारांश, पंजाबांतील अत्याचारांबद्दल सर मायकेल मुख्यतः जबाबदार असून, त्यांच्या राज्यकारभारामुळें ब्रिटिश साम्राज्याचें नुकसान झालें असून त्या साम्राज्याच्या कीर्तीलाहि काळिमा लागला आहे! सर मायकेल यांस वित्त व जीवित यांची सुरक्षितता हेंच परब्रह्म वाटत असेल. पण स्वतंत्रतेशिवाय जीवित कःपदार्थ आहे आणि स्वराज्याशिवाय स्वतंत्रता अशक्य आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील घटक होऊन राहिल्यानें आम्हांस स्वतःच्या देशांत स्वातंत्र्य आणि इतर भागांत जोखमीबरोबरच जबाबदारीचा हिस्सा मिळत असेल तर ठीक, नाहीं तर आम्हांस हें ध्येय मान्य नाहीं. हिंदुस्थानांत जबाबदार राज्यपद्धतीचा पहिला हप्ता अपुरा व असमाधानकारक असला तरी पूर्ण स्वराज्य मिळावें म्हणून त्याची बजावणी करण्याला आम्हीं तयार आहों. तथापि पंजाब प्रकरणामुळें आमचा येथील अधिकाऱ्यांवरील विश्वास उडाला आहे. तो विश्वास पुनः बसण्याकरितां ब्रिटिश सरकारनें पुढील गोष्टी कराव्या— (१) सर मायकेल यांच्या कृत्यांचा स्पष्ट निषेध व शक्य असल्यास त्यांची चौकशी, (२) डोव्हटन, ओब्रायन, स्मिथ आणि त्याच मासल्याचे हिंदी अंमल-

दार यांची चौकशी, ( ३ ) मार्शल कोर्टांनीं शिक्षा दिलेले कैदी व इतर राजकीय कैदी यांची बंधमुक्तता, ( ४ ) लष्करी व इतर कामगारांच्या कृत्यांमुळें झालेल्या नुकसानीची आणि वसूल केलेल्या दंडाची भरपाई, ( ५ ) मार्शल लॉ-कोर्टानें शिक्षा दिल्यामुळें ज्या कोणावर कसलीहि नालायकी येत असेल ती सरकारी हुकुमानें किंवा कायद्यानें दूर करणें, ( ६ ) पोलिसांच्या लांचलुचपती, जवरी, जुलूम वगैरेंबद्दल चौकशी ( ७ ) ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध जनतेची तक्रार आहे त्यांस पंजाब प्रांतांतून बदलणें, ( ८ ) ज्या अधिकाऱ्यांस रिफॉर्म ॲक्ट मान्य नसेल त्यांची, जरूर तर पेनशन देऊन बोळवण, ( ९ ) लॉर्ड चेल्म्सफर्ड यांनीं आपल्या जागेचा राजिनामा देणें अशा आमच्या मागण्या आहेत. तूर्त या प्रकरणाचा शेवट करण्यापूर्वीं कांहीं सन्मान्य व्यक्तींचा नामनिर्देश केला पाहिजे. आपलें धैर्य, आत्मविश्वास, स्वाभिमान आणि शांत वृत्ति ढळूं न देणारे लाला हरकिसनलाल, डायरचा राक्षसी हुकूम अमान्य करून पतीच्या शवाचें संरक्षण करणारी वीर पत्नी रतनदेवी, पोटांतील आंतडीं बाहेर पडून प्राणांतिक अवस्था झाली तरी ' हिंदुमुसलमानकी जय ' असाच जयघोष करणारा मुसलमान छोकरा, बंडाचा आरोप येऊन जिवावर संकट आलें तरी न डगमगणारे बालवीर मदनमोहन व खुशीराम, न्यायनिष्ठ, कर्तव्यतत्पर, स्वार्थत्यागी व धीरोदात्त सर शंकरन् नायर यांच्याविषयीं कोणासहि आदरच वाटेल. पंडित मदन मोहन मालवीय, पंडित मोतिलाल नेहरु, महात्मा गांधी, देशबंधु दास, बॅ. जयकर, तय्यबजी, ना. शफी, मि. अँड्र्युज आणि हंटर कमिटींतील हिंदी सभासद या सर्वांच्या कामगिरीबद्दल हिंदी राष्ट्र सदैव त्यांचें ऋणीच राहील. पंजाबवर ओढवलेल्या या दुर्धर प्रसंगामुळें शेंकडों लोकांस नानाविध आपत्ति सहन कराव्या लागल्या, तरी या संकटांतून व दिव्यांतून पंजाबी लोक तावून सुलाखून शुद्ध होऊन बाहेर पडले आणि त्यांच्यांतील देशाभिमान, दृढनिश्चय वगैरे गुण वृद्धिंगत झाले आणि हिंदु, मुसलमान व शीख यांच्यांतील एकीचें जास्त दृढीकरण झालें हा एक लाभच मानला पाहिजे."

"प्रतिनिधि बांधव हो, खिलाफतीचा प्रश्न आपल्यापुढें विचाराकरितां मांडण्यास मीं आतां परवानगी घेतों. या प्रश्नानें आपल्या ७ कोटी मुसलमान बांधवांचीं अंतःकरणें हालवून सोडलीं आहेत. या प्रश्नाला धार्मिक व राजकीय अशा दोन बाजू आहेत. पैकीं धार्मिक बाजूचा विचार आम्हांस कर्तव्य नाहीं.

त्याचा विचार महंमदानुयायांनीं केला आहे व तुर्की तहाच्या अटीमुळें आपल्या धार्मिक कर्तव्यास व्यत्यय येत आहे अशी त्यांची प्रामाणिक समजूत झाली आहे, एवढी गोष्ट खरी आहे. तथापि आपणास या प्रश्नाचा निराळ्या दृष्टीनें विचार केला पाहिजे. ब्रिटिश साम्राज्याचा आशियाखंडांत विस्तार होत जाणें मानवी स्वातंत्र्याला विघातक आहे. आजपर्यंत काळ्या सैन्याचा उपयोग गौरकाय राष्ट्राविरुद्ध करण्यांत येत नसे; जर्मन महायुद्धानें तो निर्बंध मोडला आणि हिंदी लष्कराचा जर्मनींत छावणी करण्याकडेहि उपयोग होऊं लागला. एवढेंच नव्हे तर कित्येक दिवस आयर्लंडांत गुरखा पलटण ठेवण्यांत आली होती असें कळतें. अशा रीतीनें इजिप्त, पॅलेस्ताईन, मेसापोटेमिया, इराण, अरबस्थान इत्यादि देशांत जर हिंदी लष्कराचा उपयोग करण्यांत येतो, तर मागें-पुढें त्या देशांतील लष्कर हिंदुस्थानावर आणण्यांत येणार नाहीं कशावरून ? आणि तसें घडून आल्यास आपल्या स्वातंत्र्याची व राजकीय हक्काची वाट काय ? शिवाय 'मॅंडेट'च्या नांवावर परकी मुलखावर आपलें साम्राज्य लादण्याकरितां हिंदी शिपायांचा जर ठिकठिकाणीं दुरुपयोग होऊं लागला तर आपल्या देशाची केवढी हानि होईल ? आज मेसापोटेमियावर कदर ठेवण्याकरितां ८० हजार हिंदी सैन्य तेथें तळ देऊन राहिलें आहे. अशा रीतीनें सैनिकांचा व द्रव्याचा पुरवठा करण्याची आम्हांवर जोखीम पडूं लागल्यास ती या देशास कशी परवडणार ? यास्तव आशिया खंडाच्या पश्चिम भागांत ब्रिटिश साम्राज्याचा विस्तार होत गेल्यास हिंदुस्थानावर तें एक अरिष्टच कोसळणार असें मानलें पाहिजे. यावर कोणी असा आक्षेप काढील कीं, असल्या जुलमास राष्ट्रसंघ आळा घालील, पण हा भ्रम आहे. राष्ट्रसंघ म्हणजे काय तर इंग्लंड व फ्रान्स यांची जूट हाच राष्ट्रसंघ. कारण अमेरिका या भानगडींत पडत नाहीं आणि इतर राष्ट्रांस त्यांत हात घालण्याची ताकद नाहीं. अर्थातच आपल्यापुढें असा प्रश्न आहे कीं, पश्चिम आशियाटिक राष्ट्रांचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या व मुसलमानांच्या धार्मिक भावनांस धक्का लावणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यवाद्यांस आपण सहाय्य करणार, का या वेळीं स्वस्थ हात जोडून बसणार किंवा हिंदू मुसलमानांच्या एकीचें दृढीकरण करण्याच्या या संधीचा फायदा घेऊन हिंदी लोकांच्या व मुसलमानी राष्ट्रांच्या हक्कांचा बचाव करणार ? यावर कित्येकांची अशी शंका आहे कीं, मुसलमानांना हिंदुस्थानांत मुसलमानी सत्ता पुनः प्रस्थापित करावयाची आहे.

ही शंका निराधार तर आहेच, पण या शंकेखोरांस माझें उत्तर हेंच आहे कीं, तसा प्रसंग आलाच तर आमच्या हक्कांचें संरक्षण करण्यास आम्हीं समर्थ आहों. सारांश, असल्या कुत्सित शंका काढून आपण ही दिलजमाईची संधि फुकट दवडूं नका. हिंदी लष्कराचा सरहद्दीबाहेर उपयोग करूं नका अशी मागणी करणें अगदीं सनदशीर असून ती जरूर केली पाहिजे. साम्राज्यावर संकट ओढवलें त्यावेळीं हिंदी सैन्य रणभूमीवर नेलें हें रास्त आहे. परंतु महायुद्ध संपून वसाहतीचें सैन्य आपापल्या देशास परत गेल्यावर हिंदी लष्कर परदेशांत कां, असा सवाल विचारणें प्राप्त आहे. या संबंधांत असहकारितेच्या चळवळींत आपण कोठपर्यंत मजल मारावी असा प्रश्न विचारण्यांत येतो. त्याचा विचार ही सभा करीलच. पण माझें उत्तर हेंच कीं, जितकी मजल मारण्याची शक्ति असेल तितकी मजल आपण गांठावी.

. सुधारणेचा कायदा व नियम यांचा आतां थोडक्यांत विचार करूं. रिफॉर्म स्कीमविषयीं माझें स्वतःचें मत म्हणाल तर १९१८ सालीं मीं हर्षानें हुरळून गेलों होतों. १९१९ सालीं ती हर्षाची उकळी जाऊन तेथें विषादानें ठाणें दिलें आणि १९२० सालीं तर निराशेनेंच मला पछाडलें अहे. मॉंटेग्यु–चेम्सफर्ड रिपोर्टांत जें होतें तें रिफॉर्म ॲक्टांत नाहीं आणि रिफॉर्म ॲक्टांत राहिलें होतें तेवढेंहि नियम व पोटकानू यांच्या तडाक्यांत शिल्लक राहिलें नाहीं. लष्करी व मुलकी खात्यांतील बड्या अंमलदारांचे पगार झटपट वाढवून हिंदी सैन्याची चाललेली लूट, हिंदी नाण्याचा हुंडणावळीचा व परत हुंड्यांचा प्रकार वगैरे गोष्टींमुळें माझी निराशा झाली आहे. कायद्यामध्यें दिखाऊ देणग्या द्याव्या व नियमांच्या निमित्तानें त्या काढून घ्याव्या असा जो प्रकार मोर्ले–मिंटोच्या वेळीं झाला त्याचीच आवृत्ति आतां होत आहे. कर्नल वेजवुड व विलायतेस जाऊन आलेले ना. पटेल यांना हा अनुभव आला आहे. मुळींच भाकरी न मिळण्यापेक्षां अर्धी भाकरी मिळाली तर बरी, पण ती तरी मी मागेन ती अर्धी मिळाली पाहिजे. पीठ मळण्यांत नोकरशाही इतकी तरबेज आहे कीं, ती आपल्या अर्ध्या भागांत सगळा लोण्याचा गोळा घालते आणि दुसऱ्या अर्ध्या भागांत रोगांचे जंतु दडपून देते, त्यामुळें उपाशीं राहणें बरें, पण अर्धी भाकर नको असें होतें.

या कॉंग्रेसपुढें असहकारितेचा महत्वाचा वादग्रस्त प्रश्न आहे. या बाबतींत अध्यक्षानें कोणत्या तरी एका बाजूला आगाऊ मत देणें मला इष्ट वाटत नस-

त्यामुळें मी स्वतःचें मत सध्यांच सांगत नाहीं. तथापि या प्रश्नासंबंधीं कांहीं तात्विक विचार मी आपणापुढें मांडणार आहें. असहकारितेचें विवेचन करण्यापूर्वी सहकारितेचें विवेचन करूं. सहकारिता दोन प्रकारची असते; एक ऐच्छिक व दुसरी अनैच्छिक. कर देणें, सक्तीचा कायदा असल्यास सैन्यांत नोकरी करणें हे अनैच्छिक प्रकार होत. ऐच्छिक सहकारितेंत पुनः दोन पोटभेद आहेत; पहिली मानाकरितां व दुसरी पोटाकरितां. पोटाकरितां जी सहकारिता करावयाची ती न करण्याचा उपदेश करण्यापूर्वी अन्य मार्गानें पोटाची तरतूद केली पाहिजे. मानाकरितां जी सहकारिता तिच्यांत मान न वाढतां अपमान वाढूं लागला कीं ती आपोआप सुटते. या दुसऱ्या पोटभेदांतच दुसरा एक उपपोटभेद असा आहे कीं, ह्या प्रकारच्या सहकारितेनें अधिकाऱ्यांच्या बालेकिल्ल्यांत शिरून तेथून नोकरशाहीवर हल्ला चढवितां येतो. याशिवाय ध्येयाच्या दृष्टीनें असहकारितेचे दोन प्रकार होतात. सरकारावर तात्काळ परिणाम होईल असा एक प्रकार आणि जनतेला असहकारितेचें वळण लावण्याकरितां अवलंब करावयाचा तो दुसरा प्रकार होय. या भेदाभेदावरून असहकारितेचा विचार कोणत्या दृष्टीनें करावा लागेल हें पहा. पण एक गोष्ट लक्षांत ठेवा कीं, अज्ञ जनतेच्या हिताचें संरक्षण करण्याची जबाबदारी आपणावर आहे. आम्हींच कायते अज्ञ रयतेचे हितकर्ते असें म्हणून टेंभा मिरवणारी नोकरशाही रयतेला मतदानाचा हक्क देणाच्या वेळेस कशी विरोध करते हें आपल्या अनुभवास आलेंच आहे. त्याचप्रमाणें ५०० रुपयांपासून ४ हजार रुपयांपर्यंत पगार खाणाऱ्या अधिकाऱ्यांचे पगार वाढविण्यांत ही नोकरशाही कशी तत्पर असते आणि अर्धपोटीं मरणाऱ्या नोकरांच्या पगाराची वाढ करण्याच्या विनंतीची कशी दादहि लागत नाहीं याचाहि आपणास अनुभव आहे! या नोकरशाहींतच डायर व बॉस्वर्थ स्मिथसारखे उपद्यापी अत्याचारी असून त्यांच्या पेनशनीचा बोजा हिंदी रयतेच्या डोक्यावर बसलेला आहे. या नोकरशाहीच्या राखलेल्या कुरणांत शफी, सप्रू, शर्मा व सिंह यांचा समावेश झाला असला तरी तेथें ते जनतेचे नोकर नसून, मालक म्हणून मिरवणार ही गोष्ट विसरूं नका. आम्हांस नोकरीच्या अधिक जागा नकोत तर नोकर हे रयतेच्या डोक्यावर नाचणारे न होतां रयतेचे खरे हितकर्ते होतील अशी राज्यपद्धति आम्हांस पाहिजे. असो. सरतेशेवटीं दोन महत्वाच्या मुद्यांचा उल्लेख करून हें भाषण संपवूं. सध्यांचें युग लोकशाहीचें आहे. अशा वेळीं पुढा-

ऱ्यानें कसें वागावें ? जनतेच्या बहुमतास निमूटपणें मान वांकवावी का जनतेची पर्वा न करितां आपल्याच मतानें चालावें. जनता, अज्ञ आणि क्षणिक बुद्धीची असते असा जो कित्येकांचा समज आहे तो चुकीचा आहे. त्यांना लोकशाही व झोटिंगशाही यांतलें अंतर लक्षांत आलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. एकादे वेळीं विकार-वश होऊन जनता बेभान होते. परंतु असा प्रकार क्वचितच घडतो. अशा प्रसंगीं पुढाऱ्यानें जनतेच्या नादीं न लागतां जनतेला नीट वळण लावलें पाहिजे. दिल्लीस स्वामी श्रद्धानंद यांनीं असें वळण लावलें आणि डॉ. सत्यपाल व किचलू यांस अटक झाली नसती तर त्यांनींहि अमृतसरला असेंच केलें असतें. पण असले अपवाद सोडून दिले तर सामान्यतः लोकांना आपलें हित कळत नाहीं असें नाहीं. अर्थातच त्यांच्या मताचा केवळ धिक्कार न करितां पुढाऱ्यानें त्याचा विचार केलाच पाहिजे. सर्वसाधारण नियम असाच घालून देतां येईल कीं, पुढाऱ्यानें जनतेच्या मताची पर्वा न करितां एकट्यानेंच तोऱ्यानें फार पुढें जाऊं नये आणि उलटपक्षीं जनतेच्याहि मागें रेंगाळूं नये. दुसरी महत्वाची सूचना ही कीं, राष्ट्राराष्ट्रांच्या झगड्यांत कोणी कोणाचा वाली नाहीं. ज्यानें त्यानें स्वतःच्या पायावर उभें राहिलें पाहिजे. ब्रिटिश मजूरपक्ष, लिबरलपक्ष, व अमेरिकन जनता आम्हांस मदत करील ही अपेक्षा व्यर्थ आहे. व्यक्तिशः कोणीं कितीहि उदारपणा दाखवील आणि असे उदारात्मे अनेक आहेत हें कबूल केलेंच पाहिजे. परंतु जेथें राष्ट्राराष्ट्राच्या हित-संबंधाचा झगडा सुरू होतो तेथें स्वावलंवनाखेरीज मार्ग नाहीं. पारतंत्र्यांत तर परकी जुलमी राजाचा अम्मल पत्करेल, परंतु परकी लोकशाहीचा अम्मल नको ! जपान, इंग्लंड, अमेरिका या देशांतील अनुभवावरून मी ही गोष्ट सांगत आहें. परराष्ट्राच्या भलेपणानें नैतिक मदत होते आणि राष्ट्रसंघांत हिंदुस्थानाला स्थान मिळाल्यानें परराष्ट्राकडे गाऱ्हाणें नेण्याचा आपणाला कायदेशीर हक्कहि आहे हें खरें, तथापि या बाबतींत 'यद्यत्परवशं दुःखं यद्यदात्मवशं सुखम्' हाच न्याय लक्षांत ठेवून आपण वागाल अशी आशा आहे. "*

या अधिवेशनांत स्वराज्य हें राष्ट्रीयसभेचें साध्य असून असहकारिता हें साधन असल्याचें स्पष्टपणें जाहीर करण्यांत आलें. असहकारितेच्या ठरावावर सतत सहा

*लालाजींच्या भाषणाचा हा गोषवारा केसरीच्या ता. ७ सप्टेंबर १९२० च्या अंकावरून घेतला आहे.

दिवस कडाक्याचा वादविवाद झाला व महात्मा गांधींनीं तयार केलेल्या मूळ ठरावांत बदल होत होत खालीलप्रमाणें बहुमतानें ठराव मंजुर करण्यांत आलेः—

(१) ज्या पक्षीं खिलाफत प्रकरणांत हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार हे दोघेहि हिंदी मुसलमानांसंबंधाच्या आपल्या कर्तव्यापासून सर्वस्वीं च्युत झाले व मुख्य प्रधानानें तर आपलें वचन जाणून बुजून मोडलें; आणि अशा रीतीनें हिंदी मुसलमानांवर जी आपत्ति कोसळली तिच्यांतून पार पडण्याकरितां मुसलमानांकडून जो प्रयत्न करण्यांत येईल त्यास सर्वप्रकारें कायदेशीर रीतीनें मदत करणें हें हिंदी मुसलमानेतरांचेंहि कर्तव्य आहे.

(२) आणि ज्या पक्षीं पंजाबांत १९१९ च्या एप्रिलमध्यें उद्भवलेल्या घालमेलींत पंजाबांतील निरपराधी प्रजेचें संरक्षण करण्यांत आणि निरपराधी प्रजाजनांशीं रानटीपणानें व क्षात्रवृत्तीला लांछन लागेल अशा रीतीनें वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यास शिक्षा करण्यांत सदर सरकारकडून भयंकर हयगय झाली किंवा त्यांस आपलें कर्तव्य बजावतां आलें नाहीं; शिवाय रहिवाशांच्या छळणुकीकडे ज्यानें पाषाणहृदयीपणानें दुर्लक्ष केलें व अधिकाऱ्यांच्या हातून घडलेल्या बहुतेक सर्व अपराधांची जबाबदारी ज्याच्या माथ्यावर, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें बसते त्या सर मायकेल ओड्वायरला सदर सरकारांनीं दोषमुक्त केलें.

(३) आणि ज्या पक्षीं पार्लमेंटांतील व विशेषतः लॉर्डांच्या सभेंतील वादविवादावरून हिंदी लोकांविषयीं सहानुभूतीचा शोचनीय अभाव दिसून आला, आणि पंजाबांतल्या अधिकाऱ्यांनीं जी सोटेशाही व रावणशाही राजरोस चालविली तिला या वादविवादानें जणुं काय दुजोराच दिला.

(४) आणि ज्या पक्षीं व्हाइसरॉयांच्या नुकत्याच झालेल्या भाषणांत खिलाफत व पंजाब या दोन्ही प्रकरणांतील उभय सरकारांच्या वर्तनाविषयीं पश्चात्तापाचा लवलेशहि दिसून आला नाहीं.

त्या पक्षीं या राष्ट्रीयसभेचें असें मत आहे कीं, वरील दोन प्रकारांतील अन्यायाची दुरुस्ती झाल्याविना हिंदुस्थानांत समाधान नांदणार नाहीं. आणि या संबंधांत आपल्या राष्ट्राची इज्जत राखण्याला व असल्या राक्षसी वर्तनाची पुनरावृत्ति न होईल अशी खबरदारी घेण्याला स्वराज्याच्या स्थापनेखेरीज दुसरा रामबाण उपाय नाहीं;

आणि या राष्ट्रीय सभेचें आणखी असें मत आहे कीं वरील दोनहि अन्याय दूर होईपर्यंत व स्वराज्याची स्थापना होईपर्यंत क्रमशः वर्धिष्णु व अत्याचारवर्ज असहकारिता करण्याचें तत्त्व मान्य करणें व तें आचरणांत आणणें यांखेरीज हिंदी लोकांना गत्यंतर नाहीं.

आणि ज्या अर्थीं ज्या वर्गानें आजपर्यंत जनतेचें प्रतिनिधित्व स्वीकारून लोकमताला वळण लावलें त्याच वर्गानें या असहकारितेला सुरुवात केली पाहिजे आणि ज्या अर्थीं सरकार आपल्या हुकमतीखालच्या शाळा, कोर्टें, कौन्सिलें आणि बहुमान व पदवीदानसमारंभ यांच्या योगानें आपली सत्ता दृढ करितें आणि ज्या अर्थीं या चळवळीच्या सध्यांच्या बाल्यावस्थेंत आपलें ध्येय साध्य करण्याला विसंगत न होईल इतका, पण कमींत कमी धोका व कमींत कमी नुकसान होईल असें करणें प्राप्त आहे.

त्या अर्थीं ही राष्ट्रीयसभा सर्वांस कळकळीनें असा सल्ला देते कीं,

( १ ) सरकारनें दिलेल्या पदव्या, बिनपगारी अधिकारांच्या जागा आणि स्थानिक संस्थांतील सरकारनियुक्त सभासदत्व सोडून द्यावें.

( २ ) गव्हर्नरची लेव्ही, सरकारी अधिकाऱ्यांनीं भरविलेले दरबार, किंवा त्यांच्या मानाकरितां होणारे समारंभ यांच्यांत भाग घेऊं नये.

( ३ ) पूर्ण सरकारी, निमसरकारी अगर सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या शाळांतून व कॉलेजांतून पालकांनीं आपलीं मुलें आस्ते आस्ते काढून घ्यावीं आणि अशा शाळा व कॉलेजें यांच्याऐवजीं प्रांताप्रांतांतून राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा व कॉलेजें स्थापन करावीं.

( ४ ) वकील व पक्षकार यांनीं खासगी भांडण तंटे तोडण्याकरितां सरकारी कोर्टाकडे धांव घेण्याचें क्रमाक्रमानें सोडून देऊन त्या कोर्टांच्या जागीं स्वतःचीं लवाद कोर्टें स्थापन करावीं.

( ५ ) लष्करी, कारकुनी व मजूरदार पेशाच्या लोकांनीं मेसापोटेमियांत नोकरी करण्याकरितां रिक्रूट किंवा उमेदवार होऊं नये.

( ६ ) सुधारलेल्या कौन्सिलच्या निवडणुकीकरितां उभे राहिलेल्यांनीं आपलीं नांवें उमेदवारांतून परत घ्यावीं आणि राष्ट्रीयसभेचा हा ठराव न जुमानतां जे उमेदवार उभे राहतील त्यांना मतदारांनीं मतें देण्याचें नाकारावें.

( ७ ) परदेशाहून येणाऱ्या मालावर बहिष्कार घालावा; आणि ज्या अर्थी ज्या गुणांखेरीज राष्ट्र उदयाला येऊं शकत नाहीं अशा गुणांचें, म्हणजे शिस्तीचें व स्वार्थत्यागाचें वळण जनतेला लावण्याचा मार्ग म्हणून ही असहकारितेची चळवळ अंगिकारण्यांत आली आहे आणि ज्या अर्थी या चळवळीच्या पूर्वरंगांत देखील प्रत्येक पुरुषाला, स्त्रीला व मुलालाहि कांहीं तरी शिस्तीचा व स्वार्थत्यागाचा धडा घेण्याला संधि मिळणें जरूर आहे, त्या अर्थी ही राष्ट्रीयसभा सर्वांना स्वदेशी मालाचा, मुख्यतः स्वदेशी कापडाचा, उपयोग करण्याविषयीं सल्ला देत आहे आणि ज्या अर्थी हिंदी भांडवलाच्या व हिंदी लोकांच्या देखरेखीखालीं चालणाऱ्या गिरण्यांतून देशांतील सर्व लोकांना पुरवठा होईल इतकें सूत व कापड सध्यां हिंदुस्थानांत तयार होत नाहीं त्या अर्थी प्रत्येक कुटुंबांत हातरहाटावर सूत काढण्याच्या कामाला उत्तेजन देण्यांत यावें आणि लक्षावधि कोष्टयांनीं आपल्याला प्रोत्साहन मिळत नाहीं म्हणून आपला सन्मान्य धंदा सोडून दिला आहे त्यांनीं हातमागावर कापड विणण्यास सुरुवात करावी असेंहि या राष्ट्रीयसभेचें सांगणें आहे. †

वरील ठरावांची अंमलबजावणी कसकशी करावयाची त्याचा तपशील ठरविण्याकरितां म. गांधी, पंडित मोतिलाल नेहरू व ना. पटेल यांची कमिटी नेमण्यांत येऊन, तिनें आपला रिपोर्ट एक महिन्याचे आंत ऑल इंडिया काँग्रेस कमिटीकडे करावा व काँग्रेस कमिट्यांनीं तदनंतर आपल्या अभिप्रायासह तो जाहीर करावा असें ठरविण्यांत आलें.

या वर्षी राष्ट्रीयसभेव्यतिरिक्त आणखी दोन परिषदांचे लालाजी अध्यक्ष होते. मुंबईस भरलेली पहिली ट्रेड युनियन काँग्रेस व नागपुरास भरलेली अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, या त्या परिषदा होत.

---

† गेलीं पांच वर्षें—न. चिं. केळकर, पृष्ठ ६६–६८.

## ७. असहयोग व कारावास.

१९२० च्या डिसेंबरांत नागपूर येथें राष्ट्रीयसभेचें मुख्य अधिवेशन भरलें. हें अधिवेशन हिंदी राजकीय इतिहासाच्या दृष्टीनें अतिशय महत्वाचें आहे. या वर्षापासून राजकीय चळवळीला नवीन वळण लागलें. राष्ट्रीयसभेच्या ध्येयांत, घटनेंत व कार्यपद्धतींत आमूलाग्र फरक करण्यांत आले. लालाजींनीं या घडामोडींत प्रामुख्यानें भाग घेतला होता. 'हिंदी राष्ट्रीयसभेचें ध्येय सर्व न्याय्य आणि शांतताप्रधान मार्गांनीं हिंदी लोकांनीं स्वराज्य मिळविणें हें आहे' या महात्मा गांधींनीं मांडलेल्या ध्येयाच्या ठरावास त्यांनीं जोराचा पाठिंबा दिला. त्यांनीं आपल्या भाषणांत इंग्लंड व हिंदुस्थान यांच्या संबंधांचा इतिहास म्हणजे एक वचनभंगाचीच मालिका आहे असें अनेक दाखले देऊन सिद्ध केलें, आणि स्पष्टपणें शेवटीं सांगितलें कीं, "आम्हीं साम्राज्यांत राहूं परंतु दुसऱ्यांच्या अधिकारांत किंवा बळजबरीनें राहणार नाहीं. इंग्रज गृहस्थावर आमचा विश्वास आहे, पण इंग्रज मुत्सद्याच्या वचनावर आमचा विश्वास नाहीं. तो अजिबात विरघळून गेला आहे." त्यांचें भाषण चैतन्यपूर्ण होतें. त्यांनीं या दिवशीं वक्तृत्वाची कमाल केली. त्यांच्या भाषणानें सारा सभामंडप हादरून गेला होता. श्रोत्यांचें अंतःकरण विचारांची विलक्षण चेतना मिळाल्यामुळें आंदोलित झालें होतें. या अधिवेशनास पंधरा हजार प्रतिनिधी व दहा हजार प्रेक्षक मिळून पंचवीस हजार लोकसमुदाय हजर होता. एवढा प्रचंड लोकसमुदाय आजवर कोणत्याहि

राष्ट्रीयसभेच्या अधिवेशनांत जमला नव्हता. या अधिवेशनांत शाळा, न्यायकोर्टें, कौन्सिलें, सरकारी नोकऱ्या व परदेशी माल यांवर बहिष्कार घालण्याचा निश्चित ठराव पास करण्यांत आला.

लालाजींचा कांहीं ठरावांच्या तपशिलाबाबत बराच मतभेद होत, पण हा मतभेद बाजूला ठेवून असहकारितेच्या चळवळीला त्यांनीं पूर्णपणें वाहून घेतलें. लेख व व्याख्यानें यांच्या द्वारा त्यांनीं पंजाबांत अपूर्व जागृति घडवून आणली. एवढयानेंच त्यांची चळवळ थांबली नाहीं. पद्धतशीर राजकीय चळवळ करण्याच्या हेतूनें त्यांनीं 'टिळक स्कूल ऑफ पॉलिटिक्स' नांवाची राजकारणाची शाळा स्थापन केली. या शाळेपुढील ध्येयः (अ) राजनीतिशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, वृत्तपत्रशास्त्र यांच्या अभ्यासाची सोय करणें, (आ) राजकीय चळवळ करण्यास योग्य असे लोक तयार करणें, (इ) सामाजिक शास्त्रांचें संशोधन करण्याची सोय लावणें, (ई) या विषयांवर हिंदी भाषांत पुस्तकें तयार करून प्रसिद्ध करणें, (उ) सर्व शाखांतील ग्रंथांनीं परिपूर्ण असें 'द्वारकादास ग्रंथसंग्रहालय' यास जोडणें, असें होतें. ही शाळा, मार्च १९२१ सालीं 'सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटी'च्या धर्तीवर 'सर्व्हंटस् ऑफ धि पिपल सोसायटी'* नांवाची संस्था लालाजींनीं स्थापन केली तिला जोडण्यांत आली. या संस्थेसाठीं लालाजींनीं तीन लाख रुपये जमवून तिला कायमपणा आणला.

१९२१ व २२ हीं दोन वर्षें असहकारितेच्या ऐन भरभराटीचीं होतीं. या दोन वर्षांत लोकांच्या उत्साहाला भरती आली होती. महात्माजींच्या 'एका वर्षांत

---

* या संस्थेनें करावयाचें कार्य, तें पुढीलप्रमाणें:—(१) प्रचार व जागृति; (२) शिक्षण व अस्पृश्योद्धार यांद्वारा अस्पृश्यतानिवारण, (३) मजुरांची संघटना, (४) सर्वसाधारण समाजसेवा; दुष्काळ, अग्निप्रलय वगैरे प्रसंगीं संरक्षण व सहाय्य करणें.

वरील उद्देशानुसार संस्थेच्या आजन्म सेवकांनीं पंजाब, संयुक्तप्रांत, ओरिसा व काठेवाड या चार प्रांतांत आतांपर्यंत बरेंच कार्य केलें आहे. 'वंदेमातरम्' (ऊर्दू दैनिक), 'पंजाब केसरी' (हिंदी साप्ताहिक) व 'पीपल' (इंग्रजी साप्ताहिक) हीं या संस्थेचीं मुखपत्रें आहेत.

स्वराज्य' या घोषणेवर पूर्ण विश्वास ठेवून लोकांनीं या वर्षी आपल्या कर्तृत्वाची कमाल केली. १९२१ सालचे अखेरीस राजपुत्र हिंदुस्थानांत आले, ते ज्या ज्या शहरांत गेले त्या त्या शहरांत कडकडीत हरताळ पडले व कांहीं ठिकाणीं तीव्र-स्वरूपाचे दंगेहि झाले. यामुळें सरकार चिडून जाऊन त्यानें दडपशाहीस सुरुवात केली. प्रांतांप्रांतांतील पुढाऱ्यांस कैद करून त्यांजवर खटले करण्यांत आले. पंजाबांत सभाबंदीचा कायदा अंमलांत आणण्यांत आला. लालाजी पंजाब प्रांतिक कॉंग्रेसकमिटीचे अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसकमिटीची सभा भरिली असतां, ती सार्वजनिक सभा आहे असें गृहित धरून, कायदा मोडल्याच्या आरोपावर त्यांस पकडण्यांत आलें व खटला भरून दीड वर्षांची सजा ठोठावण्यांत आली. पुढें दोन महिन्यांनीं त्यांची अचानक सुटका करून फिरून निरनिराळ्या दोन आरोपांखालीं त्यांस दोन वर्षांची शिक्षा करण्यांत आली.

अमेरिकेंतील कष्टाच्या राहणीमुळें लालाजींची प्रकृति आधींच बिघडली होती. त्यांत तुरुंगवास—आणि तोहि सक्तमजुरीच्या शिक्षेचा—लवकरच घडल्यामुळें त्यांची प्रकृती बिघडून गेली. त्यांचें दुखणें क्षयावर जाईल अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं. अशा स्थितींत त्यांस बंधमुक्त करावें म्हणून पुष्कळ चळवळ झाली. पण सरकारनें पहिल्या पहिल्यानें त्याकडे काणाडोळा केला. अखेर लालाजींस तुरुंगांत मृत्यु आला तर आपल्या डोक्यावर दोषाचें खापर फुटायला नको म्हणून १९२३ च्या आगष्टांत त्यांस सोडून देण्यांत आलें.

लालाजी तुरुंगांतून बाहेर आले त्या वेळीं देशांतील राजकीय परिस्थिति पार बदललेली त्यांस आढळून आली. महात्माजी तुरुंगांत होते व त्यांचे अनुयायी आपापसांत भांडत होते. ना—फेरपक्ष व फेरपक्ष असे दोन पक्ष निर्माण होऊन परस्परांत वाग्युद्ध सुरू झालें होतें. ज्या युद्धाकरितां हे लोक जमा झाले होते, तें युद्ध हे विसरून गेले होते. ज्या युद्धाची मुहूर्तमेढ लावल्यामुळें यांचा सेनापती येरवड्याच्या तुरुंगाच्या कोठडींत डांबला गेला होता, त्या युद्धाचें विस्मरण यांना इतकें पडलें होतें कीं, यांचीं या वेळचीं वाग्युद्धें पाहणाऱ्या त्रयस्थाला स्वातंत्र्ययुद्ध कधीं सुरूच झालें नाहीं असेंच वाटलें असतें. हीं वाग्युद्धें पाहून लालाजींना मनस्वी वाईट वाटलें. कायदेमंडळांत शिरून व सर्व जागा हस्तगत करून घेऊन, सरकारला राज्य करणें अशक्य होईल अशी परिस्थिति निर्माण केल्यानेंच सरकार वठणीवर येईल असें एका पक्षाचें म्हणणें होतें.

तर दुसरा पक्ष म्हणत होता कीं राष्ट्रीयसभेचा विधायक कार्यक्रम यशस्वी करून राष्ट्रांत सामुदायिक कायदेभंग करण्याचें सामर्थ्य आणण्यानेंच सरकारला वठणीवर आणतां येईल. कौन्सिलांत जाऊं इच्छिणाऱ्या पक्षाला कायदेभंगाचा मार्ग मान्य नव्हता असें नाहीं. त्याचें म्हणणें असें होतें कीं, "सामुदायिक कायदेभंग हा आजच्या घटकेस शक्य किंवा व्यवहार्य नाहीं. तो कृत्रिम रीतीनें बनवितां येत नाहीं. तो अमुक दिवसांत अमुक ठिकाणीं अमुक रीतीनें घडवून आणूं हेंहि म्हणणें खोटें. पण उलट हेंहि खरें कीं, कायदेभंग हा एक कायदेशीर, रास्त व युक्त असा मूर्धाभिषिक्त राजकीय उपाय आहे, म्हणून केव्हांहि, कोठेंहि व मनुष्यमात्राच्या निवळ स्फूर्तीनेंहि तो घडून येऊं शकतो. कायदेभंग हें एक निवळ साधन आहे, म्हणजे तो करून मिळविण्याची जी गोष्ट ती कायदेभंगाहून अधिक उच्च व स्पृहणीय आहे, असें जेव्हां मनाशीं ठरतें तेव्हांच हातून कायदेभंग होतो, व अशाच कर्तव्यभावनेचें शिक्षण लोकांना दिलें पाहिजे. अर्थात् कायदेभंगाची तिथि किंवा स्थान न ठरवितां यथाप्रसंग कायदेभंग घडून येतो, तो घडून यावा व घडवून आणूं." स्वदेशी, खादीप्रसार, मद्यपाननिषेध, अस्पृश्यतानिवारण, राष्ट्रीयशिक्षण, पंचायतपद्धति वगैरे राष्ट्रीयसभेचे विधायक कार्यक्रम या पक्षास मान्य होते.

कायदेमंडळांत जाऊं इच्छिणाऱ्या पक्षाचा दुसराहि एक असा उद्देश होता कीं, कायदेमंडळांत प्रबल विरोधी असा पक्ष नसल्यामुळें सरकार कायदेमंडळाच्या नांवावर जे कित्येक लोकहितविघातक कायदे पास करून घेतें त्यालाहि आळा घालतां येईल. या पक्षाचे अध्वर्यु देशबंधु चित्तरंजनदास हे होते. १९२३ च्या जानेवारी महिन्यांत या पक्षास स्वराज्यपक्ष असें नांव देऊन, त्यांनीं जोरानें मतप्रसारास सुरुवात केली. येथूनच राष्ट्रीय सभेंतील यादवीला सुरुवात झाली होती. लालाजी सुटून आले तेव्हां त्याला तीव्र स्वरूप प्राप्त झालें होतें. १९२३ च्या अखेरीस कायदेमंडळाच्या नव्या निवडणुका व्हावयाच्या होत्या. या निवडणुकांस कॉंग्रेसनें आपले उमेदवार उभे करावयाचे कीं नाहींत यावर रणें माजलीं होतीं, व त्याचा निकाल सप्टेंबर महिन्यांत दिल्ली येथें राष्ट्रीय सभेचें खास अधिवेशन भरवून एकदाचा लावण्याचें ठरलें होतें.

लालाजींना दासबाबूंची विचारसरणी मान्य होती. राष्ट्रास असहकारितेचा मार्ग झेंपत नसेल तर आज जो शक्य आहे तो मार्ग स्वीकारण्यास हरकत नाहीं

असें त्यांचें म्हणणें होतें. एक प्रयोग करून पाहिला, आतां दुसरा पाहूं! त्यांची प्रकृती या वेळीं अतिशय बिघडली होती. सोलोन येथें स्वास्थ्याकरितां ते येऊन राहिले होते. पण त्यांना राष्ट्रीयसभेंतील यादवीचें वातावरण स्वस्थ बसूं देईना. नाफेरवाल्यांनीं हट्ट करून कौन्सिलवाद्यांशीं मिळतें घेतलें नाहीं तर राष्ट्रीयसभेंत फूट पडणार अशी त्यांना भीति वाटूं लागली. त्यांनीं अस्वस्थ स्थितींतहि सोलोनहून एक पत्रक प्रसिद्ध केलें व त्यांत स्वराज्यपक्षाची विचारसरणी आपणास मान्य असल्याचें जाहीर केलें व हेंहि स्पष्टपणें सांगितलें कीं, कौन्सिलवाद्यांना संमत होईल अशी दिल्लीच्या खास अधिवेशनांत तडजोड झाली नाहीं, तर आपण राष्ट्रीयसभेपासून अलग होऊन, बाहेर राहून जी काय मदत करतां येईल ती करूं. सुदैवानें दिल्लीच्या अधिवेशनांत कौन्सिलप्रवेशास संमति मिळाली व फुटीचा प्रसंग टळला.

लालाजींना स्वतः निवडणुकीला उभें राहावयाचें नव्हतें. पण एकदां स्वराज्यपक्षाशीं सहानुभूति दाखविल्यावर ती प्रत्यक्ष कृतींत उतरविल्याशिवाय त्यांस स्वस्थ बसवेना. पंजाबांतील स्वराज्यपक्षातर्फे निवडणुकीस उभे राहिलेल्या उमेदवारांचें नेतृत्व त्यांनीं स्वीकारलें व निवडणुक यशस्वी करून दाखविली. स्वराज्यपक्षातर्फे उभे राहिलेले बहुतेक सर्व उमेदवार कायदेमंडळांत निवडून आले.

निवडणुकीनंतर लालाजी प्रकृतिस्वास्थ्याकरितां म्हणून कांहीं महिने स्वित्झरलंड, फ्रान्स वगैरे ठिकाणीं राहून आले. लंडनमध्येंहि ते कांहीं दिवस होते. तेथें त्यांस हिंदी विद्यार्थ्यांनीं एक मानपत्र व आठशें पौंडांची थैली अर्पण केली. इंडिपेंडंट लेबर पार्टीनें या वेळेस त्यांस सभासद करून घेऊन, त्यांच्याशीं बरेंच सख्यहि जोडलें होतें म्हणतात. १९२५ च्या सुरुवातीस ते हिंदुस्थानांत परत आले. त्यांच्या प्रकृतीस आतां चांगला आराम वाटूं लागला होता. हिंदुसंघटन व 'सर्वंटस् ऑफ धि पीपल सोसायटी' यांच्या कार्यांत ते गढून गेले. याच वेळेस अमेरिकन 'नेशन' या पत्राच्या धर्तीवर आपलें एक साप्ताहिक असावें या हेतूनें त्यांनीं 'पीपल' पत्र सुरू केलें. हें पत्र प्रत्येक विचारी गृहस्थाच्या मेजावर असलेलें दिसावें, अशी त्यांची आकांक्षा होती. पुढें स्वराज्यपक्षाच्या हिताच्या दृष्टीनें वरिष्ठ कायदेमंडळांत असणें आवश्यक भासूं लागल्यामुळें रायजादा हंसराज यांनीं त्यांचेकरितां आपल्या जागेचा राजिनामा दिला व ते २१ जानेवारी १९२६ रोजीं वरिष्ठ कायदेमंडळांत प्रविष्ट झाले.

## ८. जिनेव्हा येथील आंतरराष्ट्रीय मजूर परिषद.

जिनेव्हा येथें राष्ट्रसंघातर्फे दरवर्षी आंतरराष्ट्रीय मजूर परिषद भरविण्यांत येते. या परिषदेस सर्व राष्ट्रांकडून प्रतिनिधी पाठविण्यांत येतात. प्रत्येक राष्ट्रास सरकारतर्फे दोन, मालक व धंदेवाले या वर्गातर्फे एक व मजुरांतर्फे एक असे चार प्रतिनिधी व त्यांस कामांत मदत करण्याकरितां सहा सल्लागार असे लोक पाठविण्याचा हक्क असतो. या हक्काप्रमाणें हिंदुस्थानातर्फे दरवर्षी चार प्रतिनिधी व एक सल्लागार असे पांच लोक जातात. १९२६ सालीं या परिषदेस गेलेल्या लोकांपैकीं लालाजी हे एक होते. त्यांस मजुरांचे प्रतिनिधी म्हणून पाठविण्यांत आलें होतें.

या परिषदेस हजर राहाण्याकरितां लालाजींनीं फेब्रुवारी महिन्यांत जिनेव्हास प्रयाण केलें. तेथें पोंहोंचतांच त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें, परिषदेची कार्यपद्धति, तिचे नियम, तिनें आंखून घेतलेलें कार्यक्षेत्र यासंबंधीं माहिती देणारें सर्व वाङ्मय त्यांनीं अभ्यासिलें व आपण कोणत्या गोष्टी परिषदेपुढें मांडावयाच्या हेंहि निश्चित केलें.

परिषदेच्या अहवालवाचनानंतर त्यांनीं केलेलें भाषण स्पष्टोक्तिपूर्ण होतें. ते म्हणाले, "अतिशय महत्त्वाच्या माहितीनें भरलेला असा अहवाल कार्यवाहांनीं पुढें ठेविल्याबद्दल इतरांप्रमाणें मींहि त्यांचे आभार मानतों. या अहवालांत पुष्कळच उपयुक्त अशी माहिती आहे. माहितीच्या दृष्टीनें अहवालाचें काम उत्तमच झालें आहे. पण मला या बाबतींत एका महत्त्वाच्या बाबीवर जोर द्यावासा वाटतो.

आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेच्या कचेरीनें पूर्वेकडील देशांतील व आफ्रिका अमेरिकेंतील काळ्या-तांबड्या मजुरांच्या खऱ्या स्थितीची चौकशी केली पाहिजे. मानव जातीपैकीं एकतृतियांश लोकांतर्फे एक डझनाहूनहि कमी प्रतिनिधी या परिषदेस घेतले जावे ही अत्यंत शोचनीय गोष्ट आहे. युरोपांतील मजूरवर्गानें कित्येक वर्षांच्या धडपडीनंतर आपापल्या सरकारांकडून व मालकवर्गांकडून बरेच हक्क मिळविले आहेत, पण हे जे हक्क त्यांस मिळाले आहेत त्यांचा खरा उपभोग, ज्यांस तशा तऱ्हेचे हक्क मिळालेले नाहींत अशा आशिया व आफ्रिका या खंडांतील मजुरांची स्थिति सुधारल्याशिवाय, घेतां येणार नाहीं. कारण मालकवर्ग या देशांतील मजुरांच्या प्रतिकुल स्थितीचा फायदा घेण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं. पूर्वेकडील देशांतील मजुरांची स्थिति सुधारण्यासाठीं आम्हीं शिकस्तीचे प्रयत्न करीत आहोंत. आज तेथें आमच्यासमोर अनेक अडचणी उभ्या आहेत. पहिली गोष्ट अशी आहे कीं तेथील सरकार मजुरांची स्थिति सुधारणारे कायदे पास करावयाला बहुशः तयार नसतें. असे कायदे पास करून आपली सत्ता व आपले अधिकार, त्याचप्रमाणें त्यांच्या मर्जीतलीं कुळें जे भांडवलवाले त्यांची सत्ता व अधिकार संपुष्टांत येतील असें त्यांस वाटतें. त्यामुळें कायदेमंडळांत मजुरांची स्थिति सुधारण्यासंबंधींचें एखादें बिल आणलें गेलें म्हणजे 'मजुरवर्ग अद्याप अशिक्षित आहे, मागासलेला आहे,' अशी सबब पुढें करून सरकारकडून तें बहुधा फेंटाळून लावण्यांत येतें. सरकारची ही सबब कांहीं अंशीं बरोबर आहे. कांहीं विवक्षित धंद्यांत सरकार जेवढी खबरदारी घेतें तेवढी घेणें योग्यच असतें. पण या सबबीला कांहींतरी कालाची मर्यादा आहे. कालाच्या अंतापर्यंत ही सबब कोण ऐकून घेईल? जिच्या मुळाशीं अन्याय आहे अशी सत्ता राखण्याची खबरदारी घेण्यापेक्षां मजुरांच्या कल्याणाची व त्यांशीं होणाऱ्या व्यवहारांत कांहीं तरी मानवता दाखविण्याची खबरदारी घेणें ज्यास्त जरूर आहे. पूर्वेकडील मजुरांची स्थिति सुधारण्याबद्दलची जी आम्हीं चळवळ चालविली आहे ती यशस्वी करण्यासाठीं पश्चिमेकडील मजुरांनीं पूर्ण सहकार्य केलें पाहिजे. तुम्हांला हें ठाऊक आहे कीं, विशेषेंकरून जे देश स्वयंशासित नाहींत, परक्या राष्ट्रांचा ज्यांच्यावर अंमल आहे अशा देशांतील नेटिव्ह मजुरांच्या परिस्थितीकडे विशेष लक्ष देणें आज अत्यावश्यक आहे. आमची अशी इच्छा नाहीं कीं, प्रत्येक सरकारानें आम्हीं सांगूं तें केलें पाहिजे. प्रत्येक सरकार आपल्या देशाचें मालक

आहे. तें आपल्या घरची व्यवस्था लावूं शकेल. या परिषदेच्या द्वारा जें आम्हीं घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहों तें म्हणजे मजुरांच्या कल्याणाला पोषक होईल असें आंतर्राष्ट्रीय वातावरण निर्माण करून ज्या देशांतील मजुरांची स्थिति अनिष्ट व अयोग्य आहे तिच्यावर पुराव्यासह प्रकाश पाडून व ती जगाच्या नजरेसमोर आणून नैतिक वजन पाडून सुधारणा करणें हें होय. या दृष्टीनें परिषदेच्या कचेरीनें, युरोप व अमेरिकेंतील मजूरवर्गाच्या हितार्थ, पूर्वेकडील जे देश परकीयांच्या नियंत्रणाखालीं आहेत, तेथील मजुरांच्या परिस्थितीची नीट चौकशी करून सर्व गोष्टी जगाच्या चवाठ्यावर ठेवल्या पाहिजेत. या देशांत काय चाललें आहे याची माहिती आंतर्राष्ट्रीय चळवळींत भाग घेणाऱ्या लोकांना कळणें अत्यावश्यक आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील मजुरांच्या, उदाहरणार्थ फिजी, केनीया आणि दक्षिण आफ्रिका या भागांतील, परिस्थितीची खरीखुरी माहिती जगजाहीर झाली पाहिजे. मला ब्रिटिश साम्राज्यावर कोणतेच आरोप करावयाचे नाहींत. मला जें दाखवून द्यावयाचें आहे तें हेंच कीं, या भागांतील मजुरांच्या परिस्थितीची नीट चौकशी होऊन आंतर्राष्ट्रीय परिषदेच्या अहवालांत ती जगाच्या माहितीकरितां दाखल झाली पाहिजे." यानंतर, त्याच सुमारास दक्षिण आफ्रिकेंत नेटिव्हांना कांहीं विविक्षित धंद्यांत शिरण्यास प्रतिबंध करणारें बिल युनियन सरकारपुढें येऊं घातलें * होतें त्यावर चौकशी झाली पाहिजे असें सांगून, त्यांनीं हिंदुस्थानांतील कांहीं भागांत ब्रिटिश अधिकारी, युरोपियन लोक यांचेसाठीं मजुरांस सक्तीनें पकडून त्यांचेकडून बिनमोबदला कसें काम करून घेण्यांत येतें याचें वर्णन करून, मनुष्यत्वाला न शोभणाऱ्या या पद्धतीला आळा घालण्यासाठीं सरकारवर परिषदेनें वजन घालावें अशी त्यांनीं आग्रहपूर्वक विनंति केली.

लालाजींच्या भाषणांतील टीकेचा सर्व रोंख मजुरांस छळणाऱ्या दक्षिण आफ्रिकेंतील सरकारवरच होता. मजुरांची स्थिति सुधारण्याचें ध्येय पुढें ठेऊन जी संस्था एवढा आंतर्राष्ट्रीय व्याप घेऊन बसली आहे ती आफ्रिकेंतील साम्राज्यवाद्यांना भिऊन तेथील परिस्थितीकडे काणाडोळा करीत आहे, ही गोष्ट पुरेपूर त्यांस पटली होती; आणि म्हणूनच त्या बाबतींत त्यांना स्पष्टपणें बोलल्याशिवाय

* हें बिल पुढें लवकरच पास होऊन गौरवर्णाच्या मजुरांना संरक्षण देण्यांत आलें.

राहवलें नाहीं. लालाजी केवळ बोलूनच थांबले नाहींत; त्यांनीं त्या संबंधींचा ठरावहि परिषदेपुढें मांडला. हा ठराव खालीलप्रमाणें होता.

" This conference requests the International Labour Office to make an inquiry into the conditions of life and work of what is known as 'native labour' and 'coloured labour' in the continents of Africa and America, to publish the results of that inquiry and place that question on the agenda of an early future conference. "

या ठरावामुळें आफ्रिका व अमेरिका यांतर्फे आलेल्या प्रतिनिधींत बरीच खळबळ उडाली व टीकाहि झाली. एका प्रतिनिधीनें तर असेंहि सुचविलें कीं, या ठरावाचे मुळाशीं लालाजींचा आर्थिक सुधारणेचा हेतु नसून कांहीं तरी राजकीय हेतु आहे. लालाजींनीं याला सणसणीत उत्तर दिलेंहि असतें, पण याच वेळीं दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी वसाहतवाल्यांच्या कांहीं प्रश्नांची वाटाघाट हिंदुस्थानसरकार व आफ्रिकन सरकार यांमध्यें चालली असल्यामुळें आपल्या टीकेमुळें त्याला कदाचित् धोका पोंचेल, असें वाटून ते स्वस्थ राहिले. या ठरावावर इतर देशांच्या प्रतिनिधींकडून चर्चा झाल्यावर मि. हंबर्ट वुल्फ या ब्रिटिश प्रतिनिधीनें खालीलप्रमाणें उपसूचना मांडली.

" This Conference welcomes the decision reached by the Governing Body to undertake an inquiry into conditions of native labour, and express the hope, that as the result of the labours of the Committee of Experts which it is proposed to establish, it may be possible to present a preliminary report on the matter to the Conference of 1927. "

लालाजींनीं परिषदेंतील एकंदर वातावरण पाहून या उपसूचनेस मान्यता दिली व आपला ठराव मागें घेतला. लालाजींनीं या परिषदेंत, मजूर परिषदेची एक कचेरी हिंदुस्थानांत असावी असा दुसरा एक महत्त्वाचा ठराव मांडला होता. या ठरावाची लवकरच अंमलबजावणी होऊन मजूरपरिषदेच्या कार्याची माहिती पुरविणारी एक कचेरी सिमला येथें स्थापन करण्यांत आली.

ज्या राष्ट्रसंघाच्या विद्यमानें ही परिषद् भरते तो संघ पूर्णपणें साम्राज्यसत्तावाद्यांचा असल्यामुळें परतंत्र व सत्ताहीन राष्ट्रांस त्याचा विशेष उपयोग होणें

शक्य नाहीं, असें जरी त्यांचें ठाम मत होतें, तरी आपलीं दुःखें व आपल्यावर होणारे अन्याय जगापुढें ठेऊन आपल्या बाजूनें त्याचें मत जागृत करण्यास व आपल्यासंबंधीं कांहीं गैरसमज पसरले असल्यास ते दूर करण्यास, त्याचप्रमाणें आंतर्राष्ट्रीय राजकारण समजून घेण्यास हें चांगलें स्थळ आहे अशी त्यांची खात्री झाली होती. त्यांनीं 'पीपल' पत्रास जिनेव्हाहून ता. २ जून १९२६ रोजीं धाडलेल्या पत्रांत यासंबंधींचे विचार* स्पष्टपणें मांडले आहेत.

---

* लालाजींचे यासंबंधींचे विचार खालीलप्रमाणें आहेत.

"I am of opinion, that Indians should use every possible opportunity to attend International gatherings, take part in them, and establish relations with the public men of all countries. It serves a double purpose. It enables us to judge how and where we stand. It gives us opportunities of removing misapprehensions and wrong impressions and giving a true and correct view of conditions in our country. Our country is very much misunderstood and misrepresented. No amount of writing can effectually remove the impressions thus disseminated. Actual contact with living men, leaders in their own spheres, political or economic or social, is much more effective than anything we may write and circulate. In my judgment it is a crime to let things go in default. We must mix and establish relations with person of all nationalities. Such International gatherings afford good opportunities for the purpose. Moreover they inspire self-confidence and self-respect. Rubbing shoulder, with the ablest and the most prominent of world's public workers one begins to feel assured that one could do as well as others do, only if the opening and the opportunity were there. Besides it has a great educative value of its own. You learn much which you could not otherwise know and understand. If you are a person with too much of self-importance and self-sufficiency you come to know your place. The only thing is to avoid building hopes on foreign help either for your freedom or for any other big purpose you must not lose your balance. Much depends on personal equation.

जपानी लोकांना अशा तऱ्हेच्या आंतर्राष्ट्रीय संमेलनाचें महत्व नीट कळलें आहे. सवाशीं मिळून मिसळून निरनिराळ्या देशांतील घडामोडींची बित्तंबातमी ते काढतात व त्याचा देशासाठीं भरपूर उपयोग करून घेतात. त्या बाबतींत लागेल तो पैसा खर्च करण्यास त्यांची तयारी असते. आपल्या देशाबद्दलहि स्वखर्चानें माहिती पुरविण्यास ते एका पायावर तयार असतात. लालाजी हजर होते त्या परिषदेस पांच प्रतिनिधी व दहा सल्लागार मिळून पंधरा जपानी हजर होते. परिषदेच्या प्रत्येक कमिटींत ते आपला शिरकाव करून घेत व आपल्या

---

Raw youth, or men with unformed characters or insufficient knowledge of world politics are not the persons to be sent to these international gatherings. You cannot depend on their maintaining their balance and keeping their place. Subject to these qualifications I am very strongly of opinion that Indians should utilise every opportunity that comes handy to attend international gatherings and mix with persons of international fame. Now this is not a new opinion. I have been saying that ever since I returned from America. I have been pressing it on our political leaders. Neither the League of Nations nor the international Labour Organisation should be taken too seriously. I still maintain that the League of Nations, as at present constituted, is a League of Imperialists. It is natural that institutions of this kind should be mostly utilised by states and nations commanding power and influence and respect in the world. A powerful man finds every thing useful and handy and knows how to use it for his own ends. The same is the case with the other International Organisations. One must be clear on this point. If one has no misconceptions on this score one can very judiciously join these organisations and try to get as much out of them as possible. Our cause is just. Our claims are true. We do not want to disseminate or spread falsehood or untruth but at the same time we cannot afford to let ourselves, our country and our nation be misrepresented and misunderstood. We cannot afford to let falsehoods, untruths and calumny be circulated against us."

देशहिताचें घोडें जेथें जितकें दामटतां येईल तितकें दामटीत. या उलट हिंदुस्थानची स्थिति! या परिषदेस पांचच लोक हजर! आणि त्यांत हिंदी असे दोघेच! बरें त्यांना देशाची कळकळ यथातथाच. लालाजी वगळून बाकीचे सारे 'हिज् मास्टर्स व्हॉइस' पैकींच!! लालाजींचें यासंबंधीं असें म्हणणें होतें कीं, हिंदुस्थानसरकारला परिषदेस जास्ती लोक पाठविणें परवडत नसेल, तर निदान जे पाठवावयाचे ते सर्व हिंदी तरी पाठवावे. इतर कांहीं फलप्राप्ति झाली नाहीं तरी या लोकांना शिक्षण तरी मिळेल!

# ९. राजकीय परिस्थितीचें परीक्षण व पुढील कार्याची दिशा.

राष्ट्रांतील ऐक्य नाहींसें झालें होतें. जातीजातींत, धर्माधर्मांत, पक्षापक्षांत बेबनाव उत्पन्न होऊन परस्परांतील चुरस विकोपाला पोंचली होती. १९२०-२१ सालीं हिंदूंच्या गळ्यांत गळा घालून स्वातंत्र्यसंपादनाकरितां काम करीत असलेले मुसलमान एकीकडे हिंदूंचा गळा दाबावयास तयार झाले होते, तर दुसरीकडे राजकारणी म्हणविणाऱ्या लोकांत तटच तट पडून राष्ट्रशक्तीचा एकसारखा क्षय होत होता. १९२०-२१ सालीं नेहमीं चिंताग्रस्त दिसणारें सरकार आतां निर्घोर असलेलें दिसत होतें. चळवळीचा लंबक स्थिर झाला होता, स्वराज्यसाधनाचीं यंत्रें गंजण्याच्या मार्गाला लागलीं होतीं. राष्ट्राची ती चेतनाहीन, कळाहीन, उत्साहशून्य स्थिति पाहिली म्हणजे मुखावाटे उद्गार निघूं लागत कीं, 'कुठें १९२१ आणि कुठें १९२६'! लालाजी म्हणतात, " The political outlook is not merely gloomy or dark; hope is simply nonest. Of course, people still think in political terms, they talk and write of politics and they conduct political campaigns. But the whole thing is lifeless and spiritless. There is no reality behind. It is a mere shadow. There is no zest, no zeal, and no go in it. Our rulers have seen through the game, they have made up their minds about it and have no fears or anxieties on that score. "

जिनेव्हाहून आल्यावर हिंदुस्थानांतील एकंदर राजकीय परिस्थितीचें लालाजींनीं परीक्षण केलें * व तें केल्यानंतर त्यांचे तोंडून असे उद्गार निघाले.

एकंदर परिस्थिति अशी निराशाजनक असली, तरी त्यांतहि देशोन्नतीचें कांहीं कार्य करतां येण्यासारखें नाहीं काय? आहे. मग तें कोणतें काम? लालाजी लिहितात, "हिंदुस्थानाला दिलेल्या राज्यघटनेचें परीक्षण करण्यासाठीं रॉयल कमिशन येईल त्याचे आधींचीं तीन वर्षें (१९२६–२९) कोणतें प्रत्यक्ष काम करण्यांत घालवावीं याचा हिंदुस्थानच्या राजकीय पुढाऱ्यांनीं एकत्र बसून विचार करावा. पुढील तीन वर्षें राष्ट्राच्या राजकीय इतिहासाच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत कीं नाहींत? मला वाटतें हीं तीन वर्षे बऱ्हंशीं आपला भविष्यकाळ निश्चित करतील. ज्यामध्यें स्वराजिस्टांचा, हिंदूंचा किंवा मुसलमानांचा मतभेद नाहीं असा कांहीं तरी कार्यक्रम आपणास या तीन वर्षांसाठीं शोधून काढावा लागेल. असा कोणता कार्यक्रम आपणास घेतां येईल तें पाहूं.

(१) लष्कराचें हिंदीकरण जितक्या लवकर करतां येईल तेवढें केलें पाहिजे, यासंबंधीं आपणा सर्वांचें एकमत आहे असें मला वाटतें. हिंदी अधिकारी असलेलें व हिंदी लोकांनीं पूर्णपणें भरलेलें लष्कर नसेल तर खरें स्वराज्य अस्तित्वांत येणें शक्य नाहीं. 'लष्कर' या शब्दांत राष्ट्राच्या संरक्षणास आवश्यक असलेल्या सर्व बाबींचा—आरमार, वैमानिक दळ, शस्त्रें व दारुगोळा यांचे कारखाने इत्यादींचा—मी समावेश करीत आहें. सरकारी तज्ज्ञ आम्हांस वारंवार सांगत आले आहेत कीं, ही गोष्ट आमच्या हयातींत होणें शक्य नाहीं. हें त्यांचें म्हणणें अखेरचा निर्णय आहे असें आम्हीं समजत नाहीं. स्कीन†कमिटीला या विषयावर

* 'पीपल' पत्राच्या १९२६ च्या आगष्ट–सप्टेंबरच्या अंकांत लालाजींनीं 'Reflections on the Political Situation' या मथळ्याखालीं प्रसिद्ध केलेली लेखमाला जिज्ञासूंनीं अवश्य वाचावी.

† विलायतेंतील 'सँडहर्स्ट कॉलेज'च्या धर्तीवर हिंदी लष्करी अधिकारी तयार करण्याचें एक विद्यालय स्थापन करण्यासंबंधीं विचार करण्याकरितां जुलै १९२५ मध्यें लेजिस्लेटिव्ह ॲसेंब्लींत पास झालेल्या ठरावानुसार, लेफ्टनंट जनरल सर अँड्रयु स्कीन यांच्या अध्यक्षतेखालीं पं. नेहरू, बॅ. जिना वगैरेंची एक कमिटी नेमण्यांत आली होती. या कमिटीच्या हिंदुस्थानांत बऱ्याच बैठका झाल्या व तिची एक पोटकमिटी

कांहीं तरी सांगावेंच लागेल. मोठ्या खेदाची गोष्ट कीं, पंडित मोतिलाल नेहरू या विषयावरील आपले विचार नमूद करूं शकणार नाहींत. त्यांना या कमिटीवर नेमतांच त्यांनीं नेमणूक स्वीकारली ही योग्य गोष्ट केली, पण पुढें जे शब्द, नियम व पद्धति यांनाच केवळ वाहिलेले आहेत अशा अनुयायांच्या हळवेपणामुळें कमिटी-वरील जागेचा राजिनामा देण्यास त्यांस भाग पडलें ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट होय. राजीनामा दिल्याबद्दल ज्यांनीं त्यांचें अभिनंदन केलें त्यांना त्यामुळें केवढें नुकसान झालें याची कल्पनाहि नसेल. ज्यानें वेगवेगळ्या देशांतील लष्करी प्रश्नांचा अभ्यास करण्यांत व कमिटीचा अखेरचा रिपोर्ट लिहिण्यांत भाग घेतला असता असा मोतिलालजींसारखा गृहस्थ कमिटींत असणें किती महत्त्वाचें आहे, हें न समजण्यासारखे हे लोक अदूरदृष्टी होते. हिंदुस्थान हें स्वयंशासित राष्ट्र बनावें अशी सरकारची अंतःकरणापासून खरोखरच इच्छा आहे किंवा नाहीं याची खात्री, तें लष्कराच्या हिंदीकरणाच्या बाबतींत जें धोरण स्वीकारील त्यावरूनच पटावयाची आहे. आणि म्हणून या बाबतींत एकमत व जोरदार संघटना करून लष्करी प्रश्न चिकाटीनें धसास लावला पाहिजे. या प्रश्नाचे बाबतींत राजकीय किंवा धार्मिक मतभिन्नता मुळींच आड येत नाहीं. सर्वांनाच पटणारा हा विषय आहे. स्कीन कमिटीचा रिपोर्ट या वर्षअखेर बाहेर पडेल. आणि त्यावर असें-ब्लीला आपलें मत द्यावें लागेल.

( २ ) लष्कराच्या खालोखाल दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे जमाबंदीचा. लष्कर व देशाच्या वसुलीचें व चलनाचें धोरण आंखण्याचें स्वातंत्र्य एवढीं आम्हाला द्या, म्हणजे स्वराज्य मिळाल्यासारखेंच आहे. निर्दोष जमाबंदी ही निर्दोष चलनप-द्धतीवर अवलंबून आहे. देशाच्या नाण्यांची आंतर्राष्ट्रीय बाजारांतील किंमत ही त्याची लायकी ठरवीत असते. त्याच्यावरच त्याची औद्योगिक व आर्थिक भरभराट अवलंबून असते. करन्सी कमिशनचा रिपोर्ट आतां बाहेर पडला आहे. आमच्या देशबांधवांपैकीं एका प्रसिद्ध व विद्वान गृहस्थाचें–सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास यांचें–दोन महत्त्वाच्या बाबींत कमिशनमधील बहुसंख्याक सभासदांशीं

---

१९२६ च्या हिंवाळ्यांत ज्या पद्धतिनुसार इंग्लंड, फ्रान्स, कॅनडा व अमेरिका या देशांतील लष्करी अधिकारी तयार केले जातात, त्या पद्धतींचा अभ्यास करण्या-करितां गेली.

मतैक्य झालेलें नाहीं. या दोन बाबी हुंडणावळीचा दर व नव्या रिझर्व बँकेची स्थापना या होत. तरी या बाबतींत बहुसंख्याकांच्या रिपोर्टाला संमति द्यावयाची कीं त्याला जोडलेल्या मतभेदपत्रिकेला पाठिंबा द्यावयाचा याचा निश्चित विचार देशाला करावा लागेल. हा प्रश्न अतिशय नाजुक आहे. शब्दशूर किंवा नवशिके पुढारी यांच्या हातून सोडविला जाण्यासारखा हा प्रश्न नाहीं. देशाच्या हिताचें रक्षण करण्यासाठीं यावर विचारपूर्वक वादविवाद व्हावयास पाहिजे. विरुद्ध पक्षांतील बुद्धिमान निष्णातांशीं तोडीस तोड देणारे बुद्धिमान निष्णात या वेळीं पुढें आले पाहिजेत. अशा बुद्धिमंतांचा आमच्यांत अभाव आहे असें नाहीं. पण विवक्षित पक्षाशीं संबद्ध असे ते नाहींत. यासाठीं असे लोक शोधून काढून त्यांस असेंब्लींत देशहितरक्षणासाठीं पुढें केलें पाहिजे. एक दोघांनीं पुढाकार घ्यावयाचा व बाकीच्यांनीं त्यांचें अनुयायित्व स्वीकारून केवळ ‘ होय ’ किंवा ‘ नाहीं ’ एवढेंच म्हणावयाचें अशानें भागणार नाहीं.

( ३ ) यानंतर असेंब्लीच्या येत्या बैठकीपुढें येण्याचा संभव असलेला तिसरा एक प्रश्न आहे. तो म्हणजे बादशाही शेतकी कमिशनसंबंधींचा होय. शेतकी कमिशन काय करणार आहे तें आपणास माहीत नाहीं. त्यानें चौकशीसाठीं ठरविलेल्या बाबी अगदींच मर्यादित आहेत; त्याची निवड अगदींच असमाधानकारक आहे. तरी पण त्याचा रिपोर्ट कसाहि बाहेर पडला तरी, शेतकीच्या धंद्याचें भवितव्य घडविणें किंवा बिघडविणें त्याच्याच हातांत आहे. शेतकी हा आमचा प्रमुख धंदा आहे. चारपंचमांशाहून अधिक लोकांचें तें निर्वाहाचें साधन आहे. शेतकीवर सर्वस्वी अवलंबून न राहतां देशांत कारखाने व उद्योगधंदे यांची वाढ होण्यास प्रोत्साहन दिलें पाहिजे हें जरी खरें असलें, तरी त्याची आबाळ होऊं न देतां अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, कानडा, रशिया, ब्राझिल, आर्जेंटाइन, आस्ट्रेलिया वगैरे देशांत शेतकीला जो आधुनिक शास्त्रीय प्रयोगांचा फायदा घेऊं दिला जातो तो सर्व ह्या आमच्या प्रमुख धंद्याला दिला जाणें अत्यावश्यक आहे. आज कच्चा माल पक्का होण्यासाठीं ज्या प्रमाणांत परदेशांत जातो त्या प्रमाणांत तो धाडण्याची जरूरी नाहीं. त्याचप्रमाणें परदेशांतील कच्चा माल येथील कच्च्या मालापेक्षां उत्तम प्रतीचा व सोयीचा म्हणून येथें आणणेंहि आम्हांस परवडणार नाहीं.

कायदेमंडळांतील लोकांचें ज्याकडे ताबडतोब लक्ष वेधणें जरूर आहे असे याशिवाय आणखी बरेच प्रश्न आहेत. यांतील बरेच अत्यंत महत्वाचे आहेत.


चांगलें लष्कर, किंवा उत्कृष्ट प्रकारची जमाबंदी पद्धति यांचे आधीं यांकडे लक्ष गेलें पाहिजे. अशा प्रश्नांपैकीं महत्त्वाचे प्रश्न म्हणजे शिक्षण, आरोग्य व मजूर हे होत. परस्परावलंबी असे हे प्रश्न आहेत.

(४) शिक्षणाचा प्रश्न. याला अनेक बाजू आहेत. सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू होऊन तें राष्ट्राच्या शक्तींत, बुद्धिमत्तेंत, अर्थसाधनांत अधिकाधिक महत्वाची भर घालण्यांत सहायभूत होईल असें कसें देतां येईल त्याचा विचार झाला पाहिजे. यापुढें लालाजींनीं सध्यां दिलें जाणारें विश्वविद्यालयीन शिक्षण कसें सदोष आहे, कुचकामाचें आहे याची विस्तृत चर्चा केली असून, लोकप्रतिनिधींनीं त्यांत बदल घडवून आणण्याचे प्रयत्न केले पाहिजेत असें सांगितलें आहे. व शेवटीं सध्यां शिक्षित वर्गांत जी बेकारी बेसुमार वाढत आहे त्याची चर्चा त्यांनीं केली आहे. ते म्हणतातः—आमच्या सुशिक्षित तरुणांच्या बेकारीचा प्रश्न, हा ज्याकडे तावडतोब लक्ष दिलें पाहिजे अशा प्रश्नांपैकीं एक प्रश्न आहे. सरकार या बाबतींत उदासीन आहे. ब्रिटिश बेटांतून कसबी लोक आणून त्यांस रोजगार देण्याचें त्याचें व्रत अद्यापहि अव्याहत चालू आहे. त्याचें असें म्हणणें असतें कीं, तें इकडे ज्यांना परदेशांतून आणतें त्यांच्या तोडीचें कसब आमच्या मुलांत नाहीं. मी या आरोपाचा इन्कार करतों. बरें, त्यांत थोडेंसें तथ्य आहे असें जरी ग्रहीत धरलें, तरी तशी स्थिति असण्यास जबाबदार कोण ? त्याचा दोष कोणावर ? मुलांचा किंवा त्यांच्या आईबापांचा त्यांत दोष नाहीं. तो दोष, कसबी बनण्यास ज्या तऱ्हेच्या सोयी पाहिजेत त्या करून न देणाऱ्या सरकारचा आहे. आईबापांनीं हाडाचीं काडें करावीं, कर्जबाजारी व्हावें, स्वतः अनेक गैरसोयी सोसाव्या, साधारण सुखांनाहि फांटा द्यावा आणि मुलांना शिक्षण द्यावें, आणि शेवटीं जें फळ आपल्या मुलांच्या हातांत पडावें अशी त्यांनीं अपेक्षा करावी तें परदेशी मुलांच्या हातांत पडल्याचें व स्वाभिमान नष्ट केल्याशिवाय जगण्यापुरतेंहि अन्न त्यांस मिळत नाहीं अशी स्थिति पाहण्याचें नशिबीं यावें, हा सारा प्रकार शोचनीय आहे."

कायदेमंडळांत गेलेल्या राष्ट्रीयपक्षाच्या लोकांनीं जेव्हां तेव्हां 'बाहेर पडण्याचे' व 'पुनः आंत येण्याचे' प्रकार करीत कालक्षेप न करतां कांहीं तरी राष्ट्रहितोपयोगी काम करावें असें लालाजींचें मत असल्यामुळें, त्यासंबंधीं कोणाचेंहि दुमत होणार नाहीं, अशा या बाबी कार्याकरितां म्हणून त्यांनीं पुढें मांडल्या. नेहरूंच्या स्वराज्यपक्षाचें असेंब्लींतील बेफिकिरीचें व रुसव्या फुगव्याचें वागणें



सर्व्हंटस् ऑफ पीपल सोसायटीचे सभासद.



लाला लजपतराय स्मारक-भवन.

त्यांस मान्य नव्हतें. आणि म्हणूनच १९२६ साल अखेरच्या नव्या निवडणुकींत स्वराज्यपक्षातर्फे उभे न राहतां 'स्वतंत्र' म्हणून उभे राहिले. देशबंधु दासांच्या मृत्यूनंतर त्यांचें स्वराज्यपक्षाशीं, विशेषतः पं. मोतीलाल नेहरूंशीं पटेना. मालवीय, जयकर, मुंजे, केळकर यांच्याकडे त्यांचा ओढा अधिक होता. त्यांनीं स्थापन केलेल्या 'नॅशनॅलिस्ट' पक्षाचे ते अध्यक्ष बनले व त्यास अखेरपर्यंत ते चिकटून राहिले. याला कारणेंहि होतीं. हिंदूंच्या प्रश्नाचे बाबतींत स्वराज्यपक्षानें कधींहि आस्था दाखविली नाहीं. असेंब्लींत हिंदुहितविरोधक एखादा ठराव आल्यास स्वराज्यपक्षाचे लोक बहुधा गैरहजर असलेले किंवा मुकाट बसलेले आढळत. लालाजींची या बाबतींतील वृत्ती तर भिन्न होती. हिंदूंना संघटित करण्याचें कार्य ते कितीतरी वर्षें करीत होते, विशेषतः श्रद्धानंदजींच्या मृत्यूनंतर, तेंच त्यांचें एकमेव कार्य होऊन बसलें होतें. अर्थात् त्यांस मालवीय-मुंजे यांच्या पक्षालाच मिळणें योग्य वाटलें. नव्या निवडणुकीच्या वेळीं लालाजींना स्वराज्यपक्षाकडून कसून विरोध झाला. पण लालाजी त्यांस पुरून उरले. पंजाबांत व संयुक्तप्रांतांत लालाजींच्या पक्षानें स्वराज्यपक्षियांचा जवळ जवळ धुव्वा उडविला. निवडून आलेल्या उमेदवारांत त्यांच्या पक्षांतील लोकांची संख्याच जास्त होती. खुद्द असेंब्लींत स्वराज्यपक्षाच्या खालोखाल त्यांचा 'नॅशनॅलिस्ट' पक्षच बलवान होता. येथें एक गोष्ट सांगणें अत्यंत जरूर आहे, आणि ती ही कीं, पंडित मोतीलाल नेहरूंशीं त्यांचें जरी पटत नव्हतें, तरी त्यांचें जें कार्य त्यांस संमत होई त्यास कळकळीनें पाठिंबा दिल्याशिवाय ते राहिले नाहींत. उदाहरणार्थ, नेहरू रिपोर्ट बाहेर पडतांच त्याच्या बाजूनें त्यांनीं जंगी प्रचार केला. जेथें जेथें संधि मिळेल तेथें तेथें नेहरू रिपोर्टाचें महत्त्व लोकांस पटवून देण्यास त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. नेहरू रिपोर्टावर ते इतके खुष होते कीं, कोणी सार्वजनिक कार्यकर्ता भेटला, म्हणजे त्यास पहिला प्रश्न ते हा विचारीत कीं, 'तुम्हीं नेहरू रिपोर्ट वाचला आहे काय?' वाचला नाहीं असें उत्तर दिल्यास ते त्यास आग्रहानें सांगत, 'जरूर वाचा, त्याचा अभ्यास करा!' नेहरू रिपोर्टाच्या कित्येक प्रति त्यांनीं स्वखर्चानें आपल्या स्नेहीमंडळांत वांटल्या. इटावा येथें आग्रा प्रांतिक परिषद भरली असतां, त्या ठिकाणींसुद्धां त्यांनीं जें भाषण केलें तें नेहरूरिपोर्टावरच होतें. नेहरूंचें कारस्थानी वर्तन त्यांस आवडत नसे. विशेषतः त्यांची सरसहा सर्व लोकांवर शह ठेवण्याच्या पद्धतीची त्यांस चीड येई. पण असें असलें तरी, त्यांच्यामधील महत्त्वाच्या गुणांची वाहवा करण्यास ते मागें पहात नसत.

## १०. लालाजी आणि हिंदुसमाज.

हिंदी राजकारणांत एक काळ असा होता कीं, ज्या काळांत एकच व्यक्ति जहाल समाजसुधारक व जहाल राजकारणी असणें अशक्य कोटींतलें समजलें जाई. एखादी तशी व्यक्ति असलीच तर तिला उभयान्वयी समजली जाऊन ती दुलक्षिली जात असे. कित्येकदां सुधारक व जहाल राजकारणी या दोन्ही पक्षांकडून तिचा तीव्र उपहास होई. महाराष्ट्रांत तर, 'देशाची राजकीय व सामाजिक अशा उभयविध बाबतींत सेवा करूं पाहणाऱ्या मनुष्यानें एक तर नेमस्त व सुधारक तरी असलें पाहिजे किंवा जहाल व पुराणाभिमानी तरी असलें पाहिजे,' अशी समजूत दृढमूल झाली होती. समाजसुधारक व जहाल राजकारणी हे एकमेकांचे हाडवैरी समजले जात. 'आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक,' हा वाद जवळ जवळ अर्धशतक चालला होता. आगरकरपक्ष व टिळकपक्ष यांमध्यें चालत असलेले वाद पाहिले म्हणजे वाटतें कीं, या दोन पक्षांत विरुद्ध पक्षावर लाखोली वाहण्यांत अधिक निष्णात कोण याबद्दल जणूं काय चुरसच लागली होती. सुदैवानें आज हा वाद नामशेष होण्याच्या मार्गाला लागला आहे. ' आधीं कोणतें', या प्रश्नाला ' दोन्ही ' असें नव्या पिढीनें उत्तर देऊन या वादाला मूठमाती दिली आहे. आजच्या पिढीला आगरकर व टिळक या दोन्ही विभूति वंद्य वाटतात. आगरकरांचें सामाजिक तत्त्वज्ञान व टिळकांचें राजकीय तत्वज्ञान हीं दोन्ही चांगल्या रीतीनें पचवून राष्ट्राचा गाडा प्रगतिपथावरून भराभर पुढें हांकत नेण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत येत चाललें आहे.

पंजाबांत महाराष्ट्राप्रमाणें 'आधीं राजकीय कीं आधीं सामाजिक' हा वाद फारसा माजला नव्हता. जीं रणें माजलीं होतीं तीं धार्मिक व सामाजिक सुधारणेचे बाबतींत! आर्यसंस्कृतीला खरडून टाकून हिंदु समाजावरील मुसलमानी संस्कृतीचे लेप कायम करण्याचे जे कित्येक वर्षें प्रयत्न झाले त्यांस तीव्र विरोध करणारा व पूर्वसंस्कृति नव्या मार्गांनीं पुनः रूढ करणारा वर्ग पंजाबांत उदयास येत होता. यांत धार्मिक व सामाजिक क्रांतीचे पुरस्कर्ते बरेच होते पण राजकीय क्रांतीचा उघडपणें पुरस्कार करणारे आरंभीं फारसे नव्हते. अशा वेळीं सामान्य जनांत व शिक्षित समुदायांत राजकीय परिवर्तन घडवून आणणारे असे दोन पुरुष पुढें आले. लाला लजपतराय व अजीतसिंह हे ते होत. लालाजींच्या प्रेरणेमुळें आर्यसमाजांत धार्मिक,सामाजिक व शैक्षणिक चळवळीबरोबरच राजकीय चळवळ करणारीं नवीं माणसें निर्माण झालीं. लालाजी राजकारणाच्या आखाड्यांत पडण्यापूर्वी पंजाबांत राष्ट्रीय सभेची व तिच्या कार्याची हेटाळणी केली जाई. पंजाबवर राष्ट्रीय सभेंतील पुढाऱ्यांची छाप लालाजींनीं राष्ट्रीयसभेंत प्रत्यक्ष भाग घेईपर्यंत कधींच पडली नाहीं. लालाजींचा राजकारणांतील पहिला गुरु मॅझिनी हा होय. आयुष्याच्या पूर्वार्धांत तोच त्यांची ध्येयदेवता बनला होता. मॅझिनीचें सर्व वाङ्मय लालाजींनीं स्वतः अभ्यासिलें व नंतर अनेक पंजाब्यांकडून अभ्यासविलें व त्यांच्या अंतःकरणांत देशप्रेमाची ज्योत पेटविली. हें लक्षांत घेऊनच प्रसिद्ध क्रांतिकारक भाई परमानंद यांनीं त्यांस 'पंजाबचे राजकीय गुरु'* असें म्हटलें आहे. लालाजींचें राजकारण त्यांच्या समकालीनांच्या राजकारणाहून अधिक व्यापक स्वरूपाचें होतें. देशाची सर्वांगीण प्रगति न होतां मिळणारें स्वातंत्र्य राष्ट्राच्या अंतिम हिताच्या दृष्टीनें कुचकामाचें आहे ही गोष्ट त्यांस पटली होती. यामुळेंच त्यांचे राजकीय विचार जसे उदार व पुढारलेले होते तसेच सामाजिक विचारहि उदार व पुढारलेले होते. हिंदुसमाजानें आपल्या शरीराभोंवतालचीं जुनीं जीर्ण कवचें भलत्याच अभिमानाला बळी पडून कंवटाळून न बसतां, त्यांस दूर फेंकून देऊन नव्या युगांत उपयोगी पडतील अशींच धारण केलीं पाहिजेत; ज्ञान आणि विज्ञान यांत जगाच्या मागें न राहतां

---

* "Lala Lajpatrai was undoubtedly the political Guru of this province. He was the first man, who taught us the first lessons in patriotism." ( Hindustan Times, Lajpat Rai Annual, 1928. )

स्वतःचा उत्कर्ष कसा घडवून आणतां येईल याचा अविलंबेंकरून विचार केला पाहिजे. आपला धर्म व आपली संस्कृति यांस उजळा देऊन त्याचा प्रसार करण्यासाठीं निष्ठापूर्वक यत्न केला पाहिजे, ही गोष्ट त्यांनीं हिंदुसमाजास नानाप्रकारें समजून देण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. त्यांनीं आपल्या आयुष्याच्या अखेरी अखेरीस हिंदुसमाजाचें संवर्धन, दृढीकरण व बलवर्धन या गोष्टींकडेच अधिक लक्ष दिलें. हिंदुसंघटनाचे मूळ जनक तेच होत. राष्ट्रधर्माला न विसरतां स्वधर्माचें रक्षण व वर्धन कसें करावें हें त्यांनीं या संघटनविषयक चळवळीच्या द्वारा समाजाला शिकविलें. या संघटनाच्या चळवळीमुळें हिंदूंना राष्ट्रोत्कर्षाबरोबरच आपला सामुदायिक उत्कर्ष कसा करून घेतां येईल याची स्पष्ट कल्पना आली. राष्ट्राच्या उत्कर्षाकरितां निरनिराळे समाज जसे एकमेकांशीं संलग्न असणें जरूर आहे, तसेंच समाजाच्या उत्कर्षाकरितां समाजाचे निरनिराळे घटकावयवहि संलग्न असणें अत्यावश्यक आहे, ही गोष्ट हिंदूंच्या मनांत बिंबविण्याचा त्यांनीं आटोकाट प्रयत्न केला. यासंबंधींचें नग्न सत्य सांगण्यास ते मुळींच कचरले नाहींत. हिंदुसमाज कां खुरटत आहे, तो उत्तरोत्तर दुर्बल कां होत चालला आहे याची सूक्ष्म चिकित्सा करून त्यावर त्यांनीं वेळोवेळीं उपायहि सुचविले आहेत. 'हिंदुसमाजाच्या दुर्बलतेचें पहिलें कारण म्हणजे स्त्रिया, मुलें व स्वशरीर यांकडे झालेलें दुर्लक्ष होय. या दुर्लक्षामुळें आपण प्रगतीचे शर्यतींत फार मागें पडलों. विशेषतः स्त्रियांचे बाबतींत शतकानुशतकें जी हेळसांड झाली तीमुळें जवळ जवळ वंशक्षयाला सुरुवात झाली व राष्ट्र प्रत्येक बाबतींत अयशस्वी होऊं लागलें. स्त्रियांचें मानसिक व शारिरीक संवर्धन न झाल्यामुळें त्यांपासून उत्पन्न होणारी प्रजा दुर्बल व भ्याड निपजूं लागली, साहसी वृत्तीचा लोप होऊं लागला. साहसी वृत्तीचा दुष्काळ झाल्यामुळें समाज बुद्धिमान व संपत्तिवान् असूनहि मागें पडूं लागला व राष्ट्राला स्वाभिमानी, स्वावलंबी व स्वसंरक्षणक्षम बनविण्याचे बाबतींत अधिकाधिक नालायक होऊं लागला. स्त्री ही वंशजननी आहे. ती जर अज्ञानी राहील, दुर्बल राहील, गुलामी वृत्तीची बनेल तर त्याचे दुष्परिणाम प्रजेला भोगावे लागतील. हिंदुसमाजानें स्त्रीला अज्ञानी ठेवलें, मूर्ख व संकुचित वृत्तीचें बनविलें, दुबळी व भ्याड केलें, परावलंबनाची संवय लाविली, महत्वाकांक्षाशून्य बनविलें, तिच्यांतील विचार करण्याची शक्ति नष्ट केली, याचे दुष्ट परिणाम तिच्यापासून उत्पन्न झालेल्या प्रजेवर झाले.' लालाजींची विचारसरणी ही अशी होती. समाजबलवर्धनाचे खटाटोपांतील पहिला

खटाटोप स्त्रियांची उन्नति व सुधारणा हा होय असें ते सांगत. ही उन्नति व सुधारणा कशी घडवून आणतां येईल यासंबंधींची योजना, जिनेव्हाच्या आंतर्राष्ट्रीय परिषदेहून परत येतांना त्यांनीं मनाशीं निश्चितहि केली होती. ही योजना खालीलप्रमाणें होती:—

स्त्रियांच्या उन्नतीकरितां सर्व हिंदुस्थानभर 'सेवासदनें' स्थापावयाचीं. या सेवासदनांचें कार्य पुढीलप्रमाणें:—( १ ) कौटुंबिक आरोग्यासंबंधींचीं तत्त्वें व तीं आचरण्यांत आणण्याचे नियम निश्चित करणें; ( २ ) निरुपद्रवी मार्गांनीं कुटुंबाचें नियमन कसें करावें याची शिकवण देणें; ( ३ ) स्त्रियांस अभ्यासासाठीं सात्विक वाङ्मय पुरविणें; ( ४ ) समाजसेवेच्या संवयी लावणें व सेवा करण्यास प्रोत्साहन देणें; ( ५ ) मुलींकडून वैद्यकाचा अभ्यास करवून परिचारिकेचा धंदा करण्यास प्रोत्साहन देणें; ( ६ ) स्वतःच्या शरीराचें कोणत्याही संकटांत संरक्षण करण्याची पात्रता आणील अशातऱ्हेचें शारीरिक शिक्षण देणें; (७) बुद्धिमान विद्यार्थिनींस स्वदेशांत किंवा परदेशांत उच्च शिक्षण घेतां यावें म्हणून शिष्यवृत्ति देण्याची सोय करणें; ( ८ ) बालविवाहाविरुद्ध चळवळ करणें; ( ९ ) गरीब व असहाय विधवांची सोय लावणें.

अस्पृश्योन्नतिप्रमाणेंच स्त्रियोन्नतीचा प्रश्न लालाजींना अत्यंत जिव्हाळ्याचा वाटे. * स्त्रियोन्नती हा राष्ट्रोन्नतीचा पाया आहे अशी त्यांची दृढ समजूत होती. हा पाया जितका भरींव असेल तितकी समाजमंदिराला शाश्वतता येईल, असें त्यांचें मत होतें.

लालाजी हिंदु विवाहविषयक कायदा बदलला पाहिजे अशा मताचे होते. विवाह, विवाहापासून विवाहितांचें सौख्य व आरोग्य कसें टिकेल, अपत्याचें कल्याण

---

* लालाजींनीं पीपलमध्यें लिहिलेल्या 'हिंदुसमाजाची पुनर्घटना' यालेखांत खालीलप्रमाणें उद्गार काढले आहेत:—

" How can you build up a nation efficient for all purposes of offence and defence if you neglect the intellectual, physical and economic condition of your women ? Men of the race, take care of your women, if you desire to be men and fathers of Men healthy, efficient, self-respecting and self-defending. Give me healthy women of courage and quality and I will guarantee Swaraj in a very short time. Let us continue our struggle for Swaraj by all means but let us not neglect the foundation of nationhood without which Swaraj can only be ephemeral and unsubstantial. "

कसें होईल, समाजाचें हित कसें होईल याचा विचार होऊन झाला पाहिजे असें ते म्हणत. विविक्षित परिस्थितींत घटस्फोट करण्यास कायद्यानें वाव मिळावा असेंहि त्यांचें मत होतें.

हिंदुसमाजांतील उच्चनीचत्वाचे भेद व दुष्ट रूढी यांचें निर्मूलन झालें पाहिजे; समाजांत महारोग्यावांचून अस्पृश्य असा कोणीहि गणला जातां नये; हिंदू तेवढा एक ही भावना उत्पन्न झाली पाहिजे असें ते सारखें सांगत आले. नुसतें सांगत आले असें नाहीं तर कृतीनें करीत आले. अस्पृश्योद्धारासाठीं त्यांनीं आपला कितीतरी स्वकष्टार्जित पैसा पाण्यासारखा खर्च केला.

हिंदुधर्म हा मूळचा उदार आहे, तो सर्वांचा मायपोट आहे व तो तसा बनला पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. त्यांच्या सर्व धडपडी, सर्व चळवळी या इच्छा-पूर्तीकरितां होत्या. हिंदुमहासभेची स्थापना त्यांनीं याच हेतूनें केली. हिंदुधर्मानें दुसऱ्या कोणत्याहि धर्मावर बळजबरीनें आक्रमण करूं नये किंवा दुसऱ्यासहि करूं देऊं नये असें त्यांचें म्हणणें असे. स्त्री, मूल व दुर्बल यांचें धर्मपरिवर्तन करण्या-विरुद्ध ते होते. कायद्यानें त्याला आळा घातला पाहिजे असें त्यांचें मत होतें. धर्माचीं तत्वें पटून जो एक धर्म सोडून दुसऱ्या धर्मांत जाऊं इच्छित असेल त्यानें खुशाल जावें, त्याला कोणी प्रतिरोध करूं नये. पण असहाय परिस्थितीचा फायदा घेऊन एखाद्याला बाटविणें हा शुद्ध नीचपणा आहे असें ते मानीत.

लालाजींपुढें हिंदुसमाजाच्या पुनर्घटनेसंबंधीं अनेक योजना होत्या. त्यांचें आयुष्य आणखी कांहीं वर्षें वाढतें तर त्या खास मूर्तावस्थेंत येत्या. लालाजींच्या अकालिक निधनामुळें, हिंदुसमाजाची सूक्ष्मपणें पाहणी करून, त्यावर अचूक उपाय योजणारा कुशल समाजवैद्य नाहींसा झाला.

राष्ट्राच्या राजकीय उन्नतीप्रमाणेंच, सामाजिक उन्नति घडवून आणण्याकरितां लालाजींचें अंतःकरण रात्रंदिवस तळमळत असे. स्वधर्माचा, स्वराष्ट्राचा जळ-जळीत अभिमान लालाजींप्रमाणें फारच थोड्यांत आढळेल. स्वधर्मांतील कम-कुवतपणाची त्यांना जाणीव होती, पण परक्यांनीं त्यासंबंधीं केलेला 'राईचा पर्वत' त्यांना केव्हांहि सहन झाला नाहीं. मिस मेयो या बाईनें 'मदर इंडिया' हें हिंदुस्थानची नालस्ती करणारें पुस्तक लिहितांच त्यांस जो तीव्र संताप आला तो याचमुळें. बाईच्या या दुष्ट हल्ल्याला त्यांनीं आपल्या '**दुःखी भारत**' (१९२८) या पुस्तकांतून सडेतोड उत्तर दिलेलें आहे. हें पुस्तक लिहितांना त्यांनीं आपल्या रुग्ण शरीराचीहि पर्वा केली नाहीं.

# ११. लढतां लढतां अखेर !

हिंदुस्थानाला दिलेल्या मॉंटेगचेम्स्फर्ड सुधारणा कितपत यशस्वी झाल्या, त्यांच्यांत आणखी भर घालावी कीं आहेत त्यांतच काटछाट करावी, यासंबंधीं चौकशी करून रिपोर्ट करण्यासाठीं हिंदुस्थानचे बादशहा पंचम जॉर्ज यांनीं, सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखालीं कमिशन नेमलें असल्याचें २६ नोव्हेंबर १९२७ रोजीं जाहीर केलें. हें कमिशन एकजात इंग्रजांचें बनविलें होतें व त्यांत पार्लमेंटांतील तिन्ही पक्षांतर्फेचे लोक घेतले होते. वास्तविक कोणत्याहि देशाची राज्यघटना बनवावयाची झाली किंवा तिची चौकशी करावयाची झाली तर त्या-साठीं जें एक मंडळ तयार होतें त्यांत त्या देशाच्या अनुभविक पुढाऱ्यांचा अवश्य समावेश केला जातो. आजपर्यंत हिंदुस्थानांत जीं पार्लमेंटकडून किंवा हिंदुस्थान सरकारकडून कमिशनें नेमलीं गेलीं त्यांत हेंच धोरण स्वीकारण्यांत आलें होतें.

मॉंटेग–चेम्सफर्ड सुधारणांच्या पहिल्या हप्त्याची मुदत संपली; त्या वेळीं हिंदी पुढाऱ्यांस वाटूं लागलें कीं, नवें बादशाही कमिशन फेरसुधारणांकरितां जेव्हां नेमिलें जाईल तेव्हां तें अशाच पद्धतीचें असेल. आणि या समजुतीनें, असें कमिशन अस्तित्वांत येण्यापूर्वी आपलें स्वराज्याचें ध्येय कोणत्या प्रकारचें आहे, आपणास यापुढें कोणत्या प्रकारची राज्यघटना पाहिजे याची निश्चिती करून एकमुखी मागणी तयार करणें बरें असें ठरवून सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं पं. मोतीलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखालीं भावी राज्यघटनेचा मसुदा तयार केला. हा मसुदा सर्वत्र मान्यता पावला; पण विलायतेंत त्याची किंमत झाली नाहीं. त्या वेळचे, साम्राज्यसत्तावा-

दाचे अर्क असे, भारतमंत्री लॉर्ड बर्कनहेड यांनीं त्यास कचऱ्यांतील कपट्याएवढीहि किंमत दिली नाहीं. स्वतःला पसंत पडतील असे पार्लमेंटांतील सात गोरे लोक निवडून त्यांचें कमिशन त्यांनीं बनविलें; लॉर्ड सिंहासारखे हिंदी गृहस्थ त्या वेळेस पार्लमेंटचे सभासद असतां, त्यांसहि या कमिशनमध्यें घेतलें नाहीं. लॉर्ड बर्कनहेडची ही वृत्ती हिंदी लोकांचा उघड उघड अपमान करणारी होती. ही वृत्ती, ' तुम्हीं गुलाम आहांत, तुम्हीं तुच्छ आहांत, तुम्हांला काय हवें काय नको याची निवड करण्याचा किंवा सांगण्याचा हक्क तुमचा नाहीं, तुमच्या तोंडावर जो तुकडा आम्हीं फेंकूं तो तुम्हीं बिनतक्रार खाल्ला पाहिजे व पचवून दाखविला पाहिजे, तुमच्या हातून तसें घडलें नाहीं तर दिलेला तुकडाहि परत घेऊं' असेंच सांगत होतीं. या वृत्तीची हिंदुस्थानास चीड आली. कमिशनशीं आम्हांला यापुढें कांहीं कर्तव्य नाहीं, अशी घोषणा सुरू झाली. शहरांशहरांतून निषेधप्रदर्शक सभा भरल्या, काळ्या निशाणाच्या मिरवणुकी निघाल्या, ब्रिटिश मुत्सद्यांना उघड उघड आव्हानें दिलीं गेलीं.

हिंदुस्थानच्या निषेधाला भीक न घालतां सायमनसप्तक १९२८ च्या फेब्रुवारींत हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर उतरलें व त्यानें आपला संचार सुरू केला.

प्रांताप्रांतांतून सायमननिषेध सुरू झाला. पंजाबांत लालाजींनीं पुढें होऊन सायमन कमिशनविरुद्ध जोराचा मतप्रसार करण्यास सुरवात केली. असेंब्लींतही सायमन-कमिशनशीं असेंब्लीस कांहींहि कर्तव्य नाहीं अशा अर्थाचा ठराव* आणला. लालाजींनीं या ठरावावर भाषण करितांना बर्कनहेड व त्याला माना डोलावणारे लोक यांची चांगलीच हजेरी घेतली. ते म्हणाले, " बर्कनहेड म्हणतात कीं हिंदुस्थानच्या प्रश्नाचा विचार करण्याचा किंवा त्यावर निर्णय देण्याचा हक्क एकट्या पार्लमेंटचाच आहे. ईस्ट इंडिया कंपनीकडून पार्लमेंटनें हिंदुस्थान आपल्या ताब्यांत घेतलें, आणि झोटिंगपादशाहीपासून त्याला मुक्त केलें; आज ब्रिटिश लोक जर हिंदुस्थानांतून निघून

---

* हा ठराव पुढीलप्रमाणें होता, " This Assembly recommends to the Governor-General-in-Council to inform His Majesty's Government that the present constitution and scheme of the Statutory Commission are wholly unacceptable to this House and that this House will therefore have nothing to do with the Commission at this stage and in any form."

गेले तर हिंदुस्थानांत पुनः झोटिंगपादशाही सुरू होईल असें त्यांचें म्हणणें आहे. खेदाची गोष्ट आहे कीं, झोटिंगपादशाहीसंबंधींची भारतमंत्र्यांची व आमची कल्पना यांत पुष्कळ फरक आहे. इंग्लंड व हिंदुस्थान यांचेसंबंधाच्या वैभवशालीपणाबद्दल, मोठेपणाबद्दल ते बोलतात. हें मोठेंपण आणि वैभव ब्रिटिशांच्या दृष्टीनें सत्य आहे खरें ! हिंदी लोकांच्या दृष्टीनें मात्र तें नाहीं. इंग्लंडचा हिंदुस्थानाशीं संबंध जडल्यामुळें हिंदुस्थानचें कांहीं कल्याण झालें असें मला म्हणवत नाहीं. भारतमंत्र्यांच्या व आमच्या दृष्टींत हाच फरक आहे. आतां झोटिंगपादशाहीच्या प्रश्नाकडे वळूं. परकीयांनीं संगिनींच्या जोरावर लादलेल्या कायद्याहून अन्य झोटिंगपादशाही ती आणखी कोणती असणार ! एखाद्या स्वाभिमानी राष्ट्रावर चालविलेल्या या झोटिंगपादशाहीहून अधिक मोठी झोटिंगपादशाही ती कोणती ? ज्यांच्याकरितां सरकार निर्माण करावयाचें, ज्यांच्याकरितां राज्यघटना बनवावयाची, त्यांना आपलें भवितव्य ठरविण्याचा यत्किंचितहि अधिकार असूं द्यावयाचा नाहीं अशी जी पद्धत ती कोणत्या झोटिंगपादशाहीहून कमी ठरेल ! महाराज, धमक्यांनीं कधीं प्रगति घडून येत नसते. असल्या झोटिंगपादशाहीच्या धमक्यांनीं आम्हीं भिऊन जाणार नाहीं. या येथें उभा राहून मी आपल्याला सांगतों, कीं ब्रिटिश लोक हिंदुस्थानांतून निघून गेल्यानें जर बेबंदशाही माजावयाची असेल तर तिला मी भीत नाहीं. त्याहूनहि वाईट परिस्थितीचा अनुभव घेण्याला मी तयार आहें. आम्हीं सध्यां ज्या परिस्थितींत राहात आहोंत त्याहून वाईट, आणखी वाईट ती कोणती परिस्थिति असणार ! याहून अधिक वाईट अशी कोणतीहि परिस्थिति असूं शकणार नाहीं. दैन्यरूपी दरीच्या अगदीं शेवटच्या टोंकापर्यंत आम्हीं कोलमंडत गेलों आहोंत—आज अधःपाताच्या एका टोंकाला जाऊन पोंचलों आहोंत. ब्रिटिश सरकारला असें वाटत असेल कीं, आपण हिंदुस्थानांतून निघून गेल्यास हिंदी लोक आपापसांत लढूं लागतील. ठीक आहे, या लढाईचें मी स्वागतच करीन. कारण अखेरीस पुष्कळशीं युद्धें, पुष्कळशा मारामाऱ्या, पुष्कळसा रक्तपात यानंतर आम्हीं स्थैर्याचा कांहीं तरी प्रयत्न करूं व आमचें सरकार आम्हीं बनवूं. हें स्थापन झालेलें सरकार आम्ही हळू हळू सुधरूं. (युरोपियन सभासदांच्या बैठकीकडून हास्याचा ध्वनि ऐकूं येतो. ) युरोपिअन सभासद मला हंसत आहेत, पण त्यांना माझें हेंच उत्तर आहे कीं, "तुम्हीं पोटभर हंसून घ्या, कारण तुम्हीं स्वतःचें चित्र रेखाटणाऱ्या चिताऱ्याप्रमाणें आहांत. तुम्हीं जर आम्हीं आहोंत

त्या स्थितींत असतां तर हंसलां नसतां, रडलां असतां. इंग्लंडवर आम्हांस दोन वर्षें राज्य करण्याची संधी द्या, म्हणजे मग पाहूं कोण हंसतें आणि कोण रडतें तें! (या ठिकाणीं असेंब्लींतील एक मुसलमान सभासद कबिरुद्दिन अहमद मध्येंच अडथळा करून विचारतात, 'मोगल पातशाहीच्या वेळेला तुम्हीं कसें राज्य केलेंत? ब्रिटिश आले कसे? हिंदुमुसलमानांचे दंगे होतात त्याचें काय?') आम्ही फार चांगल्या रीतीनें राज्य केलें. हिंदुमुसलमानांच्या दंग्याची मी फिकीर करीत नाहीं. इंग्लंडांत दंगे झाल्याचें आपण ऐकत नाहीं काय? या प्रश्नाचा निकाल आम्हांला लावावासा वाटेल तेव्हां तो लावूंच लावूं. या दंग्यांची जबाबदारी येथें जे तिसरे लोक आहेत त्यांच्यावर आहे. हे दंगे घडवून आणणारा हा तिसऱ्या लोकांचाच पक्ष आहे. हा पक्ष दूर होऊंद्यात आणि मग पहा भांडणें थांबतात कीं नाहीं. ही अगदीं सोपी परिक्षा आहे. तुमच्या असल्या या बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं." यानंतर भारतमंत्र्यांच्या अनेक विचारांवर टीका करून ते म्हणाले, "ब्रिटिशांच्या १५५ किंवा १७५ वर्षांच्या कारकीर्दीनंतर, आमची या आमच्या देशांत कोणती अवस्था आहे? महाराज, आम्हांला असें सांगण्यांत येतें कीं, आम्हीं आमचें संरक्षण करण्यास असमर्थ आहोंत, आम्हीं आमच्या घराचें रक्षण करण्यास असमर्थ आहोंत, आम्हांला आमच्या रेल्वे चालवितां येत नाहींत, इतकेंच काय पण आमचा अर्थव्यवहारहि नीट सांभाळतां येत नाहीं. ब्रिटिशांची भरभराट होण्याचीं साधनें, याहून आमची अन्य लायकी नाहीं काय? आम्ही फक्त कट करण्याच्या लायकीचे आहोंत, दुसऱ्याच्या हातांतील खेळणीं होण्याच्या लायकीचे आहोंत, स्वाभिमानी राष्ट्राकडून ज्या गोष्टींची अपेक्षा केली जाते त्या करण्याची आमची आज लायकी नाहीं. ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत जें राज्ययंत्र स्थापिलें त्याचें हें फळ. या फलाबद्दल जर त्यांना अभिमान वाटत असेल तर तो खुशाल वाटूं द्या. माझी त्याला हरकत नाहीं. ते सामान्य माणुसच आहेत. येथें ते पैसे जमवायला, आपले खिसे भरावयाला आले आहेत. ठीक आहे; पण त्यांनीं ट्रस्टीपणाचें सोंग आणूं नये. या सोंगाला माझी हरकत आहे. ते जर ट्रस्टी असतील तर ते अशा प्रकारचे ट्रस्टी आहेत कीं जे दुसऱ्यानें विश्वासानें ठेविलेल्या द्रव्यापैकीं पैनपैहि गिळंकृत करीत असतात. खरोखरच हे ट्रस्टी आहेत काय? मला वाटत नाहीं ते आहेत म्हणून. परवांच, कॅबिनेट मिनिस्टर असलेले एक गृहस्थ सर जॉयसन हिक्स आपल्या भाषणांत म्हणाले कीं, 'आम्हीं हिंदुस्थान तरवारीनें जिंकलें व

तें तरवारीनेंच राखणार. ’ महाराज, परवां, १९१८ सालीं ज्या वेळीं सध्यांच्या सुधारणांचा मसुदा तयार होत होता त्या वेळेस अँग्लो-इंडियनांचे एक प्रमुख पुढारी सर जॉन चेस्नी यांनीं ‘ इंडिया अंडर एक्सपेरिमेंट ’ या नांवाचें एक पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें होतें. या पुस्तकांत त्यांनीं स्पष्टपणें लिहिलें आहे कीं, “ हिंदुस्थाननें आम्हांला लोणी भाकर दिली; आम्हीं हिंदुस्थान आमच्या हातांतून जाऊं देणार नाहीं.” महाराज, हेंच सत्य आहे. मनुष्यैकवादित्वाची ऐट त्यांनीं आणूं नये, ट्रस्टीपणाचें सोंग आणूं नये; आपण सामान्य माणसें असें समजून आपलें जें कांहीं हित साधावयाचें असेल तें उघडपणें साधूं लागावें. आम्ही असहाय आहोंत हें मला ठाऊक आहे. लॉर्ड बर्कनहेड वस्तुस्थितीची जाणीव आम्हांस करून देऊं इच्छितात. आम्हांला त्याची जाणीव नाहीं काय ? या सरकारनें आम्हांस पौरुषहीन करून टाकलें आहे हें आम्हांस ठाऊक नाहीं काय ? आम्हांस पौरुषहीन केलें आहे इतकेंच नव्हे, तर आमच्या प्रकृतींत असें एक वीष भिनवून टाकलें आहे कीं ज्यामुळें आमचेच देशबांधव आम्हांस विरोध करतात व सरकारास पाठबळ देतात. हें सगळें आम्हांस ठाऊक नाहीं काय ? ब्रिटिशांची ही विवक्षित प्रकारें राज्य करण्याच्या पद्धतीला माझा विरोध आहे. सुधारणांच्या कार्यांच्या इतिहासाचें जर पर्यालोचन केलें तर असें दिसून येतें कीं, १९१७ सालीं ते जें बोलले तें कृतींत आणण्याचा त्यांचा हेतू नव्हता. ते आम्हांस बेताबाताचें तरी स्वराज्य देऊं इच्छितात काय ? छे, मुळींच नाहीं. ते आम्हांला चिरडून टाकीत आले आहेत, आमचे सर्व ठराव पायांखालीं तुडवीत आले आहेत, आम्हांला गुन्हेगारांप्रमाणें वागवीत आले आहेत. सामान्य गुन्हेगारांप्रमाणें आमचेवर पोलिसांची नजर ठेवण्यांत येते; आमचीं पत्रें फोडून वाचलीं जातात, आगगाड्यांतून आमच्या मागून मागून पोलीस ठेवण्यांत येतात, आणि असा प्रकार चालला असतां ब्रिटिश सरकारच्या मनांतून आम्हांस खरोखरच स्वराज्य द्यावयाचें आहे या गोष्टीवर आम्हीं विश्वास ठेवावा असें त्यांस वाटतें. महाराज, असल्या या पोकळ आश्वासनांवर माझा विश्वास नाहीं. हीं आश्वासनें पोकळ व खोटीं आहेत. आणि त्यामुळेंच सरकारनें जें सध्यां धूर्तपणें ब्रिटिश कमिशन नेमिलें आहे त्याच्या प्रामाणिकपणाबद्दल मला विश्वास वाटत नाहीं.......आतां माझ्या मुसलमान बंधूंना उद्देशून मला एकच शब्द सांगावयाचा आहे. त्यांना मला सांगावयाचें आहे कीं, ‘ बंगालची फाळणी ध्यानांत ठेवा, सेव्हरेसचा तह लक्षांत

आणा.' ब्रिटीश सरकारनें दिलेलीं कोणतींहि वचनें तुमच्या कामास येणार नाहींत. इस्लामनें तुम्हांला गुलाम बनून गोंडा घोळण्याचा, हांजी हांजी करण्याचा उपदेश केलेला नाहीं. मर्दाप्रमाणें पुढें होऊन या झगड्यांत सामील व्हा. या कमिशन-बरोबर या झगड्याचा शेवट व्हावयाचा नसून तो अव्याहत चालत राहावयाचा आहे. आमचें काम अत्यंत दुर्घट आहे हें मला ठाऊक आहे, पण मी तुम्हांला आश्वासन देतों कीं, वाटेल तें झालें तरी तें सर्व आम्हीं हंसतमुखानें सोसूं. आम्हीं ब्रिटिशांचीं आर्जवें करणार नाहीं कीं त्यांजकडे दया भाकणार नाहीं. त्याच वेळेला शक्य तेवढें करून, आम्ही आमच्या देशाचे मालक होऊं इच्छितों, मालक होण्याचा आम्ही दृढनिश्चय केला आहे व आमची भूक शमविण्याकरितां फेंकले जाणारे तुकडे आम्हीं मुळींच स्वीकारणार नाहीं, ही गोष्ट ब्रिटिशांना पटविण्याचा प्रयत्न करूं."

लालाजींच्या या भाषणानंतर निरनिराळ्या सभासदांचीं भाषणें झालीं. ठरा-वावर तीन दिवस वादविवाद झाला व तो मतास टाकल्यावर ६८ विरुद्ध ६२ मतांनीं पास झाला. हा निकाल ऐकून अँग्लोइंडियनांना मरणप्राय दुःख झालें, सरकारचे बगलबच्चे खट्टू झाले, सरकारी सभासदांचा जळफळाट झाला व सर-कारचे गृहमंत्री निकाल ऐकतांच एकदम खुर्चीत कोसळले. हा ठराव म्हणजे घमेंडखोर बर्कनहेडसाहेबांचें एकप्रकारें नाक ठेंचणेंच होतें.

१९२८ च्या आक्टोबरच्या ३० तारखेस सायमनसप्तक लाहोरास आलें. इतर शहराप्रमाणें लाहोरांत निषेधप्रदर्शक मिरवणूक निघाली. या मिरवणुकीचें नेतृत्व लालाजींनीं स्वीकारलें होतें. या दिवशीं पोलिस अधिकाऱ्यांनीं मिरव-णूक मोडून काढण्याचा विचार केला होता असें दिसतें. कारण मिरवणुकींत दंगा होण्याजोगें कांहींहि घडलें नसतां पोलिसांकडून मिरवणुकीवर लाठीचा हल्ला झाला. लालाजींवरहि प्रहार करण्यांत आले. हे प्रहार एवढे भयंकर होते कीं डॉ. सत्यपाल व इतर लोक यांनीं लालाजींभोंवतीं कडें केलें नसतें तर तेथल्या तेथेंच त्या दिवशीं विलक्षण प्रकार घडता ! पण जे प्रहार झाले तेहि अखेर हानिकारक ठरले.

मिरवणुकीनंतर निषेधप्रदर्शक सभा भरली. या सभेंत झालेल्या प्रकारास उद्देशून लालाजींनीं स्पष्टपणें सांगितलें कीं, "शांतताप्रधान मार्गांनीं आपला झगडा चालवाव-याचा हें आपलें अद्यापहि ध्येय आहे; पण सरकार जर अशाच तऱ्हेनें वागणार असेल, तर आमचीं तरुण माणसें आमच्या हातांतून सुटून देशाला स्वतंत्र कर-

ण्याच्या बाबतींत त्यांना जे मार्ग स्वीकारावेसे वाटतील ते त्यांनीं स्वीकारल्यास मला त्याबद्दल मुळींच आश्चर्य वाटणार नाहीं. तो दिवस पाहण्यास मी जिवंत असेन कीं नाहीं हें मला सांगवत नाहीं; पण सरकारनें तो दिवस उगवायला भाग पाडलेंच तर माझा आत्मा त्या झगड्यांत यश यावें म्हणून तुम्हांला आशिर्वादच देईल."

सभा आटोपून घरीं गेल्यावर लालाजींच्या छातींत असह्य वेदना उठूं लागल्या व शरीराला विलक्षण थकवा आला. त्या दिवसापासून त्यांची प्रकृति सारखी क्षीण होत चालली. वैद्यांनीं तपासणी करून अनेक औषधोपचार केले, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. १६ नोव्हेंबर रोजीं वेदनांचें प्रमाण अधिकच झालें व १७ च्या उजाडत जुलमी सत्तेशीं सतत तीस वर्षें झगडत असलेल्या त्या रणझुंजाराचा आत्मा जेथें कोणीहि दंडुकेगिरी गाजवूं शकत नाहीं, कोणीहि पाशांत जखडूं शकत नाहीं, कोणीहि प्रभुत्व चालवूं शकत नाहीं अशा त्या स्वतंत्रतेच्या साम्राज्यांत निघून गेला.

'मायभूमीसाठीं झगडत असतां मला मृत्यू यावा' असें लालाजी नेहमीं म्हणत असत. त्यांची ती इच्छा अखेर पूर्ण झाली! वीराचें मरण त्यांना आलें!!



पं. गुरुदत्त, एम्. ए.

## १. पंडित गुरुदत्त, एम्. ए.

आपल्या पंचवीस वर्षांच्या अल्पकालीन जीवनांत ज्यानें आपल्या प्रचंड बुद्धिसामर्थ्यानें साऱ्या पंजाबप्रांतावर छाप पाडून ठेविली, आपल्या विद्वत्तेच्या चुणुकेनें विलियम मॉनियर, पिनकॉट इत्यादि प्राच्यभाषाकोविदांना ज्यानें चकित करून निरुत्तर केलें, मॅक्समुल्लरसारख्या वेदवेदांगपारंगताला आपल्या वेदोपनिषदांच्या भाष्यांत चुका झाल्या असल्याचें ज्यानें कबूल करावयास लावलें, एवढ्याशा छोट्या जीवनांत ज्यानें अरबी, फार्शी, संस्कृत व इंग्रजी या भाषा करतलमलवत् करून सोडल्या, आर्यसमाजांत ज्यानें महर्षि दयानंदांच्या खालोखालचा दर्जा या अल्पकालांत प्राप्त करून घेतला, विद्वत्तेप्रमाणेंच वक्तृत्वकला ज्याच्यावर पूर्णपणें प्रसन्न होती, व तिच्या जोरावर ज्यानें डी. ए. व्ही. कॉलेजाला एकेका व्याख्यानांत शेंकडों रुपये मिळवून दिले, संपत्ति किंवा सत्ता यांची यत्किंचितहि हांव न धरतां ज्यानें आपलें छोटेंसें जीवन आर्यसमाजाच्या कार्यी लाविलें व तें कार्य करीत असतांनाच ज्यानें इहलोकाचा निरोप घेतला, नव्हे त्या कार्यभारामुळेंच ज्याचें इहलोकींचें जीवन इतक्या अल्पकालांत विराम पावलें, त्या पं. गुरुदत्तांचा जन्म ता. २६ एप्रिल १८६४ सालीं मुलतान शहरीं एका पिढीजात सरदारकुलांत झाला. यांच्या पूर्वजांनीं युद्धक्षेत्रावर आपलें रणकौशल्य दाखविलेलें होतें आणि एक वेळ बऱ्याच मोठ्या भागावर त्यांचें राज्यहि चालू होतें. ज्या वेळीं मुसलमान लोकांनीं भारतवर्षावर पहिल्याप्रथम स्वारी केली, त्या वेळीं या कुलांतील त्या वेळच्या राजा जगदीश यानें मुसलमानांचा मोठ्या शौर्यानें मुकाबला केला व आपल्या प्रजेचें रक्षण केलें. पण मुसलमानांची धाड एवढ्यानेंच थांबली नाहीं. त्यांचे हल्ल्यामागून

हल्ले चालू होते व त्यामुळें या शूर राजाला त्यांच्याशीं लढतां लढतांच आपला देह धारातीर्थी ठेवावा लागला. राजा जगदीशानंतर पुढें गुरुदत्तांच्या वडिलांपर्यंत या कुलांत शूर वीरांचीच मालिका लागलेली होती. गुरुदत्तांच्या वडिलांना मात्र क्षात्र-तेज दाखविण्याला संधि उरली नाहीं. यांच्या वडिलांच्या–लाला रामकृष्णांच्या–वेळीं इंग्रजी राज्याचा पाया घातला जाऊन सर्वत्र शांतता नांदूं लागली होती. लाला रामकृष्णांनीं फार्शी भाषेंत चांगली प्रवीणता मिळविलेली असून ते सरकारी शाळेंत अध्यापक होते. लालाजींची बुद्धि व स्मरणशक्ति तीव्र होती. शेवटीं शेवटीं त्यांनीं संस्कृताध्ययनास सुरवात केली व त्या भाषेचेंहि त्यांनीं चांगल्या प्रकारें ज्ञान करून घेतलें. लालाजींचा विवाह बाल्यावस्थेंत झाला होता. त्यांची पत्नी अशिक्षित असली तरी हुशार होती. लालाजींना पुष्कळ मुलें झालीं, परंतु त्यांपैकीं बरींच वारलीं. पं. गुरुदत्त हें त्यांचें शेवटचें संतान होतें. कैक मुलांच्या मृत्यूनें लालाजींची व त्यांच्या पत्नीची अवस्था चमत्कारिक झालेली होती. तीं शरीरानें व मनानें वृद्ध बनलीं होतीं; परंतु गुरुदत्तांच्या जन्मानें हळूहळू उभयतांचें दुःख कमी होऊं लागलें. असें सांगतात कीं, बरींच मुलें गेल्यामुळें गुरुदत्तांच्या वेळीं लालाजी आपल्या कुलगुरूला भेटण्यास गेले असतां त्या गुरूनें त्यांना आशीर्वाद देऊन पुत्रप्राप्ति होण्याकरितां परमेश्वराची प्रार्थना करण्यास सांगितलें. पुढें सुदैवानें गुरुदत्तांचा जन्म होतांच उभयतां पतिपत्नी त्यांना घेऊन गुरुजींकडे गेलीं. मुलाला पहातांच गुरुजींनीं त्याचें नांव 'मूला' म्हणून ठेविलें. कांहीं दिवसांनीं गुरुजींच्या सांगण्यावरून गुरुदत्तांच्या नांवांत "बैरागी" असें परिवर्तन झालें. गुरुजींच्या प्रसादानें आपल्याला पुत्ररत्नाचा लाभ झाला, असा लाला रामकृष्णांचा विश्वास असल्यामुळें त्यांनींहि या नामपरिवर्तनाला मान्यता दिली. लहानपणापासूनच पंडितजींची ज्ञानाभिलाषा प्रकट होत होती. लहानपणींसुद्धां निरनिराळे प्रश्न विचारून ते लालाजींना सतावून सोडीत असत; परंतु या प्रश्नांच्या सरबत्तीनें त्रासून न जातां लालाजी आपल्या मुलाचें यथाशक्ति समाधान करीत असत.

लाला रामकृष्ण अध्यापक असल्यामुळें पांचवें वर्ष लागण्यापूर्वींच त्यांनीं पंडित-जींना अक्षर ओळख करून दिली व हळूहळू उर्दू व फार्शी भाषाहि शिकविण्यास सुरवात केली. याप्रकारें देशी भाषा वाचण्यास शिकविल्यावर इंग्रजी भाषेची ओळख करून देण्याची लालाजींना इच्छा झाली; परंतु स्वतःला ती भाषा अव-गत नसल्यामुळें पुढें काय करावें हा प्रश्न त्यांच्यापुढें पडला. पण लालाजी

एवढयावरच थांबले नाहींत. त्यांनीं त्या काळचे शिक्षणखात्याचे डायरेक्टर कर्नल हालराईड यांनीं नवीन विद्यार्थ्यांकरितां म्हणून लिहिलेलें " How to speak English " हें पुस्तक विकत आणून स्वतः तें शिकण्यास आरंभ केला व स्वतःचें शिक्षण पुरें होतांच गुरुदत्तांना शिकविण्यास सुरवात केली.

आठव्या वर्षी त्यांना झंग येथील शाळेंत दाखल करण्यांत आलें. या वेळीं त्यांचें इंग्रजीचें शिक्षण वर्गांतील इतर मुलांच्या बरोबरीचें होतें, परंतु फार्शी व गणित या दोन विषयांत मात्र वर्गांतील इतर विद्यार्थ्यांच्या ते फार पुढें गेलेले होते. या शाळेंत असतांना चालू अभ्यासाबरोबर त्यांचें फार्शी ग्रंथांचें वाचन चालूच होतें. हें वाचन असेंच चालू राहिल्यामुळें या शाळेंतील शिक्षण पुरें होऊन ती सोडण्यापूर्वीच मौलाना ए रूमी, शमस् तरबेज, दीवाने हाफिज इत्यादि ग्रंथ त्यांनीं वाचून काढले होते. या पुस्तकांत नवयुवकांच्या नैतिक विकासाला हानिकारक भासणारे असे विचार असले तरी त्यांत असें कांहीं गूढ तत्त्वज्ञान भरलेलें आहे कीं, ज्याचा पौर्वात्य देशांत कैक शतकें आदर होत आलेला आहे. याखेरीज या पुस्तकांत असा कांहीं भाग आहे कीं, जो वाचीत असतांना वाचक स्वतःला विसरून जातो. गुरुदत्तांवर या पुस्तकांच्या वाचनानें फार परिणाम झाला व आकाशाकडे नजर लावून ते घटकान्घटका बसूं लागले. अशा वेळीं आजूबाजूस कितीही गडबड चालू असली तरी त्यांचें ध्यान विचलित होऊं शकत नसे. एक दिवस अशा प्रकारें आकाशाकडे नजर लावून बसले असतां त्यांच्या आईची तिकडे नजर गेली व मुलाचा हा विडेपिसेपणा पाहून ती त्याच्यावर रागावली. आईचा राग ओसरतांच गुरुदत्त म्हणाले, " आई, आकाशांत चमकणाऱ्या त्या ताऱ्यांकडे व इतर भिन्न भिन्न आकृतींकडे तरी पहा! या दृश्याकडे पाहिलें कीं या सर्वांचा निर्माता कोणीतरी असला पाहिजे असें वाटूं लागतें व अशा चमत्कृतिपूर्ण निर्मात्याला पाहाण्याची तीव्र उत्कंठा लागते. त्या निर्मात्याला पाहाण्याचा मार्ग शोधून काढण्यांत मी गुंग आहें. आई, तूंहि याच मार्गाला लाग. " यावर ती साध्वी काय बोलणार ? या वेळीं गुरुदत्त अकरा बारा वर्षांचे होते व या बालवयांतील त्यांचे हे विचार वाचले म्हणजे हा कोणी योगभ्रष्ट तर जन्मास आला नव्हता ना असें वाटूं लागतें.

शाळेंत असतांना गुरुदत्तांना कविता करण्याचा फार नाद होता. या वेळच्या त्यांच्या कविता सुंदर, सरळ व मोहक असून त्या तात्कालिक स्फूर्तीनें रचलेल्या

असत. असें सांगतात कीं एक वेळ एका लांबलचक उर्दू वाक्याचा त्यांनीं ताबड तोब फार्शी पद्यांत अनुवाद करून टाकला. परंतु पुढें काव्य बनविण्याकडे त्यांचें लक्ष राहिलें नाहीं. मिडल परीक्षा पास होतांच ते मुलतान येथें आले व तेथील हायस्कुलांत दाखल झाले. या वेळीं मसनवी मौलाना रूम हें त्यांचें आवडतें पुस्तक होतें. हायस्कुलांत असतांना परिक्षेंत नेहमीं त्यांचा नंबर वर असे व हेडमास्तर सरकार यांचें त्यांच्यावर फार प्रेम असे. वाचण्याचा त्यांना भारी नाद होता. मुलतान येथें असतांना त्यांनीं तेथील झाडून सारीं वाचनालयें पालथीं घालून सोडलीं. या शाळेंतील एक अध्यापक मास्तर दयाराम यांनीं गुरुदत्तांची धर्माकडील प्रवृत्ति पाहून त्यांना India in Greece व Bible in India हीं दोन पुस्तकें वाचावयास दिलीं. यापूर्वीं थोडे दिवस आधीं "आईने ए मजहिबे हनूद" नांवाचें पुस्तक त्यांच्या वाचण्यांत आलेलें होतें. या पुस्तकांत हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास दिलेला असून शिवाय हिंदुधर्मांतील उत्तमोत्तम तत्त्वेंहि ग्रथित केलेलीं आहेत. या पुस्तकाच्या वाचनानें त्यांनीं प्रणवाचा जप करण्यास सुरवात केली. जप करण्यांत कांहीं दिवस गेल्यावर त्यांना प्राणायाम करण्याची आवश्यकता भासूं लागली व लगेच त्यांनीं प्राणायामास सुरवात केली. परिणामतः पूर्वींच त्यांच्या ठायीं असलेली एकाग्रता फार प्रबल झाली. या वेळीं त्यांची एकाग्रता इतकी वाढलेली होती कीं एकदां एका ठिकाणीं त्यांचें मन लागलें कीं आजूबाजूला काय चाललें आहे याचें त्यांना भानहि राहात नसे.

हायस्कुलांत प्रवेश झाल्यावर इंग्रजी वाचनाकडे त्यांचें लक्ष लागलें. इंग्रजी पुस्तकांच्या वाचनानें हळूहळू त्यांच्यांत परिवर्तन होऊं लागलें. त्यांचीं मतें बदललीं, पूर्वींचा विश्वास गेला व पूर्वींची श्रद्धाभक्तिही उरली नाहीं. आस्ते आस्ते ते नास्तिक बनत चालले. फारशी ग्रंथांतील विचार त्यांना नुसते काव्यमय वाटूं लागले व त्यांच्यांत सत्याचा अंश फार कमी आहे असें त्यांचें मन त्यांना सांगूं लागलें. केवळ एकट्या गुरुदत्तांचीच अशी स्थिति झालेली नव्हती. सारा पंजाब पाश्चात्य कल्पनांनीं व विचारांनीं मोहित झालेला होता. बहुतेकांचा आपल्या धर्मावरील, चालीरीतींवरील व कर्मकांडावरील विश्वास उडून गेला होता व हें सारें थोतांड आहे असा समज होऊं लागला होता आणि प्रत्यहीं बरेच लोक येशूच्या कळपांत प्रविष्ट होऊं लागले होते. अशा क्रांतीच्या वेळीं एका महात्म्याचें पंजाबांत पदार्पण झालें. या महात्म्यानें जडवाद्यांच्या युक्त्यांचा धुव्वा

उडवून दिला. मुसलमान, पादरी किंवा हिंदु जे जे कोणी याच्यासमोर वादविवादास उभे राहिले किंवा याच्या धर्मप्रसारास आडवे आले ते ते पराभूत होऊन नाउमेद झाले. एकाच चकमकींत त्यांना या महापुरुषाच्या प्रतिभेची चांगलीच जाणीव झाल्यामुळें त्यांना स्वस्थ बसणें भाग पडलें. या महात्म्याचा उद्देश सत्य सनातन वैदिकधर्माचा प्रचार करणें हा होता. याच्या प्रचाराला आळा घालण्याकरितां कांहीं आंग्लविद्याविभूषितहि पुढें सरसावले; पण त्यांच्या पाश्चात्य विचारांचेंहि त्याच्यापुढें कांहीं चाललें नाहीं. अशा प्रकारें जुनेनवे पंडित हतबल झाल्यामुळें या महात्म्याचा जनतेवर प्रभाव पडला व येशूच्या कळपांत होणाऱ्या भरतीस ओहोटी लागली. पं. गुरुदत्तांचें लक्षहि या महात्म्यानें आपल्याकडे आकर्षून घेतलें. गुरुदत्तांचे मित्र पं. रैमलदास व लाला चेतनानंद हे या महात्म्याचे म्हणजे स्वामी दयानंदांचे शिष्य झालेच होते व पुढें पं. गुरुदत्तहि झाले. उपरिनिर्दिष्ट मित्रांनीं गुरुदत्तांना 'सत्यार्थप्रकाश' वाचावयास दिला व ता. २० जून (१८८०) ला गुरुदत्त आर्यसमाजांत प्रविष्ट झाले. आर्यसमाजाच्या इतिहासांत हा दिवस अति मंगल होता असें म्हणणें भाग आहे. कारण या दिवसापासून समाजाच्या उन्नतीला निराळें वळण लागलें व गुरुदत्तांच्या प्रचारामुळें समाजाला अनेक विद्वानांच्या सहानुभूतीचा व सहकार्याचा लाभ मिळाला.

प्रत्येक गोष्टीच्या मुळाशीं जाण्याची पंडितजींची वृत्ति असल्यामुळें समाजाचे सभासद होतांच त्यांनीं अष्टाध्यायी वाचण्यास सुरवात केली, व मदतीला एक पंडित देण्यास समाजाच्या कार्यकर्त्यांस सांगितलें आणि असें करतांना पंडित दिला न गेल्यास तुमच्या धर्मांत कांहीं राम नाहीं म्हणून समजेन, अशी धास्तीहि घातली. गुरुदत्तांच्या या मागणीप्रमाणें अक्षयानंद नामक पंडिताला त्यांच्या मदतीस नियुक्त केलें गेलें. पण या पंडिताकडून त्यांचें समाधान होऊं शकलें नाहीं. बिचारा पंडित शिष्याचे अनेक प्रश्नोपप्रश्न ऐकून चकित झाला व अशा शिष्यास शिकविण्यास आपण योग्य नाहीं हें समजून चुकला. शेवटीं या पंडिताबरोबर दीडेक अध्याय वाचून झाल्यावर त्याला रजा देण्यांत आली. यानंतर गुरुदत्तांनीं स्वतःच अध्ययनास सुरवात केली व या पुस्तकाचें सांगोपांग अध्ययन केलें. पुढें डॉक्टर वॅलेंटाइनकृत "Easy Lessons in Sanskrit Grammar" नांवाचें पुस्तक त्यांच्या पहाण्यांत आलें व त्याचेंही त्यांनीं

अध्ययन केलें. या पुस्तकानंतर त्यांनीं ऋग्वेदादि भाष्यभूमिकेचा संस्कृत भाग वाचण्यास सुरवात केली. मुलतान आर्यसमाजाच्या कार्यकर्त्यांचें गुरुदत्तांवर पूर्ण लक्ष होतें व एक वेळ आर्योद्देशरत्नमाला व ऋग्वेदादि भाष्यभूमिका या दोन पुस्तकांत त्यांनीं यांची परीक्षाहि घेतली. अस्तु.

शाळेंत असतांना इंग्रजी साहित्यांतील त्यांनीं मिल्टन, कौपर, शेक्सपीयर यांचे ग्रंथ वाचले; फारशी साहित्यांतील मसनवी मौलाना रूमी, हाफिज व इतर सुप्रसिद्ध ग्रंथांचें आलोडन केलें आणि अरबींतील सर्फ नहव व मरा नहव वाचून टाकले. भौतिक विज्ञान त्यांचा आवडता विषय होता; परंतु त्याबरोबरच तर्कशास्त्र, मनोविज्ञान व तत्वज्ञान इत्यादि विषयांवरील अनेक पुस्तकें वाचून काढलीं. चौदा पंधरा वर्षांच्या मुलाच्या दृष्टीनें हें सर्व अपूर्व होतें. शाळेंत असतांना अवांतर पुस्तकें वाचण्यांतच पुष्कळसा वेळ जात असल्यामुळें त्यांचा वर्गांत पहिला नंबर नसे हें खरें, परंतु त्यांच्यासारखा चौरस विद्यार्थी मात्र उभ्या वर्गांत एकही नव्हता. एंट्रंसमध्यें शिकत असतांना शेक्सपीयरच्या नाटकांतील उतारे ते इतक्या सफाईनें बोलत असत कीं, जणूंकाय नाटकांतच बोलत आहेत असें वाटावें. अशा वेळीं हावभाव, बोलण्याची शैली इत्यादि सर्व त्या त्या प्रसंगाला उचित अशीं असत. एकदां हेडमास्तरांनीं आपल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचें ठरविलें. या परीक्षेसाठीं त्यांनीं एका ग्रंथांतील उतारा अभिनयासह म्हणवून घेण्याचें ठरवून पांच रुपयांचें बक्षिस ठेविलें. उताऱ्याचे शेवटचे शब्द "Here it is" असे होते. बऱ्याच विद्यार्थ्यांनीं प्रयत्न केला, पण कोणीहि कसोटीस उतरूं शकला नाहीं. शेवटीं गुरुदत्तांना बोलावण्यांत आलें. त्यांनीं टेबलावर उभें राहण्याची परवानगी मागितली व ती मिळतांच उतारा म्हणून दाखविण्यास सुरवात केली. शेवटचे शब्द येतांच एकदम त्यांचा रागरंग बदलला व मुद्दाम त्याकरितां खिशांतून आणलेलें पुस्तक पुढें करून योग्य अभिनयासह "Here it is" हे शब्द त्यांनीं उच्चारले. लगेच प्रशंसासूचक टाळ्यांचा कडकडाट झाला व हेडमास्तरांनीं त्यांच्या पाठीवर शाबासकी देऊन बक्षिसाची रक्कम हातावर ठेविली.

गुरुदत्तांच्या केवळ प्रखर बुद्धीमुळेंच त्यांच्या शिक्षकांचें त्यांच्यावर प्रेम होतें असें नाहीं. याला दुसरेंहि एक कारण होतें व तें म्हणजे त्याची सत्यप्रियता. साऱ्या शाळेंत खरें बोलण्याविषयीं त्यांची प्रसिद्धि होती. कसल्याही प्रसंगीं व कोणत्याहि वेळीं ते खोटें म्हणून बोलणार नाहींत याविषयीं शाळेंतील एकूण एक विद्या-

र्थ्यांची व शिक्षकाची बालंबाल खात्री होती. विद्यार्थिदशेंत पुष्कळांना भलभलत्या संवयी जडतात; पण गुरुदत्तांना अशा प्रकारची कसलीहि संवय जडली नाहीं.

मुलतान येथें असतांना नास्तिक मताकडे त्यांचा कल झुकलेला दिसून येत असला तरी मधून मधून बालपणींच्या आस्तिक वृत्तीला ते बळेंच चिकटून राहूं पहात असलेले दिसून येत असत. साधुसंन्याशांच्या दर्शनाला जाण्याचा व त्यांच्याशीं बोलत बसण्याचा त्यांना नाद होता. एकदां आपल्या चुलत्याबरोबर मुलतान येथें आलेल्या एका संन्याशाच्या दर्शनाला ते गेले होते. या वेळीं उभयतांत पुढील संवाद झाला.

गुरुदत्त—महाराज, योग शिकण्याचा सर्वोत्तम विधी कोणता ? पातंजल योग-दर्शनांत दिलेला कीं दुसरा एखादा ?

संन्यासी—पतंजलीचाच. इतर सर्व स्वकपोलकल्पित आहेत.

गुरुदत्त—स्वामी दयानंदांविषयीं आपणांस माहिती आहे काय ?

संन्यासी—होय, जंगलांत आम्ही एकत्र रहात होतों. एक वेळ एका गांवांत आम्ही दोघे भागवत पुराण ऐकावयास जात असूं. भागवतांतील निरनिराळ्या वाह्यात गोष्टी ऐकून दयानंद संतापत असत. अशा वेळीं संन्याशांनीं रागद्वेषापासून अलिप्त राहिलें पाहिजे असें सांगून मी त्यांचें समाधान करीत असें.

गुरुदत्त—सर्व प्रकारच्या ज्ञानाचें बीज वेदांत आढळून येतें काय ?

संन्यासी—होय.

गुरुदत्त—वेदांत सैन्यसंचालन व व्यूहरचना कशी करावी याविषयींहि माहिती आहे काय ?

संन्यासी—होय. मी हें सर्व जाणतों; इतकेंच नव्हे तर माझ्याबरोबर सहा इसम जंगलांत येतील व त्या ठिकाणीं कांहीं काळ राहातील तर त्यांना रामायण व महाभारतकालीन सैन्यसंचालनाचें व व्यूहरचनेचें शिक्षणहि देईन.

गुरुदत्त—स्वामीजी, आपण कोण कोणते देश पाहिले आहेत ?

संन्यासी—बेरिंग, अलास्का वगैरे बहुतेक सारे देश पाहिले आहेत.

गुरुदत्त—या निरनिराळ्या देशांच्या भाषाहि आपणांस अवगत आहेत काय ? जर असतील तर रशियन भाषेंत थोडा वेळ बोला पाहूं.

संन्यासी—तुमच्यापैकीं कोणाला रशियन भाषा कळत नसतांना माझ्या बोलण्याचा काय उपयोग होणार आहे. आतां त्या भाषेंत व्यंजनें अधिक आहेत एवढें सांगितलें कीं पुरे.

एक दिवस खेळत असतांना एक मुलगा त्यांच्या पाठीवर थाप मारून पळत सुटला. गुरुदत्तहि त्याच्या मागें लागले. अशा प्रकारें पाठलाग करीत करीत ते शहराच्या वेशीबाहेर गेले. पुढें मारणारा मुलगा शहराबाहेरील झाडींत घुसला. गुरुदत्तांचें त्याच्याकडे लक्ष होतेंच. तेही त्या झाडींत घुसले. थोड्याच वेळांत वाटेंत एक भिंत आडवी आली. भिंतीवरून पलीकडे जावें कीं न जावें या विचारांत ते क्षणमात्र तेथें उभे राहिले व मनाचा निश्चय होतांच भिंत ओलांडून पलीकडे गेले. भिंतीपलीकडे जातांच तेथील एकंदर दृश्य पाहून ते थोडेसे घाबरले, पण मागें न फिरतां त्यांनीं पुन्हां त्या मुलाच्या पाठलागास सुरवात केली. इतक्यांत झाडींतून एक चमत्कारिक ध्वनी ऐकूं आला व त्या ध्वन्यनुरोधानें पाहूं लागतांच एक भलाभक्कम साधु त्यांच्या दृष्टीस पडला. या साधूचे डोळे फार तेजस्वी होते व त्याचा चेहरा असा होता कीं पाहातांच भय व आदर एकदम उत्पन्न व्हावा. साधु गुरुदत्ताजवळ आला व त्या ठिकाणीं येण्याचें कारण विचारूं लागला. गुरुदत्तांनीं खरी हकीकत सांगतांच त्यानें त्यांना भिण्याचें कारण नाहीं म्हणून धीर दिला व आपल्या झोंपडींत घेऊन गेला. झोंपडींत गेल्यावर या साधूनें त्यांच्या शिक्षणाची वगैरे चौकशी करून संस्कृतावर विशेष लक्ष देण्यास सांगितलें व पुढें योगाविषयीं बरीच माहिती करून देऊन आपण सांगितल्याप्रमाणें न वागल्यास घोर आपत्ति कोसळतील म्हणून धाक घातला. घरीं आल्यावर गुरुदत्तांनीं साधूच्या उपदेशाप्रमाणें वागण्यास सुरवात केली. या साधूनें दाखविलेल्या योगिक प्रक्रियेनें गुरुदत्तांच्या आत्मविकासास फार मदत झाली. असो.

१८८० सालीं ते एंट्रन्स पास झाले व पुढील सालीं जानेवारी महिन्यांत लाहोरास येऊन त्यांनीं सरकारी कॉलेजांत आपलें नांव दाखल केलें. या कालीं साऱ्या पंजाबांत फक्त एवढेंच एक कॉलेज होतें. यामुळें अखिल पंजाबांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरितां लाहोरास यावें लागत असे. डॉ. लाइटनर हे या वेळीं कॉलेजचे प्रिंसिपॉल होते. डॉक्टर महाशयांच्या नेतृत्वाखालीं या कॉलेजाची फार भरभराट झाली व तें लोकप्रियहि झालें. कॉलेजप्रवेशानंतर थोड्याच दिवसांत गुरुदत्तांनीं प्रोफेसरांचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें व त्यामुळें हायस्कुलाप्रमाणें कॉलेजांतहि त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें.

या दिवसांत ब्राम्हसमाजाचा बराच बोलबाला चालू होता. या बोलबाल्यामुळें ख्रिस्ती धर्माच्या तत्वांचें फार प्रस्थ माजलें व कोणत्याहि बाबतींत योग्यायोग्य

जाणून घेण्याकरितां अंतःकरणाला प्राधान्य दिलें जाऊं लागलें. या बाबतींत लोकांचा गैरसमज होऊं नये म्हणून गुरुदत्तांनीं Regenerator of Aryavarta पत्रांत एका लेख लिहिला. हा लेख वाचनीय असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग याखालीं दिला आहे.

" अंतःकरणप्राधान्याच्या बाबतींत ब्राम्हसमाजाचें सहजावबोधि संप्रदायाशीं साम्य आहे. या संप्रदायाचें असें मत आहे कीं आमच्यांत अशी एक शक्ति आहे कीं जी योग्यायोग्याचें–आमचे चक्षु जसें एखाद्या वस्तूचें परीक्षण करितात तसें—परीक्षण करूं शकते. ज्यांना हें मत मान्य नाहीं त्यांचें म्हणणें असें कीं या शक्तीला स्वतंत्र असें अस्तित्व नसून ती अनुभवानें, संगतीनें व शिक्षणानें उत्पन्न होत असते."

* * * *

"जर या शक्तीच्या आदेशाविरुद्ध कांहीं करतां किंवा बोलतां आलें नसतें किंवा आमच्या इतर शक्तींच्या परिवर्तनाबरोबर किंवा ऱ्हासाबरोबर या शक्तींत फरक घडून येत नसता तर हा प्रश्नच उद्भवला नसता. परंतु दुर्दैवानें तसें होत असलेलें दिसून येत नाहीं. उलट कैक वेळीं आमच्या ठायीं असलेली ही शक्ति बाह्य प्रभावानें व कार्यकारणानें इतकी लवकर प्रभावित झालेली दिसून येते कीं, 'हिच्या आदेशाप्रमाणें वागावें कीं काय' असा प्रश्न पुढें उभा राहतो, आणि अशा प्रसंगीं 'हिच्या आदेशानुसार वागणें इष्ट नाहीं' असें सांगणारे व त्याबरहुकूम वागणारे आजपर्यंत अनेक लोक होऊन गेले आहेत व सध्यांहि विद्यमान आहेत.

"ज्या सोमनाथाच्या मूर्तीपुढें हिंदु लोक श्रद्धेनें व भक्तिभावानें आपलें मस्तक नमवून तिची इष्टकार्यें सिद्धीस जावो म्हणून प्रार्थना करतांना आढळतात, त्याच सोमनाथाच्या मूर्तीचे मूर्तिभंजक महंमद तुकडे तुकडे करून नंतर परमेश्वरी आज्ञा आपल्या हातून पार पडल्याबद्दल मोठ्या श्रद्धेनें व भक्तिभावानें परमेश्वराची प्रार्थना करीत असलेला दिसून येतो. सोमनाथाच्या मूर्तीचें वंदन करणाऱ्या हिंदूच्या व त्या मूर्तीचे तुकडे करणाऱ्या मूर्तिभंजक महंमदाच्या मनःस्थितींत कांहीं फरक असेल असें मानण्याचें कारण नाहीं. यावरून ही शक्ति संसर्गानें उत्पन्न होत असते व संसर्गानें व शिक्षणानें ती पुष्ट होत जाऊन परिस्थित्यनुरोधें तिला वळण लागत असतें, असें म्हणणें भाग आहे.

"लहान मुलें खोटें बोलत असतांना जीं घाबरत असलेलीं दिसून येतात, त्याचें कारण आईबाप किंवा इतर मनुष्यें रागावतील किंवा अप्रसन्न होतील याशिवाय दुसरें काय आहे? इतर मनुष्यें नाराज होण्याचें भय किंवा इतरांना प्रसन्न करण्याची आशा आम्हाला वाटत नसेल, आमच्या ठायीं नरकाचें भय किंवा स्वर्गाची आशा नसेल, ईश्वरी आज्ञेविरुद्ध जाण्याची भीति किंवा ईश्वरी आज्ञेनुकूल चालण्याची आशा नसेल तर दुसरी कोणतीहि शक्ति आमचें नियमन करूं शकणार नाहीं."

हा लेख त्यांनीं १८८२ सालांत लिहिला. या वेळीं ते एफ. ए. मध्यें होते. इतक्या लहान वयांत 'अंतःकरणाच्या आदेशा'सारख्या गहन विषयावर इतक्या सांगोपांग रीतीनें लिहिणें सोपी गोष्ट नाहीं. पण यांत आश्चर्य मानण्याचें कांहींच कारण नाहीं; कारण हा वेळपावेतों त्यांनीं तत्वज्ञानाचे अनेक मोठमोठे ग्रंथ वाचून काढले होते व सुदैवानें त्यांची स्मरणशक्ति तीव्र असल्यामुळें त्यांतील तत्वें त्यांनीं आपलींशीं करून सोडलीं होतीं. वर्गांत असतांना ते प्रोफेसरांचीं व्याख्यानें एकाग्रतेनें ऐकत असत व त्यांतील मुख्य मुख्य भाग टिपून घेत असत. १८८३ सालीं ते एफ. ए. च्या परीक्षेला बसले व लाला लजपतरायांच्या म्हणण्याप्रमाणें वर्गाबाहेर अभ्यासाच्या पुस्तकांकडे फारसे पहात नसतांहि ते पहिले आले.

गुरुदत्तांचा आपल्या सहाध्यायांच्या व विशेषतः त्यांच्या मित्रांच्या जीवनावर व विचारांवर फार प्रभाव पडलेला होता. धार्मिक व तात्विक प्रश्नांची चर्चा करण्याकरितां एका समितीची स्थापना करण्याचें ठरवून १८८२ सालीं त्यांनीं आपल्या विचाराला मूर्तस्वरूप दिलें. सभासदांच्या सर्वसंमतीनें गुरुदत्तांनाच हिचे मंत्री नेमण्यांत आलें. या समितींत हिंदु, मुसलमान, ब्रह्मो, आर्यसमाजी वगैरे सर्व धर्मांचे लोक होते व प्रत्येक आपापल्या धार्मिक मताप्रमाणें प्रत्येक प्रश्नाचा विचार करीत असे. सभासदांची जिज्ञासा जागृत करण्याचें कार्य समिती करी व सभासद एकमेकांचीं मतें समजून घेण्याचा प्रयत्न करीत. या समितीचे आर्यसमाजी असे पुढील सभासद होते—लाला विश्वनाथ, लाला लजपतराय, लाला हंसराज, लाला सदानंद, लाला चेतनानंद, लाला रुचिराम, दिवाण नरेंद्रनाथ, पं. हरिकृष्ण, व पं. रामेश्वरनाथ कौल. समितीच्या सर्व सभासदांना गुरुदत्तांविषयीं आदर वाटत असे व बरेचसे त्यांच्या सद्भावनेनें प्रभावितहि झालेले होते.

या पुढील सालांत (१८८३) गुरुदत्त जवळ जवळ पक्के नास्तिक बनण्याच्या पंथास लागले; परंतु सुदैवानें त्यांची ही स्थिति फार काळ टिकली नाहीं. त्यांची

वृत्ति विचारी असल्यामुळें हळू हळू त्यांचें मन दुसऱ्या बाजूकडे झुकूं लागलें. या वेळीं त्यांच्या अंतःकरणांत या बाबतींत तुमुल युद्ध चालू होतें. त्यांच्या नास्तिकतेमुळें त्यांच्या अनेक मित्रांचाहि ईश्वरावरील विश्वास नाहींसा झालेला होता. याच सुमारास त्यांच्या एका मित्रानें त्यांना जनतेसमोर ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं स्वतःचे विचार ठेवा म्हणून लिहिलें असल्याचें त्यांच्या दैनंदिनीवरून दिसून येतें. आपल्या दैनंदिनींत त्यांनीं पुढील टिपण लिहून ठेवलेलें आहे—" लाला....... लिहितात कीं मी नास्तिक बनलों असल्याचें सर्व लोकांस एकदां स्पष्टपणें सांगून टाकावें." वर लिहिल्याप्रमाणें त्यांच्या विचारांत सुदैवानें फरक पडूं लागला नसता तर त्यांनीं या मित्राची सूचना अमलांत आणण्यास कमी केलें नसतें.

याच वर्षी मार्च महिन्यांत त्यांनीं एक विज्ञानश्रेणी स्थापन केली. हिचें कार्य डॉक्टर ओमन या सरकारी कॉलेजांतील विज्ञानाच्या प्रोफेसराच्या नेतृत्वाखालीं चाललें होतें. एका बाजूनें या श्रेणीचें काम चालू होतें, तर दुसऱ्या बाजूनें Regenerator of Aryavarta पत्राकरितां लेख लिहिण्याचेंहि काम चालूच होतें.

या सुमारास गुरुदत्तांच्या आयुष्यास निराळें वळण लावणारी एक घटना घडून आली. स्वामी दयानंद सरस्वति अजमीर शहरीं अत्यवस्थ आजारी असल्याची बातमी ता. ९ आक्टोबर रोजीं लाहोरास आली. लगेच लाहोर आर्यसमाजानें लाला जीवनदास व पं. गुरुदत्त या दोघांना अजमीरास पाठविलें. गुरुदत्तांच्या अजमीरास जाण्यानें गुरुदत्तांचेंच नव्हे तर आर्यसमाजाचेंहि कल्याण झालें. तेथें जाण्यानें त्यांच्या आयुष्यक्रमास निराळें वळण लागलें व आर्यसमाजाच्या इतिहासांत एका नव्या मनूचा प्रारंभ झाला. अजमीरास पोंचल्या वेळीं स्वामीजींची अवस्था फार कठीण झालेली होती. सर्वांगावर फोड उठले होते व त्या फोडांमुळें एका कुशीवरून दुसऱ्या कुशीवर वळणेंहि अशक्य होऊन गेलें होतें. परंतु अशा भयंकर स्थितींतहि स्वामीजींच्या मुखावर पूर्वीचेंच तेज व शांति झळकत असलेली दृष्टिगोचर होत होती. त्यांच्या चेहऱ्याकडे पाहाणारास अशा कष्टप्रद अवस्थेंतसुद्धां दुःखाचें किंवा कष्टाचें लवमात्रहि चिन्ह दिसून येत नव्हतें. स्वामीजींची ही अप्रतिम सहनशीलता व प्राणांतिक वेदनांविषयींची बेफिकिरी पाहून गुरुदत्त दिङ्मूढ झाले व गंभीरपणें कैक घटका महर्षींकडे नुसते पहात राहिले. स्वामीजींसारख्या महान् विभूतीकडे इतकें लक्ष वेधून जाण्याची गुरुदत्तांच्या आयुष्यांतील

ही पहिलीच वेळ होती. तसेंच या प्रकारानें स्वामीजींचें लक्ष त्यांच्याकडे लागण्याचाहि हाच पहिला प्रसंग होता. एका दृष्टीनें पाहतां दोन महान् आत्म्यांच्या मीलनाची ही वेळ होती, असें म्हटल्यास अनुचित होणार नाहीं. या प्रसंगानें गुरुदत्तांच्या ठायीं असलेलीं नास्तिकतेचीं पटलें नाहींशीं होण्यास सुरवात झाली व पुढें स्वामीजींच्या मृत्युसमयींच्या दृश्यानें तर तीं कायमचींच लुप्त होऊन गेलीं. अंतिम श्वास घेण्यापूर्वी स्वामींनीं आपल्या नोकरांस व लेखकांस शाली वगैरे दिल्या व प्रयाणाचा काळ अगदीं निकट येऊन ठेपतांच गुरुदत्तांशिवाय इतरांना बाहेर जाण्यास सांगितलें. या आसन्नमरणावस्थेंतहि स्वामीजींच्या प्रशांत मुखकमलावर एक अपूर्व तेज चमकत होतें. जणूं काय त्या महान् आत्म्याला या जगाची व त्यांतील सुखदुःखाची इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष मृत्यूचीसुद्धां पर्वा किंवा भीति वाटत नसावी, आणि जगच्चालकाच्या प्रत्यक्ष भेटीचा आनंद तो उपभोगीत असावा. शेवटीं 'परमात्मन् तुझी इच्छा पूर्ण होवो' इतके शब्द उच्चारून स्वामीजींचा आत्मा नश्वर कलेवर सोडून गेला. गुरुदत्त एकाग्रतेनें हें सर्व अवलोकन करीत होते. या दृश्याच्या अवलोकनानें त्यांच्या मनांतील सर्व प्रकारचीं संशयपटलें नष्ट झालीं व आमूलाग्र परिवर्तन घडून आलें. त्यांच्या नेत्रांसमोर सर्व गोष्टींत सत्यालाच प्राधान्य देणारा असा एक सत्यव्रती आत्मा निर्भयपणें मृत्यूला कवटाळीत होता व असें करीत असतांना त्याला कशाचीहि भीति वाटत नव्हती. उलट मोठ्या आनंदानें तो परलोकाच्या प्रवासास निघालेला आहे असें पहाणारास वाटावें. या दृश्याच्या अवलोकनानें त्यांचें मृत्यूविषयींचें भय नाहींसें झालें व मृत्यु म्हणजे केवळ स्थानांतर असून जे सत्याला प्राधान्य देऊन त्याप्रमाणें वागत असतात, त्यांना मृत्यूची भीति वाटत नाहीं इत्यादि गोष्टी त्यांना प्रत्यक्ष प्रमाणानें पटून गेल्या. यापुढें गुरुदत्तांनीं आर्यसमाजाच्या वाङ्मयाच्या अध्ययनास सुरवात केली. सत्यार्थप्रकाशाचीं त्यांनीं अठरा पारायणें केलीं. प्रत्येक पारायणाच्या वेळीं आपणांस नवीन नवीन गूढें उकलत गेलीं असें त्यांनीं एक वेळ म्हणून दाखविलें होतें.

स्वामीजींच्या निधनाची बातमी ताबडतोब तारेनें सर्व ठिकाणच्या समाजांस कळविण्यांत आली. या बातमीनें सारे आर्यसमाजी शोकसागरांत बुडून गेले. पुढें कांहीं काळपर्यंत आर्यसमाजांत निराशेचें वातावरण पसरून राहिलें होतें. वादळांत एखाद्या नौकेचा कर्णधार नाहींसा झाल्यावर त्या नौकेवरील लोकांची जशी

चमत्कारिक अवस्था होते, तशीच स्थिति या वेळीं साऱ्या आर्यसमाजीयांची झालेली होती. मोठमोठ्या आपत्तींच्या वेळींसुद्धां ज्यांचा धीर खचला गेला नाहीं किंवा ज्यांची शांतता ढळली गेली नाहीं असे लाहोर आर्यसमाजाचे आधारस्तंभ जे लाला सांईदास तेसुद्धां या प्रसंगीं उदास होऊन हतबल बनले. अशाप्रकारें चारी बाजूनें नैराश्याचें वातावरण पसरलें असतां एका सद्गृहस्थाच्या मनांत एक विचार उत्पन्न झाला व त्यानें तो आपल्या मित्रांस भीत भीत सांगितला. या सद्गृहस्थाला आपला विचार लोकांना कितपत मानवेल याविषयीं जबरदस्त शंका वाटत होती; पण प्रत्यक्ष प्रत्यय मात्र उलटा आला. तदनुसार लाहोर आर्यसमाजानें स्वामीजींच्या निधनानंतर एक आठवड्याच्या आंत स्वामीजींचें स्मारक करण्याचें नक्की ठरवून टाकलें; पण गुरुदत्त येईपर्यंत त्याला प्रसिद्धी मात्र दिली नाहीं. गुरुदत्तांचें आगमन होतांच त्यांना स्मारकाची योजना दाखविण्यांत आली. त्यांना ती पसंत पडली व त्यांनीं फुरसुतीप्रमाणें तिच्याकरितां काम करण्याचें कबूलहि केलें. लाहोरास आल्यानंतर लवकरच त्यांचें एक व्याख्यान झालें. या व्याख्यानांत स्वामीजींच्या अंतसमयींचें दृश्य त्यांनीं इतकें हुबेहूब वर्णन केलें कीं श्रोत्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. पुढें ८ नव्हेंबर ( १८८३ ) रोजीं स्मारकाची योजना जनतेसमोर ठेवण्यांत आली व लोकांनींहि तिला मान्यता दिली. या वेळीं गुरुदत्तांनीं जें भाषण केलें तें इतकें आवेशपूर्ण व अंतःकरणाला पीळ पाडणारें होतें कीं जागच्या जागीं स्मारकाकरितां ७००० रु. गोळा झाले.

यापुढें स्वामीजींच्या स्मारकाला मूर्तस्वरूप प्राप्त झालें असलें तरी त्यांच्या कायमच्या गमनानें आर्यसमाजाची झालेली हानी भरून येण्याचें चिन्ह दृष्टिगोचर होत नसल्यामुळें बऱ्याच लोकांच्या मनाला समाधान वाटत नव्हतें. कांहीं लोकांची अशी मनःस्थिति होती तर कांहीं लोक कॉलेजामागें लागलेले होते. गुरुदत्तांची मनःस्थिति मात्र कांहीं निराळीच होती. स्वामीजींच्या निधनानें ते शोकाकुल झालेले असले तरी इतरांप्रमाणें निराश होऊन गेलेले नव्हते किंवा स्मारकाच्या कोलाहलांतहि नव्हते. शांतपणें आत्मिक उन्नतीच्या मागें लागून राहिले होते. अशा प्रकारें बाह्य उपाधींपासून अलिप्त असा दोन वर्षांचा काल त्यांनीं व्यतीत केला व एक दिवस स्वामीजींच्या निर्वाणामुळें धर्मामृतपानाच्या बाबतींत हताश होऊन बसलेल्यांचें औदासिन्य घालविण्यास समर्थ होऊन ते पुन्हां कार्यक्षेत्रांत अवतीर्ण झाले.

१८८५ सालीं बी. ए. ची परीक्षा पास होतांच कॉलेजफंडाकरितां पंजाबांतील निरनिराळ्या ठिकाणच्या समाजांत त्यांनीं व्याख्यानें दिलीं व सुशिक्षित लोकांचें लक्ष कॉलेजाकडे वेधून घेतलें. विद्वत्ता, निर्मल चारित्र्य व बालकाप्रमाणें असलेली सरलता या त्यांच्या अलौकिक गुणांमुळें व्याख्यानाला लोकांची गर्दी होऊं लागली व कॉलेजफंडालाहि चांगली मदत मिळाली. फंडाकरितां मागणी करण्याच्या वेळीं त्यांच्या अंतःकरणांतील भावना त्यांच्या मुखावाटे बाहेर पडूं लागल्या, कीं श्रोतृसमुदायांतून पैशाचा वर्षाव होऊं लागे. अशा वेळीं पैशाभावीं कांहीं लोक वचनें देत तर कांहीं अंगावर असलेले दागदागिने देऊन टाकीत. आर्यपत्रिकेंतील खालीं दिलेल्या उताऱ्यावरून त्यांचीं व्याख्यानें किती परिणामकारी असत हें कळून येईल."यानंतर लाहोर आर्यसमाजाचे सुयोग्य सभासद पं. गुरुदत्त विद्यार्थी, बी.ए. हे बोलावयास उभे राहिले. त्यांनीं ऋग्वेदांतील एक मंत्र घेऊन त्याचा अर्थ विशद केला व या एकाच मंत्रांत वायूचे सर्व गुण कसे थोडक्यांत योग्य प्रकारें ग्रथित करण्यांत आलेले आहेत तें त्यांनीं श्रोत्यांना दाखवून दिलें. यापुढें वेदांतील प्रत्येक मंत्र असा गूढार्थवाचक असल्यामुळें वेदांचें अध्ययन केलें जाणें इष्ट व आवश्यक आहे असें त्यांनीं सांगितलें. नंतर ते म्हणाले, वेदवाद्यांची ही बाजू झाली. आतां जे लोक वेदांना कवडीमोल मानतात त्यांच्या दृष्टीनेंहि वेदांचें अध्ययन केलें जाणें कसें आवश्यक आहे तें पहा. अशा लोकांनीं वेदांचें अध्ययन केल्यास त्यांना त्यांचें म्हणणें जनतेसमोर सप्रमाण मांडतां येऊन वेदांचा फोलपणा सशास्त्र सिद्ध करतां येईल व असें झाल्यानें वेदांवरील लोकांचा अंधविश्वास नाहींसा होऊन त्यांचें इष्ट कार्य सिद्धीस जाईल. तात्पर्य कोणत्याहि दृष्टीनें पाहिलें तरी वेदांचें अध्ययन होणें इष्ट व आवश्यक आहे. यानंतर त्यांनीं डी. ए. व्ही. कॉलेजफंडाकरितां मागणी केली व त्यांच्या वक्तृत्वानें मोहून गेलेल्या लोकांनीं १०००० रु. त्यांच्या हवालीं केले."

पुढें थोड्याच दिवसांनंतर रावळपिंडी येथें त्यांचें व्याख्यान झालें. या व्याख्यानांत १६०० रु. जमले. यानंतर एप्रिल महिन्यांत पेशावरला त्यांचें जाणें झालें व तेथील व्याख्यानांत २६०० रु. गोळा झाले. पुढें कांहीं महिन्यांनंतर अमृतसर शहरीं त्यांची दुसरी खेप झाली व या खेपेस कॉलेजफंडाला मदत करणें हें प्रत्येक आर्यसमाजीयाचें कर्तव्य आहे असें त्यांनीं सप्रमाण प्रतिपादन केलें. या व्याख्यानानें जागच्या जागीं ९०८ रु. जमा झाले.

बी. ए. ची परीक्षा पास झाल्यावेळीं पुढच्याच वर्षी एम. ए. च्या परीक्षेला बसण्याचा गुरुदत्तांचा निश्चय होऊन गेला होता. परंतु या वर्षातील त्यांचा बराचसा काल कॉलेजफंडाकरितां व्याख्यानें देण्यांत, धार्मिक वादविवाद करण्यांत, जिज्ञासूंचें शंकासमाधान करण्यांत व बुद्धिबळें खेळण्यांत गेलेला दिसतो. तरीहि परीक्षेची वेळ येतांच पदार्थविज्ञान ( Physics ) हा विषय घेऊन ते परीक्षेला बसले व परीक्षेंत पहिले आले.

एम. ए. पास होतांच लाहोर येथील सरकारी कॉलेजांत ते असिस्टंट प्रोफेसर नेमले गेले. अशाप्रकारें जम बसल्यावर डी. ए. व्ही. कॉलेजाकरितां त्यांनीं पुन्हां कार्य करण्यास सुरवात केली. हळू हळू ते निरनिराळ्या ठिकाणच्या आर्यसमाजांच्या वार्षिकोत्सवांस जाऊं लागले. प्रत्येक ठिकाणच्या आर्यसमाजाला आपल्या वार्षिकोत्सवांत गुरुदत्तांचें एक तरी व्याख्यान व्हावें अशी उत्कट इच्छा असल्यामुळें निरनिराळ्या ठिकाणांहून त्यांना आमंत्रणांवर आमंत्रणें येऊं लागलीं, परंतु गुरुदत्तांनीं कोणाच्याहि आमंत्रणाचा निरादर केला नाहीं.

पुढें कॉलेजफंडाकरितां आग्रा-अयोध्या प्रांतांत एक डेप्युटेशन पाठविण्याचें निश्चित झालें. डेप्युटेशनकरितां निवडलेल्या इसमांत गुरुदत्तहि होते हें सांगावयास नकोच. परंतु ऐन वेळीं त्यांचे वडील आजारी पडल्यामुळें व त्यांना पाहाणारा दुसरा कोणी नसल्यामुळें डेप्युटेशनबरोबर त्यांचें जाणें झालें नाहीं. परंतु यामुळें गुरुदत्तांना फार वाईट वाटलें. याविषयीं त्यांनीं लाला लजपतरायांना दोन पत्रें लिहिलेलीं आहेत. पहिल्या पत्रांत ते लिहितात—"माझे वडील मुजफ्फरगड येथें आजारी पडले असून अति अशक्त झालेले आहेत. मी त्यांच्याजवळ जाऊन राहावें अशी त्यांची इच्छा आहे. सध्यां मी लाहोरास आहें व शक्य तें कार्य करीत आहें. त्यांना येथें आणावें तर खर्चाचें मान वाढणार. शिवाय ते मला आपल्याजवळून हलूं देणार नाहींत आणि तशा स्थितींत समाज किंवा अन्य कार्याकरितां बाहेर जातां न येऊन मी केलेली प्रतिज्ञा व्यर्थ ठरणार आहे. अशा प्रकारें एका बाजूला वडिलांची मनीषा व दुसऱ्या बाजूला समाजकार्य या दुहेरी अडचणींत सांपडल्यामुळें काय करावें हें सुचेनासें झालें आहे. प्रत्येक रजेच्या दिवशीं मुलतानला जाऊन येत असतों." दुसऱ्या पत्रांत ते लिहितात—"मुजफ्फरगड सोडतां येत नाहीं, हें पाहून फार वाईट वाटतें. सुटीचे सारे दिवस येथेंच जाणार असें वाटतें व बाहेर कोठें जाणें होईलसें दिसत नाहीं.

वडील फार आजारी आहेत व मी सतत त्यांच्याजवळ असावें असा त्यांचा आग्रह आहे. वडिलांना खुष ठेवण्याकरितां माझ्या किती प्रकारच्या कर्तव्यांना किती दिवस तिलांजली द्यावी लागेल हें समजत नाहीं. अशा स्थितींत मी काय करावें हें आपण सांगाल काय ? ''

याप्रमाणें १८८६ सालच्या उन्हाळयांतील सुटीचे बहुतेक दिवस वडिलांच्या शुश्रूषेंत गेले, पण त्यांच्या वडिलांची प्रकृति न सुधरतां उलटा रोग वाढतच गेला व बरें होण्याची आशाहि राहिली नाहीं. या वेळीं गुरुदत्तांनीं उपचार करण्याची पराकाष्ठा केली. शेवटीं सुटी संपण्याच्या सुमारास प्रकृतींत फेर पडूं लागला व लवकरच त्यांचे वडील बरे झाले. सुटी संपतांच गुरुदत्त लाहोरास आले.

१८८७ सालीं प्रो. ओमन (सायन्सचे प्रोफेसर) रजेवर गेल्यामुळें त्यांच्या जागीं गुरुदत्तांची नेमणूक झाली. प्रोफेसर झाल्यानंतरहि त्यांचें मन डी. ए. व्ही. कॉलेजाकडेच लागून राहिलेलें होतें.

मागील वर्षाप्रमाणें या वर्षीहि उन्हाळ्यांतील सुटीच्या दिवसांत कॉलेजफंडाकरितां डेप्युटेशन पाठविण्याचें ठरलें. हें डेप्युटेशन दौऱ्यावर निघण्याच्या थोडे दिवस आधीं दुर्दैवानें गुरुदत्तांचे वडील पुन्हां आजारी पडले व त्यामुळें या वेळींहि डेप्युटेशनबरोबर जातां येतें कीं नाहीं याविषयीं त्यांना काळजी वाटूं लागली. परंतु मागच्या खेपेच्या आजारीपणांत गुरुदत्तांच्या वडिलांनीं आपल्या मुलाची मनःस्थिति जाणली असल्यामुळें या खेपेला त्यांनीं गुरुदत्तांना जवळ राहाण्यास आग्रह केला नाहीं व त्यांना डेप्युटेशनबरोबर जाण्यास परवानगी दिली.

१८८७ च्या जुलई महिन्यांत डेप्युटेशननें लाहोर सोडलें. लाला लालचंद्र, एम. ए., लाला मदनसिंह, बी. ए., लाला द्वारिकादास, एम. ए., लाला लजपतराय, मियानीचे प्रसिद्ध कंट्राक्टर व जमीनदार लाला ज्वालासहाय व पं. गुरुदत्त असे सहा इसम या वेळच्या डेप्युटेशनांत होते. डेप्युटेशनाबरोबर जाऊन कॉलेजाकरितां आपल्या हातून कांहीं सेवा घडावी या उत्कंठेनें गुरुदत्त गेले खरे, परंतु वडील आजारी असल्यामुळें त्यांच्या काळजीनें त्यांचें चित्त घेरलेलें होतें. वडिलांची प्रकृति समजण्याकरितां ते सदोदित व्याकुल झालेले असत व दौऱ्यावर असेपर्यंत वारंवार घरीं तारा करून बातमी आणवीत असत. शेवटीं दौरा संपवून डेप्युटेशन लाहोरास परत आलें. लाहोरास आल्यावर लगेच त्यांना

रावळपिंडीचें निमंत्रण आलें व गुरुदत्त रावळपिंडी आर्यसमाजाच्या वार्षिकोत्सवास गेले. या वेळीं त्या ठिकाणीं दिलेल्या व्याख्यानाचे अंतिम शब्द याप्रमाणें होते—“ तुमच्या शरीरांत आत्मा आहे या गोष्टीवर जर तुमचा विश्वास असेल, देहपाताबरोबर तुमच्या जीवनाचा नाश होत नाहीं या तत्वावर तुमचा विश्वास असेल, उलट तुमच्या ठायीं असें एक तत्व आहे कीं जें देहपातानंतरहि कायम असतें यावर तुमचा भरंवसा असेल व या तत्वाची सदोदित उन्नति होत जावी अशी तुमची इच्छा असेल आणि केवळ ज्ञानानेंच या तत्वाची उन्नति होत असते हें तुम्हाला माहीत असेल तर ज्ञानप्रसारार्थ निर्माण झालेल्या डी. ए. व्ही. कॉलेजाला मदत करणें हें तुमचें आद्य कर्तव्य आहे. आत्मोन्नतीचें कार्य हें अखिल मानवजातीचें कार्य आहे. यासाठीं तुम्ही हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती कोणीहि असा अशा पुण्यप्रद कार्यांत हातभार लावणें हें तुमचें सर्वश्रेष्ठ कर्तव्य आहे. ” या मागणीनुसार जागचे जागीं कॉलेजफंडाकरितां रु. १२५३–४–० गोळा झाले.

रावळपिंडीहून लाहोरास आल्यानंतर थोड्याच तासांत वडिलांच्या निधनाची बातमी त्यांना समजली. लगेच तार पाठवून मुलतान येथील आपल्या जातभाईंना आपण येईपर्यंत दहनक्रिया करूं नका असें त्यांनीं कळविलें. त्यांच्या जातभाईंना हे पोंचेपर्यंत दहनक्रिया राहिल्यास वैदिक विधीप्रमाणें अंत्येष्टिसंस्कार करण्याची भानगड उपस्थित करतील अशी धास्ती पडली व ही बला टाळण्यासाठीं ते यांच्या आईपाशीं अंत्येष्टिसंस्कार करण्याकरितां शव मागूं लागले. आईनें गुरुदत्त येईपर्यंत तसें करण्याचें नाकारलें. गुरुदत्त पोंचल्यावर त्यांच्या जातभाईंनीं बरीच गडबड करून पाहिली, पण तिचा कांहीं उपयोग न होतां वैदिक विधीप्रमाणें एकंदर क्रिया उरकण्यांत आली.

वडिलांच्या निधनानें गुरुदत्तांवर घरादाराचा सर्व बोजा पडला व निरनिराळ्या प्रकारच्या घरगुती विवंचनांनीं त्यांना घेरून टाकलें. या सर्व भानगडींतून निभावून जाऊं पहात असतांनाच त्यांना लाहोर आर्यसमाजाच्या वार्षिकोत्सवांत कॉलेजफंडाकरितां व्याख्यान देण्यास सांगण्यांत आलें. कॉलेजावर त्यांचें निस्सीम प्रेम असल्यामुळें त्यांनींहि कबूल केलें. या वेळचें त्यांचें भाषण चिरस्मरणीय असें झालें. या भाषणाचा सारांश देण्याचें काम स्वतः गुरुदत्तच करूं शकतील; येरागबाळांकडून तें होणें नाहीं. या वेळीं ते इतक्या गंभीरतेनें व सहजस्फूर्तीनें बोलत होते कीं तीन हजारांचा श्रोतृसमाज अगदीं शांततेनें व एकाग्रतेनें त्यांच्या अमृतवाणीचें

पान करीत होता. या वेळचा त्यांचा प्रत्येक शब्द जणूं काय हृदयकपाटांतून बाहेर पडत आहे, असें वाटत होतें. त्यांचा चेहरा, त्यांच्या मुखांतून स्रवत असलेला वाक्प्रवाह हीं सर्व जें कांहीं ते बोलत आहेत त्याचा चित्रपट त्यांच्या मनःचक्षूंसमोर उभा आहे असें दर्शवीत होतीं. मधून मधून आपल्या मुद्यांच्या पुष्टीकरितां ते दयानंदांच्या आयुष्यांतील घटना सांगत होते. अशा प्रकारचें प्रभावशाली भाषण आपल्या क्वचितच ऐकण्यांत आलेलें आहे असे अनेकांनीं उद्गार काढलेले आहेत. अशा या अश्रुतपूर्व भाषणांत अनेकांच्या नेत्रांतून अश्रुधारा वहात होत्या.

या वर्षांतील अखेरीचे दिवस महत्वाच्या अशा धार्मिक विषयांवर व्याख्यानें देण्यांत गेले. या व्याख्यानांपैकीं तीन विशेष महत्वाचीं आहेत. 'जीवनाचा उद्देश', 'सत्य' आणि 'आर्यसमाज' हीं तीं तीन होत. याखेरीज अतिमहत्वाचें असें जें व्याख्यान झालें तें 'आध्यात्मिक जीवनाचें तत्व' हें होय. पुढें १८९० सालीं हें व्याख्यान पुस्तकरूपानें प्रकाशित करण्यांत आलें.

नवीन वर्षारंभाबरोबर (१८८८) गुरुदत्तांचें कार्य दुप्पट जोरानें चालू झालें. त्यांचा बराचसा वेळ लोकांत धर्म व नीति यांच्या तत्त्वांचा प्रचार करण्यांत जाऊं लागला. या वेळीं उपदेशाचा जणूंकाय वर्षावच चालू झालेला होता. सुशिक्षित लोक विशेषतः आर्यसमाजी सकाळ संध्याकाळ त्यांच्या घरीं येऊन वैदिक तत्त्वज्ञानांतील गूढ तत्त्वांविषयीं चर्चा करीत असत. हे वादविवाद प्रायः आनंदोत्साहानें परिपूर्ण असत व कैक तासपर्यंत चाललेले असत. गुरुदत्तांना विचारण्यांत येणारे प्रश्न विविध प्रकारचे व विविध शास्त्रांतील असत. अशा विविध विषयांवरील विविध प्रकारच्या प्रश्नांचीं उत्तरें देऊन समाधान करणें सोपी गोष्ट नव्हती. परंतु गुरुदत्तांची गति पदार्थविज्ञान, भूगर्भ, रसायन, वनस्पति, शारीर, ज्योतिष, गणित, तत्त्वज्ञान इत्यादि विविध शास्त्रांत चालत असल्यामुळेंच त्यांच्या हातून हें काम तडीस गेलें. या वेळीं कोणी त्यांच्याकडे शंकासमाधानासाठीं आला व त्याचें समाधान न होतां तो विन्मुख गेला असें एकही उदाहरण उपलब्ध नाहीं. या कामीं ज्ञानाबरोबर दुसऱ्याहि एका देणगीची जोड त्यांना लाभलेली होती. ती म्हणजे त्यांचें विभूतिमत्व. कैक लोकांचें त्यांच्या नुसत्या दर्शनानेंच समाधान होत असे.

गुरुदत्तांच्या आयुष्यांतील हा काल फार महत्वाचा असा गेला. या वर्षी मॉनियर विल्यमस् यानें लिहिलेल्या Indian Wisdom या पुस्तकावर टीका-

त्मक अशीं त्यांनीं व्याख्यानें दिलीं, स्वरविद्येचें अध्ययन केलें व वेदमंत्रांच्या उच्चारणाची शुद्ध रीत त्यांनीं प्रचलित केली. हें एकच कार्य त्यांच्या हातून इतकें महत्वाचें असें झालेलें आहे कीं त्यांनीं दुसरें कांहींहि केलें नसतें तरी त्या वेळच्या विद्वन्मण्यांत त्यांची गणना केली गेली असती. परंतु या सर्वांहून अमोल अशी जी कामगिरी त्यांनीं केली ती वैदिक धर्माचें खरें तेजस्वी स्वरूप दाखविणारें प्रतिपादन ही होय. पाश्चात्य विचारांनीं भाळून गेलेले सुशिक्षित लोक आर्यसमाजाच्या सिद्धांतांविरुद्ध अनेक आक्षेप घेत असत. अशा लोकांशीं त्यांच्याच शस्त्रास्त्रांनीं तोंड देण्याकरितां अशा एका विद्वद्वर्याची गरज होती कीं जो त्यांच्या आक्षेपांचें खंडन करूं शकेल, संशयी लोकांच्या वायफळ प्रश्नांचे सादर सहानुभूतिपूर्वक जबाब देऊं शकेल आणि हें सर्व करीत असतांना इतर सर्व धर्मांहून वैदिक धर्माचें महत्त्व सिद्ध करून दाखवूं शकेल. परमेश्वराच्या कृपेनें आर्यसमाजाला गुरुदत्तांच्या रूपानें अशा एका विभूतीचा लाभ झाला व तिनें हें काम उत्तम प्रकारें बजाविलें. त्यांच्या निर्भय प्रतिपादनशैलीमुळें प्रतिपक्षीसुद्धां त्यांची तारीफ करूं लागले. असो.

१८८८ च्या डिसेंबरांत लाहोर आर्यसमाजाच्या वार्षिकोत्सवाच्या वेळीं त्यांचें जें भाषण झालें तें चिरकालिक महत्वाचें आहे. ते म्हणाले, "आधुनिक विज्ञानांत कितीहि उपयुक्त गुण असले तरी मानवी जीवनाच्या समस्येवर तें कांहींसुद्धां प्रकाश पाडूं शकत नाहीं. मानवी आत्म्यांत संवेदना उत्पन्न करणाऱ्या सर्वांत महान् व गूढ प्रश्नांचा–मानवजातीच्या मूलकारणाचा व अंतिम परिणामाचा–उलगडा करण्यांत आधुनिक विज्ञान कांहींसुद्धां मदत करूं शकत नाहीं. आधुनिक वैज्ञानिक प्रत्येक नाडीची व हाडाची चिरफाड करूं शकेल, रक्ताच्या छोट्याशा बिंदूची प्राप्त असणाऱ्या भारींत भारी शक्तीच्या सूक्ष्मदर्शक यंत्रानें सूक्ष्मातिसूक्ष्म परीक्षा करूं शकेल, पण वरील प्रश्नांच्या बाबतींत त्याच्याकडून कांहींसुद्धां होऊं शकणार नाहीं. वाटल्यास शतकानुशतकें त्याला चिरफाड किंवा परीक्षा करीत बसूं दे, परंतु मानवी जीवनाच्या समस्येसंबंधानें त्याच्या ज्ञानांत या कार्यानें भर पडणें शक्य नाहीं. या समस्येचा उलगडा करण्यास त्याला वेदांची मदत घेणें अवश्य आहे. या अद्भुत रहस्याचा उलगडा वेदच करूं जाणतात व वैज्ञानिक लोकांना शेवटीं वेदांकडेच वळावें लागेल.

प्राचीन ऋषि वेदांना सर्व विद्यांचें आदिमूल मानीत असत–तें त्यांचें मानणें योग्य आहे–व वेदाध्ययनांत सदोदित मग्न असत. अशा या वेदाध्ययन-

प्रामुख्याच्या काळीं आर्यावर्तांत जी सुखसमृद्धि होती, तशी आजला कोठेंहि दिसत नाहीं. सुदैवानें वैदिक सूर्याचा त्याच्या मूळच्या तेजस्वी स्वरूपांत पुनरपि उदय झाला असून त्याला आच्छादून बसलेल्या ढगांना त्यानें छिन्न भिन्न करून टाकलें आहे. त्याला प्रस्तुतचें स्वरूप प्राप्त होण्यास महर्षि दयानंद सरस्वतींचे भगीरथ प्रयत्न कारणीभूत झालेले आहेत. प्राचीन ऋषि ज्या प्रकाशाचें सौख्य व आनंद उपभोगित होते, त्या प्रकाशाचें दर्शन स्वामीजींनींच पुन्हां आम्हाला करून दिलेलें आहे. चिरकालपर्यंत अंधारांत चांचपडत राहिल्यामुळें कांहीं लोकांना या प्रकाशाविषयीं भ्रम वाटतो व ते पूर्वीच्याच अंधारांत चांचपडत राहाणें बरें समजतात. अशा लोकांच्या भ्रमाचें आणि धर्मांध व दुराग्रही लोकांच्या धर्मांधतेचें व दुराग्रहाचें निराकरण करणें हें आम्हां अंधविश्वासाच्या गर्तेंतून बाहेर पडलेल्यांचें परमपवित्र कर्तव्य आहे. हें कर्तव्य पार पाडण्याचा एकच उपाय आहे. तो हा कीं ज्या संस्थांद्वारें भावी पिढ्यांना अज्ञानांधकारांतून पार पडण्यास योग्य असें ज्ञानदान केलें जाऊन त्यांना प्रकाशांत आणून सोडलें जाणार आहे अशा संस्थांना तनमनधनानें साहाय्य करणें हा होय."

याप्रमाणें हें सारें वर्ष गुरुदत्तांनीं निरनिराळ्या प्रकारचीं महत्वाचीं कार्यें करण्यांत घालविलें. या साऱ्या सतत परिश्रमांचा त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाला व त्यांच्या शरीरांत एका रोगानें आपलें ठाणें ठेवून दिलें व शेवटीं हाच रोग त्यांचें इहलोकींचें वास्तव्य संपुष्टांत आणण्यास कारणीभूत झाला. असो. त्यांची प्रकृति ढासळलेली पाहून अनेकांनीं त्यांना कांहीं दिवस विश्रांति घेण्यास सांगितलें व त्यांनींहि तसें करण्याचें कबूल केलें. परंतु वैदिक धर्मप्रसाराची तळमळ त्यांना इतकी लागून राहिलेली होती कीं तिनें त्यांना अशा रोगग्रस्त स्थितींतहि स्वस्थ बसूं दिलें नाहीं.

सुदैवानें किंवा दुर्दैवानें याच सुमारास अच्युतानंद, प्रकाशानंद, स्वात्मानंद व महदानंद असे चार संन्यासी गुरुदत्तांपाशीं येऊं लागले. या चौघांना वैदिकधर्माचीं तत्वें जाणून घेण्याची अति उत्कंठा होती; पण गुरुदत्तांखेरीज त्यांची ही मनीषा तृप्त करणारा दुसरा कोण होता ? गुरुदत्त यांच्याशीं फार आदरानें व प्रेमानें वागत असत. संन्यासीहि गुरुदत्तांच्या विद्वत्तेनें मोहून गेले होते. हळूहळू चौघेहि संन्यासी रात्रंदिवस गुरुदत्तांना सोडीनासे झाले. चौघेहि वेदांताचे भोक्ते होते, परंतु गुरुदत्तांसमोर त्यांचा वेदांत पार नाहींसा होऊन गेला. पुढें त्यांची जिज्ञासा तृप्त

होतांच ते वैदिक धर्मानुयायी बनले व वैदिक धर्मप्रचाराची इच्छा प्रगट करून पंजाब प्रतिनिधि सभा सांगेल त्याप्रमाणें कार्य करण्याचें त्यांनीं कबूल केलें. कांहीं कालपर्यंत चौघांनींहि मोठ्या उत्साहानें काम केलें; परंतु पुढें चौघांपैकीं दोघे सोडून गेले. या चारी संन्याशांची तत्त्वज्ञानपिपासा तृप्त करण्याकरितां गुरुदत्तांना भारी श्रम पडले. या चौघांचाच तेवढा गुरुदत्तांच्यामागें लकडा होता असें नाहीं. पुष्कळसे समाजी व इतर लोकहि या दिवसांत त्यांच्याकडे येत जात असत. यांपैकीं कांहीं शिकण्याकरितां, कांहीं मनोरंजनाकरितां तर कांहीं गुरुदत्तांच्या ज्ञानाचा ठाव घेण्याकरितां अशा निरनिराळ्या उद्देशानें येत असत. अशा प्रकारें निरनिराळ्या हेतूनें निरनिराळे लोक येऊन नाना प्रकारें गुरुदत्तांना प्रश्नोपप्रश्नांनीं भंडावून सोडीत असले तरी कोणालाहि त्यांनीं विन्मुख दडविलें नाहीं. उलट बरीच रात्र होईपर्यंत ते त्यांच्याशीं मोठ्या प्रेमानें बोलत बसत व प्रत्येकाचें समाधान करीत.

याविषयीं लाला लजपतराय लिहितात कीं "हे चारी संन्यासी गुरुदत्तांबरोबर अनेक दिवस राहिले व निरनिराळ्या धार्मिक बाबींवर त्यांनीं चर्चा केली. यावेळीं त्यांच्या घराला एकप्रकारें प्राचीन काळच्या ऋष्याश्रमाचें स्वरूप प्राप्त झालेलें होतें आणि अनेक लोक खरोखरच त्यांच्या गृहाला 'ऋष्याश्रम' असें संबोधित असत. अनेक लोक सत्यशोधनाकरितां त्यांच्याकडे येत व तृप्त होऊन परत जात. गृहस्थ, संन्यासी इत्यादि सर्व प्रकारचे व दर्जाचे लोक मानवी जीवनाच्या गूढ रहस्यांचा उलगडा करून घेण्याकरितां त्यांच्या घराचा रस्ता धरीत व समाधान पावून परत जात. याप्रमाणें वैदिक धर्मप्रचाराची अमोल कामगिरी करीत असतांनासुद्धां त्यांचें स्वतःच्या आत्मोन्नतीकडे दुर्लक्ष झालेलें नव्हतें. या वेळींहि त्यांचें अध्ययन सारखें चालूच होतें. दहा उपनिषदें, ऐतरेय ब्राम्हण, निरुक्ताचा कांहीं भाग, चरक, सूर्यसिद्धांत व पतंजलीचें महाभाष्य वगैरे ग्रंथ स्वामी दयानंदसरस्वतींच्या वेदाङ्गप्रकाशाच्या साहाय्यानें त्यांनीं वाचून काढले. स्वामीजींचे ग्रंथ त्यांना विशेष प्रिय होते. सत्यार्थप्रकाशांतील मुक्तिविषयक समुल्लास त्यांनीं अनेकवार वाचला होता व या प्रत्येक वाचनाच्या वेळीं स्वामीजीं-विषयींचा त्यांचा आदर सारखा वृद्धिंगत होत होता. या वेळीं दिवसें दिवस स्वामीजींविषयीं त्यांना वाटत असलेलें प्रेम व आदर हीं सारखीं वाढत चाललीं होतीं व १८८९ च्या मध्याच्या सुमारास त्यांच्या या भावना शिखरास जाऊन

पोंचल्या होत्या. असो. याप्रकारें वाचनांत व इतर कार्यांत गढून गेलेले असतांहि कोणाहि ज्ञानेच्छूला ज्ञानलाभ करून देण्यास त्यांनीं 'ना' म्हटलें नाहीं. ''

अशा प्रकारें सतत शक्तीबाहेर श्रम करीत राहिल्यामुळें त्यांच्या शरिरांतील रोग वळावला. या रोगानें त्यांची अवस्था कशी जर्जर करून सोडली होती हें त्यांच्या दैनंदिनींतील खालील उताऱ्यावरून कळून येईल.

१२ जानेवारी—कैक वेळां रक्त गेलें.
१४ जानेवारी—गुदद्वारें रक्त जात आहे.
२२ ,, —जास्त आजारी.
१ फेब्रुवारी—रोगाला सुरवात होत आहे.
१२ ,, —अधिक आजारी; रक्त जात असून अशक्ताहि वाढत आहे.
१ मार्च —अजीर्ण कायम आहे.
१६ ,, —जीव घाबरल्यासारखा होतो व नाकावाटे रक्त जातें.
१ आक्टोबर—गुदद्वारें बरेंच रक्त गेलें.
२ ,, —जीव घाबरल्यासारखा होतो.

त्यांची सहनशक्ति असामान्य असल्यामुळें इतरांस त्यांचें दुखणें समजून येत नसे इतकेंच. या वर्षाच्या अखेरीला त्यांची प्रकृति अजिबात बिघडून गेली होती, परंतु तशा स्थितींतहि त्यांचें कार्य चालूच होतें. बाहेरून पहाणारास त्यांच्या चेहऱ्यावर अशांततेचें नांवहि दिसून येत नसे व उलट ते आनंदांत असलेले दिसून येत, पण आंतून काय खळबळ चालू होती तें त्यांचें त्यांनाच माहीत.

आतांपर्यंतच्या त्यांच्या कार्यानें विशेषतः आर्यसमाजी लोकांत वैदिक वाङ्मयाच्या अध्ययनाची लालसा उत्पन्न झाली होती. परंतु उभ्या लाहोरांत गुरुदत्तांशिवाय दुसरा कोणीही त्यांची जिज्ञासा तृप्त करण्यासारखा नव्हता. पुढें लोकांचा तगादा वाढत चालला तसें कोणत्या ना कोणत्या उपायानें अशी व्यवस्था करणें अवश्य होऊन बसलें. अशा अडचणीच्या वेळीं स्वतःचें शरीरस्वास्थ्य बिघडून गेलें असतांहि गुरुदत्तांनीं हें काम स्वतःच्या अंगावर घेतलें व तें स्थायी करण्यासाठीं 'उपदेशक श्रेणी'ची स्थापना केली. सुरवातीला बरीच मंडळी येऊं

लागली, परंतु नेहमींच्या अनुभवाप्रमाणें पुढें हळू हळू कमी होऊं लागली. लाला नारायणदास, एम्. ए., एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांनीं संस्कृताध्ययनासाठीं तीन महिन्यांची रजा घेतली व ते या वर्गांत सामील झाले. या एकाच उदाहरणावरून लोकांची उत्सुकता किती प्रबळ झालेली होती तें दिसून येण्यासारखें आहे. हा वर्ग फार दिवस चालला नाहीं, परंतु जेवढे दिवस तो चालला तेवढया मुदतींत त्यानें अनेकांना संस्कृत भाषा शिकण्यांत मदत केली. वर्ग कितीहि दिवस चालेला असो, परंतु त्यानें गुरुदत्तांच्या जर्जरित शरीराला जास्त जर्जरित केलें हें मात्र खरें.

दरम्यान एकदोनदां गुरुदत्तांच्या मनांत वानप्रस्थाश्रम स्वीकारण्याचा विचार उत्पन्न झाला. परंतु त्यांच्यावर असलेल्या जबाबदारीमुळें त्यांना तो प्रत्यक्षांत आणतां आला नाहीं. या वेळीं त्यांच्याकडून अनेक लोकांना मदत मिळत असे व यांपैकीं कैक केवळ त्यांच्याच मदतीवर अवलंबून असलेले असे होते.

१८८९ सालीं एप्रिल महिन्यांत डॉक्टर ओमन (सायन्सचे प्रोफेसर) रजेवरून परत आल्यामुळें गुरुदत्तांची नेमणूक संपली. प्रोफेसराच्या जागेवर असेपर्यंत त्यांना चांगला तनखा मिळत असला तरी घरखर्चानंतर उरलेली रक्कम ते गोरगरिबांना देऊन टाकीत असल्यामुळें या वेळीं त्यांच्यापाशीं संचय असा कांहींच नव्हता. त्यांची ही परिस्थिति सर्वांना ठाऊक असल्यामुळें अनेकांनीं परोपरीनें त्यांना डायरेक्टराला भेटण्यास सांगितलें. परंतु ज्या व्यवसायानें आत्मोन्नतीस साहाय्य होत नाहीं असला व्यवसाय यापुढें न करण्याचा त्यांचा ठाम निश्चय झालेला असल्यामुळें त्यांनीं कोणाचेंहि म्हणणें मनावर घेतलें नाहीं. त्यांचे विचार कांहींहि असले तरी घरचा व आश्रित लोकांचा खर्च चालविला जाणें अवश्य आहे असें दिसून येतांच त्यांनीं 'वैदिक मॅगेझीन' नांवाचें एक मासिक पत्र काढण्याचें ठरविलें. असें एखादें पत्र निघाल्यास व तें गुरुदत्तांसारख्या चौरस विद्वानानें चालविल्यास त्याच्या योगें वैदिक धर्मप्रसाराला चांगलीच मदत होईल असें आर्य समाजीयांना वाटलें व त्यांनीं गुरुदत्तांना थोडीफार मदत केली.

या पत्राचा उद्देश वैदिक साहित्याच्या विविध भागांचा अनुवाद, सार, समालोचना व विवेचन करून लोकांची वेदांविषयींची वाढती जिज्ञासा तृप्त करणें हा असला तरी त्याबरोबरच वैदिक धर्माचीं उच्च तत्त्वें प्रतिपादून जगांतील इतर सांप्रदायिक धर्मांच्या—ज्यांत इतर धर्मानुयायांविषयीं यत्किंचितहि अनुकंपा नाहीं—

तत्त्वांशीं वैदिक धर्मासारख्या अखिल मानवजातीसाठीं निर्माण झालेल्या धर्मांच्या तत्वांची तुलना करून त्याचें खरें महत्त्व लोकांच्या नजरेस आणून देणें हाहि एक होता.

उपरिनिर्दिष्ट उद्देशानुसार लेख लिहिले जाणें सोपी गोष्ट नव्हती. असे लेख लिहिले जाण्यास लेखकाची योग्यता सामान्य असून चालण्यासारखें नव्हतें. बरें एखादा योग्य असा इसम मिळता तर त्याला त्याच्या श्रमाचा योग्य मोबदला देण्याला गुरुदत्तांजवळ पैसा नव्हता. अशा स्थितींत मासिक भरून काढण्यास गुरुदत्तांनाच परिश्रम करणें भाग होतें. मासिकांत येणारा लेख मासिकाच्या दर्जाला, उद्देशाला व नांवाला शोभण्यासारखा होण्याकरितां कोणत्याहि विषयावरील लेख लिहिण्यापूर्वीं त्या त्या विषयावरील निरनिराळ्या लेखकांचीं निरनिराळीं पुस्तकें वाचून काढणें अवश्य होतें. यामुळें या नव्या उपक्रमाकरितां त्यांना अति श्रम करणें जरूर होतें. याविषयीं लालाजी म्हणतात, "त्यांनीं प्रो. मॅक्समुल्लरचे सर्व ग्रंथ, न्याय, मीमांसा, वैशेषिक, योग, निरुक्त, स्वामी दयानंदांचें वेदभाष्य, पतंजलीचें महाभाष्य, मनुस्मृति आणि दुसरे अनेक ग्रंथ पुन्हां एकदां नजरेखालून घातले."

या एवढया अध्ययनाचे श्रम झेपण्यासारखी त्यांची अवस्था नव्हती. 'वैदिक मॅगेझिन'चा पहिला अंक जुलई महिन्यांत निघाला व त्याची हिंदुस्थानांत व इतरत्र अति प्रशंसाहि झाली; पण याकरितां पडलेल्या श्रमानें त्यांची प्रकृति खालावत गेली व यापुढें कांहीं दिवसांनीं 'आपल्यांतून चैतन्य निघून गेलें' अशा अर्थाचे उद्गार त्यांनीं आपल्या स्नेह्यांपाशीं काढले.

आगस्ट महिन्याच्या सुरवातीस त्यांना सर्दीनें गांठलें व पुढें लगेच खोकल्यानें व तापानें घेरलें. यांचा प्रतिकार करण्याचे प्रयत्न केले गेले परंतु सप्टेंबरपर्यंत त्यांचा जोर सारखा वाढतच होता. पुढें लाहोर येथें प्रकृति सुधारण्याचें कांहीं चिन्ह न दिसल्यामुळें त्यांना पहाडी हवेंत नेण्याचें ठरलें व या बाबतींत मरी हें ठिकाण निवडण्यांत आलें. या ठिकाणीं त्यांचे भक्त सरदार उमरावसिंह यांनीं त्यांची रहाण्याची वगैरे उत्तम व्यवस्था केली व एका चांगल्या डॉक्टराचें औषधहि चालू केलें. परंतु येथेंहि प्रकृतींत फरक पडण्याचें कांहीं चिन्ह दिसेना. येथें येऊन थोडे दिवस जातांच त्यांचा धष्टपुष्ट देह अत्यंत क्षीण झाला. याच

सुमारास पेशावर आर्यसमाजाच्या उत्सवाची वेळ आली. या उत्सवाला जाण्याचा गुरुदत्तांनीं निश्चय केला. वास्तविक इतका लांबचा प्रवास झेंपण्याइतकी त्यांना शक्ति नव्हती; पण त्यांच्या स्वभावाप्रमाणें एकदां निश्चय झाल्यावर त्या निश्चयांत फरक पडणें शक्य नव्हतें. स्नेह्यांनीं न जाण्याविषयीं त्यांना परोपरीनें विनविलें, पण कोणाचेंहि न ऐकतां ते निघून गेले. बरें तेथें गेल्यावर तरी स्वस्थ राहिले काय? नाहीं. त्यांनीं उत्सवांत भाग घेतला व वेदांवर एक अत्युत्कृष्ट व्याख्यान दिलें. उत्सवांतील सर्व भाषणांत त्यांचें भाषण उत्तम झालें खरें, परंतु त्यामुळें झालेल्या श्रमानें त्यांचा रोग दुणावला गेला व लाहोरास आल्यानंतर लवकरच ते बिछान्याला खिळून गेले आणि त्यांच्याकडून कांहींच होईनासें झालें. आक्टोबर महिना अखेरपर्यंत रोगाचें मान वाढतच होतें, पण शेवटीं शेवटीं थोडा आराम पडूं लागला. या वेळीं खुद्द गुरुदत्तांनासुद्धां रोगांतून बरें होण्याची आशा वाटूं लागली. अशा वेळीं त्यांनीं थोडे दिवस कांहीं न करतां स्वस्थपणें घालवावयास हवे होते. पण गुरुदत्तांचा स्वभाव त्यांना स्वस्थ बसूं देईना. थोडें बरें वाटतांच डी. ए. व्ही. कॉलेजाच्या व्यवस्थापक समितीच्या कार्यांत भाग घेण्यास त्यांनीं सुरवात केली. चांगलें बरें वाटूं लागण्यापूर्वीं करावयास लागलेल्या या श्रमांनीं पुन्हां रोगानें जोर धरला व पुनरपि ते अशक्त बनूं लागले. अशा स्थितींत त्यांना गुजराणवाला येथें नेण्यांत आलें व तेथें डॉ. फत्तेचंद यांच्या निरीक्षणांत ठेवण्यांत आलें. या ठिकाणीं गुरुदत्त बरेच दिवस होते. डॉ. फत्तेचंदांनीं उपचार करण्यांत शिकस्त केली, पण उपयोग होण्याचें कांहींच लक्षण दिसेना. पुढें पुढें गुरुदत्तांची स्थिति इतकी खालावली कीं बरें होण्याची आशाच राहिली नाहीं. शेवटीं त्यांना लाहोर शहरीं आणण्यांत आलें व एक हवाशीर बंगला भाड्यानें घेऊन तेथें त्यांना ठेवण्यांत आलें.

लाहोरास आल्यावर आपल्या वैद्यकीनें साऱ्या पंजाबांत प्रसिद्ध असलेले पं. नारायणदास वैद्य यांच्या उपचारांत गुरुदत्तांना ठेवण्यांत आलें. नारायणदासांनीं अनेक क्षयरोगी बरे केलेले होते व त्यांचें औषध सुरू झाल्यावर गुरुदत्तांच्या प्रकृतींत सुधारणाहि दिसूं लागली. पुष्कळांना आतां हे बरे होणार असें वाटलें, परंतु अचानकपणें रोगानें उलट खाल्ली. पुढें नारायणदासजींचें औषध बंद करून शेरअली नामक हकिमाला जालंदराहून खास बोलाविण्यांत आलें. लाला लजपतरायांच्या म्हणण्याप्रमाणें या हकिमाच्या औषधानें यक्षिणीच्या कांडीप्रमाणें

गुरुदत्तांच्या प्रकृतींत एकदम फरक घडवून आणला. हकिमाच्या औषधाच्या पहिल्या सप्तकानंतर सर्वांना वाटलें कीं गुरुदत्त आतां थोड्याच दिवसांत बरे होतील; पण त्यांच्या प्रकृतींत घडून आलेला हा फरक क्षणिक ठरला. कदाचित् दिव्याची ज्योत ज्याप्रमाणें विझतांना लखकन् प्रकाशते, तसेंच याहि बाबतींत झालें असावें. रोगानें पुनः पलट खाल्ली व तो सारखा वाढतच गेला.

१८ मार्चचा दिवस उगवला. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें व प्रत्येकाच्या मुखांतून 'आतां आशा नाहीं, आतां आशा नाहीं' असे निराशाजनक उद्गार बाहेर पडूं लागले. इकडे गुरुदत्तांची आत्मज्योति आस्ते आस्ते मंदावत चालली होती. याप्रमाणें अस्थिरतेंत सारा दिवस जाऊन संध्याकाळ झाली; सात, आठ दहा, बारा वाजले! बारा वाजून जातांच त्यांचें इहलोकींचें वास्तव्य अति शीघ्रतेनें संपुष्टांत येऊं लागलें. यानंतर दर पांच पांच मिनिटांगणिक नाडी तपासण्यांत येऊं लागली. मध्येंच गुरुदत्त या कुशीचे त्या कुशीवर झाले व वेदमंत्रांचें पठन करूं लागले. पुढें जवळ बसलेल्या आपल्या मित्राला—भक्त रैमलदास—ईशोपनिषद मोठ्यानें म्हणण्यास त्यांनीं सांगितलें. त्यांचें स्वतःचें वेदमंत्रोच्चारण चालूच होतें. याप्रमाणें वेदोपनिषदांच्या घोषांत काल व्यतीत होत होत सहा वाजले. साताचे ठोके पडले. सात वाजून जाऊन कांहीं मिनिटें होतात न होतात तोंच गुरुदत्तांचा आत्मा नश्वर कलेवर सोडून निघून गेला!

लवकरच ही बातमी लाहोर शहराच्या कोनाकोपऱ्यांतून ज्या ज्या ठिकाणीं आर्यसमाजी म्हणून रहात होता त्या त्या ठिकाणीं विजेप्रमाणें पसरली व सर्व आर्यसमाजी शोकसागरांत बुडून गेले. सुटी नसतांहि नऊ वाजण्यापूर्वींच त्यांच्या घराजवळ पांच सहाशें लोक जमले.

दहा वाजण्याच्या सुमारास पुढील तयारीस सुरवात झाली. महानिद्रेंत निद्रित असतांना गुरुदत्तांचा फोटो काढून ठेवावा असें कांहीं लोक म्हणूं लागले, तर कांहीं दहनविधीच्या वेळीं लोकसमुदायासह काढावा असें म्हणूं लागले; परंतु यापैकीं कोणाच्याच मनचा हेतू अवास्तव असल्यामुळें सिद्धीस गेला नाहीं. साडे दहा वाजतां प्रेतयात्रेला सुरवात झाली. या वेळीं सातशें लोक जमले होते. ही प्रेतयात्रा शामली बाजारांतून निघाली. जों जों ती पुढें पुढें जाऊं लागली तों तों लोकांची संख्या वाढूं लागली. बाजारांत रस्त्याच्या दुतर्फा गुरुदत्तांचें शेवटचें

दर्शन घेण्याकरितां लोकसमुदाय रांगेनें उभा होता. प्रेतयात्रेबरोबर लाहोर आर्य-समाजांची भजनमंडळी व डी. ए. व्ही. बोर्डिंग हाऊसमधील मुलें वेदघोष करीत होतीं व मधून मधून भजन गात होतीं. बाजारांतून प्रेतयात्रा जात असतां दुतर्फा घरांच्या गच्चीवरून प्रेतावर पुष्पवृष्टि चालू होती. एवढया अल्प वयांत अशी अलौकिक विभूति सोडून गेलेली पाहून सारें शहर हळहळत होतें. साडे बारा वाजण्याच्या सुमारास प्रेतयात्रा स्मशानांत जाऊन पोंचली. पुढें प्रेत ठेवण्याकरितां विधियुक्त वेदी तयार करण्यांत आली व चिता बनविण्यांत आल्यावर शवाला अग्नि देण्यांत आला. शेवटीं लाला हंसराजजींनीं समयानुकूल एक छोटीशी प्रार्थना केली व स्नान करून लोक जड अंतःकरणानें घरोघर निघून गेले.

सारें शहर व इतर ठिकाणची आर्यजनता शोकसागरांत बुडून जाण्याइतकें ज्या विभूतीनें लोकांना आपलें वेड लावलें तिच्या वृद्ध मातेची स्थिति काय वर्णन करावी ? बिचारीनें अनेक अपत्यांना जन्म दिला, पण त्यांपैकीं सारीं ईश्वरापाशीं जाऊन वृद्धपणीं त्या साऱ्यांच्या शोकाचा विसर पाडण्यास एकटे गुरुदत्तच राहिले होते. पण तेहि शेवटीं तिच्या डोळ्यांदेखत तिला असहाय स्थितींत सोडून गेले !

अनेक अपत्यांना प्रसवून तीं सर्व एकामागून एक जावीं आणि शेवटीं अखेरचें सर्वांची भरपाई करणारें असें कांहीं वर्षें जगावें, त्यानें तेवढया अवधींत आपल्या विद्वत्तेनें, सदाचारानें व जनसेवेच्या तळमळीनें साऱ्या लोकांस चटका लावावा व सर्व लोकांचे डोळे त्याच्यावर वेधून गेले असतां त्यानेंहि सोडून जावें अशा प्रकारचें दुःसह दुःख ज्या एखाद्या माउलीनें अनुभविलें असेल तीच माउली गुरु-दत्तांच्या वृद्ध मातेची मनःस्थिति जाणूं शकेल. इतरांस त्याची कल्पना होणें नाहीं.

आर्यसमाजीयांबद्दल काय लिहावें ? त्यांचा गुरुदत्तांवर किती भरंवसा होता, गुरुदत्तांविषयीं त्यांच्या काय काय अपेक्षा होत्या हें सांगणें अशक्य आहे. या-विषयीं लालाजींच्या शब्दांत "असा विद्वान् आर्यसमाज आजतागायत निर्माण करूं शकला नाहीं," एवढें सांगणें पुरे आहे.

याप्रमाणें साऱ्यांच्या आशा–अपेक्षांवर विरजण घालून आर्यसमाजरूपी नभो-मंडलांतील हा अतुलनीय तेजस्वी तारा क्षणभर चमकून लुप्त झाला ! ईश्वर करो आणि असे अनेक तारे आर्यसमाजांत चमकले जावोत.

—गुरुदत्त–लेखावलीच्या आधारें.

# गुरुदत्तांचा उपलब्ध लेखसंग्रह ( हिंदी भाषांतर )

१. The Terminology of the Vedas–वैदिक संज्ञाविज्ञान.

२. The Terminology of the Vedas and European Scholars ( वैदिक संज्ञाविज्ञान व पाश्चात्य विद्वान )–या दोन लेखांत पाश्चात्य विद्वान् वेदमंत्रांचा अर्थ कोणत्या कारणास्तव बरोबर करूं शकत नाहींत किंवा इच्छित नाहींत हें स्पष्ट केलें आहे. शिवाय या लेखांत वेदांचा अर्थ करण्याची शुद्ध आर्षशैली दाखविली असून मॉनियर विल्यम्स, मॅक्समुल्लर वगैरे पाश्चात्य पंडितांनीं वेदांचा अर्थ करतांना केलेल्या चुका दाखविल्या आहेत. वैदिक वाङ्मयाचा अभ्यास करूं इच्छिणारांच्या हे दोन्ही लेख उपयोगाचे आहेत.

३. Criticism on Monier William's 'Indian Wisdom'—मॉनियर विल्यम साहेबांनीं आपल्या 'इंडियन विज्डम' नामक पुस्तकांत वैदिक धर्मांतील दोष दाखवून व त्याची ख्रिस्ती धर्मांशीं तुलना करून ख्रिस्ती धर्माचें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला आहे. गुरुदत्तांनीं आपल्या या लेखांत मॉनियर विल्यम्सनें दाखविलेल्या वैदिक धर्मांतील उणीवांचें व दोषांचें सप्रमाण सयुक्तिक खंडन केलें असून वैदिक धर्म कसा सर्वांगपूर्ण व सर्वश्रेष्ठ आहे हें साधार सिद्ध केलें आहे.

४. Evidences of the Human Spirit—या लेखांत आत्म्याचें अस्तित्व नाकबूल करतांना अनात्मवादी जीं प्रमाणें पुढें करीत असतात त्यांचा फोलपणा दाखविला असून विज्ञानाधारें आत्म्याचें अस्तित्व सिद्ध केलें आहे.

५–६–७ ईश, मांडूक, मुंडकोपनिषद्–या तीन उपनिषदांचें गुरुदत्तांनीं केलेलें भाषांतर अनेक दृष्टींनीं अपूर्व आहे. विज्ञानाशीं परिचय नसल्यामुळें जुन्या विद्वानांना यांतील कांहीं वैज्ञानिक तत्वांचें सार कळत नसे व अशा प्रकारच्या मंत्रांचा ते शब्दाला प्रतिशब्द देऊन अर्थ करीत असत. उदाहरणार्थ मुंडकोपनिषदांत ( मुंडक १, खंड २, मंडल ४ ) अग्नीच्या सप्त जिव्हांचें वर्णन दिलें आहे. इतर विद्वान याचा शब्दशः अर्थ करून मोकळे झाले आहेत. विशेष खोलांत शिरण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत किंवा पडण्याचें सामर्थ्य नव्हतें. परंतु गुरुदत्तांनीं या सप्त जिव्हांचा Seven Zones of Burning Flame असा अर्थ करून एकप्रकारची सुसंगतता आणली आहे. प्रदीप्त अग्नीच्या सप्त मंडलां-

विषयीं सायन्स शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनासुद्धां माहिती असते, पण अग्नीच्या जिव्हा मात्र कोणीच पाहिलेल्या नाहींत. अस्तु. अशा प्रकारच्या अनेक नवीन गोष्टी गुरुदत्तांनीं केलेल्या या उपनिषदांच्या भाष्यांत आढळून येतील.

८. Vedic Texts—No. 1—Atmosphere या लेखांत त्यांनीं ऋग्वेदाच्या दुसऱ्या सूक्ताच्या पहिल्या मंत्राच्या आधारें आणि वायु शब्दाच्या व्युत्पत्त्यनुरोधें असें दाखविलें आहे कीं आधुनिक विज्ञानांत वायूचे हलका, गतिशील, कंपनाला फैलावणारा व वासाचें प्रसृण करणारा माध्यम इत्यादि जे गुण दर्शविले आहेत ते वैदिक साहित्यांतील 'वायु' शब्दावरून दिग्दर्शित होतात. परंतु इंग्रजी भाषेंतील wind शब्दावरून मात्र होत नाहींत.

Vedic Text No. 2—Composition of Water—या लेखांत ऋग्वेद सूक्त २, मंडल ७ हा मंत्र घेऊन व त्याचा अर्थ विशद करून दाखविलें आहे कीं या मंत्रावरून हैड्रोजन व ऑक्सिजन या दोन गॅसांच्या संयोगानें पाणी बनतें हें दिग्दर्शित करण्यांत आलेलें आहे.

Vedic Text No. 3—Grihastha—या लेखांत ऋग्वेदाच्या १० व्या सूक्ताचे कांहीं मंत्र घेऊन तद्वारा सुखमय आयुष्य व्यतीत करण्याला परमेश्वरानें वेदद्वारा कसा उत्तम उपदेश केलेला आहे हें दाखवून दिलें आहे. या लेखाच्या वाचनानें त्यांच्या अद्वितीय प्रतिभेची प्रतीति येते.

९. The Realities of Inner Life—या लेखांत गुरुदत्तांनीं तीन सिद्धांतांचें प्रतिपादन व स्पष्टीकरण केलें आहे.

१. आध्यात्मिक जीवन हेंच एक यथार्थ व खरें जीवन आहे. सांसारिक फंदांत पडलेला मनुष्य परमेश्वराच्या स्वरूपाचें योग्य आकलन करूं शकत नाहीं व त्याचा अनुभवहि घेऊं शकत नाहीं.

२. बुद्धिप्रागल्भ्य व कोरडा तर्क या दोहोंनीं परमेश्वराचें आकलन करण्यांत असफल झाल्यामुळें प्रार्थनारूपी पेटंट औषधाची उत्पत्ति झाली.

३. या विश्वाचा निर्माता एक अदृश्य, अतुल, प्रतापी, सर्वव्यापक आणि या जगताचें सर्व शासक असें तत्व आहे.

गुरुदत्तांनीं या लेखांत असें सिद्ध केलें आहे कीं, परमेश्वराचा साक्षात्कार होण्यायोग्य बनण्याकरितां प्रार्थना हें साधन नसून बुद्धिविकास हेंच आहे. त्यांच्या मताप्रमाणें योग्य प्रार्थना तोच इसम करूं शकेल कीं जो स्वतःला परमेश्वरी

आदेश प्राप्त होण्यालायक बनण्याकरितां असे प्रयत्न करील कीं जे सर्व ज्ञानाचा स्रोत जो परमेश्वर त्याच्या मार्फत त्याच्या बुद्धीला गम्य होतील.

१०. Pecuniomania (संपत्तीची आग)—या लेखांत गुरुदत्तांनीं सधन संपत्तीच्या मागें लागून तिच्या प्राप्तीकरितां चालू असलेल्या धांवपळीमुळें जे अनर्थ घडत आहेत त्यांचें वर्णन केलें असूत नंतर 'अर्थकामेष्वसक्तानां धर्मज्ञानं विधीयते' या मनूच्या श्लोकाप्रमाणें संपत्तीमागें लागणें हें आध्यात्मिक व भौतिक अशा दोन्ही दृष्टीनें हानिकारक आहे असें सिद्ध केलें आहे. नंतर मनाचा मोठेपणा हीच खरी संपत्ती असून हेंच शाश्वत धन होय असें दाखविलें आहे. शेवटीं असल्या खऱ्या धनाचा जितका आदर केला जाईल तितका थोडा असून कोऱ्या संपत्तीला किंमत न देणें योग्य होय असें सांगितलें आहे.

११. A Reply to Mr. T. William's Letter on Idolatry in the Vedas "–टी. विल्यम यांच्या वेदांत मूर्तिपूजन असल्याबद्दलच्या आक्षेपांना उत्तर—पाद्री टी. विल्यम यांनीं एक लेख लिहून वेदांत मूर्तिपूजा आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. गुरुदत्तांनीं त्या लेखाला उत्तर म्हणून लिहिलेल्या या लेखांत पाद्री साहेबांनीं आपल्या मतपुष्ट्यर्थ पुढें आणलेल्या प्रमाणांचें व युक्त्यांचें साधार निराकरण केलें आहे.

१२. A Reply to Mr. T. William's Criticism on 'Niyoga' (टी. विल्यम यांनीं नियोगावर घेतलेल्या आक्षेपांना उत्तर)—टी. विल्यम्स साहेबांनीं नियोगावर लिहितांना दयानंद, वेद व एकंदर आर्यजातीवर शिव्यांचा वर्षाव केला आहे. असो. त्यांनीं घेतलेल्या आक्षेपांना पंडितजींनीं या लेखांत समर्पक उत्तर दिलें आहे. गुरुदत्तांच्या उत्तरानें पाद्रीसाहेब गार पडले.

१३. Vedic Text No. 1–Atmosphere (वेदवाक्य नं. १–वायुमंडल)—गुरुदत्तांनीं लिहिलेल्या या लेखावर टी. विल्यम्स यांनीं जे आक्षेप उपस्थित केले त्यांना या लेखांत उत्तर दिलेलें आहे.

१४. Mr. Pincott on the Vedas–वेदांविषयीं पिनकाटसाहेबाचें मत—इंग्लंडांतील पिनकॉट नांवाच्या कोणा एका साहेबानें वेदांवर एक लेख लिहिला व त्यांत वेदांत अनेक भ्रांतिमूलक गोष्टी आहेत असें खरडलें. गुरुदत्तांनीं या लेखद्वारें साहेबांच्या सर्व शंकाकुशंकाचें निराकरण केलें आहे.

## २. लाला हंसराज.

शिक्षणप्रसार हेंच आयुष्यांतील एकमेव ध्येय समजून ज्यांनीं आपलें सर्वस्व त्या कारणीं खर्चिलें अशा पंजाबांतील थोर पुरुषांत लाला हंसराज यांची प्रामुख्यानें गणना करण्यांत येते. एकोणिसाव्या शतकांतील राष्ट्रीय शिक्षणाच्या कल्पनेप्रमाणें पंजाबांत पहिल्यानें स्थापन झालेल्या व आपल्या कर्तबगारीनें श्रेष्ठत्वाचा मान पटकाविलेल्या एका प्रमुख शिक्षणसंस्थेचे हे जनक होत. ही संस्था म्हणजे लाहोर येथें स्वामी दयानंदांचें स्मारक म्हणून स्थापिलेली 'दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेज व स्कूल' ही होय. आज अविरत ४५ वर्षे ते या संस्थेची कायावाचामनेंकरून सेवा करीत आहेत.

लाला हंसराज यांचा जन्म हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या बाजवारा या निसर्गसुंदर व ऐतिहासिक शहरीं सन १८६१ सालीं झाला. यांच्या वयाच्या दहाव्या वर्षीं यांचे वडील वारले. यांचें पुढील पोषण व शिक्षण, त्यांचे वडील बंधु लाला मुल्कराज यांनीं केलें. यांची बुद्धि मुळचीच तरतरीत असल्यामुळें, प्राथमिक अभ्यास पुरा झाल्यावर अवघ्या चार वर्षांत मॅट्रिक्युलेशन परिक्षेपर्यंतचा अभ्यास करून यांनीं परीक्षेंत उत्तम प्रकारचें यश मिळविलें. परीक्षा पास झाल्यावर, घरची परिस्थिति प्रतिकूल असतांहि, कॉलेजांत प्रवेश केला. याच ठिकाणीं पं. गुरुदत्त व लाला लजपतराय यांच्याशीं त्यांची मैत्री जडली. या मित्रत्रयीनें आपापल्यापरीनें आपल्या देशाचा इतिहास घडविला आहे.

कॉलेजांत असतां पंजाबांतील आर्यसमाजाचे पुढारी लाला सांईदास यांच्याशीं त्यांचा परिचय झाला व पुढें त्याचें शिष्यत्वांत रूपांतर झालें. सांईदासांस हंसराजांच्या बुद्धिमत्तेची व कर्तृत्वाची चांगलीच कल्पना आल्यामुळें त्यांस त्यांनीं हाताशीं धरून, पंडित गुरुदत्त यांच्या सहकारितेनें आर्यसमाजाच्या मतप्रसाराचें कार्य घडवून आणण्याचें ठरविलें. सांईदासांनीं या आपल्या दोन शिष्यांकरवीं हें कार्य कसें घडविलें त्यासंबंधींची विस्तृत हकीकत लाला लजपतराय यांनीं आपल्या जीवनकथेंत विस्तारपूर्वक दिली आहे.

१८८३ सालीं आर्यसमाजाचे जनक स्वामी दयानंद हे जोधपूर येथें निवर्तले. त्यांच्या निर्वाणानंतर त्यांच्या कार्याला साजेल असें कांहीं तरी स्मारक उभारण्याचें पंजाबांत घाटूं लागलें. या वाटाघाटींतून 'दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेज व स्कूल' ही संस्था स्थापन करण्याचें ठरलें. संस्था स्थापण्याचें ठरल्यावर तिचें कार्य धडाडीनें चालविण्यास आजीव सेवक कोण मिळतील याची चर्चा सुरू झाली. हंसराज हे नुक्तेच बी. ए. झाले होते. त्यांनीं आपल्या वडील बंधूंच्या संमतीनें या संस्थेचें आजीव निर्वेतन काम करण्याचें जाहीर केलें. त्यांचे बंधु मुल्कराज यांनीं त्यांच्या कौटुंबिक खर्चाकरितां ह्यातीपर्यंत द. म. रुपये ५० देण्याचें कबूल केलें व तें त्यांनीं वर्षानुवर्षें चालविलें. या बंधुद्वयाच्या स्वार्थत्यागाला खरोखरच तोड नाहीं. विशेषतः हंसराजांनीं दारिद्र्याला ध्येयाकरितां आजन्म कवटाळण्यांत जें धैर्य दाखविलें तें तर अलौकिकच आहे.

हंसराजांनीं 'दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेजाला' वाहून घेतल्यापासून त्यांचेवर व संस्थेवर अनेक संकटें आलीं, पण ध्येयापासून यत्किंचितहि न ढळतां १८८६ सालीं ज्या निश्चयानें त्यांनीं कंबर कसून कामास सुरुवात केली त्याच निश्चयानें ते आज तेंच काम तितक्याच निश्चयानें करीत आहेत.

पंजाबांत आज जी सर्व तऱ्हेची क्रांति दिसून येत आहे त्याला 'दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेज' हें कारण आहे आणि 'दयानंद अँग्लो-वेदिक कॉलेज' म्हणजेच लाला हंसराज.

---

## ३. लालाजीविषयींच्या माझ्या आठवणी.

डी. ए. व्ही. शाळेच्या नवव्या वर्गांत असतांना पंजाबकेसरी लाला लजपतराय यांच्याशीं माझा पहिल्यानें परिचय झाला. त्या दिवसांत शाळा व कॉलेज दोन्ही एकाच इमारतींत होतीं. या वेळीं इंग्रजी भाषेंत बोलण्याचें मला वेडच लागलेलें होतें. रात्रंदिवस घरींदारीं, वेळीं अवेळीं, गरज असतां नसतां मी इंग्रजींत बोलत असें. लाहोरांतील पुष्कळसे लोक माझ्या या विचित्रतेमुळेंच मला ओळखूं लागलेले होते. तसेंच माझ्या या विक्षिप्तपणामुळें डी. ए. व्ही. शाळा व कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्यासुद्धां मी परिचयाचा झालों होतों. बोलण्याप्रमाणेंच इंग्रजी भाषेंतून व्याख्यान देण्याचाहि शौक मला जडलेला होता. माझीं व्याख्यानें ऐकण्यास कॉलेजांतील विद्यार्थीहि येत असत. अशा प्रकारें केवळ माझ्या या विक्षिप्तपणामुळेंच माझी इतकी प्रसिद्धी होणें, हें त्या वेळच्या दास्यवृत्तीचें सूचक होतें. डी. ए. व्ही. कॉलेजाकरितां फंड गोळा करण्याचाहि मी यत्न करीत असें. या वर्षी शंभर रुपये जमवून मी लालाजींच्या स्वाधीन केले. यामुळें लालाजी माझ्यावर खुष झाले, त्यांनीं मोठ्या प्रेमानें माझी पाठ थोपटली व माझ्या या कृत्याची चारचौघांत प्रशंसाहि केली. या प्रसंगामुळेंच लालाजींशीं माझा व्यक्तिशः परिचय झाला.

गुरुकुल पक्षांत सामील झाल्यावर एक दोन असे प्रसंग घडलेले आहेत कीं त्यांच्याशीं लालाजींचाहि संबंध आलेला आहे. त्या दिवसांत गुरुकुलपक्षानें स्त्रियांतील पडद्याची चाल बंद केली होती, परंतु कॉलेजपक्षाला तिची जरुरी

भासत होती. या दिवसांत लाला लजपतराय कॉलेजपक्षांत पूर्णपणें रंगून गेलेले असल्यामुळें तेसुद्धां पडद्याचें समर्थन करीत असत. या वर्षींच्या वार्षिकोत्सवांत वच्छोवाली समाजानें पडद्याला छाट दिली असल्यामुळें लालाजींनीं या गोष्टीचा निषेध केला.

* * *

या दिवसांत स्व. डॉक्टर जयचंद्र हे एक कट्टर समाजसुधारक होते. यांनींच पहिल्या प्रथम आपल्या घरांतून पडद्याची हकालपट्टी केली. डॉक्टर महाशय स्वतःच्या पत्नी ( गुलाबदेवी ) समवेत फिरावयासहि जात असत, आणि अशा वेळीं कैकदां त्यांचे मित्रसुद्धां त्यांच्याबरोबर असत. डॉक्टरसाहेबांनीं आपल्या घराशेजारीं स्त्रीपुरुषांना एकत्रितपणें खेळण्याकरितां एक टेनिसकोर्टहि तयार केला होता.

दुर्दैवानें थोड्याच दिवसांत गुलाबदेवी परलोकवासी झाल्या व डॉक्टरसाहेबांचा लालाजींची कन्या पार्वतीदेवी यांच्याशीं पुनर्विवाह झाला. पार्वतीदेवी आज हयात आहेत. आपल्या वृद्धावस्थेंतहि आज त्या जी देशसेवा बजावीत आहेत त्याचें मोल करणें शक्य नाहीं. या घटकेस त्या सरकारचा पाहुणचार उपभोगित आहेत. असो. या विवाहानंतर डॉक्टरसाहेबांना खिजविण्याच्या हेतूनें मी म्हटलें, " डॉक्टरसाहेब, आतां आपले सुधारकी चाळे बंद होतील. लाला लजपतरायांचे जांवई बनल्यामुळें आपल्यांत असें परिवर्तन होणें अवश्यंभावी आहे. आपले श्वशूर पडद्याचे पक्षपाती असल्यामुळें आपल्यालाहि आतां स्वतःच्या घरांत पडदा ठेवणें जरूर आहे."

माझे हे शब्द ऐकतांच डॉक्टरसाहेबांना आवेश चढून त्या भरांत त्यांनीं मला पुढील आमंत्रण दिलें: " येत्या रविवारीं संध्याकाळीं मी आपल्याला सपरिवार फिरावयास येण्याचें निमंत्रण देतों. त्या वेळीं माझी पत्नीहि आमच्याबरोबर फिरावयास येईल."

माझ्या मित्रांना मी ही बातमी सांगितली. रविवारीं आम्हीं दोघेहि आपापल्या पत्नींसह फिरावयास गेलों. भगिनी पार्वतीदेवी व मी बोलत चाललों होतों व डॉक्टरसाहेब आणि माझी पत्नी बोलत चाललीं होतीं. आमच्या या फेरफटक्या-विषयीं माझ्या मित्रांना बातमी कळल्यापासूनच त्यांच्यांत याविषयीं चर्चा सुरू झाली होती. रस्त्यांत माझा एखादा मित्र भेटतांच मी त्याच्याशीं भगिनी पार्वतीदेवींचा

" या लाला लजपतराय यांच्या कन्या असून डॉक्टर जयचंद्र यांच्या पत्नी आहेत " अशा प्रकारें परिचय करून देई व अशा प्रत्येक परिचयाच्या वेळीं पार्वतीदेवी हंसत असत.

आमच्या या रविवारच्या सफरीची बातमी इतक्यावरच न थांबतां तिची चर्चा फार दूरवर पसरली. लाला लजपतरायांची कन्या रामदेवबरोबर बिनपडद्यानें फिरावयास गेली, हा एक सार्वजनिक चर्चेचाच विषय झाला. बार रूममध्यें लालाजींच्या वकील मित्रांनीं त्यांच्याकडून यासंबंधाची खरी हकीकत समजून घेण्याची इच्छा दर्शविली. यावर लालाजी म्हणाले " ही बातमी खरी आहे व ही सर्व हकीकत मला माहित आहे." लगेच पुढें गंभीरपणें ते म्हणाले, "प्राचीन काळीं भारतवर्षांत पडद्याची चाल नव्हती, ऋषी दयानंद या चालीविरुद्ध होते, व मीहि आजपासून तिला उचित समजत नाहीं. "

या मामल्याला मी इतक्यावरच सोडलें नाहीं. चौथ्या दिवशीं भगिनी पार्वती-देवी माहेरीं गेली. मीहि त्याच दिवशीं संध्याकाळीं तिला भेटण्याकरितां म्हणून लालाजींकडे गेलों. जातांच त्यांनीं प्रेमळपणें विचारिलें, " आज इकडे कोठें ? "

मी—भगिनी पार्वतीदेवीला भेटण्याकरितां आलों आहें.

लगेच मंद स्मितपूर्वक त्यांनीं मला आंत जाण्यास सांगितलें. कांहीं दिवसांनीं पार्वतीदेवींशीं माझा परिचय वाढतांच 'आपण उच्च शिक्षण कां घेतलें नाहीं ?' असा प्रश्न मी त्यांना केला. यावर पार्वतीदेवींनीं उत्तर दिलें " माझे वडील भोळे अस-ल्यामुळें लाला हंसराजांच्या फंदांत सांपडून त्यांनीं मला उच्च शिक्षण दिलें नाहीं. हंसराजांनीं मात्र आपल्या मुलीला उच्च शिक्षण दिलेलें आहे." पार्वतीदेवींनीं मोठ्या कष्टानें ही गोष्ट सांगितली.

दुर्दैवानें डॉ. जयचंद्र परलोकवासी झाले. त्यांच्या निधनानंतर पार्वतीदेवी स्वतःच्या उणीवा भरून काढण्याच्या प्रयत्नास लागल्या व आजला त्या एक विदुषी बनल्या आहेत. याशिवाय त्या एक उत्कृष्ट राष्ट्रकार्यकर्त्याहि आहेत. वडिलांकडून वारसदारीच्या रूपानें त्यांना वक्तृत्वकला लाभलेली आहे व त्या बोलूं लागल्या कीं ऐकणारास स्वनामधन्य लालाजींचें स्मरण झाल्याशिवाय रहात नाहीं.

*　　*　　*　　*

सन १९०० सालीं बंगालच्या फाळणीनें बंगालप्रांतांत राष्ट्रीय चळवळ जोरानें सुरू झाली व तिचा प्रतिध्वनि इतर प्रांतांपेक्षां पंजाबप्रांतांत अधिक उमटला. याचें सर्व श्रेय लाला लजपतराय व सरदार अजीतसिंह या दोघांना आहे. लालाजी शहरवासियांचे पुढारी होते तर सरदार अजीतसिंह ग्रामीण जनतेचे होते. दोघांच्या प्रयत्नाचा परिणाम असा झाला कीं झोंपा काढीत असलेला पंजाब जागृत झाला व स्वराज्याच्या आंदोलनास लागला. या सुरू झालेल्या चळवळीनें लाहोरशहरीं 'भारतमाता सोसायटी'ची स्थापना झाली व राष्ट्रीय भावनांनीं भरलेलीं गाणीं गात गात लोक प्रतिदिनीं मिरवणुका काढूं लागले. या चळवळीचें प्रमाण पुढें इतकें वाढलें कीं प्रत्यक्ष इंद्राचें सिंहासन हादरलें गेलें. या दिवसांत सर डेनिसन एबिटसन पंजाबचे गव्हर्नर होते. त्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे या चळवळीच्या मुळाशीं लाला लजपतराय, सरदार अजीतसिंह व आर्यसमाज आहेत, असा रिपोर्ट केला. या रिपोर्टाचा परिणाम असा झाला कीं लाला लजपतराय व सरदार अजीतसिंह यांना पकडण्यांत येऊन हद्दपार केलें गेलें.

लालाजींच्या या प्रथम गिरफदारीचा दिवस आर्यसमाजाच्या इतिहासांत कायमचा अंकित होऊन राहील. लालाजी कॉलेजपक्षाच्या आधारस्तंभांपैकीं असल्यामुळें त्यांच्याबरोबर कॉलेजावरहि सरकारची वक्रदृष्टि होते कीं काय या धास्तीनें कॉलेजपक्ष घाबरून गेला. कॉलेजपक्षाच्या पुढाऱ्यांनीं विचार केला कीं लालाजी आतां कायमचेच गेले असल्यामुळें त्यांच्यासाठीं विनाकारण कॉलेजाला तरी संकटांत कां घाला? यामुळें त्यांनीं लालाजींचा 'पुष्कळ दिवसांपासून कॉलेजाशीं कसलाहि संबंध राहिलेला नव्हता' असें सांगण्यास सुरवात केली. डी. ए. व्ही. कॉलेजांतील एका प्रमुख सद्गृहस्थानें "पुष्कळ दिवसांपासून लालाजींचा कॉलेजाच्या व्यवस्थेंत किंवा कार्यांत हात नव्हता; याप्रकारें कॉलेज व आर्यसमाज या दोहोंशीं त्यांचा फारसा संबंध राहिलेला नसल्यामुळें त्यांच्या वैयक्तिक विचारांशीं उभय संस्थांचा संबंध जोडणें अयोग्य आहे." वगैरे वगैरे ट्रिब्यून पत्रांत भरकटून टाकलें.

या संकटाच्या वेळीं लालाजींचे जे आजीवन प्रतिपक्षी बनलेले होते, ज्यांना लालाजी सामाजिक प्रतिद्वंदी किंवा एक प्रकारें शत्रु लेखीत होते असेच लोक पुढें आले. या आपत्कालीं लालाजी आर्यसमाजी नसल्याचें कॉलेजपक्ष दर्शवूं लागला तर गुरुकुलपक्ष त्यांना आपले म्हणूं लागला. लालाजींच्या हद्दपारीनंतर

गुरुकुलपक्षाचे सर्वमान्य पुढारी महात्मा मुंशीराम यांनींच लालाजींना आर्यसमाजी म्हणून पहिल्याप्रथम जाहीर केलें. त्या दिवसांत राजकारणी लोकांशीं स्वतःचा संबंध दर्शविणें आजच्याप्रमाणें प्रशंसास्पद किंवा सोपें नव्हतें. असें असतांहि महात्मा मुंशीरामजींनीं त्यांना आर्यसमाजी म्हणून जाहीर केलें. त्यांच्या अनेक अनुयायांना त्यांचें हें करणें आपल्याच हातांनीं स्वतःवर आपत्ति ओढवून घेण्यासारखें भासलें. सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेटांत तीन पत्रें लिहून त्यांनीं लालाजींशीं स्वतःचा संबंध पूर्णपणें जोडून टाकला. त्या दिवसांत महात्मा मुंशीरामजींच्या ‘सद्धर्मप्रचारक’ साप्ताहिकाचा मी संपादक होतों. या पत्रांत ‘ही तुमच्या परीक्षेची वेळ आहे’ अशा मथळ्याचा मी एक लेख लिहिला व त्यांत लालाजींची बाजू घेऊन त्यांना हद्दपारीची शिक्षा ठोठावल्याबद्दल सरकारवर कडक टीका केली. या लेखामुळें सरकार माझ्यावर व मुंशीरामजींवर खटला भरणार असल्याची दाट अफवा पसरली. आम्ही दोघेहि तुरुंगांत जाण्यास तयार होतों, परंतु त्या वेळीं आम्हाला तें सौभाग्य लाभलें नाहीं.

लालाजींच्या हद्दपारीनें हिंदुस्थानांत व इंग्लंडांत बरीच खळबळ उडाली. सरकारच्या या कारवाईविरुद्ध लोकांनींहि खूब चळवळ केली. शेवटीं सरकारला त्यांना सोडणें भाग पडलें.

हद्दपारींतून सुटून लाहोरास येतांच उभयपक्षांनीं एक होऊन त्यांचें स्वागत केलें. त्या वेळीं उभयपक्षांचे वार्षिकोत्सव चालू होते. नेहमींप्रमाणें या वेळींहि कॉलेजफंडाकरितां मागणी करण्यास त्यांना सांगण्यांत आलें. त्यांनींहि तें कबूल केलें; पण मागणी करतांना गुरुकुलाचीहि प्रशंसा केली. या वेळीं एकदां त्यांना भेटण्याकरितां मी गेलों होतों. भेट होतांच त्यांनीं मला प्रेमानें आशीर्वाद दिला व म्हणाले, “माझ्या गैरहजेरींतील एकंदर हकीकत मला कळून चुकली आहे. खरोखरच महात्मा मुंशीरामजींनीं खऱ्या आर्यत्वाचें उदाहरण घालून दिलें आहे. माझ्या अंतःकरणांतून आतां पक्षभेदाची भावना कायमची लुप्त होऊन गेली आहे.”

या वर्षी लालाजींनीं गुरुकुलपक्षीय आर्यसमाजाच्या वार्षिकोत्सवांतहि व्याख्यान दिलें. या व्याख्यानांत त्यांनीं स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, “माझ्यांत पक्षोपक्षाची भावना किंचिन्मात्रहि राहिलेली नाहीं. दोन्ही पक्ष मला सारखेच प्रिय आहेत.” या दिवसापासून त्यांचा गुरुकुल कांगडीशीं संबंध जडला व तो पुढें

दिवसेंदिवस वाढत गेला. अमेरिकेंत असल्यावेळीं त्यांनीं लिहिलेल्या 'आर्यसमाज' नांवाच्या पुस्तकांत "डी. ए. व्ही. कॉलेजाशीं माझा संबंध जनकाचा असून गुरुकुलाशीं प्रियकराचा ( Lover ) आहे" असें स्पष्टपणें लिहून ठेवलें आहे. खरोखरच गुरुकुलाविषयीं लालाजींची अशीच भावना होती.

* * *

लालाजींच्या ठायीं जी ज्वलंत देशभक्ति व असाधारण वक्तृत्वशक्ति वास करीत होती ती सहन करणें नोकरशाहीला शक्य नव्हतें. लालाजी बोलूं लागले कीं, पाषाणहृदयेंसुद्धां पिघळून जात असत. त्यांची देशभक्ति सांथीच्या रोगासारखी संक्रामक असल्यामुळें नोकरशाहीच्या कारस्थानांनीं त्रासून जाऊन त्यांना अमेरिकेचा रस्ता धरावा लागला. अमेरिकेंत असल्या वेळीं त्यांच्यांत एक परिवर्तन घडून आलें. वेदांविषयीं त्यांचे विचार संदेहात्मक झाले.

अमेरिकेहून परत आल्यावेळीं आर्यसमाजानें आपल्या या महान् नेत्याचा अपूर्व सन्मान केला. परंतु पुढें लौकरच लोकांना त्यांच्या व्याख्यानांत वेद हे ईश्वरीय ज्ञान आहेत याविषयीं त्यांच्यांत उत्पन्न झालेल्या संदेहाचा वास येऊं लागला. गुरुकुलपक्षीय मुखपत्र 'प्रकाश'नें लालाजींच्या या परिवर्तनावर टीका केली. पुढें आर्यसमाजांत याविषयींच्या चर्चेनें प्रचंड स्वरूप धारण केलें. 'प्रकाश'चे संपादक माझे जिवलग मित्र आहेत आणि लालाजींवर माझी श्रद्धा होती, यामुळें या बाबतींत लालाजींना स्वतः जाऊन भेटणें चांगलें असें मला वाटलें. तदनुसार मी लाहोरास त्यांच्या घरीं गेलों. भेट होतांच मी म्हणालों "वेद हे ईश्वरीय ज्ञान आहेत याविषयीं आपलें मत काय आहे ?"

लालाजींनीं लगेच याविषयींचे आपले विचार विस्तृतपणें सांगितले. तें ऐकून मी म्हणालों, "लालाजी, मला वाटतें वेद हे ईश्वरीय ज्ञान आहेत यावर जसा पाहिजे तसा आतां आपला विश्वास राहिलेला नाहीं; आतां तो अविश्वासाच्या सीमेपर्यंत गेलेला नाहीं एवढेंच."

लालाजींनीं माझें म्हणणें कबूल केलें व मी काढलेल्या त्यांच्या बोलण्याच्या निष्कर्षाची तारीफ केली. लगेच मी नम्रपणें पण सल्ला देण्याच्या हेतूनें म्हणालों– "अशा स्थितींत आपणाला आर्यसमाजाचे सभासद राहतां कामा नये. पण समाजावरील प्रेम मात्र कमी होऊं देऊं नये."

लालाजी सरळ स्वभावाचे होते. त्यांना माझें म्हणणें पटलें व त्यांनीं समाजाच्या सभासदत्वाचा राजीनामा दिला. त्यांच्या संमतीनें आमच्यांत झालेल्या या

संभाषणाचा सारांश मी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केला व लालाजींचे विचार स्पष्ट झाले असल्यामुळें त्यांच्यावर कोणाहि आर्यसमाजीयानें यापुढें टीका करण्याच्या भरीस पडूं नये अशी सूचना दिली.

पुढें आर्यसमाजाचे सभासद नसतांनाहि ऋषि दयानंदांवरील त्यांची असीम श्रद्धा कायम राहिली. ते नेहमीं म्हणत कीं मी गुरुडमचा विरोधी असलों तरी ऋषि दयानंदांना मी आपला गुरु मानतों. ज्यावेळीं १९२५ सालीं महात्मा गांधींनीं ऋषि दयानंदांवर कांहीं निराधार आक्षेप लादले त्या वेळीं त्या आक्षेपांविरुद्ध लालाजींनींसुद्धां जबरदस्त गर्जना केली, १९२७ सालीं सप्टेंबर महिन्यांत दिल्ली शहरीं आर्य कॉंग्रेसचें जें भव्य अधिवेशन भरलें होतें त्या अधिवेशनांतहि नगर-कीर्तनाच्या अधिकाररक्षणाच्या प्रस्तावाचें लालाजींनीं जोरदार शब्दांत समर्थन केलें, आणि स्वामी श्रद्धानंदांच्या दिव्य बलिदानाच्या प्रसंगीं आर्यसमाजाचें सांत्वन करणें त्यांनीं आपलें आद्य कर्तव्य मानलें.

*　　*　　*　　*

१९२१ सालीं पंचविध बहिष्काराची चळवळ जोरानें चाललेली होती. सुरवातीला लालाजी शाळा कॉलेजांवरील बहिष्काराविरुद्ध होते. परंतु नागपूर कॉंग्रेसच्या वेळीं पंजाबी लोकमतानें त्यांना आपलें वैयक्तिक मत बाजूला ठेवण्यास भाग पाडलें. नागपुराहून आल्यावर पहिल्यानें त्यांनीं डी. ए. व्ही. कॉलेजावरच मारा सुरू केला. डी. ए. व्ही. कॉलेजाकरितां लालाजींचे श्रम लाला हंसराजजींपेक्षां कोणत्याहि बाबतींत कमी नव्हते. त्यांनीं आपल्या आयुष्यांतील ऐन उमेदीचा अधिकांश काल कॉलेजाच्या सेवेंत घालविलेला होता. ज्या कॉलेजाकरितां त्यांनीं आपली शक्ति व धन खर्चीं घातलीं होतीं तेंच कॉलेज आतां ते बंद पाडण्याच्या प्रयत्नास लागले. लालाजींच्या चळवळीनें पहिल्या प्रथम डी. ए. व्ही. कॉलेजांत हडताळ पडला व नंतर इतर अनेक प्रमुख कॉलेजांत पडला.

याच दिवसांत लालाजींच्या प्रयत्नानें लाहोर शहरीं कौमी महाविद्यालयाची स्थापना झाली. याच्या मुख्य संस्थापकांत लालाजी व भाई परमानंद होते. या विद्यापीठाच्या शिक्षणसमितीचा ( Board of Education ) मीहि सभासद होतों. बोर्डाच्या एका सभेंत कौमी महाविद्यालयाऐवजीं राष्ट्रीय महाविद्यालय असें नांव ठेवण्यांत यावें अशा अर्थाचा मी एक ठराव आणला. परंतु भाई परमानंदांनीं—जे आजकाल मुसलमानांचे कट्टे विरोधी बनले आहेत—नांवांत एक तरी मुसलमानी

शब्द असणें अवश्य आहे अशा युक्तिवादावर त्याचा विरोध केला. यावर कौमी शब्दाशीं 'मुसलमानांचा कांहीं संबंध नाहीं, तो शब्द फार्शी किंवा अरबी आहे' असें मी उत्तर दिलें. लालाजींनींसुद्धां माझ्या ठरावाला अनुमोदन दिलें; परंतु त्या कालीं बोर्डाच्या सभासदांत भाई परमानंदांचें अति प्रस्थ असल्यामुळें माझा ठराव पास होऊं शकला नाहीं.

या कौमी महाविद्यालयानें आपल्या स्नातकांना (Graduates) बी. ए. पदवी देण्याचें ठरविलें होतें. यामुळें महाविद्यालयानें स्वभाषेंत पदव्या देणें योग्य आहे असा एक ठराव मी आणला. याचेंहि लालाजींनीं समर्थन केलें. परंतु एवढयानेंहि हा ठराव पास होऊं शकला नाहीं. कारण बोर्डाच्या सभासदांना दास्यवृत्तीनें इतकें भारून टाकलेलें होतें कीं स्वभाषेंत पदव्या देणें त्यांचें त्यांनाच हास्यास्पद वाटत होतें.

लालाजींत असीम गुण होते व या अमोल असीम गुणांमुळेंच 'पंजाबकेसरी' ही पदवी त्यांना लाभली.

—प्रो. रामदेव, आचार्य, गुरुकुल कांगडी.

( पंजाब केसरी, लाला लजपतराय, विशेषांक, १९३० )

REFBK-0004373

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
8373
दा. क्र.

# लाला लजपतराय यांचें वाङ्मय.

## उर्दु.

(१) तवारिख-इ-हिंद (भा. १)
(२) महाराज शिवाजी.
(३) महाराज अशोक.
(४) मॅझिनी.
(५) गॅरिबाल्डी.
(६) स्वामी दयानंद सरस्वती.
(७) भगवान श्रीकृष्ण.

## इंग्रजी.

(1) Young India.
(2) The United States of America.
(3) England's Debt to India.
(4) Arya Samaj.
(5) Political Future of India.
(6) The Evolution of Japan.
(7) The Problem of National Education in India.
(8) Unhappy India.
(9) India's Will to Freedom.

मुद्रकः—मं. ना. कुळकर्णी, कर्नाटक प्रेस,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.
प्रकाशकः—मं. ना. कुळकर्णी, मालक, भारत-गौरव-ग्रंथमाला,
३१८ ए, ठाकुरद्वार, मुंबई.